मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांच्या सूक्तिरत्नावलीतील सप्तदश यष्टी

समयोपदेश / सुबोध हिंदुधर्म

oooooooooooooooooooooooooooooooooooooooo

# गीताप्रवचने

oooooooooooooooooooooooooooooooooooooooo

## १. जगन्मान्य धर्म

### (धर्म-निर्मितीची वैश्विक प्रक्रिया)

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

### १. सर्वमान्य धर्माची कल्पना

आपण जगाकडे पाहिलें असतां दोन प्रकार दिसतात.

(१) प्रत्येक मनुष्य कोण्यातरी सामाजिक बंधनाने समाजाशी बद्ध आहे व अशा रीतीने समाजाशीं बांधून घेतल्याशिवाय त्याच्या जीविताची घटनाच करतां येत नाही.

(२) दुसरा प्रकार असा की तो मनुष्य त्याला अनुकूल असेल असेंच बंधन पाहून घेतो व वाईट किंवा प्रतिकूल बंधनाने तो समाजाशी बांधला जात नाही. म्हणजे प्रत्येक मनुष्यांत अनुकूल व प्रतिकूल निवडण्याची शक्ति असते.

* पहिल्या प्रकारच्या दृष्टीने तो जगताचा घटकावयव आहे व *दुसऱ्या दृष्टीने तो स्वतंत्र आहे.

* एका दृष्टीने तो समाजातला गणला जातो व

*दुसऱ्या रीतीने तो जर कुटुंबाचें हित करणारा नसला व समाजाच्या कल्याणाकरता झटणारा असला तर कुटुंबाच्या दृष्टीने वेडा गणला जातो,

* पण समाजाच्या दृष्टीने तो चांगला गणला जातो व

* केव्हा केव्हा समाजाच्या दृष्टीने तो वेडा ठरतो व साधु पुरुषाच्या दृष्टीने तो फार चांगला ठरतो.

याप्रमाणे मनाला ज्या रीतीने वळण द्यावें त्या दिशेने त्याची वाढ होते व





अमुक मनुष्य वेडा आहे किंवा शहाणा आहे हें जगांतील कोणत्याच कंडीशनने ठरवितां येत नाही.

मनाला चांगला वाटला तर चांगला व वाईट वाटला तर वाईट; तथापि कांही जरी घेतले तरी प्रत्येकांत क्रम दिसतोच.

टिपीकल जे वेडे असतात त्यांच्यातहि क्रम दिसतोच. ते एखादे वेळेला गाणें म्हणतात तेव्हा त्यांचे गाणें क्रमबद्धच असतें व याप्रमाणे त्यांच्यातले विकार क्रमबद्धच असतात. परंतु हें पुस्तक आहे, या पुस्तकावर आपली दृष्टि अशीच एकाग्र राहील असें सांगतां येत नाही पण प्रयत्नाने तशीच ठेवूं शकू व आपल्या मनात एखादी गोष्ट आली तर ती आपण प्रयत्नाने करूं; तसें वेडे मात्र करूं शकणार नाहीत.

याप्रमाणे जेव्हा एखादा मनुष्य आपले सर्व चित्त एकाच गोष्टीकडे लावतो तेव्हा तो वैषयिक दशेला सोडून त्यापेक्षा उंच दशेला जातो. त्याची मग नॉर्मल स्टेट नसतें. त्याचे विचार उंच असतात. जसा जसा मनुष्य आपलें चित्त इतर गोष्टीकडून काढून एकाच गोष्टीवर लावतो तसतसा तो या नॉर्मल स्टेटला सोडून सुपरनॉर्मल स्टेट मध्ये शिरतो.

उदाहरणार्थ, तुझी स्त्री मरण पावली आहे व तिच्याकडेच तुझें चित्त नेहमी लागलेलें आहे व त्यामुळे तुला ती नेहमी स्वप्नांत दिसते. अशी स्थिती जर वैषयिक गोष्टींविषयी आहे तर मग जगत्कारणाशीं मिळावयाचें असल्यास तें नॉर्मलस्टेटमधे कसे संभवेल? कोणतीही गोष्ट सोडावयाची असल्यास ती नॉर्मलस्टेटमधे कधीच सोडतां येणार नाही. तिच्यावर मन एकाग्र करून या नॉर्मलस्टेटच्या पलीकडें गेलें तरच ती सोडतां येईल. याची पुष्कळ उदाहरणें आहेत.

न्यूटन एकदा विचारांत गढला असता बटाटे धुण्याला देण्याऐवजी त्याने आपली घड्याळ धुवावयास दिली.

आर्किमिडीजने सोन्याची स्पेसीफिक ग्रॅव्हिटी (विशिष्ट गुरुत्व) शोधून काढली व तो या विचारांत इतका गुंग झाला होता की जेव्हा त्याचा प्रश्न सुटला तेव्हा तो नग्नच राजाकडे धांवत गेला व त्याची चोरी सांपडवून दिली.

कोणतीहि गोष्ट सोडविण्याकरिता कमी जास्त प्रमाणाने या नॉर्मलस्टेटच्या पलीकडे गेलें पाहिजे.

एका गृहस्थाला छर्‌रे करण्याची युक्ति स्वप्नांत सुचली.

ही गोष्ट वैषयिक बाबींबद्दल झाली.

## धर्माचे अन्तःस्फुरण

याचप्रमाणे धर्माच्या बाबतींतहि जर आपल्याला जगत्कारणाशीं मिळावयाचें आहे तर आपल्याला नॉर्मल स्टेट सोडून त्याच्यापेक्षाहि उंच उंच स्थितींत गेलें पाहिजे. स्वप्न हें फारच खालची स्थिति आहे. त्याच्यापेक्षाही उंच उंच स्थित्या आहेत.

* कित्येकदां मनुष्याला धक्का बसला असें वाटून त्याच्या प्रश्नांचे उत्तर सुचतें.

* कित्येकदां आपल्या मनालाच एकदम तसें वाटायला लागतें.

एवं कोणत्याहि रीतीने पाहिलें तरी मन एकाग्र होऊन नॉर्मल स्टेटला सोडून (लौकिक किंवा व्यावहारिक) सुपरनॉर्मलस्टेट मध्ये (अलौकिक दशेत) गेल्याशिवाय असे प्रकार होत नाहीत.

* बुद्धाला स्फूर्ति झाली म्हणतात.

* महंमदाला तशी वाणी ऐकूं आली असे म्हणतात.

* ख्रिश्चन धर्मात बापाने धर्म सांगितला असें म्हणतात. आता ईश्वराला बाप समजणें हें कांही नॉर्मलस्टेट मधले नव्हे.

हे लोक जगत्कारणापासून असे विचार आणत असतात व नॉर्मल स्टेटच्या वर असल्यामुळे इतर लोकांच्या दृष्टीने ते जरी वेडे ठरले, तथापि कोणी कांही म्हटलें तरी त्यापासून ते ढळत नाहीत.

आपल्या स्टेजमध्ये बरोबर असून जर कोणी कितीही म्हटले तरी ढळूं नये हे तत्त्व प्रत्येक धर्मात आहे. जगत्कारणाशीं, जसें जसें ते ऐक्य पावत जातात तसे तसे ते हायर टिचिंग्ज्स (उच्च ज्ञान) मिळवितात.

आता जगत्कारणाशीं ऐक्य होण्याकरता ज्या डीप-स्टेट मध्ये (सूक्ष्म-दशेंत) आपणाला जावें लागतें त्याची काही मर्यादा आपल्या धर्माशिवाय दुसऱ्या कोणत्याच धर्मांत दिलेली नाही व ज्या योगाने या स्थितींत जातां येईल अशा पुष्कळशा प्रक्रिया आर्य धर्मात सांगितल्या आहेत.

ही डीपस्टेट होतां होतां - जोपर्यंत ज्याच्यापासून आपल्याला टिचिंग्स् येतात तें व आपण, एक होत नाहीत, जोपर्यंत त्यांच्यात व आपल्यांत स्पेस असते, तोपर्यंत टिचिंग्स् येणें बंद पडतें.

आपल्या धर्मात सांगिलेलीं तत्त्वें नॉर्मलस्टेट मधून निघत नसतात म्हणून हे सिद्ध झाले की आपला धर्म काही नॉर्मलस्टेट मधून निघाला नसून सुपरनॉर्मलस्टेट मधून निघाला आहे व या सुपरनॉर्मलस्टेट मध्ये जाण्याचा उपाय म्हटला म्हणजे जगत्कारणाकडेच जाण्याचा प्रयत्न करून तिकडे जशी जशी एकाग्रता होईल तसे तसे परिस्थिति सोडत जाणें हा आहे.





## २. सर्व मनुष्यजातीचा धर्म कोणता होऊं शकेल ! ख्रिश्चन धर्म ?

या प्रश्नाचा उलगडा करण्यापूर्वी आपण थोडें सिंहावलोकन करून पाहूं व पुढचा स्थापना केला जाणारा सिद्धांत ख्रिश्चन धर्मांतून निघू शकतो की काय याचाही विचार करूं. ख्रिश्चन धर्मामध्ये ईश्वराला पिता मानतात. आर्यधर्मांत हा सिद्धांत पूर्वीचाच आहे.

आर्यधर्मांत नवीन असें इतर कोणत्याच धर्मांत नाही.

**''पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ॥'' गीता**

मनाचा स्वभाव असा आहे की जिकडे तें एक वेळ प्रेम करूं लागलें त्याकडेच तें आकर्षिलें जातें. जगत्कारणाशीं मन लावलें तर तिकडेच तें ओढल्या जातें.

मागे हेंहि सिद्ध झालेंच आहे की इतर रूपावर प्रेम करण्यापेक्षा जगत्कारणावर प्रेम करून त्याच्या प्रेमांत गुंग होणें इष्ट आहे व या ठिकाणीं नास्तिक व आस्तिक या दोघांचेहि मतैक्य दाखविलें आहे.

आता या प्रेमाचें स्टॅंडर्ड काय होईल? प्रिय वस्तूचा व आपला कधीच वियोग न होणे म्हणजे प्रेमाची सीमा झाली, हे स्टॅंडर्ड होतें. म्हणजे आपल्यामध्ये व प्रिय वस्तूमध्ये दोनपणा नसावा असें वाटणें.

सीतेला आलिंगन देतांना आपल्या गळ्यांतील हार देखील रामाला आवडत नसे. यावरून श्रीराम भोगी नव्हते; व भोगामुळेच प्रेम करणारे असते तर जास्त भोगाने किंवा जास्त भोगाच्या मनुष्याला- भोग वगैरेच जास्त प्रिय असतात. यावरून असें वाटतें की, त्यांचे देह त्यांच्या प्रेमांत आडवे आल्यासारखे त्यांना वाटत असावे, या सीमेत (अवस्थेत) जाण्यापूर्वी आपल्या या प्रेमाच्या तीन पायऱ्या आहेत.

### प्रेमाच्या तीन पायऱ्या

(१) पूज्य बुद्धि.

(२) प्रिय वस्तूशीं नातें जुळविणे.

(३) ती वस्तू व आपण एक होणे.

यापैकी पहिली पायरी चाकरपणाची आहे. याचे दोन भाग करावयाचे. एक साधारण चाकर व दुसरा एकनिष्ठ चाकर. पहिल्या प्रकारची चाकरी भीतीने उत्पन्न होते व त्यांत क्रूरपणा असतो.

दुसऱ्या प्रकारची चाकरी पूज्य बुद्धीने उत्पन्न होते. यालाच दास्यभक्ति म्हणतां येईल. दुसरी पायरी म्हणजे आपलें व त्या प्रिय वस्तूचें नातें जुळविणें. यांत

आपला व जगत्कारणाचा कांही तरी संबंध जुळवून आणावा. म्हणजे जगत्कारण आपला पिता आहे व माता आहे व माझ्या पित्याशीं मी जसें निर्भीड वागतों पण वाईट कामांत त्यांचा धाक वागवितो त्याप्रमाणे परमेश्वराशी वागणें !ज्यांना परमेश्वराशी नातें आहे असें वाटतें, त्यांचेपासून जन-समुदायालाहि त्रास होत नाही.

तिसऱ्या पायरींत तर हें कांहीच राहत नाही. तिसऱ्या पायरींत ऐक्य होतें. या पायरींत जगत्कारणाशिवाय दुसऱ्या वस्तूशीं मिळून जातां येत नाही. दुसऱ्या वस्तूवर असें प्रेम होऊं शकत नाही. कारण दुसऱ्या सर्व वस्तू अपूर्ण आहेत. दुसऱ्या वस्तूंत मिळाल्यास ती आपली दुसऱ्याच ओघाला जाते. म्हणून आपल्या प्रेमांतच ती वस्तू येईल असा नियम करावा.

आता या तीन पायऱ्यांनी (जगत्कारणापर्यंत) सर्व जगाला पोहोचविण्या विषयी कोणता धर्म समर्थ आहे हें पाहूं. व्यवहारांतहि मनुष्यांचे वर्तन असेंच असतें व प्रेमाच्या ह्या पहिल्या दोन पायऱ्या दृष्टीत पडतात.

## ख्रिश्चन धर्म

ख्रिश्चन धर्मांत ईश्वराला बाप मानलें असून सर्व माणसें त्याची मुलें आहेत असें सांगितले आहे.

या वरून दोन गोष्टी निघतात. एक, कांही बाबतींत त्यांच्याकडे जबाबदारी असली पाहिजे व कांही बाबतींत आपल्याकडे जबाबदारी असली पाहिजे. ईश्वर जर आपला पिता आहे तर जसा एखाद्या वाघाच्या तोंडांत सांपडलेला मनुष्य परतंत्र होतो व त्याला कोठेच जातां येत नाही, त्याप्रमाणे एकाद्या यंत्राप्रमाणे, योग्य वळण न देतां आमचा स्वभाव परतंत्र करून टाकणें हें कांही ईश्वराचें काम होणार नाही. ही कल्पना आपल्याहि धर्मांत कांही अंशांने आहेच. भीतीशिवाय प्रीति राहत नाही. व या विषयी श्रुतीहि आहे

**'भीतोऽस्मा द्वा तौ पवते' - श्रुती.**

**भय बिन प्रेम न होय गुसाई ॥ - तुलसीदास.**

श्रीज्ञानेश्वर महाराज......

एका मनुष्याला चार मुलें आहेत व चारी निरनिराळ्या स्वभावाचे आहेत. तर पित्याने त्यांच्या स्वभावानुरूप व जेणेंकरून त्यांना सुख होईल अशा रीतीने घरचीं कामें वाटून दिलीं पाहिजेत, तरच घर चांगलें चालेल व चौघांना समान सुख होईल.

## मुसलमान धर्म

मुसलमान धर्मांत ईश्वर हा एक मोठा भीतिदायक प्राणी आहे असें सांगितलें



आहे.

आर्य धर्मांत ईश्वराची आज्ञा पाळण्याविषयी भीती व त्याच्याविषयी प्रीती हे दोन्ही संकलित केले आहेत. तथापि वाघाने नरडी धरल्यावर जसा स्वभाव परतंत्र होतो त्याप्रमाणे भीती नको; पण आपल्या स्वभावाला वळण देऊन निरनिराळ्या प्रकारचे स्वभाव एकाच मार्गाने वळवितां येतील अशा प्रकारचे टिचिंग्स् पाहिजेत.

पुष्कळांनी धर्म एक करण्याची खटपट केली. पण यश आलें नाही. कारण त्याचें वर्तन लोकांना सुलभ गेलें नाही. जगांत निरनिराळे स्वभाव आहेत व ईश्वर जर जगाचा पिता आहे तर या सर्व लोकांचे स्वभाव एका जुटीने आणून एका मार्गांत लावणें हें त्याचें काम आहे व हें काम कोणत्या धर्माने होतें हें आपण पाहूं.

## मनुष्यांचे ४ भाग व ४ प्रवृत्ती

जगाचें निरीक्षण करून जर विचार केला तर असें दिसतें की ठळक रीतीने मनुष्यांचे चार भाग होऊं शकतात व त्यांच्यामध्ये चार प्रकारच्या ठोकळ प्रवृत्ति दिसतात.

(१) कित्येकांना वाटतें की कांही तरी काम करावें.

(२) कित्येकांना आपण प्रेम करावेंसे वाटतें

(३) कित्येकांना वाटतें की आपल्यामध्ये ज्या कांही गुप्त शक्ति आहेत, ज्यांच्या योगाने केव्हा केव्हा अलौकिक गोष्टी घडतात, त्या शक्ती जाणून त्यांचा उपयोग करावा.

(४) कित्येकांना वाटतें मी कोण आहो? कोठून आलो? हें जगत् कसें झालें? वगैरे, याचा विचार करावा.

## (१) कर्मयोग

आता पहिल्या वर्गाच्या लोकांना जर एका चांगल्या मार्गाला लावावयाचें आहे तर त्यांना जें वाटतें की 'परिस्थितीच्या स्वाधीन राहून त्या परिस्थितींत होईल तेवढा फायदा करून घ्यावा व त्यांतच सुखदुःख भोगत रहावे. त्यापेक्षा ''इहलोकांत व परलोकांत ज्या रीतीने सुखच मिळेल असें कार्य करण्याचा नियम लावून देणें चांगले'' व तो नियम आर्यधर्माने चांगला लावतां येईल.

तो नियम म्हणजे दुसऱ्यांचे चांगलें करणें, व्यवहारांत चांगलें वागणें, दुसऱ्याला चांगला मार्ग सांगणें, सत्य बोलणें वगैरे! या प्रकारच्या शिक्षणाला कर्मयोग म्हणतात.

**''योगः कर्मसु कौशलम्''**

आपल्या कामांत चांगली कुशलता मिळविणें. हा कर्मयोग या आर्यधर्मातच आहे, दुसऱ्या कोणत्याच धर्मात नाही - म्हणून या प्रवृत्तीच्या माणसांकरिता या आर्यधर्माशिवाय दुसऱ्या कोणत्याच धर्मांत मार्ग नाही.

परकीय भाषेंत तर 'कर्म' शब्दाचा अर्थबोधक शब्दच नाही.

## (२) भक्तियोग

दुसरे ज्यांना प्रेमच करावेसें वाटतें त्यांची ती प्रेममय वृत्ति जगत्कारणाचें ठायीं नेहमी असून त्याच्या प्रेमाने अंतःकरण भरूं देणे. याला भक्तियोग म्हणतात.

येथपर्यंत आल्यावर कर्मयोगाची अवधी संपतें. ही प्रवृत्ति फारच थोडक्या लोकांत असतें.

## (३) राजयोग

ज्या अलौकिक शक्ति आहेत त्यांचा उपयोग करणें हा राजयोग होय.

## (४) ज्ञानयोग

जगाचें कारण काय? तें कोठून आलें? आपण कोठून आलों, कोठे जाणार? या प्रश्नाचें उत्तर पुष्कळ तत्त्वज्ञानांत (फिलॉसॉफीतून) दिलें आहे. तथापि (त्यातून) समाधानकारक उत्तर मिळत नाही. कित्येक ठिकाणीं हिन्दु लोकांचेच विचार घेतले असावेसे दिसते. कित्येकांत खरा अर्थ न समजून भलतीच टीका केली आहे.

तथापि पारकीय तत्त्वज्ञान आपण कोण आहों? या प्रश्नापर्यंत येऊन पोहोंचले आहे व येथूनच पुढे आपली फिलॉसॉफी सुरू होतें.

वरील २ व ३ मध्ये सांगितलेलें म्हणजे ज्यांना प्रेम करावेंसे वाटतें व ज्यांना अलौकिक शक्तीचा उपयोग करावासा वाटतो त्यांच्याकरताहि या आर्यधर्मात स्टँडर्ड सांपडतें. याप्रमाणे या चारी प्रवृत्तींच्या लोकांना जर धर्म पाहिजे असेल तर तो आर्यधर्मच होऊं शकतों.

## ३.

## पुन्हा इतिहासाच्या दृष्टीने आर्यधर्मच सनातन व तोच सर्व जगताचा धर्म होऊं शकतो

साधारणपणे जर इतिहासाचें निरीक्षण करून पाहिलें तर आर्य लोकच पूर्वी भरभराटींत होते; व पुन्हा धार्मिक इतिहासाच्या दृष्टीने जरी घेतले तथापि * प्रत्येक धर्म हिन्दुधर्मांतून निघाला असें दिसतें.

* यहुदी धर्म पर्शियन धर्मापासून निघाला. त्यांचीच अग्निपूजा व इतर पद्धति घेतली.



* पुढे या यहुदि धर्मापासूनच ख्रिश्चन धर्म निघाला.

* पर्शियन धर्मावर धाड घालून मुसलमानी धर्म निघाला.

* मुसलमान धर्मावरूनहि असें दिसतें की त्या पूर्वी ते अग्निपूजक होते व पुढे महंमदाने येऊन ते मोडून टाकले व हा दुसरा मुसलमानी धर्म काढला. 'अरेबियन नाईट' मध्ये अग्निपूजेचा उल्लेख आहे. म्हणून ही अग्निपूजा ही मुसलमान धर्म स्थापन होण्यापूर्वी होती.

## पर्शियन धर्म

ही पूजा पर्शियन लोकांमध्येंहि झोरास्टर नांवाच्या प्रोफेट / धर्मस्थापकाने सुरू केली. त्याचीं तीन तत्त्वें आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. हुखय, | २ हुमथ, | ३ हुवरस्थ म्हणजे |
| १.पवित्र मन, | २.पवित्र वाचा व | ३.शुद्धाचरण (म्हणजे) |
| १.मानसिक पवित्रता, | २.वाचिक पवित्रता व | ३.कायिक पवित्रता. |

या तीन गोष्टी पार्शी लोक पाळतात.

यांचा झेंदावेस्ता म्हणून ग्रंथ आहे. त्यांत –

आर्याणां / त्रि-करण / गेह-हवन / गेह, वगैरे शब्द आहेत. ते संस्कृत मधूनच घेतले आहेत.

आपल्या यज्ञोपविताच्या मंत्रांत यज्ञोपविताविषयी पवित्रता सांगितली आहे व गायत्रींत सूर्यस्तुति केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याहि धर्मांत यज्ञोपविताविषयी मंत्र असून त्याची पवित्रता सांगितली आहे.

आताच्या सर्व विवेचनावरून पाहिलें तर व आता जसे रानटी लोक सोडून द्यावे लागतात तसें जर पूर्वीचेहि रानटी लोक सोडून दिले व पर्शियन धर्मापूर्वीची स्थिति घेतली तर सुशिक्षित लोक पूर्वी कोणत्या धर्माचे असावे याचें उत्तर 'आर्यधर्माचें' असें असलें पाहिजें असें दिसतें.

हें कदाचित आपल्या लोकांना नवीन वाटेल, तथापि आपल्याहि पुराणांत याला प्रमाण आहे -

**'आदौ कृतयुगे सर्व-नृणां हंस इति स्मृतः'**

पुढे शापा वगैरेने म्लेंछादिक झालेत असें पुराणादिकांत आहे.

पुनः 'सर्वच धर्म या धर्मापासून उत्पन्न झाले' असें प्रत्येक धर्मांत लिहिलें आहे. तथाापि आपल्या धर्मांत जसा ऐतिहासिक पुरावा मिळतो तसा कोठेच मिळत नाही. यांतहि आणखी विशेष गोष्ट अशी आहे की आर्य धर्म सोडून बाकी सर्वच धर्मांत ३००० वर्षांपूर्वी कांही नव्हतें. पुढे ईश्वराने सृष्टि उत्पन्न केली असें सांगितलें

आहे.

* **महंमदी धर्मांत** ईश्वराने धर्म पैगंबराला सांगितला असे आहे व तोच धर्म पूर्वीपासून आहे.

* **जैन धर्मातही** असेच सांगितले आहे की पूर्वी सर्वच जैन होते.

या प्रमाणे प्रत्येक धर्मांत आपला धर्मच पूर्वीचा म्हटला आहे. तथापि या सर्व धर्मांत ''३००० वर्षांपूर्वी कांही नव्हतें'' असें आहे,

- हें म्हणणें (जिऑलॉजिकल) भूगर्भशास्त्र दृष्टीनेहि असंबद्ध आहे. अशा प्रकारचा उल्लेख आपल्या आर्यधर्मांत नाही. भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने सृष्टीची मर्यादा ठरू शकत नाही.

हिंदु धर्मात ''सृष्टि आकाशरूप आहे'' वगैरे जे सांगितलें आहे ते आधुनिक विज्ञानाला धरूनच आहे व ख्रिश्चन धर्मामध्ये जें सांगितलें आहे की_(---- सुटले)

दुसऱ्या सूत्रांत जे चार योग सांगितले त्याचा थोडा विचार करून सांगतों,

* पहिल्यांना म्हणजे 'ज्यांना कांहीही करावेसें वाटतें' त्या प्रवृत्त्या सर्वांच्या त्रिगुणात्मक असतात.

* 'कित्येकांना कांहीच करावेसे वाटत नाही' म्हणजे त्यांच्यामध्ये तम व रज दिसतो.

* कित्येकांच्या क्रिया केवळ स्वार्थाच्याच दिसतात व नेहमी त्यांचें चित्त चंचल असतें. हे लोक रजस्तममिश्र दिसतात.

* कित्येक आपला तसाच दुसऱ्यांचा कसा फायदा होतो हें पाहात असतात व त्याप्रमाणे त्यांच्या क्रिया होतात. हे सत्त्वरजमिश्र असतात.

* कित्येक दुसऱ्याचा फायदा कसा होईल हे पाहात असतात. हे सत्त्वगुणी असतात व या प्रवृत्त्यनुरूपच शास्त्राने वर्णाश्रम धर्म केले आहेत.

## शूद्र वर्ण

ज्यांच्यामध्ये तम जास्त म्हणजे ज्यांना काही करावेसे वाटत नाही त्यांच्याकडून बुद्धीचे काम होऊं शकत नाही व परिस्थित्यनुसारहि त्यांना जाऊं देणें चांगलें नाही म्हणून त्यांनी बुद्धिमान् मनुष्यांच्या अनुरोधाने वागावें व त्यांची सेवा करून व आपला तम नाहीसा करून हळूहळू सत्त्व वाढवावा व याच लोकांना शूद्र म्हटलें आहे. यांना खाण्यापिण्याचा नियम नसतो. हे मांसभक्षक असतात.

### मांस-भक्षण

''मांस हा अन्नाचा तमोभाग असल्यामुळे मांस खाणाऱ्यांना बुद्धि उत्पन्नच होत नाही'' व मांसामध्ये मनाला आवडणारा पदार्थ नाही. अन्नामध्ये जो आवडीरूपाने



भाग असतो तो मनाला पुष्टि देतो. तो भाग मांसामध्ये नसतो. म्हणून मांस खाणाऱ्यांना बुद्धि उत्पन्नच होत नाही. त्यांच्यातली इलेक्ट्रीसीटीहि तामसच असते म्हणून त्यांचें हातचें खाऊ नयें.

## वैश्य

आता दुसऱ्या प्रकारचे लोक जे स्वार्थाकरिताच क्रिया करतात, ते सत्त्वतममिश्र असल्यामुळे सुखी दुःखी असतात व यांनाच वैश्य म्हणतात.

## क्षत्रिय

कित्येक लोक आपला तसाच दुसऱ्याचा फायदा पाहतात व तदनुसार क्रिया करतात. ते सत्त्वरज मिश्र असतात त्यांना क्षत्रिय म्हटलें आहे.

### ब्राह्मण

कित्येकांना परोपकारच करावासा वाटतो. यांच्यांत सत्त्व असतें व हे ब्राह्मण म्हटलें जातात. यांच्याकडून बुद्धीचींच कामें होतात.

सत्त्वनिष्ठ कोणीहि असला तरी त्यांच्याशीं व्यवहार करण्याला हरकत नाही.

**यस्य यल्लक्षणं प्रोक्तं** --- - ज्या लक्षणाचा जो असेल त्या वर्गांत त्याला घालावें.

''ब्राह्मणाची कन्या दुसऱ्याला देऊं नये. पण ब्राह्मणाने कोणाचीहि स्त्री करावी.'' - या सर्वांचा उद्देश सर्वांनी उंच चढावें. कोणी खाली येण्याचा प्रयत्न करूं नये, याकरिता आहे. ही पूर्वीची रूढी होती. आताची रूढी उलट आहे.

या पहिल्या वर्गांतच म्हणजे कर्मयोगांतच वर्णाश्रम धर्म आहेत.

भक्तियोगांत प्रेमच असल्यामुळे प्रेम हा सत्त्वाचा धर्म असल्यामुळे यांत कर्मयोगासारखें वैचित्र्य नाही व म्हणूनच जाती वगैरेचा प्रतिबंध नाही. ज्यांना आपला स्वभाव जिंकता येत नाही त्यांच्यातच स्वभाव जिंकून सत्त्व वाढविण्याकरिता उपाय पाहिजेत.

## वर्णाश्रम कोणाला ?

पहिल्या प्रवृत्तीचे म्हणजे कांहीहि करावे या प्रवृत्तीच्या लोकांनी स्वभावाचा जय करावा म्हणून यांच्यामध्यें वर्णाश्रम योग्य आहे. पण-

(१) ज्यांनी आपला स्वभाव जिंकला आहे अशांचा सात्त्विक स्वभाव असल्यामुळे त्यांना कर्ममार्गाची जरूरी नाही.

ज्यांना आपली शक्ति वाढवितां येते त्यांनाच स्टँडर्ड कार्यकर्ते म्हणतां येईल.

जे वैद्य म्हणवितात पण समजत कांहीच नाही त्यांच्यांतच बरे वाईट असतात पण जे चांगले शिकले आहेत, ज्यांना अनुभव आहे त्यांच्यात कांही बरा वाईट भेद राहात नाही.

(२) कर्मयोगामध्ये जें वैचित्र्य दिसतें ते स्वभावानुसार असल्यामुळे व त्याला नियमन जरूर असल्यामुळे वर्णाश्रम वगैरे आहेत.

(३) भक्तींत नुसता सत्त्वगुणच असल्यामुळे वैचित्र्य नाही व वर्णाश्रमाची गरज नाही.

(४) राजयोगांतही मनाचा जय केल्यामुळे तेही सात्त्विक आहेत व म्हणून त्यांच्यातहि वैचित्र्य व वर्णाश्रम नाहीत.

(६) ज्ञानयोगामध्ये जगाशीं विरोध नसल्यामुळे व परमेश्वराशीं ऐक्य होत असल्यामुळे व त्याच्याशी जें ऐक्य पावले आहेत त्यांच्यांतही भेद नसल्यामुळे व परमात्म्याचा कोणाशींच विरोध नसल्यामुळे वर्णाश्रमाची कांहीच जरूर नाही.

या सर्व गोष्टीवरून असें सिद्ध झालें की, सर्व प्रवृत्तीच्या मनुष्यांना या आर्यधर्मात उन्नतीचा उपाय सांगितला आहे. म्हणून, सर्वांना लागूं पडणारा हा आर्यधर्मच होऊं शकतो.

०००

॥ श्रीज्ञानेश्वर आई समर्थ ॥

# २. जगत्कारणाकडे नेतो तो धर्म

## गीतेचा उपोद्घात

काल कर्मयोगादि जे चार योग सांगितलेत त्यांचाच पुढे विचार करूं. सर्व मनुष्यांचा धर्म एक आर्यधर्मच होऊं शकेल, दुसरा कोणता दिसत नाही. पुष्कळांनी इकडचें कांही दडपून व तिकडचें कांही दडपून सर्वांना लागूं होईल असा एक धर्म काढण्याची खटपट केली पण ती सिद्धीस गेली नाही. एक शुद्ध आर्यधर्मच सर्वांना लागू होईल इत्यादि गोष्टी काल झाल्या.

## १. ज्ञानाची उत्क्रांति

## मनुष्याचे मानसिक क्रमाने बद्ध जीवित

जडाचा मनाला उपयोग होतो किंवा मनाचा जडाला उपयोग होतो? जड मनाला शिकवितें किंवा मन जडाला शिकवितें? या विषयी पारकीय लोकांत बराचसा वादविवाद आहे. बहुतेक अंशीं मनच जडाला जास्त हेतु आहे असें म्हटल्यास जास्त शोभा येईल.



## प्रत्यक्ष ज्ञान

आपल्याला ज्ञान होण्यांची चार द्वारें आहेत. पहिल्या दशेंत जें कांही इंद्रियाने गोचर तेंच आपलें ज्ञान असतें, या प्रत्यक्ष ज्ञानाच्या पलीकडे आपलें ज्ञान नसतें, म्हणजे जेव्हा कोणत्याच ज्ञानाचा विकास नसतो तेव्हा प्रत्यक्ष ज्ञानावरच सर्व ज्ञानाची मदार असते. - लहान मुलाला इंद्रियाने जेवढें ज्ञान होईल तेवढेंच असतें. दुसऱ्या कोणत्याच द्वाराने त्याला ज्ञान होत नाही.

## 'अनुकूल - प्रतिकूल' जाणणे

तथापि या प्रत्यक्ष ज्ञानांतहि एक गोष्ट दिसून येते. ती ही की, प्रत्येक माणासांत मग तो मुलगा असो किंवा मोठा मनुष्य असो त्याच्यात 'हें अनुकूल आहे व हें प्रतिकूल आहे' - असें जाणण्याची शक्ति असतेच. ही निवडणूकीची शक्ति कांही कितीहि प्रत्यक्ष ज्ञान मिळविलें तरी ते पदार्थ किंवा पदार्थांचे ठसे शिकवूं शकत नाहीत.

लहान मुलाचा हात अग्निजवळ नेला व पोळला तर तो एकदम आपला हात काढून घेतो. आता ह्या लहान मुलाची मदार तर प्रत्यक्ष ज्ञानावर असते. मग अग्नि दुःखदायक आहे हें ज्ञान त्याला कसें होतें? हें अग्निज्ञान तर त्याला नवीनच आहे. 'मी दुःखदायक आहे' असें कांही अग्नि सांगत नाही. अनुकूल ज्ञानाने प्रवृत्ति व प्रतिकूल ज्ञानाने निवृत्ति होते. पण ही पदार्थांची अनुकूलता किंवा प्रतिकूलता तो पदार्थ शिकवूं शकत नाही.

कित्येकांना जे सिद्धांत मोठे वाटतात व जे ते सपाट्याने ग्रहण करतात व ज्यांच्या योगाने अनेक मतांचें खंडण करतात त्याच मताच्या विरुद्ध केव्हा केव्हा आग्रहाने बोलण्याचा प्रसंग येतो.

एकाद्याला विचारलें की - ''ही गोष्ट चांगली आहे किंवा वाईट आहे?''

तर तो म्हणेल की -''मला ह्याचा अनुभव नाही मी काय सांगू?''

अनुभवावरच आपण अनुकूलता व प्रतिकूलता ठरवितो. अमूक गोष्ट अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे हें जड जाणूं शकत नाही, तें जाणणारें चेतनच पाहिजे.

*कित्येक अनुकूलता व प्रतिकूलता स्वाभाविकरित्याच समजते असे म्हणतात. - पण हें अगदीच विरुद्ध आहे. अनुकूलता व प्रतिकूलता ही अनुभवावरूनच सिद्ध होत असतें. अनुभव असल्याशिवाय अमूक पदार्थ अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे हें ठरवितांच येत नाही. शास्त्रज्ञ लोकहि अनुभवावरच (एक्स्पीरियन्सवरच) जास्त भिस्त ठेवतात. म्हणून ज्याअर्थी अमुक पदार्थ अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे हें एकदम आपण सांगतों त्याअर्थी याचे कांहीतरी पूर्वी संस्कार असलेच पाहिजेत.

फिजिऑलॉजीमध्ये याचे उत्तर नाही. फिजिऑलॉजीस्ट म्हणतात की हें ज्ञान उपजतच असतें म्हणजे शरीराला जें अनुकूल वाटतें तें तें घेतें व प्रतिकूल वाटतें तें घेत नाही. पण हे उत्तर म्हणजे जसा प्रश्न आहे तसेच उत्तर दिले.

प्रश्न नेहमी जो भाग अज्ञात असतो त्याविषयी असतो. यात अज्ञात भागाचे काही उत्तर नाही म्हणून अमुक वस्तु अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे, हें त्या वस्तूच्या सहवासाशिवाय कळत नाही व ही अनुकूलता व प्रतिकूलता जाणण्याची शक्ति मूळची ग्रहण केल्याशिवाय पदार्थापासूनहि शक्ति मिळणें शक्य नाही.

पुष्कळ फिजिऑलॉजीस्टस् 'हे शरीर आपल्याला हा पदार्थ अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे हे सांगते' असे म्हणतात; पण शरीर जर परिस्थितीच्या स्वाधीन आहे तर ज्या परिस्थितींत तें जाईल त्या परिस्थितीचे ते संस्कार घेईल. पण ही शक्ति तर लहान मुलांतहि असते.

## मेंदूवरील ठसे अनुकूल / प्रतिकूल शिकवितात काय ?

कितीहि प्रत्यक्षाचें ज्ञान घेतलें तरी त्या प्रत्यक्ष पदार्थापासून होणारे ठसे जसेच्या तसेच उत्पन्न होतील, पण हा ठसा प्रतिकूल आहे की अनुकूल आहे हें कांही ते ठसे शिकवूं शकत नाहीत.

आता उदाहरणार्थ एक तुपाचें भांडें घेऊं. भांडें पाहिल्याबरोबर त्याचा ठसा उमटतो. पण तें भांडें उबडें केलें असतां तूप सांडेल व तसेच्या तसेंच ठेविलें असतां तूप सांडणार नाही हें ज्ञान कांही तो ठसा शिकवूं शकत नाही. म्हणून त्या ठश्याहून ही शक्ति निराळी असली पाहिजे.

जितक्या मानाने दृश्य पदार्थ जड आहेत तितक्याच मानाने मनांतील त्या पदार्थांचें चित्रहि जड आहे. तुपाचें भांडें उबडें केलें असतां तूप सांडेल व तसेंच ठेविलें असतां सांडणार नाही हे दोन्ही परस्पर भिन्न आहेत. असें पाहणारा ठशाहून दुसराच असला पाहिजे.

## प्रत्यभिज्ञा

'प्रत्यभिज्ञा म्हणजे पूर्वी पाहिलेली गोष्ट पुन्हा पाहिल्यावर स्मृतींत येवून पुन्हा त्या पदार्थाचें ज्ञान होणें.'

एक पुस्तक पूर्वी पाहिलें व कांही काळाने तेंच पुन्हा पाहिलें तर त्या पुस्तकाची स्मृति होऊन पुन्हा त्या पुस्तकाचें चित्र मनांत येतें. हे दोन्ही ठसे परस्पर भिन्न आहेत. 'ज्या पुस्तकाचे पूर्वी ज्ञान झालें होते तेंच पुस्तक हें आहे' हें ज्ञान कांही तो स्मृतीचा ठसा शिकवूं शकत नाही.

येथे व्यवस्थापक सत्त्व दुसरेंच घेतलें पाहिजें. हें सत्त्व जर आपल्यामध्ये नसतें



तर कितीही ठसे घेतले तरी त्यापासून ज्ञान होणार नाही. कारण संघातांतले पदार्थ कांही संघाताचा उपयोग करीत नाही.

उदा.- विडा! हा अनेक द्रव्यांचा बनला असून त्याचा उपयोग त्यांतील द्रव्य करीत नाहीत. त्या प्रमाणे अमुक ठसा अमुक आहे तो अनुकूल आहे की प्रतिकूल आहे इत्यादि गोष्टी तो ठसा किंवा त्या ठशांचा संघात शिकवूं शकत नाही.

या मानसिक क्रमावरूनच प्रत्यक्षज्ञानाला आपण व्यापक स्वरूप देतो व त्यावरून पुढें अनुमान काढतों. प्रत्यक्ष क्रमाने आपलें जीवित जितकें बांधलें आहे त्यापेक्षा मानसिक क्रमाने तें जास्त बांधलें आहे. प्रत्यक्षाने होत असलेला भ्रम अनुमानाने दूर करावा लागतो. मानसिक क्रमाने आपलें जीवित बद्ध नसतें तर आपण केवल पशुप्रमाणे वागलों असतों.

## अनुमान

अनुमान हें ज्ञानाचें दुसरें द्वार आहे. प्रत्यक्ष ज्ञानात नैसर्गिक प्रवृत्ति असते. लहान मुलांना स्तनपान करण्याची संवय असल्यामुळे कोणतीहि वस्तु ते तोंडांतच घालतात. अमुक वस्तु तोडांत घालण्याची नव्हे हें त्यांना समजत नाही. हें दुसरें ज्ञानाचें द्वार प्रत्येकात उत्पन्न होत असतें.

उदा. तुमच्या पुरुषोत्तमास सांगितलें की 'पाणी तापलें. पण पाण्यातळी विस्तव नव्हता' तर तो लगेच विचारील की 'विस्तव नव्हता तर पाणी तापलें कसे?' हें अनुमान पुरुषोत्तमाला समजतें.

हें अनुमान उत्पन्न झाले म्हणजे नैसर्गिक प्रवृत्तीच कांही ज्ञानाचें द्वार राहत नाही. मग विचार म्हणून जें ज्ञानाचें द्वार आहे त्याचें आपण सहाय्य घेतों.

नैसर्गिक कोटींत तें ज्ञान पशु कोटींतलें असतें. अनुमानाच्या द्वाराने पुढे ज्ञान होत असतें, तथापि तेंहि सामान्यच होत असतें. चिखल दिसला तर पाणी सांडलें असें अनुमान करूं. पण 'कोणी सांडले?' हें ज्ञान कांही अनुमानाने ठरूं शकत नाही. यंत्र पाहून मनुष्याने केलें असें म्हणतां येईल, पण कोणत्या मनुष्याने केलें हें सांगतां येत नाही. याला शाब्दिक पुरावाच पाहिजे.

## शब्दप्रमाण

प्रत्यक्षाने फारच थोडे ज्ञान होतें. अनुमानाने प्रत्यक्षाच्या मुळाशीं सामान्य तत्त्व आहे असें ठरवितां येतें. विशेष ज्ञानाला शाब्दिक पुरावाच पाहिजे. पुस्तक पाहिलें तर हें पुस्तक कशावरून आहे, असें आपण विचारीत नाही. भ्रमाच्या ठिकाणीं विचारतो. भ्रम नसला तर प्रत्यक्षाच्या ठिकाणीं जशी अनुमानाची गरज पडत नाही त्याचप्रमाणे शाब्दिक प्रमाणामध्येहि अनुमानाची गरज नाही. कारण शब्दप्रमाण प्रत्यक्षापेक्षा

जास्त प्रबल आहे. शब्दांच्या ठिकाणींहि अनुमान लागत नाही. पण शब्दप्रमाण कोणाचें मानावें? खरा कोण बोलतो व खोटा कोण बोलतो? या विषयी मात्र तर्क केला पाहिजे. निस्पृह जे लोक असतात, त्यांच्या तोंडून खरेंच तत्त्व निघत असतें असें अनुमान करणें श्रेयस्कर आहे. हें शब्दप्रमाण ज्ञानाचें तिसरें द्वार आहे.

## अंतःस्फूर्ति व आप्तवचन

चवथें द्वार म्हणजे अंतःस्फूर्ति. यावेळेला मनुष्य सुपर नॉर्मल स्टेट मध्ये जात असतो. याला कशाचीच सहायता न लागता, अशीच स्फूर्ति होत असते.
वरवरच्या ज्ञानाने आपलें समाधान होत नाही.

* इंद्रियांच्या योगाने होणाऱ्या प्रत्यक्ष ज्ञानापेक्षा अनुमान ज्ञान जास्त दृढ आहे, * त्यापेक्षा शाब्दिक व *त्यापेक्षा अंतःस्फूर्तीचें ज्ञान जास्तच दृढ होते. म्हणजे आपण जास्त जास्त डीप स्टेट मध्ये जात असतों. डीप जसें जसें जावूं तसें तसें उंच तत्त्व आपल्याला मिळत जाईल व * अशा डीप स्टेट मध्ये जावून आपल्या धर्मांतील टीचिंग्स् आणिलें असले पाहिजेत; तेव्हाच हे टीचिंग्स् सर्व जगताचा धर्म होऊं शकतील. हें टीचिंग्स् व त्यांचा अनुभव घेवून सुलभ रीतीने त्यांचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता केलेले टीचिंग्स् दोन्हीहि आप्तवचनच म्हटल्या जातात.

## श्रुति व स्मृति

जगत्कारणापासून खास आलेले टीचिंग्स् त्या श्रुति व त्यांचा स्पष्ट अर्थ समजण्याकरता केलेले टीचिंग्स् त्या स्मृति होत. या श्रुति व स्मृति जास्त प्रमाण आहेत. मग बायबल कां प्रमाण नाही या वादांत शिरण्याची जरूरी नाही.

आपल्याला पहावयाचें एवढेंच आहे की सर्व लोकांचा धर्म जर करावयाचा असेल तर आर्यधर्मच होण्यासारखा आहे व आणखी, बायबलपेक्षाहि श्रुतिस्मृतीत हायर टीचिंग्स सापडतात.

## पितृमूलक धर्म व दैविक धर्म

धर्मांतहि दोन भाग आहेत. पितृमूलक धर्म व दैविक धर्म. मेल्यावर परलोकांत जावून पूर्वी मृत झालेल्या पितरांशी दळणवळण ठेवण्याकरिता व त्यांना थोडें साह्य व्हावें म्हणून केलेला धर्म पितृमूलक धर्म म्हटला आहे आणि देवता म्हणून ज्या आहेत, त्यांच्याशी दळणवळण ठेवण्याकरिता करावा लागणारा यज्ञादिक दैविक धर्म म्हटला जातो.

## २. कर्मयोग

या कर्मयोगाचे सामान्यरीतीने नीति व धर्म असे दोन भाग आहेत.



* सर्व वर्णांना सामान्य धर्म ती **नीति** ! व
* अधिकारानुरूप सांगितलेला आचार तो **धर्म** !

या नीतिविषयी पारकीय लोकांत बराच वाद आहे. या नीतीला स्वतंत्र सिद्धांताप्रमाणे फिलॉसॉफीचें स्वरूप दिल्याने कार्य होतें. पण ही नीति कांही तसा स्वतंत्र सिद्धांत नाही. या नीतीवर ॲरिस्टॉटल, मार्टीन्यू वगैरे पुष्कळांनी मोठमोठे ग्रंथ लिहिले आहेत त्याचे तीन भाग निघतात.

## (१) अथॉरिटी

एक अथॉरिटी. प्लेटो वगैरेचे ग्रंथ अथॉरिटिवर लिहीले गेले आहेत. चांगल्या मनुष्यांच्या मनांत चांगलेच विचार असतात. ईश्वराचे टिचींग्स् चांगले व त्याप्रमाणे वागावे असा त्याचा समज होता.

## (२) इंट्यूशन

दुसरा भाग इंट्यूशन मार्टिन्यू वगैरे या मताचे होतें. चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें जाणण्याची शक्ति आपल्यामध्ये आहे. तिला कॉशन्स म्हणतात. त्या कॉशन्सप्रमाणे चालावें व ती जिकडे नेईल तिकडे जावें असें याचें मत आहे. वाईट कामें जीं आपल्या हातून होतात तीं कॉशन्सला दाबून आपण करीत असतों.

## (३) युटिलीटी

तिसरा भाग बहुउपयोगिता युटिलिटी. मिल, स्पेन्सर हे ह्या मताचे आहेत. पुष्कळांचे ज्या रीतीने कल्याण होईल ती नीति. पण हें पुष्कळांचे कल्याण म्हणजे जेणेकरून पुष्कळांचे वैषयिक कल्याण होईल ती नीति असें मानतात. या तिन्ही भागांचा आर्यधर्मांत पूर्वीपासूनच उगम आहे.

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तद्देवेतरो जनः।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥** गीता २१-३

## (४) अथॉरिटी

श्रेष्ठ जसें आचरण करतात व ते जें प्रमाण म्हणून सांगतात त्याप्रमाणे वागणें.

**सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ॥**

संशयस्थानीय वस्तुविषयी आपली चांगली अंतःकरण प्रवृत्तीच प्रमाण आहे.

## (५) युटीलिटी

**त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे ...॥**

कुलाच्या कल्याणासाठी एका मनुष्याचा त्याग करावा. गावासाठी कुळाचा

त्याग करावा व देशासाठी गावाचा त्याग करावा. येथे मात्र कल्याण म्हणजे संसारांतील दुःखांतून मुक्तता असें समजल्या जाते. ही गोष्ट ओघानेच आल्यामुळे व ती न सांगितल्यास पुष्कळ घोटाळा माजेल म्हणून सांगतों. वरील तिन्ही नीतीचे भाग आर्यधर्मांत आहे, हें समजलें व त्यांचा समन्वय समजला म्हणजे परकीय मताचें अनायासेंच खंडण होईल.

## ॲनी बेझंटची हिन्दूंवर धाड
## (उत्क्रान्तिवादाचे खंडन)

मिसेस ॲनी बेझंटने आपल्या 'सम प्रॉब्लेम्स ऑफ लाइफ' नांवाच्या पुस्तकामध्ये हे नीतीचे तीन्ही भाग दिले आहेत. पूर्वीचे तिचे नव्हत. हीगलच्या ग्रंथांतून घेतले आहेत. ''थॉट पॉवर : इट्स कंट्रोल ॲंड कल्चर'' हें हुबेहुब ''परिवर्त संहितेचें'' भाषांतर आहे. हा बौद्ध ग्रंथ आहे. ''ह्यूमन आय'' नांवाचे पुस्तक 'स्वर्णप्रभा' नांवाच्या ग्रंथाचें भाषांतर आहे. हिला दुसऱ्यांच्या पुस्तकांचें भाषांतर करून आपल्या नांवावर छापण्याची संवय आहे. हिच्या पुस्तकावर इंग्लिश लोक आपलें मत देत नाहीत व हिच्याकडून कांही तरी कार्य करून घ्यावयाचें असेल म्हणून मौन धरतात. हिने हीगलच्या ग्रंथांतून वाक्यच्या वाक्य उतरून घेतलें आहेत व या तीन नीतीच्या भागांचा ''इव्होल्यूशन'' च्या दृष्टीने विचार केला आहे. अशा पद्धतीने पुढीलप्रमाणे हिन्दूंवर धाड येते.

**ॲनी बेझंटचे मत :-** अज्ञानी मनुष्य असतो त्याला अथॉरिटीचें तत्त्व उपयोगी आहे व पुढे व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार उद्‌भूत झाला म्हणजे इंट्यूइशनचे तत्त्व घ्यावे व पुढे परोपकार करावासा वाटला म्हणजे बहुपयोगितेचें तत्त्व घ्यावें ही सर्वांत उंच स्थिती घेतली आहे. हिच्या या पद्धतीवरून असा निष्कर्ष निघतो की नीतीचें तत्त्व नेहमी बदलत जातें. खंडन :- हिन्दूधर्मांत वेद प्रमाण आहेत म्हणजे हिच्या मताप्रमाणे हिन्दूधर्माच्या लोकांना स्वतंत्र विचार करण्याची योग्यता नाही कारण ते वेदांवर विश्वास ठेवतात. व अज्ञानी आहे तोपर्यंत ॲथॉरिटीवर विश्वास ठेवावा म्हणजे हिन्दु लोक रानटी आहेत असें निघतें.

परिस्थितीच्या दृष्टीने याच्याशीं उत्क्रांती तत्त्वांचें सादृश्य दिसतें व म्हणून इव्होल्युशन थियरी लागू पडतें असें वाटतें. पण हें बरोबर नाही. आकाशांतून पाणी पडतें तेव्हा तें स्वच्छ असतें. पण पुढे संसर्गाने दुसऱ्या पदार्थांचे गुण घेऊन मलिन होतें. यावरून शुद्ध कारणापासून जेव्हा एखादी गोष्ट बाहेर निघते तेव्हा ती शुद्धच असते व पुढे कांही पदार्थांचा संपर्क पावून मलिन होते. कार्यकारण भाव स्वीकारला तर कारण व्यापक व कार्य अल्प घेतलें पाहिजे. व्यापक तें शुद्धच असलें



पाहिजे. कारण त्या ठिकाणी संगतीने मलिन होण्यास दुसरा कोणताच पदार्थ नसतो. कारण व्यापक असून अशुद्ध असलें तर कार्य कितीहि वर गेलें तरी शुद्ध व्हावयाचें नाही. 'दृष्टांत एखादी वस्तु सिद्ध करतो असें मुळीच नाही तर फक्त सिद्धांताची कल्पना देतो' - या जगाचें कारण व्यापक घेतलें पाहिजें. व्यापक घेतलें तर त्याचें प्रथम कार्यांत तेच गुण आले पाहिजेत. व्यापकांत संसर्ग नाही. पुढे कार्यांत परस्पर संसर्ग होऊन तें वाईट होईल या दृष्टीने इव्होल्युशन पेक्षा रिव्होल्युशनच जास्त दिसतें. एकाद्या राष्ट्राची उत्क्रांती होते पण त्या बरोबरच दुसऱ्या राष्ट्राची अपक्रांतीहि होते. म्हणून हें बेझंटचें म्हणणें बरोबर नाही.

## इव्होल्यूशन की चक्राकार परिवर्तन ?

आपल्या मताप्रमाणे या जगाला उत्क्रांती वगैरे कांही नसून आदि अंति संकोचरूप व मध्ये विस्तार दिसतो. जसे वृक्ष बीजदशेमध्ये संकोचरूप असून वृक्ष दशेमध्ये विस्तार पावतो व पुन्हा बीजदशेमध्ये संकोच पावतो, याप्रमाणे हें जग उत्पत्ति-प्रलयाने भरलें आहे याची उत्क्रांती होते व अपक्रांतीहि दिसून येते यावरूनच पुनर्जन्म झाला तरी उत्क्रांती झाली पाहिजे हें म्हणणें बाधित होते. कोणत्याहि गोष्टींचे आपल्याला चक्राकारच परिवर्तन दिसतें. उदा. - वीर्य. त्यापासून पुरुष, त्यापासून वीर्य व पुन्हा त्यापासून पुरुष. याप्रमाणे प्रत्येक वस्तूचा संकोच विस्तार व पुन्हा संकोच असें चक्राप्रमाणे चाललेंच असतें.

उत्क्रांती मानल्यास मनुष्याच्या बुद्धीची स्त्रियांच्या बुद्धीपेक्षा जास्त वाढ दिसतें. म्हणून स्त्रियांचे अगोदर पुरुष झाले असे मानावे लागेल. यावरून जगत्‌चक्र अनादि आहे व यापासून सुटावयाचें असल्यास स्वतंत्र मार्ग फोडला पाहिजे. वृक्ष नाहीसा करावयाचा असल्यास बीज येण्याच्या पूर्वीच झाड जाळलें पाहिजें किंवा बीजच जाळलें पाहिजें. असे बीज जाळण्यास दुसरा अग्नी पदार्थ पाहिजे.

त्याप्रमाणे जगत् चक्रापासून सुटावयाचे असल्यास दुसरीकडूनच उपाय मिळविला पाहिजे. तो जगापासून मिळणें शक्य नाही. जगत्कारणाकडे जर आपणाला जावयाचें आहे तर अशाश्वत अशा जगापासून शाश्वत जगत्कारणाकडे जाण्याचा मार्ग मिळावयाचा नाही. त्याला शाश्वत मार्ग शाश्वत जगत्कारणापासून आलेले वेदच आहेत. ज्यांना विशेष अधिकार येतो त्यांनाच अथॉरिटी येते व त्या पुरुषांच्या वचनाप्रमाणे मन बनवीत जावे. मनाला जिकडे न्यावें तिकडे तें आपली प्रगती करतें.

**''मनाचेनि एक निके । हें देखिले गोडीचिया ठाया सोके ।**
**म्हणोनि अनुभव सुखचि कवतिकें । दावीत जाईजे ॥ ज्ञा. ६ओ. ४२०''**

इंट्युइशनवर स्वतंत्र भरंवसा ठेवणें शक्य नाही. अथॉरिटीप्रमाणे मनाला वळण देऊन जसें जसें तें वाढवीत जावें तसें तसें तेंच वळण त्याला मिळाल्यामुळे त्याला इंट्युइशनचा अधिकार येतो.

युटिलिटी म्हणजे काय हें पारकीय लोकांत अजून चांगलें ठरलें नाही. जी गोष्ट अथॉरिटीने दिली व ज्या गोष्टीला महात्म्यांचें मन इंट्युइशन होवून बसलें आहे त्याच मार्गाचा सर्व माणसांनी अवलंब करावा. साधुपुरुषांच्या मनोवृत्ति इंट्युइशन होतें. पण इंट्युइशनवरून साधुपुरुष ठरत नाहीत.

''साधुपुरुष म्हणजे जगत्कारणाच्या अथॉरिटीप्रप्रमाणे वागणारे लोक.''

युटिलिटी म्हणजे अशा रीतीने वागून ज्या एका रीतीने या संसारांतून सुटून आपल्याला जसें सुख मिळालें तसेंच सर्वांना मिळावे, अशा उदात्त तत्त्वावर जेव्हा आचरण होतें. तेव्हा युटिलिटी प्रिंसिपल लागू पडेल.

## ३. नीति आणि धर्म

सामान्य आचरण अथॉरिटीने घेवूं. बुद्धीचें काम जे आपणाला करावें लागतें तें सर्वांकडून होत नाही. तें सत्त्वावर अवलंबून असल्यामुळे तें प्राप्त करून घेण्याकरता जे वर्णधर्म सांगितले आहेत त्यांना धर्म म्हणूं. या धर्माचें असें एक तत्त्व आहे की - कोणाचा द्वेष न करतां वर गेलेले लोक सांगतील त्याप्रमाणे वागून रज, तम नाहीसे करून सत्त्वशुद्धि करून वरवर चढत जावें.

''नीति म्हणजे स्वभाव नियम व धर्म म्हणजे आचार नियम.''

ज्या रीतीने बुद्धि सत्त्वाकडे जाईल तो धर्म म्हणावा. धर्म व नीति घेऊनच योगांत अष्टांग घेतले आहेत. हें काढून टाकल्यास सहाच अंगे राहतात. स्वभाव-शिक्षणाने बहुतेक शील व आचाराच्या योगाने बाह्य क्रिया सुधरवितां येतात.

**(१) आसन :-** हे कांही नसून मिताहार ठेवून आध्यात्मिक शास्त्रांत येणारे शारीरिक अडथळे, रोग वगैरे दूर करण्याकरिता एक प्रकारची शारीरिक कसरत आहे. याच्यांत फिजीऑलॉजीकल भाग येतो.

**(२) प्राणायाम :-** आचार शिक्षण व नीतिशिक्षण जरी झालें तरी आपल्या शरीरांतील यंत्रावर ताबा ठेवणें बरें. हें सर्व शरीरांतील गतीवर ताबा ठेवल्याशिवाय होत नाही व प्राणाचें ठळक रूप श्वासोछ्वास आहे. त्या प्राणाची गती श्वासोच्छ्वासांत जास्त व्यक्त होते; इतर ठिकाणीं तशी होत नाही म्हणून श्वासोच्छ्वासावर ताबा केल्याने सर्व शारीरिक यंत्रावर ताबा ठेवितां येतो.



## ४. अभ्यासाचा क्रम

धर्माच्या रीतीने पहिले स्वभाव. मग आचार. मग शारीरिक शिक्षण. पुढे शरीरांतील यंत्रावर व मनावर ताबा करणें असें क्रमाक्रमाने आहे. येथून याच्यापुढे राजयोगाचा आरंभ होतो.

''आपले विकार ताब्यांत घेणें.'' आपण देहाच्या स्वाधीन झाल्यामुळे व विकार देहाला धरून असल्यामुळे आपल्यास विकाराचे ताब्यांत जावें लागतें.

प्रेम मात्र विकार नाही कारण तो सर्वदा राहतो. याच्यापासून एखाद्या वृत्तीच्या तडाख्यांत सांपडून सुखदु:खाच्या स्वाधीन न होतां - पाहिजे त्या गोष्टीकडे पाहिजे त्यावेळीं लक्ष देतां येतें.

सायकॉलॉजिकल भाग राजयोगांत येतो. विकार आपल्या ताब्यांत घेतले म्हणजे पुढे शांत स्थिती होते व ठशांचे वगैरे आपण बनले असूं, ह्या शंका तेव्हा निवृत्त होतात. या स्थितींत कोणतेच विकार नसतात व आपल्या स्थितीचा अनुभव तेव्हा येतो.

एखाद्या गोष्टीपासून आपण बनले असूं तर ती गोष्ट कधीच आपल्या मनांत यावयाची नाही. कारण कधीच कार्याच्या ताब्यांत नसतें.

**(४) धारणा :-** अटेंशनची पॉवर वाढविणें. पुष्कळ सायकॉलॉजिस्टांनी याकडे दुर्लक्ष केले. अटेंशनवादी इंमटीरीयल असले पाहिजेत. हे पारकीय सायकॉलॉजीवरून समजतें.-

''पाहिजे तेथे पाहिजे तितका वेळ अटेंशन ठेवतां येणे ही धारणा!''

**(५) ध्यान :- ''मेडीटेशन''** ध्यान मात्र कोणत्याही सायकॉलॉजीने शोधून काढले नाही. आपलें मन ज्या आकाराचें करावयाचें असेल त्या आकाराचें तें होतें. असें मन कां होतें? या प्रश्नाचें उत्तर सायकॉलॉजी देत नाही. सर्व पदार्थांची अव्यक्त स्थिती (चाओस) मन असावी म्हणून पाहिजे त्या वेळेला मन पाहिजे त्या आकाराचें होऊन, पाहिजे तेव्हां तो आकार सोडून देवूं शकतें.

धारणेपर्यंत सायकॉलॉजी जाते. जेवढे कांही जगत् आहे तेवढेहि मनापासूनच निघते व पुन्हा मनांतच लीन होतें असें असले पाहिजे. यांचें कारण असें-व्यक्तीवरून जातीची कल्पना करतां येतें. ज्या अर्थी एका व्यक्तीचें मन कोणत्याहि आकाराचें होतें व तो आकार मोडतें त्या अर्थी सर्व जगताचें मन घेतल्यास तें सर्व जगत् करते व सर्व जगत् मोडतें असें सिद्ध होतें. येथपर्यंत प्लेटो वगैरे आले. या रीतीने ''कोणत्याहि आकाराचें मन करून ठेवून दुसरा आकार घेऊं न देणें याला 'ध्यान' म्हणतात.''

**(६) समाधी :-** जो आकार घेतला तोच आपण होऊन जाणें ही समाधी!

## ५. भक्तीचे प्रकार

यापमाणे जगत्कारणाशीं आपले मनाने ऐक्य होतें. तरी पण मनांत खांब आणला व त्यावर प्रेम नसला तर एकदम देहावर येऊं किंवा रक्तपीतीचा मनुष्य आणला तर त्याच्यावर प्रीती नसल्यामुळे आपले मनानें ऐक्य होणार नाही. व एकदम देहावर येऊं. याप्रमाणे खरें खरें जर आपलें मन प्रेमाने जगत्कारणाकडे ओढलें न गेलें तर, जरी मनाने ऐक्य पावलों असलों तथापि आवडी इकडची असल्यामुळें, एमदम देहावर येऊं हेंच भगवंतांनी मुचकुंदाला सांगितलें आहे.

**युंजानानाम् अभक्तानां प्राणायामादिभिर्मनः।**
**अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम् ॥ भाग.स्कंध १०**

' भगवान म्हणतात वासना क्षीण झाली नाही व प्राणायामादिकांनी मनाचा जय करून माझ्याकडे लावून ऐक्य जरी पावलें तरी माझ्या ठिकाणीं प्रेम नसल्यामुळे व्युत्थान होतें.

प्रेमाने ईश्वराशी ऐक्य पावणें हीच भक्ति. या भक्तिमध्ये तीन प्रकार बांधतां येतील.

(१) एक **दास्यभक्ति.** ही द्वैतवाद्यांची आहे. आम्ही परमेश्वराचे दास आहों असे तें म्हणतात. यांत परमेश्वर निराळा व मी निराळा म्हणजे आपल्यावर जितका प्रेम तितका कशावर नसतो व आपला संबंध जितका जास्त असेल तितका प्रेम जास्त असतो. यांत आपला व स्त्रियेचा जितका संबंध आहे त्याच्यापेक्षाहि कमी संबंध परमेश्वराशीं राहत असल्यामुळे स्त्रीपेक्षाहि कमी प्रेम परमेश्वरावर राहण्याचा संभव आहे. ही भक्ती द्वैतवादी माध्वांची आहे.

(२) दुसरी भक्ति परमेश्वराशीं **नातें जुळविणे!**

ही भक्ति विशिष्टाद्वैत लोकांची आहे. यांतही अपूर्णता आहेच कारण अतिशय प्रेम करू. . . .तथापि आपल्याशी व परमेश्वराशी नाते असल्यामुळे जो थोडासा भेद राहतो तो अडथळा करतो. एकजीव होऊं देत नाही.

(३) तिसरी भक्ति **एकत्व.** हीच खरी भक्ति आहे.

वरील दोन्ही भक्तींत परमेश्वरावर आपण जे प्रेम करतो तें त्याच्या गुणांमुळे करतो. परमेश्वराचे ठिकाणीं राहणारे दयालुत्वादि गुण काढून टाकले तर त्याचे ठिकाणीं प्रेम जडणार नाही.

पण आपण दुर्गुणी जरी असलों व दयालुत्वादि गुण जरी नसले, तथापि आपला प्रेम आपल्यावर पूर्ण असतो. गुणाच्या अपेक्षेने प्रेम करणें गौण आहे म्हणून आपल्यासारखेंच प्रेम ईश्वरावर जडेल तर खरा प्रेम होईल.



## ६. ईश्वरावर शंका

**शंका :-** येथपर्यंत जरी आलें तरी एक शंका गुप्त राहते. पूर्वी आपण अति नीच स्थितींत होतो व आता ईश्वरस्थितींत येऊन पोहोचलों. तसाच ईश्वरहि नीच स्थितींतूनच या स्थितीला पोहोंचला आहे काय?

**समाधान :-** ज्या वस्तु अत्यंत भिन्न आहेत त्या कितीहि एकत्र केल्या तरी एक होऊं शकत नाहीत. मूळचेंच जर अभिन्न असूं तरच एक होऊं. आपण मूळचे जसेच्या तसेंच आहोंत. फरक जो भासतो तो खोटा आहे. ईश्वर व्यापक तर त्यांत दुसरा जगरूप पदार्थ राहण्याला जागा कोठून राहणार? म्हणून आपण मूळचे तोच आहों. जर आपण मूळचे अभिन्न आहोंत तर ऐक्य तरी कसलें? फरक-निराळेपणा भासत होता तो स्वप्नामध्ये निद्रादोषाने जसा एखादा पुरुष आपण एकच असून नानात्वाला पावतो किंवा अंधःकाराच्या दोषाने मूळची रज्जू असून त्यावर सर्प पाहतो त्याप्रमाणे आपण मूळचे एक असून माया दोषाने आपल्यांत व ईश्वरांत भेद पाहतो.

मूळची जी खोटी वस्तू आहे तिचा नाश तरी काय करावयाचा? माया जाणली की तिचा नाश होतो. स्वप्नांतला रोग जसा स्वप्नौषधीने बरा होतो किंवा पाण्यांतून तरून जाण्यास जसा पाण्याचा आश्रय करावा लागतो त्याप्रमाणे; किंवा जसा काट्यानेच काटा काढावा लागतो त्याप्रमाणे!

आतापर्यंत जीं साधनें सांगितलीं तीं सर्व मायेचा आश्रय घेऊनच करावीं लागतात व त्यांच्या साहाय्याने माया तरून जावे लागते. हा सर्व मिथ्या भासच आहे. हा नाहीसा करून माझी जशी वृत्ति झाली आहे त्याप्रमाणे वृत्ति करणें यात सर्व धर्माचें रहस्य आहे. संक्षेपाने आतापर्यंत आउट लाईन्स केल्या आहेत. पुढे विस्तारपूर्वक सांगतां येईल.

## ७.

या सर्व गोष्टीवरून आपण जन्माला आल्यापासून आपलें कर्तव्य काय आहे हें मागे सांगितले आहे व हा मार्ग सोडून देऊन भलत्याच ठिकाणीं प्रेम ठेवून आपण फसतो. म्हणन असें न करता मागे (सांगितलेला) स्वीकारलेला मार्ग स्वीकारून आपली उन्नती करून घ्यावी. आणि मागील सर्व विवेचनावरून पाहतां असे दिसून येतें की मनुष्याचा धर्म कोणता होऊं शकेल या प्रश्नाचें उत्तर आर्यधर्मच होऊं शकतें असें येतें.

**॥ श्रीमत्सद्‌गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली ॥

# ३. विचारपद्धती : पाश्चात्य व आर्य

## विचार करावयाच्या दोन पद्धति

आतापर्यंत मी जें सांगितले त्यांत बुद्धीचे काम होतें. पुढे मेडिटेशनचें काम लागेल व कदाचित् सांगण्यांत जशी सिस्टिम पाहिजे तशी राहणारहि नाही. ती तुम्ही जुळवून घ्यावी. पुष्कळ वेळेला जेव्हा कांही गोष्टी सांगतो तेव्हा त्यापैकी कांही सोपपत्तिक म्हणजे रॅशनल व काही अनुपपत्तिक म्हणजे इर्‌रॅशनल असतात.

मनाला खरोखर विचारलें की ''जितक्या सोपपत्तिक गोष्टी तितक्या सर्व खऱ्या व अनुपपत्तिक (इर्‌रॅशनल) तितक्या सर्व खोट्या असें म्हणण्याची तुझी छाती आहे काय?'' – तर तें ''नाही'' असेच म्हणेल.

कल्पना करा की जेव्हा लॉ-मध्ये पुरावे द्यावे लागतात तेव्हा ज्याकडून अधिक पुरावे तो पक्ष बरोबर म्हणतात. पण पुरावेच बरोबर आहेत कशावरून? त्याचप्रमाणे हे पुरावे आहेत असे वाटणाऱ्याला भ्रम झाला नसेल कशावरून?

**उदा :-** अमुक एक मनुष्य दिवसा जेवीत नाही व लठ्ठ दिसतो ह्यावरून तो रात्री जेवीत असला पाहिजे, असे अनुमान काढलें तर कांही वातरोगांतहि ही स्थिती होत असते म्हणून सोपपत्तिक नेहमी बरोबर असतें असें म्हणतां येत नाही.

आपल्या मनांत कांही गोष्टी असतात व त्यांच्याशीं जुळून एखादी गोष्ट दिसली म्हणजे ती सोपपत्तिक आहे असे आपण म्हणतो. जेव्हा एखाद्या सिद्धांतास आपण उदाहरण मागतो तेव्हा आपल्याला माहीत असलेल्या गोष्टीचेंच आपण सादृश्य मागत असतो.

पृथ्वी वाटोळी ओहे व ती आपल्या भोवती फिरते असें सांगण्याकरिता आपण एक गोळा घेतो व त्याला सुई टोचून अशा रीतीने फिरते म्हणून सांगतो.

पण ह्या पद्धतींत दोष आहे. त्याने सिद्धांताची बरोबर कल्पना येत नाही. फक्त एका देशाची काय ती कल्पना येते. तेवढ्या दृष्टांतावरून सिद्धांताचा दुसरा देशहि बरोबर असेल असें सांगण्यास कांही एक आधार नाही.

तर्काचेही असेच आहे. जेव्हा आपण तर्क करतो तेव्हा पदार्थाच्या सर्व बाजू सिद्ध करीत नाही. जसें ''मॅन इज मॉर्टल'' ह्या सिद्धांतांत पुष्कळ भाग श्रद्धेचाच आहे. ''मॅन इज मॉर्टल'' हें आपण पूर्व अनुभवावरून ठरविलें पण पुढे असेंच राहील त्यास कांही पुरावा नाही.



सारांश, आपण अज्ञात अंशावरच पुष्कळ वेळा चालत असतो. आपण उपपत्तीच्या योगाने ठाऊक असलेला एक देशच सांगतो व ते जुळून आले म्हणजे सोपपत्तिक म्हणतो व जे आपल्याला ठाऊक असलेल्याशीं जुळत नाही त्यास अनुपपत्तिक म्हणतो. आपणांस ज्ञात असें फारच थोडे आहे.

## काल मीमांसा / कार्य-कारण संबंध

तसेंच आपणांस काल हाहि फार थोडा ज्ञात आहे. तेवढ्यावरून जेव्हा आपण पर्वताएवढा काल स्थापन करतो तेव्हा धाडसच होतें. ह्यांतील अज्ञात काल आपल्या संशयांत पडलेला वाटतो परन्तु कांही गोष्टी अशा आहेत की त्या पुढे बदलतील. ह्याविषयी संशय घेतांच येत नाही. कारण आजच मनाला कांही गोष्टी बरोबर समजलेल्या असतात व कांही अंशमात्र समजतात. अंशमात्रांत पुढचा काल संशयांत असतो.

ह्या अंशवान् पदार्थांचा विचार करावयाच्या दोन पद्धति आहेत. एक स्वकीयांची व दुसरी परकीयांची !

(१) परकीयांची पद्धति कार्यापासून कारणाकडे जाण्याची आहे व

(२) आपली कारणापासून कार्याकडे व फिरून पुन्हा कार्यापासून कारणाकडे जाण्याची अशी आहे.

कार्य तेवढे बरोबर आहे असें दोघेहि मानतात. फरक हाच की कार्यावरून अनुमान करणारे असतात त्यांना कार्याचा साक्षात्कार असतो व 'कारण' अनुमित असतें.

दुसऱ्यांना दोन्हीहि साक्षात् असतात. झाड पाहिलें म्हणजे येथे एखादें बीज पडलें असावें व त्यापासून हें झाड झालें असावें असें वाटते. त्यांत झाड हें प्रत्यक्ष असून 'बी' अनुमित आहे. परन्तु झाड लावणाऱ्याला बी व झाड दोन्ही साक्षात् आहेत.

चिखल पाहिल्याबरोबर बदली आली असावी व पाऊस पडला असावा असें वाटतें. त्यांत चिखल साक्षात् असून बदली ही अनुमित आहे. परन्तु ज्याने बदली पाहिली व पुढे चिखल पाहिला त्यास दोन्हीहि साक्षात् आहेत. ह्याचा अर्थ असा नाही की ज्याला कारण ठाऊक असतें त्याला कार्यहि प्रत्यक्ष असतें तर जेव्हा कारण माहीत असतें व पुढे कार्य होतें तेव्हा त्याला कार्य व कारण दोन्ही साक्षात् असतात. कार्यावरून कारणाचे अनुमान करणाऱ्यास फक्त कार्यच साक्षात् असतें. जें ज्याचें कारण ठरलेलें असतें त्यापासून पुढे त्याचें कार्य होईलच असा केव्हा केव्हा निश्चय नसतो. परन्तु एकदा कार्य झालें म्हणजे तें त्याच कारणापासून होत असतें. बदली आली म्हणून पाणी येईलच असा निश्चय करतां येत नाही. परंतु पाऊस आला तर

तो बदलीनेच येत असतो.

सारांश, कारणापासून कार्य होईल ह्याचा संशय असला तरी कार्य झालें तर तेंच कारण आहे. असा निश्चय असतो.

## नैय्यायिक व साइंटिस्ट दोघेही बालिश

साइंटिस्ट कार्यावरून कारणाचा विचार करतात. आपल्याकडेहि नैय्यायिकांची हीच पद्धति आहे.

कार्यावरून कारणाचा विचार करणाऱ्यांची बुद्धी बालिश असायला पाहिजे.

त्यांना कारण माहीत नसतें. ज्याचें आपल्याला एक्स्प्लेनेशन देतां येत नाही तें जर दुसऱ्याने दिलें तर तो बुद्धिमान आहे असें आपण म्हणतो.

एक्स्प्लेनेशन म्हणजे समोर असणाऱ्या गोष्टींची कार्यकारण शृंखला दाखविणें. पुढे आलेले पदार्थ कांही एक्स्प्लेनेशन देत नसतात तर जेव्हा सामान्य कारण समजतें तेव्हाच ते एक्स्प्लेनेशन होतें. जेव्हा वैद्य अरुचीचें एक्स्प्लेनेशन देतो तेव्हा तो तिचे कारणच सांगत असतो.

ह्याप्रमाणे जो जास्त कारणवेत्ता तो अधिक बुद्धिमान व कमी कारणवेत्ता तो कमी बुद्धिमान ठरतो. केवळ कार्यवेत्त्याला बुद्धिमान म्हणत नाहीत. अलंकार नुसते माहीत असून ते कशाचे आहेत हें माहीत नसलें तर तो बुद्धिमान नाही. अरुचि, वैद्यास व रोग्यास सारखी माहीत असते. परन्तु रोग्यास तिचें कारण माहीत नसतें व वैद्यास तें असतें. म्हणूनच ''कार्यवेत्त्याला बुद्धिमान म्हणत नाहीत.'' आपण जेव्हा कार्यापासून कारणाचा विचार करतो तेव्हा त्या विचारात बालिशता असते.

## अनलाईझेशनची अपूर्णता

अशा रीतीने विचार करताना आपण कार्याचे विभाग करतो किंवा त्याला अनलाईझ करतो.- पुस्तकाचा विचार करीत असतांना आपण त्याचे बालिश बुद्धीने तुकडे करतो व अशा रीतीने तुकडे करीत करीत शेवटीं एखादा तुकडा मनांत ठेवतो व त्याला परमाणू असें म्हणतों. हे परमाणू एकत्र जमविले म्हणजे त्याचें कार्य होतें असें आपण म्हणतो. ही नैय्यायिक व साइंटिस्ट यांची पद्धति आहे.

## संख्या, जाती व व्यक्तिज्ञान

ह्या पद्धतीने एका गोष्टीचा निकाल लागत नाही. संख्या व जाती ह्यांची पदार्थ समजण्यास फार जरूर आहे व कार्यावरून ह्या समजत नाहीत. संख्येचा विभाग होत नाही. एका पदार्थाचे तुकडे केले तरी शेवटील तुकड्यास आपण एकच म्हणतो. किंवा एका पदार्थांतून काही भाग कितीहिदां जरी उणे करीत गेलो तरी



उरलेल्या विभागास आपण एकच म्हणतो. आपण पदार्थाचे लहान लहान तुकडे करून 'अणुत्व जाती' (म्हणजेच) 'परमाणु' आहेत असें म्हणतो.

## जाती / व्यक्ति ज्ञान

जाती-ज्ञानाने बरेच काम होतें. काष्ठत्व-जाती स्थापन केल्यामुळे हे व्यासपीठ लाकडाचें आहे असें आपण म्हणतो. नाहीतर ह्यास लाकडाचें व दुसऱ्यास कशाचें तरी म्हटले असतें.

हे जातिज्ञान काय आहे?

व्यक्तिवरच जाति अवलंबून आहे असें म्हणता येत नाही. कारण व्यक्ति, जातीचे पिक्चर मनांत आणून देत नाही. सादृश्याचें ज्ञान व्यक्तीवरून होत नाही तर आपण मनानेच तें जुळवून घेतो. सदृशत्वावरून जाति ठरवितो ह्यांत चूक होते.

आपण व्यक्ति ठरविण्यांत विसदृश गुण मनात घेतो व सदृश गुणांकडे दुर्लक्ष करतो. आणि जाति ठरविण्यात आपण सदृश गुणांकडे लक्ष देतो व विसदृश गुणांचा परित्याग करतो. ही चूक नैय्यायिक व साइंटिस्ट्स ह्या दोघांच्याहि लक्षांत आली नाही.

पुष्कळ म्हणतात की, जाति-व्यक्तीचा अन्योन्याश्रय आहे. ह्यांच्या मतें पर्टिक्यूलर हे जनरलवर व जनरल हे पर्टिक्यूलरवर अवलंबून आहे. पुस्तकत्व ठाऊक नसलें तर पुस्तक म्हणता येणार नाही व पुस्तक माहीत नसलें तर पुस्तकत्व समजणार नाही. पण हा अन्योन्याश्रय आहे. हा दोष आहे.

## महाराजांचे नवे मत

माझे स्वतःचे मत असें आहे की,

''आपण कांही गुणांकडे लक्ष देतो व तितकेच गुण ग्रहण करतो आणि त्यास पदार्थ असें म्हणतो.''

**आपण पदार्थ आहे असें म्हणतो तेव्हा विसदृश गुणांकडे आपण लक्ष देत नसून सदृश गुणांकडेच लक्ष देतो.**

हें असें कां होतें हें सांगतां येत नाही. पण असें होतें मात्र खरें. असो.

## कारण : जातीला धरून

कारण हें काय असतें? जितकीं कार्यें उत्पन्न होतात त्या सर्वांत कारणाची अनुवृत्ति असली पाहिजे. 'कारण' नेहमी जातीला धरून असते; व्यक्तीला धरून नसतें. तें कधीच व्यक्तीला समीप नसतें.

आपण 'पेटींतून खांब झाला' असें म्हणत नसून 'लाकडांपासून झाला' असें म्हणतो. कार्याला पर्टिक्यूलराइज करीत असतो. म्हणजे कार्यांतील युनिटी मोडतो.

जातींत युनिटी अधिक आहे. आपण जेव्हा एखाद्या वस्तूचे परमाणू पाहतो तेव्हा त्या वस्तूची युनिटीच मोडतो.

अर्थात् कार्यावरून कारणाचें अनुमान करण्यात त्या कार्याची युनिटी मोडल्या जाते.

## एकत्व संख्या जातीला धरून

आपण जी पदार्थास एकत्व संख्या देतो ती जातीलाच धरून देतो. व्यक्तीला धरून देत नाही. हजार माणसांचे घोळक्यास आपण एक समुदाय म्हणतो. तसेंच आपण जेव्हा एक मनुष्य म्हणतो तेव्हा परमाणु मिळून झालेल्यासच एक म्हणतों. हें एकत्व जातीसच देतो.

## नानात्व व्यक्तीला धरून

जेव्हा पदार्थातून कांही व्यक्ति अलग करितो तेव्हा आपण त्यांना नानात्व देतो. आपण पुस्तकांस जेव्हा नानात्व देतो तेव्हा त्यांतून कांही व्यक्तीच काढत असतो.

परमाणु मिळून व्यक्ति होते म्हणजे काय होते? जातीचीच कल्पना जेव्हा जास्त घट्ट होते म्हणजे पुष्कळ स्पेसमध्ये जी जाति ग्रहण करीत होतो ती जेव्हा एकाच थोड्या स्पेसमध्ये ग्रहण करितो तेव्हा ती व्यक्ति होते. अर्थात कार्य ही जाती झाली असें म्हणणे भाग पडेल.

बरें, असें मानलें तर कार्यावरून कारणाचें अनुमान होतें असें म्हणता येणार नाही. कारण व्यक्तीची कल्पना परसेप्शनने होतें. अनुमानाने होत नाही.

अनेक व्यक्ति मिळून जाति होते असें मानलें तर जिच्याविषयी व्यक्तीची कल्पना केली तशीच दुसरी व्यक्तिही आहे की नाही?

असेल तर येथेही जातीची कल्पना घेतली. मोलीक्यूल ही जाती आहे पण त्यांतील ॲटम्स दोन होते की एक होता?

दोन होते व सारखे होते असें मानले तर जाती घेतलीच; म्हणजे कार्याचे वेळेला जाती आहे व कारण ही जाती आहे असें म्हणावें लागेल.

म्हणून सायंटिस्ट्स व नैय्यायिक पद्धतींत दोष आहे.

## सांख्यांचा जाति-कारण वाद व ॲटोमिक थियरी

आता आपण कारणाची कल्पना जातीवर ठरवूं. जातिकारणवादी प्लेटो किंवा आपणाकडे सांख्य आहे. साख्यांचे म्हणणें असें आहे की, निरनिराळ्या वस्तूंचे निरनिराळे परमाणू नसून तें एकाच वस्तूचे विभाग आहेत. इलेक्ट्रॉनिक थियरी ह्याच पद्धतीची दिसते. जे.जे. थॉम्प्सन म्हणतो जे इलेक्ट्रॉन्स हॅड्रोजनमध्ये आहेत तेच



ऑक्सिजनमध्येहि आहेत. त्याने हें आपलें म्हणणें अल्फा, बीटा व एक्सरेजने सिद्ध केलें आहे. तो म्हणतो इलेक्ट्रॉन्स हे विवक्षित डायरेक्शन मध्ये आले म्हणजे निरनिराळे पदार्थ भासतात.

सांख्य ह्याचेहि पुढे गेले आहेत.

ह्या थियरीमध्ये एकाच वस्तूच्या परमाणूंचें हें जगत् मानलें आहे. ह्यांचे इलेक्ट्रॉन्स इतके सूक्ष्म आहेत की जर एक ॲटम पृथ्वी एवढा मानला तर त्या मानाने एक इलेक्ट्रॉन चेंडू एवढा होईल. ही एक एटोमिक थियरी आहे. पण हे इलेक्ट्रॉन्स एकाच वस्तूचे आहेत असें म्हणण्यांत त्यांच्यामध्ये जो निरनिराळेपणा होतो तो कां होतो? ह्याचें उत्तर या थियरीने देतां येत नाही.

निरनिराळे इलेक्ट्रॉन्स मानले तर त्यामध्ये स्पेस असली पाहिजे. ती स्पेस काय आहे हें त्या थियरीने सांगतां येत नाही.

सांख्य म्हणते जाति व स्पेस ह्यांत फारसा फरक नाही. कारण स्पेसला एक्झिस्टन्स तर आहेच.

बरें ती जर व्यक्ति मानली तर ती 'फायनेट' आहे असें मानावें लागेल.

त्याअर्थी स्पेसचा जातींतच अंतर्भाव करणें योग्य आहे.

आता मॅटर व ही स्पेस ज्याचेपासून प्रतीत होते ती जाती होय, असें झालें व ह्या जातीलाच सांख्यांनी प्रकृति म्हटलें आहे.

हें म्हणणें वरील थियरीपेक्षा बरेंच सयुक्तिक आहे.

तथापि जातिपासून व्यक्ति कशी होते? हें सांख्याला दाखवितां येत नाही. ह्या पद्धतींतहि कार्यावरूनच अनुमान केल्यासारखें दिसतें.

## वेदान्ताची पद्धती

एक वेदांतपद्धतीच काय ती कारणापासून बरोबर कार्याकडे येते. वेदांतांत सत्त्व, रज, तम हा भाग सांख्यांतूनच घेतला आहे. तथापि त्यांत दुसरी एक पद्धति आहे.

वेदांताचे मताप्रमाणे एक ब्रह्मच असून तें अज्ञानाने आवृत आहे. ब्रह्मावरील जितके अज्ञान नाहीसे होतें तितकें ब्रह्म स्पष्ट होऊन तें पदार्थरूपाने भासतें.

कमी अज्ञान निघालें तर तेंच ब्रह्म 'पदार्थ' होतें व सर्व निघालें तर ब्रह्मरूपाने दिसतें.

ज्याप्रमाणे प्रकाश ज्या ज्या आकाराच्या छिद्रांतून काढला त्या त्या आकाराचा होतो त्याप्रमाणेच पदार्थ दिसते वेळी ब्रह्माचेही होत असते.

मन जातीकडे धावते तेव्हा विसदृश गुणांकडे लक्ष देत नाही. त्यामुळे सामान्य चैतन्यावरील अज्ञान दूर होऊन ब्रह्म जातीच्या आकाराने दिसते; व व्यक्तीकडे धावते तेव्हा विसदृश गुणांकडे लक्ष देतें; त्यामुळे तितकेच अज्ञान दूर होऊन व्यक्ति दिसते.

आपण पदार्थाकडे पाहतो तेव्हा आपणास ब्रह्माच्या एक-देशाचें ज्ञान होत असून बाकीच्या सर्व देशांचें अज्ञान असतें. संसार-ज्ञान हें ब्रह्मज्ञानच होय.

## कार्य व कारण

कार्यकारणभाव हा पदार्थांत नाही. आपण जेव्हा कारण म्हणतो तेव्हा सारखेपणाकडे लक्ष देतो व विसदृशाकडे दुर्लक्ष करतो व कार्य म्हणतो तेव्हा विसदृशपणाकडे लक्ष देऊन सारखेपणाकडे दुर्लक्ष करतो. एकंदर कार्यकारणाची ही अशी स्थिती आहे.

वस्तुतः कार्य म्हणून कांही एक नसून कारणच आहे व तें अज्ञान होय. तें जितकें दूर केलें तितकें ब्रह्म दिसून तें पदार्थाकार भासतें.

अज्ञान नानाप्रकारचें आहे. सत्त्व, रज, तम हे त्याचे प्रकार होत.

मनाचे ठिकाणीं सत्त्वच फार आहे कारण तें चैतन्याचे अगदी जवळ आहे. विकार मनांत आल्याबरोबरच त्यावरील आवरण लौकर निघतें.

रज हे सत्त्वाइतके चैतन्याचें समीप नाही. त्यावरील आवरण निघतें पण लौकर निघत नाही.

तमांत आवरण फार आहे. त्यांत आपण इंद्रियांची मदत घेऊन आवरण दूर करीत असतो व नंतर पदार्थ दिसतात.

## स्पेसचा अर्थ

जेव्हा पदार्थ भासतात तेव्हा त्यांत स्पेसचें आवरण असतें. स्पेस म्हणून कांही एक नसून जेव्हा आपण ब्रह्मावरील किंचित् आवरण दूर करतो व तितक्यापुरते ब्रह्म पदार्थाकार भासते. तेव्हा त्याहून बाकीच्या चैतन्यावर आवरणच असतें व तें आवरणच म्हणजे स्पेस होय.

सारांश दुर्लक्ष असलेला चैतन्याचा भागच स्पेस होतो.

## 'टाइम' चा अर्थ

तसेंच टाइम म्हणून कांही एक नसून जेव्हा बुद्धि एकामागून एक आवरण दूर करतें तेव्हा त्यांत जें डिस्टन्स वाटतें तीच टाइम होय.

एकंदरीत स्पेस- टाइम अँड मॅटर, हें अज्ञानाचें कार्य होय. हें मेडिटेशनने



संपूर्ण दूर होते, तेव्हा मनुष्य मुक्त होतो.

सर्व पदार्थांत जाती आहेत. पण आपण जेव्हा व्यासपीठ घेतो तेव्हा सामान्य गुणांकडे दुर्लक्ष करून विशेष गुण घेत असतो व त्यामुळे ते व्यक्तिरूपाने भासते.

## पुनर्जन्माची उपपत्ति

तसेंच जोपर्यंत सर्व आवरण दूर होत नाही तोपर्यंत आपण वासनेने जें जें कांही करतो तेवढ्या पुरतेंच आपण आपलें व्यक्ति-अस्तित्व मानून घेतो. व म्हणूनच आपण पुनर्जन्म घेतो. याप्रमाणे पुनर्जन्माची उपपत्ति आहे.

## स्वप्न कसे पडते?

स्वप्न म्हणजे बाकीच्या संस्कारांकडे दुर्लक्ष करणे व एकच संस्कार घेणे होय. स्वप्न पाडून घ्यावयाचें असल्यास एक संस्कार पुढे घेऊन बाकीच्याकडे दुर्लक्ष करावें म्हणजे स्वप्न पडतें.

## कार्याची उत्पत्ती

जेव्हा कारणापासून कार्य होतें. असें आपण म्हणतो तेव्हा बाकीच्या चैतन्यावरचें आवरण तसेंच ठेऊन पदार्थापपुरते आवरण आपण दूर करतो.

## मेडिटेशनने जगाची उत्पत्ती

**मेडिटेशन म्हणजे विवक्षित चैतन्यावरचें आवरण दूर करणें होय.**

मेडिटेशनमध्ये आपण एकाच भागाकडे लक्ष देऊन तेथील आवरण दूर करतो. जेव्हा कारणापासून कार्य होतें असें आपण म्हणतो तेव्हा तें काम मेडिटेशननेच होतें.

''त्या परमेश्वराने जग उत्पन्न केलें.''

"ध्यानाने जग उत्पन्न केलें.''

''तो म्हणाला - मी एक आहे पुष्कळ होईन.''

''त्याने सर्व लोक उत्पन्न केलें.''

अशा वेदांत पुष्कळ श्रुति आहेत.

ह्या परमाणुवाद्यांना अनुपपत्तिक वाटतात व बरेच लोक ह्यावर केवळ श्रद्धाच ठेवतात, परन्तु वरील मेडिटेशनच्या पद्धतीवरून परमेश्वरानें हें जग असेंच उत्पन्न केलें असलें पाहिजें हें आपणाला आता युक्तीने पटलें आहे.

खरोखर पाहिलें असतां ही कारणाकडून कार्याकडे जाण्याचीच पद्धति बरोबर आहे.

**उदा :-** एखाद्या मुलीस पोळी करावयास सांगितली असतां तिला जर कणीक व पोळी कशी करावी हें सांगितलें तर ती त्या कणिकेची पोळी करून देईल.

परंतु तिला पोळ्या दिल्या व असें सांगितलें की ''ह्या पोळ्यांचें कारण पाहून मग या कारणापासून कार्य तयार कर.'' तर तिने त्या पोळ्यांचे कितीहि तुकडे करून पाहिले तरी त्याचें कारण जी कणिक ती तिला कधीच समजणार नाही.

आपल्या इकडील महात्म्यांची पद्धति कारणाकडूनच कार्याकडे जाण्याची होती. त्यांना एकदा कारण समजल्यावर पुन्हा त्या कारणाचें कार्य झालेंच पाहिजें अशी गरज नसतें. कारण त्यांना 'कारण' समजल्याने ते मुक्त होतात. त्यामुळे त्यांना कार्याची आवश्यकता नसते.

असो. हा एथपर्यंत गीतेचा उपोद्घातच झाला. ह्याचे पुढे आता गीतेला प्रारंभ होईल.

**॥ श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥**

# ४. मनोविश्लेषण

**१**

मी येथे आता गीतेची प्रस्तावना सांगत नाही. तथापि या गीतेचें थोडक्यात कारण सांगतों. युद्धाचे वेळीं अर्जुनाला आपल्या भावांवगैरेविषयी मोह पडला होता. तो दोन प्रकारें पडला होता.

(१) एक तर मी यांना मारणार व हे कौरवादिक मरणार व म्हणून मी काय करावें? (२) दुसरे यांना मारणें हा कांही धर्म नव्हें.

एक देहाला आत्मा समजून देहनाशाबरोबर आत्मनाश होतो असें मानूं लागला व दुसरें मी काय करावें अशा स्वतःच्या कर्तव्याविषयीचा होता.

हें दोन्ही प्रकारचे मोह प्रत्येकांना असतात. पैकी कर्तव्याविषयीचा मोह कर्माने जात असून आत्म्यासंबंधीचा मोह ज्ञानाने नाश पावतो व ह्याकरितांच ही फिलॉसॉफी स्थापन झाली आहे.

## २. तीन प्रकारचा मनुष्य

मनुष्य तीन गोष्टींचा बनला आहे. देह, मन व आत्मा. तीन गोष्टी एकत्र झाल्या म्हणजे मनुष्य होतो.

**१)** पंचभूतांचा बनलेला हा दृश्य देह,

**२)** मन म्हणजे क्षणोक्षणीं बदलणारा असा एक पदार्थ. त्यांत वायु वगैरे दृश्यांतच येतात.

**३)** आत्मा म्हणजे या जड देहांत व या बदलणाऱ्या पदार्थांमध्ये चेंजिंग



पाहणारा.

मनांत इच्छा नसली तर जड देहाकडून कांहीच होत नाही. यावरून देहावर ताबा करणारी विशेष कोणी तरी शक्ति आहे, असें निघते. मनाला नियमन करणारा नसल्यास 'एखादा विचार करावा व एखादा विचार करूं नये' अशा प्रकारें जें आपण विचारावर ममत्व स्थापन करितो, ते करूं शकणार नाही. विचार बरोबर झाला किंवा नाही हें कांही कॉंशन्सला ठरवितां येणार नाही म्हणून आत्मा पाहिजेच.

जरी विकारांना पुष्कळांनी पाहिलें, तथापि आत्मा पाहिला नाही. विकारांचा परिणाम पाहूनच आपली स्थिति ठरविली म्हणजे ''आत्मा जो वास्तविक 'अनुभवगम्य आहे त्याला अनुमानगम्य केलें' ही चूक झाली.''

गावाला जातांना पुष्कळ गावं पाहतो तथापि मुक्कामाचेंच ठळक गावं लक्षांत राहतात. त्याप्रमाणे मनुष्यांत अनंत तत्त्व आहेत. पण वर सांगितलेलें तीनच त्यांत मुख्य आहेत. आता आपण पाहूं की - देह काय आहे ?

## ३. देह काय आहे ?

देह हा अगदीच नेणता पदार्थ आहे. आत्मा हा सर्व विकार व सर्व जडाला जाणणारा आहे. मनांत कांही जडाचाहि भाग आहे व तें चेतनांशासहि चिकटून असतें. आपण मनाच्या विकारांना जेव्हा पाहतो तेव्हा आपण त्यांच्याहून निराळे असतो पण एकदम कोणी जेव्हा हाक मारतो तेव्हा 'ओ' देतो. म्हणजे सर्वच विकार एकत्र करितो. आपण आपलें मन नेहमीच कांही पृथक करीत नाही. जेवतांना आपण आपल्याला बांधून टाकतो म्हणजे त्या विकाराचा अविवेक करतो.

वास्तविक मन जड आहे तें कांहीच जाणत नाही. आत्माच सर्व जाणतो. मन त्या त्या स्थितिरूप बनत असतें. मन सर्वथाच दृष्य पाहिजें असें कांही नाही. 'इथर-टाइम' हे सर्व जड आहे पण काही दिसत नाही. हें सर्व ज्ञेय आहे. आत्मा अनुभवगम्य आहे विकारांचे सर्व चेंज आत्म्यानेच पाहतात व नंतर पाहणारा जो, त्याला विसरून जावून, त्याचा विकाराशीं अविवेक करून, विकारानेच चेंज कळलीं असें म्हणतात. म्हणजे जो अनुभवगम्य आहे तो अनुमानगम्य मानतात. ही त्यांची चूक आहे.

मन जड व त्याचा संबंध चेतनाशी आहे. आता ह्या ठिकाणीं अशी शंका येते की जड व चेतन हे तर विरोधी आहेत; मग यांचा संबंध कसा होतो ? पण दोन्ही जर गोष्टी सत्य असल्या व परस्परविरोधी असल्या तर एके ठिकाणीं राहत नाहीत. पण एक सत्य व एक मिथ्या एके ठिकाणीं राहूं शकतात.

**उदा :-** वाघ व मनुष्य. हे दोन्ही एकाच सत्तेंतलें असल्यामुळे ते एका ठिकाणीं

राहूं शकत नाहींत. पण मनुष्य व वाघाचें चित्र विषम सत्तेंतलें असल्यामुळे एका ठिकाणीं राहूं शकतात.

मन हें वास्तविक मिथ्या आहे. जर आपण त्याला साह्य केलें तर त्याला कांही जाणतां येतें. आपलें लक्ष नसलें तर पदार्थ कळत नाही. मनाच्याच योगाने देह चालतो. मन मिथ्या असल्यामुळे चेतनाशी संयोग झाला. हें सर्व आत्माच चालवितो.

बाहेरच्या पदार्थाचे मानसिक चित्र पहिलें तयार होतें. तें आपल्याला कळतें. इच्छा उठते तीहि आपल्यांतून उठत नाही. कारण तीहि आपल्याला कळते व त्यावेळीं आपण त्याहून निराळे राहतो व ती इच्छा देहाला चालविते, म्हणजे मन देहावर येतें, तेव्हा देह चालतो. पण एकाच्या क्रिया एकावर दिसतात हा भ्रम आहे.

आत्मा वास्तविक अनुभवाने कळणारा असून आपण त्याला मनाने पाहण्याची खटपट करितो. वास्तविक आत्मा मनाला पाहतो मग तो मनाने कसा कळणार? मन डोळ्यांना पाहतें व तें आपण डोळ्यांनी पाहण्याची खटपट करितो. पण ही व्यर्थ आहे.

यांच्याप्रमाणे आत्मा मनाला जाणतो व तोच आत्मा आपण मनाने पाहण्याची खटपट करतो.

हें ज्ञान विचाराने न येता स्वयं असलें पाहिजें व तें दाखवून देणारा गुरुमात्र पाहिजे.

**'कसे बोटाने दाखवूं तुलां । पहा अनुभव गुरूच्या मुला ॥'**

## ४. कर्ता व भोक्ता

हा देह कर्ता-भोक्ता होऊं शकत नाही कारण हा दृश्य व जड आहे व याला कांही समजत नाही. त्याचप्रमाणे आत्माहि कर्ता व भोक्ता होऊं शकत नाही. कारण भोगाचे जे विकार आहेत त्याहून तो निराळा आहे. त्याचे ठिकाणी अमुक केलें पाहिजें व अमुक करूं नये हे विकार नाहीत. हे विकार मनाचेच आहेत म्हणून चेतनाशीं संयोग पावलेलें मनच कर्ता व भोक्ता होऊं शकतें. जो ज्या कार्याचा कर्ता असतो तोच भोक्ता होऊं शकतो.

## ५. परलोक : पुनर्जन्म

हा देह कर्ता-भोक्ता होऊं शकत नाही कारण हा कर्ता-भोक्ता असता तर देहानी जितका अनुभव घेणें शक्य आहे तेवढ्या पुरतीच इच्छा आपल्याला व्हावयाला पाहिजे होती. देहाविरहित म्हणजे जिचा देहाने अनुभव घेणें शक्य नाही अशी इच्छा उत्पन्न झाली नसती. पण जगत् कसें करावें? सूर्यावर काय आहे? वगैरे इच्छा



उत्पन्न होतात. यावरून इच्छा देहापेक्षा व्यापक आहे व अर्थातच ती देह पडल्यावर पूर्ण होण्याकरिता राहिली पाहिजे. कारण तिची तर पूर्णता या देहांत झाली नाही तर तिची वाढ न होतां एकदम नाहीशी होणें शक्य नाही. सायंटिस्टला ही गोष्ट मान्य नाही.

जेथे या इच्छेची पूर्णता होते तोच परलोक किंवा पुनर्जन्म होय.

## ६. पुनर्जन्म कोण घेतो?

देह पुनर्जन्म घेत नाही कारण तो कर्ता भोक्ता नाही. चेतन व जड यांच्या संयोगाने झालेले पातळ मन तेंच पुनर्जन्म घेतें. पाणी हातांत घेऊन पाहिजे तो आकार देतां येत नाही. पण ओली माती जर घेतली तर थोडी ओली व थोडी घन असल्यामुळे पाहिजे त्या वेळेला पाहिजे तो आकार देतां येतो. त्याप्रमाणे देह अति जड व येथेच पडून राहणारा आहे. याला पुनर्जन्म नाही. याला पाहिजे तो आकार देतां येत नाही. कारण जो जो आकार त्याला द्यावा त्या आकाराला, जाणणारा आत्मा पाहिजेच. त्यावाचून त्याची सिद्धीच होणार नाही. म्हणून चेतन व जड यांच्या संयोगाने बनलेलें मनच ओल्या मातीप्रमाणे पाहिजे तो आकार घेतें यालाच पुनर्जन्म म्हणतात.

## ७. गर्भावतरण प्रक्रिया

हें जें मन आहे तें आकार घेतें पण पहिलें आपल्या वासनेप्रमाणे आकार घेतें. मूर्खांना आत्मा व मन एकच वाटत असल्यामुळे ज्ञान होईपर्यंत पुनर्जन्म सुटत नाही. मनालाच जीव म्हणतात. जीव वासनाबलानेच जो आकार घेतो तो फार मोठा असतो व तसा आकार घेण्याला साचा पाहिजे. त्यालाच गर्भ म्हणतात. पहिले तो आकार श्वासाच्या द्वाराने पित्याच्या शरीरांत जातो. या प्रत्येकांशी प्रेमरूप अट्रॅक्शन असतेंच व त्यामुळेच तो आकार पित्याच्या शरीरांत जातो. तो कसा कसा जातो हे स्वतः गेल्याशिवाय समजणार नाही. कारण तर्काने हें सांगणें शक्य नाही म्हणून माझें वचनमान पुढे समजेलच. नंतर तो बापाच्या वीर्यांतून आईच्या गर्भांत जावून वासनेप्रमाणे आकार घेऊन बापाचें रेत व आईचें शोणित यांच्या योगाने जो गर्भ तयार होतो त्याचे आंगावर पांघरूण घेतो. अशा रीतीने पुनर्जन्म होतो.

## ८. नास्तिकाच्या एका महत्वाच्या प्रश्नाचें उत्तर

पुष्कळ नास्तिक असें म्हणतात की पुनर्जन्म आहे कशावरून? मेल्यावर आत्मा नाहीसा होतो हें त्यांचे म्हणणें त्यांनाच घातुक आहे कारण त्यांना विचारावें की,

'जर पुनर्जन्म नाही तर हा तरी जन्म कसा आला?'

'आत्मा नव्हता व त्या अभावापासून त्याला हा जन्म आला' असें जर म्हणाल तर मेल्यावरहि तो तुमच्या मतें नाहीसा होतो, मग त्या अभावापासून तो पुन्हा कां जन्माला येऊं नये?

आत्मा पूर्वी होता असें मानल्यास इम्मॉरटॅलिटी सिद्धच झाली.

पूर्वी आत्मा नव्हता व तो आता उत्पन्न झाला असें मानल्यास - देहाकरिता जशी वीर्य शोणित सामुग्री पाहिजे तशी यालाहि सामुग्री पाहिजे. मुळांतच कांही नाही तर त्याची उत्पत्ति तरी कशी व्हावी?

देहाचें कारण पूर्वी होतें म्हणून देह उत्पन्न झाला. त्याप्रमाणे जीव उत्पन्न होण्याला कारण होतें - असे म्हणशील तर नाहीसा होऊन पुन्हा कसा उत्पन्न होणार नाही?

आतां हा आत्मा नाहीसा होऊन दुसराच उत्पन्न होतो, हा कांही उत्पन्न होत नाही - असें म्हणशील तर दोन निरनिराळ्या वस्तु उत्पन्न होण्याला दोघांनाहि स्वतंत्र निराळ्या सामुग्र्या पाहिजेत. पण येथे तर दोघांनाहि 'अभाव' (ही) एकच सामुग्री आहे.

- म्हणजे आम्ही जसे भाव इंमॉरटल धरतो त्याप्रमाणे नास्तिकहि अभाव इंमॉरटल धरतातच.

आत्म्याचें ज्ञान व देहाचा जडपणा याचा मनाला संसर्ग आहे. आत्मा हा ज्ञान आहे. मनाला कांही ज्ञान होत नाही. कारण मनाला ज्ञान होतें म्हटल्यास क्रोधाचें ज्ञान शांतीला झालें पाहिजें पण तसें होत नाही. क्रोधाचें व शांतीचें ज्ञान एकालाच होतें. याप्रमाणे पुनर्जन्म दोघांनाहि कबूल आहे, भगवान म्हणतातः-

**अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसेऽमृतम् ।**
**तथापि त्वं महाबाहो, नैनं शोचितुमर्हसि ॥**

अर्जुना ! हे नित्यच जर नष्ट होतात असें जर मानत असशील तरी शोक करूं नकोस. कारण हें जसें नसून उत्पन्न झालेत त्याप्रमाणे पुन्हाहि उत्पन्न होतीलच. व जर हे बांधव नित्यच उत्पन्न होतात असें मानशील तर मग शोक करण्याची गरजच नाही.

**वासांसि जीर्णानि यथा विहाय, नवानि गृह्णाति नरोऽपराणि॥**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥**

ज्याप्रमाणे जीर्ण वस्त्र टाकून नवीन वस्त्र आपण आंगावर घेतो त्या प्रमाणे देही जीर्ण देह सोडून नवीन देह घेतो. देही म्हणजे वासनारूपी देहाशीं जो चिकटला



जातो तो.

## ९. स्वार्थी व निःस्वार्थी : विश्लेषण

मन जसें जसें स्वार्थाला धरून कर्म करूं लागतें तसें तसें तें या देहाला जास्त चिकटतें. व जसें जसें परोपकार करण्याकडे लागतें तसें तसें देहाची पर्वा कमी राहत असल्यामुळे देहाहून निराळे होत जाते.

यावरून एक सिद्धांत असा निघतो की स्वार्थपरायण मनुष्याच्या हातून नीच कृत्यें होत असून तो परतंत्र होतो व त्याला नीच कर्मानुसार नीच जन्म घ्यावा लागतो. परोपकार करणाऱ्या मनुष्याच्या हातून नेहमी चांगलीं कृत्ये होत असल्यामुळे व तीं कृत्यें करतांना देहाची पर्वा राहत नसल्यामुळे तो देहाहून निराळा होतो व त्याला चांगल्या कर्मानुसार स्वतंत्र जन्म मिळतो.

स्वार्थी लोक दुसऱ्याचा द्वेष करतात तेव्हा त्यांच्याजवळ शस्त्र नसलें तर दात ओठ खाऊन दाताने त्या मनुष्याला फाडून टाकावेसें त्यांना वाटतें. या अशा हिंस्त्रक वासनेमुळे त्यांना व्याघ्रादिक हिंस्त्रक पशूंचा जन्म येतो.

परोपकारी मनुष्य स्वतंत्र असल्यामुळे स्वतंत्र अशा देवादिकांचा आकार घेतो. हे सर्व आकार मनच घेत असतें.

## १०. नास्तिकाला उत्तर

पुष्कळ नास्तिक म्हणतात की जर पुनर्जन्म आहे तर मागल्या जन्माची स्मृति कां राहत नाही? स्मृति असल्याशिवाय जन्म कसा ठरवावा?

हा त्यांचा हेतू अगदी पुचाट आहे. हेतू इतका प्रबळ असावा की त्यानी तीच गोष्ट सिद्ध झाली पाहिजे, दुसरी होऊं नये. बाळपणीं आपण काय केलें आहे हें माहीत नाही, गर्भातली आपणांस स्मृति नाही, किंबहुना काल आपण काय केलें हे सुद्धा आठवत नाही तर यावरून असें म्हणतां येईल काय? की आपण बाळपणीं नव्हतों व कालहि नव्हतों.

स्मृति अशी असली पाहिजे की असें म्हणणें चूक आहे. संस्कार लीन राहतात. पण ते उद्भूत करतां येत नाहीत कारण आपलें अज्ञान फार भयंकर आहे.

स्मृतीच्या अभावावरून पुनर्जन्म खोडतां येत नाही. तुम्हांस स्मृति नाही ही परमेश्वराची मोठी कृपाच आहे. कारण कर्मानें कोणाचा संबंध कसा जुळेल हें सांगतां येत नाही.

पती चांगला असून स्त्री पतीवर प्रेम न करतां आपल्या दुर्गुणी मुलावर प्रेम करूं लागली तर तो त्या प्रेमामुळे पुढले जन्मीं तिचा पति होतो. मुलाला रक्षणाचा

व शिक्षणाचा अधिकार आहे व केवळ रक्षणाचाच अधिकार केला तर पतीची प्रतीती होते. आता जर स्मृति राहिली तर मातृसंयोग केल्याचा दोष येईल. म्हणून स्मृति न राहणेंच चांगलें आहे.

आपल्यास स्मृति कशाची राहते? ज्याची आसक्ति फार राहते त्याचीच स्मृति राहूं शकते. गाडींत बसतांना आपण कितीकांचें तोंड पाहतों. पण स्मृति सर्वांची राहत नाही. ज्याचा विशेष संबंध असला त्याचे तोंड ध्यानांत राहतें.

पुनर्जन्माचीहि तशीच गोष्ट आहे. एका आईच्या पोटीं दोन जुळीं मुलें होतात, पण त्यापैकी एक गणितशास्त्रांत चांगला तर दुसरा व्याकरणाशास्त्रांत चांगला दिसतो. ह्यांचे कारण पूर्वी त्यांना ह्या विषयाचे ठिकाणीं जास्त आसक्ति असावी असें अनुमान निघतें.

मागल्या जन्माकडे कमी अनुसंधान असल्यामुळे व या देहावरच जास्त अनुसंधान असल्यामुळे स्मृति राहत नाही. अनुसंधान ठेवल्यास आठवूं शकतील. म्हणून ह्या जन्मांत जे जे संस्कार दृढ करून घेऊं ते आठवल्यावाचून राहणार नाही.

## ११. सकाम कर्म व निष्काम कर्म

पापकर्माने मन देहाला चिकटून राहतें व तसाच त्या वासनेनुरूप आकार घेतें. पुण्यकर्माने मन स्वतंत्र होतें व स्वतंत्र इच्छा झाली तरी ती गोष्ट मिळवून घेतें. देहाची स्पृहा करून चांगलें काम होत नाही. व परोपकारी मनुष्य देहाच्या रहित असल्याशिवाय म्हणजे तो इंमॉरटल सोल घेतल्याशिवाय चालत नाही. देहाहून निराळे होतांना मन स्वतंत्र होतें व यावेळेला जर एखादी वासना राहिली तर स्वतंत्रतेमुळे ती पूर्ण होते. पण त्यामुळे पुन्हा स्वार्थाच्या तडाख्यांत मन जातें व नीच कर्म करूं लागतें. पुण्य कर्म करतांना वासना राहिल्यामुळे स्वतंत्र स्वर्गांत सुख भोगून मनुष्य स्वार्थाच्या तडाख्यांत सापडतो व स्वार्थात देहाला चिकटून देहाचे जडधर्म आपल्या अंगावर घेऊन मृत्यु लोकांत जन्म पावतो.

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ।**
**ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकमश्नन्ति दिव्यान् दिवि देवभोगान् ॥२०॥**
**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।**
**एवं त्रयीधर्ममनुप्रपन्नागतागतं काम कामा लभन्ते ॥९-२१॥**

भगवान म्हणतातः- सोम पिऊन राहणारे- ऋक्, यजुः, साम या तीन वेदांनी माझी स्तुति करणारे पवित्र असतात व पापीहि असतात. वासना ठेऊन पुण्यांचे फल पापांत घालवितात, असे लोक माझे अग्नीच्या द्वाराने पूजन करून



प्रार्थना करतात. की 'देवा, स्वर्ग दे' पुढे या कर्मामुळे ते स्वर्गसुख भोगतात व स्वार्थाच्या तडाख्यांत सापडून मृत्युलोकीं येऊन जन्मतात. हें सर्व सकाम कर्माचें फल आहे. म्हणून चांगलीं कर्मे करावीं.

निष्काम कर्म केल्याने पुन्हा जन्म होत नाही. चांगलें कर्म करावें पण भोगाची अपेक्षा करूं नये. नुसती मोक्षाची इच्छा करावी. मोक्ष वासना नव्हे. ही इच्छा दीप-तिरोधानवत् ज्योतीप्रमाणे भासते.

## १२. गुरु : परलोक सहायक

हा देहा रहित प्रेम जितका जास्त तितके आपण देहाहून निराळे राहतो. बंधू वगैरे कुटुंबांतील माणासांवर जो प्रेम असतो तो वैषयिक व देहाला धरून असतो. गुरूचा प्रेम आत्मिकरूप असल्यामुळे देहाहून निराळा असतो. म्हणून तो प्रेम सर्वांत श्रेष्ठ आहे, देहसंबंधाने प्रेम असणाऱ्यांची परलोकीं भेट होणें शक्य नाही. कारण ते आपल्या वासनेनुसार कदाचित् दुसराच आकार घेतील. देहरहित ज्यांच्यावर प्रेम असतो त्यांच्याशींच परलोकीं भेट होते.

गुरुप्रेम आत्मिक संबंधाचा असल्यामुळे देहरहित असतो. म्हणून गुरु परलोकांत अवश्य भेटतात.

आमच्याकडे एक म्हण आहे. ती कदाचित् खोटी असेल व अडाणी लोकांच्या तोंडांतून निघाली असेल, म्हणून तत्त्ववेत्त्यांना खरी वाटणार नाही. तथापि तिच्यांतलें तत्त्व खरें असेल तर ती तुच्छ करण्यांत कांही हंशील नाही. आमच्या इकडे स्त्रिया आपआपसांत सखू जोडतात. पहिले एकमेकीला जेवावयाला बोलावतात. एकमेकींच्या तोंडात साखर घालतात व मग सखू बहिणींचे नातें जुळवितात. या सखू बहिणी देवाच्या येथे मिळतात व इतर एका मायपोटच्या बहिणी देखील मिळत नाही अशी समजूत आहे. कारण एका मायच्या पोटच्या बहिणींचा द्रव्यसंबंध असतो, पण सखू बहिणींचा संबंध प्रेमामुळेच असतो. म्हणून ह्या खरोखरच परलोकांत मिळत असाव्या व म्हणूनच गुरूवर प्रेम ठेवण्याचा प्रघात असावा.

## १३. कर्माचा शेवट मुक्ति

कर्माने देहाहून रहित होतां होतां शेवटीं (देह-)प्रेमाने अगदी रहित होतो. मग पुढे चित्तहि नावडेसें होतें कारण जर आपण एकच आहोत तर मग चित्ताचे विकार तरी मध्ये कशाला पाहिजेत? म्हणून तो चित्ताकडे लक्ष देत नाही. याप्रमाणे कर्माने देहाहून रहित होऊन ज्ञानाने चित्ताचा नाश केला म्हणजे मुक्ति मिळवितां येते.

## १४. मानसिक क्रमाने बद्ध जीवित प्रत्यक्षज्ञान फारच लंगडे

पुष्कळ वेळां प्रत्यक्ष ज्ञानावाचून आपली खात्री होत नाही असें वाटतें. पण वास्तविक प्रत्यक्ष ज्ञान फारच लंगडें असतें व केव्हा केव्हा नकोसें वाटतें.

उदाः- सर्व पदार्थ इंद्रियाने गोचर होतात. कानाने कांही ऐकतो. डोळ्यांनी पाहतो, जिभेने चाखतो इत्यादि सर्व गोष्टी करतो. पण या सर्व गोष्टींतून आपल्याला काय पाहिजें? यापैकी कांहीच नको असतें तर यांतून जो पदार्थ आवडेल तो पाहिजे व जो आवडत नाही तो नकोसा वाटतो. आपल्याला ज्या गोष्टी आवडत नाही त्या सर्वांचा त्याग करतो. यावरून काय निघतें?

यावरून आपणच आपल्याला पाहिजे असतो. प्रत्यक्ष प्रमाणावर मुळीच मदार नसते. जे आपल्याला आवडेल तेच घेतो. म्हणजे यावरून असें दिसतें की या प्रत्यक्ष इंद्रियजन्य ज्ञानाने आपलें जीवित मुळीच बद्ध नसून तें मनाने बद्ध आहे.

## १५.नास्तिकाला प्रत्यक्ष विरोध

शंकाः- बहुतेक नास्तिक बापाचें वीर्य व आईचें रक्त यापासून उत्पन्न झालेल्या देहाबरोबरच आत्मा उत्पन्न होतो म्हणजे आत्मा गुण व देह गुणी असे ते मानतात. उदा. पुष्प गुणी असून गंध हा त्याचा गुण आहे. साखर गुणी असून गोडी हा तिचा गुण आहे. हे नास्तिक नुसते प्रत्यक्ष प्रमाण मानतात.

समाधानः- आता आत्मा देहाबरोबर उत्पन्न होऊन मग देह पडल्यावर मरतो हें त्यांचें म्हणणें बरोबर नाही. कारण ‘देह (हे) द्रव्य व आत्म्याचा गुण’ असें जर मानलें तर जोपर्यंत द्रव्य आहे तोपर्यंत गुणांचा नाश होऊ शकत नाही.

आता पुष्पाचा वास कांही वेळाने नाहीसा होतो तरी तो फुलामध्यें जें पाणी असतें त्याची जी वाफ होते, त्या वाफेच्या परमाणूबरोबर निघून जातो. म्हणजे द्रव्य सोडून निराश्रित गुण कधीच राहूं शकत नाही. त्याचप्रमाणे साखरेला सोडून गोडी कधीच राहत नाही.

एकंदर पदार्थ आहे तोपर्यंत गुण असतोच. देहाचा गुण जर आत्मा आहे तर देह आहे तोपर्यंत आत्मा राहिला पाहिजे. पण प्रेतांत तसें आढळून येत नाही. येथे नास्तिक चुकतात. त्यांचे तर्क हेत्वाभासरूप असतात.



## १६. ॲथॉरिटीची जरूरी व बुद्धीने ठरविलेल्या ईश्वरांत नेहमीचा फरक

लहान मूल जन्मलें म्हणजे आईच त्याला सर्व दैवत असतें. कोणताच पदार्थ आईपेक्षा जास्त आवडत नाही (दुसरी कोणतीहि सुंदर स्त्री असली तरी) तर आई आवडते. पुढे मोठा होतो तसें तसें आईवरचे प्रेम कमी करून बाप मोठा आहे असें वाटून बापावर प्रेम करू लागतो. पुढे एकाद्या वेळेला राजाच्या हुकुमाने बापाला पोलीसाने धरून नेलें म्हणजे राजा बापापेक्षा मोठा वाटतो. पुढे एकाद्या वेळेला संकटांत पडला असतां सर्व लोक जेव्हा त्याचें संरक्षण करण्याला असमर्थ असतात त्यावेळेला कोणी ईश्वर समर्थ आहे असें त्याला वाटतें. हें कांहीहि असो. कितीहि तर्क केलें तरी असें वाटणारी बुद्धि तशीच राहते. ती कांही जात नाही.

याप्रमाणे आपल्या बुद्धींत उत्क्रांती होत असते. पहिले अमुक वरिष्ठ, पुढे त्यापेक्षा अमका मनुष्य वरिष्ठ व शेवटीं परमेश्वर वरिष्ठ वाटतो. शेवटीं कोणी कांही म्हटलें तरी परमेश्वराचें सांगितलेलें जास्त भरंवशाचें वाटतें. बाळपणीं कोणी कितीहि सांगितलें तरी पटत नाही. आईने सांगितलें की खरें वाटतें.

याप्रमाणे जसजसा मनुष्य वाढतो तसतसें तर्काने एक एक गूढ सोडतो व एक एक घेतो. तरी कितीहि मोठा झाला व कितीहि गूढ सुटलें तरी या जगाचे कारण जें ब्रह्म आहे त्याहून आम्ही निराळे किंवा त्याचे अंश आहोत? आम्हाला सुखदुःखाचें बंधन काय म्हणून? इत्यादि गूढ प्रश्नांची उत्तरें तर्काने देतां येत नाहीत. यांचें उत्तर देण्याकरितां शब्दच पाहिजेत. कारण ज्या मनाने हा प्रश्न ठरवावयाचा तें मन बंधनमूळ व विकारात्मक आहे. म्हणून याच्याकडून उत्तर निघत नाही.

यांचें उत्तर देण्याला ईश्वरवाक्यच श्रेष्ठ आहे व ते वेद आहेत. ते वेद या प्रश्नाचें उत्तर ‘माया’ असें देतात. इच्या योगाने बंधन आहे. ही नसती तर दुःखपर्वत प्राप्त झाला नसता .

आपल्याला दुःख कोण देतो? आपण आपल्याला देत नाही. कारण स्वतः दुःख घेण्याची कोणाचीच इच्छा नसतें.

त्याप्रमाणे जडहि देत नाही. तर जड हें आपल्याहून निराळें आहे असें मानल्यामुळे व जड म्हणून कांही वस्तूच नाही हें न समजल्यामुळे आपली एकावर प्रीति व एकावर द्वेष आहे व हेच दुःख देण्यास कारण होतात.

इंग्लिश फिलॉसॉफीने विकार दाबून ती समाधान स्थिती ओळखून पाहण्याचा प्रयत्न केला नाही. एवं अज्ञान सर्व दुःखाला कारण आहे.

## १७. इतर धर्माहून वैदिक धर्माची विशेषता

कोणताहि धर्म घ्या. त्यांत तीनच तत्त्वे राहतात.

(१) त्या धर्माच्या प्रॉफेटवर विश्वास ठेवावा.

(२) आपलें शरीर वगैरे पवित्र ठेवावें.

(३) कोणाचें वाईट करूं नयें.

### 'विश्वास ठेवणे' - हा धर्म नव्हे

पैकी पहिल्या तत्त्वाला धर्मत्व कां देतात हें समजत नाही. कारण हें कोणत्याच तत्त्वांत जात नाही. विश्वास ठेवणें हे सर्वांस माहीत आहे. हें कांही अज्ञात नाहीं. पुन्हा 'विश्वास ठेव' म्हटल्याने धर्मत्व येत नाही.

विश्वास ठेवल्याने एखादी वस्तु मिळते व न ठेवल्यास मिळत नाही. म्हणजे हे भावनातंत्र झाले वस्तुतंत्र नाही.

शरीराची पवित्रता ठेवणें हे सर्वांनाच आवडतें. कुत्रें देखील स्वतःची विष्ठा खात नाही.

सर्वांनाच चांगलें वागावेसें वाटतें. कोणाचे वाईट करूं नयें. हें तत्त्व बोलायला सोपें आहे. माझें जर त्यापासून चांगलें होतें तर मी दुसऱ्याचें वाईट कां करूं नये? या प्रश्नाला दुसऱ्या धर्मांत असें उत्तर आहे की 'असें केल्याने समाज चांगला चालणार नाही. इतरहि तुम्हाला दुःख देतील किंवा परमेश्वर आपल्याला शिक्षा देईल म्हणून असें करू नयें.'

ह्या म्हणण्यात कांहीच अर्थ नाही. कारण परमेश्वर शिक्षा देईल हे सांगावयास नकोच व एवढ्याकरिता परमेश्वराची भिती बाळगावी लागत नाही. धर्म कांही याच्याकरिता नको. परमेश्वरांची भिती न घेतली तरी प्रत्येकाला वाटतें कीं धर्म पाहिजे.

आपण कोण आहों? सृष्टि कशी झाली? मेल्यानंतर आपलें काय होणार? तीन प्रकारच्या दुःखातून सुटण्याला उपाय आहे काय? इत्यादि प्रश्नांचें उत्तर मात्र आर्य धर्माशिवाय समाधानकारक कोणत्याच धर्मातून मिळत नाही.

## १८. मनुष्याला फिलॉसॉफी कां पाहिजे ?

प्रत्येक मनुष्याला तीन प्रकारचें दुःख असतें.

आध्यात्मिक, म्हणजे आपल्यापासून होणारें. तें दोन प्रकारचें आहे. शारीरिक व मानसिक :- कफ, पित्त, वात इत्यादिकांनी झालेलें दुःख शारीरिक समजावें. व प्रियवियोग व अप्रिय संयोग हें मानसिक समजावें.



आधिभौतिक म्हणजे इतर प्राण्यांपासून होणारें दुःख.

आधिदैविक म्हणजे ग्रहपीडादिक व मेल्यानंतर यमयातनादिक. आधिदैविक दुःख होत नाही. असें पुष्कळांना वाटते. परन्तु मेडिकल रिपोर्टस् वरून याची बरीच साक्ष वाटते. हिस्टेरिया रोगामध्यें रोगाचें कारण कांहीच समजत नाही. यांत केव्हा केव्हा अशी शक्ति दिसते की १० मणाचें ओझें एकटा उचलून फेकतो. ही शक्ति कांही आमची नव्हें. म्हणून अधिदैविक तत्त्व आहे. या तिन्ही तापांची आत्यंतिक निवृत्ति म्हणजे पुन्हा कधीच न होणें याला मोक्ष म्हणतात.

## १९. दुःखनाश

या दुःखाची आत्यंतिक निवृत्ति कशाने होणें शक्य आहे?

आपल्याला जे दुःख होतें तें जगाच्या संगतीने होतें. नाही तर झालें नसतें. म्हणून जगांतून सुटलें तर नाहीसें होईल. यांतून सुटण्याचा उपाय म्हणजें कारणसहित जगाची निवृत्ती झाली पाहिजे. हें जग न भासलें पाहिजें.

## २०. जीवनमुक्ति व विदेहमुक्ति

मृगजल जरी दिसतें तरी पण तें पिण्याची इच्छा होत नाही. मग तहानेने फार व्याकुळ झालें तरी चिंता नाही. **(१)** जगत् जरी दिसतें तरी त्याविषयी 'आसक्ति नसणें' याला जीवनमुक्ति म्हणतात' व **(२)**'साक्षीच न भासणे' ही विदेहमुक्ति होय.

## २१. जगाचा नाश

जगाचें कारण अज्ञान एकदा नाश पावल्यावर पुन्हा उत्पन्न होत नाही

अनादि वस्तूचा असाच नियम आहे. एकवार नाश पावल्यावर पुन्हा उत्पन्न होत नाही. जन्म-मरण सर्वांनाच आहे पण बीजापासून वृक्ष किंवा वृक्षापासून बीज यांत जसा आदि समजत नाही त्याप्रमाणे या जगताचाहि आदि समजत नाही. तथापि भाजलेलें बीज जसें निघत नाही किंवा वृक्ष जाळले असतां पुन्हा उत्पन्न होत नाही त्याप्रमाणे हें जगत् नाश पावल्यावर पुन्हा उत्पन्न होत नाही.

## २२. सृष्टीचे दोन भाग

सृष्टीचे दोन भाग आहेत. एक जीवकृत सृष्टि व दुसरी ईश्वरकृत सृष्टि. या दोन्ही एकच आहेत. हे दृष्टिसृष्टिवादांत सांगीन.

ईश्वरकृत भागापासून सुखदुःख नाही. जीवकृत भागापासूनच सुखदुःख आहे. स्त्रीचा मांसमयदेह ईश्वराने निर्माण केला आहे. आईबापाने केला नाही. कारण कर्त्याला कार्याचें पूर्ण ज्ञान असतें. एका अंशाचें ज्ञान असल्यास कर्ता होणार नाही.

आईबापाला नुसतें संयोगज्ञान आहे. पण गर्भ वाढतो कसा वगैरे ज्ञान त्यांना नाही.

कांटच्या मताप्रमाणे जड पदार्थापासून सृष्टि झाली असती तर जड पदार्थाला ज्ञानाच्या विरुद्ध कांही पदार्थ करता यावयाला पाहिजे होतें. ज्ञानाची गरज लागूं नये पण असें होत नाही. नाकाचें काम नाकानेच होतें. तोंडाचें काम तोंडानेच होतें. व्यवस्था सृष्टींत बरोबर आहे. एखाद्या ठिकाणीं इंद्रियाची शक्ति कमी जास्त होते पण एक इंद्रियाचें काम दुसरें इंद्रिय करूं शकत नाही. सर्प डोळ्याने ऐकतात हें इतर जातींत दिसत नाही. नेचर म्हणावें तर त्या जातींतच असें कां असावें इतर जातींत कां नाही ? यावरून ईश्वर जीवकर्मानुसार सृष्टि उत्पन्न करतो. ईश्वराने स्त्री उत्पन्न केली. पण कोणी तिच्या ठिकाणी माता भावना, कोणी स्नुषा भावना, कोणी पत्नी भावना अशा नानाप्रकारच्या भावना ठेऊन ममत्व स्थापन करितात.

ही समज कांही ईश्वराने उत्पन्न केली नाहीं हें जीवानेंच केलें. जीवाच्या कल्पनेप्रमाणे तो गोष्ट ठरवितो. प्रीति, द्वेष, भीति या सर्व जीवाच्या कल्पना आहेत. व याच सुखदुःखाला कारण आहेत. एखाद्याची स्त्री सुंदर आहे तेवढ्यावरून द्वेष उत्पन्न होत नाही. आपल्याला ती पाहिजे असें वाटल्यावाचून हेवा उत्पन्न होत नाही. आपला मुलगा नाही तो पर्यंत कसाहि वागला तरी हरकत नाही. पण आपला म्हटला की खपत नाही.

अन्न परमेश्वराने उत्पन्न केलें. अन्न खाण्याचें आहे, मला खावें लागतें इत्यादि कल्पना जीवाच्या आहेत. तसें नसतें तर चितेंतहि अन्न बरें वाटलें असतें. व्याघ्र, चोर वगैरे जीव कल्पनेनेच आहेत. वाघाला वाटतें की मनुष्य खाद्य आहे व मनुष्याला वाटते की वाघ खातो. आपली देहावर प्रीति आहे म्हणून दुःख होतें. देहबुद्धीच दुःख देणारी आहे, झोपेंत, मूर्छेत, अंगांवरून सर्प गेला तरी दुःख होत नाही. शूर लढाईत लढतात. लढतां लढतां शीर तुटतें. तरी आवेशाने लढतच असतो. पण ज्या वेळेला त्याचें लक्ष शिराकडे जातें त्या वेळेला तो मूर्छित पडतो. एकदा मनुष्य उंचावरून पडला व त्यांचे डोकें फुटलें तरी त्याचे डोळे झांकून त्याला घेऊन जातात. त्याला त्याच्याकडे पाहूं देत नाहीत. कारण रक्त पाहिल्याबरोबर तो शॉकने मरून जाईल.

यावरून सिद्ध झालें की देहावर आसक्ति असते म्हणून दुःख होतें. अज्ञानामुळे दुःख व तें अज्ञान नाहीसें करून ज्ञान झालें म्हणजे समाधि स्थित होतो व दुःख नाहीसें होते.

**॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००



# ५. कर्मकाण्ड

आपलें इष्ट साध्य मोक्ष आहे. एथपर्यंत आलों. आतापर्यंत सर्व आउटलाइन सांगितली. आता अभ्यास पद्धतीने विस्तृत सांगतों. पूर्वी आपण एकंदर धर्माचे चार भाग केले.

(१) **कर्मयोग**. त्यांत * नीति व * आचारधर्म असे दोन भाग केले होते. पण आपल्यामध्ये असे दोन भाग समजल्या जात नाहीत. एकच समजतात.

(२) **योग**. याचे दोन भाग आहेत. * हठयोग व * राजयोग

(३) **भक्तियोग** व

(४) **ज्ञानयोग**. या ज्ञानयोगांतहि सांख्य व वेदान्त असे दोन भाग आहेत.

* **सांख्य** म्हणजे आपल्याला उपाधीहून निराळे करणें. व

* **वेदान्त** म्हणजे आपण त्रिकालाबाधित असून सर्व आपणच आहों असें पाहणें.

* **धर्म** म्हणजे कर्मयोग. आपल्याकडे धर्म व नीति फारसे पृथक् करतां येत नाही. पृथक् सांगितलें होतें तें समजावें म्हणून सांगितलें.

धर्म (म्ह०)पूर्वी आपल्याकडे सकाम कर्म करणें असें समजत होतें.

## धर्माची उत्पत्ति

ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर वेदान्त धर्म सर्वांत परफेक्ट होता. प्रत्येक धर्माचे मूळ असेंच आहे. व त्यांतील मूळ टिचिंग्ज जगत्कारणापासूनच निघालें असतात. पण तें मनुष्यबुद्धीच्या मानाने समजण्याला फारच (सूत्रमय) असतात. नॅचरल सृष्टींतील पदार्थ त्या सृष्टीच्या मानाने असतो.

उदा.- पर्वत घेऊं याला जेथून तेथून चढण्याला मार्ग नसतात. मनुष्याला चढतां यावें हा कांही त्याचा उद्देश नाही. पक्षाला धारण करणें, पाणी पडणें वगैरे पुष्कळ उद्देश असतात. मनुष्याला चढतां यावें हाच उद्देश असतां तर त्याला पायऱ्या झाल्या असत्या. ज्या वेळेला जसा ज्या वस्तूचाच उपयोग असतो तशी तिला आपण करून घेतो.

याप्रमाणेच धर्माचे टिंचिंग्ज पहिले जगत्कारणांतून येताना पर्वताप्रमाणे नॅचरल असतात. पहिले हे टिचिंग्ज डीप स्टेट मध्ये जावून घेतलीं जातात. व पुढे मनुष्यजातीला समजावें म्हणून आपण ज्याप्रमाणें पर्वतावर चढण्याकरता पायऱ्या करतो त्याप्रमाणे बुद्धिनुसार त्याची व्यवस्था लावतात. पर्वताला पायऱ्या करतात तशा यालाहि पायऱ्या करतात. ही गोष्ट प्रत्येक धर्माला लागूं आहे. प्रथम आपण पारकीय धर्म घेऊं.

## बौद्धधर्म

**उदा :-** बुद्धिझम्. या धर्मांत बुद्धाने जे टिचिंग्ज् शिकविले ते विखुरलेले शिकविल्या गेलेत. त्यांच्या मताने वास्तविक ते विखुरलेले नसतील. कारण जगत्कारणापासून जे लोक टिचिंग्ज आणतात त्यांत आपल्याप्रमाणे शंका येत नाहीत. आपल्याला फार जवळ जवळच्या शंका येतात. पक्षाला जर दूर जावयाचें असले तर तो एकदम या जागेवरून त्या जागेवर उडून जातो. पण आपल्याला या जागेवरून त्या जागेवर जावयाचें असल्यास पायांनीच गेलें पाहिजें. यावरून पक्षी व्यवस्थेशीर चालत नाहीत व मनुष्य व्यवस्थेशीर चालतो असें म्हणतां येत नाही. आपल्या रीतीने दोघेहि व्यवस्थित आहेत. त्यांनाहि शंका असतातच. आज देहापासून आत्मा कसा होतो ही शंका तर उद्या एखादी दुसरीच शंका.

बुद्धानें पुष्कळ टिचिंग्ज दिलेत. त्यांच्या तीन सभा झाल्या. यांत दोन तत्वें सांगितलीं आहेत. (१) योग (२) आचार.

बुद्धिप्रमाणे विचार करीत जाणें याला **योग** म्हणतात. व

**आचार** म्हणजे अहिंसा वगैरे पाळणें.

**माध्यमिक** यांनी योगाचें ग्रहण केलें नाही. आचाराचें ग्रहण केलें. हे कनिष्ठ आहेत.

योग व आचार दोन्ही ग्रहण ज्यांनी केले ते **योगाचार**.

सौत्रांतिक यांनी फक्त सूत्रच विचारलें म्हणून यांना **सौत्रांतिक** म्हटलें आहे.

धर्माचा निरनिराळ्या भाषेंत ज्यांनी प्रचार केला त्यांना **वैभाषिक** हें नांव मिळालें.

त्यांच्या टिचिंग्ज चे पुढे अशोक राजाचे वेळीं तिसरी सभा होऊन तीन भाग केले. **(१)** सूत्र. यांचें नांव त्रिपितक आहे. मूळ शब्द त्रिपथग. पण पाली भाषेंत त्रिपितक म्हणतात. यांत सूत्र प्रथम आहेत व पुढे थोडे थोडे आचार व योग सांगितलें आहेत. **(२)** नांव माहित नाही पण यांत लहान लहान इतिहास सांगितले आहेत. **(३)** या भागांत प्रज्ञापारमिता ग्रंथ येतो व तर्काने प्रूव्ह करें करावें हें सांगितलें आहें.

## इस्लाम धर्म

मोहमेडीयन रिलीजन या धर्मांत मुख्य धर्मग्रंथ कुराण आहे. यांच्यातले टिचिंग्ज ईश्वरापासून आले आहेत असें तें मानतात.

दुसरा ग्रंथ हर्दास नांवाचा आहे त्यांत मोहम्मदने ईश्वरापासून मिळालेलें टिचिंग्ज व्यवस्थित रीतीने लिहिले आहे.

मोहमेडीयन लोक नेहमीच रानटी राहिल्यामुळे त्यांची डेव्हलपमेंट झाली



नाही.

पुढे सुफी धर्म निघाला. त्यांत **मस्तवी मौलानारूम** हा ग्रंथ आहे. त्यांत पुनर्जन्म मानला आहे. मी आपली ७७० शरीरें पाहिलीं असें त्यांत म्हटलें आहे.

या धर्मांत हाफिस साहेब व सादक साहेब हे महापुरुषहि झालेत. त्यांनी हिन्दुप्रमाणे फिलॉसॉफी स्थापन केल्या. यांनी वरच्या पवित्रतेलाच धर्म मानला व त्यामुळे डीप स्टेट मध्ये जावून जे टिचिंग्ज आलेंत त्यांचा धर्मांत समावेश केला नाही. त्यामुळे विषयासक्ति वाढून सृष्टींतील सर्व पदार्थ भोगासाठीच उत्पन्न केले आहेत ही समजूत दृढ झाली.

दुसरे लोक यांच्यामध्ये गेले की त्यांना बकऱ्यासारखे कापले. यांनी विचार मुळीच केला नाही. एखादा गुरु नीतिमान असला तर त्याला धर्मवेडा समजून कापून टाकलें व अनीतिमानाचें रक्षण केलें.

आपल्याकडे असा प्रकार मुळीच नाही. अनीतिमान ब्राह्मणाला रेशमाच्या गादीवर बसवून नीतिमान शूद्राला जाळून टाकलें अशी महाभारतांत कोठेच कथा नाही.

## ख्रिश्चन धर्म

ख्रिश्चन धर्मांत अशी कल्पना आहे की ख्राईस्ट हा इतर राष्टांतील अनीतिमान ख्रिश्चन असला तरी त्याला उद्धरून नेईल. पण नीतिमान इतर राष्टाला बुडवून टाकील.

ही कल्पना आपल्यामध्ये नाही. आपल्या धर्मांत चांगला कोणत्याहि ठिकाणीं असो त्याचा उद्धार होतो व वाईटाचा नाश होतो असें आहे. देवदैत्यांचा लढा नेहमीच चालला आहे. पण,

* असुरकुलांत उत्पन्न झालेल्या प्रल्हादाचें ईश्वराने रक्षण केलें. प्रल्हादाला ईश्वराची भीति वाटत नसे. पण इतर दैत्यांना ईश्वराची भीति वाटत असे.

* दुसरे बळी वगैरे जे राजे झालेत त्यांचे परमेश्वर दास झालेत.

* बिभीषण दैत्यवंशीय असून रामाने रावणाचा वध करून त्याला लंकेचे राज्य दिलें. त्याचें राज्य घशांत टाकलें नाही. कारण आपल्याकडे राज्य घशांत टाकण्याची कल्पना नाही. चांगलें राज्य ठेऊन वाईट राज्य नाहीसें करावें असें आहे.

## राष्टीय कल्पना

आपल्यामधील राष्टीय कल्पना 'हायर' आहे हें म्हणणें अभिमानाचें नाही तर निःपक्षपातपणाचें आहे. यांच्या इतिहासांत अशा कथा मुळीच नाहीत.

त्याचप्रमाणे लंकेचे राज्य बिभीषणालाच दिले. यावरून जो देश जिंकला

त्या देशांतलाच जर एखादा मनुष्य चांगला असला तर त्यालाच **होमरूल** देण्याची रीति पूर्वी होती. आपल्या देशांत पुष्कळ चांगले लोक सापडतात. परन्तु त्यांना होमरूल न देतां **होमकुंडांत** मात्र घालतात.

असें असूनहि आपण दुसऱ्या देशाचा इतिहास आपल्या देशाला लावावयाला पाहातो हें आश्चर्य नव्हें काय?

* तसेंच कृष्ण अवतारामध्ये अनुशाल्वाला साह्य केलें.

* कलियुगांत संत मंडळ जे होऊन गेलें त्यात कित्येक मुसलमान संत होतें. त्यांनाहि परमेश्वराने साह्य केलें असें भक्तिविजयावरून दिसतें. पुष्कळ वेळां कबीर वगैरे मुसलमानांचे जंगम वगैरे शिष्य झाले होते.

* दैत्यवंशीय शुक्रापासूनहि कच नांवाच्या बृहस्पतीच्या मुलाने संजविनी विद्या संपादन केली.

## हिन्दु व मुसलमान यांचा विरोध

हिन्दु मुसलमान यांचा विरोध धर्मदृष्टीने भासत नाही. पण हिंदू लोक व मुसलमान यांच्यामध्ये जो लढा दिसतो तो विषयासक्तीच्या दृष्टीने झाला.

हिंदू अगदीच निर्विषय आहेत असें नाही व धार्मिक इतिहासावरून असें दिसतें की त्यांनी इतर जातींचा विनाकारण द्वेष केला नाही. यावरून आपल्या धर्मातले आहे तेवढेच उद्धरले जातील व बाकीच्या धर्मातले नरकांत जातील ही समजूत आपल्या धर्मात नाही, व -

## सर्व जगताचा धर्म आर्यधर्मच होऊं शकतो

असें वाटतें.

येवढा जो इतर धर्माचा परिणाम झाला तो फिलॉसॉफीचा भाग धर्मात स्वीकार केला नाही म्हणून व त्यामुळे चांगल्या गोष्टीला घेऊन वाईट गोष्टीला झुगारून देण्याची कल्पनाच त्यांना येईनाशी झाली.

मूळ टिचिंग्ज मुसलमानी धर्मात आहेत व ते समजण्याकरिता निराळी व्यवस्था करावी लागते.

## पर्शियन धर्म

पण पर्शियन धर्मात हें मुळीच नाही. नुसता कर्ममार्गच सांगितला आहे. त्यांत वरवर पवित्रता कशी ठेवावी याच्याशिवाय कांही दुसरें सांगितलें नाही. ओल्ड इजिप्शीयन वरवर शारीरिक पवित्रतेलाच धर्म मानीत होते. तथापि परशियन धर्मात थोडक्यांत समजण्याकरता कांही ग्रंथ केले आहेत व कर्म कसें करावें हें समजण्याकरिता मूळ टिचिंग्जचा जास्त विस्तार केला आहे. अर्थ समजण्याची गरज



नाही असे ते समजतात.

## यहुदी धर्म

* प्रथम यहुदी धर्म. महंमद येशुख्रिस्ताच्या नंतर झाला यांत तौरित इंजल किताब आहेत. कोणी म्हणतात तौरित मोत्याची आहे व कोणी म्हणतात नाही. आणखी एक यांचीच 'जबुर फुरकाम' नांवाची किताब आहे.

* ओल्ड टेस्टामेंट मध्ये 'डबल मॅन' ची थियरी सांगितली आहे.

* ख्रिश्चन पंथांतहि रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट असे दोन भाग आहेत. ह्यांच्यामध्ये धर्माकरिता आपसांत फार रक्तपात झाला असा इतिहास आहे.

याही धर्मात फिलॉसॉफिचा समावेश केला नाही.

मोहमेडीयन व परशियन यांच्यापेक्षा ग्रीक मध्ये फिलॉसॉफर्स पुष्कळ झाले.

## ख्रिश्चन धर्म

मूळ बायबल मध्ये विखुरलेली टिचिंग्ज आहेत पण पाद्री लोकांनी न्यू टेस्ट्यामेंट मध्ये थिऑलॉजी घालून काही व्यवस्थेशीर केले आहे. यांत ईश्वर घेतला आहे व ईश्वराविषयीच्या कल्पनेच्या पलीकडे कोणतीच कल्पना जाऊं शकत नाही असें लिहिलें आहे. ख्रिस्तावर विश्वास ठेवणें जास्त चांगलें. कारण तो ईश्वर असून दयाळू आहे. **तो ख्रिश्चन लोकांना सुखी ठेवतो व इतर लोकांना नरकांत टाकतो** असें म्हटलें आहे. याप्रामणे त्यांनी आपल्या पुस्तकांत स्वर्ग व नरक दोनच भाग केले आहेत 'बटलर सरमन्स 'ॲनॉलॉजी ऑफ थिऑलॉजी' आहे त्यांत असें सांगितलें आहे की चांगल्या गुणांचा पुतळा ईश्वर असून वाईट गुणांचा पुतळा सैतान डेव्हिल आहे. यांतहि पुढच्या फिलॉसॉफीचा समावेश केला नाही.

**यांच्यामध्ये नीतीचे नियम निराळे, राष्टाचे कायदे निराळे, धार्मिक तऱ्हा, निराळी फिलॉसॉफिचें बडबडणें निराळें !**

— असा प्रत्येक गोष्टींत निराळेपणा असल्यामुळे ''नीतिकरता नीतिमान घेऊन दुसऱ्या देशाचा उद्धार करावा'' असे विचार नव्हते. तर आपल्या पानग्यावरच आहार ओढून आपली तुंबडी भरण्याची हाव दिसून येते, तथापि ग्लॅडस्टोन सारख्यांचे उदाहरण याला अपवाद आहे.

* आपल्याकडे नीतीने धर्म,
* धर्माने समाज,
* राष्ट समाजाचें बनलेलें,
* धर्म फिलॉसॉफीने बांधलेला व
* फिलॉसॉफी ऑकल्टिझमने (गूढवादाने) बांधली असल्यामुळे असा भयंकर इतिहास

दिसून येत नाही. त्यांच्याकडे फारच भयंकर कृत्यें झालीं आहेत.

उदा. सॉक्रेटीस उत्तम पुरुष असून अपमान केल्याच्या आरोपावरून त्याला फाशीं दिलें. या लोकांना फिलॉसॉफी करिता दुसऱ्या लोकांच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग आला. **धर्मांत फिलॉसॉफिचा समावेश न झाल्यामुळे चिरकाल राहणारा धर्माचा टिकाऊपणा नाहीसा झाला.**

एक पाद्री आला व त्याने सर्व इंग्लंड ख्रिश्चन केलें. कांहींना ख्रिश्चन धर्म न आवडला तर बायबलला फाटा देऊन भलताच पंथ काढतात. आपल्यांतही पुष्कळ पंथ आहेत. पण सर्वांना वेद मान्य आहेत.

## हिंदुधर्म कां बुडाला नाही?

**''आपल्या धर्मावर पुष्कळदां धाड आली पण फिलॉसॉफीचा समावेश असल्यामुळे तो बुडाला नाही व कधी बुडणें शक्य नाही.**

**जरी एखाद्या वेळेस दुसऱ्या धर्मांतील विचार आपल्या धर्मांत घुसडल्या गेलेत तरी थोडी स्वतंत्रता आल्याबरोबर पुन्हा खरा धर्म स्थापला जातो व त्यांत फिलॉसॉफी असल्यामुळे दुसऱ्या धर्माचे चिरपरिणाम राहूं शकत नाहीत.''**

आपल्यांत वेद समजण्याकरिता शास्त्रीय व्यवस्था केली आहे.

---

वर सांगितलेले धर्माचे चार ठोकळ भाग. त्यापैकी आज पहिला कर्मयोग घ्यावयाचा आहे. कर्मयोगांत धर्म व नीति असे दोन भाग सांगितलेले होते. पण त्यांत विशेष फरक नसल्यामुळे दोन भाग मानले जात नाहीत.

वेदांत सर्व कांही आहे. इतर धर्मांतील धर्म पुस्तकांत फिलॉसॉफीचा भाग नसतो. आपल्या वेदांत तो आहे. म्हणून धर्म करण्याला बरें पडलें. वेदांतील कर्मयोगसंबंधाने ऋषींनी विचार केला होता व याज्ञवल्क्य, मनु, कपिल, इत्यादि स्मृतिकारांनी वेदांतल्या गोष्टी समजण्याकरता स्मृति केल्या आहेत. योग, सांख्य, स्मृति वगैरे यांनी वेदांतलें ज्ञान समजाऊन देण्याची खटपट केली. पूर्वी केलेल्या धर्माच्या चार भागांचा समावेश ज्ञान व कर्म या दोन भागांतच होतो. जगांत दोन प्रकारची प्रवृत्ति दिसते.

## दोन प्रवृत्ति

(१) वैषयिक सुखाकडे व (२) अखंड सुखाकडे. पैकी पहिली प्रवृत्ति कर्ममार्गांत येते व दुसरी ज्ञानमार्गांत मोडते. ज्ञानाचें संबंधाने सर्वांचें एकमत आहे. ज्ञान असें आहे की तसे आहे? असें करावें की तसें करावें? अशा प्रकारचे विकल्प कोणालाच नाहीत. सांख्यांत प्रकृति व पुरुष निराळे सांगितले आहे. तथापि 'असें असेल किंवा



नसेल' अशा प्रकारचे विकल्प नाहीत.

वेदांतशास्त्राच्या मानाने तें कोठे चुकलें असेल पण त्या शास्त्राच्या मानाने त्यांत विकल्प नाहीत.

**योगांत** ईश्वर मानला आहे, ता त्रिकालाबाधित आहे यातही विकल्प नाहीत.

**वेदांतांत** ब्रह्म सांगितलें आहे. त्याबद्दलही त्यांच्यात विकल्प नाहीत.

अर्वाचीन फिलॉसॉफी मध्ये मात्र घोटाळा आहे.

**जैन धर्मात** 'असें असेल, तसेंहि असेल' असे पुष्कळ विकल्प आहेत. परन्तु ज्ञान वस्तुतंत्र असतें. त्यांत विकल्प संभवत नाहीत. खांब आहे. दरवाजा आहे. यांत हा खांब आहे किंवा नाही, दरवाजा आहे किंवा नाही असे विकल्प मुळीच संभवत नाही. क्रियेमध्ये विकल्प संभवतात. वारा कपड्यानेहि घालतां येईल व पंख्यांनेहि घालता येईल. जैन फिलॉसॉफी अधम अशी मानली गेली . त्यांच्यांत हेमचंद्र सूरी वगैरे फिलॉसॉफर्स होऊन गेले व त्यांनी पुढे हिन्दु धर्मांतून विचार चोरून घेऊन जैन फिलॉसॉफी चांगली केली. याला इतिहासाचा पुरावा आहे की, हिन्दु ग्रंथांतील उदाहरणें दिलीं आहेत. प्रत्येकांच्या इतिहासांत असेंच आहे. जैनाच्या कर्म-फिलॉसॉफीमध्ये इकडील उदाहरणें पुष्कळ आहेत.

## कर्मकांडामध्ये फार विकल्प

आपल्याकडे आहेत. **'उदिते जुहुयात् / अनुदिते जुहुयात्'** अशा दोन श्रुति आहेत. मनु म्हणतोः- एकाच कर्माबद्दल दोन श्रुति असल्यास त्या दोन्ही प्रमाण मानाव्या. या गोष्टीचा पाया पुढे ब्रह्मसूत्रांत सिस्टिमॅटीकली समजावून सांगितला आहे. त्यांत ज्ञानाचा पुष्कळसा भाग घेऊन व त्यांचा समन्वय करून या गोष्टींचा उहापोह केला आहे व तो प्रयत्नहि सिद्धीस गेला आहे.

## जैमिनीने केलेली खटपट

कर्ममार्ग समजावून देण्याकरता जैमिनीने पुष्कळ खटपट केली. पण त्यांतहि पुष्कळ विकल्प आहेत. कारण त्यांनी श्रुति शब्दावरच जोर देऊन समन्वय करण्याची खटपट केली आहे. त्यामुळे श्रौत धर्म बरोबर आहे. स्मार्तधर्मात मात्र घोटाळा आहे. वाटेल तितके आचार सांगितले आहेत. याप्रमाणे जैमिनीने केलेली खटपट कांही अंशी सिद्धीस गेली आहे. तरी विकल्प मिटविण्याचें साधन नसल्यामुळे बराच लढा राहिला. व त्यामुळे डोळे लावून शब्दप्रमाणच मानावें लागतें.

ज्ञानांतला लढा मात्र निघाला. तेथे कांहीच विकल्प नाही. याच्यापुढे पाशुपत, पांचरात्र, वैष्णववादी पुष्कळ आगम धर्म निघालेत व त्यामुळे जैमिनीच्या धर्माशी लढा लागला. हें केव्हा घडलें हें सांगतां येत नाही. याप्रमाणे मीमांसाधर्म डळमळित

राहिला.

## श्रीकृष्णाने धर्म-ज्ञानाचा लढा दूर केला

हा लढा पुढे जगमान्य श्रीकृष्ण विभूती प्रगट झाली तेव्हा निघाला. याला आम्ही अवतार म्हणण्याचें कारण असें की यांनी गीतेमध्यें जें ज्ञान सांगितलें त्या ज्ञानाने खरोखरच धर्म / ज्ञानाचा लढा दूर झाला.

ही गीता जेव्हा जेव्हा धर्म / ज्ञानाचा लढा पडतो तेव्हा कल्पाकल्पांत होत असते. व या कारणामुळेच-

**'गीता ग्रंथ जगाचें बायबल होणार'**

**असें मी भविष्य करितों.**

या ग्रंथाने धर्माचा व ज्ञानाचा लढा विलक्षण रीतीने काढला. शब्द प्रमाणावर किंवा मीमांसेवर धर्म बसवावा ही पद्धती न मोडतां, पहिलें सांख्यावर धर्म बसविला. वेदान्ताच्या व सांख्यांच्या तत्त्वासंबंधी लढा नाहीसा केला. हें कसें केलें तें पाहूं.

पहिलें कर्म योग सांगितला. तो अध्याय ३ रा, १६, १७, १८ इ. पुष्कळ ठिकाणींहि तो सांगितला आहे. जगाचे यांनी दोन भाग केले. १ दैव व २ आसुर. दैवी संपत्तीचे लोक वेगळे काढले व आसुर संपत्तीचे लोक वेगळे काढले.

**अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।**

**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१॥**

वर सांगितलेले गुण ज्यांचे ठिकाणी असतील ते दैवी संपत्तीचे समजावे. मग ते कोणत्याहि जातीचे असोत. वैदिक धर्म दैवी गुणाशिवाय केल्यास आसूरच म्हटलें आहे. **''यजन्ते नामयज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम्''** नास्तिकांनाहि आसूरांतच घातलें आहे. **असत्यमप्रतिष्ठन्ते ॥** दैव व आसूर हे दोन भाग लोकांच्या दिसण्यावरून केलेत व याप्रमाणे फलाचा निश्चय केला की दैवी संपत्ति मोक्षाला कारण आहे व आसूर संपत्ति बंधाला कारण आहे.

**दैवीसंपद्विमोक्षाय निबंधायासुरीमता ॥**

व देवानी म्हटल्याप्रमाणे हे दोन जगाचे भाग फिलॉसॉफीच्या पक्षाने त्यांच्या दिसण्यावरून केलेत.

**'द्वौ भूतसर्गो लोकेऽस्मिन् दैव आसुर एव च'**

पुढे याला फिलॉसॉफीची जोड लावली. पूर्वीच्या फिलॉसॉफीमध्ये सांख्य फिलॉसॉफी कॉमन आहे. तींत कांही दोष आहेत. पण सर्व दुःखांपासून सुटणें याला


मोक्ष म्हटलें आहे. जगाला कारण त्रिगुण असून तें दुःखमय आहे. ज्ञानावाचून मोक्ष नाही इत्यादि गोष्टींत सांख्य फिलॉसॉफी कॉमन आहे.

पौराणिक दृष्टीने विचार केला तर कपिल परमेश्वराचा अवतार होते व त्याचप्रमाणे श्रीकृष्ण परमेश्वराचाच अवतार होते. जगाचे जे दोन भाग केले ते कार्यावरून केले व त्याला फिलॉसॉफीकल कारण दाखविलें. या जगाचें कारण तीन गुणांनी बद्ध आहे. ते गुण सत्त्व, रज, तम हे होत. रज-तम ज्यांच्यांत जास्त ते आसूरी संपत्तींत घातले व सत्त्व ज्यांच्यांत जास्त ते दैवी संपत्तींत घातलें. व ''याला फिलॉसॉफीची पुष्टी देऊन हा धर्म दृढ केला.''

१७ व्या अध्यायात मनुष्य गुणधर्मानुसार कर्म कसें करतो व एकच गोष्ट तीन गुणांनी कशी बदलतें हें दाखविलें आहे. त्यांतच सात्त्विक तप, राजस तप, तामस तप सांगितलें आहे. पुन्हा १८ व्या अध्यायांत एकच गोष्ट गुणाच्या योगाने कशी बदलते हें सांगितलें. या सर्वांवरून असा निष्कर्ष काढला की - **''जेवढ्या गोष्टी सात्त्विक असतील तेवढा धर्म व जेवढा रजतमात्मक तेवढा अधर्म !''**

## जाती जन्माने की कर्माने ?

पुन्हा जन्मानी जाती मानावयाची किंवा गुणकर्मानी जाती मानावयाची याबद्दल मोठा लढा होता. मनु म्हणतात -

**श्रुतिद्वैधं तु यत्र स्यात् तत्र धर्मानुभवौ स्मृतौ ।**

पुन्हा सूतसंहितेंत सांगितले आहे की -

**जन्मनैवहि जातिः स्यात् ।**

जानश्रुति जन्मानेच क्षत्रिय मानला गेला. जाबालीचा पुत्र सत्य बोलला त्यावरूनच त्याला ब्राह्मण मानलें. गौतमाने जातीचा निश्चय गुणावरूनच केला आहे.

**शूद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणो भवेत् ॥**

**ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात्प्रत्यवरो भवेत् ॥**

**शूद्रे चैतद् भवेल्लक्ष्यं द्विजे त्ना न विद्यते ॥**

**न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः॥**

**सर्वोपायैस्तु लोभस्य क्रोधस्य च विनिग्रहः ।**

**एतत् पवित्रं ज्ञानानां तथा चैवात्मसंयमः ॥**

क्रोध, लोभ वगैरेंचा रोध करावा म्हणजे वर्णाची जरूर नाही असें महाभारतांत सांगितलें आहे.याचा निर्णय भाष्यांत केला नाही.पण गीतेमध्ये मनुष्यांच्या गुणांवरून त्याचे चार भाग करून शुद्ध सत्त्वमय ते ब्राह्मण, सत्त्व कमी व रज जास्त ते क्षत्रिय, सत्त्व व तममिश्र ते वैश्य व रजतममिश्र व ते शूद्र याप्रमाणे वर्ण व्यवस्था केली व लढा नाहीसा केला.

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुण-कर्म-विभागशः ।**
**तस्य कर्तारपि मां विद्धि अकर्तारमव्ययम् ॥**
**शमो दमः तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।**
**ज्ञानविज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥**

याप्रमाणे चार वर्ण गुणांनी बांधून पाशुपत, पांचरात्र वगैरे वैदिककालीन सर्व धर्मांतील लढा नाहीसा केला.

मनुष्यामध्ये दोन प्रकारची कॉंशन्स आहे.शब्द प्रमाणाची व चांगल्या कॉंशन्सची एकवाक्यता आल्यामुळे धर्म पटूं लागला व त्यामुळे धर्मांतील लढा मोडला.अर्वाचीन धर्मालाहि ही गोष्ट मान्य नाही असें म्हणतां येत नाही.

सात्त्विक तेवढा धर्म व बाकीचा अधर्म.

चांगल्या कुळांत असूनहि वाईट गुण असले तर तो नीच समजावा.

**मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥**

याप्रमाणे धर्माची फिलॉसॉफी सांख्यावर स्थापिली व याचप्रमाणे धर्म बसविला.

(१) सात्त्विक लोक जे होतील त्यांनी लोकांना उपदेश करून गोड बोलून त्यांनाहि सात्विक करणें हा ब्राह्मणांचा धर्म !

(२) जे लोक गोड बोलूनहि ऐकणार नाहीत व आपलें सत्त्व वाढविणार नाहीत त्यांना जबरदस्तीने सात्त्विक करणें हें काम क्षत्रियांकडे ठेविलें.

(३) खाण्यापिण्याचा धंदा करून आपली सत्त्ववृद्धि करणें हें काम वैश्यांना दिलें व

(४) जे लोक अगदीच सात्त्विक नव्हते त्यांनी भीतीने वरच्या तिन्ही वर्णांची आज्ञा पाळून सात्त्विक बनणें हें काम शूद्राकडे दिलें.

आपलीं सर्व कर्मे निष्काम करून सत्त्व वाढवावें व ऐक्य पूर्ण वाढवून युद्धाच्या खटपटी नाहीशा करून, देहारहित जी स्थिति आहे ती प्राप्त करून घ्यावी. आणि ज्यांना जशी कामना असेल त्याप्रमाणे न्यूनाधिक सत्त्वावर स्वर्गाची स्थापना



केली, पण -

**कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।**
**क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यं गतिं प्रति ॥४३.१**
**भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।**
**व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥४४.२**

यावरून केवळ सकाम कर्म करण्याची निंदाच केली आहे.सर्व कर्मे निष्काम करावीं असें सांगून ज्ञानमार्ग व धर्ममार्ग दोन्ही निराळे आहेत, हें मत नाहीसें केलें. धर्मांत निष्काम वागल्यानेच ज्ञानांत प्रगति होते.यामुळे सांख्य, वेदान्त, योग हे तिन्ही एकवटून गेले.व जैमिनीच्या सकाम कर्मशास्त्रालाच फाटा बसला असें म्हटलें तरी चालेल.

आपला धर्म निष्काम रीतीने करावा व सत्त्व संस्कार दृढ होऊन जोपर्यंत आपले वाईट गुण गेले नाहीत, काम क्रोध नाहीसे झाले नाहीत, तोपर्यंत आपल्यांत प्रधानगुण कोणता आहे हें पाहून जन्मभर निष्काम कर्म करीत राहावें. हें तत्त्व तिसऱ्या अध्यायांत चांगलें सांगितलें आहे.

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥३५.३**

आपल्या धर्मांत वाईट जरी आचरण असले तरी तें घ्यावेंच असा अर्थ नाही. शिक्षाध्यायांत श्रुति आहे.- श्रद्धया देयम् । अश्रद्धयापि देयम् । या श्लोकांनी फारच तोटा झाला.धंदे सोडून लोकांच्या उरावर बसून फुकट जेवावें असें मत या आळशी लोकांनीच काढलें, ज्ञान न होवो पण राग द्वेष नाहीसें करणें चांगले.

**इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्युदस्यच ।**
**तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥**

आपल्या धर्माने सत्त्व वाढतें किंवा नाही पाहावें व मग आपला धर्म पाळावा. भाष्यांत आचार्यांनी मजाच केली आहे.ते म्हणतातः 'गुणानपेक्ष - - - 'शास्त्रावरून धर्म ठरवावयाचा असला तर कोणालाहि धर्म शिकवावा लागला असता.पाप्यालाहि वेदांत शिकविण्याला हरकत नसती. म्हणूनच गुणावरून धर्म बांधणें चांगलें आहे. परंतु आपली इच्छा नसतांहि आपल्याला आसुरी संपत्तींत कोण नेतो ?

**अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।**
**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥३६.३॥**

असा अर्जुनाने प्रश्न केला असतां भगवान सांगतात :-

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥३७.३॥**

एखाद्या गोष्टीची इच्छा असणें म्हणजे काम व ती न मिळाल्यास मनाची चलबिचल स्थिती होणें का क्रोध होय. 'एष' म्हणजें 'ह्या' म्हणण्याचें कारण असें की हें नेहमीच जवळ असतात व वैरी दाखववयाचा असल्यास हा वैरी म्हटला पाहिजे. याला आताच मारून टाकावेसें वाटतें म्हणून तेथे एष शब्द घातला आहे. काम-क्रोधांच्या योगाने आपलें ज्ञान झाकलें आहे. वास्तविक आपण देहाच्या पलीकडे! नाहीतर एखादी गोष्ट न मिळाली तर आपण समाधान मानून घेतो. असें करतां आलें नसतें. पुन्हा देहापुरतेंच आपण असतो तर पुढच्या गोष्टींतून कसें सुटून जावें हें समजलें नसतें. या कामक्रोधापासून सुटण्याकरिता भगवान् म्हणतात,

**तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।**
**पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥४१.३**

### इंद्रिय-नियमन

**''विज्ञान म्हणजे अनुभव.''** इंद्रियें नियमन कशीं करावीं याचा उपाय भगवान सांगतात -

''इंद्रियें दाबून ताब्यांत आणण्यापेक्षा आपण इन्द्रियांहून निराळें राहिलों तर तीं आपल्याला उपद्रव करीत नाहीत.''

**''संगं त्यक्त्वा सुखी भव''** ही संस्कृत म्हण याच अर्थाची द्योतक आहे. इंद्रियरोध करण्यामध्ये फारच त्रास होतो व कित्येक फारच आसुर उपाय योजतात. उदा. शिश्नास खिळे टोचणे, जीभ कापणें वगैरे. पण आपण स्वतः इन्द्रियाहून निराळे आहो असें समजलें म्हणजे त्यांची उपेक्षा होते व त्यामुळे त्यांच्यापासून त्रास होत नाही. म्हणून भगवान म्हणतात -

**इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ।**
**मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥४२॥**
**एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ॥**
**जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ३.४३**

याहून आपण निराळें कसें आहोत, हें भगवान् वरील श्लोकांत सांगतात. आत्म्याला जाणल्यामुळे या सर्व इंद्रियांची उपेक्षा होऊन त्यांचा जय सहज होतो. व



नंतर देह आहे तोपर्यंत सात्त्विक राहून निष्काम कर्मे करून लोकांना उपदेश करीत राहावे.

### कर्मयोगांतील ज्ञान

गीतेमध्ये कर्मयोगांतच ज्ञान सांगितले, त्या कर्मयोगांत फरक आहे. दिवसा आपण आपले व्यवहार सूर्याच्या योगाने करतो व रात्रीं दिव्याच्या योगाने करतो. पण रात्रीं दिव्याचे संरक्षण करावें लागतें. दिवसा सूर्याचें संरक्षण करावयास नको. आणखी सूर्याची व दिव्याची जाती एकच आहे. दोघांच्याहि योगाने पदार्थ दिसतो,

त्याप्रमाणे कर्मकांडांत आत्मा इंद्रियांहून निराळा आहे असें सांगून ध्यानाने तशी वृत्ति करावी लागते. व तशी वृत्ति ठेवतांनाच आपण ब्रह्मरूपाने प्रकाशित होतो. म्हणून कर्म अशा रीतीने केल्यानेच चित्तशुद्धि होतें. असें जर नसतें तर नुसत्या अग्नींत तूप टाकल्याने देवतानुग्रह कां व्हावा? त्यापासून चित्त शुद्धि कां व्हावी? अग्नींत तूप एका विवक्षित पद्धतीने ब्रह्मचर्यादि गुणांनी युक्त असून टाकल्यासच सत्त्वगुण वाढून चित्तशुद्धि होते व देवता-अनुग्रह होतो. याप्रमाणे १६ व्या अध्यायांतहि दैवी संपत्ति सांगितली आहे. या दैवी संपत्तीच्या योगाने इंद्रियांचा त्याग कर म्हणून सांगितलें. भगवान म्हणतात,

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत् त्रयं त्यजेत् ॥२१.१६**

काम, क्रोध व लोभ हे तीन नरकाचीं द्वारें आहेत. यांचा दैवी संपत्तीच्या योगाने त्याग करावा. तो तुझा धर्म आहे तोच तुझा यज्ञ आहे. तुला सोपा पडेल तो धर्म कर. पण त्यांत सात्त्विकपणा असला पाहिजे. (तो) देवतांस तूप टाकूनहि होईल. कारण अग्नींत तूप टाकणें हाहि यज्ञच आहे. वाक् यज्ञानेहि देवतांचा अनुग्रह होईल. कोणताहि धर्म कर त्यांत सात्त्विकपणा असला म्हणजें झालें.

**अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे ।**
**प्राणापानगतीं रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥२९.४**

कोणी कांहीहि करो, सत्त्व वाढवीत असलें म्हणजे झालें. तोच त्याचा धर्म आहे. या धर्माच्या व्याख्येमुळे पाशुपत वगैरे सर्वांनाच यज्ञाचें स्वरूप येऊन धर्मांतला लढा नाहीसा झाला.

''मांस खाण्याची इच्छा झाल्यास त्याला आपलें मांस देण्याइतकी आपली तयारी झाली पाहिजे तर मांस खावें. एवढी तयारी नसली तर मांस खाऊ नये''

सत्त्वावर धर्माचा पाया बसविल्यामुळे मद्यपान-स्त्रीगमन या सर्व वेडगळ

समजुती काढून टाकाव्या लागल्या. आपल्या येथे चोरी खपत असल्यास दुसऱ्याचे येथे चोरी करावी. नाही तर करूं नये. एवढी तयारी नाही तर भयंकर धर्म आपल्या शिरावर घेऊन सत्त्ववृद्धि कशी करून घ्यावयाची?

आता कितीहि सात्त्विक झाला तरी त्याने आपल्या सात्त्विकत्वाची समाप्ति कोठे करावी? जगांत जर केली तर जगांच्या उपयोगाचें असेल तेवढे सात्त्विक म्हणावें लागेल. म्हणजे युटिलिटेरियन प्रिन्सिपल येईल व पुन्हा लढा तसाच राहील. म्हणून त्याची समाप्ति जगत्कारणांत करणें चांगले. येथूनच पुढे उपासना कांडाला सुरवात होते.

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

# ६. उपासनाकाण्ड

मागे कर्मकांड सांगितलें. आता उपासनाकांड सांगू. या उपासनाकांडांत हठयोग, राजयोग, भक्तियोग हे येतात. पुन्हा भक्तियोग ज्ञानकांडांतहि येतो. पण तो पुढे ज्ञानकांड सांगण्याच्या वेळीं सांगीन. आपल्याकडे वेदांत बहुतेक उपासना कर्ममिश्र घेतली आहे. कर्माशिवाय उपासना नाही व उपासनेशिवाय कर्महि करूं नयें असें सांगितलें आहे. 'अंधतमः प्रविशन्ति ये अविद्यामुपासते' (यजुर्वेद ४०) ह्या मंत्रावर श्रीशंकराचार्यांची टीका आहे. आपल्यामध्ये व्याख्यानावरून बहुतेक गोष्टीचा निकाल लावावा असें आहे. सर्व ठिकाणीं विद्या म्हणजे ज्ञान, व अविद्या म्हणजे संसार अज्ञान असा अर्थ घेतला आहे. येथे विद्या म्हणजे उपासना व अविद्येचा अर्थ कर्म घेतला आहे. १ ल्या उपासना मंत्राचा अर्थ कर्म करणारे नरकांत जातात व केवळ उपासना करणारेहि अंधतमस्त्रामध्ये जातात. २ रा मंत्र कोणी म्हणतात, कर्मानीच मोक्ष होतो, कोणी उपासनाने होतो असें म्हणतात. ३ रा मंत्र यावरून असें दिसतें की कर्म व उपासना हे दोन्ही जो जाणतो तो कर्माच्या योगाने मृत्यूचा नाश करून उपासनेच्या योगाने अमृत भक्षण करितो. म्हणजे कर्माच्या योगाने मृत्युरूपी हा संसार नाश पावतो व अमृत म्हणजे जेथून पुन्हा यावें लागत नाही असा. यावरून कर्माच्या योगाने इहलोक तरून जावून म्हणजे या लोकांतून जाणें नाही तर पार जाणें म्हणजे तरून पुढे खड्ड्यांत पडणें नाही. उपासनेच्या योगाने तेथे शाश्वत सुख भोगतो. तात्पर्य, आपल्या धर्मांत कर्मासहित उपासना सांगितली आहे. व याचप्रमाणे जरी निरनिराळ्या धर्मांचे आचार निराळे असले तरी पण ही कल्पना प्रत्येक धर्मांत आहेच.



## सर्व धर्मात उपासना

बौद्ध धर्मांत ईश्वर मानला नाही, तरी उपासना आहे. सध्या हा धर्म सोडून देऊं.

ख्रिश्चन, यहुदी, या सर्व धर्मांत ईश्वर मानला आहे. व आचाराच्या योगाने उपासनाहि सांगितली आहे.

बौद्ध धर्मांतील आचार चांगले व सत्त्व वाढविणारे आहेत. पर्शियनमध्ये हाऊसमस्दा यांची उपासना आहे.

जैमिनीने संकर्षणकांड म्हणून ग्रंथ केला आहे. त्यांत हा उपासना मार्ग चांगला सांगितला आहे.

आपल्यांत उपासनेची कल्पना अशी आहे.- कर्माच्या योगाने इहलोक तरून जावून निष्काम उपासनेच्या योगाने ब्रह्मलोकाला जावून तेथे ज्ञान होऊन नंतर मनुष्य मुक्त होतो. ही उपासनेची कल्पना इतर धर्माला लागूं केली तर त्यांच्यामध्ये परलोकांविषयी दोन कल्पना निघतात.

(१) ईश्वर, जो अति पुण्यवान ईश्वरभक्त आहे त्याला नेहमी स्वर्गात पाठवितो.

(२) व जो अति पापी आहे त्याना नेहमी नरकांत घालतो.

पहिली कल्पना आपल्याशीं कांही अंशी जुळतें. पण ईश्वराशीं भिन्न राहिलेलें केव्हाहि खालीच राहावयाचें. ते कधीच ईश्वराशीं ऐक्य होत नाहीत. मुक्तीची कल्पना त्यांच्यांत नाही. आपल्यांत - ईश्वराहून निराळा राहिलेला कधीच मुक्त होत नाही असें आहे.

दुसरी कल्पना विसंगत आहे. साठवून ठेवलेलें धान्य केव्हा तरी खाल्यानेच संपावयाचेंच. त्याप्रमाणे केलेलें पापपुण्य भोगल्याने संपलेंच पाहिजे. **'यद्यथेह कर्मचितो'** कोणतेंही कर्म भोगल्याने संपलेंच पाहिजे. पण ईश्वरभक्ति कधीच संपत नाही कारण ईश्वर कधीच संपत नाही. ज्याचें ईश्वराशीं ज्ञानाने ऐक्य होतें ते पुढे नेहमीच सुखांत राहतात. इतर धर्मांत साधारण पापपुण्याचा विचार नाही. अति उंच स्थितीच घेतली आहे. याप्रमाणे परलोकांत शाश्वत सुख मिळविणें हें उपासनेचें फळ आहे.

ज्याप्रमाणे जगांत दोन क्रम आहेत,

१) एकाद्या ठिकाणीं जावयाचें असल्यास मनुष्य पायाने हळूहळू जाईल

२) व पक्षी एकदम उडून जाईल.

त्याप्रमाणे कोणी निष्काम उपासना करून ब्रह्मलोकाला जावून तेथे ज्ञान करून घेऊन मुक्त होतात व कोणी येथेच एकदम ज्ञान करून घेऊन मुक्त होतात.

## कार्य-कारण भाव

जगांत कोणत्याच पदार्थांचा कार्यकारणभाव सांगतां येत नाही. बीजाचें कारण वृक्ष किंवा वृक्षाचे कारण बीज हें सांगतां येत नाही. हें केव्हापासून उत्पन्न झालें याची कांहीच कल्पना करतां येत नाही. हें अनादि आहे - कारण काल निर्णय करतांना अन्योन्याश्रय नको. बीज-वृक्षामध्ये आदि समजत नाही. त्याचप्रमाणें हें कोठपर्यंत तसेंच राहील हेंहि सांगता येत नाही. तरी पण बीज भाजून टाकल्यास त्याचा पुन्हा वृक्ष होत नाही. व वृक्षच जाळून टाकला तर त्याला पुन्हा फळें येत नाहीत. हाच न्याय सर्व पदार्थांना लागू आहे. यामध्ये चार गोष्टी आपल्याला दिसतात. (१) या बीज वृक्षामध्ये कोणते आधी आहे हें सागंतां येत नाही. याचा संबंध अनादि आहे. (२) तसाच अनंत आहे. तसेंच ठेवलें तर किती वेळ तो तसाच राहील हें सांगतां येत नाही. (३) एखाद्या वेळेला जमिनीच्या दोषामुळे बीज उगवत नाही. (४) वृक्ष किंवा बीज भाजून टाकून त्यांची वाढ खुंटवितां येते. हाच न्याय सर्व पदार्थांना लागूं आहे. (५) स्त्री आधी की पुरुष आधी? हें सागंतां येत नाही. (६) ॲक्शन आधी की आधी रिॲक्शन? हें सांगतां येत नाही.

तात्पर्य कोणत्याहि पदार्थाच्या आदिविषयी निर्णय करतांना अमुक एक आधी असें कांहीच सांगतां येत नाही. यावरून इव्होल्यूशन थियरी लागूं पडत नाही. याप्रमाणे संसार अनादि आहे. कधीपासून उत्पन्न झाला हें सांगतां येत नाही. वासनेपासून कर्म होतें व कर्माचें पुढे त्या त्या कर्माप्रमाणे फळ भोगण्याकरिता कर्म व पुन्हा कर्माचें फळ याप्रमाणे हे अनादि अनंत आहे. **'सोऽयमध्यासोऽनादि अनंतो** - - - ' असें श्री शंकराचार्यहि म्हणतात. जमिनीच्या दोषानेहि झाडाची वाढ खुंटते. त्याप्रमाणे 'कर्माच्या योगाने मुनष्य ब्रह्मलोकाला गेला असतां तेथे त्याच्या कर्माची वाढ खुंटते व ज्ञान होऊन तो मुक्त होतो.' अनादि व अनंत अशा संसाराचा संबंध पुष्कळांशीं आहे. कर्माच्या योगाने ब्रह्मलोकाला जावून तेथे ज्ञान होऊन मुक्त होणारे प्राणी थोडे व येथेच ज्ञान मिळवून,, चितच मुक्त होतात. हा कांही अपवाद नाही. नियमच आहे.

कित्येक असा नियम धरतात की चांगलें असतें तें पुष्कळ ठिकाणीं असलें पाहिजें. पण हा कांही नियम नाही. कांही चांगली गोष्ट फैलते व कोणती फैलतहि नाही. व त्यांतहि आपण ह्या गोष्टीचा विचार आपण जेथे आहों तेथे तेथे असला पाहिजे असें वाटतें. यावरील चार गोष्टीपैकी ४ थी फारच थोडक्यांच्या ठिकाणी दिसते. भगवान् म्हणतात :-



**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चित् यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥**
**इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः।**
**बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते ॥**

पुनर्जन्म व संसार पुष्कळांना लागूं आहे व कर्माच्या योगाने ब्रह्मलोकांत जाऊन तेथे ज्ञान संपादन करून मुक्त होणें किंवा याच लोकीं ज्ञान प्राप्त करून घेऊन मुक्त होणें या दोन गोष्टी आपल्या करण्याने होतात. पुन्हा ब्रह्मलोकांत जाऊनही कामना असल्यास फिरून मृत्यु लोकीं परत येतो.

## मनुष्यांचा परस्पर ऋणसंबंध

जगांत मनुष्याचा ३ प्रकाराने संबंध असतो. व त्या संबंधांपैकी कोणता संबंध टिकाऊ असतो हें पाहूं. ज्या संबंधाचे संस्कार आपल्यावर जास्त असतात त्याचा संबंध टिकाऊ असतो. प्रत्येक मनुष्य कोणत्या तरी संबंधाच्या योगाने दुसऱ्याच्या ताब्यांत असतो. पुष्कळ जण दुसऱ्याच्या ताब्यांत जाण्यास खुष असतात व पुष्कळ नाखुषहि असतात. आपल्याला या जगांत तीन प्रकारचें ऋण असतें. ज्याचें ऋण बळकट त्याचा संबंध बळकट असतो. या ऋणाचीं दोन स्थानें आहेत. कित्येक मनाने ग्रहण करितात. त्यापैकी मनाने ग्रहण केलेलें ऋण पुष्कळ दिवस टिकतें.

### (१) गोत्रज ऋण (२) पालक ऋण (३) शिक्षण ऋण.

जन्मल्याबरोबरच आपला कित्येकांशीं नात्याचा संबंध जुळतो व त्यामुळे आपण त्याच्या कांहीतरी ताब्यांत जातो. मनाने नातें स्वीकारलें तर पुष्कळ दिवस आपण त्यांचा आदर करतो व शरीराच्या माथ्यावर नात्याचा बोझा दिला तर तो आपण फेकून देण्याची खटपट करतो.

**पैशाचें ऋण.**- पुष्कळ वेळा आपल्याला पैसा मिळतो व त्या पैशामुळे आपण दुसऱ्याच्या ताब्यांत जातो. नात्याकरिता पुष्कळवेळां पैशाला व पैशाकरिता पुष्कळवेळां नात्याला आपण फाटा देतो. हिन्दुस्तानांत नात्याकरता पैशाला फाटा देण्याची पुष्कळ उदाहरणें आहेत. केव्हा केव्हा हें ऋण आपण मनानेहि स्वीकारतो.

**उदा.** आपल्यावर एखादा प्रसंग आला व कोणी त्या प्रसंगीं मदत केली तर त्याचें ऋण मनाने स्वीकारतो. मग त्याच्याविरूद्ध जावेसें वाटत नाही. कारण जे आपण मनाने ग्रहण करतो त्याचे संस्कार जास्त जोरदार असतात.

**शिक्षकऋण** - एखाद्यापासून आपल्या बुद्धीला ट्रेनींग मिळाल्याने होतें. याचे संस्कार शरीराने कधीच ग्रहण होत नाहीत. सर्वदा मनानेच ग्रहण केले जातात. आता

कधी कधी मनुष्य या संबंधात इन्डिफरन्टहि वागतो पण तो शरीराच्या स्वाधीन होऊन तसें वागतो. जर या शिक्षणाचें ऋण शरीराने ग्रहण केले असलें तरच शिक्षकांशी इन्डिफरन्ट वागतो व मनाने त्याचें ग्रहण केले असलें तर मग त्याच्याविरुद्ध तो जात नाही.

आपल्याला निष्काम शिक्षक मिळतो तेव्हा त्याचें ऋण मनाने ग्रहण केल्या जाते. पूर्वी असेंच होतें. एखाद्या शिक्षकाच्या येथे कांही विद्यार्थी राहावयाचें. त्या शिक्षकाने त्या विद्यार्थ्यापासून कांहीच घेऊं नये. जेव्हा विद्यार्थ्यांच्या येथे लग्नावगैरेसारखें कार्य होईल तेव्हा त्यांनी आपल्या गुरुजींची पूजा करून त्यांचा यथायोग्य मान करावा व त्यांना गुरुदक्षिणा द्यावी. आता असें नाही. पालकऋण व शिक्षकऋण या दोन ऋणाचे संस्कार मानसिक होतात व ते काढून टाकण्याला फारच यत्न लागतात. पैशाच्या वगैरे ऋणाची फेड होऊं शकते पण शिक्षकाच्या ऋणामुळे आपण त्याच्या ताब्यांत जातो व त्याच्याविरुद्ध अगदीच जावेसें वाटत नाही. व शेवटीं त्याच्या ताब्यांत आपली बुद्धि असल्यामुळे त्याच्या सांगण्याप्रमाणे वागल्याने त्याच्यामागून आपण परलोकांतहि जातो. आपल्यामध्ये चांगली संगति व वाईट संगति याच्याचकरता मानिली आहे. कारण आपली बुद्धि ज्याच्या ताब्यांत जाईल त्याच्याचप्रमाणे आचरण घडत असल्यामुळे त्यांच्यामागनूच परलोकांत जावें लागतें.

धर्म हा एक, मानसिक संस्काराची मुख्य बाब आहे. ती पाहिजे तेव्हा बदलवितां येत नाही. ती बाब एकाएकी सोडून धर्मांतर करतां येत नाही. आपलां जो धर्म आहे त्याच्यामागूनच आपल्याला परलोकांत गेलें पाहिजें. बुद्धिशिक्षकाचा ताबा झुगारून देण्याची खटपट केली तरी होत नाही. व त्या शिक्षकाच्या मागून आपल्याला परलोकांत जावें लागतें यांत शंका नाही.

## दोन प्रकारचा विचार

(१) वस्तुतंत्र, (२) कर्तृतंत्र.

वस्तुतंत्राबद्दल अंदाज पुष्कळदां चुकतो व पुष्कळदां बरोबर येतो. आपण वस्तुतंत्राचा विचार अनुभवाने करतो. वस्तुतंत्राचा अनुभव बरोबर ठरविण्याचें असल्यास जर मागचा अनुभव तसा असला तर तो बरोबर ठरूं शकेल.

त्या वस्तूच्या स्थितीवर आपला विचार अवलंबून असणें हें वस्तुतंत्र व आपल्या इच्छेप्रमाणेच होणें हें कर्तृतंत्र होय.

वस्तुतंत्रज्ञान विचारांत जातें व कर्तृतंत्रज्ञान श्रद्धेंत मोडतें.

बहुतेक हें जगत् श्रद्धातंत्रच आहे. पुष्कळ म्हणतात की आम्हीं सर्व तर्काने



ग्रहण करतो. पण त्यांत कांही अर्थ नाही.

पुष्कळवेळां असें म्हणण्यांत येतें की शास्त्र श्रद्धेने मानावें लागतें. पण गणितशास्त्र कांही तसें नाही. गणितशास्त्राचाहि पाया श्रद्धेवरच रचला आहे. तो कसा हें मी सांगतो.

## गणितशास्त्राचाहि पाया श्रद्धेवरच

आपण एक व एक मिळून दोन करतो. म्हणजे एक ही संख्या पहिलें आपल्या मनांत ठरवितो. व त्यांत पुन्हा तशीच संज्ञा ठरवून मिळवितो व दोन होतात असे म्हणतो. या अमक्या वस्तूला एक म्हणावायाचें असें आधी ठरवितो म्हणजे एखाद्या वस्तूवर एकत्व स्थापन करतो. हा ग्रहीत धरलेला एक व तसाच दुसरा ग्रहीत धरलेला एक मिळून मग दोन म्हणतो. पहिलें एकत्व ग्रहण आपण अचिकित्सित केलें. याला आपण एक कां म्हणावें? लोक म्हणत आले म्हणून! म्हणजे निव्वळ श्रद्धा झाली. पॉईंट आपण गृहीत धरतो व पुढे गृहीतावरून उत्तर काढतो. कांही चिकित्सा न करतां ग्रहण करणें ही श्रद्धा. एकत्व गृहीत नसून व्हेरायटीवरून कल्पना येते? व्हेरायटीवरून निरनिराळ्या, कल्पना येतील. पण संख्येची कल्पना येऊं शकत नाही. नंबराची कल्पना वस्तु शिकवीत नाही. ती आपण आपल्या भावनेप्रमाणे घेतो. गणित कांही वस्तु शिकवीत नाही. तें बुद्धि शिकवितें. बुद्धीने एक पदार्थ आहे असे म्हटलें येथे काय झालें? अमुक एक पदार्थ निराळा आहे म्हणून एक वस्तु आहे असें घेतलें म्हणजे काय ? दोन वस्तुवरून एकाची कल्पना येते किंवा एकावरून दोनची कल्पना येते ? एकावरून दोनची कल्पना शक्य नाही. कारण एकाची कल्पना दोनपेक्षा नित्य आहे. एकाची कल्पना बुद्धीच शिकवितें. वस्तु पाहून एकाची कल्पना करणें शक्य नाही. एक आल्याशिवाय दोन येत नाही. उदा. दोन पुस्तक मनांत आण व त्यांना जुळीव व आपल्याला सोडून दे. म्हणजे कल्पनाच करतां येत नाही दोनवर एकाची कल्पना एकदम करतो. दोनची कल्पना पहिलें घेऊन मग त्या दोनच्या अपेक्षेने एकाला एक म्हणत नाही. मुलाला एक पदार्थ दाखविला म्हणजे काय? त्याला स्पेस वगैरेहून निराळें करण्याचे ज्ञान असतें काय? एक व एक मिळून दोन होतात हें ज्ञान श्रद्धाजन्य आहे. इतर पदार्थ निराळे करून एकत्वाची कल्पना आणतो असें म्हटल्यास यांत असा संशय येतो की एकत्व पहिलें आहे किंवा पृथकत्व पहिलें आहे? प्रथमच स्पेस, टाईम, वगैरे निरनिराळ्या गोष्टी लक्षांत येतात, परन्तु एकत्व मनानेच स्थापन करतो. पदार्थांच्या स्वाधीन जर ही कल्पना असती तर एक एक मिळून दोन होतात असें ठरवितां आलें नसतें. पुन्हा एकत्व आपण कांही विवक्षेने ठरवीत असतो. उदा. १००० एक हजार आहे.

ही गोष्ट कांही आपल्याला पदार्थाने शिकविली नाही. पण एकाची कल्पना हजार म्हटल्याबरोबर येते असें म्हणतां येत नाही. कारण एकाची कल्पना आपण बाकीच्याहून निराळी करून मनाने गृहीत घेतली व पुढेहि एक व एक मिळून दोन होतात हें मनानेंच घेतलें. हे पदार्थ एक हजार आहेत असे त्या पदार्थांचे सेन्सेशन्स शिकवूं शकत नाही. हजाराला आपण एक हजार आहे असें म्हणतों. एकाची कल्पना मनाने जुळविली, सेन्सेशनने जुळविली नाही.

**स्पेसचा आधार :-** आता मध्ये स्पेस आहे असें घेतलें म्हणजे पदार्थांची कल्पना स्पेस वर गेली. चार तुकड्यांचा एक पदार्थ केला तर एकच पदार्थ म्हटल्या जाईल व चार तुकडे असले तर स्पेस मध्ये असल्यामुळे चार तुकडे म्हटल्या जातील. ज्या पदार्थाचे सारखे सेन्सेशन होतात त्यांची तुम्ही संख्या ठरवूं शकत नाही. सेन्सेशन मध्ये स्पेस तुम्हांला दिसतो त्याचीच तुम्ही संख्या ठरवू शकतां. एकत्व आपल्याला पदार्थ ठरवूं शकत नाही. स्पेस इतर पदार्थांहून निराळा होऊं शकत नाही म्हणून स्पेसची आयडीया सर्वांच्या पूर्वी आहे.

मुलाला स्पेसची आयडीया न आली तर त्याला पदार्थाची सिद्धीच करतां येणार नाही. लेकरांसमोर पदार्थ नेला तर त्या पदार्थाचे सेन्सेशन्स त्याला होतील. स्पेसचे सेन्सेशन होणार नाही म्हणून स्पेस नाहीं असे तो म्हणणार नाही. हात फैलाविला तर मुलाला स्पेसची आयडीया नाही असें कसें म्हणता येंईल? कारण हात लांब केला तर स्पेसचें कार्य त्याच्यावर घडतेंच. एखादी वस्तु पाहण्यापूर्वी त्या वस्तुविषयी आपलें ज्ञान व मुलाचें ज्ञान सारखेंच असतें. एखादी वस्तु पाहिल्याबरोबर तूं जसें तिचें पृथक्करण करशील तसेंच मुलगाहि करील, मुलगा आपल्या आईला आपल्याहून पृथक् पाहतो. म्हणून त्याला माईंड असतें व **स्पेसवाचून माईंड राहते असे म्हणता येणार नाही.** व जेव्हा माईंड कार्य करते तेव्हा त्याला स्पेसची आयडीया असतेच. मुलाला आपल्याहून स्पेसची आयडीया जास्त आहे. दोन सेन्सेशन्स मिळण्यापूर्वी स्पेस असतो.

पहिलें माईंडचा संयोग स्पेसशींच होतो. पदार्थांच्या अपेक्षेने स्पेसचें ज्ञान आहे असे मानलें तर स्पेसचे निराळें ज्ञान असलें पाहिजे. स्पेस एक वाटतो ह्याचे कारण असे आहे की, स्पेस मध्ये स्पेस सापडत नाही. म्हणून दोन पदार्थांच्या मधली जागा स्पेस म्हणता. व पदार्थ नसला तरी नुसता स्पेस म्हणताच देह आहे व स्पेसही आहे असे दोन पदार्थ असले तर देहाला जाणणारा निराळा असलाच पाहिजे. म्हणून देहाला जाणण्यापूवी स्पेसची आयडीया आली पाहिजे. लेकराचें मनहि पृथक होऊनच जाणतें म्हणून त्यालाहि ज्ञान आहेच.



## ज्ञान : पदार्थानुमिति व स्वार्थानुमिति

ज्ञान दोन प्रकारचें असतें. १. एक पदार्थानुमिति व २. दुसरें स्वार्थानुमिति.

आपल्याला जें समजतें त्याचें दुसऱ्याला अनुमान करून देणें याला पदार्थानुमिति म्हणतात. व आपल्याला जें करतां येतें त्याचें दुसऱ्याला अनुमान करून देतां न येणें याला स्वार्थानुमिति म्हणतात. उपयोग करणारा, उपयोग करण्याच्या वस्तूहून नेहमी भिन्न असतो. मुलाला स्वार्थानुमिति असलीच पाहिजे. पदार्थानुमिती नसेल. मुलाला देह व तो एकच वाटले असते तर हाताच्या ऐवजीं नाकाचा उपयोग केला असता. पण तसें होत नाही म्हणून त्याला कॉंशन्स असलीच पाहिजे. झोपेतही ॲटोमॅटीक ॲक्शन कॉंशन्सपूर्वक होतात. एखादा गाढ झोपेंत असला तर त्याला जागा करण्याला जेवढा वेळ लागतो त्यापेक्षा कमी वेळ तो कड फिरत असतांना जागा करण्यास लागतो.

झोपेमध्ये ज्या ॲटोमॅटीक ॲक्शन्स होतात त्याची स्मृति आपण ठेवीत नाहीं. म्हणून राहात नाही. पण जरूरीच्या गोष्टीची स्मृति ठेवतोच. ज्या जरूरीच्या गोष्टी नसतात त्याची स्मृति ठेवीत नाही. मुलाला स्पेसची आयडीया आहे पण त्याला एकत्वाची व दोनत्वाची कल्पना नाही तर ती शिकविल्याने येते. त्याला न शिकविलें तर एक व दोनची कल्पना येणार नाही. म्हणून एकत्वाची आयडीया गृहीत म्हणजे श्रद्धापूर्वक आहे. तर्काने ठरविलेली नाही. त्याप्रमाणेच १ व १ मिळून २ होतात हेंहि गृहीतच झालें. म्हणूनच गणिताचीं उत्तरें बरोबर येतात.

कल्पना करा की, एक कुत्रे आहे व त्याला पंख आहेत म्हणून ते वर उडून जातें. असें गृहीत केलें म्हणजे ज्याला ज्याला म्हणून पंख आहेत असे चार पायाचे प्राणी वर उडून गेले पाहिजेच असें श्रद्धेनेच ठरतें.

## तर्कापेक्षा श्रद्धा व्यापक

या ठिकाणीं हें अनुमान श्रद्धामूल झालें म्हणून तर्काला श्रद्धा खोडतां येत नाही. म्हणजे श्रद्धा व्यापक व तर्क अव्यापक झाला. कारणाहून कार्य अव्यापक असतें. येथे तर श्रद्धामूल तर्क आहे म्हणून तर्काने श्रद्धा खंडित केली जात नाही. कारणाचा कार्याने नाश करवत नाही. आमची श्रद्धा खोटी असेल पण ती खंडित करण्याला तर्काजवळ काय प्रमाण आहे? मग आम्हांला तुम्हीं अंधश्रद्धा म्हणतां याचें कारण काय? कारण तर्काने श्रद्धा कांही खंडित होत नाही.

कोठेहि पहिली श्रद्धा ठेविल्याशिवाय चालावयाचें नाहीं.

## तर्क म्हणजे श्रद्धाच

तर्क तरी काय आहे? तर्क म्हणजे दहापांच ठिकाणी श्रद्धा ठेवून त्याच्यांतून एखादी कॉमन श्रद्धा घ्यावयाची व त्याला तर्क म्हणावयाचें.

तात्पर्य, तर्क म्हणजे श्रद्धाच दुसरे काही नाही. हा तर्कही उन्नत उन्नत होत जातो.

श्रद्धा म्हणजे एकदम मनांत गोष्ट मनांत येणे. निश्चय म्हणजे श्रद्धा.

ची (विथ) नी = निःशेषेण चय = निश्चय = पूर्ण गोळा करणें = म्हणजे एकदम गोष्ट मनांत येणें.

जेव्हा फिजीकल तर्क मनांत येतो तेव्हा आपण मेजर प्रेमीस, मायनर प्रेमीस श्रद्धेनेच घेतो व कन्क्लुजन तर्काने काढतो.

इंडक्शन मध्ये अनुभव प्रमाणच उत्तर असतें. मेंटल लॉजीक मध्ये आपण मनाच्या वृत्तीनेच पाहिलें पाहिजें, म्हणजे प्रेम कसा उत्पन्न होतो वगैरे या गोष्टीवरून जेव्हा आपण कॉमन श्रद्धां काढूं तेव्हाच मेंटल लॉजीक होईल.

नास्तिक फिजीकल लॉजीकने मेंटल लॉजीक ठरवूं पाहतात. वास्तविक दोघेहि श्रद्धाळूच असतात. फिजीशियन लोक फिजीकल अनुभव प्रमाण मानतात व मेंटल लोक मेंटल अनुभव प्रमाण मानतात.

मी मेंटल अनुभव अनुभव प्रमाण घेतो. आमची श्रद्धा डीप असल्यामुळे फिजीकल लोकांना दिसत नाही म्हणून ते आम्हांला भोळे, भाविक म्हणतात. आमच्या लोकांत कांही अर्धश्रद्धाळू आहेत. ते फिजीकल लोकांना श्रद्धाळू म्हणत नाहीत. फिजीकल लोकापेक्षा मेंटल लोकांची श्रद्धा जास्त डीप असते.

विट्ठलरावाची आई घ्या. तिची श्रद्धा घरापुरतीच आहे. आपल्याला तिच्या श्रद्धेप्रमाणे वागावें असें वाटणार नाही. तुम्ही आम्हाला कांहीही म्हणा पण फिजीकल लोकांच्या म्हणण्याप्रमाणे परलोक नाही असें म्हणणें आम्हाला कसें पटणार? असो. तात्पर्य बुद्धीचें जें शिक्षण आपल्याला मिळत असतें त्याच्यामागे आपण जात असतो.

## जड-चेतनाचा वाद

जसजसा डीप स्टेटमध्ये मनुष्य जातो तसतसा तो आपले विचार सूक्ष्म करितो. त्या विचाराला आपलें शरीर अडथळा करितें, व दुसरें अनुकूल शरीर आपल्याला मिळतें. उदा. सर्पाला हात नसतात. हात जर नसलें तर अमुक पदार्थ एवढा आहे तमुक पदार्थ तेवढा आहे हें कळत नाही. पांघरूण लांब असलें तर त्याचा हाताने चेंडू केल्याशिवाय तें फेकतां येणार नाही व हाताशिवाय चेंडू करतां येणार नाही. मात्र चेंडू कसा करावयाचा हें मनांत राहील.





बोसने 'प्लॅन्ट रिसपॉन्स' नावांचें एक पुस्तक केलें आहे. त्यांत त्याने प्रथम 'लिव्हींग फिजीकल व्ह्यूज' घेऊन ते 'नॉन लिव्हींग'ला लावून दाखविले प्लॅन्ट जिवंत असली व त्याला लिचोंडा घेतला तर त्याची लांबी कमी होते व रूंदी वाढते हें सिद्ध करून दाखविलें. नॉन लिव्हींग मध्येहि असें केलें म्हणजे चेंजेस होतात म्हणून तेहि जिवंत आहेत असें दाखविलें आहे. आपलें नाक तोंड दाबलें तर आपल्याला कांहीच सांगतां येणार नाही. म्हणून आपणांला सेन्सेशन नाही असें म्हणतां येणार नाही. त्याप्रमाणेच निंबाला टोचले तर त्याला सेन्सेशन नाही असे असे कसें म्हणता येईल. पदार्थानुमितीने निंबाला सेन्सेशन आहे असे तुम्ही जाणाल म्हणून निंबू जड व आम्ही चेतन असें कांही होत नाही. आपलीं इंद्रियें दाबून ठेविलीं तर जसें आपलें ज्ञान नाहीसें होत नाही, त्याप्रमाणेच दगडांत झाडांतहि ज्ञान आहे असें महाभारतांत सांगितलें आहे. यावरून बोसने प्लॅन्ट रिस्पॉन्स कांही नवीन काढलें नाही हे सिद्ध होते.

मनुष्य जसजसा डीप स्टेटमध्ये जातो तसेंतसें ज्ञान प्रगट करण्याला निराळीं इंदियें व शरीरें लागतात. सायन्स सात वर्षांत शरीर अजीबात बदलतें असें म्हणतें.

डीप स्टेट मध्ये जड द्रव्यांशी शरीर मिश्रण पावत नाही व भिंतीचा अटकाव होणें इत्यादि अडथळें नाहीसें होतात.

डीप स्टेटमध्ये कर्मयोगी असून जे ईश्वराशी उपासना करतात ते जातात. त्यांची शरीरें आपल्याला न दिसणारीं होतात. प्रथम ईश्वराची टीचींग अशा हलक्या शरीरांत येतात.

सर्वांत सूक्ष्म शरीर ब्रह्मदेवाचे आहे म्हणून त्यालाच परमेश्वराने वेद दिले. आपण जड शरीराने त्यावर तर्क करावयाला पाहतो. परन्तु डीप स्टेटमध्ये जावून त्यावर तर्क करा म्हणजे कांही तर्कच चालणार नाही. जसें इंजीनचें काम तूं शिकलास व तुला विचारले की धुराने मनुष्य कां मरत नाही तर तूं उत्तर देशील की 'याला अनुभव प्रमाण आहे.'

कोणतीहि गोष्ट मनांत येणें म्हणजे श्रद्धाच होय.

**वेद :-** याप्रमाणे आधी ती श्रद्धा घेवून नंतर पहा म्हणजे तुला समजेल की, वेद ब्रह्मदेवाला दिले किंवा नाही?

तसेंच सूर्यशरीर फार हलकें असल्यामुळें डीप स्टेटमध्ये गेल्याशिवाय समजत नाही. सूर्याचा रथ देवता वगैरे सर्व डीप स्टेटमधलेच असल्यामुळे त्यांचें वर्णन डीप स्टेटमध्ये गेल्याशिवाय आपल्याला कळत नाही.

## रोग विवेचन

रोगशास्त्रांत प्युअर आणि इंप्युअर असे दोन प्रकारचे लाइफ असतात. एखादी गोष्ट निरोग्याला जशी दिसते त्याच्या उलट ती रोग्याला दिसते.

आपल्या ''कॉमन प्रवृत्तीला प्रतिबंध करणें याचें नावं **रोग** ''

व ''प्रवृत्तीला अगदी समान चालविणें म्हणजे **निरोगी**. ''

कल्पना कर की कावीळ झालेली २५ माणसें आहेत. त्यांच्यांत ऊन पिवळी दिसणें हा नियम राहील. तुम्हाला तो अपवाद असेल. त्याप्रमाणे आपल्या प्रवृत्तीला घडी घडी अडथळा आहे म्हणून आपल्याला कोणतीहि वस्तु प्युअर दिसत नाही. आपण सूक्ष्म वस्तूच्या मानाने सगळेच रोगी आहोंत. वाघाला समोरचें बरोबर दिसत नाही. आडवें दिसतें. कारण वाघाचें पित्त जास्त खवळलेलें असतें. त्यामुळे त्याला प्युअर वस्तु दिसत नाही. घुबडाला सूर्य दिसूं शकत नाही. मोठा प्रकाश झाला म्हणजे आपल्याला दिसत नाही. डोळ्याला रोग होतो.

तात्पर्य अमुक वस्तु अशी आहे, अशी आपली एका स्टेजने खात्री असो. पण अमुक वस्तु अशी नाही असें दुसऱ्या प्रकाराने म्हणण्याला आपल्याजवळ कांही खात्री नाही व कोणतेंहि प्रमाण नाही.

पृथ्वी सोन्याची आहे. मेरू पर्वत सुवर्णाचा आहे इत्यादि सर्व खरें आहे व तें सर्व ध्रुवावर धारणा केली असतां दिसते परन्तु आपण ध्रुवावर धारणा केली नसल्यामुळे प्रतिबंध होतात.

कोणत्याहि धातूचें ऑक्साइड माती आहे हें आपल्याला दिसतें. पण आपल्यापेक्षा जें सूक्ष्म प्राणी आहेत त्यांना मातींतलें सोनें दिसत नाही. यावरून **पुराणें 'मायथॉलॉजी' म्हणणे अगदीच मूर्खपणाचें आहे.**

सूर्यदेवता सूक्ष्म आहे. भगवान् म्हणतात, अर्जुना,

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥१।४**
**एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।**
**स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥२।४**

हा कर्मयोग मी प्रथम सूर्याला सांगितला. सूर्यापासून तो पुढे मनूला मिळाला व मनूने तो पुढे इक्ष्वाकुला दिला व इक्ष्वाकुपासून तो राजर्षीला प्राप्त झाला. व याप्रमाणे परंपरनेने तो योग येत येत पुष्कळ काळ लोटल्यामुळे नाहीसा झाला.

०००



॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

# ७. पंचीकरण आणि फिजिक्स

## पांच प्रिन्सीपल्स / पंचमहाभूतें

आर्यधर्माचा ओघ, दृश्य जगाचा विचार करतांना मानसिक स्थिति या जगाला कितपत उपयोगी पडते. हें पाहण्यांत आहे. अमुक गोष्ट माझी आहे असें आपण म्हणतो तेव्हा काय होतें? माझी आहे असें म्हटल्यास ती आपल्या अंगाला चिकटली पाहिजे. अमकी गोष्ट आपली आहे म्हणजे आपल्या शरीराला त्याची जरूर आहे किंवा आपल्या हाताजवळ ती आहे म्हणून ती आपली समजत नसतो, तर तिच्यावर आपले प्रेम असते म्हणून तिला आपली समजतो. अमुक गोष्ट आपली म्हणण्यांत प्रेम पाहिजे म्हणजे त्यांत पुष्कळसा भाग मानसिक पाहिजे. आपल्या घरांत उंदीर राहतात. कुत्रे राहतात पण आपण त्यांना आपले समजत नाही. कारण त्या पदार्थावर आपले प्रेम नसते. आपले

आर्य लोक शाश्वत मानसिक पदार्थांनाच आपले म्हणत असत. त्यांच्या तात्विक मीमांसेंत मानसिक भाग पाहिजे होता. कारण सृष्टींतील पदार्थांत नेहमीच बदल होत असतो.

फिजीक्स मध्ये जें एलीमेंट्स आहेत त्यांत मधून मधून वारंवार बदल होत असतो. आता जी रेडियम नांवाची धातु निघाली त्यावरून अशी शंका उत्पन्न होते की या एलीमेंट मध्ये कदाचित् दुसऱ्या पदार्थांचे परमाणु मिसळले असतील व त्यामुळे ६३ तत्त्वांचे बदली २ तत्त्वच मानण्याचा प्रसंग आला आहे. ॲटोमिक थियरीमध्ये हायड्रोजन अतोनात उत्पन्न होतो यावरून परमाणूच्या व्हायब्रेशन पासूनच हायड्रोजन उत्पन्न होतो की काय, असा संशय आहे.. उष्णतेच्या योगाने कोणत्याहि पदार्थांचे परमाणु निरनिराळें होऊं शकतात व ते वर जातात व परमाणु सर्वांत लहान मानला आहे. यावरून एखाद्या एलीमेंटचे परमाणु दुसऱ्या एलीमेंटमध्ये कशावरून मिसळले नसतील? कदाचित् ते आपल्याला काढतां येत नसतील.

आर्य पंचमहाभूतें मानतात. **(१) आकाश :-** जेवढी कांही जागा आहे मग ती कोठेहि असो तेवढेहि आकाश समजावयाचें. **(२) वायु : -** (मोशन) गति. जेवढी गति तेवढा वायु. **(३) अग्नि :-** रूप, (कलर्स) व उष्णता. इलेक्ट्रीसिटी हें सर्व अग्निच आहे. **(४) जल:-** रस द्रवतत्त्व. ओलेपणा ज्याच्यांत असेंल तें सर्व जल. **(५) पृथ्वी:-** गंध व कठीणपणा हे सर्व पृथ्वीच आहे.

कोणत्याहि पदार्थांत स्पेस असते, त्याला गति असते व तो कोणता तरी

कलर घेतो व तसाच त्याला एक प्रकारचें द्रवत्व व कठीणपणा असतोच. म्हणजे प्रत्येक पदार्थांत हीं पंचमहाभूतें आहेत. जे पृथ्वी पदार्थ आहेत त्यांत गंध व कठीणपणा जास्त असतो. वायु पदार्थांत गति जास्त व बाकीचे गुण कमी असतात. ज्या तत्त्वाचा जो पदार्थ असतो तें तत्त्व त्या पदार्थांत जास्त असून बाकी तर कमी असतात.

स्पेस, गति, कलर, रूप, उष्णता हे सर्व गुण मानसिकच आहेत. ज्या पदार्थांत रूप किंवा उष्णता आहे त्यावरून सांगतां येते की त्यांत गति किंवा इलेक्ट्रीसिटी आहे व या गुणांना धरून ठेवणारे दृश्यही मानसिकच आहेत. गुण व द्रव्य दोन्ही मनानेच ग्रहण करतो.

पहिलें हीं भूतें एकांत एक मिळालीं नव्हतीं पण पुढे मिळाल्यावर पंचीकृत झालीत. त्यांत कांही न्यूनाधिक आहेत. हे जे आकाश दिसतें त्यांत मानसिक स्पेस प्रधान असून इतर बाकी चार गौण आहेत. या पंचभूतामध्ये कोणतेंच द्रव्य नसतें तर दगड खाली येण्याला उशीर लागला नसता. उष्णताहि येण्याला उशीर लागतो. सूर्याचा प्रकाश जमीनीवर येण्याला साडेआठ मिनीटे उशीर लागतो. स्पेसमध्ये द्रव्य नसतें तर लाईटला रेझिस्टन्स करणारा कोणताच पदार्थ नसता व लाईट एकदम जमिनीवर आला असता. यांत कांहीतरी पृथ्वीचा भाग आहे. हा दृश्य स्पेस पंचीकृत असल्यामुळे त्यांत इतर तत्त्वांचे मिश्रण आहे. शुध्द मानसिक स्पेस घेतली तर त्यांत कांही दिसत नाही. इथर जे ऑल परव्हेडिंग व स्थूल मानतांत तेंच आर्य लोकांचें दृश्य आकाश आहे. आकाशांत जर कांही द्रव्य नसतें तर पदार्थांना स्पेस चालावयाला वेळ लागणार नाही काय? नाही. कारण द्रव्य असल्याशिवाय रेझिस्टन्स होणार नाही व रेझिस्टन्स न झालें तर वेळ लागणार नाही. शक्ति वाचनू राहूं शकत नाही.

तुझा हात तेथे आहे व माझा हात येथे आहे. या दोन हातामधल्या स्पेसने कांही माझा हात तुझ्या हाताकडे किंवा तुझा हात माझ्या हाताकडे ओढला जावयाचा नाही. मध्ये साखळी असली तरच ओढले जातील.

द्रव्यावाचून गुण राहूं शकत नाही. या स्पेसमध्ये पृथ्वी वगैरे इतर व जड अंश आहे.

या आकाशाचा गुण शब्द आहे. साऊंडला वाहक हवा आहे असे म्हणतात. पण साऊंड निघतो हें काय आहे? तें कांही हवा नाही. एका पदार्थावर एक पदार्थ आदळला म्हणजे साऊंड निघतो. साऊंड दोहोंपैकी कोण्याच पदार्थांत नाही. मग काय आहे? त्या आपटण्यामध्ये कांही स्पेस राहतो म्हणून आवाज होतो. स्पेसचा



गुण साऊंड आहे.

मोशनला आकाश पाहिजेच आहे. मोशन येथून तेथपर्यंत जाते. त्यांत कांही एक प्रकारची मॅटर आहे. दोन गति विरुद्ध दिशेने असल्यास रेझिस्टन्स होतें. त्यांत इतर तत्त्व आहेत. मोशन प्रधान आहे.

अग्नि म्हणजे रूप म्हणजे कलर वगैरे. यांतहि रूप प्रधान असून इतर तत्त्व गौण आहेत. उष्णतेकडे हात नेल्यास स्पर्श होतो. यांत कांही कठिण भाग आहेच. यांत जलनहि आहेच. उष्णतेमध्ये पातळपणा आहे. उष्णतेतील पातळपणा त्या उष्णतेशी विरोधी नाही. हें सर्व तत्त्व वास्तविक एकच आहेत.

जलावर मारल्याबरोबर रेजिस्टन्स वाटतो. कठिणपणा असतो. यांत रस, तत्त्व जास्त असून बाकीचे कमी आहेत.

पृथ्वीमध्ये गंध व कठिणपणा जास्त असून इतर रूपादिक कमी आहेत.

मानसिक पंचभूतांच्या पंचीकरणानें ही भूतें बनलीं आहेत. एक भूत प्रधान व बाकीचीं गौण आहेत. एक भूत अर्धे व दुसरी अष्टमांश आहेत. पण यांचें पृथक्करण करतां येत नाही. तथापि मानसिक भूतांवर ताबा केल्याने समजतें.

एक फूल घेतलें. त्यांत रूप किती आहे हें काढतां येत नाही. कारण अति कमी व अति जास्त असलें तर कळत नाही. हा इंद्रियांचा दोष आहे. अंधार असतो तेथे कांहीतरी उजेड असतोच पण दिसत नाही. तसेंच डोळ्यांतले काजळ दिसत नाही. दिसत नाही म्हणून नाही म्हणण्यास कांहीच आधार नाही. डोळ्याने दिसत नाही म्हणून नाही म्हणता येत नाही. कोण्यातरी प्रमाणाने घेतलेंच पाहिजे.

अति गति असते तो पदार्थ स्थिर दिसतो. अति गति कमी केली तरी त्या पदार्थाचे परमाणू हालत नाही असें म्हणतां येणार नाही. याच पंचभूताचें जगत् झालें आहें. तुमच्या एलिमेंट्समध्येहि ही पंचभूतें आहेतच. सर्व पदार्थांतून हीं पांच भूतें काढून टाकल्यास पदार्थच समजणार नाही. या सर्व गुणांला धरून ठेवणारें कांही तरी द्रव्य पाहिजे. पण स्पेस काढून टाकली तर ते गुणहि समजत नाही.

योग्यांना यांचें पृथक्करण करतां येतें. ते लय चिंतनाच्या तऱ्हेने काढतात. याच ५ भूतापासून लोक तयार होतात. आपल्यामध्ये पृथ्वीचा भाग जास्त आहे म्हणजे कठिणपणा जास्त आहे. बाकी इतर भाग कमी आहेत. कांही प्राणी हातावर घेतल्यास पाण्याच्या बिंदुप्रमाणे हलके वाटतात. मासे वगैरेमध्ये जल तत्त्व फार असून बाकीचें तत्त्व कमीं आहेत. कांही प्राणी आपल्याला दिसत नाहीत. आपण कणगींत किंवा पेटींत बसलों तर आपण दिसणार नाही. कारण समानाभिहार होतो. जो ज्या द्रव्यांचा बनला असतो तें द्रव्य फार असलें तर तो दिसत नाही. स्पिरिट्स

(मृतात्मे) वगैरेमध्ये तेज जास्त आहे म्हणून ते दिवसा प्रकाश फार असल्यामुळे दिसत नाहीत. ते अंधारांत दिसतात. तसेंच वायुज वगैरे प्राणी आहेत. त्यांत वायुतत्व जास्त आहे.

याचप्रमाणे चैतन्य-शक्ति सर्व पदार्थांत आहे. मानसिक पदार्थ तयार केला तरी त्यांतहि ती शक्ति आहेच. पंचमहाभूतांतहि ती चैतन्यशक्ति आहेच. तिच्यावर जोपर्यंत अज्ञान पटल आहे तोपर्यंत तिला कोणतेंना कोणतें तरी शरीर आहेच. देव, पशु, पक्षी सर्व पंचभूतें मिळून झालीं आहेत. कारण गुणच कार्यांत येत असतात. कृष्णतंतूपासून कृष्णपट होतो. सत्त्व रज तम हे तीन गुण मूल कारण जी माया तिच्यांत आहेत. व तेच पुढे कार्यात दिसतात. या पंचभूतामध्ये हे तीन गुण आहेत. यापैकी सत्त्व ज्यांच्यांत जास्त आहे त्या देवता, रजप्रधान मनुष्य, व तमःप्रधान पश्वादिक आहेत.

ज्या गुणाच्या देवतेंचे आपण पूजन करूं त्या देवतेच्या लोकाला आपण जाऊं. भगवान म्हणतात, अर्जुना जे माझें पूजन करतात ते मजप्रत पावतात.

------

# ८. सत्त्ववृद्धी म्हणजे धर्म

**कोऽहं कथमहं जातो को वै कर्तास्य विद्यते ।**
**उपादानं किमस्यहि विचारः सोऽयमीदृशः ॥१॥**

प्रत्येक मनुष्य कितीहि गडबडींत असला तरी हे प्रश्न त्याला येतातच की मी कोण आहे? कोठून आलों? हें जगत कसें झालें? याचा कर्ता कोण व पुढे याचें काय होईल?

**नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।**
**उभयोरपि दृष्टोऽन्तरस्त्वनयोरतत्त्वदर्शिभिः ॥२॥**

जगताचें कारण काय आहे हें पाहूं गेलों असता नास्तिक असो किंवा आस्तिक असो या दोघांचेंहि या विषयी मतैक्य आहे.- आस्तिक चैतन्य सर्व सामर्थ्यवान मानतात. व नास्तिक जड सर्व सामर्थ्यवान मानतात. म्हणजे या दोघांचाहि नाममात्रच वाद आहे. वास्तविक हा वाद असण्याचें कारण असें असावें की आस्तिकाला आपलें मत स्पष्ट सांगतां येत नसावें व नास्तिकाला आपला प्रश्न चांगला मांडतां येत नसावा. पण जर वाद मिटवावयाचा असला तर चेतन व जड दोन्ही चेतनरूपानेच विकास पावतात असें मानणें बरें. जर नास्तिक निरनिराळ्या शक्ति मानत असतील तर



त्यांना नियामक एक पुन्हा ज्ञानशक्ति मानावी लागेल. मग तसें न मानतां एकच ज्ञानशक्ति मानण्यास काय हरकत आहे ? पुन्हा नास्तिक द्रुश्य व आस्तिक अदृश्य खरें मानतात. तथापि नास्तिकहि जगत्कारण अदृश्यच मानतात.

**न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥३॥**

नास्तिक लोकहि, कोणतीच गोष्ट नाश पावत नाही, वस्तु रूपांतर होतें असें कबूल करतात.

शक्तीचें रूपांतर तें मानीत नाहीत, पदार्थाचें रूपांतर मानतात. म्हणजे शक्तीचा एका कामांतून दुसऱ्या कामांत उपयोग होते. उदा.- इलेक्ट्रीसिटी पाणी पृथक् करण्याला पाहिजेच व पाणी तयार करण्याकरताहि पाहिजेच. म्हणजे नुसता तिचा एका कामांतून दुसऱ्या कामांत उपयोग होतो एवढेच.

## आस्तिक-नास्तिकांचे मतैक्य

येथे आत्म्याच्या अमरत्वाविषयी नास्तिक व आस्तिक यांचें मतैक्य दिसतें. ज्याप्रमाणे नास्तिक लोक शक्तिनाश कबूल करीत नाहीत त्याचप्रमाणे आस्तिकहि शक्तीचा नाश कबूल करीत नाहीत. नास्तिक लोक, शक्तीचें रूपांतर होत नाही, पण ती एका कामांतून दुसऱ्या कामीं उपयोगी पडते असें म्हणतात. या नास्तिक लोकांची शक्ति, आस्तिक लोकांचा आत्मा असून तिचें एका कामांतून दुसऱ्या कामांत लागणें यालाच आस्तिक लोक पुनर्जन्म म्हणतात. तेव्हा याविषयी आस्तिक व नास्तिक यांचा नाममात्रच वाद आहे.

असें आहे तर मग धर्माची जरूर काय?

या जगांत आपला मूळ उद्देश सुख मिळावें असा आहे व त्यासाठी प्रत्येक मनुष्य नेहमी अव्याहत प्रयत्न करीत असतो. परिस्थिती म्हणजे जगांतील नियति शक्ति ही त्याला आपल्याकडे ओढीत असते व तिला हा मनुष्य अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. उदा. ग्रॅव्हीटी प्रत्येक पदार्थ पृथ्वीकडे ओढीत असते पण आपण चालतांना वगैरे त्या ग्रॅव्हीटीच्या उलट प्रयत्न करीत असतो. आता या परिस्थितींत सुख आहे किंवा नाही हें पाहूं.

## सुखाचा प्रयत्न

जगांत पदार्थांचे रूपांतर नेहमी चालूच असल्यामुळे ज्या ज्या पदार्थापासून आपण सुख मानूं त्या त्या पदार्थापासून नेहमी सुखच मिळेल अशी शाश्वती नाही. म्हणून विषयापासून सुख मिळविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी अखंड नित्य सुख

मिळणें शक्य नाही. वस्तुतः विषयांचा स्वभाव सुख देणें हा नाही. कारण पुष्कळ जेवल्यापासून अजीर्ण होतें त्याचप्रमाणे सर्व विषयांची गोष्ट आहे.

अनुभव दृष्टीनेहि पाहिलें असतां आपली स्वतःवर जेवढी प्रीति आहे तेवढी कोणत्याच पदार्थावर नाही व ज्या गोष्टीवर आपण प्रेम करतो ती आपल्या सुखाची आहे असें जाणून करतो. प्रेतावर कोणीच प्रेम करीत नाही.

जगाचा विचार न करून अखंड समाधान आपण ठेवूं शकतो. असें जर आहे तर आपल्याला सुखाची कल्पना जगापासून मिळतें हें म्हणणें कसें संभवते? 'सुख सर्वांनाच पाहिजें व जगांत सुख नाही' अर्थात् सुखाची कल्पना जगाहून निराळ्या ठिकाणीं असली पाहिजे. आत्मा नष्ट होत नाही, हें तर मागे सिद्ध झालेंच आहे.

## परिस्थितीचा व आपला संबंध

(१) आत्मा नष्ट होत नाही. (२) परिस्थितिपासून सुख नाही. (३) आपल्याला सुख पाहिजे. - या तिन्ही कल्पना घेतल्या तर ह्यांतून काय सिद्ध होते? जेथे जेथे आपण जातो तेथे तेथे सुख पाहिजें असतें. म्हणजे मेल्यावरहि सुखच पाहिजें असें एक वाटतें व आपण परिस्थितीच्या स्वाधीन गेलों असतां सुख होत नाही. याचा विचार केला म्हणजे परिस्थितीचा जय करून ती अनुकूल करून घेतल्यास सुख होईल असें वाटतें. सारांश सुख पाहिजे असेल तर आपण परिस्थितीचा जय करीत असलें पाहिजें. आता मेल्यावर आपण नष्ट होत नाही व आपल्यास सुख नेहमी पाहिजें. म्हणून तें सुख मिळविण्यास आपण उपाय करावा हें सिद्ध झालें.

**जन्मदुःखं जरादुःखं नित्यं दुःखं पुनः पुनः ।**
**संसारसागरे दुःखं तस्मात् जागृहि जागृहि ॥१॥**

आता मेल्यावर कसें सुख मिळेल अशी बुद्धि झाल्यानंतर जीवंतपणींच एखादी वस्तु आपण सुखाची मानूं व त्यापासून आपल्याला नेहमी सुखच होईल असें आपल्या बुद्धीने जर ठरवितां येत नाही. कारण पदार्थाचें नेहमी रूपांतर होत असतें तर मग मेल्यावर आपणांस नेहमीच सुख राहील असा उपाय शोधून काढण्यास आपली बुद्धि कशी समर्थ होणार? परिस्थितीप्रमाणे वागलों असतां सुख मिळवितांना पुष्कळ अडचणी येतात व दुःख होतें व म्हणूनच पेसिमिस्ट्स (निराशावादी) लोक परिस्थितीप्रमाणे वागण्यांत दुःख आहे असें म्हणतात.

पुष्कळ वेळां आपण परिस्थितीचा जय करतो व परिस्थिती आपला जय करते. परिस्थितीपासूनच आपण बनलो असतो तर परिस्थितीच्या विरुद्ध कधीच गेलो नसतो. कोणतीहि गोष्ट उपादान कारण्याच्या विरुद्ध कधीच जात नसते. नेहमी



परिस्थितीप्रमाणेच वागलो असतो तर आपण कोणतेंच काम केलें नसतें. ग्रॅव्हीटीच्याप्रमाणे वागलो असतो तर आपण जमिनीवरून उठण्याचा प्रयत्न केला नसता. येथे परिस्थितीचा आपण जय केला असें दिसतें व मरण येतें, यावरून परिस्थितीचा जय झालेला दिसतो. पुनः अनेक प्रकारची खटपट करून आपण आपलें जीवित चालवितो यावरून आपला जय दिसतो. तर्कानें मन व परिस्थिति एकाच शक्तीचे परिणाम आहेत असें वाटतें. पण त्यांच्यांतच एकमेकांशीं विरोध दिसतो म्हणून असें ठरतें की यांत काही तरी गूढ आहे. गूढ कोणते? परिस्थितींत, आपण नेहमी परिस्थितीच्या स्वाधीन होऊन जावेसें वाटत नाही. एकदा परिस्थितीचा त्याग करावासा वाटतो व आपला त्याग करावासा वाटत नाही. म्हणून परिस्थितीचा व आपला कांहीच संबंध नाही व कोणी तरी तो संबंध घालून दिला असला पाहिजे. संबंध घालून देणारी माया आहे. परिस्थिति मायेचा परिणाम आहे.

तात्पर्य :- अशी एक संकष्ट शृखंला प्राप्त झाली आहे की परिस्थितीपासून सुख नाही. आपला आपल्याला त्याग करावासा वाटत नाही व सुख तर पाहिजे व आमच्याजवळ सुखाचें साधन तर नाही म्हणून या जगताचें जें कारण, नास्तिक व आस्तिक या दोघांच्याहि मतें मागे ठरविलें आहे, त्यांत या संकष्ट शृंखलेपासून काढण्याची शक्ति असली पाहिजे व जर ही शक्ति जगत्कारणांत नसेल तर सुखाचा अंश तरी कोणापासून उत्पन्न व्हावा?

आपणांस सुखाची केवळ कल्पनाच नाही तर अनुभव आहे. व तो 'चित्तसमाधानांत सुख आहे' असा अनुभव आहे. विषयांत तर सुख नाही. कारण भोजनापासून सुख होत असेल तर जितकें आपण जास्त भोजन करूं तितकें सुख जास्त वाढत गेलें पाहिजें. पण तसें होत नाही. उलटे अजीर्णादि दुःख उत्पन्न होतें. म्हणून ही शक्ति जडांत नाही. या परिस्थितींतून ज्या रीतीने सुटतां येईल त्या रीतीने चाललें पाहिजें.

* जगत्कारणापासून उत्पन्न होणाऱ्या सुखाचें साधन तो धर्म व
* त्यापासून परावृत्त करणारें साधन तो अधर्म.
* आपलें स्वरूप त्यास परब्रह्म म्हणतात व
* परिस्थितीस माया म्हणतात.

७. आपली वरील संकष्ट परंपरा नाहीशीं करण्याला जगत्कारण समर्थ असलेंच पाहिजें. कारण आपण सर्वच अन्न, पाणी, शास्त्र, इतिहासादि व्यवहारांतील गोष्टी या जगत्कारणापासूनच घेतो. त्यापासून प्राप्त करून घेतलीं जाणारीं साधनें मात्र आपल्याला कळेल अशा रूपांतच पाहिजेत.

उदा.'सी ओ टू' (म्हणजे पाणी) हें आपल्याला बुद्धीने शिकवितां येतें म्हणजें बुद्धिशिवाय याला राहतांच येत नाही व हे कांही आपल्याला जडापासून शिकतां येत नाही.कारण आपल्याला शिकण्याला जशी बुद्धि पाहिजे तशींच ती शिकविणाऱ्यामध्येहि पाहिजे. म्हणून या सर्व जगताचें गणित शिकविणारी मनुष्यरूपाने असणारी बुद्धि तिलाच अवतार म्हणतात.

## अवतारांचा उपदेश

८. ते अवतार किंवा महात्मे जे सांगतात ते श्रद्धेनेच घेऊन चाललें पाहिजे. पण ते सांगतात ते बरोबर आहे किंवा नाही येवढे मात्र तर्काने पटवून घ्यावें.

९. सत्य समाजाला अवश्य आहे. त्यावाचून चोरामध्येहि चोरी साधणार नाही. प्रत्येक चोर सर्व डबोल्यावर हात मारण्याचा प्रयत्न करील तर सर्व बेत फसेल. हा सत्यपणा कांही तरी अंशाने निस्पृहता असल्याशिवाय साधत नाही.

जर एकाद्या मनुष्याचें सर्व कुटुंब मरण पावलें व जर खोटें बोलण्याचा प्रसंग आला तर तो म्हणतो आता मी खोटें कोणाकरिता बोलूं? याप्रमाणे साधारण निस्पृह असतात ते जर खोटें बोलत नाहीत तर ज्यांनी आपल्या सर्व आशा नाहीशा करून संसाराचा त्याग आनंदाने केला ते लोक उगीच कशाला खोटें बोलतील? साधारण मनुष्य जर दुसऱ्यांचे मत खोडलें जाण्याची भीति न बाळगतां आपलें मत जसें आहे तसेंच सांगतो तर मग ज्यांना कशाचीच इच्छा नाही ते भलतेंच मत कशाला सांगतील? परमात्मा मानुष रूपांत येऊन जो धर्म शिकवितो तदनुसारच महात्मे शिकवितात.

१०. परमेश्वराने किंवा महात्म्यांनी सांगितलेलें साधनच परिस्थितींतून काढण्याला समर्थ आहे. दुसरीं सर्व साधनें परिस्थितींतच ढकलतात. म्हणून ज्या प्रमाणे दोन पायऱ्या चढले तरी, कांहीच वर न गेल्यापेक्षा कांही तरी वर जातो; त्याप्रमाणे - हा धर्म थोडा जरी केला तरी मनुष्य थोडा वर जातोच. म्हणून ज्या साधनांच्या योगाने आपण वर चढूं, जीं साधनें केलीं तर सुख द्यावयाचे व न केल्यास शिक्षा किंवा दुःख द्यावयाचें असें त्या जगत्कारणाने ठरवून ठेविलें पाहिजें.

जगांत बहुतेक क्रिया प्रतिक्रिया चालल्याच आहेत. भिंतीवर दगड फेकला म्हणजे जितक्या जोराने तो फेकूं तितक्याच जोराने भिंतीवरून उलटून दुसऱ्या ठिकाणीं पडतों, हें जर भिंत्यादि पदार्थांत होतें तर मग राग द्वेष असणाऱ्या मनुष्यादि प्राण्यांत होणें सहाजिक आहे. एकाद्याने ५० मनुष्याना ठार केलें तर ५० मनुष्याबद्दलची (एक वेळची) शिक्षा पुरी होत नाही. यालाहि पन्नासदा मारलें पाहिजें. व एवढी शिक्षा या जगांत मिळूं शकत नाही. तर ती कोठे तरी मिळालीच पाहिजे.



व ज्या ठिकाणीं ही शिक्षा मिळतें त्यालाच नर्क म्हणतात.

आता ही शिक्षा त्या मनुष्यांच्या द्वेषावर अवलंबून राहील. कारण या जगांतच आपण पाहतो की एकच मनुष्य द्वेषामुळे कित्येकदा दुसऱ्याचे दांत उपडतो. त्याला कुत्र्याच्या हातीं फाडवितो. हत्तीच्या पायाखाली तुडवितों. तर मग त्या मनुष्याच्या द्वेषाचा परिणाम काय होईल सांगतां येत नाही. म्हणून नर्क हा खरा असून त्याचें पुराणादिकांत केलेलें वर्णन होणाऱ्या शिक्षेपेक्षाहि पुष्कळ कमीच असलें पाहिजें. त्या प्रमाणे ५० मनुष्यांना जर दुष्काळांत अन्न दिलें तर त्याचेंहि पुण्य या जगांत मिळणें शक्य नाही. म्हणून त्याचेंहि फळ कोठेंतरी मिळालेंच पाहिजे. जें ज्या ठिकाणीं मिळतें त्यालाच आम्ही स्वर्ग म्हणतो.

**सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा ।**
**अहं करोमीति वृथाभिमानः स्वकर्मसूत्रैर्ग्रथितोहि लोकः॥(आनंदरामायण)**

## कर्मफळाचा नियम

आपण एखाद्या पदार्थावर प्रेम करतो म्हणजे वस्तूवर करीत नाही तर आकारावर करतो. म्हणून ती वस्तु पुन्हा मिळत नाही. कारण त्या आकाराचें रूपांतर होतें. वस्तूचा संयोग किंवा वियोग जे होतात ते आपल्या चांगल्या कर्मांचे फळ किंवा अपराधाबद्दल शिक्षा असली पाहिजे. कारण आपण या जगांत पाहतो की जो चांगलें काम करील त्याला चांगलें फळ मिळतें. वाईट काम करील त्याला शिक्षा मिळते. आपण मेल्यावरहि नष्ट होत नाही हें मागे (सिद्ध) झालेंच आहे. म्हणून ज्या कर्माचें फळ आपल्याला या जगांत मिळालें नाही त्या कर्माचें फळ आपल्यास मिळालेंच पाहिजे. एखाद्या दुःखी मनुष्याला आपण दुःखमुक्त केलें तर आपल्यावरहि तसाच प्रसंग आल्यास दुःखमुक्त होण्याचा संभव आहे.

केव्हा केव्हा अनिष्ट कर्मे करणाराची उन्नति दिसते. पण दुसऱ्या बाजूने त्यांची फारच अवनती दिसते. त्यांचें पापकर्म जोपर्यंत उघडकीस आलें नाही तोपर्यंतच त्यांची उन्नति दिसते. पण पुढे त्यांची अवनती होतेच.

उदा. पारकीय लोकांचें वर्तन चांगलें नसूनहि त्यांची स्थिति चांगली दिसते. पण उलट बाजूने परस्परांत कलह, द्रव्यासाठी प्राणघात, हिंदुस्थानांतून गेल्यावर नीच उद्योग करावा लागणें, वगैरे बऱ्याच रीतीने त्यांची अवनतीहि दिसते. याप्रमाणे जसें ज्याचें कर्म असेल तसें त्याला फळ मिळतेंच.

या कर्माचा नियम अबाधित आहे व हा घेतल्याशिवाय धर्माला धर्मत्वच येत नाही.

## चैतन्याचा जडावर ताबा

**मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।**
**हेतुनानेन च कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ गीता ९.१०**

जड व चैतन्य मिळून जगत्कारण होतें असें म्हणतां येत नाही. कारण हें जर विरुद्ध घेतलें तर विरुद्ध गोष्टीपासून कोणतीच गोष्ट बनत नसते व त्यामुळे जगत्कारणाचा नाश होईल. विरोधी न घेतल्यास मग चैतन्यापासून जड किंवा जडापासून चैतन्य झालें म्हणण्यांत कांहीच अर्थ नाही. आणखी त्यांतहि आपण पाहतो की चैतन्य जडाचा उपयोग करून घेवूं शकत नाही. यावरून चैतन्याचाच जडावर ताबा दिसतो.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ४.७**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ४.८ गीता**

जसें जसें आपण परिस्थितीला सोडून जगत्कारणाकडे जावूं तसें तसें त्याचें आकर्षण पडून आपल्यामध्ये व त्या कारणामध्ये एक प्रकारचें दळण वळण सुरु होतें. हीच भक्ति होय.

हें प्रेम व साधनें जेव्हा थोडीं होतात व लोक जसजसें परिस्थितीच्या ताब्यांत जातात तेव्हा त्यांची पुन्हा स्थापना करण्याकरिता जगत्कारण मनुष्यरूपाने उत्पन्न होतें. त्यालाच अवतार म्हणतात.

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ गीता**

हा जो धर्म व त्याचीं साधनें आहेत त्यापैकी थोडेसें जरी केलें तरी त्याचें फळ मिळतेंच. यामध्ये अभिक्रम नाश पावत नाही. तुम्हाला ज्यारीतीने हा धर्म करितां येईल त्यारीतीने साधनें करून करावा. येथे प्रत्यवाय नाही. आरंभ इकडून करा किंवा तिकडून करा. क्रमाचा नाश होत नाही. थोडासा जरी केला तरी पुष्कळ फायदा होतो.

## धर्म हा कर्मधर्म व जातिधर्माहून वेगळा

या वचनावरून एक सिद्धांत निष्पन्न होतो तो हा की -

हा जो धर्म सांगितला तो जातिधर्म किंवा कर्मधर्म नसला पाहिजे. कारण



जातिधर्मांत किंवा कर्मधर्मांत क्रम-नाश उपयोगास येत नाही. संधेच्या नंतर स्नानादिक केलें तर क्रम-नाश होऊन भलतेंच विपरीत फळ होतें. म्हणून हा भगवंताने सांगितलेला धर्म कर्मधर्म किंवा जातिधर्म नसला पाहिजे. हा धर्म थोडा केला तरी मोठ्या भयापासून रक्षण करतो. यावरूनहि तो कर्मरूपी नाहीच असेंच दिसतें.

तुकाराम महाराज म्हणतात,

**कर्म धर्म नव्हे सांग । उणें आंगी पतन**

समर्थ रामदास म्हणतात -

**यथासांग रे कर्म तेंही घडेना । घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना ।**

यावरून कर्मधर्मामध्ये थोडासा करून बाकीचा टाकून दिल्यास पतन सांगितलें आहे. म्हणून भगवंतानीं सांगितलेला धर्म कर्मरूप किंवा जातिरूप होऊं शकत नाही.

**दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ।**
**मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥१६.५**
**अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानियोगव्यवस्थितिः ।**
**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१६.१**
**अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।**
**दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ऱ्हीरचापलम् ॥१६.२**
**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।**
**भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥१६.३**

भगवान म्हणतात :- अभय, सत्त्वशुद्धि, ज्ञानप्राप्त करून देणारीं साधनें, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशुनता, दया इत्यादि गुण दैवीसंपत्तीचे आहेत; व ही प्राप्त केली केली असतां याच्या योगाने मोक्ष मिळतो. ज्याअर्थी ही दैवी संपत्ति प्राप्त करून घेण्यामध्ये क्रमनाश होत नाही व याच्या योगाने जगत्कारणाकडे सुलभ जातां येतें म्हणून हाच धर्म ईश्वराने सांगितला असला पाहिजे. नाही तर मागचा श्लोक जुळत नाही व यज्ञकर्म धर्माने मागच्या श्लोकांशी मेळ पडत नाही, म्हणून दैवी संपत्ति हाच धर्म आपल्याला घेतला पाहिजे. ज्याचें जें करणें तोच यज्ञ असें सांगितलें आहे.

हा धर्म सांगितल्याप्रमाणे आपण जर यज्ञ करून देवांना प्रसन्न केलें तर ते देवहि आपलें इच्छित देतील. अमुकच यज्ञ करावा हा कांही धर्म सांगितला नाही. ''ज्याला जो उत्तम रीतीने करतां येईल तोच त्याचा धर्म आहे.'' आपल्याशीं वरच्या

चांगल्या लोकांशीं दळण वळण राहावें, आपले पितर ज्या चांगल्या ठिकाणीं गेले असतील तेथेच आपणहि जावें अशा उद्देशाने ही भावना सांगितली आहे. गुणकर्मानेच किंवा जातिकर्मानेच हें प्राप्त करून घेतलें पाहिजें असें सांगितलें नाही.

**ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ।**

**अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ १३.२४**

हा धर्म जिकडून चांगल्या रीतीने पाळतां येईल तितका समन्वय करून पाळावा. कोणी ध्यानाने, कोणी योगाने, कोणी कर्माने, कोणी कांही करून तरून जातात.

**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।**

ज्या गुणाचा जो असेल त्या गुणाच्या अधिकाराप्रमाणे त्याला धर्म सांगावा. या सर्व धर्मांचें इष्ट फल भगवत्प्राप्ति हें आहें. कारण इतर स्वर्गादिक सुख भगवंतापेक्षा कमी आहे. धर्म कमी आचरला तर स्वर्ग मिळतो व नच आचरला तर नर्कप्राप्ति होते. सर्व सुख सोडून निरपेक्ष प्रेम करणें हीच भक्ति.

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**

**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ ९.३२**

या धर्माचे ठिकाणीं सर्वांना अधिकार आहे. मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, वैश्य असो किंवा शूद्र असो.

**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।**

**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ९.३३**

माझा जो आश्रय करतो तो मग शूद्र असो किंवा चांडाळ, पापयोनि जरी असला तरी त्याचें कल्याणच होतें. मग माझा आश्रय करून जे ब्राह्मण आहेत ते कसे तरणार नाहीत. माझे भक्त अखंड सुखाचा अनुभव घेतात, कारण तें सुख नित्य आहे व इतर परिस्थितीच्या ताब्यातलें सुख अनित्य आहे व परिणामी हितकर नाही. म्हणून :-

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**

**अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥ १८.६६**

सर्व धर्मांचा त्याग करून तूं मला शरण ये. तुला असें वाटत असेल की मी पापयोनि आहे पण तुला पापाची भीति नाही. आणि पाप झालें अशी भावना जरी असली तरी मी त्याच्यापासून तुला मुक्त करीन.



## दहा अवतार

हाच धर्म युगायुगांत स्थापन झाला असला पाहिजे. कारण दुष्टांचें शासन करून साधूंचें रक्षण करण्याकिरता सत्त्व गुणाची परमेश्वर स्थापना करतो, हे मत्स्य, कूर्म, वराहादि अवतारावरून कळते.

(१) **मत्स्य** अवतारांत शंखासुराने वेद चोरून नेले तेव्हा त्याला मारून ते आणलेत. मधु-कैटभांचा नाश केला.

(२) **कूर्म** अवतारांत पृथ्वी रसातळांत जावयाला लागली तेव्हा तिचा उद्धार केला.

(३) **वराह** अवतारांत हिरण्यकेशीस मारला.

(४) **नृसिंह** अवतारांत :- मानुष कार्यें या अवातारापासून सुरू झालीं. हिरण्यकश्यपूला मारून प्रल्हादाचें रक्षण केलें. जातिधर्माकडे लक्ष न देतां त्याचें रक्षण केलें. असुर म्हणजे दैत्य नव्हे. तर,

**दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।**

**अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ १५.४**

यावरून भागवत धर्म स्थापन केला. यज्ञादिक धर्म स्थापन केला असें दिसत नाही.

(५) **वामन :-** या अवतारांत देवांचें रक्षण करून बळीला पाताळाचें राज्य दिलें व पुढे पुनः इंद्रपद देणार आहेच. यावरून कर्माचा नाश केला नाही. बळीच्या आश्रयाने असुर फार माजतील एवढ्याकरिता पराजय केला. निःशेष दैत्यांनी यज्ञ करूं नयेत असा भाग नव्हता.

(६) **परशुराम :-** क्षत्रियांना मारलें. चितेंतून ब्राह्मणांना जिवंत केलें. यावरून जातिधर्म स्थापन केला नाही.

(७) **राम :-** या अवतारांत रावणाचा संहार केला. सीता आणली व सत्य, दया अशा धर्माचें स्थापन केलें. भक्तमालेंत शबरीचें तीर्थ तळ्यांत टाकून ब्राह्मणांना घ्यावयाला लावलें अशी कथा आहे. यावरून जातिधर्म स्थापन केला नाही असें सिद्ध होतें.

(८) **कृष्ण :-** गवळ्यांच्या घरीं जन्म घेऊन यज्ञपत्न्यांचें अन्न घेतलें. गोकुळांतील यज्ञ भंग केला. गोपी, पतींची पर्वा न करतां, श्रीकृष्णाला शरण आल्या, तेव्हा धर्माची आडकाठी न घालतां त्यांना पावन केलें. सत्त्वगुणाने मोक्ष होईल असा धर्म स्थापिला.

**(९) बुद्ध :-** अहिंसा धर्म स्थापिला. बौद्धांनी आता त्याचा विपर्यास केला असेल. जयदेव स्वामींनी म्हटलें आहे की, तूं अहिंसा धर्म स्थापन करून यज्ञकांडाचा निषेध केला, - पण ज्ञानकांडाचा निषेध केला नाही. यावरूनहि जातिधर्म स्थापन केला नाही.

**(१०) कल्की :-** भविष्यपुराणांमध्ये म्लेंच्छाप्रमाणे वागतील त्यांचा नाश केला जाईल असें म्हटलें आहे.

या सर्व विवेचनावरून असें दिसतें की जगत्कारणांत आपल्याला परिस्थितीपासून काढण्यांचे सामर्थ्य आहे व आपणहि परिस्थितीचा जय करून त्याचेंकडे जाण्याचा प्रयत्न करतो; व तिकडे जातांना आकर्षण पडून चित्ताला समाधान वाटतें. म्हणून आपणहि त्या कारणाचें प्रतिबिंब आहो म्हणून परिस्थितीचा जय करून परिस्थितीच्या सुखाची इच्छा न करतां वासनांचा त्याग करून प्रेमाने परमेश्वराशीं ऐक्य होणें याला मोक्ष म्हणतात.

**॥ श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥**

०००

# ९. धर्माची उपपत्ति

## आदि धर्म = आर्य धर्म

या सर्व जगामध्ये आर्यधर्मच सर्वांच्या पूर्वी उत्पन्न झाला आहे. सर्व धर्मांच्यापूर्वी हाच एक धर्म होता, व याबद्दल इतिहासाची साक्ष आहे की बाकीचे सर्व धर्म या धर्मातून निघाले आहेत. हा धर्म आपल्याला परमेश्वरापासून मिळाला आहे.

इतर धर्मांत जें सांगितलें आहे तें आपल्या धर्मात पूर्वीपासून आहेच पण इतर धर्मांत जें सागितलें नाही अशा पुष्कळ गोष्टी आपल्या धर्मात सांगितल्या आहेत. ह्या धर्माला मुख्य आधार वेद आहेत व हे परमेश्वराने उत्पन्न केले आहे व त्याचे चार भेद आहेत. ऋक्, यजुः, साम, अथर्वण.

मुलगी जोपर्यंत आईबापाच्या घरीं असतें तोपर्यंत तिला आईबाप स्त्रियांना करावीं लागणारीं घरांतली कामें शिकवितात व पुढे सासरीं गेल्यावर तीं कामें करण्याचा दृढ अभ्यास झाला म्हणजे पुढे तिला आपल्या मुलीला तसेंच शिकविण्याचा अधिकार येतो. याचप्रमाणे आपल्या धर्मात आहे. आपण वेदांनी सांगितल्याप्रमाणे धर्म आचरण करीत गेलो म्हणजे पुढे आपल्या अंगीं दुसऱ्याला धर्म सांगण्याचें सामर्थ्य येतें.





## कर्म, उपासना व ज्ञान

आपल्या धर्मात तीन भाग आहेत. कर्म, उपासना व ज्ञान. पहिलें कर्म करावें, मग उपासना व नंतर ज्ञान प्राप्त करून घ्यावे. याचप्रमाणे गीतेचेंहि तीन भाग आहेत. पहिलें सहा अध्यायांत कर्म सांगितलें आहे. दुसऱ्या सहा अध्यायांत उपासना सांगितली आहे व बाकीच्या सहा अध्यायांत ज्ञान सांगितलें आहे. व ही (गीता) परमेश्वररूपच आहे म्हणून वेदरूप आहे.

कर्म म्हणजे जो गुरु व वेद यांनी आपला धर्म नेमून दिला असेल तो करणें. व तोच धर्म फळाच्या इच्छेने न करितां ईश्वराला अर्पण करणें उपासना म्हणतात. आपण व ईश्वर एकच होऊन जाणें याला ज्ञान म्हणतात. हा गीतेचा उपोद्घात झाला.

आता थोडें विस्तार करून सांगतों. या जगांत प्रत्येकांना सुख व दुःख आहेच असें दिसतें. निकालस सुखी कोणीच दिसत नाही. त्यांत फरक एवढाच. की कोणाला कमी दुःख व सुख जास्त, तर कोणाला कमी सुख तर दुःख जास्त. कोणाला एका पदार्थापासून सुख तर दुसऱ्याला त्याच पदार्थापासून दुःख. कोणाला मोठा प्रयत्न करूनहि सुख होत नाही, कोणाला कांही प्रयत्न न करतांहि सुख होतें. कोठे बाप आपल्या मुलीकरता चांगलें स्थळ पाहतो व देतो पण पुढे त्या मुलीचा नवराच क्षय रोगाने किंवा इतर रोगाने बिमार पडून मरतो. एखाद्याचा मुलगा चांगला तर दुसऱ्याचा वाईट. एखादा बाप मूर्ख तर त्याचा मुलगा चांगला विद्वान. एखादा बाप चांगला विद्वान तर मुलगा अगदी शंख.

याप्रमाणे जगांत प्रत्येक मनुष्य सुखी व दुःखी दिसतो, त्यांतहि दुःखी फार असतात. असें कां असावें? कित्येक म्हणतात, ईश्वरच मनुष्यांना सुखदुःखांत टाकतो. पण असें म्हणणें बरोबर नाही कारण ईश्वर जर सर्व जगाचा पिता व चालक आहे तर त्याला सर्वच लोक सारखे असले पाहिजेत. एकाला सुख व दुसऱ्याला दुःख असें त्याने कां द्यावे? असें मानल्यास त्याचें ठिकाणीं निष्ठुरता- विषमभाव- आहे असें म्हणावें लागेल व यःकश्चित जीवाप्रमाणेच स्वच्छंदी जीव म्हटला जाईल.

बाप मुलीला चांगलें घर पाहून देतो व पुढे नवऱ्याला कुष्ठ होऊन तो मरतो. येथे मुलीचा कोणता अपराध झाला? ईश्वरानेच तिला दुःखांत टाकलें म्हणावे तर ईश्वर अन्यायी व निर्दयी झाला. सर्प किंवा कुत्रादेखील त्याला चिडविल्याशिवाय कोणाला चावीत नसतात. व ईश्वर जर विनाकारण कोणालाहि दुःखांत टाकील, तर तो कुत्र्यापेक्षाहि नीच होईल. पशु देखील उगीच कोणाला मारीत नाहीत. विनाकारण दुःख देणारा ईश्वर या पशुपेक्षाहि नीच समजल्या जाईल. म्हणून ईश्वरच मनुष्यांना सुखदुःखें देतो हें मानणें बरोबर नाही. तो ज्याचें जसें कर्म असेल

तसें त्याला फळ देतो. आपलें वाईट होवो किंवा चांगलें होवो त्याला कारण कर्मच असतें.

कितीहि संसार केला व चांगला वाढविला तरी निकालस सुख कोठेच संसारांत आपल्याला मिळावयाचें नाही व तशा सुखाकरिता तर आपली खटपट असते? म्हणून सर्व सुखाचा साठा जो परमेश्वर तो जर आपण मिळविला तर आपल्याला निकालस सुख मिळेल व तो मिळवून घेण्याकरिता आपल्याला पुण्यकर्मे केली पाहिजेत. चांगल्या कर्माशिवाय परमेश्वर कोणालाच मिळत नाही. 'उत्तम कर्म म्हणजे ज्याचा जो धर्म असेल तेंच त्याचें उत्तम कर्म' अर्जुनालाहि धर्माविषयी मोह पडला होता व नंतर धर्म सांगून भगवंताने त्याचा मोह दूर केला. भगवान म्हणतात, अर्जुना !

**श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥३.३५**

आपला धर्म वाईट असला तरी दुसऱ्याच्या धर्मापेक्षा तो फार चांगला. स्वधर्म आचरण करीत असतांना मरण आलें तरी कांही हरकत नाही; पण परधर्म नको. श्रीज्ञानेश्वर महाराजहि म्हणतात,

**अगा स्वधर्म हा अपुला । जरी कां कठीण जाहला ॥**
**तरी हाचि अनुष्ठिला । भला देखे ॥२१९॥**

कल्पना कर या गावांत मोठ्या हवेल्या आहेत, म्हणून यांच्याकरिता आपलें घर मोडून टाकावें काय?

**तरी लोकांची धवळारें । देखोनिया मनोहरें ॥**
**असतीं आपुली तणारें । मोडावीं कैवीं? ॥ ज्ञा.अ ३-२२३**

भगवान म्हणतात, अर्जुना ! तुझा धर्मच तुला योग्य आहे. कल्पना कर दोघे मनुष्य आहेत. त्यापैकी एक कष्ट करून चार पैस मिळवितो व आपलें पोट भरतो व दुसऱ्याच्या संपत्तीकडे पाहून आनंद मानतो व दुसरा चोरी करून आपलें पोट भरतो; तर या दोघांत चांगला कोण? जो आपलें पोट कष्ट करून भरतो तो चांगला. भगवान् म्हणतात, जो आपला धर्म सोडून देऊन दुसऱ्याच्या धर्माचें अवलंबन करतो; त्याच्या हृदयांत मी राहत नाही.

शिवलीलामृत तूं वाचलें त्यांत कथा सांगितल्या आहेत, त्याचा कधी विचार केला आहेस काय? आपण थोडा विचार करूं.

पहिलें सीमंतिनीचा अध्याय यांत विलक्षण पातिव्रत्य वर्णन केलें आहे.



पतीच्या कल्याणाकरिताच तिने शिवव्रत केलें.

शारदाहि तशीच पतिव्रता होती. तिला पूर्वीच्या जन्मीच्या पतिपासून मुलगा झाला व पुढे ती कैलासाला गेली.

महानंदा वेश्या होती पण तिनेहि आपल्या धर्माप्रमाणे वागून आपलें पातिव्रत्य संपादन केलें. एकाचे दिवस पूर्ण झाल्याशिवाय इंद्र जरी आला तरी ती वश होत नसे. नित्य नूतन पति हा त्यांचा धर्म आहे.

बहुलाहि पतिव्रताच होती. तीहि आपल्या विधवा धर्माप्रमाणे वागून कैलासाला गेली.

राजाचा धर्म आहे की, कोणीहि अतिथी आला तरी त्याला विन्मूख पाठवूं नये. त्याला अन्न वस्त्र द्यावें. या धर्माप्रमाणे वागून श्रियाळ राजा कैलासाला गेला. स्वतःचा धर्म सोडून देवून, तरलेला कोणीच दिसत नाही. स्वतःचा धर्म श्रेष्ठ आहे. या विषयी एक कथा आहे.-

## पतिव्रता व कौशिक ब्राह्मण

कोणी एक उग्र तपांत गढलेला कौशिक नांवाचा ब्राह्मण होता. एके दिवशी तो एका झाडाखाली वेदाध्यायन करीत असता त्यांच्या अंगावर एका बगळ्याने मलोत्सर्जन केले. त्यांनी त्याच्याकडे क्रोधाने पाहिल्याबरोबर तो पक्षी मरून खाली पडला. तें पाहून त्याला वाईट वाटलें. पुढे एके दिवशी तो भिक्षा मागीत असतां एका घरीं भिक्षा मागण्याकरिता आला, तेव्हा त्याच घरांतील स्त्रीने त्याला थांबण्याला सांगितलें. कारण तिचा पति थकून दमून भूकेने व्याकूळ होऊन बाहेरून आला होता. त्याच्या खाद्यपेयाची तयारी करून देण्यांत ती साध्वी गुंतली होती व पतीचें सर्व काम आटोपल्यावर भिक्षा घेऊन ती त्या ब्राह्मणाकडे आली. तिष्ठत ठेवल्याने तो संतापला असें पाहून ती म्हणाली,

''महाराज ! क्षमा करा. पतीला मी सर्वात श्रेष्ठ दैवत समजतें. ते थकून भागून आल्यामुळे त्याचा समाचार आधी घेऊन मी ही भिक्षा आणली आहे.''

ब्राह्मण म्हणाला, ''तुला ब्राह्मण श्रेष्ठ वाटत नसून पति श्रेष्ठ वाटतों अं! ब्राह्मणाचा तूं अपमान करतेस? ब्राह्मणापुढे इंद्र देखील वाकतात. अग्नितुल्य ब्राह्मणाच्या अंगीं सर्व पृथ्वी भस्म करून टाकण्याचें सामर्थ्य आहे, हें तूं अहंपणाने जाणत नाहीस!''

स्त्री म्हणाली, ''महाराज ! मी कांही बगळी नव्हे. उगीच राग कशाला करिता? 'नहि गलाफा विप्र्षे . . .'मी ब्राह्मणाचा कधीच अपमान करीत नाही. मी त्याचा प्रभाव ओळखतें. त्यांचा क्रोधहि कठीण व प्रसादहि मोठा आहे. या

चुकीबद्दल क्षमा मागतें. पण पतीची सेवा करून जेवढा धर्म पदरी पडेल तेवढाच मला पुरे आहे. माझ्या मागे आपण क्रोधाच्या झपाट्यांत बगळी मारली तें मला अंतर्ज्ञानाने समजलें.''

क्रोध हा मनुष्याचा शत्रु आहे. जो काम, क्रोध, मोहांना जिंकतो, सत्य ओळखतो, दुसऱ्यांनी पीडा दिली असतांहि जो उलट पीडा देत नाही तोच ब्राह्मण!

यावरून जो आपला धर्म आहे, तोच प्रथम करावा व या धर्माशिवाय ज्ञान होत नाही. मग प्रल्हाद, बिभीषण, भरत, मीराबाई यांनी धर्मत्याग कां केला? यांनी आपला धर्म मुळीच सोडला नाही.

प्रल्हाद व हिरण्यकश्यपू दोघेहि देवाला जाणत होते. फरक एवढाच, प्रल्हादाची प्रेमभक्ति व हिरण्यकश्यपूची विरोधभक्ति होती. पुढे हिरण्यकश्यपूचा वध झाल्यावर त्याचा उद्धार करण्याकरिता प्रल्हादाने देवाची प्रार्थना केली व देवाने सांगितलें की

''तुझ्यासारखा वैष्णव उदरीं येऊन हा नर्काला कसा जाईल?''

गोपी देखील पति सोडून श्रीकृष्णाकडे कधीच गेल्या नाही. गोपींनी श्रीकृष्ण पति व्हावा म्हणून कात्यायनी व्रत केलें व या गोपी कुमारी होत्या.

**''हेमंते प्रथमे मासि. . . ''**

हेमंत ऋतूंत श्रीकृष्ण पति व्हावा म्हणून व्रत केलें व त्या कुमारी होत्या म्हणून त्यांचा धर्म मोडला नाही.

मीरेचेंहि असेंच आहे. कुमारवयापासूनच ती श्रीकृष्णाला पति मानीत असे. व त्याप्रमाणे लग्न न करण्याविषयी तिने आपल्या बापाला सांगितलें होतें, पण त्याने तिचें ऐकलें नाही. तिने दुसरा पति केला असतां तर अधर्म झाला असता.

स्वप्नांतच श्रीकृष्णाने तिचा हात धरला. मग एक श्रीकृष्ण पति केल्यावर दुसरा पति कसा करितां येतो, म्हणून तिचा धर्म मोडला नाही.

०००

**हिंदु धर्म कां बुडाला नाही ?**

आपल्या धर्मावर पुष्कळदा धाड आली पण फिलॉसफी त्यात असल्याने तो बुडाला नाही; जरी एखादे वेळेस दुसऱ्या धर्मातील विचार आपल्या धर्मात घुसडले गेले तरी थोडी स्वतंत्रता आल्याबरोबर पुनः खरा धर्म स्थापला जातो. फिलॉसफीमुळे दुसऱ्या धर्माचे चिरपरिणाम राहू शकत नाहीत. म्हणून हिंदु धर्म बुडाला नाही.

– ***श्रीगुलाबरावमहाराज***



**'' श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ''**

# १०. पतिव्रता-धर्म

काल प्रल्हाद, गोपी, मीरा वगैरे यांनी धर्म सोडला असा जो कित्येक त्यांच्यावर आरोप घेतात, त्याचें निराकरण केलें. तेंच पुनः आज थोडे सांगतो.

प्रल्हादाने आपल्या बापाचा द्वेष केला असतां तर त्याला उद्धरण्याविषयी देवाला कधीच विनंती केली नसती.

आता गोपी ज्या श्रीकृष्णाकडे गेल्या त्यांत कांही शरीराने गेल्या व कांही मनाने ध्यान करून गेल्या. ज्या पति वगैरेंच्या लज्जेने जाऊं शकल्या नाहीत त्या ध्यानाने गेल्या. गेल्याच असत्या तर त्यांचें पतीने काय केलें असते? पण धर्ममर्यादा उल्लंघन केली नाही. त्या उपासनेच्या योगाने श्रीकृष्णाकडे गेल्या. ज्या शरीराने श्रीकृष्णाकडे गेल्या त्या कुमारिका होत्या. रासामध्ये प्रत्येक गोपींना एक एक स्वतंत्र श्रीकृष्ण होता. व श्रीकृष्णाच्या ज्या १६००० बायका होत्या, त्यांनाहि स्वतंत्र एक एक श्रीकृष्ण होता. म्हणून गोपींचा पतिव्रता धर्म किंवा श्रीकृष्णाचें एकपत्नीव्रत भंगलें नाही. एका शरीराने जास्त स्त्रिया भोगणें हा अधर्म आहे. याचप्रमाणे मीराकडूनहि अधर्म झाला नाही. कारण बाळपणापासूनच श्रीकृष्णाकडे तिची प्रीति होती. व स्वप्नांत तिला श्रीकृष्णाने वरलेंहि होतें व हेंच तिने आपल्या बापाला व आईला सांगितलें होतें.

**''माई माको स्वप्ने में पर्णी गोपाळ''**

पण तिच्या बापाने तिचें न ऐकून तिचें लग्न करून दिलें. एकदा श्रीकृष्णाने वरल्यावर पुनः याला पति कसें मानतां येतें? कारण हा अधर्म झाला असतां म्हणून तिने आपला जीव-पति सोडून दिला. ईश्वर-पति सोडून जीव-पति करणें चूक झालें असतें.

स्त्रियांना पतिशिवाय गतिच नाही. गुरूच्या कृपेने मुक्ति होते हें सर्व खोटें. उदा. तुझ्या डोक्यांत नाद होतो. एक वैद्य आहे तो गोड औषध देतो व दुसरा कडू औषध देतो, व पथ्य दोघांचीहि सारखीच आहे. तर तूं औषध कोणाचें घेशील? जो वैद्य गोड औषध देतो त्याचें घेशील.

तुला एका गावाला जावयाचें आहे व तुजबरोबर दुसरा एक मनुष्य जावयाला निघाला. तूं पाठीवर दगड बांधून घेतलें व दुसऱ्याने अन्न बांधून घेतलें. दोघांनाहि श्रम सारखेच होतात. पण दगडाने तुला व्यर्थ श्रम होतील व अन्नाने त्याचे पोट भरेल.

तुझी पतीवरची प्रीति कमी आहे व तुला एका मनुष्याला जेवूं घालावयाचें आहे. आता या मनुष्याला स्वयंपाक करून जेवूं घालण्यांत पतीला जेवूं घालण्यापेक्षा कांही कमी श्रम पडत नाहीत; पण पतीला स्वयंपाक करून जेवूं घालण्यांत त्याचे उपकार कमी होतील. तो आपल्याला अन्न वस्त्र देतो.

याचप्रमाणे स्वतःच्या धर्माने जसें सत्य समजतें तसें कोणत्याच इतर धर्माने समजत नाही. म्हणून आपलाच धर्म चांगला.

तुझा मुलगा आहे. त्याला तूं विद्या शिकविली व घरचा कारभार पाहण्याला शिकविले; पण तो आळस करितो. घरचा कारभार पाहात नाही. तुला जर त्याला एखाद्या गावचे पाटील नेमावयाचें आहे तर तूं नेमशील काय? नाही. कारण त्याला घरचेंच जर काम चांगलें येत नाही तर पाटीलकीचें काम कसें चालविणार? - तुझें सर्व पतीच्या स्वाधीन आहे. ज्याच्या स्वाधीन आपण असतो त्याच्या मनोगताप्रमाणे चालून जर धर्म आचरण आपल्याच्याने होत नाही तर दुसऱ्याच्या म्हणण्याप्रमाणे वागून तुम्ही काय कराल? अमावास्येनंतर द्वितीयेचा चंद्र सर्वजण पाहतात व कित्येक त्यावर अक्षदा टाकतात. पण उपयोग काय? आपला सर्व व्यवहार तर सूर्याने चालतो. सूर्याला आपण कांहीच मानीत नाही व बिजेच्या चंद्राला अक्षदा वाहतो.

ज्याच्याशी आपला संबंध जास्त असतो ती गोष्ट करावीशी वाटत नाही. नवऱ्यावरच आपले सर्व अवलंबून असून तो आला असतां त्याला पाणी द्यावयाचें नाही व व्रत करीत बसावयाचें. ही सर्व लबाडी आहे.

परमेश्वर हा स्त्रियांवर लवकर प्रसन्न होतो. नास्तिकांना तर्काने पटवून द्यावें लागतें, पण स्त्रियांना ईश्वर पटवून द्यावा लागत नाही. पतीच त्यांना ईश्वर आहे.

पहिलेंच जर पमेश्वर आहे असें घेऊन चालले, तर तो आहे हे कशावरून? ईश्वराचें अस्तित्व कळावयाचें नाही. लहानपणी खेळतांना मातीच्या बाहुल्या करितो, त्याचें लग्न लावतो व त्याप्रमाणे पुढे तसाच व्यवहार करतो. हें सर्व आपण पहिलें विश्वासानेच करतो. किंवा अग्नि पेटवतांना धुपट येतो. त्याप्रमाणे धर्मामध्य पहिलें आपण विश्वासानेच करतो असें वाटतें पण तसे नसते. भगवान् म्हणतात -

**ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः।**
**श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः॥ ३.१३**

''प्रथम आपला धर्म पाळावा'' हें माझें मत जें कोणी श्रद्धेने पाळतात त्यांना कर्माच्या योगाने माझी प्राप्ति होते. ते मात्र कोणाचा द्वेष करणारे नसले पाहिजेत.

कल्पना कर. आपण गरीब आहो. आपल्या घरीं चार दाणे आहेत. ते



पचवून खाण्यामध्ये दुसऱ्याचा हेवा करावा लागता नाही. पण दुसऱ्याची (साधूची) सेवा करण्यामध्ये मात्र पतीची जेव्हा उपेक्षा करावी लागते, तेव्हाच दुसऱ्याची सेवा होईल. म्हणजे आपल्यामध्ये पतिविषयी मत्सर उत्पन्न होतो. एखाद्या साधुपासून देव प्राप्त करून घेण्याची इच्छा असली म्हणजे त्यांत अगोदरच पतिविषयी मत्सरबुद्धि आली. म्हणून असे करण्याविषयी भगवान् निषेध करतात.

आपला धर्म सोडून दुसऱ्याचा धर्म घेतो, त्याच्या हातून कोणीच पूर्ण होऊं शकत नाही.

कित्येक हिंदु ख्रिश्चन होतात. पण ख्रिश्चन देव असें सांगतो की ''हिंदूंचा द्वेष करा.'' ज्याच्या मनांत द्वेष नाही त्यालाच या लोकांत व परलोकांत सुख होतें. दुसरा धर्म घेतो तेव्हा आपल्या धर्माचा द्वेष करतो.

पुष्कळ स्त्रियांची पतीचे ठिकाणी ईश्वरबुद्धि नसते व इतर व्रतें वगैरे करतात. म्हणजे पहिलें पतीचा द्वेष करावयाचा व नंतर दुसऱ्या देवाचा प्रेम संपादन करावयाचा. म्हणजे ज्याचें खावयाचें त्याच्याशींच द्वेष करावयाचा, असें होतें. म्हणून आपला धर्म सोडून, कितीहि परधर्म करणारा असला तरी तो प्रिय नाही. आपला धर्म सोडूं नये. म्हणूनच भगवान् श्लोकांत म्हणतात, ते श्रद्धावंत असून अनसूयन्त असले पाहिजेत.

आपल्या धर्माविषयी मत्सर न ठेवतां दुसऱ्याचा धर्म पाळणें शक्य नाही.

दगडाचे ठिकाणीं किंवा मूर्तीचे ठिकाणीं ईश्वरभावना ठेवण्यापेक्षा पतीचे ठिकाणीं ईश्वरभावना ठेवल्याने ईश्वरभावना दृढ लवकर होते; कारण भावना ही उपमानप्रमाणाने होत असते.

उदा. कल्पना कर. तुझी मुलगी आहे, तिला पाहण्याकरिता आले व तुला विचारलें की, मुलीचा तोंडवळा कसा आहे तर तूं काय सांगशील? या मुलींत व तुझ्या मुलींत सारखेपणा आहे म्हणून तू या मुलीच्या तोंडाप्रमाणे, माझ्या मुलीचे तोंड आहे असे म्हणशील.

त्याप्रमाणे पतीचें ठिकाणी ईश्वरभावना करण्यामध्ये असें साहाय मिळतें. गर्भात ईश्वरानेच आपले पालन केले व आता पति आपले पालन करतो म्हणून पतींत व ईश्वरांत एवढें साम्य आहे. मूर्तीवर परमेश्वराची भावना केली, ती कशी करणार? गर्भांत कांही दगडाच्या मूर्तीने पालन केलें नाही. पति पाळतो म्हणून पतींत व ईश्वरांत साम्य आहे. भगवान् म्हणतात, ''आपलेपणा ठेवून जो धर्म पाळतो तोच मजप्रत पावतो.''

## धर्मान्तरात स्वधर्माचा द्वेष

परधर्म स्वीकारण्यामध्ये स्वधर्माचा द्वेष करावा लागतो, हें काल सांगितलें. भगवान म्हणतात, अर्जुना! दगडाला व अन्नाला पाठीशी बांधून नेण्यांत श्रम सारखेच पडतात. पण अन्नाने पोट भरतें तसें दगडाने भरत नाही. म्हणून गावाला जातांना जसें अन्नच बांधून नेणे चांगले आहे, त्याप्रमाणे परधर्म स्वीकारण्यामध्ये व आपला धर्म स्वीकारण्यामध्ये श्रम सारखेच.

परधर्मावरहि श्रद्धाच ठेवावी लागते व स्वधर्मावरहि श्रद्धाच ठेवावी लागते. मग स्वधर्मावरच कां ठेवूं नये?

परधर्मावर श्रद्धा ठेवतांना कोणते श्रम कमी पडतात? अर्जुन म्हणतो, देवा! हा माझा क्षत्रिय धर्म मला मुळीच आवडत नाही. याच्यापेक्षा भिक्षा मागणें बरें वाटतें. कारण.

**गुरूनहत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।**
**हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुंजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥२.५**

या युद्धामध्ये मोठे मोठे पुरुष आले आहेत. कित्येक माझे वडील आहे. कित्येक भीष्मासारखे व द्रोणासारखे महात्मे आहेत. या सर्वांचा फडशा पाडून राज्य मिळविण्यांत कार्य पुरुषार्थ आहे? पुनः या महात्म्यांची आपण पूजा करावी की यांना मारावें?

**कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।**
**यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥२.७**

यावर देव कांही बोलले नाही. अर्जुनाला वाटलें, की इतके चांगले बोललो, माझे म्हणणे धर्माला धरून आहे. आपल्या वडिलांना मारणें कांही चांगले नाही असें मी म्हणतो. याच्यांत मी काय वाईट म्हणतो? तरी पण देव कां बोलत नाहीत?

अर्जुन म्हणतो, महाराज, माझ्या मनांत जें काही होतें तें मी सांगितले. पण हे कदाचित् चूक असेल. मला माझ्या कल्याणाचें काय आहे हें कदाचित् समजत नसेल. आपल्याला माझ्या कल्याणाचें काय वाटतें सांगा. मला कांही समजत नाही. मुलाला कितीहि वाटलें की माझें हित या खेळण्यांतच आहे तरी पण खरें हित आईलाच माहित असतें. देवांनी त्याला 'प्रथम युद्ध कर' म्हणून सांगितलें नाही, पण तो म्हणाला, की ''युद्ध करण्यापेक्षा भिक्षा मागणे बरे व भिक्षा मागणें कांही क्षत्रियाचा धर्म नव्हे.'' यांत तो स्वतःचा धर्म सोडून भलताच धर्म धरणार होता म्हणून त्याला स्वधर्म सांगितला. अर्जुनाच्या मिषानेच सर्वांना स्वधर्म पाळण्याविषयी



देवाने उपदेश केला.

## परधर्म कां नको ?

भगवान् म्हणाले, अर्जुना! तूं आपला धर्म सोडून देऊन भलताच धर्म धरतोस, हें चांगले नाही. कारण परधर्मात जास्त सुख आहे याबद्दल तुजजवळ काय पुरावा आहे?

उदा. एक पोटचा पुत्र आहे व दुसरा दत्तक पुत्र आहे. यापैकी कोणाचा भरवंसा जास्त राहील? औरसपुत्राचाच भरंवसा जास्त राहील, कारण दत्तकपुत्र जन्म देणाऱ्या आईबापाकडे वळण्याचा संभव आहे. येथे भरंवसा ठेवण्यामध्ये दोन्ही ठिकाणीं विश्वासच पुरावा आहे.

परधर्म कल्याणकारक आहे; येथे तरी तुझा विश्वासच आहे की नाही? याशिवाय दुसरें काय आहे? मग स्वधर्मविषयीच विश्वास का ठेवूं नये? अज्ञानी माणसांना श्रद्धाच उपयोगी पडते. दुसऱ्या धर्मावर तरी विश्वास ठेवणारच, मग का आपल्या धर्मावर ठेवू नये?

आपल्या येथली जर भाकरी खायाची आहे, तर दुसऱ्याच्या येथल्या भाकरीचा द्वेष करणार नाही, पण दुसऱ्याच्या येथली भाकरी खायाची असल्यास आपल्या येथली न आवडली पाहिजे. आपल्या येथल्या भाकरीचा द्वेष होतो. भगवान म्हणतात,

**ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।**
**सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः॥३.३२**

मी जो सर्वांचा पालनकर्ता, त्या माझे मतांचा द्वेष करतात ते नष्ट मूढ समज. याच्यावर तातहि असेंच म्हणतात,

**तरी लोकांची धवळारें । देखोनिया मनोहरें ।**
**असती आपुली तणारें । मोडावी केवी ॥ ज्ञानेश्वरी ॥**

भगवान् म्हणतात, अर्जुना! तुला कर्म काय व ज्ञान काय हें कांहीच समजत नाही. तुझ्यासारखें जे अज्ञानी आहेत त्याचा बुद्धिभेद करणें योग्य नाही. ते कर्मालाच अधिकारी आहेत. तुला विचार नाही.

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।**
**जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥३.२६**

ज्ञानी पुरुषांनी जसा अज्ञानी पुरुषांचा बुद्धिभेद करूं नये तसाच त्यांनीहि

कर्ममार्ग करून दाखवावा.

**सक्ताः कर्मण्याविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥३.२५**

अर्जुना, तूं कर्म कर पण फलाशा मात्र धरूं नको. कारण,

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥२.४७**

हें ऐकून अर्जुनाला बरें वाटलें व विचार केला की, आता आपल्याला कर्म करावयाला व फलाशा धरावयाला नको व आनंदित होऊन देवाला म्हणाला, देवा! मला कर्महि व फलाशाहि नको असतां मला तुम्ही कर्म कर म्हणून का सांगता?

**व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।**
**तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥३।२**

''एकदा सांगतां की कर्म कर व पुनः सांगतां की फलाशा धरूं नको. 'एक ना धड भाराभर चिंध्या' असें सांगू नका. एक निश्चयाने माझ्या कल्याणाचें कोणतें तें मला सांगा''.

देव म्हणाले, ''अर्जुना! तुला मोह होत असेल, कारण तूं अज्ञानी आहेस. पण ही दोन्ही मते माझीं आहेत.''

**लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा प्रोक्ता च मयानघ ।**
**ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥३.३**

## ज्ञानमार्ग व कर्ममार्ग

अर्जुना! ज्ञानमार्ग व कर्ममार्ग हे दोन्ही मीच सांगितलें आहेत. त्यांत विचारी मनुष्याला ज्ञानमार्ग श्रद्धावानाकरिता कर्ममार्ग.

परंतु पहिलें कर्म केल्यावाचून ज्ञानमार्ग उद्‌भूत होतच नाही. आपला धर्म करतांना फलाशा धरूं नको, पण परधर्म कर असें मी म्हणत नाही; कारण स्वधर्म आचरतांना व परधर्म आचरतांना दोन्ही वेळेला फलाशा नकोच. मग स्वधर्मच कां करूं नये? अर्जुन म्हणाला, 'परधर्म तरी करतो म्हणून कोठे म्हणतो, मला दोन्ही नको.''

देव म्हणाले, अर्जुना ! तूं मूर्ख आहेस. अरे, तुला एक क्षण तरी,

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्टत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ३.५**



मनाचा व्यापार बंद पाडून राहतां येतें कां? कोठे काड्याच मोडशील तर कोठे नखांनी मातीच उकरशील. कांही तरी करीतच बसशील. मग स्वतःचा धर्म कां करूं नये?

सत्पुरुष तोच जाणावा, मुनी तोच जाणावा, योगीहि तोच आहे, जो आपल्या बोलण्याप्रमाणे वागून दाखवितो.

पूर्वी जनकाप्रमाणे राजेदेखील कर्मानेच तरून गेलेत.

**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।**
**लोकसंग्रमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ॥३.२०**

एक पाय अग्नीत व एक पाय बाहेर असला तरी या जनक राजाला स्मृति राहात नसे व तोहि कर्म करीतच होता. कारण जसा तो मुक्त झाला होता, तशीं त्याच्या राज्यांतील मनुष्यें झालीं नव्हती.

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥३.२१**

अर्जुना ! मोठे लोक जसें आचरण करतात तसेंच लोकहि वागतात. मजकडेच पहा.

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानावाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥३.२२**
**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥३.२३**

मला कर्म करून काय करावयाचें आहे, पण मी जर तसें न केलें तर इतर लोकांना मार्ग कसा लागावा? कित्येक लोक श्रीकृष्णावर मुळीच धर्म पाळला नाही असा आरोप करतात. पण त्याचें मागे खंडण केलेंच आहे व गीतेंत त्यांनी कोठेच परस्त्रीगमन सांगितलें नाही.

## आत्मा = कृष्ण व वृत्ती = गोपिका रूपकाचे खंडन

याच ठिकाणीं देव उपमानप्रमाणाचें खंडण करतात. ते म्हणतात, कित्येक आत्मा श्रीकृष्ण व वृत्ति गोपिका असें रूपक करतात. देव म्हणतात, असें रूपक करून भलतेंच करूं नये. उपमा घेऊन आपला धर्म सोडून देणें चांगलें नाही. कारण असा एक श्लोक आहे, **''ज्ञानामृतं भोजनं''** मग अन्नच कशाला पाहिजें? मी

चांगलें आचरण केलें नाही, तर लोकहि तसेंच करूं लागतील. हे सर्व लोक माझ्या स्वाधीन आहेत.

**उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।**
**संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ।।३.२४**

मीच आपला धर्म बुडविण्याला कर्म करतो असें होईल, आपल्या हाताने लावलेलें झाड आपणाच कसें उपडून टाकावें? म्हणून,

**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्ताश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ।।३.२५**

जसा मूर्ख धर्म आचरण करतात त्याचप्रमाणे ज्ञानी लोकांनी धर्म आचरण करावा. पण मूर्ख जसा आसक्त असतो, तसा आसक्त मात्र राहूं नयें. व दुसरा मनुष्य मारतो व आईहि मारते, पण आईचें मारणें कल्याणाकरता असतें व दुसऱ्याचें मारणें द्वेषामुळे असतें. सुंदरदास म्हणतात. . . . . धर्म दोघांनीहि सारखाच आचरण करावा, पण ज्ञानी पुरुषाने आसक्त राहूं नये. अर्जुना ! तुला जर लोकांत राहावयाचें आहे तर तुला कर्म केलेंच पाहिजे.

### व्यासांची कथा

एकदां सर्व ऋषी मिळून व्यासांकडे गेले व त्यांना विचारलें, महाराज, खरें काय आहे? तेव्हा हें एकून ते नदीवर स्नानाला गेलेत. त्याबरोबर ऋषीहि गेलेत. श्रीव्यासांनी एक बुडी मारली व म्हणाले, ''स्त्रियांनो तुम्ही धन्यं आहां !'' दुसरी बुडी मारली व वर येऊन म्हणाले, ''हे कली ! तूं धन्य आहेस.''

### पतीसेवा

स्त्रियांना धन्य म्हणण्याचें कारण असें की, त्यांच्यामागे पतीसेवा हा एकच धर्म आहे, व पुरुषाच्यामागे अनेक धर्म आहेत. कलीला धन्य म्हणण्याचें कारण असें की, कलीयुगांत थोडक्या कालांत धर्मानें मनुष्य पावन होतो. देव म्हणतात, अर्जुना स्त्रियांना पतिसेवा हाच धर्म श्रेष्ठ आहे.

**दुःशिलो दुर्भगो वृद्धो जडो रोगी अधनोऽपि वा ।**
**पतिः स्त्रिभिर्नहातव्यो लोकेप्सुभिरपातकी ।। भागवत.**

पति कसाहि असला तरी स्त्रियांनी त्याला सोडूं नये, पण पातकी म्हणजे १- मद्यपान करणारा, २- मांसभक्षक, ३- गुरुस्त्रीगामी, ४- सद्धनन करणारा, ५- विश्वासघातकी असला तर मात्र सोडावा.



पातकी नसला तर तो ईश्वर समजावा. पूर्वोक्त पातक करून पश्चातापाने सर्व सोडून दिल्यास पुनः त्याच ठिकाणीं परमेश्वर भावना ठेवावी.

मागे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलें की, अर्जुना ! जे कोणी माझें मत ऐकणार नाहीत ते मूढ, नष्ट समज.

यावर अर्जुनाने प्रश्न केला की, देवा ! तूं निग्रहानुग्रह समर्थ आहेस. माझें मताप्रमाणे जे करतील ते मजप्रत पावतील. व जे त्याप्रमाणे वागणार नाहीत ते अधोगतीला जातील, हें सांगण्याचें कांही कारण नव्हतें. कारण तूं दंड किंवा कृपा करण्याला समर्थ आहेस. मग जबरदस्तीने त्यांच्या मनांत प्रवेश करून त्यांना आपल्याप्रमाणे करावयाला कां लावीत नाही?''

यावर भगवान म्हणतात,

**न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।। ५.१४**

''अर्जुना ! मी कोणाच्या क्रियेने बद्ध नाही. कर किंवा करूं नको, असें मी कोणालाच कांही म्हणत नाही, त्याच्या कर्माचें फळ मात्र देतो.''

ईश्वर जर नसला तर कर्माचे फळच मिळणार नाही, व आपल्यांत चैतन्यच राहणार नाही, व आपल्या कडून क्रियाहि घडणार नाहीत. सूर्योदय झाल्याबरोबर कोणी स्नान करतात, कोणी झोप घेतात, पण सूर्य कांहीच करीत नाही. त्यांना कर म्हणत नाही किंवा नको करूं म्हणत नाही. त्याचप्रमाणे चंद्रोदयाला कित्येकाला आनंद होतो व चोरांना त्रास होतो. तसा मी कोणाला कांहीच सांगत नाही.''

परमेश्वरच कांही न करतां लोकांचा उद्धार करील तर सृष्टि उत्पन्न करण्याची जरूर काय होती? उत्पन्न करून जेथल्या तेथेच त्यांचा उद्धार करावयाचा होता. भगवान म्हणतात, ''मी यांना मुक्त केलें असतें, पण काय करूं हें सर्व मिथ्या आहे. हे कांही सत्य नाही.

कल्पना कर - एका नदीच्या काठीं एक झाड आहे. त्या झाडावर कोणी गृहस्थ चढला व पाण्यांत त्याने आपलें प्रतिबिंब पाहिलें व मी बुडालों म्हणून म्हणूं लागला तर त्याला काय करणार? त्याला एवढेंच सांगतां येईल की, 'बाबा तूं बुडाला नाहीस. तें तुझें प्रतिबिंब आहे. तें खोटें आहे.' त्याचें म्हणणें खरें मानून काढण्याचा प्रयत्न करणारा व तो मी बुडाला म्हणणारा दोघेहि मूर्ख होतील. त्याप्रमाणे मी जर ह्या मिथ्या जगांतून काढण्याचा प्रयत्न करीन तर त्यांच्यासारखाच मूर्ख होईन. कारण मिथ्या प्रतिबिंबाची काय सुटका करणार? त्यांनी स्वतःच विवेक केला पाहिजे.

लोकांकरिता कायदे होतात पण ते कोणालाच 'असें वागा किंवा तसे वागा'

म्हणून कांहीच सांगत नाहीत. राजाप्रमाणे लोकहि स्वतंत्र आहेत. तसें नसतें तर कायद्याची जरूर नव्हती व चोरी कोणी केली नसती.

त्याप्रमाणे लोक जर सर्वस्वी परतंत्र असते तर ते जड झालें असते. त्यांचें ईश्वराचें ऐक्य झालें नसतें, कारण ईश्वर नियंता व चैतन्य झाला असता. चैतन्य म्हणजे ज्याला सर्व कळते तें. ज्याला कांहीच कळत नाही तें जड. व विरोधी पदार्थ विरोधींत मिळत नसतो. उदा. थंडी व उन. उन्हांत थंडी मिळत नाही. मुलावरही तुझी सत्ता आहे व भांड्यावरहि तुझी सत्ता आहे. भांडे जसें एका ठिकाणी ठेवलें तर तेथून पुनः उचलतपर्यंत दुसऱ्या ठिकाणी हालत नाही, पण मुलगा एका ठिकाणी ठेवला तरी त्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तो जातो. याचें कारण असें की, मुलाला कांही स्वतंत्रता आहे. त्याच्यात कांही तरी चैतन्य आहे. भांडयाप्रमाणे असतें तर प्रेतवत् जड झालें असतें. जीव चैतन्य आहे. जड असता तर ईश्वरांत मिळूं शकला नसता. मुलाप्रमाणे जीव चेतन व स्वतंत्र असल्यामुळे त्याने ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागून आपलें कल्याण करून घ्यावें. मुलगा चेतन आहे व तो आपल्या मनाप्रमाणे खेळतो व त्याप्रमाणे जीव स्वतंत्र आहे व चेतन आहे व तो जसें कर्म करील तसें त्याला फळ मिळते. कर्माबद्दल तो स्वतः जबाबदार आहे.

**नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।**
**अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ॥ ५.१५**

भगवान म्हणतात, अर्जुना ! मी जो परमात्मा आहे, तो कोणाला पुण्य देत नाही किंवा पाप देत नाही. हे लोक आपल्या अज्ञानाने बद्ध होऊन फेऱ्यांत पडतात व मजवर आरोप करतात. जीव कर्म करण्याला स्वतंत्र आहे, मात्र चांगलें करावें असे सांगणें माझें आहे. सांगून जर ऐकिलें नाही, तर मी काय करणार? मग त्याचें जसें कर्म असलें तसे फळ द्यावें लागतें. हे लोक जर जड व परतंत्र असते तर तसें केलें असतें, पण ते मजसारखेंच चेतन व कर्म करण्यांत स्वतंत्र असल्यामुळे मी तसें करूं शकत नाही. मी मात्र त्यांना चांगलें कर्म सांगतो. त्याप्रमाणे वागून त्यांनी आपलें कल्याण करून घ्यावें. तात म्हणतात,

**म्हणोनि इंद्रियें एकें । जाणतेनी पुरुखें ।**
**लाळावी ना कौतुकें । आदि करूनी ॥३॥ २.२०**

धर्म किंवा अधर्म करण्याची जबाबदारी पमेश्वरावर नाही. त्यानेच आपल्या स्वतःच्या प्रयत्नाने इंद्रियें रोधून माझे आज्ञेप्रमाणे वागावें. परधर्म स्वीकारूं नये. जाणत्या पुरुषांनी धर्माचा त्याग करूं नये.

आता असें कोणी म्हणतील की, यज्ञपत्न्यांनी आपल्या पतीच्या आज्ञेविरूद्ध



श्रीकृष्णाला कसें अन्न नेऊन दिलें? यज्ञपत्न्यांनी श्रीकृष्णाला जें अन्न नेऊन दिलें त्याचा अर्थ निराळा आहे. भागवतांत असें सांगितलें आहे की एकदां यज्ञ करण्याला लागले की, मुंगीपासून ब्रह्मदेवापासून कोणीहि जरी आला तरी त्याला अन्न द्यावें व स्त्रीचा धर्म असा आहे की, पतीचें उणें पडल्यास तिनें तें पूर्ण करावे. त्यांनी अन्न दिलें नसतें तर यज्ञभंग झाला असता. श्रीकृष्णाकडे गेल्यावर श्रीकृष्णाने पुनः त्यांना परत पाठवून दिलें. पति सोडून देण्याला सांगितलें नाही. म्हणून अधर्म झाला नाही.

## श्रीनारदांची कथा

अशी एक कथा आहे. भगवान श्रीनारद हे पूर्ण ज्ञानी व ईश्वरभक्त आहेत. हे कधीच खोटे बोलत नसल्यामुळे त्यांचा देवांत व दैत्यांत सारखाच मान आहे. व खरें बोलण्यामुळे यांच्यावर कळी लावतात असा आरोप आहे. दैत्यांचाहि यांच्यावर सारखाच विश्वास आहे. यांचें गमन तिन्ही लोकांत आहे. हे फिरत फिरत दैत्याकडे जातात. दैत्य यांना यथोचित आदर करून हात जोडून विचारतात की, 'महाराज! आपलें कोठून येणें झालें?'

यांना खरें बोलावयाचें. यांनी सांगावयाचे की, 'मी इंद्राकडून आलो'

दैत्यांनी विचारायाचे की, 'तिकडे कसें काय चाललें आहे?'

यांनी मग जसें असलें तसे सांगावयाचें. 'इंद्र तुला मारण्याच्या खटपटींत आहे'.

दैत्याने विचारावें 'मग महाराज मी कसें करूं?'

श्रीनारदांनी सांगावयाचें की 'तूं तप कर म्हणजे इंद्राला जिंकशील.'

पुढे इंद्राकडे जावयाचें व त्याने विचारलें की, 'महाराज! आपलें कोठून येणें झाले?'

नारदाने सांगावें की, 'इंद्रा ! मी आताच त्या दैत्याकडून आलों.'

इंद्राने पुनः विचारावे की, 'महाराज, मग कसें काय झालें?'

यांनी सांगावयाचें की, 'मला त्यांनी विचारलें की, भगवान आपलें कोठून येणें झालें ? मी सांगितलें की, इंद्राकडून आलो, तेथे तुला मारण्याची खटपट चालली आहे. त्याने विचारलें की, मी कसें करूं. मी सांगितलें की, तूं तप कर म्हणजे इंद्राला जिंकशील.'

इंद्राने विचारलें की 'महाराज मी कसें करूं?'

त्याला सांगावयाचें की, 'तूं त्या अमक्याला साह्याला बोलाव म्हणजे तुझें कल्याण होईल.'

असें जरी करत असत तरी त्यांना म्हणण्याची कोणाची छाती नसे.

सज्ज्न आपल्या कर्मानेच तरतात व दुर्जन आपल्या कर्मानेच नाश पावतात. यांच्या समोर दुष्टांचें कांहीच चालत नाही.

**दुर्जनावर आचरणाचा दाब पडतो. सदाचरणच जगाला चांगल्या मार्गाला लावण्याच्या उपयोगी पडतें.**

भगवान श्रीनारद हे बाल ब्रह्मचारी आहेत. त्यांच्या मनांत एकदा आलें की, आपण लग्न करावें. असा विचार करून द्वारकेंत श्रीकृष्णाकडे आले. आल्याबरोबर श्रीकृष्णाने बसायला आसन दिलें, व यथोचित साष्टांग नमस्कार व पूजा करून विचारलें,

'महाराज ! कशी काय आज्ञा आहे?'

नारदांनी सांगितलें, 'देवा! मी लहानपणापासून ब्रह्मचारी आहे. गृहस्थांश्रमांतले सुख मला कांहीच माहीत नाही. मला आता गृहस्थाश्रम करावासा वाटतो. आपल्यापाशीं १६००० बायका आहेत. इतक्यांचे तुम्ही काय करतां? मला एखादी द्या.'

श्रीकृष्णाने सांगितलें 'मी ज्या घरांत नसेन तेथली स्त्री आपण न्यावी.'

आता प्रभु श्रीकृष्णाचें सामर्थ्य नारदांना माहीत होतें. पण यत्किंचित् वासनेमुळे त्यांना मोह पडला. प्रत्येक वस्तु ब्रह्मरूप आहे. आपणच आपल्या वासनेने खांब, घर इत्यादि रूपाने पाहतो. नारदांची परमेश्वराचे ठिकाणी मनुष्यभावना दृढ झाली. पुढे नारद प्रत्येक घरी जाऊन पाहूं लागलें. पण जेथे त्यांनी जावें तेथे तेथे श्रीकृष्ण आहेच. कोठे श्रीकृष्ण वेणी घालून राहिलेत, कोठे हात धूतात, कोठे जेवतात, कोठे कांही करून राहिले असें दिसलें. सर्व घरें धुंडून पाहिलीं पण एकहि घर रिकामें नव्हतें. जेथे तेथे श्रीकृष्ण आहेच. दोन तीनदां एक एक घर पाहिलें पण श्रीकृष्णाशिवाय घर सापडलें नाही.

प्रत्येक स्त्रीच्या भावनेने त्यांची त्यांची स्वतंत्र मूर्ति बनली होती. श्रीकृष्ण पूर्णयोगी होते. व एकपत्नी व पूर्ण धर्मनिष्ठ होते. एका एका स्त्रीची श्रीकृष्ण मूर्ति स्वतंत्र निराळी असल्यामुळे श्रीकृष्णाने अनेक स्त्रिया भोगल्या हा आरोप सहजच नाहीसा होतो. श्रीकृष्णावाचून जेव्हा एकहि घर त्यांना मिळालें नाही तेव्हा नारद थकले व विचार करूं लागले की, 'श्रीकृष्णानें हें सर्व व्यापून टाकलें आहे. हें जगच सर्व परमेश्वररूप आहे. मी व्यर्थ भ्रमांत पडलों होतो.' असा पश्चाताप होऊन ते नदीवर स्नानाकरिता गेले.

**परमेश्वर, थोडा पश्चातप झाला की शिक्षा देतो.**

**ज्याला पश्चातापच होत नाही, त्याला परमेश्वर यमाच्या हाती देतो.**

**थोडा पश्चाताप झाला की, त्याला थोडी शिक्षा देऊन चांगली गति देतो.**



नारदांना वाटलें की, ज्या प्रभूला आपण आपले विषय अर्पण करावे त्यांच्यापासून मी विषय मागून घ्यायला प्रवृत्त झालों. स्नान करण्याला पाण्यांत गेलेंत व बुडी मारली. बुडी मारून बाहेर येतात तोंच नारदाचें स्त्रीरूप झालें. हें पाहून त्यांना लज्ज्ञा वाटली. तेथे फिरत फिरत एक गंधर्व आला. त्याला पाहून नारद लाजूं लागले. गंधर्वाने विचारलें ''तूं कोण आहेत?''

नारद खोटें बोललें व सांगितलें की, ''मी गंधर्वकन्या आहे.''

गंधर्वाने तिच्याशी विवाह केला, व त्यापासून तिला पुढे पुष्कळ संतती झाली. नारदाला फार त्रास होऊं लागला. नंतर नदींत बुडी मारली व बाहेर आले व पाहतात तो पुनः पूर्ववत् मनुष्य देह त्यांना दिसला. स्नान करून श्रीकृष्णाकडे गेले व साष्टांग नमस्कार केला.

## धर्मानुष्टान

धर्मात्याग करून परमेश्वर भक्तांना क्षमा करीत नाही. अग्नि आहे व तो कितीहि प्रिय झाला तरी तो उशाशी ठेवण्याच्या कामाचा नाही. दूध चांगलें असलें तरी तें सर्पाला दिल्यास विषच होतें. तसें इंद्रियांना लाडवूं नये. त्यापासून काम, क्रोध जास्त वाढतात.

इंद्रियांना धर्मावाचून दंड होत नाही. म्हणून सत्पुरुष धर्मानुष्ठान सांगतात. त्यावर अर्जुनाने विचारलें. देवा,

**अथ केन प्रयुक्तोयं पापं चरति पुरुषः।**
**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥३.३६**

आपण जर ज्याचें जसें कर्म असेल तसें फळ देता. तात म्हणतात,

**तैसा समस्ता या भजना । मी साक्षीभूत पै अर्जुना ।**
**येथ प्रतिफळें भावना । आपुलाली ॥ ज्ञाने.४.७६**

दुख आपणाला व्हावें असें कोणालाच वाटत नसतें. लोकांची पाप करण्याची तर प्रवृत्ति नसते. पण मग जबरदस्तीने कोण यांना अधर्माकडे प्रवृत्त करतो. भगवान म्हणतात, काम एष, क्रोध एष रजो गुण समुद्भवः। रजोगुणापासून उत्पन्न झालेलें 'काम म्हणजे विषयप्रीति' व 'क्रोध म्हणजे न आवडणें', हे दोन मनुष्याचे शत्रु आहेत. लोक यांच्या तडाख्यांत सापडून परधर्माचा स्वीकार करतात म्हणून तूं या कामक्रोधाचा जय कर. आता तो जय कसा करावयाचा हें पुढे सांगीन.

**काम एष क्रोध एष रजोगुणासमुद्भवः ।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३.३७**

न आवडणें व आवडणें हे दोन्ही रजोगुणाचेच धर्म आहेत.

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ।**
**तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनाम् ॥ १४.७**

मला अमुक पाहिजे ही इच्छा करणें रजोगुणाचें लक्षण आहे.

भगवान म्हणतात, अर्जुना ! माझ्या मताप्रमाणे न वागूं देण्याला काम क्रोध हे दोनच शत्रु आहेत. काम म्हणजे विषयप्रीति, ईश्वरप्रीति नाही. या गुणांचे लोक असुर समजावेत. देवांनी लोकांचे दोन भाग केलेत.

१ दैवी संपत्तीचे लोक -

**द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन् दैव आसुर एव च ॥१६।६ (१)**
**दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ॥१६.५ (१)**

व २ दुसरे आसुरी संपत्तीचे लोक. आसुरी स्वभावाचे लोकापाशीं हें काम क्रोध जास्त प्रमाणाने असतात. या लोकांना,

**असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।**
**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥१६.८**

हे आसुर स्वभावाचे लोक नेहमी खोटें बोलतात. भक्ति किंवा स्वधर्म त्यांना कधीच माहीत नसतो.

**ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी ॥**१६.१४(२)
**आढ्योऽभिजानवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ॥**१६.१५(१)

ते समजतात की मीच ईश्वर आहे. मी मोठा भोगी आहे. मी सत्पुरुष आहे.मी बलवान, मी सुखी, पुष्कळ लोकांत माझा मान आहे.

**यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ।**

सर्वावर मीच दया करणारा आहे. मीच समर्थ आहे. हे सर्व अज्ञानाने मोहित होऊन आपल्यालाच सर्व मानीत असतात. ज्याचें चित्त घटकाभर देखील स्वस्थ होत नाही, नेहमी मोहांत गुंतून राहतात ते नर्कात जातात.

**एतान् दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोल्पबुद्धयः ।**
**प्रभवन्त्युग्रकर्माणि क्षयाय जगतोऽहितः ॥१६.९**



मी पूर्ण परमेश्वर आहे, अशा प्रकारची दृष्टि धारण करून आपणच आपला नाश करून घेतात. कर्म चांगलें आहे किंवा वाईट आहे हें कांही पाहात नाहीत. बरें अशी ईश्वर दृष्टि घेतली तर परमेश्वराचें काम धर्म स्थापन करणें, साधूंचें रक्षण करणें हें ते करीत नाहीत.

**परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।**
**धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ४.८**

परमात्मा म्हणतात माझा जन्म फुकट होत नाही. १- साधूंचें रक्षण व २- दुष्टांचा नाश व ३- ज्याचा जो धर्म असेल तो त्याला शिकवावयाचा इतक्या कामाकरिता मी अवतार घेतो. पण हे असुरलोक माझे धर्म घेतात. पण धर्म स्थापन करणें वगैरे कांही करीत नाहीत. त्यांना आत्मज्ञानाची चाड नसते. वाटेल तसें वागतात. ईश्वराचा अवतार - धर्म स्थापन व सज्जन रक्षणाकरिता आहे, तर यांचा अवतार– जगाचा नाश व धर्माचा उच्छेद करणयाकरिता असतो.

**आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ।**
**यजन्ते नामयज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम् ॥**
**अहंकारं बलं दर्पं काम क्रोधं च संश्रिताः ।**
**मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥१६.१८**

हें आसुर नाममात्र यज्ञ करतात. विधिपूर्वक करावा वगैरे कांही नाही. नामापराध न पाहतां नामच सर्व कांही आपलें कल्याण करणार आहे असें समजून नामस्मरण करतात. त्या दश अपराधामध्ये धर्म सोडून देऊन वाटेल तसें नामस्मरण करणें हा अपराध आहे.

**तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्त्रामशुभां आसुरीष्वेवयोनिषु ॥१६.१९**

या दुष्टांना धनाचा मद असतो. मीच एक संभावित आहो असें तें मानतात. अहंकार, कामक्रोध हे यांच्या अंगीं पूर्ण बाणलेले असतात. व मी जो सर्वांच्या देहांत राहणारा त्या माझा द्वेष करतात. यांच्या अंगी माणूसपणा मुळीच नसतो. संसारचे ठिकाणीं अगदी आसक्त ब्रह्मज्ञान नुसतें तोंडाने सांगणारे असे हे आसुर स्वभावाचे लोक असतात. नेहमी धर्माच्या विरुद्ध वागतात, या लोकांना मी वाईट योनींत घालतो. आपल्या त्याच समजुती दृढ करून घेतात व जन्म जन्म पुढे अधोगतीलाच जातात. त्यांना माझी प्राप्ति कधीच होत नाही. यांना चांगलें सांगावें तर हें म्हणतात

की, 'नको, आम्ही नर्कांतच जाऊं.' यांना पुढचें स्वप्न पडतें की काय कोण जाणे, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना नर्कच मिळतो. यांना माझी प्राप्ती कशी व्हावी? कारण,

**अपहाय निजं कर्म कृष्ण कृष्णेति वादिनः ।**
**ते हरेर्द्वेषिणः पापा धर्मार्थं जन्मयद्धरेः ॥**

वेदाने सांगितलेलें आपलें स्वतःचें कर्म टाकून देऊन तोंडाने नुसते कृष्ण-कृष्ण म्हणणारे भगवंताचा द्वेष करणारे आहेत.कारण भगवंतच धर्मार्थ अवतार घेत असतो. मग त्याला धर्माचा त्याग करणारा पुरुष कसा प्रिय होईल ? जे कर्म नको म्हणतात त्यांना देवाने आसुर कोटींत घातलें व जे म्हणतात की, आम्हांला कर्महि नको व फळहि नको ते लोक तामसीच असतात. यमदंड दिसेपर्यंत ह्या त्यांच्या गोष्टी असतात. पण एकदा यमदंड दिसला म्हणजे मग मात्र त्यांना पश्चात्ताप होतो. मी ईश्वर म्हणणारा नीच योनींत जातो हें पाहून अर्जुन भ्याला व म्हणाला, देवा! मग मी ब्रह्म आहे असें जे वेदांतांत आहे, तें कसें ? भगवान म्हणाले, पार्था, तूं भिऊं नकोस ! तूं सात्त्विक (दैविक) संपत्तीचा मनुष्य आहेस, हे आसुर संपत्तीचे लोक,

**मत्कथाः पुण्यरूपिण्याः सगुणध्यानगोचराः ।**
**रूपकेणैव युंजन्ति शरीरेऽस्मिनबुद्धयः ॥**

याप्रमाणे वागून आपलें चित्त शुद्ध न करतां माझ्या ज्या पुण्यकारक कथा आहेत, माझ्या रामकृष्णादि अवतारांतील ज्या कथा आहेत, त्यांचा आपल्या स्वतःस ईश्वर समजून स्वतःवर आरोप करतात व त्याप्रमाणे वागतात. हे गुण तुझ्या ठिकाणीं नाहीत. तुला भिण्याचें कांहीच कारण नाही. 'मी ब्रह्म आहे.' हा जो महावाक्याने बोध होतो तो धर्माच्या योगाने चित्तशुद्धि झाल्यावर होतो म्हणून तेथे प्रत्यवाय नाही. चित्तशुद्धि न होतां मी ईश्वर आहे म्हणून आपले विषय वाढविल्याने पतन आहे. अर्जुन म्हणाला देवा! आम्ही तर पडलो अज्ञानी, हे धर्म आम्हांला कसें समजावें. भगवान म्हणतात,

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्र विधानोक्तं कर्मकर्तुमिहार्हसि ॥१६.२४**

अर्जुना ! तूं कोणाच्या सांगण्यावर विश्वास ठेवूं नको. शास्त्रांत जें सांगितलें असेल, तें प्रमाण मानून त्याप्रमाणे वाग. कारण शास्त्र कोणी केलें नाहीत ते माझ्यापासून निघाले आहेत.

**सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ॥**



**वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ॥१५.१५**

भगवान म्हणतात, मी सर्वांच्या हृदयांत आहे. मी वेदाने जाणला जातो. वेदाचा उत्पादक मीच आहो. भलभलतीं मतें सोडून दे व वेदमार्गाने चाल म्हणजे तुला भीति नाही, कामक्रोध हे आपल्याला आसुरांमध्ये टाकतात. एखादी वस्तू तूं कोठे ठेवली व आठवण विसरलास तर ज्याला माहित आहे त्याला विचारशील किंवा नाही, त्याप्रमाणे आपलें हें अगाध ज्ञान कामक्रोधाने झाकून टाकलें आहे.

**धूमेनाव्रियते वन्हिर्यथादर्शो मलेन च ।**
**यथोल्बेनाऽऽवृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३.३८**

### खरी शांती

एखाद्या वेळेला आपल्याला वाटतें की, आपल्याला क्रोध नाही, काम नाही, पण ज्याप्रमाणे एखाद्याला जास्त तिखट खाण्याची संवय झाली म्हणजे त्याला वाटतें की, मी कांही फार तिखट खात नाही, पण खाण्याची संवय नसली म्हणजे तेंच तिखट जास्त वाटते. त्याप्रमाणे अविचारी मनुष्याला आपले दोष दिसत नाहीत. व केव्हा केव्हा आपल्याला क्रोध आला तरी तो दाबून टाकतो व शांति धरतो. अशा शान्तीचा एकनाथ महाराजांनी निषेध केला आहे.

**अंतरीं शुद्ध नाही बोधू । दांत खावोनि साहे द्वंद्वू ॥**
**ते शांती नव्हे शुद्धू । एक विनोदू क्षमेचा ॥**

क्रोध व कामाचा उपयोग निराळा आहे. क्रोधाचा उपयोग अधर्म नाहीसा करून धर्म स्थापन करण्यात करावा. ''अपराध दिसूनहि तो न सुधरविता शांत राहणें ही कांही शांतता नव्हे.'' एकनाथ महाराज म्हणतात, 'अंतरीं ठसावलें परब्रह्म ।' अंतरामध्ये पूर्णज्ञान व बाहेर समता असणें याला शांति म्हणतात.

### समता

समता म्हणजे कांही ब्राह्मण व महार एकच जाणणें हें नाही.

**कां समतेचेनी कलकलाटे । जाणीवपणे बळेंचि भ्रष्टें ।**
**तें साम्य नोहें गोमटें । आसुरत्व नेटे अनुवादू ॥**

अशी समता असुरामध्ये फार असते. विष जें असतें तें जरी मारक आहे तरी वैद्याच्या हातीं गेलें असतां तें हितकर होते, मूर्खांच्या हातीं गेलें असताच मारक होतें. अन्नहि चांगलें आहे पण फार खाल्लें तर अजीर्ण होतें. त्याप्रमाणे शान्ति व समता हें गुण चांगलें आहेत. पण धर्माच्या विरुद्ध असल्यास त्यांचा फार भयंकर परिणाम होतो. समता म्हणजे सर्व वस्तूंच्या ठिकाणीं परमेश्वर एकच आहे असें

समजणें; पण भेद मोडून टाकूं नयें.

भिंत व चूल दोन्ही मातीच्याच वस्तू आहेत पण भिंतीवर स्वयंपाक होऊं शकत नाही. कार्यदृष्टीने भेद व कारण दृष्टीने अभेद समजावा. बुगडी, बाळी, सरी, सर्व सोन्याचेच अलंकार आहेत, पण बाळी बुगडी कानांत घालतात, पण सरी गळ्यांत घालतात. या सर्व वस्तू ज्यापासून झाल्या त्याचें कारण एक पण कार्यात भेद असतो. तो भेद मोडून टाकणें चांगलें नाही. शरीर व भिंत एक, मग भिंतीला कां खावूं घालूं नयें? कार्यदृष्टीने भेद न मानला तर भलताच परिणाम होतो. अभेदच आहे तर मग गोटे मातीं कां खावूं नये ?

अभेद मानणारे लोक भलतेंच मानूं लागतात. आपल्याला ईश्वर मानून धर्माच्या विरुद्ध वागतात. गर्भ जसा जाळेने झाकला असतो, तसें आपलें ज्ञान, कामक्रोधरूपी धुपटाने झाकलें आहे. हे कामक्रोध वैरी आहेत. यांचा नाश कर. नाश करण्याचा उपाय तुला पुढे सांगीन.

नंतर परमात्मा म्हणाले, आपलें कर्म सोडून देऊन नुसतें नामस्मरण करतात ते हरीचे द्वेष्टे समजावेत. प्रभूचा अवतार देखील धर्मस्थापन करण्याकरताच असतो.

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।।१८.४६**

स्वधर्माचा परित्याग करून नुसत्या भक्तीने मी प्रसन्न होत नाही. आपल्या बुद्धीचें ठिकाणीं तीन दोष असतात. उदा. गहूं आहे. तें पहिलें आपण निवडतो. पुढे दळतो व मग त्याच्या पोळ्या करतो. त्याप्रमाणे बुद्धीचें ठिकाणीं तीन दोष असतात. १.मल २.विक्षेप ३. आवरण. वेदांत डिंडिमकार म्हणतात,

**कर्माणि चित्तशुद्ध्यर्थं ऐकाग्र्यार्थम् उपासना - इति वेदांत डिंडिमः ।।**

मल म्हणजे धर्माविरुद्ध वागण्याची इच्छा. विक्षेप म्हणजे धर्माप्रमाणे वागून चित्त स्थिर नसणें. हें करूं की तें करूं असें वाटणें. आवरण म्हणजे मी कोण आहे हें न कळणें. दोष म्हणजे पडदे.

ह्यापैकी मल दोष स्वतःशिवाय दूर होत नाही. हा दोष आहे तोपर्यंत ज्ञान होत नाही. हा धर्माचरणाने दूर होतो.

**विक्षेप** ईश्वरउपासनेने दूर होतो.

**आवरण** ज्ञानाने नाहीसें होतें.

जोपर्यंत एक दोष नाहीसा होत नाही तोपर्यंत पुढचा दोष नाहीसा करण्याची खटपट करूं नये.



लहान मुलाला पुरणाची पोळी आवडते म्हणून त्याला खावूं घालणें इष्ट नाही, कारण कृमी होण्याची भीति असते. जोपर्यंत आपलें हित कशांत आहे हे समजलें नाही तोपर्यंत ज्ञान किंवा उपासना करणें व्यर्थ व घातुक आहे. तुझा धर्म असा आहे -

## स्त्रियांचा मुख्य धर्म

**भर्तुः शुश्रूषणं स्त्रीणां परो धर्मो ह्यमायया ।**
**तद्बंधूनांच कल्याणः प्रजानां चानुपोषणम् ।।**

पतीची ईश्वरभावनेने सेवा करणें हाच स्त्रियांचा मुख्य धर्म आहे. माझ्या प्राप्तीसाठी हे लोक खटपट करतात पण येथे चुकतात.

एका बाईने आपल्या गळ्यांत नथ अडकवून घेतली व आठवण न राहिल्यामुळे ज्याला त्याला विचारावयाला लागली. एका गृहस्थाने तिला आरसा दाखविला, त्यांत तिने आपल्या गळ्यांत नथ पाहिली.

भगवान म्हणतात, हे लोक आपलें घरचे रत्न विसरतात व आपला धर्म सोडून देऊन, आपल्या पतीची सेवा करणे सोडून देऊन दुसऱ्याच ठिकाणी उपासना करतात. पती सोडून इतर ठिकाणी ईश्वरभावना करणें म्हणजे पतीचें ठिकाणी ईश्वर नाही असें कबूल करण्यासारखेंच आहे. स्त्रीला जसा पती, तसे मुलाला आईबाप आहेत. सर्व व्यापक परमेश्वराला, आपण एके ठिकाणी आहे व दुसऱ्या ठिकाणी नाही म्हणणे म्हणजे मुद्दाम अद्वैत सोडून द्वैत स्वीकारणें होय. परमेश्वराने ज्याला त्याला असा धर्म लावून दिला की, प्रत्येकाला ईश्वर जवळ सापडावा.

## आईबापांची सेवा

पुष्कळ मुलें म्हणतात की, 'आईबापांची सेवा कशाला करावी?'

त्यांना असे विचारावें की, आईबापाने तुम्हाला बाळपणीं पोसलेंच नसतें तर ईश्वरभक्ति करण्याकरिता देह कोठून आला असता? तुम्हा स्त्रियाचेंहि तसेंच. नवऱ्याने पोसलें नाही तर ईश्वरभक्ति करण्याकरिता देह कसा राहिला असता? ईश्वर पोसतो म्हणणे चूक आहे. भगवान म्हणतात,

**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।। २.११**

जो ज्याप्रमाणे माझे भजन करील तसे त्याला फळ देतो पुनः नंदाला सांगितले,

**अस्तिचेदीश्वरः कश्चित्फलरूप्यन्यकर्मणाम् ।**

**कर्तारं भजते सोऽपि न ह्यकर्तुः प्रभुर्हि सः ॥**

जो म्हणतो की 'ईश्वर पालन करतो' त्याला विचारावे की, 'कारे! ईश्वर कर्मावाचून पालन करतो की, कर्म पाहिजे? कर्मावाचून पालन करीत असेल तर मग एकाला कुत्रा, एकाला मनुष्य, एकाला गाढव असें निरनिराळ्या जन्मांत कां घालावें? असें आपल्या इच्छेने करील तर तो ईश्वर होणार नाही. कारण त्याचें ठिकाणीं समता राहणार नाही. तुला सांगितलें की, भालकाराचे मुलाला ठोक तर तूं तसें करणार नाहीस. कारण उगीच विनाकारण मारणें कोणालाच पसंत नाही.

परमेश्वर कर्माप्रमाणे फळ देतो हें मानणें चांगलें. ईश्वर सर्व करतो म्हणणारे आसूर आहेत. 'परमेश्वराने ज्याचा आपला संबंध लावून दिला, तो सोडून टाकणें' म्हणजे त्याची आज्ञा मोडणें आहे.

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकातरः ।**

**न स सिद्धिमवोप्नोति न सुखं न परां गतिम् ॥१६.२३**

शास्त्रधर्माचा परित्याग करून इच्छेप्रमाणे वागणाऱ्यांना धर्माची सिद्धि मिळत नाही. या विषयी श्रुतिहि आहे. **'यो ह वै . . . . . .**

### धर्माचे ३ भाग

शास्त्रांत सांगितलेल्या धर्माचे तीन भाग आहेत.

१ पाप निवृत्ति. २ चित्तशुद्धि. ३. लोकांचे कल्याण.

### स्व-धर्माशिवाय चित्तशुद्धि नाही

पतीला ईश्वर मानून त्याची सेवा केली म्हणजे पापनिवृत्ति होते. पति ईश्वर नाही असें वाटतें म्हणूनच धर्माविरुद्ध वागण्याची इच्छा होते.

दुसऱ्याचा धर्म पाळतांना आपल्या धर्मात दोष दिसून त्याचा द्वेष वाटतो व आपला धर्म निष्काम रीतीने आचरून त्यापासून जी आपली चित्तशुद्धि व्हावयाची, त्याच्याऐवजी आपले चित्त मलिन होतें. म्हणून आपल्या धर्माशिवाय चित्तशुद्धि होत नाही. आपल्याला ज्या गोष्टी पाहिजेत, त्या सर्व आपल्या धर्माने मिळतात.

या पतिव्रताधर्मापासून मोठ्या मोठ्या सिद्धि प्राप्त होतात. पतीला सोडून तुम्हाला कोणत्याच व्रतादिकांची जरूरी नाही.

### अनुसूयेची कथा : मनाची संकल्पशक्ती

याविषयी अनुसूयेची कथा आहे. भगवती अनुसूयेसारखी पतिव्रता कोठेच नव्हती. पतीहून इतरांना- वडील किंवा आपली लेकरे समजावे, असा पतिव्रतेचा धर्म आहे. त्याप्रमाणे भगवती अनुसूया सर्वांना पुत्र मानीत असे. आपले मन ज्या ज्या



पदार्थाविषयी तीव्र संकल्प करतें तो तो पदार्थ आपल्याला स्थूल दृष्टीने दिसतो.

जास्त भीति वाटली तर एकदम घाम येतो. हा घाम काय आहे? एक शरीरांतला पदार्थ आहे. तसा मन कांही शरीरांतला पदार्थ नाही. कारण, असतां तर मांसाप्रमाणे दिसतां. ढेकूण आपल्याला चावतें. तें मनाशिवाय कसे चावूं शकतें? पण त्यालाहि मारलें तरी त्याचें रक्त सापडेल पण मन दिसत नाही. आपण निजतो तेव्हा आपल्याला इकडची स्मृति नसते. स्वप्नांत तू माहेर पाहतेस, मनाने तेथे जातेस. मन जर शरीराचा भाग असतां तर तें कसे जाऊ शकले असते. म्हणून मन शरीराहून निराळें आहे. आपण स्वप्नांत जेवतो असें दिसतें. आपलें शरीर येथेच असते.

म्हणून शरीराचा भाग मन नव्हे. जरी मन शरीराहून निराळे आहे तरी ते जेव्हा तीव्र होतें तेव्हा तेच शरीररूप होते.

अंगाला टोचलें तर अंगावर टोचण्याची खूण दिसते पण भीति वाटली तर भीति दिसत नाही. पण तिचा परिणाम शरीरावर होतो. स्वप्नांत लाडू खाल्ला तर तोंड गोड होत नाही. पण भीतीमुळे घाम येतो. लाडू खाण्याचा परिणाम शरीरावर होत नाही. याचे कारण असे की, मन ज्या गोष्टीविषयी तीव्र होते व त्याला जी गोष्ट सत्य वाटते, त्याच गोष्टीचा परिणाम लवकर होतो.

तूं रड बरें. जबरदस्तीने रडावयाला गेलो तर रडूं येत नाही. रडणें हा देखील मनाचाच धर्म आहे. रडतांना डोळ्यांत पाणी येतें. जी मानसिक गोष्ट तीव्र होते, त्याच गोष्टीचा परिणाम शरीरावर होतो. भगवती अनुसूयेने पतिव्यतिरिक्त इतर सर्वांना पुत्राप्रमाणे मानावें व ही तिची भावना फारच तीव्र झाली होती.

एकदा भगवान नारद फिरत फिरत भगवती अनुसूयेच्या आश्रमी आले. तिला पाहून फारच आनंद झाला. भगवतीने त्यांचा यथोचित आदर करून पूजा केली. नंतर श्रीनारदांनी सांगितलें ! ''भगवती अंबे ! धन्य आहेस! तुजसारखी पतिव्रता या तिन्ही लोकांत नाही,'' असे म्हणून ब्रह्मलोकाला निघून गेले.

तेथे ब्रह्मदेवाची स्त्री सावित्री बसली होती. नारद आले पाहून नमस्कार केला, विचारलें ! ''नारदा ! कोठून येणे झाले?''

नारद म्हणाले, ''आई ! मी फिरत फिरत भगवती अनुसूयेच्या आश्रमी गेलो होतो. भगवती अनुसूयेसारखी पतिव्रता या तिन्ही लोकांत दुर्लभ. आपली पतिव्रतेमध्ये ख्याति आहे पण तिच्याप्रमाणे आपणही नाही असें म्हणावें लागते.''

हें ऐकून सावित्रीला फार वाईट वाटलें व रागावून बसली. पुढे तेथून वैकुंठाला गेले. नारद आले पाहून लक्ष्मीने नमस्कार केला व विचारले, ''नारदा

! आपलें गमन सर्वत्र आहे. कोठे काय विलक्षण प्रकार घडला असेल तर सांगा.''

हे ऐकून नारद म्हणाले, ''आई ! मी भगवती अनुसूयेच्या आश्रमी गेलो होतो. तिला पाहून फार आनंद झाला. तिच्यासारखी पतिव्रता या तिन्ही लोकांत सापडणें दुर्लभ.'' हें ऐकून लक्ष्मीलाहि वाईट वाटलें व तीहि रागावून बसली.

येथलें काम झालें असें पाहून नारद कैलासाला गेले. भगवती उमा बसली होती. नारदांना पाहून नमस्कार केला व यथायोग्य पूजा करून विचारलें,

''नारदा ! कोठून आलां आपण ! सृष्टीत कांही विलक्षण प्रकार पाहण्यांत आला असल्यास सांगा.''

नारद म्हणाले, ''फिरत फिरत अनुसूयेच्या आश्रमीं गेलो. मी पुष्कळ पतिव्रता पाहिल्या पण भगवती अनुसूयेसारखी पतिव्रताच नाही.''

हें ऐकून उमेलाहि वाईट वाटलें. सायंकाळी ब्रह्मा, विष्णु, महेश्वर परत आल्यावर पाहूं लागले तर स्त्रिया सामोऱ्या आल्या नाहीत. त्यांना आश्चर्य वाटलें की, आज झालें कसें काय? यांना कसला राग आला? असें म्हणून स्त्रियेंकडे गेलेत. ब्रह्मदेव आंत जाऊन पाहतात तो सावित्री रागावून बसली आहे.विष्णू आंत जाऊन पाहतात तो लक्ष्मी रागावून बसली आहे. शंकर आंत जाऊन पाहतात तो उमा रागावून बसली आहे. पूर्वी एक मोठे घर असें त्यांत एक रागघर असें. राग आला की, त्यांत जाऊन बसावें. तिघांनीहि आपआपल्या स्त्रियांना रागाचें कारण विचारले. तेव्हा त्या म्हणाल्या ''आम्ही सांगतो तसे कराल काय?''

त्यांनी सांगितलें की, ''एकदा सांगा तर काय झालें तें?'' तेव्हा त्या स्त्रियांनी नारदाच्या येण्यापासून झालेले इत्यंभूत वर्तमान सांगितलें. ब्रह्मा, विष्णु, महेशांनी सांगितलें की खरें आहे. ती खरोखर महान पतिव्रता आहे. तिची तारीफ ऐकून तुम्हाला वाईट वाटलें, पण तुमची तारीफ ऐकून मात्र तिला वाईट वाटलें नसतें. स्त्रियांपाशीं त्यांची तारीफ न करता दुसऱ्या स्त्रीची तारीफ केली म्हणजे, त्यांना वाटतें की, आपल्या पतीला आपल्यापेक्षा दुसरी स्त्री आवडतें. त्यांनी पुष्कळ समजावून पाहिले पण न समजल्यामुळे स्त्रियेच्या स्वाधीन होऊन महासतीचा छळ करण्याकरिता निघाले.

विषयाच्या स्वाधीन होणारा विष्णु असो अगर कोणीहि असो तो श्वानापेक्षाहि नीच समाजावा. श्वानदेखील आपल्या वेळेवर विषय भोगतात. आपल्याला तर विषय सोडून एक घटकाभर देखील फुरसत नसते. मुलाचा सांभाळ करतो तो देखील म्हातारपणी त्याने सांभाळावे म्हणून. कुत्रा आला तर भाकर नेऊं देत नाही. काय म्हणून? आपल्या पोटाकडे लक्ष असतें म्हणून. विषयांच्या स्वाधीन होवून हा



सर्व संसार मानला आहे. ''पुष्कळांना खरें बोलणें आवडतें पण स्वतःच्या कामांत नाही.'' ब्रह्मा, विष्णु, महेश्वरांनी सृष्टीचें कार्य टाकून देऊन स्त्रियांच्या स्वाधीन होऊन भगवती अनुसूयेचा छळ करण्याकरिता निघाले.

दुसरी कथा - अशी एक आनंदमार्गात कथा आहे की एकदा ब्रह्मा, विष्णु, महेश्वर यांना गर्व झाला की, आमच्याशिवाय सृष्टि करणार कोणीच नाही. असे विचार करून निघाले. आता हे जरी ब्रह्मा, विष्णु, महेश्वर होते, तरी ते स्त्रियांच्या स्वाधीन होवून आपण उत्पन्न केलेल्या स्त्रियेवर धाड घालण्याकरिता निघाले. तात्पर्य विषयाच्या स्वाधीन होणारा कोणीहि झाला तरी नीचच समजावा.

पुढे ते एका आश्रमीं आले. त्या आश्रमी एक जनावर होते. ते नाकावर चालत असे. त्यांना हे पाहून आश्चर्य वाटले. त्या आश्रमांत एक पुरुष होता. तेव्हा शंकराने विचारले, 'हा प्राणी कोणी उत्पन्न केला?'

तेव्हा त्यांनी सांगितले की, 'या सृष्टीत जी उणीव आहे ती भरून काढण्याविषयी आम्हाला आज्ञा आहे.'

पुनः त्यांनी विचारलें की 'या पडशींत काय आहे?'

त्या पुरुषाने सांगितलें की, 'ती फोडून पहा.'

फोडून पाहिले तेव्हा अंडे निघालें. तें अंडे फोडून पाहिलें तेव्हा त्याच्यांतून ब्रह्मा, विष्णु व महेश्वर सापडलेत. तेव्हा या ब्रह्मा विष्णु महेश्वरांना आश्चर्य वाटलें व सलज्ज होऊन नमस्कार केला व तेथून चालते झाले व भगवती अनुसूयेच्या आश्रमीं आले.

अतिथी आलेले पाहून भगवती बाहेर आली. ब्रह्मा, विष्णु, महेश्वरांनी आपलीं रूपें पालटली होती व ब्राह्मणांचा वेष घेतला होता. भगवती बाहेर आली तेव्हा तिच्या हातीं गारगोट्या दिल्या व सांगितले की 'यांचा भात करून द्या.'

भगवती अनुसूयेने त्या गारगोट्या घेऊन त्यांचा भात करून दिला. अत्रि ऋषी स्नानाला गेले होते. भात वगेरे सर्व स्वयंपाक झाला. पण ऋषीला उशीर असल्यामुळे अतिथींनाच भोजनाला बोलावलें. पण त्यांनी सांगितलें की, ''आम्ही अतिथी आलो आहो. आम्हांला नग्न वाढा.''

भगवती अनसूयेने विचार केला की, ''हे अतिथी असून नग्न वाढ म्हणतात, त्याअर्थी हे कांही वडील नाहीत व हट्टी दिसतात त्याअर्थी हें मुलें आहेत.'' व तिची त्यांच्या ठिकाणीं मुलाची भावना दृढ झाली. हा तिचा संकल्प दृढ झाल्यामुळे एकदम ब्रह्मा, विष्णु, महेश्वरांचीं मुलें झालीं. भगवती अनुसूयेने त्यांना स्तनपान करवून झोपाळ्यांत घातलें.

एवढे झाल्यावर नारद ब्रह्मलोकाला निघून गेले. व भगवती सावित्रीला म्हणाले की, 'आई ! ब्रह्मदेव कोठे गेलेत?' सावित्री म्हणाली, 'आज १००० वर्षे झालीं पण कोठे गेलेत याचा पत्ता नाही.'

तेथून निघून नारद वैकुंठाला गेले व तेथे लक्ष्मीला विचारलें की, 'आई! नारायण कोठे गेलेत?' ती म्हणाली '१००० वर्षे होऊन गेलींत पण त्यांचा पत्ता नाही.' पुढे उमेला विचारलें व उमेनेहि त्याचप्रमाणे उत्तर दिलें.

श्रीनारदाने सांगितलें की तुम्ही वेड्या आहांत. तुमचे पति भगवती अनुसूयेच्या झोपाळ्यांत निजले आहेत. हें ऐकून त्यांना खोटे वाटलें व खरें काय आहे हें पाहण्याकरिता त्या तिघीहि निघाल्या व भगवती अनुसूयेच्या आश्रमीं आल्या. पाहतात तो खरोखरच ते झोपाळ्यांत निजले होते. भगवती अनुसूयेला नमस्कार करून त्या आपआपला पति मागूं लागल्या. भगवतीने सांगितलें की तुम्हींच ओळखून घ्या. याविषयीं एक पद आहेः- (मानभाव पंथांतील दत्तारती)

**सप्तगिरीं पर्वती । चरित्र पाहूनी नारद सांगे पुसतसे पार्वती ॥**
**माय अनुसूया एक सती ।**
**साऱ्या पतिव्रता पायीं बांधिल्या तोडर गरजे क्षिती ॥१॥**
**मग त्यांनी धाडिले पति ।**
**तिन्ही देव बालक केले पाळण्यांत हालवत होती ॥३॥**
**मग आल्या तिघी जणी । पति द्या आमचे जन्मनी ॥**
**तुम्ही घ्या आपुले ओळखुनी ।**
**कांही केल्याने ओळख पुरेना भ्रांति पडली अंतरी ॥४॥**

श्री नारदानेहि सांगितलें की आपण आपला पति ओळखून घ्या. पण ओळखतां येईना. पार्वतीने एक ओळखून घेतला. तें पाहून नारद हासले व म्हणाले की, 'वा आई ! खरेंच शंकर आता म्हातारे आहेत. अंगावर नेहमी सर्प असतात व राख फासतात. नेहमी त्यांना स्मशान आवडतें. हे विष्णु बरे विलासी आहेत.' पार्वतीने सलज्ज होऊन पुनः विष्णूला झोपाळ्यांत निजवून दिलें.

सावित्रीनेहि एकाला उचलून घेतलें. तें पाहून नारदांना हासूं आलें, व म्हणाले 'वा आई! उत्तम केलें. ब्रह्मदेव कल्पाच्या अंतीं नाश पावणारच. हे शंकर मात्र मरत नाही.' सावित्रीहि हें ऐकून सलज्ज झाली व शंकरांना पुनः तिने झोपाळ्यांत निजवून दिलें. त्याचप्रमाणे लक्ष्मीचीहि अशीच फजिती झाली.

तिघींचाहि गर्व नाहीसा झाला. तेव्हा अनुसूयेने अत्रींचें स्मरण केलें व



अत्रिऋषींनी त्या पाळण्यांतील देवांची स्तुति केली व सांगितलें की, 'आपलीं रूपें धरा.'

देवांनी आपापलीं रूपें धरलीं व प्रसन्न होऊन म्हणाले, 'वर मागा.'

तेव्हा अनुसूयेने सांगितलें की, ''आपण पुत्र झाले आता याहून काय मागणार?''

तेव्हा देवांनी सांगितलें की, 'कांही झालें तरी तुमचे पुत्र होऊन राहणार.'

मग अत्रीने सांगितलें 'असें करूं नका. अंश रूपाने राहा. प्रतिज्ञा खोटी होणार नाही.'

आपला धर्म चांगला आहे व त्यांत आपला कोणाचाहि संकल्प तीव्र करण्याचें सामर्थ्य आहे.

मागे आपल्या धर्मांतच सर्व शक्ति आहे असें सांगितलें. भगवान म्हणतात,

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥२.५१**

जे अवतार ते सर्व पतिव्रतेच्या उदरींच झालेत. त्याचप्रमाणे भगवती अनुसूयेच्या पोटीं देव आलेत. पुढे सावित्री वगैरेनी आपले पती घेतले व देवांनी आपल्या सत्त्वांशापासून दत्तावतार धारण केला व तेथे राहिलेत.

जेव्हा आपण एखादी गोष्ट तुच्छ करतो किंवा चांगली म्हणतो तेव्हा आपल्यांत राग-द्वेष उत्पन्न होतात. देव म्हणाले, अर्जुना ! शहाणे लोक -

**बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृत-दुष्कृते ।**
**तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥२.५०**

कर्म करतात पण फलाशा धरीत नसतात व त्यामुळे माझ्या पदाला पावतात. तेव्हा अर्जुनाने स्त्री-धर्माला अनुसरून शंका केली. अर्जुन म्हणाला, देवा! फलाशा न धरतां कर्म करावें असें आपण म्हणतां? व स्त्रियांचा धर्म तर असा आहे की, त्यांनी तो पति जन्मोजन्मीं मिळावा अशी इच्छा करावी. तर हें कसें? फळाची इच्छा धरावी किंवा नाही? भगवान म्हणाले,

**अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।**

''फळाची इच्छा करूं नको असें जें मी म्हणतो त्याचा अर्थ असा नाही की, ईश्वराची इच्छा करूं नये.'' त्याचा अर्थ एवढाच की कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या फळाची इच्छा करूं नको.

उदा. आपल्याला एका मुलीचें लग्न करावयाचें आहे. ती आपण परक्याला देऊन देतो. ती आपणच ग्रहण करीत नाही. कारण आपणच ग्रहण केली तर

मनुष्याला वाटेल तितक्या बायका सांपडून विषयवासना वाढेल. त्याप्रमाणे आपल्या कर्मापासून स्वर्ग किंवा इतर जें फळ आहे तें मिळून वासना वाढते म्हणून त्या फळाची इच्छा करूं नयें. ''परमेश्वर हा कर्मापासून उत्पन्न होणारा नाही, म्हणून परमेश्वराची इच्छा करणें ही फळाची इच्छा नव्हे.''

**दोन वाक्यांची संगती**

भगवंताचे एक वचन असें आहे,

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥२.५१**

व दुसरें एक वचन असें आहे.

**मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्यसि ॥**

या दोन वाक्यांची संगती कशी ती सांगतो. धर्माने परमेश्वराची इच्छा करावी. पण त्यापासून उत्पन्न होणाऱ्या फळाची इच्छा करूं नयें. पतीला ईश्वर मानावें लागतें. त्यामुळे जन्मोजन्मीं तोच पति मिळावा अशी इच्छा करणें हें कर्माचें फळ नाही; तर उलट ईश्वराविषयीच इच्छा करणें आहे. म्हणून स्त्रियेने तोच पति जन्मोजन्मीं मिळावा, अशी भावना करणें उचित आहे. भगवान यांतच विधवा-धर्महि सांगतात. विधवा-धर्म व पतिव्रता-धर्म एकच आहेत. (आपण) आपला हा जो संबंध जुळवीत असतो, तो कांही जन्मपर्यंत तसाच असतो.

उदा. आपल्याला भूक लागत असते व त्यानंतर आपण जेवतो. मग कांही वेळ भूक लागत नाही. पुनः कांही तासांनी भूक लागते. म्हणजे तृप्ति लवकर होते पण पचायास वेळ लागतो. त्याप्रमाणे आपला या जगांत संबंध लवकर जुळतो. पण अमुक मनुष्य माझा अमुक नातलग आहे ही वासना लवकर जात नाही. अशी आपल्यांत एक म्हण आहे की, ''दुखणं हत्तीच्या पायाने येते व मुंगीच्या पायाने जाते.'' लसूण ठेवावयाला वेळ लागत नाही. त्याचा वास काढण्याकरिता वेळ लागतो. कोणतीहि संवय लवकर लागते; पण तशी लवकर सोडल्या जात नाही.

तात्पर्य, जगांतील संबंध लवकर जुळतो पण तुटायला वेळ लागतो. वाईट संबंधच तोडण्याची जरूर असते.चांगला संबंध तोडण्याची जरूर नाही. हा संबंध पुष्कळ जन्मांच्या संसर्गाने जडला असल्यामुळे तुटण्याला उशीर लागतो.

तुमचा पतिपत्नीसंबंध, फार उत्तम आहे. पति जिवंत आहे तोपर्यंत करावा लागणारा धर्म पतिव्रताधर्म होय व मेल्यावर करावा लागणारा धर्म विधवाधर्म होय. पति जिवंत नसला तर तो जेथे गेला असेल तेथेच स्त्रीनेहि जावें व ती जर आपल्या



धर्माप्रमाणे वागणारी असली तरच पतिजवळ जाते.

तुलसीदास म्हणतात, **ज्या पर जाको सत्य सनेहु ।** ज्या वस्तूवर ज्याचा प्रेम असतो ती वस्तु त्याला मिळतेच. पहिलें तुला मरणाचें ज्ञान सांगतो -

**वासांसि जीर्णानि यथा विहाय, नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥२.२२**

**पूर्वजन्माची स्मृति**

तुला हें कबूल आहे किंवा नाही की, आपण जें जें जागृतींत पाहतो तें तेंच स्वप्नांत दिसतें. आता तुला असें विचारतो की, मुलगा जन्मतो तेव्हा तो २-४ दिवस हासत नाही व पुढे ५-६ दिवसांपासून हासत असतो; केव्हा रडतो. आता याला तर या जगाचा अनुभव कांहीच नाही. मग हासणें वगैरे विकार याला कोठून आलेत? सुखदुःखाचा अनुभव याला काय आहे?
बृहदारण्यक उपनिषदांत असें म्हटलें आहे.

**बालसमये पूर्वजन्मसंस्कारवशात् स्मृतिरूपं नित्यं प्रत्यक्षं पश्यति ।**

या मुलाला पूर्वजन्मीच्या पदार्थांची आठवण होवून हासतो, रडतो व दचकतो. त्याला तुमची तेवढी आठवण नसते. जेव्हा त्याचें तिकडील ध्यान कमी होऊन तुमच्याकडे लक्ष लागतें, तेव्हा इकडील धर्म लागूं होतात.

लहानपणीं तूं खेळत होतीस. ते खेळ आता काय आठवतात? लहानपणच्या तुझ्या खेळाची तुला आठवण नाही लहान मुलगा जो हासतो किंवा दचकतो, त्याचें कारण असें की, तो पूर्वजन्मीचें स्वप्न पाहतो व त्याचे जसे संस्कार होतात, त्याचप्रमाणे तो हासतो, रडतो किंवा दचकतो.

तरुण वयांत मनुष्य या जन्मांतले व वृद्धपणी पुढील जन्मीचें स्वप्न पाहात असतो.मनुष्याला अनंत जन्मींचे ज्ञान असतें. जें मेल्यावर कांही राहत नाही असें म्हणतात, ते मूर्ख समजावेत.

मेल्यावर आत्मा नाहीसा झाला असतां तर त्याला स्वप्न दिसलें नसतें. एक कपडा काढून दुसरा घालणें म्हणजे जन्म घेणे आहे. हा मनुष्य मरतो तेव्हा तो सर्व वासना सोडून देत नाही. त्याची पुत्रादिकांवर ममता असते. पति मरण पावल्यावर स्त्रियेला त्याचेपाशीं जावें लागते. व त्याच्या वासना न गेल्यामुळे त्याला फार त्रास होतो. म्हणूनच ''श्राद्धादिकांत पिंड देतांना तूं आपल्या सर्व वासना सोडून दे व मुक्त हो'' असें म्हणतात. पण त्याच्या वासना सुटत नाहीत व जन्महि मिळत नाही. तो अधर राहतो.

स्वप्नांत जसें तूं हा स्थूल देह सोडून वासनामय शरीराने कार्य करतेस, त्याप्रमाणे मेल्यावर मनुष्य वासनामय देह घेऊन राहतो व त्याचा हा देह दिसत नाही. व दुसराहि देह मिळत नाही. एक पाहुणा आहे त्याला दोन घरीं आमंत्रण दिलें व दोन्ही ठिकाणीं त्याला बोलावण्याला विसरलेंत, तर तो जसा उपाशी राहील त्याप्रमाणे मेलेल्या मनुष्याला होतें.

पुनः आपल्या आवडीचा पदार्थ आपल्याजवळच असून घेतां न आला तर फारच दुःख होतें. भूक लागली व अन्नहि जवळच आहे, पण घेतां येत नाही, तर केवढा त्रास होईल? अन्नच नसतें तर गोष्ट निराळी. या मनुष्याला आपण फारच जवळ असतो. त्याचा प्रेमहि कांही कमी होत नाही. त्याला प्रेम करावासा वाटतो. पण त्याला तसें करता येत नाही. कामशास्त्रांत वात्स्यायन म्हणतात. आपल्याला गुदगुल्या केल्या असतां जशा होतात, त्याप्रमाणेच सेन्सेशनल डिझायरच्या योगाने टेस्टीकलमध्ये गुदगुल्या होतात. दोन्ही फिलींग्ज एकाच जातीचे आहेत.हें सेन्सेशस स्त्रियांच्या ठिकाणीं केश धरल्याने उत्पन्न करतां येतें व प्रतिपदेच्या दिवशीं कोठले केश हालवावे, अमक्या दिवशीं कोठले केश हालवावे असें हे मोठे शास्त्रच आहे. विधवांनी केश ठेवल्यामुळे या मृत मनुष्याच्या वासना वाढतात व वासना वाढल्यामुळे तो पुढे स्वर्गाला जाण्याऐवजी मृत्युलोकाला येतो. पतीला त्या केशांकडे पाहून अधिक काम उत्पन्न होतो. तो सूक्ष्म असल्यामुळे केश धरतो पण वासना पूर्ण न झाल्यामुळे त्याला जी उच्च गति मिळावयाची ती न मिळतां मृत्युलोकी येतो; म्हणून विधवा स्त्रियांनी केश काढावेत.

द्वारकेला जातात तेव्हा मुद्रा घेतात. त्याप्रमाणे पतीचें आंगठें कपाटावर उमटण्याकरिता स्वासिनी स्त्रियां कुंकू लावतात. पतीच्या आंगठ्याच्या रेषा व स्त्रियेच्या कपाळाच्या रेषा एक आहेत.

इलेक्ट्रीसिटी दोन प्रकारची आहे. पॉझिटीव्ह ॲण्ड निगेटिव्ह. स्त्रियांच्या डाव्या बाजूला व पुरुषाच्या उजव्या बाजूला इलेक्ट्रीसिटी असते. मनुष्याचा प्रेम हृदयांत व स्त्रियांचा प्रेम डोक्यांत असतो. मनुष्य इमोशनल होतो तेव्हा हार्ट डाईजेस होण्याचा संभव असतो व स्त्रियांचे डोके दुखते. म्हणून पतीच्या पायावरच्या रेषा तिच्या मस्तकावर उमटाव्या एवढ्या करिता कुंकू लावतात. पति मेल्यावर दुसऱ्याचें आंगठे उमटूं नये म्हणून कुंकू लावूं नये. पुनर्विवाह करू नये. केशामुळे काम उत्पन्न होतो व दुसऱ्याशीं संग करतांना द्वेष उत्पन्न होतो व पती फारच अधोगतीला जातो व पती अवश्य भूत होतो. तात्पर्य त्याला त्रास होवूं नये म्हणून केश काढावे व कुंकू लावूं नये. ज्या ठिकाणी पती गेला असेल त्या ठिकाणीं त्याचे ध्यान करून आपणहि



जाण्याची खटपट करावी. स्वासीन असतां पतीची पूजा करावी व मेल्यावर त्या लोकांत मनाने पूजा करावी लागते. पतिव्रता धर्मांत पतीच्या आधी स्त्री मर पावली तर पतीलाहि असेंच कांही करावें लागते. म्हणून भगवान् म्हणाले, अर्जुना, पतिव्रतेने हाच पति जन्मोजन्मीं मिळावा अशी इच्छा करणें, ही कांही फळाची इच्छा करणें नव्हे. ती इच्छा ईश्वराविषयीच असते.

## पति-ध्यानाची रीती

भगवान् म्हणाले -

**अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ।**
**मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १२.१०**

अभ्यासाचें ठिकाणीं असमर्थ असशील तर सर्व कर्मे मलाच अर्पण कर. पतिव्रतेने आपल्या पतीची मूर्ति हृदयी धरून आंतली मूर्ति व बाहेरची मूर्ति एक करून ध्यान करावें. प्रथम पतीला शरीर अर्पण करावे व मग पतीचें मन व आपलें मन मिळविण्याची खटपट करावी. एखाद्या देवाची धातूची मूर्ति घेऊन त्याच्याशी आपलें ऐक्य करणें कठीण असतें, परंतु गुरुशिष्यधर्म व पतिव्रताधर्म यांच्या योगाने हें ध्यान लवकर साधतें. पतीच्या मनाशीं मन मिळविले म्हणजे नंतर आत्म्यांत आत्मा मिळवून द्यावा. यालाच ईश्वरभक्ति किंवा जीवब्रह्मैक्यता म्हणतात.

पतिव्रता धर्म न पाळतां नुसत्या भक्तीने ईश्वरप्राप्ति होत नाही व त्याचा देवांनी निषेध केला आहे. भगवान् म्हणतात,

**'यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम्'**

नुसतें माझें नामस्मरण करून त्यावरच भिस्त ठेवतात व अविधिपूर्वक जे भक्ति करतात ते मला आवडत नाहीत. या लोकांना सोपी म्हणजे इंद्रियांना त्रास पडणार नाही अशी गोष्ट पाहिजे.

इंद्रियांना ताप पडूं नये असें ज्या पुरुषांना वाटतें त्यांना माझी प्राप्ती होणें शक्य नाही.

कांही लोक आपला धर्म आपल्याच्याने होत नाही असें म्हणून कर्म आरंभच करीत नाहीत, किंवा पतिव्रतेला पति नेहमीच जवळ असतो. जवळचा देव पाहणें सोपें आहे तसा वैकुंठातला देव पाहणें सोपे नाही. म्हणून पतीच्या आत्म्याशी आपला आत्मा मिळवता येतो.

कित्येक म्हणतात, परमेश्वर प्रत्येकाच्या हृदयांत असतोच. मग पतिसेवा कां

करावी? यावर माझे असें म्हणणें आहे की जर परमेश्वर आपल्या हृदयांत आहे तर मग विषय कां आवडावेत? एकाच हृदयांत आपण व परमेश्वर आहोत तर मग परमेश्वर व आपण एकच कां वाटत नाही?

हें तिचें म्हणणें खरें आहे, पण जेव्हा आपलें चित्त शुद्ध होतें तेव्हा परमेश्वरांचे प्रतिबिंब आपल्या हृदयांत पडतें व मग त्याची ओळख होते. पतिव्रताधर्मात हें फार लवकर साधतें. पतीचें अंगुष्ठ नेहमी हृदयांत धरावें. अंगुष्ठ कुंकुमावर उमटून घ्यावें. त्याच्या चरणाचें ध्यान करावें. असे वर वर ध्यान करीत चालावें. व पुढे हास्य मुखाचें ध्यान करावें. व त्याच्या हास्यांत आपलें मन मिळवून घ्यावें. पहिलें मनाने पतीच्या बरोबर फिरावें. अशा योगांने मन शरीराच्या रहित होवून पतीच्या हास्यांत आपलें मन मिळवून देता येते.

पुराणांत अशी कथा आहे की, जेथे शंकर आहे तेथे पार्वती आहेच. याचाहि अर्थ असाच आहे की पति जेथे जेथे जाईल तेथे तेथे मनाने ध्यान करावें की मीहि त्यांचेबरोबर आहे. व हें ध्यान शरीर विस्मृति होईपर्यंत करावे.

### आर्वीकर मायबाई

आर्वीकर मायबाईची एक गोष्ट आहे. या मायबाई परम पतिव्रता होत्या. एकदा तिचे घर एकानी पैशानी भरून दिलें. त्या घरांतून निघून गेल्या व सांगितलें की, या घराला आग लावून द्या. एवढे त्यांचें वैराग्य असें. एकदा त्यांच्या पतीने त्यांना तोंडात सुपारी ठेवण्याकरिता दिली. ती त्यांनी तशीच ८ महिनेपर्यंत ठेविली. शेवटीं त्या सुपारीवर मांस चढलें व ते दुखावयाला लागलें. पण पतीने ठेव म्हटलें म्हणून तशीच ठेवली. खाल्ली नाही. त्यांनी आपला धर्म केला.

### भर्तृहरी

स्वधर्म स्वीकारणाऱ्यांना पश्चात्तापाची पाळी येत नाही. परधर्म स्वीकारणाऱ्यांना म्हातारपणीं पश्चात्ताप होतो. भर्तृहरी म्हणतात -

**यावत्स्वस्थमिदंशरीरमरुजं यावत् जरा दूरतो ।**
**याव्गेंद्रियशक्तिरप्रतिहता यावत् क्षयो नायुषः ॥**
**आत्मश्रेयसितावदेव विदुषा कार्यः प्रयत्नो महान् ।**
**संदिप्ते भवने तु कूपखनने प्रत्युद्यमः कीदृशः ॥१॥**

जोपर्यंत शरीरस्वास्थ्य आहे, कोणताच रोग नाही, जोपर्यंत जरा येऊन ठेपली नाही, जोपर्यत इंद्रियशक्ति कमी झाली नाही, जोपर्यंत आयुष्याचा क्षय झाला



नाही, तोपर्यंत शहाण्या-पुरुषाने आत्मप्राप्तीचा लाभ करून घ्यावा. जरादिक येऊन ठेपल्यावर प्रयत्नांचा कांहीच उपयोग होणार नाही. घर पेटल्यावर विहिर खोदण्यापासून कांहीच उपयोग नाही.

कर्म न करतां नुसत्या नामस्मरणापासून आळस वाढतो. कर्मापासून आळस कमी होतो. इंद्रियदमन होतें. म्हणून भगवान म्हणतात, कर्माने इंद्रियदमन करून भक्तीने माझी प्राप्ति होते. पति पंचपातकी असला तर सोडावा. पतिव्रता उत्तम असली तर पति सुधारतोच. कण्वाने आपल्या मुलीला उपदेश केला,

**शूश्रुषस्व गुरुन् कुरुप्रिय सखी वृत्तिं सपत्निजने ।**
**भर्तुर्विप्रकृताऽपि रोषणतयामास्मप्रतिपंगमः ॥**
**भूयिष्टं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी ।**
**यांत्येवं गृहिणीपदं युवतयो वामा कुलस्याधयः ॥१॥**

आपल्याहून श्रेष्ठ जे आहेत त्यांची सेवा करावी. सवतींना बहिणीप्रमाणे पाहावें, आपल्या मनाच्या विरुद्ध एखादें काम नवऱ्याने केल्यास त्याबद्दल राग मानूं नकोस. सेवकांना यथायोग्य वेतन दे. वेळच्या वेळी त्यांना त्यांचे पैसे दे व भाग्यामुळे उन्मत्त होवूं नकोस. याप्रमाणे ज्या चालतात त्याच खऱ्या कुलांगना समजाव्या. इतर कुलटा होत. आपल्यावर जसा प्रेम आहे तसा सर्वावर करावा. त्याच्या योगाने समबुद्धि होते.

———————

पतीचे ध्यान करण्यापूर्वी आपल्या अंगी उत्तम प्रकारचें गुण पाहिजेत. नुसतें मन एकाग्र केल्याने होत नाही. आपल्या अंगीं उत्तम गुण असले तरच मन एकाग्र होतें. घाणेरडे पाणी जर साठवून ठेवले तर पिण्याच्या उपयोगी पडत नाही. त्याप्रमाणे -

अशुद्ध चित्त एकाग्र केल्यापासून विकारच वाढतात.

म्हणून अगोदर आपला धर्म चांगला पाळून उत्तम गुण अंगीं आणून घ्यावे व चित्तशुद्धि करून घेतली पाहिजे. ते उत्तम गुण कोणते हे भगवान् सांगतात,

**अहिंसा सत्यमस्त्येयमकाममक्रोधलोभता ॥**

अहिंसाः कोणाला दुःख न देणें. दुःख देणें दोन प्रकारचें असतें. १. आपल्याकरिता व २. दुसऱ्याच्या कल्याणाकरिता. दुसऱ्याच्या कल्याणाकरिता दुःख देणें हिंसा होत नाही. पुष्कळजण ईश्वरावर दोष देतात की, तो आम्हाला दुःखांत टाकतो, पण आपण चांगल्या मार्गाने चालावे म्हणूनच दुःख देतो.

दुसरा गुण सत्य.या सत्यावरच सर्व धर्मांची मदार आहे. याशिवाय ज्ञान,

धर्म वगैरे सर्व खोटे. शत्रुदेखील सत्य बोलण्यावर विश्वास ठेवतात. या विषयी एक कथा आहे.

## कथा : युधिष्ठिर व दुर्योधन

भगवान युधिष्ठिर हे सत्यमूर्ति होते. एकदा दुर्योधनाला वाटलें की, आपण अमर व्हावें. आता याचा उपाय कोणाला विचारावा? असा विचार करीत असतां, त्याला वाटलें की, सत्य बोलणारा एक धर्म आहे. त्याला विचारावें म्हणजे तो आपल्याला उपाय सांगेल. धर्म त्याचा शत्रु होता तरी त्याला विश्वास वाटला. असा विचार करून दुर्योधन धर्माकडे जावयाला निघाला. इकडे श्रीकृष्णाला चिंता पडली की, आता कसें करावें. तेव्हा भगवान धर्माला म्हणाले, ''धर्मा ! तूं खोटे सांग. नाहीतर हा दुर्योधन अमर होऊन अजिंक्य होईल.''

धर्माने सांगितलें की, ''कसाहि प्रसंग आला तरी मी खोटे बोलणार नाही.''

यावरून **ईश्वराचें म्हणणें असलें तरी महात्मे आपला धर्म सोडत नाही.**

धर्म म्हणाला की, ''इतकेंच होईल की, मी त्याचे हातून मरेन. या साडेतीन हाताच्या देहाकरीता कशाला खोटें बोलूं?''

महात्म्यांना वाटत असतें की, परमेश्वर स्वर्ग, मुक्ति किंवा दुःख जे देतो तें तो त्यांच्या त्यांच्या कर्माप्रमाणे देतो. स्वतः कांहीच करीत नाही.

श्रीकृष्ण म्हणाले, ''बरें बा, तुला वाटेल तसें कर.''

जेव्हा दुर्योधन धर्माकडे आला तेव्हा धर्माने मोठ्या प्रेमाने विचारलें, ''बाळा! कोणीकडे आलास?''

यांच्यामध्ये युद्धापुरताच विरोध होता. **महात्म्यांच्या मनांत विरोध नसतो.**

दुर्योधन म्हणाला, ''दादा! मी मरणार नाही असा कांही उपाय सांगा. कोणत्याहि उपायांनी मी मेलों न पाहिजे.''

तेव्हा धर्म म्हणाले, ''दुर्योधना ! तुझी आई गांधारी फार पतिव्रता आहे. पति आंधळा आहे व परपुरुषाकडे पाहावयाचें नाही, म्हणून तिने डोळ्याला पट्टी बांधली आहे. तिच्या समोरून तूं अगदी अंगावर एकहि वस्त्र न ठेवता उघडा जा म्हणजे ती तुजकडे कृपादृष्टीने पाहील व तूं अमर होशील.''

हे श्रीकृष्णाला बरें वाटलें नाही. त्यांनी ऋषीचें रूप धारण केलें व दुर्योधन आपल्या आईकडे जात होता तितक्यात त्याला रस्त्यांतच भेटले व म्हणाले, ''काय दुर्योधना ! असा उघडा कोठे जातोस?''

दुर्योधनाने सांगितले की, ''धर्माने मला अमर होण्याचा उपाय सांगितला.''

श्रीकृष्णाने विचारलें, ''कसा सांगितला रे उपाय ?''



दुर्योधन म्हणाला, ''धर्माने मला आई गांधारीच्या समोर असा उघडा उभा राहा म्हणून सांगितले.''

ज्याची जशी बुद्धि असते तशीच त्याला सल्ला पटत असते. श्रीकृष्ण म्हणाले, ''दुर्योधना तूं फार भोळा आहेस ! धर्म तुझा शत्रु असून तूं त्याच्या म्हणण्यावर कसा विश्वास ठेवलास? अरे ! माता गांधारी महान पतिव्रता आहे. असें पाहण्याबरोबर ती तुला एकदम भस्म करील व पांडवांचा अनायासें कार्यभाग होईल. युद्धावाचून तूं मरावा म्हणून हा उपाय सांगितला.''

दुर्योधनाला श्रीकृष्णाचे म्हणणें खरें वाटलें.

श्रीकृष्णाने सांगितलें की, 'हा मजजवळचा फुलाचा पोषाख घे व हा घालून जा.'

दुर्योधनाने तसे केले व गांधारीसमोर आला.

गांधारीने विचारले, ''दुर्योधना! कोणीकडे आलास?''

दुर्योधन म्हणाला, ''आई ! मी धर्माला अमर होण्याचा उपाय विचारला तेव्हा त्यांनी सांगितलें की, माता गांधारीसमोर तूं नग्न जा म्हणजे अमर होशील.''

तेव्हा गांधारीने विचारलें! ''धर्माने सांगितलें तसेंच केलेस ना?''

दुर्योधनाने ''हो'' म्हणतांच गांधारीने आपली पट्टी सोडून त्याकडे पाहिले व सांगितलें की ''झाकलेला भाग सोडून सर्व तुझी काया अमर आहे.''

आपला पुत्र होता म्हणून गांधारीने कांहीच केले नाही. होते तसे सांगितले. त्याचप्रमाणे १८ दिवसपर्यंत दुर्योधन 'मला जय मिळो असा आशीर्वाद दे', म्हणून गांधारीमागे फिरला पण तिने उत्तर हेंच दिलें की, ''यतो धर्मस्ततो जयः।''

दुर्योधनाचा पोषाख पाहून गांधारीला वाईट वाटलें व विचारलें, ''अरे हें कोणी सांगितलें?''

दुर्योधन म्हणाला, ''एका ऋषीने मला हा पोषाख दिला.''

तेव्हा तिला वाटलें की, हें श्रीकृष्णाचें काम आहे, याप्रमाणे शत्रूचाहि विश्वास सत्य बोलण्यावर असतो.

तिसरा गुण अस्तेय! मनाने देखील दुसऱ्याच्या वस्तूची इच्छा न करणें.

चवथा गुण अकाम! मिळत असलेल्या वस्तुविषयी इच्छा करणें याला काम म्हणतात व

वस्तु मिळावयाची आहे व अडथळ्यामुळे न मिळून वाईट वाटणें क्रोध होय.

ती वस्तु आपल्याजवळ राहावी असे वाटणें लोभ.

काम, क्रोध, व लोभ हे तीन गुण नसावेत.

लोकांच्या कल्याणाची इच्छा करणें हा शेवटचा गुणहि अंगीं असून धर्म पाहिजे. नुसता धर्म किंवा नुसते हे गुण कांही उपयोगाचें नाहीत.

## पतीचे ध्यान

तुमचा पतिसेवादि धर्म असून हे गुणहि अंगी असले पाहिजेत. हे गुण आल्यावर ध्यान करावें. ध्यानाविषयी भगवान् पुनः सांगतात - धर्माच्या योगाने शरीरादि चित्ताची शुद्धि करावी. मग ध्यानाला आरंभ करावा. ज्याचे जसे संस्कार असतील तसें ध्यान करावें. तुम्हां स्त्रियांना कुत्र्याचें ध्यान उपयोगाचें नाही. पतीचें ध्यान चांगलें आहे. परमात्मा तुम्हाला पतिद्वारा अन्न देतो. दगडाच्या मूर्तीचें ध्यान करून कांही उपयोग नाही. दगडाच्या मूर्तीला प्राणप्रतिष्ठा केल्यावर देवत्व येते. ती प्राणप्रतिष्ठा कठीण आहे, म्हणजे ''आपल्या अंगात ज्याप्रमाणे श्वास चालतो, त्याप्रमाणे मूर्तीतहि श्वास चालला पाहिजे,'' असें ध्यान कठीण आहे. करणारा योगीच असला पाहिजे. पाहिजे ठिकाणी प्राण असतोच म्हणून पतिध्यान कठीण जात नाही. (अपूर्ण)

* * *

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

# ११. सुखासाठी धर्मपालन

**श्री ज्ञानेश्वर पाउलें वंदुनि प्रेमविहार ।**
**कांतवचन भाषा वदू जे करी संसृतिपार ॥१॥**
**निगमसुधाफल हृदयरस कृष्णवचन सुखसार ।**
**ऐकुनि युवति नरहि तसे करिती स्व-साक्षात्कार ॥२॥**
**सावध श्रोतृवृंद तुम्ही देऊनी अति अवधान ।**
**श्रीहरि वचनें अमरमति व्हा मारुनि मदमान ॥३॥**
**निज निज धर्मा आचरुनि चित्त करुनिया शुद्ध ।**
**जाणुनि ब्रह्मज्ञान बळें जनहि करा अतिबुद्ध ॥४॥**

कोणीहि मनुष्य जगाकडे पाहावयाला लागला तर त्याला या जगांत चार प्रकारची सृष्टि उत्पन्न झालेली दिसते. कांही, पुरुष व स्त्रियांच्या संयोगापासून स्त्रीचें ठिकाणीं गर्भापसून उत्पन्न होतात. उदा. (१) मनुष्य, पशु. यांना जरायुज म्हणतात. (२) कांही प्राणी आईपासून उत्पन्न होतात पण त्यांचा जन्म अंड्यापासून होतो. उदा. पक्षी, सर्पादिक. यांना अंडज म्हणतात. (३) कांही जमिनीपासून



उत्पन्न होतात. उदा. वृक्ष वगैरे. यांना उद्भिज म्हणतात. (४) कांही प्राणी घामापासून किंवा चिखलापासून उत्पन्न होतात. उदा. उवा, गोचिड वगैरे. यांना घर्मज म्हणतात.

आता या चारहि प्रकारच्या प्राण्यांची सुखाकरिता खटपट असते व कोणीकडून व कोणत्या रीतीने आपल्यास सुख मिळेल असा तो नेहमी विचार करितो व ज्या रीतीने सुख मिळेल त्यारीतीने तो प्रयत्न करीत असतो. याप्रमाणे जवेढी त्याची खटपट किंवा प्रयत्न असतो, तो सुखाकरिता असतो. दुःखाकरिता कधीच कोणी प्रयत्न करीत नाही व उलटें दैवाने प्राप्त झालें असल्यास, तें कोणत्या रीतीने दूर होईल त्या रीतीचा तो प्रयत्न करीत असतो.

थंडीपासून आपल्याला दुःख होतें म्हणून कपडें घालतो. भूकेपासून दुःख होते म्हणून जेवतो. कोणताहि रोग झाला व त्याचा त्रास सहन न झाला तर औषधी घेतो. एवं कोणताहि प्रयत्न आपल्या सुखाकरीताच असतो. आता अशी गोष्ट आपली एका मनुष्यप्राण्याची आहे असें नाही. तर प्रत्येक प्राण्याची खटपट सुखाकरिताच आहे. गुरे देखील थंडीपासून बचाव व्हावा म्हणून झाडाखाली बसतात. त्याप्रमाणे झाडें देखील त्यांना सुखावह परिस्थिति असली म्हणजे चांगली वाढतात व  वाईट दुःखरूप परिस्थिति असली म्हणजे सुकून जातात. वसंतात झाडें प्रफुल्लित असतात.(अनुकून परिस्थितीं‍त वाढतात व प्रतिकूल परिस्थितीत सुकतात.) याप्रमाणे सर्वांनाच सुख अवश्य पाहिजें आहे.

आता आपल्यास सुख पाहिजें एवढेंच पाहिजें नसून ते सुख सतत अखंड राहावें अशीहि प्रबल इच्छा असते. एक क्षण देखील दुःखांत जावासा वाटत नाही. स्वासीनी स्त्रियांना पतिसुख नेहमी असावें असें वाटतें.

याप्रमाणे हें सिद्ध झालें की, या जगांत प्रत्येक प्राण्याला सुखाची इच्छा आहे व तें सुख सतत राहावें असे वाटते. पण ही त्यांची इच्छा या जगांत पूर्ण होत नसल्यामुळे त्यांना कधीच शांती राहात नाही. आपण जो विषय भोगतो, त्यापासून होणारें सुख तेवढ्यापुरतें क्षणिक असतें व तेवढ्यापुरतां तो विषय भोगला व त्याच्यापासून सुख झालें तर तें नेहमी करिता रहात नाही. पुनः त्या विषयाची आठवण होऊन तो विषय भोगण्याकडे लक्ष जाते.

**उदा.-** आपण जेवलो व त्यापासून आपल्याला सुख वाटलें, पण तें सुख नेहमी सतत तसेंच राहात नाही. दुसरें दिवशी पुनः भूक लागते व आपल्याला त्यापासून त्रास होतो व पुनः जेवावें लागतें. बरें एकदा पुष्कळसे जेवून घ्यावे व खूप तृप्ति करून घ्यावी असे म्हणून जर फार जेवावयाला लागलो तर दुसरे दिवशी

अजीर्ण होते. याप्रमाणे कमी जेवावे तर पुनः दुसरे दिवशी भूक लागून त्रास होतो व फार जेवावें तर अजीर्ण होऊन त्रास होतो. याप्रमाणे कोणत्याहि रीतीने पाहिलें तरी जेवणापासून सुख होत नाही व त्यापासून होणारे सुख अगदी थोडा वेळ टिकणारे आहे.

याचप्रमाणे सर्व विषयभोगाचें आहे व जगांतील कोणत्याच पदार्थापासून अखंड सुख मिळत नाही व ते पदार्थच भोगण्याकडे आपली प्रवृत्ति असली तर त्या पदार्थापासून आपल्याला अखंड सुख कसें मिळणार? अर्थातच मिळत नाही. आता जगांतील सर्व माणसांची विषय भोगण्याकडे प्रवृत्ति आहे आणि हे विषय तर थोडा वेळ सुख देणारे आहेत म्हणून या जगांतील कोणीच प्राणी सदासर्वदा सुखी नसतो. किंबहुना नेहमीच तो दुःखात असतो. निव्वळ सुख म्हणून कोणालाच मिळत नाही.

तूं आपल्याकडेच पाहा. तुझी प्रकृत्ति चांगली नाही. सोनूचा कान फुटला आहे. अशा स्थितींत तुला सुख आहे काय? नाही. याप्रमाणे जगांत कोणी सुखी नाही. कांहीना कांहीतरी दुःख असतेंच. एक क्षण सुखाचा असतो. आपल्याला भूक लागली व त्यापासून त्रास झाला तर आपण अन्न मागून तरी खाऊं, पण पशु वगैरे आपल्याहि पेक्षा दुःखी आहेत. त्यांना भूक लागली तरी मालक खावयाला देईल तेव्हाच ते खातात.

कीटकादि लहान प्राणी यांना कोणीहि पायातळी रगडून मारतात. झाडा वगैरेंना आपण वाढवावयाचे व आपणच आपल्या हातने त्यांना कापून टाकतो. ह्या दृष्टीने पशु, पक्षी, झाडें वगैरे आपल्यापेक्षाहि दुःखी आहेत. याप्रमाणे मागे सांगितलेले चारहि प्रकारचे प्राणी दुःखी आहेत. कोणीच सुखी नाही.

आता जगांत तर कोणी सुखी नाही व जगांत तर अखंड सुख कोठेच नाही व आपल्यास सुख तर पाहिजे, तर मग कसें करावयाचे? समज तुला फार तहान लागली आहे व प्यावयास पाणी हवें आहे व घरांत तुझ्या पाणी नाही, तर काय करशील? तशीच राहशील काय? नाही. पाणी तर प्यालेंच पाहिजे, तर आणावयाचें कोठून? तर जेथे पाण्याचा साठा आहे तेथून आणावें लागेल. असा साठा कोणता आहे? विहीर किंवा नदी. पुनः कल्पना कर - तुला फार भूक लागली आहे व अन्न तर नाही. तर काय करशील? तशी तर राहणारच नाही, तर स्वयंपाक करावा लागेल.

## सुखाचा सांठा

त्याप्रमाणे आपल्यास सुख तर पाहिजें व तेंहि अखंड पाहिजें व असें सुख तर ह्या जगांत नाही तर कसें करावयाचें? कोठून तरी प्राप्त करून घेतलें पाहिजें.



आता कोठून प्राप्त करून घ्यावयाचें? जेथे या सुखाचा साठा असेल तेथून हें मिळविलें पाहिजे. आता ह्या सुखाचा सांठा कोठे आहे? या अखंड सुखाचा सांठा ईश्वर आहे. हा ईश्वर कोण आहे सांगतो. जी जी वस्तु दिसते त्यांत कांहीना तरी दुःख आहेच. निव्वळ सुख म्हणून नाही. कशावरून?

आपण जी जी वस्तु पाहतो ती ती वस्तु झोपेंत दिसत नाही. झोप म्हणजे काय? आपण निजतो त्यावेळेस आपल्या निद्रेंत दोन भाग असतात. एक कांही वेळ स्वप्न दिसतात व कांही वेळ अगदी गाढ झोप लागली असते. या गाढ झोपेला (स्वप्न सोडून निद्रेचा भाग) सुषप्ति किंवा झोप म्हणतात. आता झोपेंत ह्या वस्तु कां दिसत नाहीत? तसेंच देवतांचे दर्शन झोपेत झाल्यास दिसेल काय? नाही.

कारण कल्पना कर. आपण एक व्याघ्र पाहिला व त्यापासून भीति वाटते, ती कशी वाटते? पुनः आपण एक भूत पाहिलें व पाहिल्याबरोबर आपल्याला भीति वाटते, ती कशी वाटते? आपण भूत पाहतो व हृदयांत भीति शिरते म्हणजे ती भीति डोळ्यावाटे हृदयांत शिरते. आता ही भीति कोणाला वाटते? मनाला किंवा शरीराला? शरीराला वाटत नाही, कारण मेल्यावर कांही भयंकर पदार्थ दाखविला तरी भीतीपासून उत्पन्न होणारे कंपादिक धर्म शरीराच्या ठिकाणी दिसत नाही. तर ही भीति मनाला वाटते.

मन डोळ्याच्या द्वाराने रूप घेतें कानाच्या द्वाराने शब्द घेते. जिभेच्या द्वाराने रुचि घेते. याप्रमाणे मनच सर्व इंद्रियांच्या द्वाराने निरनिराळे विषय ग्रहण करिते. तसें नसते तर आपले लक्ष दुसरीकडे लागलें असतें व त्या भीतिकडे किंवा समोर असलेल्या विषयाकडे नसलें तर त्या भीतिपासून आपल्याला भय वाटत नाही; व पुढे विषय असला तर विषय आहे किंवा नाही हेंहि समजत नाही.

आता समज ह्या माझ्या सांगण्याकडे तुझें लक्ष आहे आणि दुसरीकडे लक्ष नाही तर दुसऱ्याने हाक मारली किंवा कांही बोलला तर तुला ऐकूं येईल काय? नाही, कारण तुझें मन त्या बोलण्याकडे नाही म्हणून! याप्रमाणे ज्या गोष्टीकडे मन असतें तीच गोष्ट आपणास समजते. त्याप्रमाणे झोपेंत म्हणजे स्वप्न सोडून दुसरा निद्रेचा भाग म्हणजे गाढ झोपेंत - हे मन सर्व इंद्रियांबरोबर अज्ञानांत लीन झाल्यामुळे या जगांतील वस्तु किंवा देवतादर्शन आपल्यास झोपेत होत नाही.

प्रत्येक वस्तु आपण मनाने जाणतो. आपलें चित्त दुसरीकडे असलें तर जवळून एखादा मनुष्य गेला तरी दिसत नाही. यावरून मनच पदार्थ पाहतें, डोळे पाहात नाही. मनच शब्द ऐकितें, कान ऐकत नाही. याप्रमाणे सर्वच व्यापार मनच करते, जड देह कांही करूं शकत नाही. (झोपेत) मन लीन झाल्यामुळे इंद्रियावर

तें येऊ शकत नाही. आपल्याला झोपेत दर्शन झाल्यास दिसत नाही. कारण तींत डोळ्यांच्या ठिकाणी असलेली शक्ति राहात नाही व आपण पाहू कशाने? डोळ्यानेच. म्हणून देवतादर्शन झोपेंत दिसत नाही.

पुनः जी जी वस्तु दिसते ती सतत नेहमी राहात नाही. म्हणून देवतांचे दर्शनहि अखंड सुख देणारें नाही, कारण झोपेत ते होत नाही. बरे, देवतादर्शनच घेत बसले व झोप वगैरे घेणें सोडून दिलें. तर तो वेडा होईल. म्हणून देवतादर्शनहि अखंड सुख देणारे नाही.

आता जी जी वस्तु दिसते तिजपासून अखंड सुख तर मिळत नाही, तर मग अखंड सुख कोठे आहे? - तर न दिसणाऱ्या वस्तूंत असें सुख आहे. दिसणाऱ्या वस्तूंत तर सुख नाही व सुख तर पाहिजे तर सुख कोठून प्राप्त करून घ्यावे? न दिसणाऱ्या वस्तूंत सुख आहे व तेथून तें प्राप्त करून घ्यावें. तशी न दिसणारी वस्तु कोणती? किंवा अशी वस्तुच नाही?

न दिसणारी वस्तु आपण आहो. कशावरून? आपण जसें आपले शरीर पाहतो त्याप्रमाणे आपण आपलें मन पाहू शकत नाही. दिसत नाही तर मग मन आहे कशावरून?

आपण सर्व वस्तु जाणतो व एखादे वेळेस दुसरीचकडे आपण गुंतलो असलो तर जवळचा पदार्थहि दिसत नाही. म्हणजे जिकडे लक्ष असतें तोच पदार्थ समजतो. म्हणून मन आहे. ''मन नाही व इंद्रियानेच आपण विषय घेतो'' असें म्हटल्यास पदार्थ जवळ असूनहि लक्ष नसलें तर दिसत नाही असें कां व्हावें? मन आहे पण दिसत नाही व 'तें सुख' न दिसणाऱ्या वस्तूंत आहे. ज्या दिसणाऱ्या वस्तू आहेत त्या मनाला दिसतात पण मन कोण्याच इंद्रियाच्या योगाने दिसत नाही. **मनाच्या स्वाधीन सर्व वस्तु आहेत पण मन कोणत्याच वस्तूच्या स्वाधीन नाही.** मनाला कोणी पाहूं शकत नाही. देवालाहि मनच पाहतें. पण मनाला देव पाहूं शकत नाही. तुझा सोनू तुझा जन्म कसा पाहूं शकेल? हे सगळें पाहणें जर मनाच्या स्वाधीन आहे तर मग तें मन त्या वस्तूच्या स्वाधीन कसें होऊं शकेल?

**न दिसणाऱ्या वस्तूंत सुख आहे व आपणच न दिसणारें आहो, म्हणजे आपलें मनच न दिसणारें आहे व त्यातच सुख आहे.**

आता यावरून हेंहि सिद्ध झालें की, आपण देह नाही. कारण देह तर दिसतो आणि मन तर दिसत नाही. 'सुंदर' ही हाक मारल्यास कोणाला समजते? देहाला तर समजत नाही. कारण प्रेताला त्याच्या नांवाने हाक मारल्यास ओ देत नाही, तर कोण ओ देते? त्याचें मन ओ देते. मन या देहाहून निराळें आहे. दुःख नेहमी देहाच्या स्वाधीन झाल्याने होते. म्हणून तें चित्त जेव्हा आपण ईश्वराच्या



ध्यानांत लावू तेव्हा सुख मिळेल व तेहि अखंड सुख मिळेल.

## देहाचा भ्रम

मागे असे सांगितलें की, आपणास सुखाची इच्छा आहे व तेंहि अखंड सुख पाहिजें व असें सुख तर या जगांतील पदार्थात नाही. तर कोठून तरी आणलें पाहिजे. आता आणावयाचें कोठून? जेथे सुखाचा साठा असेल तेथून आणिलें पाहिजे व अशा सुखाचा साठा ईश्वर आहे. व मन त्याकडे लावलें म्हणजे तें सुख मिळते. आता तें मन देहाच्या रहित आहे, व 'सुंदर' हे नांव देहाला आहे. तें नांव मनाला समजतें. हाक मारली असतां मनच ओ देते. दुःखणें, खोकला येणे हे देहाचे धर्म आहेत. मन स्वतः देहाच्या रहित असून मनच देह कसें होते? सुंदर नांव देहाला असून हांक मारली असता ओ कोण देतें? मन.

जातीचा ब्राह्मण आहे  पण जर तो आपल्याला तेली समजूं लागला तर तो कां असें म्हणतो? याचें कारण काय? खरोखर तो ब्राह्मणच असतो. लहान पोर उभा झाला म्हणजे मी मोठा झालो असें म्हणतो. तो कां म्हणतो? वास्तविक तो मोठा झाला काय? नाही. असे म्हणतो तो भ्रमाने म्हणतो. त्याप्रमाणे वास्तविक जी वस्तु तो नाही व तो जर ती वस्तु मी आहे असें म्हणतो तर असें तो भ्रमाने म्हणतो.

वास्तविक तसें नाही. तुझें मन देहाच्या रहित राहून तूं जे हाक मारल्याबरोबर ओ देतेस ती भ्रमाने देतेस. वास्तविक नांव देहाला आहे व देह मी आहे असें समजून तूं ओ देतेस. वास्तविक ती वस्तु कांही तूं नाही. 'जिवंतपणींच मन देहरहित झालें म्हणजे ही वस्तु मी नाही असें पक्कें समजले म्हणजे हा आपला भ्रम निघून जाईल.'

## मनाची शुद्धी

आता आत्मा या मनाहूनहि निराळा आहे. तें पुढे सांगू. मन देहाहून निराळे कशाने होते? आपलें चित्त अशुद्ध असले म्हणजे विकाराकडे त्याची फारच ओढ असते. आता ते शुद्ध केले पाहिजे. कसें करावयाचें? समज, पाणी एका ठिकाणी थोपविले आहे, त्याठिकाणी ते तसेंच राहू दिलें व पुढे जर वाहूं न दिले तर तेथे रेंदा उत्पन्न होतो. त्याप्रमाणे देहांत मन कां अटकून पडलें? मनाची ईश्वरप्राप्तीकडे कां प्रवृत्ति होत नाही? तें अशुद्ध असल्यामुळे! आता ज्याप्रमाणे त्या थोपविलेल्या पाण्यांतील रेंदा काढून स्वच्छ करून टाकले म्हणजे, स्वच्छ होऊन वाहूं लागतें. त्याप्रमाणे चित्तांतील विकार नाहीसें केलें म्हणजे ते ईश्वराकडे ओढ घेते. पण हे चित्तांतील विकार कसें नाहीसे करावेत? आपण रेंदाळ पाणी कसें स्वच्छ करतो? ते पाणी आपण चाळणीने किंवा गाळून करीत असतो. या पाण्याच्या दृष्टांतात पाणी व माती दोन्ही दृष्ट पदार्थ आहेत. म्हणून आपल्याला दिसणाऱ्या उपायांनी म्हणजे

गाळण्याने ते आपण स्वच्छ केले.

पण या ठिकाणी तर दोन्ही मन व विकार न दिसणारे आहेत, तर कसें शुद्ध करावयाचें? जें दिसतच नाही, ते दिसणाऱ्या पदार्थाने कसें स्वच्छ होईल? दुसऱ्या एखाद्या न दिसणाऱ्या पदार्थानेच शुद्ध केले पाहिजे. असा न दिसणारा पदार्थ कोणता आहे? असा पदार्थ धर्म आहे !

## धर्माने चित्तशुद्धी, नंतर ध्यानयोग

धर्म कांही आपल्यास दिसत नाही. धर्म करिता करिता धर्माची आवडी लागली म्हणजे देहाची पर्वा कमी होते. व त्या धर्मातच त्याचे चित्त लीन होते. व याप्रमाणे जीवंतपणींच चित्त देहाहून निराळें झालें म्हणजे त्याला ईश्वराचें ध्यान करण्याला सांगावे व नंतर ध्यानाने ईश्वराकडे त्याच्या चित्ताची ओढ जास्त लागेल. आपला आपला धर्म करणें चित्त शुद्धि करण्यास कारण आहे.

स्वासिनी स्त्रियांचा धर्म पतीची सेवा करणें आहे. होईल त्या रीतीने तिने पतीच्या मनोगताप्रमाणे चालावें व त्याला ईश्वर समजून त्याची सेवा करावी. संताप-कृच्छ्र चांद्रायणादि व्रतें करणें हा विधवांचा धर्म आहे. स्वासिनी स्त्रियांनी कोणतेंहि व्रत पतिआज्ञेशिवाय करूं नये.

ब्राह्मणांना हिवाळ्यांत कांबळी, उन्हाळ्यांत उन निवारण करण्यांकरिता छत्र्याचें दान करणें इत्यादि पुष्कळ प्रकार आहेत. इत्यादि धर्म विधवा स्त्रियांचा आहे.

* सर्वांना ज्ञान सांगणें हा **ब्राह्मणांचा धर्म** आहे.
* दुष्टांचा नाश व सुष्टांचें पालन करणें हा **क्षत्रिय धर्म** आहे.
* शेती वगैरे करणें **वैश्याचे काम** आहे.
* **शूद्रांचा धर्म** तीन्ही वर्णाची सेवा करणें.
* स्वतः धर्माचा त्याग करून कितीहि भक्ति केल्याने ईश्वर मिळत नाही.
* पतीची सेवा हा **स्त्रियांचा धर्म** आहे. त्याच्या आज्ञेनुसार वागत जावें. आता समज पतीने 'विष खाऊं घाल' म्हटल्यास खाऊं घालावें काय? पतीची आज्ञा तर मोडूं नये. मग या ठिकाणी कसें करावे? खाऊं न घातल्यास धर्म मोडेल किंवा नाही? अशा वेळी विष खाऊं घालणे अधर्म होईल म्हणून खाऊं घालूं नये. पतीने सांगितलें की मला माडीवरून खाली ढकलून दे. तर ती त्याची आज्ञा पाळावी किंवा नाही ? पाळूं नये. या ठिकाणीं आज्ञा भंग अधर्म होत नाही. धर्म कोणता व अधर्म कोणता हें आपल्याला आपल्या बुद्धिवरून चांगलें ठरविता येत नाही. म्हणून तो धर्माधर्म साधुपुरुष व शास्त्रवचन यावरून ठरवावा लागतो. बापाची आज्ञा मुलांनी


पाळावी. पण त्यांनी मुलाची स्त्री मागितल्यास मात्र ती आज्ञा पाळूं नये. कारण स्त्री दिल्यापासून जे पातक घडेल, त्यापेक्षा आज्ञाभंग करण्यापासून कमी पातक घडेल. म्हणून या ठिकाणी त्याची आज्ञा न पाळणें चांगलें व धर्माला अनुसरून आहे. त्याप्रमाणेंच पतीने स्त्रियेला एखाद्या पुरुषासी संयोग करण्यास सांगितले तर ती आज्ञा तिने मान्य करूं नये.

हें धर्माधर्म समजणें कठीण आहेत. म्हणून शास्त्र व गुरूच्या वचनावरून समजून घ्यावेत. कोण्या वेळेला धर्माचा अधर्म व अधर्माचा धर्म होतो, हें कसें तें सांगतो पहा. समज एखाद्याच्या आंगाला आपण कापलें तर तो धर्म झाला की अधर्म झाला? अधर्म झाला. बरें त्याला जर एखादा फोड असला आणि तो कापला तर मात्र अधर्म होत नाही व पाप घडत नाही.

जशी तुझ्या घराला आणि काकीच्या घराला जमीन एकच आहे त्याप्रमाणे मागे जे चारी वर्णाला योग्य असणारे निरनिराळे धर्म सांगितले त्या सर्वांना सारखा लागू पडणारा एक धर्म. तो कोणता? खोटे बोलू नये. कोणाची हत्या करूं नये, कोणाला फसवूं नये, चोरी करूं नये, परस्त्रीगमन करूं नये. हा धर्म चारी वर्णांनी सारखा पाळला पाहिजे.

कोणाला कापूं नये पण फोड असल्यास कापावें म्हणजे पाप नाही. कारण त्याचे दुःख निवारण होते. या ठिकाणी अधर्मच धर्म आहे. विष खाणें चांगले नाही, पण औषधींत खातात. माशी मारणें पाप आहे, पण कवळ(कावीळ) झाला असतां मारून देतात. येथे माशा खाणे त्या रोगाला चांगले आहे. म्हणून अधर्म होत नाही. खरे बोलावे हा धर्म आहे, पण एखाद्याच्या त्या खरे बोलण्याने त्याचा प्राण जातो तर कसे काय करावे? खोटे बोलावे, कारण, खरे बोलण्याने त्याचा प्राण जातो व त्यामुळे होणाऱ्या पातकापेक्षा खोटे बोलण्याचें पातक कमी आहे. पण खोटे बोलणे हा कांही धर्म नाही व हे खोटे बोलणे अशा प्रसंगीच धर्माला अनुसरून होते. इतर वेळेला खोटे बोलल्यास पातक होईल. याप्रमाणेच धर्माधर्म समजणे फार कठीण आहे व तो साधु व शास्त्रवचन यावरून समजून घ्यावा.

प्रत्यक्ष अर्जुनाजवळ देव असूनहि अर्जुनाला धर्म कोणता व अधर्म कोणता हें समजलें नाही म्हणून देवाने ही गीता सांगितली.

परवाच्या निरूपणांत मी तुला धर्माधर्म सांगितलें व हे धर्माधर्म कठीण असल्यामुळे आपल्या बुद्धीच्या योगाने ठरविता येत नाहीत. म्हणून साधुपुरुष व शास्त्र यांच्या वचनावरून ठरवावें असे सांगितले. पुनः तेंच पुराणांतील उदाहरणे घेऊन सांगतो. धर्म व अधर्म हे समजण्याची मोठी अडचण पडत असते. केव्हा केव्हा

आपण धर्म समजून अधर्म करीत असतो. केव्हा केव्हा बळेच अधर्म करावा लागतो.

## नरो वा कुंजरो वा

**उदा.** महाभारतात अश्वत्थामा मेला किंवा नाही म्हणून द्रोणाचार्याने धर्माला विचारले असता धर्म खोटे बोलला. **''नरो वा कुंजरो वा''** असें उत्तर दिले. या खोटे बोलण्याबद्दल निजधामास जातांना धर्माचा आंगठा गळून पडला. देवांनी त्याला असे खोटें बोलावयाला लाविले. हा धर्म झाला की अधर्म? धर्म म्हणावा तर - त्याचा अंगठा गळून पडला व पृथ्वीचा आधार नसतां अधर त्याचा रथ चालत होता तो पृथ्वीवर चालू लागला. अधर्म म्हणावा तर देव आपल्या भक्तास अधर्म कसा करू देईल? मग याला काय म्हणावें? पाप म्हणावे की पुण्य म्हणावें? देवांनी धर्माला जे खोटे बोलावयास सांगितलें, तें काही पुण्य नाही पापच झाले. पण भेद इतकाच की द्रोणाचार्य जर मेले नसते तर सर्व राज्य दुष्ट दुर्योधनाच्या हाती गेले असते व त्यामुळे प्रजा, गाई, ब्राह्मण यांना पुष्कळ त्रास झाला असता व त्यामुळे भयंकर पातक झालें असते, पण एवढे पातक होऊं देण्यापेक्षा थोडे पातक होऊ देणे बरे, म्हणून त्याला खोटे बोलण्यास सांगितलें. त्यामुळे तो स्वर्गात तरी गेला. नाही तर नर्कातच गेला असता.

कल्पना कर की, आपण आपल्या घरांत असतां मागून आग लागली व पुढे पळून जावे म्हणून दारात आलो तर तेथे मोठा सर्प दिसला. अशा वेळेस काय करावे? घरांत राहावे तर अग्नि आहे व बाहेर जावे तर सर्प आहे. अशा वेळी सर्पावरून उडी टाकणे चांगलें होईल. घरात राहून जळून मरणार नाही. त्याप्रमाणे धर्माला दोन्हीकडून पापच लागत होते, पण खोटें बोलण्याचें पाप न्यून असल्यामुळे ते करण्यास हरकत नाही. पण धर्मानी तसे केले व देवांनी तसें खोटे बोलावयाला सांगितलें. म्हणून हा कांही धर्म समजूं नये. याप्रमाणे कोठे धर्मच अधर्म होतो व अधर्मासच कोठे आपण धर्म म्हणतो.

परमात्मा श्रीकृष्णाने श्रीराम अवतारीं बालीला पाठीमागे लपून मारले. त्या पापामुळे श्रीकृष्ण अवतारामध्ये तो वाली व्याध होऊन, त्याने श्रीकृष्णाचा आंगठा फोडला. पण गोकुळांत मात्र रास खेळतांना प्रतिबंध झाला नाही. जसें कर्म तसें त्याचें फळ असतें.

कित्येक नास्तिक कर्माचें फळ भोगावें लागतें वगैरे कांही मानीत नाहीत. त्यांना मी असें विचारतो की, मूर्खा जर कर्म-बिर्म कांही नाही व कर्माचें फळ कांही भोगावे लागत नाही तर एक जन्मतः आंधळा तर दुसरा मुका. एकाची लग्न झाल्याबरोबर स्त्री मरते तर एखाद्या स्त्रीचा लग्न झाल्याबरोबर पति मरतो. एक


गुणी असतो तर त्याची बायको कर्कशा असते. एक मनुष्य चुंबक असतो तर एक दिवाळखोर असतो. एखादे वेळीं आईबापाच्या आधीच मुलगा मरतो. एखाद्या मनुष्याला मुलाबाळापासून सुख मिळतें तर दुसऱ्याला दुःख मिळते. याप्रमाणे एकाला जन्मापासून एका प्रकारची परिस्थिति तर दुसऱ्याला दुसऱ्याच प्रकारची परिस्थिति मिळते. असें का? पूर्व जन्मीच्या पापपुण्याची फळे आहेत.एखाद्या मुलाचा बाप जन्मताच मरून जातो व त्याला दुःख होते.

## पुनर्जन्म

बरे, ईश्वरच अशा प्रकारचें दुःख देतो असें कोणी म्हणतात. हे बेटे लुच्चे असतात. परमेश्वर असे करील तर तो न्यायी होणार नाही. म्हणून जे धर्माधर्म आपल्या हातून घडतात त्याची बरी वाईट फळें कर्मांच्या तीव्रतेनुसार या जन्मीच किंवा पुढल्या जन्मी किंवा ज्या जन्मांत ती फलोन्मुख होतील त्या त्या जन्मांत भोगावीं लागतात. म्हणून पुनर्जन्म आहे. हे धर्माधर्म आपल्या बुद्धिनुसार ठरवितां येत नाहीत म्हणून तें शास्त्र व गुरु यांचेकडूनच समजावून घेणें चांगलें.

स्वासिनी स्त्रियांना पतिसेवा करणें हाच धर्म आहे. पतीच्या आज्ञेविरुद्ध व्रतादिक केल्यास तिचे पतन होते. कल्पना कर की, आपली तणाची जरी झोपडी असली तरी त्यांत आपण आपल्या इच्छेप्रमाणे वागूं. त्यांत आपण स्वतंत्र आहो. पण दुसऱ्याच्या दुमजली माडीवर राहिलो तरी आपण तेथे परतंत्रच आहो. आपलाच धर्म चांगला दुसऱ्याचा कितीहि चांगला असला तरी वाईट आहे. जगांतील सुखदुःखावरून त्यांना कर्मच कारण आहे असें समजावें. आपला धर्म थोडासा जरी असला तरी फायद्याचा आहे. भगवान म्हणतात,

**''स्वल्पमल्पस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्''**

दुसऱ्याचा धर्म जन्मभर जरी केला तरी फायद्याचा नाही. रोग दूर होईतोपर्यंतच औषधी घ्यावी लागते; त्याप्रमाणे जोपर्यंत आपल्याला परमेश्वराविषयी तळमळ लागत नाही, तोपर्यंतच धर्म करावा. पुढे मात्र फारसा आग्रह नसावा.

जोपर्यंत सुनेला मुलगा होत नाही, तोपर्यंत सासूच्या आज्ञेंत वागावें व तिला भिऊन वागावें व पुढे तिच्या डोक्यावर बसूं नये, पण इकडे तिकडे फिरावयास व बोलावयाला मोकळीक असते. त्याप्रमाणे तीव्र मुमुक्षा झाल्यावर मात्र फारसा आग्रह धरूं नये. अधर्म करूं नये. जगांतल्या सुखदुःखावरून तरी पापपुण्य आहे असें समजावें.

ज्यांना खाण्यापिण्याची चैन असते. त्यांनाच परमेश्वर नाही वगैरे वाटतें. अशांना जेव्हा दुःख प्राप्त होते तेव्हा मात्र त्यांचे चित्त ईश्वराकडे लागतें. अशा

लोकांना साधु पुरुष शाप देऊन दुःख देतात व परमेश्वराकडे वळवितात. दरिद्री, दुःखी हें परमेश्वराला नेहमीच आठवीत असतात.

नेहमीच कांही सुख तर कांही दुःख असतें व या सुखदुःखाबद्दल उपेक्ष राहून धर्म करीत असावें व असा धर्म करितां करितां ईश्वराविषयी अतिशय उत्कट इच्छा झाली म्हणजे धर्माचा विशेष आग्रह नसावा व पुढे ज्ञान करून घ्यावें व अर्जुनाला अशी इच्छा झाली होती व पुढे ईश्वराने ज्ञान सांगितलें, तेंच पुढे सांगूं. **मना तोवरि धर्म टाकूं नकोरे ॥ ...**

०००

## धर्माचा आग्रह कोठपर्यंत?

काल पाण्याशिवाय मासोळीला जशी तळमळ लागते त्याप्रमाणे ईश्वरप्राप्तीची तळमळ लागत नाही तोपर्यंत धर्म करावा. पुढे फारसा आग्रह धरू नये, असें सांगितलें. आता हे दृष्टांत देऊन सांगतो. पहा :- (हा दृष्टांत मी दिला होता असें वाटतें. कारण तो माझ्या प्रत्यभिज्ञेंत येतो.)

समज एका मनुष्याला रोग झाला. आता त्याला औषध देतो. औषध कोठपर्यंत देतो? रोग जाईपर्यंत. बरें पुढे विष देतो काय? नाही. औषध मात्र देत नाही. त्याप्रमाणे परमेश्वराविषयी तळमळ लागत नाही तोपर्यंत धर्म करावा. मग अधर्म करू नये. तरी फारसा आग्रह धरूं नये. रोग जाईपर्यंत औषध घेतो व पुढे ताकद आल्यावर औषध घेत नाही व विषहि खात नाही. पण दुसऱ्यांस तोच रोग झाला असतां आपण त्याला ते औषध देऊ व अशा करितांच, रोग नाहीसा झाल्यावर देखील लोकाकरिता आपल्याजवळ औषध पाहिजे. त्याप्रमाणे साधु पुरुष लोकांकरिता धर्माचरण करितात व कोणी अधर्मरूपी रोग ज्याला लागला आहे असा पुरुष त्यांचेपाशीं आल्यास त्याला धर्मरूपी औषध देऊन त्याचा रोग नाहीसा करितात.

अर्जुनाला असाच अधर्मरूपी रोग लागला होता. अर्जुन हा क्षत्रिय होता व क्षत्रियधर्म युद्धांत कोणीहि प्राप्त झालें तरी त्याच्याशीं युद्ध करावें, असा आहे. असें असून भीष्मादिकांशीं कसें युद्ध करूं, असें तो म्हणाला. येथे युद्ध न करणें त्याच्या धर्माच्या दृष्टीने अधर्म होत होता. तुमचा धर्म म्हणजे पतिसेवा करणें. या धर्माशिवाय तुम्हा स्त्रियांना दुसरा धर्मच नाही.

आता थोडी पहिल्या अध्यायांतील कथा सांगतो. युद्धाचे वेळीं दोन्हीकडील सैन्य उभें राहिले. कौरव-पांडव हे भाऊ होते. एका भावाचे पांडव व दुसऱ्या भावाचे कौरव होते. अशा रीतीने तयार झालेलें सैन्य जेव्हा अर्जुनाने पाहिलें तेव्हा तो



श्रीकृष्णास म्हणाला, ''कृष्णा ! या आपल्या बांधवांना मारून मग राज्य घ्यावें हें कांही चांगलें नाही. हें भीष्मादिक वडील व पूजनीय आहेत. अशाची पूजा न करितां उलट त्यांना मारावें हें कांही चांगलें नाही. मला हा अधर्म वाटतो.''

अशा रीतीने अर्जुनाला शोक झाला पण येथे युद्धांत कोणीहि असो भाऊ असो किंवा बाप असो, युद्ध करण्याला प्राप्त झाला असतां युद्ध केलें पाहिजे, हा जो क्षत्रिय धर्म तो अर्जुन विसरला. हा कांही तुम्हा स्त्रियांचा धर्म नव्हे. तुम्ही आपल्या धर्माने चालावे. घरच्या माणसाशीं तंटा वगैरे कांही करूं नये. अर्जुनाला शोक झाला तेव्हा त्याच्या हातून दोन अधर्माच्या गोष्टी होत होत्या.

१. अर्जुन आपला क्षत्रिय धर्म विसरला.

२. कौरवादिक घरचीं माणसें आहेत म्हणजे माझे बांधव आहेत असा 'माझा व तुझा' भाव उत्पन्न झाला. हा देह बुद्धीला धरून झाला. असा शोक देहाला धरून होत असतो व त्यामुळे परमेश्वराकडे चित्त लागणे कमी पडतें.

**''खोटे दुष्ट जे आहेत ते आपले समजू नये.''** दुर्योधनादिक खोटे दुष्ट होते. समज तुझा मुलगा सोनू तुला विष देण्याला तयार झाला तर तो तुला आवडेल काय? त्याला तू शत्रूप्रमाणे पाहशील. कारण अशाला 'आपले' जर म्हटलें तर ते नर्कात टाकतील. अर्जुन दुर्योधनाला 'आपला आहे' असें समजला म्हणून तो धर्म विसरला.

देहाच्या ठिकाणीं अहं बुद्धि व धर्माची विस्मृति या अशा दोन चुका त्यांच्याकडून होत होत्या. त्या देवांनी सुधरविल्या. देवांनी आधी अर्जुनाला असें सांगितलें की, जे खोटे दुष्ट आहेत ते आपले समजूं नये व नंतर त्याला त्याचा धर्म सांगितला. येथे मी आधी धर्म सांगतो व मग खोटे मनुष्य आपले नाहीत असें सांगीन.

धर्म विचारल्यावाचून आपण होऊन सांगूं नये. विचारल्यावाचून सांगितल्यास तो उपदेश स्वीकारला जात नाही. अनादर होतो.

कार्पण्यदोषोपहतः स्वभावः । पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेता ॥
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे । शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥२.७

अर्जुन म्हणतो, देवा ! मी कृपण झालो आहे, म्हणजे माझ्याजवळ विद्या आहे पण मी काय करूं हें समजत नाही. धर्महि मला समजत नाही व मी काय करावें हेहि मला समजत नाही. म्हणून महाराज! मी आपल्याला शरण आलो आहे. काय करूं तें सांगा.

**न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।**
**यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ २.६**

अर्जुन म्हणाला, देवा ! तुम्ही म्हणाल की यांना मारून टाक, पण हें माझ्याच्याने होत नाही व यांना मारुन मला जय मिळेल किंवा नाही हेहि सांगवत नाही. कारण भीष्मादिक मोठे वीर आहेत व यांना मारिलें तर आम्ही कांही वाचणार नाही.

**गुरून् हत्वा हि महानुभावान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।**
**हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुंजीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ॥२.५**

हे भीष्मादिक वास्तविक मला गुरुप्रमाणे आहेत व पूजनीय आहेत अशांना मारून राज्य मिळविण्यापेक्षा भिक्षा मागणें बरें असें मला वाटतें. कारण यांना मारून राज्य मिळविणें व यांच्या रक्तांत बुडलेले राज्य मग आपण भोगणे हे चांगलें नाही. इतके अर्जुन बोलला तरी देवांनी यावर कांहीच उत्तर दिले नाही. तेव्हा अर्जुन म्हणाला,

**पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः । यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे ।**
**शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥२-७**

देवा! मी आतापर्यंत जे सांगितलें, तें धर्माला धरून होते किंवा त्याच्यापासून अधर्म होईल हें तूं सांग. मला कांहीच समजत नाही. यांच्यात धर्म कोणता होईल व अधर्म कोणता होईल हें नीट सांग व तुला जें बरें दिसेल तें तूं सांग. हें अर्जुनाचे भाषण ऐकून देव हंसून म्हणाले,

**लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।**
**ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥३.३**

अर्जुना ! तूं फार निर्मळ आहेस. निर्मळ पुरुषाला आपल्या मनांतील गोष्ट सांगावी. तूं निर्मळ आहेस म्हणून तुला एक गोष्ट सांगतो. सृष्टि उत्पन्न केली तेव्हा मी लोकांना दोन गोष्ट सांगून ठेविल्या.

ज्यांना कांही करावेसें वाटतें, त्यांच्याकरिता धर्म व ज्यांना कांहीच करावेसें वाटत नाही, केवळ बसून राहावेसें वाटते, त्यांच्याकरिता ज्ञानमार्ग सांगितला आहे.

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥४.१**

अर्जुना! हा कर्मयोग मी पूर्वी सूर्याला सांगितला होता व सूर्याने पुढे मनूला सांगितला व मनूने पुढे इक्ष्वाकू राजाला सांगितला व तेथून पुढे परंपरेने प्रगट झाला. यावर अर्जुन म्हणाला, देवा !



**अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।**
**कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥४.४**

देवा ! हें तुमचें म्हणणें मला थोडे आश्चर्यकारक वाटतें, कारण तुझा जन्म तर आता झाला आहे व सूर्याला बरेच दिवस लोटलेत. मग तूं त्याला हा कर्मयोग सांगितला हे कसें? तेव्हा भगवान म्हणाले,

**बहूनि मे व्यतीतीनि जन्मानि तव चार्जुन ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥४.५**

''अर्जुना! असे माझे आणि तुझे बरेच जन्म झालेत, त्या सर्वांना मी मात्र जाणतो. तूं कांही जाणत नाहीस. तूं एवढा विद्वान् असून तुझी बुद्धि काय झाली कोण जाणे.'' देवाला पूर्व जन्माची आठवण होती. कारण ते ईश्वर होते. ईश्वराची बुद्धि अशी असते, की त्याला देवांचे व लोकांचे सृष्टिपासून जितके जन्म झाले असतील तेवढेहि माहीत असतात. तसे जीवांना माहीत नसतात; पण त्यांतहि कांही जीवांना माहीत असते. अशी आठवण कोणाला राहूं शकते? समज, तुझा सोनू शाळेंत जातो. आपल्या घरामागेंच शाळा आहे व तेथून मास्तर काय काय शिकवितो हें सर्व ऐकूं येते. पण पूर्ण लक्ष नसल्यामुळे त्याला आठवण राहात नाही. पण सोनूचे लक्ष त्याकडेच असल्यामुळे त्याला प्रत्येक गोष्ट आठवत असते.

त्याप्रमाणे योगी वगैरे जे असतात त्यांना त्यांचे तिकडे लक्ष असल्यामुळे मागील जन्माची आठवण असते. पण आपण या जन्मींच्याच लोकांविषयी विचार करतो म्हणून मागील जन्माविषयी स्मृति होत नाही. आपण पूर्व जन्मींच्या गोष्टीविषयी चित्त एकाग्र करीत नाही. ज्याला स्मृति कमी असते त्यला श्रद्धा ठेविली पाहिजे. अर्जुन मोठा निर्मळ होता. म्हणून देवांनी सांगितल्यावर त्याला पटलें.

धर्ममार्गात आपल्याला दुसऱ्याच्या स्वाधीन व्हावें लागतें व ज्ञानमार्गात आपण स्वतंत्र असतो. याप्रमाणे कर्ममार्ग व ज्ञानमार्ग असे दोन मार्ग आहेत. परंतु धर्ममार्ग सोडून एकदम ज्ञानमार्ग घेतां येत नाही. कल्पना कर. तुझ्या सोनूचें लग्न झालें. तुला सून आली. तिचे गुण चांगले आहेत. पण जर मुलांत खेळणें आवडत असलें व काम करण्याकडे फारसें लक्ष नसलें तर ती तुला आवडेल काय? आवडणार नाही. पण तेंच तिला एखादा मुलगा झाला म्हणजे, जर ती मुलाला घेणें, खेळविणें सोडून देऊन कामच करीत राहिली तरी तुला आवडणार नाही, मूल झालें नाही तोपर्यंत ती तुझ्या स्वाधीन होती पण मूल झाल्यावर ती थोडी परतंत्र झाली.

यांप्रमाणे धर्मात दुसऱ्याच्या स्वाधीन असतो, हा धर्ममार्ग परतंत्र आहे. ज्ञान झाल्यावर धर्माची मग गरज नाही. पण त्याशिवाय उपायच नाही. मुलगा झाल्यावर तुझी सून त्याला न खेळवितां घरांतलें कामच करीत राहिली तर तुला पसंत पडणार नाही. धर्ममागे दुसऱ्याच्या स्वाधीन होऊनच करावा लागतो. ज्ञान झाल्यावर अधर्म होत नाही पण तेवढी आसक्ति नसते. परमेश्वरप्राप्तीची इच्छा झाली म्हणजे मग आग्रह नको. नुसत्या धर्मानेच मनुष्याचें हित होत नाही. त्याकरिता पुढे ज्ञानमार्ग पाहिजे.

धर्ममार्गात हात, पाय, नाक, डोळे, नाड्यांना काम करावें लागतें; पण ज्ञानमार्गात मनानेच सर्व काम करावे लागते. तेंच शुद्ध करीत जावें व शेवटीं ईश्वरांत मिळून जावें. समज मन एक नदी आहे व आपण आकाशांतून पडणाऱ्या पाण्यामुळे पूर येतो त्याप्रमाणे आहो. किंवा मन एक घोडा व आपण जसें घोड्यावर बसून घरीं जातो, त्याप्रमाणे मनरूपी घोड्यावर बसून परमेश्वरांत मिळावें लागतें.

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।**

**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥६.३**

(ध्यान)योग म्हणून ज्याला प्राप्त करून घ्यावायाचा आहे, त्याने अगोदर कर्मे केली पाहिजें व एकदा त्या योगाच्या ठिकाणीं स्थित झाला म्हणजे कर्मापासून निवृत्त झालें पाहिजें. आपल्याला जेथे सुखाचा साठा असेल तेथे जावयाचें आहे. मोक्ष एक पहाड आहे. (ही उपमा आहे. समज, मुलगा रडावयाला लागला तर आपण त्यास 'काय राक्षसासारखा रडतोस रे' असें म्हणतो. तर तेवढ्या म्हणण्यावरून तो राक्षस झाला काय? नाही. राक्षस झाला असतां तर त्याने म्हणणाऱ्यांना खाल्लें असतें. त्याप्रमाणे येथे मोक्ष एक पहाड आहे, असे म्हटल्यावरून तो पहाड नाही. मोक्ष म्हणजे पहाड नाही तर ही उपमा आहे.) आता या पहाडावर आपल्याला चढावयाचें आहे. त्या मोक्षरूपी पहाडावर चढावयाला आपल्याला शरीराने धर्म केला पाहिजे व धर्म करूं करूं थकलो म्हणजे तेथे बसावें. पुढे धर्म वाढवूं नये. याप्रमाणे मन थकलें म्हणजे शम म्हणतात.

## प्रथम धर्माचरण नंतर ज्ञान

ज्यांनी पूर्व जन्मीं किंवा या जन्मीं धर्म केला आहे तेच ज्ञानाचे अधिकारी होतात व ज्यांना कांहीच माहीत नाही त्यांनी या जन्मीं धर्मच केला पाहिजे. समज तुझ्या घरांत रेती पडली आहे. तूं आपल्या मुलीस गहूं निवडावयास सांगितलें व बरें करतें म्हणून ती रेतीवर जाऊन बसली. रेतीतील खडे इकडच्या तिकडे टाकीत



बसली. तूं म्हणशील, कार्टे ! इकडे तिकडे खडे फेकत बसण्यापेक्षा गहू न निवडायाला तुला काय झालें ? या प्रमाणे भगवान-पार्थाला म्हणतात,

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**

**क्रियते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः॥ ३.५**

**यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।**

**कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ३.७**

भगवान म्हणतात, पार्था तूं कांही तरी कर्म करशीलच. रिकामा कोणी बसूं शकत नाही. मग चांगलें काम न करितां भलतेंच काम करण्यांत काय अर्थ आहे? जें आपल्या धर्माप्रमाणे सांगितलें असेल तेंच करणें चांगलें. रिकामे तर बसणेंच होत नाही, मग कांही तरी करीत बसण्यापेक्षा जीं आपल्याला उचित कर्में आहेत तींच करावींत. तुला तरी रिकामें बसावें असें वाटणार नाही. कांहीतरी करशीलच. मग त्यापेक्षा आपला धर्म जो पतिसेवा तो कां करूं नये?

होईल त्या रीतीने धर्म करावा. हाताने, पायाने, उठतां बसतां वाटेल त्या वेळेला आपला धर्म करीत असावें.

तुझी मुलगी अंगणांतले खडे फेकीत बसली तर त्यापासून काय फायदा झाला? कांही नाही. उलट अंगणांत खडे पडलेत. त्याप्रमाणे रिकामे बसण्यापेक्षा धर्मच करणें चांगले व हा धर्म देवाला तरी प्राप्त करून देतो. रिकामे बसून भलतेंच करण्यापासून एखादे वेळीं नुकसान होतें. पण हा धर्म ईश्वर मिळविण्यांत साह्य करितो.

**सहयज्ञः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।**

**अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्ट कामधुक् ॥३.१०**

ज्या वेळेला ब्रह्मदेवाने सृष्टि उत्पन्न केली, त्यावेळेला त्यांनी धर्म उत्पन्न केला व प्रजेला सांगितलें की, या धर्माप्रमाणे तुम्ही चाला, म्हणजे हा धर्म कामधेनुप्रमाणे तुम्हा सर्वांची इच्छा पुरविणारा होईल. मुलगा लहान अज्ञ असेतोपर्यंत तो आपल्या आईबापावर अवलंबून असतो. आईबापाच्या सांगण्याप्रमाणे व त्यांच्यावर अवलंबून जोपर्यंत राहतो तोपर्यंत त्याला चांगली वासना उत्पन्न होत असते व पुढे विषय सुखाचा झपाटा लागून थोडी आईबापाची उपेक्षा करून वाईट संगतीने राहूं लागला की, त्याला वाईट इच्छा होऊं लागतात. त्याप्रमाणे प्रजालोकांनी ब्रह्मदेवाला

विचारलें की, 'देवा! आम्ही देवाला कसें मिळवून घ्यावें?' तेव्हा त्यांनी सांगितलें, 'हा धर्म तुम्ही करा म्हणजे तुमचा हेतु पूर्ण होईल.'

## स्त्रियांचा यज्ञ

तूं दहा हजार ब्राह्मणांना खाऊ घातल्यास यज्ञ होणार नाही. पण तुझ्या पतीला जर फार भूक लागली आहे व तूं जर त्याला त्या वेळेला खाऊं घालशील तर तुझा यज्ञ झाला. तूं जर असें न करितां तें अन्न अग्नीत टाकशील तर तो यज्ञ होणार नाही. उलट पाप होईल. म्हणून ब्रह्मदेव म्हणाले, 'तुम्हीं आपापला धर्म करा म्हणजे तोच तुमच्या इष्ट हेतूला देणारा होईल'

**देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ॥**
**परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ॥३.११**

समज एखाद्या घरी पति व स्त्री दोघेहि चांगले आहेत. स्त्री नेहमी पतीच्या आज्ञेंत तत्पर असते व नेहमी त्याच्या मनोगताप्रमाणे वागून त्याची प्रीति संपादन करते. अशी स्त्री असली म्हणजे सहजच पतीलाहि तिच्यावर प्रेम करावासा वाटतो व नेहमी तिच्याशी गोड व प्रेमाने बोलत असतो. तेंच जर एखादे ठिकाणी स्त्री पतीची आज्ञा पाळत नसली व दोघांमध्ये किटकिट होत असली तर तो तिच्याशी तर प्रेमाने बोलणार नाहीच, पण कंटाळून एखादे वेळेला तिचें तोंडहि पाहणार नाही.

ब्रह्मदेव म्हणाले, तुम्ही आपला धर्म करा व देवाला प्रसन्न करून घ्या, म्हणजे सहजच देव तुम्हावर प्रीति करतील. तुम्हीच जर देवाला प्रसन्न करून घेणार नाही तर ते तरी तुम्ही प्रीति संपादन करून घेण्याच्या खटपटींत कशाला पडतील? म्हणून तुम्ही आपला धर्म करून त्यांना प्रसन्न करून घ्या म्हणजे ते तुमच्यावर प्रेम करतील व ईश्वर प्राप्त करून देण्यांत साह्य करतील.

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्टत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥३.५**

कोणीहि मनुष्य रिकामा बसूं शकत नाही. कांहीतरी करीतच असतो. मग काहीतरी निषिद्ध करण्यापेक्षा होईल तेवढा आपला धर्मच करणें चांगले. समज तुझी कमळा अंगणांतील खडे उकरत बसली तर तूं तिला काय म्हणशील? असेंच म्हणशील की 'कार्टे! रिकामे उगीच खडे उकरत बसण्यापेक्षा गहूं निवडत बैस'. तुझी ती प्रेमाची असली तरी तूं रागावून तिला काम करावयाला लावशील. तूं तिला म्हणशील की, 'अग ! गहूं निसण्यांत अनायासे तुझा खेळहि होतो व गहूंहि निसले



जातील.'

प्रत्येक प्राणी कांहीना कांहीतरी करतोच. कोणी गवतच उपडत बसेल, कोणी काड्या मोडत बसतो. कोणी गोटेच फेकतो, कोणी झोपच घेतो. एवं कांहीना कांहीतरी प्रत्येक जण करीतच राहतो. रिकामा बसत नाही. मग असा वेळ घालण्यापेक्षा धर्म कां करूं नये. रिकामे खडे उकरत बसण्यापेक्षा गहूं निसणें जसें बरें, तसें कांहीही करण्यापेक्षा धर्म करणें चांगले.

शास्त्राप्रमाणे ज्याचा जो धर्म असेल तोच त्यांनी करावा. दुसरा करूं नये. दुसऱ्या धर्माच्या योगाने पतन होतें. प्रस्तुत गीताहि अर्जुन क्षत्रिय असल्यामुळे देवांनी क्षात्र धर्माला अनुसरून ती सांगितली. नुसत्या काड्या मोडण्यापेक्षा हाती माळ घेऊन जप करीत बसणे बरे. कांहीतरी करणेंच जर आहे तर मग धर्म कां करूं नये? आळस कां करावा?

पहिल्या निरूपणांत मी सांगितलें की, जर आपल्याला तहान लागली आहे व पाणी घरात नाही व पाणी तर प्यालें पाहिजें, मग कसे करावयाचें? कोठून तरी आणलें पाहिजें. कोठून आणावयाचें? जेथे पाण्याचा साठा असेल तेथूनच आणलें पाहिजें. त्याप्रमाणे आपल्याला तर सुख पाहिजे व तेंहि अखंड पाहिजे व असे सुख तर संसारांत नाही व त्याची तर इच्छा आहे. मग कसें? तें कोठून तरी मिळविलें पाहिजें. कोठून मिळवावयाचें? जेथे सुखाचा साठा म्हणजे परमात्मा आहे, तेथून सुख मिळवून घेतले पाहिजे. जेथे सुख आहे तेथे आपला प्रेम जडतो. आपल्या सुखासाठी आपण दुसऱ्यावर प्रेम करतो म्हणजे सर्वापेक्षा आपल्याला आपलीच आवडी जास्त आहे. आपल्या हृदयस्थ परमात्म्यावर आपला प्रेम आहेच. सुखाचा साठा म्हणून जो सांगितला तो परमेश्वर आपल्या हृदयांतच आहे मग आपल्याला सुख मिळवावयाला कोठे दूर गेले पाहिजे काय? कोठे जावयाला नको आहे. आपल्याला सुख पाहिजे. सुखाचा साठा परमेश्वर व तोहि आपल्या हृदयांतच आहे. मग आपल्याला ते सुख कां मिळत नाही? ज्या रीतीने आपल्या हृदयांतील परमेश्वराचें सुख मिळतें ती रीत पुढे सांगूं.

आपल्याला मोक्षरूप शिखरावर चढून जावयाचें आहे. मोक्षाला पर्वताची उपमा आहे. जसें तूं म्हटलें की, हें मूल काय राक्षसासारखें रडतें? तर तो राक्षस झाला काय? परंतु राक्षस जसे ओरडतात तसा तो ओरडावयाला लागला म्हणून राक्षसाची उपमा दिली. तसेंच मोक्षाला पर्वताची उपमा दिली. शिखरावर मोक्षरूप शिखरावर चढून जावें लागतें. चढता चढता वर गेल्यावर पाय थकले म्हणजे बसावें लागते.

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।**
**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥६.३**

मोक्षरूपी शिक्षरावर चढण्याकरिता धर्मच पाय आहेत. तो धर्म करिता करितां पाण्याबाहेर काढलेली मासोळी जशी पाण्याशिवाय तळमळते त्याप्रमाणे ईश्वराविषयी तळमळ लागली म्हणजे धर्माविषयी फारसा आग्रह नसावा. ''जेव्हा आपल्याला संसारांतील कोणतीहि गोष्ट आवडणार नाही तेव्हा समजावें की, आता आपण शिखरावर पोहोचलो.'' मग पाय थकले म्हणून तेथे बसावयाचेंच उरलें. म्हणजे परमेश्वराजवळ तर आपण आलोच. फक्त आता काय ते तेथे मन रोखून परमात्म्यांत मिळून सुख घेण्याचेंच बाकी उरलें.

जोपर्यंत आपण परमात्म्याजवळ आलो नाही तोपर्यंत आपल्याला धर्म करावा लागतो. धर्म परतंत्रतेने करावा लागतो. तुझ्या सोनूचें लग्न झालें व सून आली म्हणजे ती जर कांही काम न करितां नुसती उभी राहिली तर तुला बरें वाटणार नाही. तिला काम करावयाला लावून काम शिकविशील. पुढे तिला मुलगा झाला म्हणजे जर ती, मुलगा रडला तरी मुलाला न घेतां जर कामच करीत राहिली तर तें तुला बरें वाटणार नाही. त्या मुलाला खेळविण्याला, पाजण्याला तिला सांगशील.

परमेश्वरप्राप्तीची दृढ इच्छा होईपर्यंत धर्म करावा व तो परतंत्रतेनेच करावा. परमेश्वराविषयी तळमळ लागली म्हणजे हृदयस्थ परमात्म्याची ओळख करून घेण्याची थोडी खटपट लागते. धर्म न करून इच्छा होत नाही.

सुनेने मुलाला खेळवून गृहकृत्यहि केलें पाहिजे. मुलगा झाल्यानंतर नुसतें मुलालाच खेळवित बसेल, तर तेंहि बरें वाटणार नाही. त्याप्रमाणे परमेश्वरप्राप्तीची पूर्ण तळमळ लागल्यावर धर्म सोडला तर तेंहि चालत नाही. मुमुक्षुदशेंतहि धर्म करीत राहावें. मुलाच्या खेळविण्याच्या नादांत सुनेने घरचें काम करणें अगदीच सोडून दिलें, व तुझेंहि न ऐकिलें तर प्रपंच चालणार नाही. पुढे तिची सूनहि असेंच तिचे ऐकणार नाही व याप्रमाणे अवज्ञा-परंपराच लागेल. तसे जाणत्या व समंजस स्त्रियांनी जर आपल्याला परमेश्वरप्राप्तीची इच्छा झाली, आता धर्माचे काय करावयाचें आहे असे म्हणून धर्म सोडल्यास परमार्थांत देवता हजारों विघ्नें करितात व परमार्थांत मोठे कष्ट पडतील.

अशा स्थितींत समजा आपला परमार्थ साधला तरी आपल्या मुलांना पुढे कोण धर्म शिकवील? त्यांना तर आज परमेश्वराची इच्छा नाही व ते आपण जसें करितो तसें करतात. त्यांना बरे-वाईट कळत नसते. अशा स्थितींत आपण धर्म सोडला तर तेहि सोडून देतील. आणि परमेश्वरप्राप्तीच्या उत्कट इच्छेवाचून धर्म



सोडल्यामुळे नर्काला जातील व पुढे संप्रदाय चालविण्याला राहणार नाही. तर धर्म सर्वथा टाकूं नये आणि परमेश्वरप्राप्तीची इच्छा झाली म्हणजे फारसें धर्मावर अवलंबून राहूं नये.

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥१६.३**

धर्म किंवा अधर्म दोन्ही आपल्या मनाने ठरवितां येत नाही. मुलाला रोग झाला व आपल्याला माहीत नसून आपण काड्या गोटे उगाळून दिले तर चालणार नाही. औषधशास्त्र जाणूनच रोगाप्रमाणे योग्य औषधी दिली पाहिजे. अशा वेळीं आपण औषधी पुस्तकांतूनच पाहून देतो, किंवा नाही? आपल्याला स्वतःला दुःख झाले, तर आपल्या मताने औषधी घेऊन चालणार नाही. अनुभविक वैद्य जेव्हा शास्त्राप्रमाणे औषधी देतील तेव्हाच रोग बसेल. पुस्तकाप्रमाणे औषध देतील तर फायदा होईलच. आपल्याला धर्म केलाच पाहिजे व तो आपल्या मताप्रमाणे केला तर बरोबर होणार नाही. भलताच परिणाम होईल. याविषयी एक कथा सांगतो.

## कैकईची कथा

एक बाई होती. तिचें नांव कैकई असें होतें. ती अगदी हट्टी होती. तिने एका वैद्याला एका ठिकाणीं औषध देतांना पाहिलें. तिला वाटलें की, नुसती खस घालून दिली तर मोठमोठे रोग बसतात व पुढे मान मिळतो व तसेच पुष्कळ पैसे मिळतात. तिला वाटलें की, आपण वैद्याला औषधी विचारून घ्यावी व वैद्यकी सुरु करावी.

दुसऱ्या दिवशीं वैद्याच्या घरीं गेली व ''तुम्ही रोग्यांना कोणतें औषध देतां?'' असें विचारूं लागली.

यावर वैद्य म्हणाला, ''बाई! मी रोग पाहून औषध देत असतों. एकच औषध सर्व रोगांवर लागूं पडत नाही. त्याच्यासाठी वैद्यशास्त्र शिकावें लागतें. नाहीतर भलताच परिणाम होतो व त्याचें अपयश वैद्याच्या माथीं येतें. तुम्ही एखादी औषधी जाणण्याची खटपट करूं नका.''

त्या बाईला वाटलें की, याला दुसऱ्याला सांगावयाचें नाही म्हणून छपवाछपवी करून राहिला आहे व तिने अधिकच हट्ट घेतला. शेवटीं वैद्याने तिला एक मात्रा दिली व सांगितलें की ''ही मात्रा दिल्यानंतर तीन दिवस रोग्याला लंघन देत जा.''

त्या बाईला वाटलें की, झालें. सर्व वैद्यशास्त्राची किल्ली आपल्या हातांत आली. पुढे त्या बाईने ती मात्रा वाटेल त्या रोगावर वाटेल त्याला द्यावी. एके दिवशीं त्या बाईच्या मुलाला हगवण लागली. त्याला तिने ती मात्रा पुष्कळशी घासून

दिली. त्यामुळे बिमारी एकदम वाढून प्रकृति अति बिघडली व पुढे त्याला तीन दिवस लंघन करावयास लाविलें. त्यामुळे चवथे दिवशीं तो मुलगा मेला.

## शास्त्राप्रमाणेच धर्माधर्म करावे

याचप्रमाणे कोणताहि धर्माधर्म कोणाच्याहि सांगितल्यावरून अथवा आपल्या बुद्धीने केला तर भलताच परिणाम होतो. म्हणून धर्माधर्म शास्त्रानेच ठरतात. आपल्याला बरोबर माहित नसलें तर शास्त्राप्रमाणेंच चालावें. विरुद्ध कोणी कितीहि सांगितलें तरी ऐकूं नये. एकवेळ कदाचित समजणार नाही. पण पुढे पुढे समजावयाला लागेल. शास्त्र पुढे असून सद्‌गुरु जर समजावून देणारे असले तर दुधांत साखरच पडली म्हणावयाचें. सद्‌गुरु जवळ नसले तर शास्त्रावरूनच काम भागवून घ्यावें.

ज्याला लोकांवर दया करण्याची इच्छा आहे तो जिवंतपणीं व्यवहारांत खोटें जरी बोलला तरी मेल्यावर मागच्या लोकाकरिता तरी खोटें लिहून ठेवणार नाही हें खास. कृपण मनुष्य मेल्यावर कोणाला धन द्यावयाचें नसलें तर तो आपलें धन लिहून ठेवणार नाही. परंतु परोपकारी मनुष्य कधीच खोटें बोलणार नाही. ग्रंथांत चांगल्या मनुष्याने विष खावें असें कधीच लिहून ठेवणार नाही. बागुलबोवा आला म्हणून लहान लेकराला लटकेंच जरी सांगितलें तरी त्यांत त्याचें कल्याण आहे. ज्या ज्या प्रकारचा मनुष्याचा अधिकार असेल त्या त्या अधिकाराला धरून शास्त्रांत धर्म सांगितलें आहेत. शास्त्रांनी सगळ्या धर्माचें फळ हेंच सांगितलें आहे की, प्राण्याला कोणीकडून तरी ईश्वरप्राप्तीची इच्छा उत्कट व्हावी.

**पितामहस्य जगतो माता धाता पितामहः ।**
**वेद्यं पवित्रमोंकार ऋक्सामयजुरेव च ॥९.१७**

परमेश्वर हाच सर्वांचा आईबाप आहे. आपलें कांही दुखलें तर आईबाप दुरुस्त करितात. आपल्या मुलाला लिहितां कसें येईल, वाचतां कसें येईल, ऊन लागेल काय, तहान लागेल काय, इत्यादि काळजी घेतात, हें न केले तर कांही येणार नाही.

जगांतील सर्व जीव शिकलेले असतात. शिकविल्याशिवाय जर कोणाला कांही आले असतें तर सर्वच एक स्वभावाचे झाले असते. पण एक कमी विद्वान, तर दुसरा जास्त विद्वान दृष्टीस पडतात. अर्थात हे सगळे शिकलेलेच आहेत. मनुष्य जातीला तर आपण शिकवितो परंतु पशुपक्षांस कोण शिकवितो? वत्साला पाजणें, वत्साने दुध पिणें, वानराला उत्तम रीतीने विषाची परिक्षा करिता येणें, धनचीडीला



उत्तम कोसला तयार करितां येणें, साळुंकीला मंजुळ बोलतां येणे, वगैरे कोण शिकवितो? तो एक परमेश्वरच सर्वांना शिकवितो. तोच माता, पिता व धाता आहे. सर्व मनुष्य सारखेच असतात. दोन मुलें शिकत आहेत. एक हुषार निघतो व दुसरा टोणपा निघतो. असें कां व्हावें? शिक्षण तर दोघांनाहि दिलें. एकच शिक्षण दिलें, मग दोघांत फरक कां? एका उबाळ्यांत धोतर धरले तर जळेल. तसे दोघांनाही सारखे पढविले. दोघेहि विद्वान व्हायला पाहिजे होते.

ह्यावरून त्या सर्वांना परमात्माच शिकविणारा आहे. नाही तर सर्वांची सारखी बुद्धि व्हावी. तो परमात्माच आपली विद्या दुसऱ्याला देतो. कोणाला वेद, कोणाला शास्त्र, कोणाला पुराण असें त्याच्या त्याच्या कर्मानुसार परमात्मा त्यांना त्यांना शिकवितो.

तुझ्याजवळ चार किल्ल्या आहेत. एक रुपयाच्या तिजोरीची, एक कोठाराची, एक गायवाड्याची व एक कपड्यालत्त्याची. आणखी चार मुलें आहेत. तर ज्याला जें काम चांगलें येत असेल तीच किल्ली त्याला देशील. तसें ज्याचें जसें कर्म असेल त्याप्रमाणे त्यांना तो शिकवितो. लहानपणीं आपण सर्वांना सारखे शिकवितो. परंतु पुढे समजावयाला लागलें की, ज्याची जशी इच्छा असेल त्या त्या प्रमाणे त्याला शिकवितो. परमेश्वराने आरंभीं सर्वांना एकच शिकविलें. 'आपले मन आपल्या ताब्यांत ठेवून विषयांच्या स्वाधीन होऊं नये' पुढे ज्याची श्रद्धा बसली तें तें त्याला परमात्मा सांगत गेला. लहानपणीं आपला आईवरच प्रेम असतो व तेथेच आपण बसतो. पुढे मोठेपणीं जेथे आपला प्रेम असेल तेथे आपण बसतो. जसें जसें ज्याचें कर्म असेल तसें तसें त्याला शिकवितो.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥७.२१**

लहान मूल आपल्या घरीं असलें म्हणजे आपण त्याला तोंडाने शिकवितो. दूर गेलें तर पत्र पाठवितो. 'दुसऱ्याशीं भांडू नयें. बाष्कळपणा करूं नयें. चोरी करू नयें.' इत्यादिक नाना रीतीने शिकवितो.

त्याप्रमाणे शुद्धबुद्धीच्या माणासाला परमात्मा स्वतः आंतून शिकवितो व पुढे विषयांत गुंग झालो म्हणजे परमेश्वरापासून दूर गेलो, त्याच्याकरिता परमात्मा वेद, शास्त्र, पुराणादिक पाठवितो. वेद, शास्त्र, पुराणादिक देवानेच केले आहेत.

**सर्वस्यं चाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।**
**वेदैश्च सर्वेरहमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहं ॥१५.१५**

परमात्मा म्हणतात, वेदशास्त्र पुराणादिक मीच केलें. मीच ते शिकवितो, व त्याच्या योगाने मीच जाणल्या जातो. आपली आई आपल्याला विष देणार नाही. त्याचप्रमाणे परमात्मा आपल्याला खोटे कसें सांगेल? त्याने केलेलें खोटें नाही व त्या शास्त्रावरूनच धर्माधर्म समजून घ्यावें. कोणी कोणतें शास्त्र शिकावें हें पुढे सांगीन.

## शास्त्र म्हणजें काय ?

भगवान म्हणतात, पार्था ! तुला कोणतें शास्त्र कोणी शिकावें, हें सांगण्यापूर्वी शास्त्र म्हणजें काय हे सांगतो. शास्त्र म्हणजे जें लिहिलेलें असून पुढचा मार्ग शिकवितें तें. तूं मुलीला स्वयंपाक शिकविलास तर तें शास्त्र नाही. कारण तें लिहिलेंलें नाही, म्हणून लिहिलेलें असून जें पुढचा मार्ग शिकवितें तें शास्त्र म्हणावें. आपला खरा हितकर्ता जो असेल त्याने लिहून ठेविलेलें तें शास्त्र म्हणावें. तें शास्त्र दोन प्रकारचें आहे.

आई लेकरांचें हित करणारी आहे. बायकोहि पतीचें हित करिते, पण पतिव्रता असली तर! मात्र जारिणी असली तर पतीचें अनहित करण्याला प्रवृत्त होईल. आई जारिणी असली तरी विष देणार नाही व,, चित् आई विष देण्याला प्रवृत्त झालीच तर मुलगा मेल्यावर तीहि झुरून मरेल. आईवर प्रत्येक जण भरंवसा टाकतो. स्त्री पतिव्रता राहिली तर तिच्यावरहि विश्वास ठेवतां येतो.

त्याप्रमाणे ईश्वराने केलेले जे वेद त्यावर विश्वास ठेवावा कारण तो सर्वांचा हितकर्ता आहे. मूल कसेंहि असलें तरी आई सर्वांवर सारखा प्रेम करतें. इतर बहिणी वगैरे मुलाने पोसावें म्हणून प्रेम करतात. परमात्मा कांही मिळावें म्हणून प्रेम करीत नाही.

## पितामहस्य जगतो माता धाता पितामहः॥९.१७

आता परमात्मा आई कसा आहे तें पहा. पुष्कळ लोक पापी आहेत व पुण्यवानहि आहेत. प्राण्यांना पापाचरणामुळे पशुयोनीला जावें लागतें व पुण्यकार्मांच्या योगाने ब्राह्मणादि योनी मिळतात. परमेश्वर कांही प्राण्यांना विनाकारण योनी देत नाही. ज्याचें जसें कर्म असतें तसें त्याला योनीत्व प्राप्त होतें. त्याने विषहि उत्पन्न केलें व दुधहि उत्पन्न केलें. पण ज्याचें जसें कर्म असेल तसें त्याला भोग मिळतात. पुण्यवान प्राण्याला दुधादिक उत्तम पदार्थ मिळतात व पाप्याला नर्कादिक प्राप्त होतात. डुकरींचीं पिलें जन्मतांच तिचें दुध पितात, पण पुढे नर्क खातात. त्याप्रमाणे मनुष्यप्राणी गर्भांत असतांना ईश्वराकडे पाहतो पण जन्मल्यावर विषय भोगूं लागतों.

परमेश्वर कर्माचें फल मात्र देतो. पापाचरणाकडे प्रवृत्त कोणालाहि करीत



नाही. परमात्मा सर्वांचा हितकर्ता आहे; तशीं इतर शास्त्रें नाहींत. आई मुलांना जितक्या प्रेमाने वागविते तितक्या प्रेमाने कोणी वागवीत नाही. स्त्री आपल्या पतीला प्रेमाने वागविते पण,, चित् प्रसंगीं धोका होण्याचा संभव असतो. वेदाला सोडून इतर शास्त्रानें सांगितलेंलें देवाचें भजन केव्हा केव्हा चुकतें. तसें एखाद्याला विचारावें की, 'कारे बा, आज पाणी येईल?'

तो म्हणतो की, ''येईल, पण बरोबर सांगवत नाही. मी कांही देवाचा लेक नाही. लागली गोळी तर लागून जाईल.''

वेदाला सोडून जीं इतर शास्त्रें आहेत त्यांनी सांगितलेंलें देवाचें भजन अंदाजाचें असतें. एखादे वेळेला बरोबर तर एखादे वेळेला चुकतें. वेदाने जें सांगितलें तेंच जर इतर शास्त्राने सांगितलें तर घ्यावें पण वेद विरहित मार्ग घेऊ नयें. त्याचप्रमाणे गीताहि परमेश्वराने सांगितली आहे म्हणून तिला वेदच म्हणतां येते. गीता किंवा वेद यांत जसें लिहून ठेविलें तसें चालावें. ज्याचा जसा अधिकार तसें लिहून ठेविलें आहे. तुला बाराखडी माहीत नाही तर संस्कृत कसें वाचता येईल?

शास्त्रांत अधिकाराप्रमाणे नियम आहेत. नुसतें वाचल्याने कांही आपल्या अधिकारानुरूप कोणते धर्म आहेत. हे समजत नसते. जसे एखादा चांगला वैद्य आहे. त्याला कोणत्या रोगावर कोणती औषणी द्यावी हे माहित आहे. जर एखादा मनुष्य बिमार झाला व त्याच्या घरच्या माणसांना सांगितले की, याला थंड पाण्याचे स्नान घाला. हा थंड पाण्याचा ज्याने उपचार सांगितला त्याने वैद्यशास्त्र मात्र वाचले आहे, पण कोण्या रोगावर कोणती औषधी द्यावी हे समजत नसल्यामुळे वैद्यशास्त्रांतून एक औषध पाहून सांगितले. आता बिमार मनुष्याला आपली प्रकृति सुधारण्याची इच्छा असल्यामुळे कोणतेंहि औषध सांगितले तरी ते चटकन करण्यास तयार होतो. कारण तो गरजवंत असतो. गजरवंतास अक्कल नसते.

त्याप्रमाणे देवाविषयी अति तळमळ लागली म्हणजे देव कसा भेटेल अशी नेहमी चिंता वाहत शास्त्रावलोकन करतो व कोणतीहि एक प्रक्रिया घेऊन तो त्याप्रमाणे करीत बसतो. परंतु त्याला आपण अधिकारी आहो किंवा नाही हें समजत नाही. म्हणून पहिले साधु पुरुषाला शरण गेले पाहिजे. त्यांना स्वतःची गरज नसते व दुसऱ्याची गरज नसते. वैद्याला औषध माहीत नसलें व पैसे जर मिळताहेत तर कांही तरी औषधी सांगून देतो. या रोगावर हे औषध चालेल किंवा नाही हे तो पाहात नाही. रोगी मरावयाला टेकला आहे तरी त्याला थंड पाण्याचें स्नान घाला असे तो सांगील व तो रोगी प्रकृतिविषयी उतावीळ असल्यामुळे तो ते

लगेच करील. पण एखादा वैद्य असा असला की, त्याला कांही पैसे घ्यावयाचे नाही व उपकारार्थ नुसते औषधीचा संग्रह करितो तो त्या रोग्याला जे औषध त्याच्या रोगावर चालेल ते औषध देईल.

त्याप्रमाणे साधु पुरुष आपल्यापाशी धर्म लोकांवर उपकार करण्याकरिता ठेवतात. त्यामुळे ते यथाधिकार धर्म सांगतात. लोकांचे दुःख दूर व्हावें ही इच्छा! भलतें कधीहि सांगत नाहीत. शास्त्र सत्पुरुषाचे तोंडून समजून घ्यावे. जेथे साधुपुरुष व शास्त्र मिळतात तेथे धर्म घडून मोक्षहि घडतो. याप्रमाणे साधुपुरुषाच्या सांगण्याप्रमाणे धर्म करावा म्हणजे ज्ञानाची इच्छा होते. मासोळी पाण्याशिवाय जशी तळमळते तशी मोक्षाची इच्छा झाली म्हणजे ज्ञानाकरिता प्रयत्न करावा. जसें लेकरूं रडावयाला लागले म्हणजे आईने कडेवर घेतल्यावर उगे राहते, दुसऱ्या कोण्याहि स्त्रीने घेतल्यास ते उगे राहात नाही, त्याच्या आईने घटकाभर जरी घेतले तरी उगे राहते, त्याप्रमाणे ''आपण कितीहि शास्त्रांची पाने चाळिली तरी समाधान होत नाही, पण वेदाचा व गीतेचा श्लोक जरी वाचला तरी चिंता व वासना कमी होते.'' लहान मुलाची आई फार काळजी घेते. त्याला खाऊं घालते, स्नान करविते व त्याने जर तिची सेवा केली तर ती थोडक्यातच प्रसन्न होते व मुलाला सेवा करूं देत नाही. तुझा सोनू पाय दाबायला बसला तर त्याला तूं पुरे म्हणशील. तोच नोकर असला तर त्याला ८-१० तास काम केले तरी पुरें म्हणणार नाहीस. आई थोड्या सेवेने प्रसन्न असते. इतरांनी पुष्कळ सेवा केली तरी प्रसन्न न होता उलटे त्याच्यावर आणखी काम लादतात.

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो व विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ २.४०**

आपला धर्म थोडाहि असला तरी कामाचा आहे. दुसऱ्याचा कितीहि असला तरी फायद्याचा नव्हे. मुलाचे हात दुखतील म्हणून आई थोड्याच सेवेने प्रसन्न होते, पण नोकरांनी थोडेच काम केले तर जाब द्यावा लागतो. मालक त्याच्या दुःखाकडे पाहात नसतो. नोकरी पुष्कळ केली तरी फायद्याची नाही. आईची सेवा थोडी केली तरी ती प्रसन्न होते. त्याप्रमाणे आपला धर्म थोडाहि केला तरी फायद्याचा आहे.

आपल्या आईची थोडीहि जरी सेवा केली ती प्रसन्न होते. तीच एखाद्या नोकराने कितीहि तास केली तरी त्याला पुरें म्हणत नाही. तुझ्या कमलाने जरी नियमाने काम न केले, तरी तिच्या थोडक्या कामाने प्रसन्न होऊन तिला पुरे म्हणशील. याप्रमाणे आपला धर्म थोडाहि जरी झाला तरी कामाचा आहे.

**''स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्''**



आपला जो धर्म असेल तोच करावा. देवळांत नाक दाबून बसणे हा काही स्त्रियांचा धर्म नव्हे. त्यांनी पतिसेवाच करावी. विधवा स्त्रियांनी कृच्छ्र चांद्रायणादि आपला धर्म करावा. धर्म केल्याशिवाय मात्र चित्तशुद्धि होत नाही. पतीला भूक लागली की, त्याला जेवावयाला घालावे. उत्तम पतिव्रता स्त्रिया पतीच्या चेहऱ्यावरूनच त्याचे मनोगत जाणतात.

धर्मच वाढवावा व असा वाढतां वाढतां ईश्वराविषयी अतिशय तळमळ लागली म्हणजे मग त्याचा आग्रह कमी करावा. आपला धर्म थोडासा असला तरी फायद्याचा आहे. मग यमाचें भय राहात नाही. ईश्वरच धर्म सांगतो असे मी काल सांगितले. तो आपलें पापपुण्य पाहतो व त्याप्रमाणे जन्माला घालतो. पापपुण्य असल्याशिवाय काही करत नाही. म्हणून नेहमी आपलाच धर्म करीत राहावे.

ज्ञानाची गोष्ट तशी नाही. कल्पना कर. आपल्या येथे वरण, भात, पोळी वगैरे स्वयंपाक झाला आहे व जेवण झाल्यावर झोप घेण्याकरिता चांगली जागा आहे. ढेकूण वगैरे कांही नाही. व दुसऱ्याचे येथे चांगले लाडू, भजे वगैरे चांगली पक्वान्नें आहेत पण त्या सर्वांत भांग टाकलेली आहे व झोप घेण्याकरिता चांगली जागा आहे. पण त्यांच्या येथे ढेकूण फार आहेत. अशा स्थितीत आपण कोठे जेवावे व कोठे निजावें? आपल्या घरी जेऊन घरीच निजणें चांगले. कारण दुसऱ्याचे येथे जेवावे तर अन्नात भांग टाकली आहे व तेथे जेवल्याने भांग अंगात येऊन मरण्याची पाळी येईल व एकदाचे जेवण झाले तर झोप येणार नाही, कारण ढेकूण फार आहेत.

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परमधर्मो भयावहः॥३.३५**

एक लेकरू आहे. त्याला आईचे दूध पाजतात. आता शेळीचे दूध प्यावयाला दिले तर अधिक पुष्ट होईल पण त्याला रोग होण्याची भीति राहील. किंवा रोग न झाला तर लठ्ठ झाल्यावर कोणाची दृष्टि होण्याचे भय असते. म्हणून आईचेच दूध बरे. आपलाच धर्म उत्तम. घरची भाकर बरी. पण दुसऱ्याचे लाडू कामाचे नाही. मुलाला रोग झाला तरी आईच्या दुधांत औषध देणे चांगले. पण शेळीच्या दुधांत औषध उगाळून दिल्याने औषधाला दृष्टि होण्याचा संभव आहे.

आपल्या धर्मात मरण आले तर बरे. त्याला परलोकांत चांगलीच गति मिळेल. पण परधर्मात मरण आले तर मात्र परलोकांत चांगली गति मिळावयाची नाही. परधर्म जन्मभरहि केला तरी कांही अर्थ नाही. मेल्यावर चांगली गति व्हावयाची नाही.

दुसरें उदाहरणः एक कुलांगना आहे. तिच्या अंगावर कांही दागिने नसले तरी तिला अब्रूदार मनुष्य मान देतात. पण तीच एखादी वेश्या असली व तिच्या अंगावर भारी दागिने असले तरी तिच्याकडे अब्रुदार मनुष्य ढुंकून देखील पाहणार नाहीत. कुलांगनेवर एकदा उपवास पडण्याचा प्रसंग आला तर चांगले मनुष्य तिला मदत करतील पण वेश्येला मरण्याचाच प्रसंग येईल. याप्रमाणे ''परमर्धात कितीहि खटपट केली तरी देव साह्य करीत नाहीत.''

**ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः ।**
**श्रद्धावन्तोऽनसूयंतो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः॥३.३१**

## विश्वासाने धर्म करावा, शंका नको

धर्म विश्वास ठेवून करावा. अविश्वास करूं नये. संसार तरी आपण विश्वासावरच करितो. विश्वास नच ठेविला तर मग अनेक संशय येऊन संसारच होणार नाही. आई मुलाला विष कशावरून देणार नाही? तूं येथे आली तर एखादा मनुष्य अंगावर विस्तव कशावरून टाकणार नाही? जेवतांना स्त्रियेने अन्नांत विष कशावरून टाकले नसेल? पाण्यांत महामारीचे किडे नसतील कशावरून? बायको जारिणी नाही कशावरून? अशाप्रकारे जर मनुष्य संशय काढू लागला तर व्यवहार चालणे अगदी अशक्य आहे.

**शंकाभिस्सर्वमाक्रान्तं अन्नं पानं च भूतले ।**
प्रकृतिः कुत्र कर्तव्या जीवितव्यं कथंन्नुवा ॥

असे भलतेच संशय काढून अर्थ नाही. संसारांत विरोधी गोष्टी होत नाहीत असें नाही, परंतु आपण आपल्या सुखांत व्यत्यय येईल म्हणून असे विनाकारण संशय काढीत नाही. अशा संशयापासून आपला अपमान होण्याचा संभव असतो. कोणीच आपल्याला जवळ येऊं देणार नाही. असेंच नास्तिकहि ईश्वराविषयी संशय काढतात.

## वेदांतातील शिरोमणि युक्ति

मागे तुला सांगितलें होते की, जे लोक खाऊन पिऊन चैनी असतात, तेच लोक आपल्या मताने ईश्वर नाही वगैरे असे सिद्धांत प्रतिपादन करतात. ते विचारत असतात की, ''ईश्वर आहे कशावरून?''

समज तुला विचारले, ''मावशी आहे की नाही ?'' असल्यास आहे म्हणशील. म्हणजे आहे म्हणण्याला वस्तूची ओळख पाहिजे. गाय आहे की नाही? येथे जर गाय नसली तर तूं गाय नाही असे म्हणशील. म्हणजे तुला गाय कशी असते हे



माहित आहे व तशी गाय तुला येथे दिसत नाही. म्हणून तूं नाही म्हणतेस? यावरून अमुक वस्तु नाही म्हणण्यालाहि त्या वस्तूची ओळख पाहिजे. आता तुला विचारतो. रेडियम आहे किंवा नाही? पाहा, तूं आता आहेहि म्हणत नाही व नाहीहि म्हणत नाही. असें कां? तुला रेडियम वस्तु माहितच नाही, म्हणून कांहीच सांगता येत नाही. यावरून जी वस्तु माहित आहे तीच वस्तु आपणासमोर असली तर येथे आहे म्हणतो किंवा समोर नसली तर येथे नाही म्हणतो. म्हणजे वस्तु माहित असल्याशिवाय ती आहे किंवा नाही म्हणता येत नाही.

देव नाही म्हणण्याकरिता देवाची ओळख पाहिजे. ही युक्ति वेदांतात शिरोमणि आहे. खंडण करण्याला समर्थ कोणीच नाही.

## ''न हि प्रतियोगी ज्ञानं विना''

''मेल्यावर आत्मा नाहीसा होतो'' असे म्हणण्याला आत्म्याची ओळख झाली पाहिजे. जी वस्तु आपण नाही म्हणतो ती आपल्या मनांत येते. समज, तुला विचारले, येथे गाय आहे? तू काय कां म्हणशील? नाही. तूं 'नाही' म्हणण्याच्या पूर्वी तुझ्या मनांत गाय आली की नाही? आली. त्याप्रमाणे कोणतीहि गोष्ट 'नाही' म्हणण्याच्या पूर्वी ती गोष्ट मनांत येते व न दिसल्यास आपण नाही म्हणतो.

त्याप्रमाणे 'आत्मा मेल्यावर नाहीसा होतो' म्हणण्याला आत्म्याची ओळख झाली पाहिजे. ओळख म्हणजे काय ? मनात असणे. ईश्वर नाही जर म्हटले तर तो मनांत आला पाहिजे व मनांत आल्यावर नाही कसें म्हणता येईल?

पुत्र मेला तरी मनांत असतो. वांझोटीच्या मनांत पुत्राची भावना येत नाही. तिच्या मनांत दुसऱ्याचा मुलगा येईल पण स्वतःच्या पुत्राची कल्पना येणार नाही. कारण तो नाहीच म्हणून. वांझोटीचा पुत्र म्हटल्याबरोबर कांहीच कल्पना यावयावी नाही व तो आहे किंवा नाही कांहीच म्हणूं शकत नाही. कारण आहे म्हणावे तर ओळख पाहिजे व नाही म्हणावे तरी ओळख पाहिजे. अमुक वस्तु आहे म्हणा किंवा नाही म्हणा ती मनांत असतेच.

मेल्यावरहि आत्मा कोठे तरी राहात असतोच. सुख सर्वांना पाहिजे. आपल्या सुखांत व्यत्यय न यावा म्हणून जसा आपण संसार विश्वासावर करितो तसा धर्महि आपल्याला परलोकांत सुख व्हावे म्हणून विश्वासावर करावा. फारच धर्म केला तर या लोकींच त्याचे फळ मिळेल.

सर्व संसार जर आपण ३ हिस्से विश्वासावर करितो, तर मग ज्याचा परिणाम सुखकर आहे असा धर्म विश्वासावर कां करू नये ? संसारांत तर आधी अंती दुःखच आहे आणि तो आपण विश्वसावर करितो. मग धर्म विश्वासाने का पाळू

नये ? समज, तुझ्या कुंजीला (नोकर) रोग झाला व तो माती खाऊं लागला तर मावशी म्हणेल, अरे ! माती खातोस तर औषधी कां खात नाही ? औषधीने रोगतरी बरा होईल.

**ये मे मतमिदं नित्यमनुतिष्टंति मानवाः ।**
**श्रद्धावंतोऽनसूयंतो मुच्यंते तेऽपि कर्मभिः ॥ ३.३१**

धर्म विश्वासावर केला असता फारशी भीती राहत नाही. स्त्रियेला गांवाला जावयाचे असल्यास आपल्या पतिबरोबरच जाणें इष्ट आहे. परपुरुषाबरोबर गेल्यास धोका होण्याचा संभव असतो. परधर्माने परलोकांत दुःख होते. सर्व धर्माचे तत्त्व ईश्वरभावना करावी हेंच आहे हें पुढे सांख्यांत समजेल. आपला धर्म विश्वासाने करावा.

## धर्म विश्वासाने व निष्काम करावा

समज, तूं आपल्या पतीला प्यावयाला पाणी दिले तर तू त्याचेपाशी पैसे मागशील काय? नाही. कां मागणार नाहीस? परस्परांत प्रेम असतो म्हणून! त्याप्रमाणे धर्माबद्दल ईश्वराजवळ काही मागू नये. पतीला जर तू पैसे घेऊन पाणी दिलेस तर तुला स्त्री म्हणणार नाही. कारण स्त्रियेचा धर्म पैसे घेऊन पाणी देणे नाही. त्याप्रमाणे धर्म करून ईश्वराजवळ त्याबद्दल कांही मागितल्यास धर्म होणार नाही. बरे पैसेहि घेतले नाहीस व पाणीहि दिले नाहीस तर धर्म होईल का? नाही होणार. त्याप्रमाणे धर्महि करीत नाही व ईश्वराला कांही मागत नाही म्हटल्याने धर्म घडणार नाही. स्वधर्मात धर्म करण्याचा अधिकार आहे. धर्माबद्दल ईश्वराला कांही मागण्याचा अधिकार नाही.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥२.४७**

परमार्थात सर्वांना धर्म करण्याचा अधिकार आहे. मागण्याचा अधिकार नाही. अधिकार कां नाही? आपण श्वास टाकतो व घेतो तर प्रत्येक श्वास घेण्याला आपण कशाचा तरी वास घेतच असतो की नाही? कां घेत नाही? कारण वास घेणें कांही काम नाही. वास घेण्याकरिता म्हणून कांही आपण श्वास घेत नाही. श्वास घेणे हे कामच आहे. त्याप्रमाणे धर्म करणे आपले काम आहे. मागणे काही काम नाही. निष्काम धर्म पाळावा. थोडी देखील कामना नसावी.

तूं पतीला पाणी देतेस व कांही मागत नाही. एखादे वेळेला तू बिमार पडलीस तर त्यांनाच फिकीर लागते व ते औषध देतात. त्याप्रमाणे निष्काम धर्म



करणारा एखाद्या वेळेला संकटांत पडला तर परमेश्वर त्याची फिकीर करतो. किंचित देखील कामना असली तर परमेश्वर दूर सरतो. धर्म केल्यावाचून चित्तशुद्धि नाही. कल्पना कर, तू घरात बसली आहेस व घराला दरवाजा आहे. आता बाहेर जावयाचें आहे तर दारावाटे न जातां भिंत फोडून गेलीस तर त्याच छिद्रावाटे चोर येऊन रात्रीं चोरी करतील व तुझे सर्व धन घेऊन जातील. त्याप्रमाणे धर्म, भक्ति, ज्ञान या परमेश्वराने सांगितलेल्या मार्गाने आपण न गेलो तर परमेश्वर आपल्याला यमाच्या हाती देतो.

**ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्टंति मे मतम् ।**
**सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३.३२**

## देवाचा दरवाजा : धर्म

परमेश्वर म्हणतात, माझ्या घराचा दरवाजा धर्म आहे. माझ्या घरांत यावयाचे असल्यास धर्मरूपी दरवाज्यानेच आले पाहिजे. चोरून भलत्याच दरवाज्याने आल्यास मी त्याला मारीन. तो मी मूर्ख समजतो. शहाणा भलत्याच मार्गाने येत नाही.

शिवलिलामृतांत सीमंतिनी आख्यान आहे. सीमंतिनीने आपल्या पतिव्रता धर्मानेच शिवाला प्राप्त करून घेतलें. महानंदा नांवाची एक वेश्या होती. तिने आपल्या धर्माने महादेवाला प्रसन्न करून घेतलें. सीमंतिनीने महानंदेचा किंवा महानंदेने सीमंतिनीचा धर्म केला असता तर उपयोग झाला नसता.

**असंतुष्टो द्विजो नष्टः संतुष्टश्च महीपतिः ।**
**सलज्जा गणिका नष्टा निर्लज्जा च कुलांगना ॥**

ज्याला संतोष नाही असा ब्राह्मण कांही कामाचा नाही. संतोष असलेला राजा कांही कामाचा नाही. कारण शत्रु जर चालून आलेत आणि हा आपल्या पलंगावर पडला तर याचे राज्य जाऊन भिकेचे ढोबर हाती येईल. वेश्या जर लाजणारी असली तर कांही कामाची नाही. कारण तिला खायला कोणी देणार नाही. कुलस्त्री जर निर्लज्ज असली तर तिला मारून टाकावे.

## धर्मचा द्वेष

**तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥१६।१९**

भगवान म्हणतात, पार्था ! धर्ममार्ग सोडून जे कोणी भलत्याच मार्गाने येतात

ते नष्ट आहेत, असे हे धर्माचा द्वेष करणारे संसारांत अधम चांडाळ आहेत. त्यांना मी राक्षस, व्याघ्र इत्यादि क्रूर योनींत घालतो व नाना प्रकारचे कष्ट देतो. व्याघ्र योनींत बारा बारा कोस खाण्याकरिता फिरावें लागते. घटकाभरहि चैन नसते. पुढे त्या योनीतून काढून त्याच्यापेक्षा नीच योनींत घालतो. किटकादि योनींत फारच कष्ट आहेत. चिखलांत किडे उत्पन्न होतात व ऊन चांगले तापायला लागले म्हणजे जमीन सुकून जाते व किडे आपोआपच मरतात. कित्येक पायातळी चालतांना रगडले जातात. शेवटी पाषाणादि जन्मांत तो जातो. पाषाणाला कोणीहि फोडतो. कोणीहि मारतो. अशा अनेक क्रूर व अतिशय दुःख ज्या योनींत आहे त्या योनींत मी त्यांना घालतो.

अशा दुःखदायक योन्या चुकवावयाच्या असल्यास मी सांगितलेला मार्ग त्यांनी स्वीकारावा. पहिले आपला धर्म करावा व धर्म करतां करतां ईश्वर प्राप्तीची इच्छा झाली म्हणजे धर्माचा आग्रह करूं नये. ज्ञान करून घ्यावे. भलताच मार्ग धरून वाईट योनींत जाऊ नये. पुढचे खाचर खड्डयांत पडले तर मागच्याने हुषार होऊ नये काय? त्यांनी तरी खड्डयांत पडण्याची कां इच्छा करावी? आपण आपल्या दृष्टीने वाईट योनी पाहतो. त्या योनींत किती कष्ट आहेत हे पाहतो. विंचवाच्या योनीत पिले जन्मल्याबरोबर विंचवाला मरावे लागते. आपला धर्म करून आपले कार्य करून घ्यावे. धर्म, शास्त्र व साधु पुरुष यांच्याकडून समजून घ्यावा. आपला स्वधर्म देवासारखा उत्तम आहे.

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ १६-२४**

**सत्पुरुषांच्या मुखाने शास्त्र व धर्म शिकावा**

स्वयंपाक शिकावयाचा आहे तर कणकींत तेल टाकून तुपांत तळल्याने येत नसतो. धर्म हा शास्त्र वाचून समजत नसतो. लोक जसे स्वयंपाक करीत आले तसाच आपणहि केला पाहिजे. त्याप्रमाणे शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे धर्म करावा. आपल्या इच्छेने धर्माधर्म होत नाही. आपल्या इच्छेला वाटले म्हणून निंबाचे खोड उगाळून मारोतीला लावणे धर्म होणार नाही. नंदीला गवत चारावयाचे तर जाळून चारले तर धर्म होणार नाही.

धर्माधर्म आपल्या इच्छेवर अवलंबून नाही. सत्पुरुषाच्या मुखानेच धर्माधर्म समजून घ्यावेत. भगवान म्हणतात, शास्त्रांत सांगिलेले करणेंच चांगले. ते देखील आपल्या बुद्धीने शास्त्र पाहून होत नाही. ज्याला शास्त्र समजते त्याला विचारून



समजून घेतले पाहिजें. शास्त्रांत सांगितले की, घरचे काम करावे. तर चूल खांदून बसणें काम नव्हे. म्हणून -

शास्त्र सत्पुरुषाचे मुखानेच समजून घ्यावे. धर्मच करीत असावे. मोक्षाची इच्छा झाल्यावर आग्रह करूं नये. मोक्षाशिवाय कांही नको असे वाटेल तेव्हा ब्रह्मज्ञानाकडे लक्ष द्यावे व मग धर्माविषयी फारसा आग्रह धरू नये. सद्‌गुरु सांगतील तसे वागावे.

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

# १२. मुमूक्षूचा धर्म

परमात्मा म्हणतो की -

मोक्षाची इच्छा झाली म्हणजे ब्रह्मज्ञान शिकण्याकडे लक्ष द्यावे. मग धर्माचा आग्रह धरू नये. मुमुक्षा होतपर्यत मात्र धर्म अबाधित करावा.

आता तुझ्या मुलाचे लग्न झालें व तुला सून आली म्हणजे तिला मूल होतपर्यत घरांतले कामच केले पाहिजे. मुलगा झाल्यावर जसे थोडें घरातले कामहि केले पाहिजे व मुलालाहि खेळविले पाहिजे त्याप्रमाणे मोक्षाची इच्छा झाल्यावर अजिबात धर्म टाकून देऊ नये. धर्मच करावा कारण मुमुक्षूहि धर्म करितात असे दिसले पाहिजे. तेच परमात्मा सांगतात,

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ ३.२१**

जसे घरात वाडवडील वागत आलेत त्याप्रमाणे आपण वागत असतो कोकणस्थ चित्पावन यांच्यामध्ये व्याह्याला पाहून शरमत नसतात, पण तुमच्या शेणवई जातीत व्याह्याला पाहून शरमतात. असें का? वाडवडील आपले असेंच करीत आले म्हणून. ज्यांना मोक्षाची इच्छा असते असे सत्पुरुष जसें जगाला आचरण करून दाखवून देतात त्याप्रमाणेच इतर लोक वागतात.

घरात एखादी म्हातारी असली तर ती एखादे वेळेला मुलाचे पोट दुखल्यास सागरगोटी भाजून देते किंवा चुन्याच्या गोळ्या खायला देते व तिच्या मागे तिची सूनहि तिचेच अनुकरण करिते. त्याप्रमाणे सत्पुरुष जो रस्ता दाखवून देतात त्या रस्त्याने लोक चालतात. आपण बीमार पडलो तर मनुष्य आपल्याला औषधी वगैरे आणून देतात. विषय आणून देत नाहीत. आपला त्याच्यावर विश्वास असतो.

भाऊकाकाला औषध दिले म्हणून रोग बसला. विष दिले नाही. विष दिले असते तर मेले असते. त्यांचा विश्वास होता. सत्पुरुष ज्या मार्गाने चालतात त्या मार्गानेच लोक चालतात. त्यांनी दाखवून दिलेला मार्ग घातुक नसतो. घातुक असता तर या मार्गानी कोणीच गेले नसते. पण पुष्कळ जातात.

नास्तिक थोडे आहेत. संसार आपण विश्वासानेच करतो. संशयी माणसांचा संसार चालत नाही. जग कोण्यातरी धर्मानेच चालते. सर्व निःशेष नास्तिक नाहीत. जे नास्तिक आहेत तेहि पूर्ण नास्तिक नसतात. त्यांनाहि संशयच असतो. हे लेकाचे नास्तिक देहाहून आत्मा भिन्न मानतच नाहीत.

समज तूं आपल्या घरी बसलास आणि विचार केला की, या नारायणराव दुकानदाराचा विक्रा तर कांही मोठा नाही व खाऊन पिऊन तर सुखी दिसतो तर याच्या घरी संपत्तीने हांडे भरलेले आहेत. ही तुझी कल्पना झाली. तू असा काही निश्चय करू शकत नाहीस. त्यांच्या येथले हांडे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय हांडे आहेत म्हणून तू निश्चय करू शकत नाहीस.

नास्तिकांना वाटते की, जे डोळ्याने पाहतो तेच खरे आहे. आत्मा तर काही दिसत नाही. याला जर आत्मा पाहावयाचा असता तर देहाच्या अलग झाले पाहिजे. जे जे कोणी सत्पुरुष देहाहून अलग झालेत ते असेच सांगतात की देव आहे, आत्मा आहे, म्हणून जे धर्माने चालत आलेत ते फसले नाहीत. फसले असतील चिलीमफुकेच, या सोडतीन हात देहावर फसले असतील. जे सत्पुरुष धर्माप्रमाणेच नेटाने वागत आले ते कधी फसले नाही व धर्मच हितावह आहे असे ते सांगतील. चांगले पुरुष ज्या मार्गाने गेलेत तोच मार्ग ते दुसऱ्यांना दाखवीत असतात.

परमेश्वर प्राप्तीची पूर्ण इच्छा झाली म्हणजे धर्म अजिबात सोडूं नये. पण त्याचा फारसा आग्रह नसावा. घरात म्हातारा मनुष्य असला तर तो कष्टच करीत राहतो. त्याला संवय झालेली असते. तो म्हणतो माझे झालेच आहे, पण पोराकरिता मात्र तीळ तीळ जीव तुटतो म्हणून मी कष्ट करतो.

जवान मनुष्य आपल्याकरिता कष्ट करितो पण म्हातारा मनुष्य आपल्या पोरांना सुख व्हावे व ते आपण डोळ्याने पाहावे म्हणून कष्ट करितो. म्हातारा जरी कष्टिक हाडाचा असला तर त्याच्यापुढे जवानहि काही काम करू शकत नाही.

**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥३।२५**

म्हाताऱ्या मनुष्यांना त्या कामाचा कांहीच उपयोग नाही. म्हातारा आपल्या कर्माविषयी उदास असतो व पोराबाळाकरिता कष्ट करीत असतो. त्यांना संवयच



पडलेली असते. सत्पुरुषांना अनेक जन्माची संवय झालेली असते. याप्रमाणे धर्म करून कोणीतरी ईश्वरप्राप्तीच्या मार्गाचा स्वीकार करावा. अशा इच्छेने सत्पुरुष कर्म करतात.

तरुण पुरुष संसार डोक्यावर घेऊन करतात. व म्हातारे मुलाबाळासाठी करतात. व वडिलापासून चालत आलेले नाव राहावे म्हणून करितात. त्यांना स्वतःला कांही उपयोग नसतो.

## मोक्षार्थी व धर्म

ईश्वर जगाचा आईबाप आहे. त्याच्यापासून धर्म चालत आला. पुष्कळांचे त्यापासून कल्याण झाले. इज्ज़तदार मनुष्य आपली इज्ज़त जाऊ देत नाही. सर्व समर्थ वडिल जो ईश्वर त्याला यमाच्या हाती आपल्या पोरांना देणे इष्ट वाटत नाही. त्याला आपली इज्ज़त जावी असे कसे वाटेल? म्हणून ज्यांना मोक्षाची इच्छा झाली आहे त्यांना धर्माची जरूर नसते.

परमेश्वरप्राप्तीची इच्छा होणे हेच सर्व धर्माचे फळ आहे. परमेश्वरप्राप्तीची इच्छा झाल्यावर मग धर्म कशाला? तर पुढे लोकांनीहि तसेंच वागावे म्हणून ते धर्म करीत असतात. म्हातारे लोक जसे आपल्या मुलाबाळांना संसार करून दाखवितात, त्याप्रमाणे सत्पुरुष लोकांकरिता कर्म करितात. पण भेद इतकाच की, परमात्माप्राप्तीची इच्छा झाली नाही ते धर्मात गुंतून पडतात. पण सत्पुरुष केवळ दुसऱ्यांना मार्ग दाखविण्याकरिता धर्म करितात.

**एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वेरपि मुमुक्षुभिः ।**
**कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥४.१५**

ही गोष्ट जी मी तुला सांगितली की मोठे लोक लोकांच्या उपयोगाकरिताच धर्म करितात, तसेच आपणहि करावें. जनकासारख्या लोकांनी देखील असाच लोकांच्या उपयोगाकरिता धर्म केला. तसें आपणहि करावें. अधर्म करू नये. समज विष्णुपंत केकरे आहेत. हे मालगुजार आहेत. आता यांनी म्हटले मी गाव पाहात नाही. कांहीही होवो. असे म्हटल्याने चालेल काय ? नाही. कारण लिखापढी होऊन गेली. त्याप्रमाणे परमेश्वर जगाचा मालगुजार आहे. भगवान म्हणतात, दुसऱ्याची गोष्ट कशाला? मीच तर स्वतःकर्म करितो.

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानवाप्तमावाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥३.२२**

**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः॥३।२३**

भगवान म्हणतात, पार्था ! मला कशाला कर्म पाहिजे, पण मला वाटते की, मी जर धर्माप्रमाणे बरोबर न वागलो तर माझे पाहून लोकहि वागणार नाही. म्हणून मी लोकांकरिता कर्म करून दाखवितो. परमेश्वरच जर स्वतः लोकांकरिता कर्म करितो, मग भक्तांनी धर्म कां करू नये? बाप ज्या मार्गाने गेला त्याच मार्गाने मुलाने गेले पाहिजे. जोपर्यंत मुलगा लहान आहे तोपर्यंत त्याला तिखट, लाडू, पोळ्या खावयाला देणे चांगले नाही. दुधच द्यावे. द्यावयाचे असल्यास हळू हळू पुढे अन्न देण्याला सुरवात करावी. एकदम देऊ नये. त्याप्रमाणे,

ज्याचे मन स्वाधीन नाही त्याला एकदम ब्रह्मज्ञान सांगू नये.

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।**
**ज्योषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समारचरन् ॥ ३.२६**

आपण कर्मे करावी व त्याच्याकडून करवून घ्यावी. या श्लोकाचा अर्थ पुढे सांगीन.

ooo

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# १३. स्व-धर्म व पर-धर्म

भगवान म्हणतात, ज्याप्रमाणे लहान मुलाला दूधच द्यावे, एकदम तिखट वगैरे देऊ नये, हळू हळू नंतर अन्न द्यावे, त्याप्रमाणे - ज्यांना कर्मच केले पाहिजे व कर्म करावसे वाटते, त्यांना ज्ञान सांगूं नये.

**न बुद्धिभेदं . . . समाचरन् ॥ ३-२६**

विद्वान झाला तरी म्हणजे मुमुक्षु झाला तरी लोकांकरिता तरी कर्म सोडूं नये. आईच्या स्तनांतील दूध आईकरिता नसते, पण दूध पाजतच नाही म्हटले तर मुलांचे पोषण होणार नाही. त्याचप्रमाणे साधु पुरुष अज्ञानी लोकांकरिता धर्म करितात. आपला धर्म केल्यावांचून परमेश्वराची भक्ति देखील उपयोगी पडत नाही. ज्याप्रमाणे मुलगा मिळविण्याजोगा झाला म्हणजे रिकामा बसून बापाच्या डोक्यावर भार टाकून खाऊ लागल्यास बापाला बरे वाटणार नाही, त्याने मिळवून आणून खाण्यांतच आनंद वाटतो. त्याप्रमाणे नुसत्या भक्तीनेच आपण ईश्वराला प्रिय होत नाही. जो आपला धर्म आहे तो आपण केला पाहिजे.



**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ १८-४७**

ज्याचा जो धर्म आहे तो त्यांनी केलाच पाहिजे. राजाला संतुष्ट करावयाचें असल्यास ज्याचें जें काम असेल तेंच त्याने केलें पाहिजें. पोलिसाने पाटिलकीचें काम करतो म्हटल्यास राजा संतुष्ट होणार नाही. भगवान म्हणतात, ज्याचा जो धर्म आहे तोच त्यांनी केला पाहिजे. त्याचा जो धर्म आहे तो तरी दुसऱ्याच्या धर्मापेक्षा गुणवान दिसत नसला तरी तोच त्याच्या उपयोगाचा आहे. आपली आई कितीहि कुरूप असली तरी दूध देण्याच्या उपयोगी तीच पडते. दुसरी स्त्री उपयोगी पडत नसते. आपला स्वभावच असा असतो की, जी संवय असते ती सुटत नाही. कित्येक स्त्रिया सकाळीं उठून सडासंमार्जन करितात. त्या म्हाताऱ्या झाल्या तरी त्यांना तें काम करण्याचें कांही वाटत नसते. ज्याचा जो धर्म असतो तोच त्याला उपयोगाचा आहे.

पतिव्रतांचा पतिसेवा करणें धर्म आहे. पण तो सोडून चांद्रायणाहि व्रत करावयाला लागले तर मोक्षप्राप्ति होणार नाही. मुमुक्षा होईपर्यंत आपआपला धर्म करावा व मग मुमुक्षा झाल्यावर ज्ञान शिकावे तरी पण धर्माचा त्याग करूं नये. दुसऱ्याला अनुकरण करण्याकरिता तरी पतिसेवा करावी. विधवा स्त्रियांनी चांद्रायणव्रत, प्रयाग स्नान वगैरे आपले धर्म पाळलेच पाहिजे. त्याशिवाय भगवद्भक्ति कल्याणप्रद होणार नाही. आपल्या धर्मांतच राहून कर्म केल्याने चित्तशुद्धि होते.

व्यवहाराचें लक्षण किर्ती मिळविणें व परमार्थाचे लक्षण भगवत्प्राप्ति आहे. या व्यवहारांत निपुण राहून जो किर्ती मिळवितो तोंच परमार्थ करून भगवत्प्राप्ति करून घेतो.

आपल्या स्वाभाविक वासना अशा असतात की,आपण दुसऱ्यांपेक्षा आपली अधिक पर्वा करितो. अशा प्रकारच्या वासना आपल्या धर्माचरणाने नाहीशा होतात.

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥१८।४६**

भगवान म्हणतात, पार्था ! आपला जो धर्म आहे तोच केल्याने पुरुषाच्या वासना क्षीण होतात व चित्तशुद्धि होऊन मोक्ष होतो.

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥१५।१४**

हा जो आपण अग्नि पेटवितो तो आपण पेटविल्यामुळे पाण्याने विझतो.

आपल्या पोटांत जो अग्नि आहे तो ईश्वराने पेटविला असत्यामुळे पाणी टाकले तरी विझत नाही. आपल्या हातचा पेटविलेला अग्नि पाण्याने विझतो. पण पोटातला पाणी टाकूनहि विझत नाही. कारण तो ईश्वराने पेटविला आहे म्हणून ईश्वर आहे. (यांत हेत्वाभास आहे पण त्याच्याशी कांही कर्तव्य नाही.) भगवान म्हणतात, मीच प्राण्यांच्या शरीरांत अग्निरूपाने राहून त्यांचे खाल्लेले अन्न पचन करितो. असा परमेश्वर आपल्या हृदयात आहे. तो दूर नाही. दूर असता तर अग्नि कसा पेटविला असता? आपण पाणी टाकलें तरी तो विझत नाही. तो आपल्याजवळ हृदयांत आहे म्हणूनच पोटांतला अग्नि विझूं देत नाही.

**सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो ।**

**मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ॥**

भगवान म्हणतात, मी सर्वांच्या हृदयांत आहे व मीच प्राण्यांना त्यांनी केलेल्या संकल्पाप्रमाणे फल देतो. परमेश्वर आपल्या हृदयांत आहे, हे मी तुला आता अनुमानाने सांगतो व हें अनुमान खरे आहे.

समज, आपल्या घराला अग्नि लागला व आपण आंत आहो. अग्नि लागला असे आपल्याला माहीत नाही. अशा प्रसंगी आपल्याला जर कोणी बाहेर काढले तरी तो आपला आईबाप समजावा. आपल्याला एखादी काळजी आहे किंवा एखाद्या मुलाला आपण उद्या सकाळी जर पाटी घेऊन लिहीत न बसलो तर आपला बाप मारील, अशी काळजी असली तर तो दुसरे दिवशी लवकर उठतो. आता हा तर निजला असतो, याला इकडील काहीच आठवण नसते. झोपेत याची कोण मान जरी कापून टाकली तरी याला शुद्धि नसते. मग याला कोण उठवितो?

किंवा दुसरा दृष्टांत, आपल्या येथे लग्न आहे. ज्या दिवशी गाडगे वाणायचे असतात, त्याचे आदले दिवशी उद्या सकाळी उठले पाहिजे अशी आपण काळजी वाहात निजतो. पुढे मध्येच जर कोणी उठविले तर आपण उठत नाही. पण आपणच होऊन मग आपण वेळेवर उठतो. त्या वेळेला आपल्याला तर कोणी बाहेरून उठवित नाही व आपण तर अगदी वेळेवर उठतो. मग कोण उठवितो? कोणीतरी आंतूनच उठवित असले पाहिजे. तो उठविणारा परमात्मा आहे.

**स्वभाव नियतंकर्म कुर्वन्नप्नोति किल्बिषम् ॥**

आपला स्वाभाविक धर्म जितका सोपा आहे तितका दुसऱ्याचा सुलभ नाही. आपला घरचा स्वयंपाक कसाहि असला तरी कामाचा आहे पण दुसऱ्याच्या येथला



पंचपक्वान्नाचाहि स्वयंपाक उपयोगाचा नाही. त्याप्रमाणे आपलाच धर्म चांगला. याबद्दल एक गोष्ट सांगतो.

## कथा : ब्राह्मण व भोई

एके गावी एक ब्राह्मण व एक भोई होता. भोई नेहमी मासोळ्या मारून त्या शिजवून देवीला नैवद्य दाखवून मग घरी जाऊन जेवीत असे. एके दिवशी ब्राह्मणाच्या नैवेद्यामध्ये मुंग्या मेल्या होत्या. ब्राह्मणाला वाटले की, दररोज भोई मासोळ्या मारून नैवेद्य दाखवित असतो तर आज आपल्या नैवेद्यांत मुंग्या असल्या तरी काय होते? असा विचार करून त्यांनी नैवेद्य दाखविला व घरी आला. या दोघांनाहि देवी सणाच्या दिवशी दर्शन देत असे. पुढे जेव्हा सण आला त्यावेळेला दर्शन करण्याकरिता ब्राह्मण देवळांत गेला. तेव्हा देवीने त्याच्याकडे पाठ केली व भोई गेला तेव्हा त्याच्याकडे तोंड केले. ब्राह्मण खिन्न होऊन घरी गेला. पुढे त्याने तपश्चर्या केली व देवीने सांगितले की, ''भोयाची उपजीविका मासोळ्यावरच असल्यामुळे त्याचे ते स्वभावज कर्म होते व त्यामुळे त्याने मासोळ्याचा नैवेद्य दाखिवला तरी पातक लागले नाही. पण तूं वेद पठण करितोस आणि तुझा धर्म तर वेदाने सांगितल्याप्रमाणे आहे. तुला हिंसा वर्ज्य आहे. तू आपला धर्म सोडलास म्हणून तुला दर्शन दिले नाही.''

याप्रमाणे आपले जे स्वाभाविक कर्म आहे तेच करावे. आता हे नास्तिक जिवंतपणीच सर्व कांही आहे मग मेल्यावर कांही नाही असे म्हणतात. या लोकांना खूप मारावे व वाटेल तर फाशी द्यावे पण ते आपल्या हाती नाही. तरी या चोरांना यम शिक्षा करतो. आता यांच्या म्हणण्याचा आपण विचार करू.

आपण या जगात अनेक प्रकारचे लोक पाहातो. कोणी पशु, कोणी मनुष्य, कोणी किटकादिक प्राणी, कोणाचा हात आखुड तर कोणाचा एक डोळा आधंळा. कोणी जन्मांध तर कोणी जन्मतः बहिरे. कावळ्याला एकच डोळा तर वटवाघुळीला झाडावर उलटे टांगून स्वतःची विष्टाच (खावी) लागते. मनुष्यामध्ये एकाला सुख तर एकाला दुःख, एकाची शेती चांगली तर एकाची वाईट.

जगांत जर पापपुण्य कांहीच नाही तर एकाला एक प्रकारची तर दुसऱ्याला दुसऱ्या प्रकारची परिस्थिति का यावी? पापपुण्य असल्याशिवाय असे होऊ शकत नाही.पापपुण्य आहेत. आपण आपल्या धर्माप्रमाणे कर्मे करावी व ती ईश्वरार्पण करावी. म्हणजे देव प्रसन्न होतात. कर्मे निरभिमानपूर्वक करावी. मी करतो अशी

घमेंड करूं नये. निष्काम कर्मांत चुकी झाली तरी पाप होत नाही व सकाम कर्मांत चुकी झाल्यास पाप होते. याबद्दल एक गोष्ट सांगतो.

### कथा : ब्राह्मण व इंद्र

एक ब्राह्मण होता. त्याने यज्ञ करण्याला आरंभ केला. यज्ञ करीत असतांना एक गाय आली. तिचे निवारण करण्याकरिता याने तिला मारले व गाय त्यामुळे मरण पावली. हत्या झाली.

पण ब्राह्मणाने विचार केला की ''या हाताने गाय मारली मी कांही मारली नाही व हाताची देवता इंद्र आहे. म्हणून ते पाप मजकडे नसून इंद्राकडे आहे.''

हे पाहून इंद्राला आश्चर्य वाटले व ब्राह्मणाचा वेष घेऊन त्याच्या यज्ञमंडपांत आले. ब्राह्मणाने आदरातिथ्य करून बसविले. तेव्हा इंद्राने विचारले,

''ब्राह्मणा हा यज्ञ कोणाचा आहे?''

ब्राह्मण म्हणाला, ''महाराज, हें काय विचारता ? हा यज्ञ माझा आहे.''

तेव्हा इंद्र म्हणाले, ''कारे ! यज्ञ तुझा व यज्ञांत झालेली गोहत्या कोणी केली? इंद्राने ?

तेव्हा इंद्राने त्याला नर्कात टाकलें.

सारांश निरभिमान होऊन कर्म करून ते ईश्वरार्पण करणे चांगले. अशी निरभिमानपूर्वक निष्काम कर्मे केल्याने आपल्यांत व देवतांत एक प्रकारचे नाते उत्पन्न होते.

समज तुझी मुलगी आहे. ती दुसऱ्याच्या घरी न दिली तर तुला सोयरे धायरे कसे येणार ? मुलगी दिल्याने जसे नवी नातें जुळतें त्याप्रमाणे या कर्माच्या योगाने परमेश्वराशी नाते जुळून देव आपल्याला साह्य करितात व आपली चित्तशुद्धि होते.

चित्तशुद्धि झाली म्हणजे धर्म अजीबात त्यागू नये. फारसा कटाक्षहि ठेऊ नये व ज्ञान प्राप्त करून घेऊन मुक्त व्हावें.

> ***प्रश्न - सर्व धर्म समान आहेत तर आपल्या धर्मात कां रहावे?***
> ***उत्तर - सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्माला कां सोडावे?***
> *श्रीगुलाबरावमहाराज*



॥ श्रीमद्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

## १४. ईश्वरभावना

भगवान् म्हणाले, पार्था, जेजे तूं कांही करशील तेते सर्व मला अर्पण करीत जा.

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥९।२७**

अर्जुना ! तूं जे करशील, आपल्या शरीराकरिता जे करशील, जे जेवतोस, यज्ञ करतोस, दान करतोस, ते सर्व मला अर्पण करून देत जा. परंतु ज्याप्रमाणे गर्भिणी स्त्रीस कांही गोष्टी वर्ज्य असतात, त्याप्रमाणे ''ज्या कर्माच्या योगाने परमेश्वर मनात टिकून राहील अशी कर्मे करीत जा. म्हणजे या कर्मापासून भक्ति उत्पन्न होईल.''

आपण आपल्या मुली दुसऱ्याच्या घरी कां देतो? न दिल्या व आपल्याच घरी ठेऊन घेतल्या तर तोंडाला काळे लागण्याचा प्रसंग असतो म्हणून आपण घरी न ठेवता त्यांना दुसऱ्याच्या घरी देतो. त्याप्रमाणे धर्म परमेश्वराला अर्पण न केला तर सुख होते पण पुण्य क्षीण झाले म्हणजे दुःख होते, म्हणून तो धर्म परमेश्वरालाच अर्पण करणे चांगले.

आता लहान मुलगा अतिशय स्तनपान मागायला लागला तर आई त्यांला तोंडांत बोटे देऊन चोखावयाला लाविते व त्याचे समाधान करितो व मुलगा दुधाची भावना करितो. खरे दूध नसते त्याप्रमाणे खरी परमेश्वरप्राप्तीची इच्छा न झाली तरी भावना करावी व भावना करूनच धर्म करावा. ईश्वराची भावना न करिता व कर्म अर्पण न करिता जर धर्म करीत राहीले तर काही उपयोगाचे नाही. तेच भगवान सांगतात,

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।**
**ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्म कर्म समाधिना ॥गीता ४।२४**

मुलगी हारा पुजण्याच्या वेळी पतीचे आयुष्य चिंतिते. त्यावेळेला पति मिळालेला नसतो. तसा आपण धर्म करितो तेव्हा अशीच भावना करावी की, परमेश्वर मिळेल. या श्लोकाचा अर्थ असा समज. तू पतीला पाणी दिलेस. पतीच्या ठिकाणी ईश्वरभावना ठेवली. पाण्याच्या ठिकाणी ईश्वरभावना, पतीच्या पायाच्या

ठिकाणी ईश्वरभावना. याप्रमाणे कर्म अर्पण केल्यावर तें कर्म ईश्वरांत मिळून जाते. अशा रीतीने आपापला धर्म पाळून ईश्वरार्पण करावा.

अग्नींत तूप टाकणे यज्ञ नव्हे. ज्याचा जो धर्म असेल तोच त्यांनी करणे हाच यज्ञ आहे. आतापर्यंत सांगितले त्यावरून सिद्ध झालें की, धर्माच्या ठिकाणी ईश्वरभावना न केली तर कांही उपयोग होत नाही.

आईने मुलाला स्तन न देता बोटे चोखावयास सांगितलें तर तो चोखतो व त्यापासून त्याला समाधान होते. समाधान कां होते? दूध तर त्याला मिळाले नाही. तर आईच्या बोलण्यावर मुलाचा विश्वास असतो म्हणून बोटें चोखल्यापासून मुलाला समाधान वाटते.

त्याप्रमाणे धर्म करावा. तो शास्त्र व गुरु सांगतील त्याप्रमाणे करावा. ईश्वराचा द्वेष करूं नये नाहीतर धर्मच बंधनास कारण होतो. सोन्याचे कडे चोरून आणल्यास प्राणनाश, त्याप्रमाणे धर्म चांगला आहे तरी पण ईश्वरार्पण न केला तर आपला नाश होतो.

ज्या आपल्या धर्माच्या ठिकाणी ईश्वरभावना सहज बसेल तो करावा. दुसऱ्याच्या धर्माच्या ठिकाणी भावना करू नये. आपल्याच धर्मावर ईश्वरभावना करावी व तीहि परमेश्वरप्राप्तीची अतिशय इच्छा होत नाही तोपर्यंत व परमेश्वरप्राप्तीची इच्छा झाल्यावर भावना सोडू नये. पण बाहेरच्या धर्मावर फारसा आग्रह धरू नये.

**स्त्रीचा यज्ञ**

सारांश आपला धर्म तो चांगला व त्या ठिकाणी ईश्वरभावना करणे इष्ट आहे. लेकरूं जेवले तर आईला जेवावेसें वाटते व न जेवले तर जेवावेसे वाटत नाही. पण हा मोह आहे.

धर्म करून पतीला टाकून जेवणे हा धर्म नव्हे. **अधर्म** झाला.

पण पुत्रास टाकून न जेवणे हा मात्र **मोह** होतो.

पतीच्या मुखांत अन्न गेले म्हणजे तुमचा **यज्ञ** झाला. त्या यज्ञांतून राहिलेले अन्न आपण जेवावे.

पतीला समजले की, तूं त्याच्याकरिता उपाशी राहिलीस तर ते कोणत्याहि गावी असले तरी येतील पण उपाशी न राहता जेऊन घेतले तर ते दुसऱ्या गावाला चालले जातील. म्हणून पतीच्या ठिकाणी परमेश्वरभावना करून त्यांना जेवू घालून नंतर आपण जेवावे.

धर्माच्या ठिकाणी प्रीति ठेवून यज्ञाचे अन्न जेविले असता धर्माच्याच कल्पना अंगांत खेळतात. सर्व पापे दूर होतात. तेच भगवान सांगतात,



**यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ।**

**भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥गीता ३।१३**

यज्ञाचें अन्न खाल्ल्याने पापें दूर होतात. सत्पुरुषाचे दर्शन होते. परमेश्वराचे नाम घेतल्याने गुरु भेटतो. योगवसिष्ठांत म्हटलें आहे,

**यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् ।**

जोपर्यंत परमेश्वराचा अनुग्रह होत नाही तोपर्यंत गुरुहि मिळत नाही, किंवा चांगले शास्त्र ऐकावयाला मिळत नाही. गुरु चांगला मिळणे किंवा चांगले शास्त्र ऐकावयाला मिळणें हे पूर्व सुकृतावर अवलंबून आहे.

**गुरु कृपावंत सर्वज्ञ थोर । विशेषसुकृतें लाहिजे ॥१।११शिवलीलामृत ॥**

गुरूला सर्व शास्त्रें आली पाहिजेत. शिष्य प्रज्ञावंत असला पाहिजे. मट्ठ नसला पाहिजे. बुद्धिवान पाहिजे व त्याच्या अंगीं गुरुभक्ति पाहिजे. वक्ता (पुराण वाचणारा) क्षमाशील म्हणजे कोणीहि प्रश्न विचारल्यास मोठ्या आनंदाने उत्तर देणारा पाहिजे. म्हणून परमेश्वरावर विश्वास ठेवून त्याला आपला धर्म यथासांग पाळून अर्पण करावा म्हणजे उत्तम गुरु मिळतो व असा सद्‌गुरु मिळाल्यावर त्याच्याकडून जे आपल्याला साधावयाचे असते ते साधून घ्यावे.

---

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# १५. पापाचरण

**यावन्नानुग्रहः साक्षाज्ज्यायते परमेश्वरात् ॥**

वसिष्ठ म्हणतात, रामा ! जोपर्यंत परमेश्वर अनुग्रह होत नाही तोपर्यंत गुरु किंवा चांगले शास्त्र ऐकावयाला मिळत नाही. आपला धर्म करावा व पुढे निष्काम धर्माच्या पुण्याने ईश्वराचा अनुग्रह होऊन सद्‌गुरु किंवा चांगले शास्त्र मिळते. भगवान म्हणतात, पार्था ! हा धर्म मी पूर्वी सूर्याला सांगितला होता.

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**

**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ ४-१**

म्हणजे सगळ्या सृष्टीच्या पूर्वी जो सूर्य उत्पन्न झाला, त्यालाहि मी धर्म करावा असें सांगितले होते. ह्यावरून असे झाले की, सर्व सृष्टिमध्ये जे प्राणी आहेत त्यांना धर्म दाखवून देणारा परमात्मा आहे. यावर अर्जुनाने शंका केली.

**अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।**

**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३-३६**

देवा ! तूंच जर सर्वांना धर्म दाखवून दिला आहेस तर मग सर्व लोक धर्म कां करीत नाहीत? कोणाच्या स्वाधीन होऊन हा मनुष्य पापे करितो? कारण कोणालाच दुःखाची इच्छा नसते? आपल्याला जबरदस्तीने पाप करवितो तो कोण? जर ईश्वर करवीत असला तर मग आम्हांवर पातकाची जबाबदारी नाही? ते कर्म त्याला लागेल.

पुष्कळ वल्लभ मताचे लोक असे म्हणतात की, पुण्य व पाप दोन्ही देवच करवितो व त्यांच्याप्रमाणे म्हणूं लागतो तर आपलीच आई आपल्या मुलाला विष देते, असें म्हणण्यासारखें होईल हें बरोबर नाही.

बरे जीवच पाप पुण्य करितो तर अज्ञानाने करतो किंवा जाणून करतो? समजून कांही पाप करीत नाही. कारण दुःख भोगण्याची कोणालाच इच्छा नसते व अज्ञानाने न जाणता करतो म्हणावें तर मग त्याचे फळ त्याला होऊं नये ? भगवान म्हणतात,

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।**

**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३-३७**

जसें एखाद्या रोग्याला माहित असते की, मी या रोगावर जर तेल वगैरे वस्तू खाईन तर माझा रोग जास्त होईल, पण तो खातोच. कारण तो इतका त्या खाण्याच्या स्वाधीन असतो की, ते पाहिल्याबरोबर त्याचा सर्व विचार नाहीसा होतो. त्याप्रमाणे सर्वांना या आपल्या मनुष्य योनीपेक्षा बाकी इतर योनीत फारच दुःख आहे.

कुत्र्याला बिचाऱ्याला कोणीच सुखाने पोळी टाकीत नाही. ते एखादे वेळेला जवळ आले तर छिट्, हाड म्हणून हाकून लावतात. विनाकारण मारतात. लहान किडे वगैरे कित्येक पायातळी चिरडले जातात. पशु वगैरेंना कोणी खायला देतील त्या वेळेला खातात.

या अनेक प्रकारें मनुष्यापेक्षा इतर योनीत फारच कष्ट आहेत. हे सर्वांना माहित आहे पण त्यांच्याकडून पापे घडतात.

**सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**

**प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करष्यति ॥ ३-३३**

भगवान म्हणतात, कल्पना कर. एखाद्या रोग्याला वैद्याने सांगितले की तूं



रात्रीं पाणी पिऊं नको व तें न जुमानतां तो रोगी पाणी प्याला; त्याप्रमाणे मी सांगून ठेविलें तरी लोक ऐकत नाहीत. त्याला मी किंवा कोणी इतर काय करणार? माझा किंवा कोणाचाच निग्रह काही उपयोगी होत नाही. आपल्यातील काम क्रोध हे पाप करवितात.

**काम** म्हणजे कोणत्याहि पदार्थाची इच्छा करणे.

**क्रोध** म्हणजे इच्छेप्रमाणे न झाले तर मिळविण्याकरिता तुटून पडणे.

भगवान म्हणतात, हे लोक मी सांगितल्याप्रमाणे वागावयास तयार नसतात. म्हणून त्यांच्याकडून पापे होतात. आपण खोटे बोलणे इच्छित नाही पण प्रसंग आला की एकदम खोटे बोलून जातो. मनांत वासना असते म्हणून पाप करून जातो. भगवान म्हणतात, हें सर्व जाणून पाप करितात म्हणून मी त्यांना उद्धरत नाही.

## नरकाची तीन दारे

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**

**कामः क्रोधस्तथालोभस्तस्मादेतत् त्रयं त्यजेत् ॥ १६-२१**

भगवान म्हणतात, नरकाला जाण्याचे तीन दरवाजे आहेत. या दरवाज्यातून जो जातो तो आपलाच नाश करून घेतो. 'तिकडे विहीर आहे तूं जाऊं नको.' असे सांगूनहि जर कोणी विहिरीत जाऊन पडला तर त्याला काय करणार?

जरबदस्तीने आपण होऊन जे या द्वाराने येतात त्यांना मी उद्धरत नाही. हे तीन दरवाजे काम, क्रोध, लोभ आहेत. साधु पुरुष व मी असे सांगत असतो की, मनुष्ययोनी सोडून इतर योनींत फारच दुःख आहे व जे या काम, क्रोध व लोभ या द्वाराने जातात त्यांना मी या वाईट योनीत घालतो.

मेल्यावर त्यांना यमाच्या येथे फारच दुःख होते. हे लोक जाणून मोहवश होवून पापे करतात. म्हणून भगवान म्हणतात, पशु पक्षी इत्यादि नीच दुःखदायक योनींत जावयाचे नसेल व उद्धरून जावयाचे असेल तर त्यांनी काम, क्रोध, लोभ ह्या तीन गोष्टी सोडून द्याव्या. अर्जुना ! येथे माझा मुळीच अपराध नाही. मूर्ख मनुष्य प्रथम काही तरी वासना धरतात.

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।**

**संगात् संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ २-६२**

**क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।**

**स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ २-६३**

भगवान म्हणतात, या लोकांना कोणती तरी कामना असते ती गोष्ट ते

मिळवून घेतात. 'आपण करतो हेच चांगले' असे त्यांना वाटत असते व ते कोणाचेंच ऐकत नाहीत.

दारु पिणारा असला तर त्याला तेंच चांगले आहे असें वाटते. अशा वासना ते नेहमी करीत असतात. एखादी वासना एखादे वेळेला पूर्ण न झाली तर ती पूर्ण करून घेण्याची वाटेल तशी खटपट करितात व जशीजशी ती पूर्ण होत नाही तसा तसा त्यांना अधिकच मोह पडतो व ती पूर्ण करून घेण्यांत तो इतका झूरतो की, दुसरें चांगले विचारच त्याला आठवत नाही व शेवटी ती इच्छा पूर्ण करून घेण्यामध्ये तो आपला नाश करून घेतो. पण पूर्ण करून घेण्याची हाव मात्र सोडत नाही.अशांना मी नीच योनींत टाकतो.

**तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ।**

**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥गीता १६।१९**

हे लोक अधमाधम आहेत त्यांचा मी द्वेष करितो. कारण तेहि द्वेष करणारे असतात व राक्षसादि नीच योनींत घालतो. ते पुढे भयंकर आसूर स्वभावाचे होतात. पुढे पुढे इतक्या नीच योनींत जातात की, ते ऐकिल्याबरोबर आंगावर शाहारे उत्पन्न होतात. अशा योनी वटवाघुळ वगैरे आहेत. या योनीत ते जाऊन आपलीच विष्टा त्यांना खावी लागते. म्हणून भगवान म्हणतात,

अर्जुना ! मला प्राप्त करून घ्यावयाचे असल्यास जाणून पाप करूं नये. धर्मानेच वागावे व माझ्या प्राप्तीची इच्छा झाल्यावर धर्माचा फार आग्रह धरूं नये. आता ईश्वरप्राप्ति कशी करून घ्यावी हे मी पुढे सांगेन.

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

----------

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥

# १६. पतिव्रता धर्म

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥१८।४६**

भगवान म्हणतात, पार्था! जर तू माझ्या प्राप्तीची इच्छा करीत असशील तर तुला यज्ञ केला पाहिजे. ज्याप्रमाणे कन्येला वर मिळावा अशी इच्छा असेल तर तिचे लग्न केले पाहिजे, त्याप्रमाणे माझ्या प्राप्तीकरता यज्ञ केला पाहिजे. ''हा यज्ञ म्हणजे आपला धर्म पाळणे होय व त्याच्या योगाने माझी प्राप्ती होईल.'' यज्ञ करून



जे अन्न सेवन करितात, ते आपल्या पापाची धुनी करितात व जे यज्ञ न करिता अन्न सेवन करितात ते पाप करितात.

**यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ।**

**भुज्यन्ते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥३।१३**

भगवान म्हणतात, अर्जुना !

**अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।**

**यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः॥गीता ३।१४**

जगत सर्व अन्नाने वाचते. आपण अन्न खातो म्हणून वाचतो. पाऊस पडतो म्हणून आपल्याला खावयाला मिळते. पाऊस मेघापासून पडतो. ज्याचा जो धर्म असेल तोच त्यांनी करावा. ''यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः'' देवांनी यज्ञाने यज्ञाची पूजा केली. आपला धर्म यज्ञ आहे. यज्ञात व धर्मात इतकाच भेद आहे की, यज्ञ करतांना ईश्वरभावना ठेवली पाहिजे. म्हणजे झाले, नाहीतर नुसते कर्म होते. तुला पतिसेवा करताना पतीचे ठिकाणी ईश्वरभावना ठेवण्याला सांगितले.

हे पाणी यज्ञाच्या योगाने पडते व तो यज्ञ म्हणजे ज्याचा जो धर्म असेल तोच आहे. हा धर्म जेव्हा आचरला जाईल तेव्हा पाणी पडेल.

**कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।**

**तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ ३।१५**

मातीची घागर केली म्हणजे त्यांत माती असते त्याप्रमाणे अन्नापासून जगत होते. अन्न पाणी पडल्यास उत्पन्न होते. पाणी यज्ञाने पडतो. यज्ञ कर्म केल्याने होतो व कर्म वेदापासून उत्पन्न होतात. वेद देवापासून म्हणून सर्वच देवापासूनच उत्पन्न होते. म्हणून देव म्हणतात, पार्था ! मला प्राप्त करून घ्यावयाचे असल्यास आपला स्वधर्म केला पाहिजे. अन्नापासूनच भूते, पाण्यापासून अन्न, यज्ञापासून पाणी, कर्मापासून यज्ञ, कर्म वेदापासून, वेद ईश्वरापासून, पुन्हा ईश्वरापासून पाणी, पाण्यापासून अन्न, अन्नापासून भूते, मनूष्यापासून यज्ञ, याप्रमाणे हे चक्र चालले आहे.

**एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।**

**अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥गीता ३।१६**

याप्रमाणे कर्म चक्राप्रमाणे फिरते. या ठिकाणी कर्माला जे अनुसरून राहात नाही ते पापात्मे समजावे. ते या जगांत इंद्रियांना सुख देण्याकरिता आहेत. तरी पण त्यांचा जन्म व्यर्थ आहे. स्वधर्मावांचून कोणत्याच प्रकारे ईश्वरप्राप्ति नाही. ही चित्तशुद्धी होईपर्यंत धर्म करावा.

पतीला जेऊ घालणेंच स्त्रियांचा यज्ञ समजावा. पतीच्या आज्ञेत तत्पर असून, दररोज त्यांचीपूजा करणे हा पतिव्रता धर्म आहे. त्यांच्या आज्ञेवाचून व्रतादिक करूं नये. लहान मुलाने आईच्या आज्ञेशिवाय काही केल्यास भलतेच होते. त्याप्रमाणे जो पुरुष स्वधर्म न करिता भलतेच करते तो आपल्या पायावर गोटा टाकून घेतो.

## कण्व ऋषींचा उपदेश

कण्व ऋषींची मुलगी शकुंतला जेव्हा सासरी जावयाला निघाली त्यावेळेला कण्व ऋषींनी तिला बोध केला. कण्व म्हणाले -

''शुश्रूषस्व गुरुन्- तूं आपल्या वडिलांची सेवा कर. जावा वगैरेंच्या ठिकाणी प्रीति ठेव. तुला जी सपत्नी म्हणजे पतीला दुसऱ्या स्त्रिया असतील तर त्यांच्याशी द्वेष करू नको. त्यांच्याशी प्रेमाने मिळून वाग. पतिविरूद्ध वागल्यास राग येऊ देऊ नको. नोकर चाकर वगैरे हाताखालच्या लोकांना प्रेमाने वागीव व त्यांचे पैसे वेळेच्या वेळी देत जा. मोठेपणा अंगी आल्यास गर्वाने फुगून जाऊं नये.'' या लक्षणांनी स्त्री कुलांगना (समजावी) अन्य स्त्रिया वेश्यासारख्या समजाव्या.

पती विरुद्ध वागला म्हणजे धर्माला सोडून आचरण करू लागला तर त्याचा त्याग करावा.

हा पतिव्रता धर्म स्त्रियांना परम कल्याणकारक आहे. या विरहित कोणत्याच व्रताने एवढे पुण्य होत नाही. या पतिव्रता महात्म्या विषयी तुला एक महाभारतांतील वनपर्वांतील कथा सांगतो.

## कथा : कौशिक व टिटवी

एक कौशिक नांवाचा ब्राह्मण होता. तो बापाला सोडून तपश्चर्येला गेला. तप करून त्याचे शरीर अगदी क्षीण झाले. पुढे तप पूर्ण झाले व त्याला दैवताचा साक्षात्कार झाला व घरी यावयाला निघाला. येतांना तपाची परीक्षा पाहावी म्हणून एक टिटवी पाहून तिला म्हणाला, ''मरून जा'' असे तोंडातून शद्ब निघाल्याबरोबर त्या टिवीने प्राण सोडला. पुढे ''उठून जा'' म्हटल्याबरोबर ती जिवंत होऊन पळून गेली. त्यांतच त्याचा सर्वपुण्यक्षय झाला.

घरी आपल्यावर तो भिक्षा मागण्याकरिता एका बाईच्या घरी गेला. ती बाई फारच पतिव्रता होती. तिचा पती तिच्या मांडीवर डोके ठेवून निजला असल्यामुळे या ब्राह्मणाला भिक्षा वाढण्याला उशीर झाला. त्यामुळे ब्राह्मणाला राग येऊन तिला म्हणाला, ''का ग ! मी कोण आहे तुला माहित नाही काय ? मी जर शाप देईन तर सर्व भस्म करून टाकीन.''



हे ऐकून ती साध्वी म्हणाली, ''महाराज! मी आपल्या पतीच्या सेवेत होते म्हणून भिक्षा वाढायला उशीर झाला. मी कांही चुकले नाही. आपल्या धमकीचा काहीच उपयोग नाही. मी कांही टिटवी नव्हे.''

नाहं बलाका विप्रर्षे हता वा जिविता पुनः । इति श्रुत्वा वचस्तस्या . . . . ॥

इतके ऐकिल्याबरोबर तो चपापला व नमस्कार करून विचारलें, ''आई ! हें तुला कसें समजलें?''

तेव्हा ती म्हणाली, ''मला हे काय विचारता? कदाचित ही सिद्धी मला माझ्या पातिव्रत्याने प्राप्त झाली असेल.''

सारांश, पतिव्रतेच्या सामर्थ्यापुढे कोण्याच व्रताची प्रौढी नाही.

दुसरी पतिव्रता - एक पतिव्रता होती ती आपल्या पतीचें डोके मांडीवर घेऊन बसली होती व पति निजला होता. अशा संधीत तिचा मुलगा विस्तवांत पडला, तरी पण तिच्या मुलाला जाळण्याला अग्नि समर्थ झाली नाही. आपल्या पतीची झोप मोडून ती उठली नाही. पतिव्रता धर्मच कल्याणप्रद आहे. सेवामात्र वर वर करूं नये. ती मनःपूर्वक निष्काम करावी.

## कथा : मुसळाची

दुसरी एक कथा तुला सांगतो. एक बाई होती. ती पतिव्रता होती. एकदा ती तांदूळ कांडीत असतांना तिचा नवरा आला व पाणी मागूं लागला. त्याच्या तोडांतून पाणी निघतांच वर मुसळ उचललें होतें तें वरचें वरच सोडून देऊन पाणी द्यावयाला उठली. मुसळ तसेंच अधर जमिनीला स्पर्श न करितां राहिले. हा चमत्कार एका बाईने पाहिला. ती घरी गेली व तांदूळ कांडायला बसली व आपल्या नवऱ्याला सांगितलें की,

''तुम्ही बाहेरून या व मला एकदम पाणी मांगा.''

असें ऐकून तो बाहेर गेला व पुनः घरी येऊन पाणी मागू लागला. पाणी अक्षर निघतांच तिने वरच मुसळ सोडून दिलें व उठायला जो गेली तो तिच्या डोक्यावर मुसळ पडलें. ''रात्रीं खाल्लें तूप व दिवसा पाहिले रूप'' असें काही धर्माचे फळ नाही. तो निष्काम करावा. कृच्छ्र चांद्रायणादि विधवांचा धर्म आहे.

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥१८।४६**

ज्या परमेश्वराच्या योगाने हें जग व्यापिलें आहे, त्या परमेश्वराची त्या धर्माच्या ठिकाणीं भावना ठेवावी. पतिव्रतांनी आपल्या पतीच्या ठिकाणी ईश्वरभावना

ठेवावी व धर्म पाळावा म्हणजे चित्तशुद्धि होऊन ईश्वरप्राप्ति होते.

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# १७. चित्तशुद्धी

भगवान म्हणाले, आपणच आपल्याला मित्र, बंधु व शत्रु आहो.

**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ६.५**

**बंधुरात्माऽऽत्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।**

**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६.६**

आपला कोणी नाश करीत नाही. कोणी कांही देत नाही. आपणच आपला नाश करून घेतो. कशावरून? आपले चित्त अशुद्ध असल्यास दुसरे अशुद्ध दिसतात व आपले चित्त शुद्ध असल्यास दुसरेहि शुद्ध दिसतात.

### कथा : धर्मराज व दुर्योधन

याविषयी महाभारतांत एक कथा आहे. एकादा धर्माच्या येथे यज्ञ चालला असतांना त्याची संपत्ति पाहून दुर्योधनाला द्वेष उत्पन्न झाला व कृष्णाला विचारले, ''कृष्णा ! तूं एकाला उदार व एकाला कृपण कां आहेस?''

यावर देव कांहीच बोलले नाही. पुढे ब्राह्मण बसले असतांना श्रीकृष्णाने दुर्योधनाला बोलावून सांगितले, ''दुर्योधना! या ब्राह्मणांतून एक चांगला ब्राह्मण घेऊन ये.''

हे ऐकून दुर्योधन ब्राह्मणाकडे जावून पाहू लागला. पण त्याला कोणीच चांगला ब्राह्मण दिसला नाही. नंतर परत येऊन देवाला सांगितलें, ''देवा! तेथे एकहि चांगला ब्राह्मण नाही.''

नंतर धर्माला बोलावून सांगितले, ''धर्मा! या ब्राह्मणांमधून एक वाईट ब्राह्मण घेऊन ये.''

हे ऐकून धर्म गेला व परत येऊन सांगू लागला की, ''देवा, मला त्या ब्रह्मवृंदांत कोणीच वाईट ब्राह्मण दिसत नाही.''

तेव्हा देव म्हणाले, ''दुर्योधना! जसे कोणी मला पाहतो तसा मी त्याला दिसतो.''

आपले चित्त जशा प्रकारचें असतें तशा प्रकारचा त्याला ईश्वर दिसतो.





महामारीला जो जास्त भितो त्यालाच ती लवकर बाधते.

परमात्मा म्हणतात, चित्तशुद्धि झाल्यावर आपण ज्ञानाच्या मार्गाला लागावे. चित्तशुद्धि म्हणजे वाईट वासना जाऊन, चांगल्या कामाकडे प्रवृत्ति होणे.

ज्याचे काम, क्रोध, अभिमान गेले आहेत त्याची चित्तशुद्धि झाली म्हणून समजावी. ती चित्तशुद्धि कशी प्राप्त होते हे सांगीन.

---

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# १८. चातुर्वर्ण्य

तुला मागे आपणच आपले शत्रु मित्र आहो, कोणी कोणाला देत नाही व कोणी कोणाचे कांही घेत नाही, असे सांगितले. ज्याचे चित्त शुद्ध असते त्याला सर्वच चांगले दिसतात म्हणून आपले चित्त शुद्ध झाले म्हणजे आपल्याला शत्रु, मित्र कोणीच राहात नाही. ही चित्तशुद्धि कशी होते हे सांगतो.

कल्पना कर. तुला गहूं निसावयाचे आहेत. तो जर गव्हाचा ढिग असला तर निसता येणार नाही. तर मग कसें करतो? आपण थोडे थोडे गहू एखाद्या पात्रांत घेऊन निसतो. त्याप्रमाणेच आपल्या मनांतील विकार काढता यावे म्हणून ईश्वराने मनुष्यजातीचे चार भाग केले आहेत.

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ॥गीता ४.१३ (१)**

भगवान म्हणाले पार्था ! हे मनुष्य जातीतील चार वर्ण मीच उत्पन्न केले व ते वर्ण त्यांच्या त्यांच्या गुणाप्रमाणे व कर्माप्रमाणे केले आहेत.

ज्वारीची मळणी करतांना आपण त्यांचे चार विभाग करतो. अस्सल, आकण, निकण व वळला. यापैकी अस्सल भागामध्ये जवारी जास्त व माती फारच कमी असते. आकण भागांत अस्सल भागांतल्या जवारीपेक्षा जवारचे दाणे बारीक असून माती थोडी जास्त असते. निकण भागांत जवारीचे दाणे जास्त बारीक असून मातीहि पुष्कळ असते व वळला भागांत मातीच फार असते व दाणे फारच थोडे असल्यामुळे ते त्यांतून धुवून काढून घ्यावे लागतात.

त्याप्रमाणेच ईश्वरानेहि मनुष्य जातीचे चार विभाग केले आहेत. पैकी ज्यांच्यामध्ये चांगले गुण असतात ते ब्राह्मण. चांगले गुण थोडे कमी असून वाईट गुणांचाहि संबंध असतो ते क्षत्रिय समजावे. वैश्य फारच निर्बल असतात. त्यांच्या ठिकाणी चांगले गुण फारच थोडे असून वाईट गुण फारच असतात. शूद्रांचे ठिकाणी चांगले गुण फारच्‌ चित दृष्टीस पडत असून वाईट गुणच फार असतात. भगवान

म्हणतात.

**ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।**
**कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः॥१८।४१**

ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांचा धर्म निरनिराळा आहे. बरें निराळा कां आहे? कारण त्याचा त्याचा स्वभाव निरनिराळा आहे. येथे तुला एक गोष्ट सांगतो.

गीतेवर शंकराचार्यांची टिका आहे. त्याला भाष्य म्हणतात. त्यांत या श्लोकाचा त्यांनी माझ्याच मताप्रमाणे अर्थ केला आहे. आता या ठिकाणी जर अशी शंका केली की, काय हो? परमेश्वराने स्वभावाप्रमाणेच कर्म का करावयाला सांगितलें? शास्त्रांत ज्याप्रमाणे सांगितले असेल त्याप्रमाणे करावे; मग ते त्याच्या स्वभावाला रुचोत अथवा न रुचोत?

या प्रश्नाचे उत्तर आचार्य असे देतात की, स्वभाव बदलून कर्म सांगण्याची शास्त्राची प्रवृत्ति नाही. आई आपल्या लेकरांना मोठे होईपर्यंत लाडविते पण पुढे ते आपल्या स्वभावावरच जातात किंवा वैद्य सर्वांना एकच पथ्य सांगतो. त्याप्रमाणे श्रुतिमाता मुंजादि संस्कार सर्व वर्णांना न सांगता - खोटे बोलूं नये असे एकच शिक्षण देते.

तरी या ठिकाणी ही गंमत आहे की, आपला स्वभाव जसा असेल तसतसा धर्म शास्त्राने सांगितला आहे.

आता एकदा शूद्र चांगल्या गुणांचा असला तर त्याची जाति गुण कर्मांनीच मानावयाची की काय? या ठिकाणी, मधुसुदनस्वामी म्हणतात की, एखादाच शूद्र चांगला गुणांचा असतो व तो चांगला गुणांचा असण्याला कांही कारणे असतात. पण सर्वच शूद्र कांही चांगल्या गुणांचे नसतात. पण ब्राह्मण तर सर्वच चांगल्या गुणांचे असतात. एखादाच वाईट गुणांचा असतो म्हणून जन्माप्रमाणे जाति मानावी.

परंतु आपण कलीमध्ये याच्या उलट पाहतो. कित्येक ब्राह्मण मद्य वगैरे पितात व शूद्र पीत नाहीत व या ब्राह्मणाच्या आचरणामुळे ते स्वाभाविकच अधम होत जातात. तर मग यांची जातिप्रमाणेच व्यवस्था लावावयाची की काय? या प्रश्नाला मधुसुदनस्वामी कांही उत्तर देत नाहीत. भागवतांत असेच वचन आहे.

**यस्य यल्लक्षणं प्रोक्त पुंसो वर्णाभिव्यंजकम् ।**
**यदन्यत्रापि दृश्यते तत्तेनैव विनिर्दिशेत् ॥**

सोने मातीत सापडो अथवा सोन्याच्या खाणीत सापडो ते सोनेच म्हटले जाईल. त्याप्रमाणे कोणत्याहि जातीचा चांगल्या गुणांचा मनुष्य सापडो तो ब्राह्मणांतच



घ्यावा. जन्मावरून ब्रह्मणादि जाति ठरविल्यास,

**सर्वे वै योनिजा मर्त्या सर्वे मूत्रपुरीषिणः ।**
**एकेंद्रियेंद्रियार्थोश्च, तस्माच्छीलगुणैर्द्विजाः ॥**

कोणत्याच जातीत कांही भेद नाही, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे सर्वच आपल्या आपल्या आईच्या गर्भातूनच उत्पन्न होतात. क्षत्रिय अन्न खातात. त्यांचाहि मळ होतो. वैश्य व शूद्र जें अन्न खातात त्यांचाहि मळच होतो. व त्याप्रमाणे ब्राह्मण जे अन्न खातात त्याचे काही सोने होत नाही. तर क्षत्रिय, वैश्य शूद्राप्रमाणे तेहि मलविसर्जन करतात. यावरून ज्याचे गुण उत्तम तोच ब्राह्मण असे आचार्य म्हणतात

**तस्माच्छीलगुणैर्द्विजा . . ।**

त्याचप्रमाणे -

**शूद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणो भवेत् ।**
**ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात्प्रत्यवरो भवेत् ॥**

शूद्र जर चांगल्या गुणांचा असला तर तोहि चांगला गुणवान ब्राह्मण होतो व ब्राह्मण वाईट कर्म करील तर तो शूद्र होतो.

**पंचेन्द्रियार्णवं घोरं यदि शूद्रोऽपि तीर्णवान् ।**
**तस्मै दानं प्रदातव्यमप्रमेय युधिष्टिर** ॥

धर्म राजाला वैशंपायन सांगतात. हे राजा! ज्याने आपली पांच इंद्रिये जिंकलीं आहेत व मनाचा निग्रह केला त्याला दान द्यावे म्हणजे अशा पुरुषांनाच दान देण्याचा अधिकार आहे.

जन्मवादी यावर असे म्हणतात की, हे कांही जरी असलें तरी खरें वाटत नाही.

त्यांना आम्ही असे विचारतो की, जर तुमचा पुत्र वाईट गुणांचा असला व नोकर विश्वासुक गुणांचा आहे, तर एखादे वेळी काशीस जाण्याचे असल्यास तुम्ही घरचा कारभार कोणाकडे सोपवाल? यावर त्यांचे उत्तर आमच्या मताप्रमाणेच येते. म्हणजे ते विश्वासु नोकरावरच कारभार सोपवितील. त्याप्रमाणेच परमेश्वराला चांगले गुण आवडतात. वाईट आवडत नाहीत तो आपले ज्ञानभांडार चांगल्या लोकांच्याच हाती देतो.

पुनः जन्मवादी असे म्हणतील की गुणकर्माने चांगला असला तरी तो ब्राह्मण होण्यास उपयोगी पडत नाही कारण सूतसंहितेंत असे सांगितलें की,

**जन्मनैवहि जातिस्याद्. . . .** जाती ही जन्मानेच उत्पन्न होते. गुणकर्माने

उत्पन्न होत नाही. जशी सर्व झाडेंच खरी, पण त्यांतहि कवठाचे झाड निराळे, चिंचेचे झाड निराळे, आंब्याचे झाड निराळे असते. झाड जर एकच तर मग आपण असा निराळेपणा कां करतो? तर बीजामुळे करतो. त्याप्रमाणे मनुष्यपणा सर्व जातीत सारखाच आहे. तरी जन्मानेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र होतात.

आता कांहीजण असे म्हणतात की, झाडाच्या बीजाप्रमाणे मनुष्याचे बीज कांही निराळे नाही. सर्व जगाचे कारण मायाच आहे. म्हणून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र सर्व एकच मानणे बरें.

यावर पुनः जन्मवादी म्हणतात की, जर मायाच कारण आहे, तर मग मनुष्य, बैल, घोडा, कुत्रा, वगैरे असे निरनिराळे कां व्हावे? असे ज्याअर्थी होते त्या अर्थी वर्ण जन्मानेच होतात. गुणकर्माने होतात, असे मानणे बरोबर नाही.

यावर गुणकर्मवादी अशी कोटी करतात की, ज्याप्रमाणे कवठीचे एकच बीज असते व त्यापासून होणाऱ्या कवठीच्या झाडांत जाती नाही त्याप्रमाणे मनुष्य बीज तर एकच आहे मग त्यांतहि भेद कां व्हावेत? म्हणून गुणकर्माच्याच योगाने जाती मानणें चागलें.

जन्मवादी म्हणतात आंब्याचे झाड एका देशांत एक तर दुसऱ्या देशांत दुसऱ्याच प्रकारचे असते व याला कारण माती. मातीच्या गुणाने हा निराळेपणा आहे. त्याप्रमाणे बीजाच्या संसर्गाप्रमाणे जाति होते.

मनु म्हणतात, ब्राह्मणाने शूद्रिणीशीं लग्न केलें व त्याच्यापासून जो मुलगा होईल तो ब्राह्मणच ठरतो व पुढे त्याने पुनः शूद्रिणीशीं लग्न लाविलें व त्याच्यापासून मुलगा झाला तर तो ब्राह्मणच ठरतो. या प्रमाणे सात पिढ्यापर्यंत ब्राह्मण राहूं शकतो. याच्या उलट शूद्राने ब्राह्मणाच्या मुलीशीं लग्न केलें तर त्याच्यापासून झालेला मुलगा शूद्र गणल्या जातो, म्हणून बीजापासूनच जाती मानावी, असें जन्मवादी म्हणतात.

गुणकर्मवादी, म्हणतात आपल्या गोत्रांतील मुलगी आपण बायको केली तर तो माहार, मांग, चांडाळ होतो. या ठिकाणी बीज तर अधिक जवळचें आहे मग तो चांडाळ उत्पन्न होतो असें कां म्हणतां? जर ब्राह्मण धर्मभ्रष्ट असला तर तोहि पतीत होतो. आणि त्याचे बीज तर कामयच असतें. तर मग चांगले गुणधर्म शूद्राचे ठिकाणीं असले तर तो ब्राह्मण कां होऊं नये? याप्रमाणे गुणकर्मानेच जाति मानणे चांगले.

हा वाद अनादिसिद्ध आहे. अजून निर्णय झाला नाही. स्वभाव कसाहि बनला असो. मनानेच बनला असो किंवा कोणाच्या शिक्षणाने बनला असो, स्वधर्माप्रमाणे



वागणे प्रत्येकाला हितावह आहे. जसे बापाच्या शिक्षणामुळे असो, किंवा मुलाने आपल्या मनानेच करीत असो, पण त्याने पित्याची आज्ञा पाळावी हा त्याचा धर्म आहे. स्त्रियेला पतिसेवा कोणी शिकविली असो किंवा तिने आपल्या मनाने पतीची सेवा करण्याचा निश्चय केला असो, पतिसेवा करणे हा स्त्रियेचा धर्म आहे.

**शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।**
**ज्ञानविज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥१८।४२**

**ब्राह्मणधर्म -**

आपलीं इंद्रिये रोधून ठेवणें, विहित कर्मानुसार आचरण करणें, बाहेर स्नान करून व आंत म्हणजे मनांत शांति ठेवून शुद्ध राहणें, क्षमा असणे, सरळपणाने वागणे म्हणजे आंत एक व बाहेर एक न दाखविणे, निष्कपटपणाने वागणे, वेद शास्त्र समजणें, म्हणजे कर्म कसे करावे, यज्ञाची पात्रे कशी मांडावी हें समजणे, ईश्वराचे ठिकाणी श्रद्धा असणे; हे ब्राह्मणाचे स्वाभाविक धर्म आहेत.

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥१८।४३**

**क्षत्रियधर्म -**

आंगी शूरपणा असणें, शत्रूला मारणें पण रागावून न मारणें, अंतःकरण शांत असणे, तेज असणे, दुसऱ्याचें वाईट करणार नाही, करीन तर चांगलेच करीन अशी धमक असणे, धैर्य असणे, कामांत न चुकणे, कुत्र्यासारखे युद्धांतून पळून न जाणे, मागितलेलें देणें, ईश्वर आहे असें समजणें, हे क्षत्रियांचे स्वाभाविक कर्म आहे.

**कृषिगोरक्षवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।**
**परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥१८।४४**

**वैश्यधर्म -**

शेती करणें, गाई चारणे, व्यापार करणें, हें वैश्याचे स्वाभाविक कर्म आहे.

**शूद्रधर्म -**

आणि वरील तीन्ही वर्णांची सेवा करणे हा शूद्रांचा स्वाभाविक धर्म आहे या श्लोकांतील अपि शब्द पक्षांतर बोधक आहे. म्हणजे शूद्रासारख्या ज्या स्त्रिया असता त्यांचा पतिसेवा करणें हा स्वाभाविक धर्म आहे.

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।**

**स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥१८-४५**

**स्वधर्मानेच चित्तशुद्धि** - आपला धर्म जो मनुष्य चांगल्या रीतीने करतो, त्यालाच उत्तम प्रकारची सिद्धि होते, म्हणजे त्याची चित्तशुद्धि होते.

उदाहरणार्थ : समज, एक कुलीन स्त्री आहे व दुसरी एक वेश्या आहे. जर कुलीन स्त्री वेश्येप्रमाणे सर्व लाज सोडून वागूं लागली तर सर्व तिची निर्भत्सना करतील व वेश्या जर कुलांगनेप्रमाणे वागूं लागली तर तिला खायला देखील मिळणार नाही. आपापल्या धर्माप्रमाणेच वागतील तरच त्यांना किर्ती मिळून सुख होईल. वेश्येला गाणें, बजावणें वगैरे करणे हेच चांगले आहे. घरांत बसणे हा तिचा वाईट गुण आहे व कुलांगनेला घरांत बसून आपल्या पतीची सेवा करून घरांतले काम करणें हेच चांगलें आहे.

त्याप्रमाणे संतुष्ट असणें, शांत राहणे वगैरे ब्राह्मणाचे स्वाभाविक गुण असून त्यांच्या योगाने त्याची किर्ती होते. राजा शांत असल्यास त्याची किर्ती होत नाही.

**असंतुष्टो द्विजो नष्टः संतुष्टश्च महीपतिः ।**

**सलज्ञा गणिका नष्टा निर्लज्ञा च कुलांगना ॥**

असंतोषी ब्राह्मण कामाचा नाही, संतोषी राजा कामाचा नाही, वेश्या सलज्ञ असून उपयोगी नाही व कुलांगना निर्लज्ञ असूं नये.

सारांश, ज्याचा जो धर्म तोच त्यांनी करावा व आपला धर्म केला तरी तो परमेश्वरप्राप्तीची इच्छा होईपर्यंत करावा व मग फारसा आग्रह ठेवूं नये व तो धर्म परमेश्वराला अर्पण करीत असावें.

समज तुझ्या पतीने घरी द्रव्य आणून तुजपाशीं दिलें व ते तू त्याला काम पडेल तेव्हा न दिले तर तो तुझा धर्म होईल काय? नाही. कारण ते द्रव्य कांही तुझे नाही. त्यांनीच मिळवून आणून तुजपाशीं ठेविलें आहे.

त्याप्रमाणे ईश्वराने आपल्याला धर्म सांगितला, तो आचरण करण्याकरिता आपल्याला पति दिला, नाक दिले, डोळे दिले, कान दिले, हात दिले, पाय दिले. ज्या हातपायाच्या योगाने आपण करावयाचें ते सर्व ईश्वराने दिलेत, तर त्या हातापायाच्या योगाने केलेला धर्म आपण ईश्वराला अर्पण न केला तर तो धर्म होईल काय? नाही. म्हणून सर्व धर्म ईश्वराला अर्पण करावा म्हणजे चित्तशुद्धि होते.

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**



**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ गीता ९।२७**

भगवान म्हणतात, पार्था ! जें तूं करतोस, जें कांही खातोस, जें कांही होम करतोस, जें कांही दुसऱ्यांना देतोस, जें कांही तप करतोस, ते सर्वच मला अर्पण करीत जा. याप्रमाणे जसें पतीनेच सर्व आणिलें आहे यांत माझे कांही नाही असें समजून पतिव्रता पतीची सेवा करिते, त्याप्रमाणे सर्वच परमेश्वराचें आहे, यांत माझें कांहीच नाही असें भक्तांनाहि वाटतें व त्याला वाटते की, ईश्वराला आपण भेटावें.

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।**

**ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ।।गीता ४।२४**

मूर्ति देवाचीच, पाथरकारहि देवांनीच निर्माण केला. आपल्याला हात, पाय, श्वास, फुलें वगैरे सर्वच देवाने दिले म्हणून जे जे आपण करावे ते ते सर्वच देवाला अर्पण करावे हे चांगले. लहान मुलाला हातापायांत शक्ति नसल्यामुळे जशी आई त्याला कडेवर उचलून घेते व त्याचे योग्य रीतीने संगोपन करते, त्याप्रमाणेच वेदाने सांगितल्याप्रमाणे कर्में करून ती ईश्वरार्पण केली असतां ईश्वर आपण होऊनच उचलून घेतो. आता परमेश्वराची भक्ति कशी करावी हे पुढे सांगीन.

**हरिःॐतत्सत् श्रीमद्भगवद्गीताटिकायां सौंदर्यधात्र्यां अमृतकलिकायां कर्मयोगरूपं प्रथमाचमनम् ॥**

**॥ श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु शुभं भवतु ॥**

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर आई समर्थ ॥**

# १९. उपासना

मागे कर्मकांड सांगितले. आता उपासना सांगतो. हा जो मागे कर्मयोग सांगितला त्या योगाने चित्तशुद्धि होते. नुसत्या विचाराने चित्तशुद्धि होत नाही.

कल्पना कर. पाण्याचा समुद्र आहे.तुला पाणी प्यावयाचे आहे. आता समुद्रांत उडी टाकून पाणी प्यावयाचे म्हणशील तर जुळेल कां? नाही. कां? पाणी पिवून तहान भागणे एकीचकडे राहून मरण्याचा प्रसंग येईल. तहान भागून मनाची शांति होणार नाही. म्हणून तहानेपुरतेंच पाणी घेतले पाहिजे. आपल्याजवळ साठविण्याला जागा नसली तर थोडें थोडें आणून घेतलें पाहिजें. सूर्याचा सर्व प्रकाश खाली येत नाही. तो त्यालाच लागून असतो. त्यांतून तुटून येत नाही. तथापि पृथ्वीवर आला की, तेवढाच प्रकाश अंधःकार दूर करण्याला समर्थ आहे. एखाद्या

निर्जन ठिकाणीं बसलो तर करमेल कां? नाही. कां नाही? संवय नाही म्हणून!

त्याप्रमाणे जोपर्यंत निर्गुण परमेश्वराच्या ठिकाणी लक्ष लावता येत नाही व सर्व विषय नाहीसे करून त्याच्या ठिकाणी लक्ष लावणेंहि कठीण आहे, तोपर्यंत त्या परमेश्वराचे अवतार सगुण मूर्तीच्या ठिकाणीं मन लावल्याने पुढे निर्गुण ब्रह्माकडे प्रवृत्ति होते. मनाचेंच अन्न करून जेवतां येते काय? नाही. पण स्वप्नांत आपण मनानेच उत्पन्न करून जेवतो म्हणजे भावना तीव्र झाली म्हणजे होते. त्याप्रमाणे तीव्र भावना झाली म्हणजे साक्षात्कार होतो.

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ ४।१**

हा योग मी सूर्याला सांगितला होता. पुढे त्याने स्वायंभुव मनूला. व मनूने इक्ष्वाकूला सांगितला. याप्रमाणे,

**एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।**
**स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ ४।२**

पुढे पुष्कळ राजर्षी या योगाला जाणत होते व याप्रमाणे परंपरेने चालत आला होता. परंतु अविश्वासी लोकांनी तो बुडविला. पूर्वीहि धर्म नष्ट होत होता.

**स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।**
**भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥४।३**

हा योग तूं सखा म्हणून सांगितला. यावर अर्जुनाने शंका केली.

**अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।**
**कथमेतद्विजानियां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥४।४**

अर्जुन म्हणला, देवा ! सूर्य तर सृष्टीच्या आधीपासून आहे. तू तर आता यशोदीच्या पोटी आमच्यासमोर झालास, मग तूं असे कसे म्हणतोस की, मी हा योग सूर्याला सांगितला ?

**बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ४।५**

देव म्हणाले, अर्जुना! अशी भलतीच शंका करूं नको. तुझे व माझे पुष्कळ जन्म झालेत, परंतु मी त्या सर्वांना जाणतो, तूं जाणत नाहीस. कारण ईश्वर सर्वज्ञ आहे, म्हणून भूत भविष्य सर्वच त्याला वर्तमान आहे. जन्मापासून त्याला कर्तेपणा नाही.



**मन : अनंत / अमर्याद**

कांही गोष्टी अशा आहेत की त्या तेवढ्या जागेत फैलावल्या तरी तीच शक्ति व मोठ्या जागेत फैलावल्या तरी तीच शक्ति असते. आपले मन शरीरापुरतेच आहे; पण स्वप्नांत ब्रह्मांडाएवढी सृष्टी उत्पन्न करते. मन त्याच्या मानाने लहान आहे. पण प्रत्येकाच्या मनाला स्पेस व टाईम याच्याबद्दलची इन्फिनिटची कल्पना येत असते व ती ॲप्रियन आहे. ती आता आपले मन इन्फिनिट असल्याशिवाय त्याची आयडिया येऊ शकत नाही. म्हणून ते तेवढे व्यापक आहे. देश व काल अनंत आहे हे मन सांगते. जर मन अनंत नसते तर त्याची त्याला कल्पना आली नसती. जे समर्याद आहे त्याला अमर्यादाची कल्पना येते म्हणणें मूर्खपणा आहे. पांच शेर वजन उचलणाऱ्यामध्ये पोटेंशल एनर्जि त्यापेक्षा जास्त पाहिजे, म्हणजे 'जेवढ्या जागेत मन आहे तेवढ्यामध्ये सर्व व्यापले जाते' व त्या मनाच्या पलीकडे असणारा आत्मा त्याच्यापेक्षा व्यापक असल्यामुळे मी सर्व जन्म जाणतो. आज्ञानामुळे शत्रू मानून ताप देतोस म्हणून परंतप तुझें नांव आहे. एकावर प्रेम व एकावर द्वेष असल्यामुळे फायदा-नुकसानीकडे लक्ष जाते व त्यामुळे स्मृति येत नाही. मन सर्व काळीशांत ठेवल्याने स्मृति होऊ शकते म्हणून मला स्मृति राहते. तू जर देवा, अजन्मा वगैरे आहेस तर मग तुला जन्म कसा? यापुढे उद्या सांगू.

**॥ श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥**

०००

**॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

# २०. अवतार

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।**
**प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ४-६**

भगवान म्हणाले, अर्जुना ! मनाला थोडक्या जागेत पुष्कळाची कल्पना करता येते. त्याप्रमाणे मी आपल्या ज्ञानशक्तीच्या योगाने आपल्या व तुझ्या जन्माला जाणतो.

''ईश्वर कोणापासून जन्मला नाही. तसाच हा कधी मरत नाही. मग अवतार कसा घेतो?''

भगवान म्हणतात, ''मी ईश्वर जन्मरहित व मरणरहित आहे कारण जन्म व मरण जी वस्तु पूर्वी नाही त्याला होते. जी वस्तू पूर्वी नाही तिचाच नाश होतो.

जी वस्तु उत्पन्न होत नाही तिचा नाशहि होत नाही. जन्ममरण कोणाला तरी समजल्याशिवाय होत नाही. असे समजल्यावाचून त्याला जन्ममरण आहे म्हणतां येत नाही. मी आपल्या मायेने अवतार घेतो.

पुष्कळ म्हणतात की मी आपल्या इच्छेने जन्म घेतो. (पुढे ही कल्पना ज्ञानकांडांत बदलेल) परमात्मा अवतार इच्छेने घेत नाही. कारण त्याला इच्छा मुळीच नाही. कारण इच्छा जी होत असते ती जी वस्तु जवळ नाही तिजबद्दल होत असते. अप्राप्त वस्तूची इच्छा होत असते किंवा जरूर असली त्या वस्तूची इच्छा होत असते व जरूर अल्पज्ञाला असते; सर्वज्ञाला नाही. परमेश्वराला दूर अशी कोणतीच वस्तु नाही. सत्पुरुषाचे पुण्य व दुष्टाचे पाप त्या कर्मांने त्याचे शरीर होत असते.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ४।७**

### अवतार केव्हा होतो ?

ज्या ज्या वेळेला धर्माची ग्लानी होते व अधर्माची वृद्धि होते, त्या वेळेला मी अवतार घेत असतो. आता हा धर्म कोणता? हा विचाराने ठरवावा लागतो. हा धर्म यज्ञादिकाने स्थापन होत नाही तर ज्या रीतीने सत्त्वशुद्धि होईल तो धर्म घ्यावयाचा.

**अधर्माची वृद्धि** झाली की सत्पुरुषांना उत्पन्न करितो.

**साधूंचा छळ** झाला की मी अवतार घेतो.

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ४।८**

व धर्माचे स्थापन करून दुष्टांचा संहार करितो व सुष्टांचे पालन करतो. असा अवतार मी युगायुगाचे ठिकाणी घेतो. माझा अवतार बंद राहात नाही.

**जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।**
**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥४।९**

याप्रमाणे माझा अवतारक्रम आहे. ते अवतार दिव्य असतात व मायेने होत नाही. याप्रमाणे जो हें जाणतो त्याला पुनर्जन्म होत नाही.

**॥ श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥**

०००





**॥ श्रीज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

# २१. अवतारोपासना

भगवान म्हणाले, अर्जुना ! माझे जन्मकर्म म्हणजे माझे अवतारकृत्य. (मी जे कांही करतो) ते दिव्य आहेत. ते पृथ्वीवर कोणाच्यानेहि होण्यासारखे नाहीत. मी जे जे काही करतो, ते लोकासाठीच करतो. आपल्यासाठी कांहीच नाही. ज्याच्या योगाने लोकांचे कल्याण होईल असे मी करतो.

**जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।**
**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥४।९**

माझा अवतार व मी करितो ते उत्तम आहे, असे जो कोणी जाणतो तो माझ्याकडेच येतो. त्यांना पुनः जन्ममरण होत नाही. मजवर जो जशी भावना ठेवितो, त्याच्यापाशी मी तसाच वागतो .

### ये यथा मां प्रपद्यन्ते -

देव म्हणतात, जो जो मजवर जसा भाव ठेवतो तसा मी त्याला पावतो. ''वसे हो अंतरी भाव जैसा.'' परमात्मा म्हणतात, अर्जुना ! माझ्याजवळ एकवेळ प्रेम दृढ झाला की, मी मग उपेक्षा करीत नाही. जसे जे मला भजतात, त्यांच्यावर मी तशी तशी कृपा करतो.

नदी वाहत असते, तिच्यातून ज्याला जितके पाणी पाहिजे तितके तो आपल्या तहानेपुरते काढून घेतो. तसेंच आपल्या इच्छेनुसार जो जो मला ज्या ज्या भावनेने भजतो, त्या त्या रूपाने मी त्याला फळ देतो.

**समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।**
**ये भजंति तु मां भक्त्या मयि तेषु चाप्यहम् ॥९।२९**

भगवान म्हणतात, मी परमेश्वर असल्यामुळे मला कोणी द्वेष्यहि नाही व प्रियहि नाही. जसे नदी कोणाचाहि द्वेष करीत नाही. राजा पाणी पिवो की चोर पिवो. ती सारखेंच पाणी पुरविते तसेंच मला कोणाचा द्वेषहि नाही व प्रेमहि नाही. ज्यांना असते तेच माझ्यावर प्रेम ठेवून मला आपल्या हृदयांत व मी त्यांच्या हृदयांत राहतोहि. मला वैकुंठहि आवडत नाही व मोठ्या तपस्वीयांच्याजवळहि करमत नाही. परंतु माझे भक्त जेथे माझे गुण गातात तेथेच मी राहतो. आता भगवान स्वतः

भक्तीचा महिमा सांगतात.

तुला जर माझ्या ठिकाणी प्रेम ठेवावयाचा असेल तर आधी चित्त शुद्ध करून नंतर प्रेम ठेव. सर्व कर्म मलाच अर्पण कर म्हणजे कर्तेपणाचा अभिमानहि निघून जाईल. कारण अभिमान आहे त्यालाच पापपुण्य लागून आहेत व पापपुण्याच्या योगाने सुख व दुःख होतात.

अधर्म तर करूच नये. परंतु धर्म केला म्हटले तरी अभिमान येतोच व अभिमान आला की फळ भोगावेंच लागते. व फळभोग संपला की, पुन्हा पतन झालेच पाहिजे. मला कर्म अर्पण कर वगैरे जे देव सांगतात ते अभिमानाने सांगत असतील असे कोणी म्हणेल तर ते बरोबर नाही. 'कारण नसून सांगणे' हा अभिमान होय. आपल्याजवळ दोन पैसे आहेत. तर मजजवळ दोन पैसे आहेत असे म्हणणे कांही अभिमान नाही. उलट एखादा मनुष्य बुडत असला तर काठावरच्या तरणाऱ्याने ''थांब भिऊ नको, मी येतो'' असे अभिमानपूर्वक बोलणे व बुडत्याला धीर देणे जास्त श्रेयस्कर आहे.

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यासि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥९।२७**

देव म्हणतात, अर्जुना ! जें जें कर्म तूं करशील तें तें मला अर्पण कर. कोणत्याच कर्मावर आपला अभिमान ठेऊं नकोस. चांगला असो की, वाईट असो तें तें सर्व तू मलाच अर्पण कर. जप, पूजा, तप, दान, यज्ञ वगैरे जे कांही तूं करशील तर तें मलाच अर्पण कर. भोग भोगावयाचे असतील, जेवाखायचे असेल, ते मलाच अर्पण करून मलाच त्याचा नैवेद्य दाखवून नंतर त्याचा उपभोग घे. अग्नींत भाजलेल्या बीजाला जसे अंकुर फुटत नाही त्याप्रमाणे कर्म मला अर्पण केले म्हणजे त्यांना सुख-दुःखरूप फळे येत नाहीत. तर त्यांच्या योगाने चित्तशुद्धिच होते.

अग्नीत तूप टाकल्याने यज्ञ काही सफल होत नाही, तर अग्नी परमेश्वराचे मुख आहे या भावनेने हवन केले तरच त्याचे फळ होते. म्हणून तूं जे कांही कर्म करशील ते ते माझी भावना धरूनच करीत जा. पुण्य कर्म जरी असले तरी त्यात पुष्कळ दोष होतात. म्हणून ते कृष्णार्पण केल्याशिवाय सफल होत नाही व कृष्णार्पण केल्यानेच चित्तशुद्धि होते.

एकपट दान केले तर दसपट मिळते. कुरुक्षेत्रांत ग्रहणाच्या वेळी दान केले तर कोटीपट फळ मिळते. हे सर्व जरी तूं केले तरी ते मलाच अर्पण कर. नाहीतर



यापासून भोग मिळतील व भोग भोगिल्यानंतर पतन होईल.

त्याचप्रमाणे तपापासूनहि भलभलतेच परिणाम होतात. जसे दुसऱ्याला शाप देणे, सिद्धि भोगणे, वगैरे ते सर्व टाळण्याकरिता तूं सर्व कर्म मलाच अर्पण करून, सर्व ठिकाणचा अभिमान सोडून मला शरण ये म्हणजे चित्त शुद्ध होईल व त्यानेच पूर्णता होईल. ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

००० 

**॥ श्री ज्ञानेश्वरमाउली प्रसन्न ॥**

# २२. अन्य देवतांच्या भक्तीचा निषेध

**येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥ ९-२३**

जे मला सोडून दुसऱ्या देवतांची भक्ति करतात, ते माझीच भक्ति करतात; कारण सर्व देवतांच्या ठिकाणी मी आहेच. परंतु ती त्यांची भक्ति अविधिपूर्वक होते. जेथली गोष्ट तेथेच पाहिजेत. पायांतले जोडवे नाकांत घातले, कानांतल्या बाळ्या डोक्यांत घातल्या तर चालत नाही. जेथला दागिना तेथेच घातला पाहिजे. त्याप्रमाणे भक्ति करण्याला योग्य जो मी त्या माझी भक्ति निष्कामरीतीने केली पाहिजे.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ ७-२१**

जो जो ज्या ज्या देवतेची भक्ति करतो, त्याची त्याची श्रद्धा मी तेथेच वाढवितो. कारण सर्व माझेच प्रतिबिंब आहेत. परंतु मुळाला सोडून फांद्याला पाणी घालणे काय कामाचे ? त्याप्रमाणे परमेश्वराला सोडून इतर देवतांची भक्ति काय कामाची ?

**कांक्षन्तः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ।**
**क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ ४-१२**

जे भक्ति करून फळ मागतात त्यांना फळ तर मिळतेंच परंतु जवळ राहत नाही. म्हणून खरे भक्त इच्छा न धरितां केवळ निष्काम रीतीनेच परमेश्वराचे भजन करतात.

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ।**
**ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ ९।२०**

जे पुण्य व पाप दोन्ही करतात म्हणजे भक्तिरूपी पुण्य व कामनारूपी पाप करतात त्यांना भक्तीच्या योगाने उत्तम गति तर होतेच; परंतु कामनेच्यायोगाने फळ भोगिल्यानंतर पतन होते.

जसे एखाद्याला अमोलिक रत्न सापडले व ते त्याने दोन पैशाला विकले तर त्याला दोन पैसे तर मिळालेच परंतु हातचे रत्न गेले. त्याप्रमाणे ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद शिकून त्यांच्या योगाने माझे यजन करून जे स्वर्ग मागतात ते पुण्याच्या योगाने स्वर्गाला तर जातात व त्यांना तेथले भोगहि मिळतात; परंतु भोग भोगल्यानंतर, पुण्य क्षीण झाल्यानंतर पुन्हा त्यांना पतन होते.

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।**
**एवं त्रयी धर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ॥९।२१**

भगवान् म्हणतात, केवळ विषयाच्या इच्छेने जे धर्माचा आश्रय करतात, त्यांना नुसती यातायात व कष्ट प्राप्त होतात. परंतु माझे भक्त तसे करीत नाहीत. भागवतात देव उद्धवाला म्हणतात,

**तान्मनरस्का मृताः मदर्थे त्यक्तदैहिकाः।**
**ये त्यक्तलोकधर्माश्च मदर्थे तान् बिभर्म्यहम् ॥**

उद्धवा! गोपीकांनी तन, मन, धन व प्राणहि सर्व माझ्याच ठिकाणी अर्पण केली. माझ्याचकरिता त्यांनी घर, दार, पति धर्माऽधर्म, लोकलज्ञा वगैरे सर्वांचा त्याग केला. त्यांचे सर्वस्व मी सांभाळीन.

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

००० 

*विजया दशमी. मुक्काम-काजळी*

*(श्रीमद्भगवद्गीता गोविंदशास्त्रींना निमित्तकरून व्याख्यान करतात.)*

# २३. गीतेचा आरंभ

धृतराष्ट्र म्हणतात :-

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ॥**
**मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥१.१॥**

**धृराष्ट्र**—सगळ्या राष्ट्राचे धारण केले होते म्हणून **धृतराष्ट्र!** व प्रधान संजय होता. **संजय** म्हणजे उत्तम प्रकारचा जय. जयच आपल्या पक्षाकडे असतांना पुन्हा संशयाचे कारण नव्हते. परंतु आपल्या पुत्राचा दुर्योधनादिकांचा-अपराध



मनांत आणून त्याला जयाची शंका होती व जय माझ्या मुलांना मिळेल काय असे विचारले व संजयाने नाही म्हटले म्हणजे त्याच्या मुखांतून निघाले ते खरे ठरणार. म्हणून तो प्रश्नच त्याने विचारला नाही.

दुसरा एक संशय त्याला दृढ झाला होता. कुरुक्षेत्र हे धर्माचे क्षेत्र आहे. दुर्योधनाचे होऊं शकत नाही. त्याठिकाणी एकत्र झालेले जे माझे व पांडुचे पुत्र त्यांत धर्मच जय पावेल. कारण ''यतो धर्मस्ततो जयः'' म्हणून ''किमकुर्वत'' काय करिते झाले असें विचारले म्हणजे त्याचे अंग कुणीकडे आहे हेही त्यांत निघून येईल असा हा अलंकारिक अर्थ झाला. परंतु व्यासांनी संजयाला दिव्यदृष्टि दिली होती. अशाकरिता की, होईल ते वर्तमान पाहून सांगावे.

येथे अशी शंका येईल की, धृतराष्ट्राला दिव्य दृष्टि देण्याला व्यासांना काय हरकत होती? अशी दिव्यदृष्टी व्यासांनी मागे एकवेळ धृराष्ट्राला दिली होती. श्रीकृष्णाला शिष्टाईचे वेळी बांधण्याचा दुर्योधनाने जेव्हा विचार केला होता, तेव्हा श्रीकृष्णाचे खरे स्वरूप त्याला कळावे म्हणून व्यासाने धृतराष्ट्राला दिव्य दृष्टि दिली होती. तशी आता देण्याला काय हरकत होती ? याचे कारण हे की, युद्धात धृतराष्ट्राचे पुत्र जसजसे मेले तसतसा त्याला शोक झाला असता व तमोगुण जास्त झाल्यामुळे त्याने भगवद्‌गीता ऐकली नसती. धृराष्ट्राला आपल्या मुलांच्या जयाबद्दल मुळीच भरवंसा वाटत नव्हता. त्याला वाटले कुरुक्षेत्र आपलेच आहे आणि याला धर्मक्षेत्रही म्हणतात. राज्याला पट्टाधिकारी धर्म आहे. कुरुक्षेत्र हे पुण्यपावन आहे. अलंकारिक हेतु सांगण्याचा उद्देश असाः- पूर्वजन्माचे कर्म आपल्यास मिळते असा नियम आहे. परंतु पाप पुण्य जर अत्युत्कट झाले तर येथेच फल मिळते.

**''अत्युत्कटैः पापुण्यैरिहैव फलमश्नुते ॥''**

अति तीव्र पापपुण्याचे फळ - याच जन्मी, तीन वर्षांनी, तीन महिन्यांनी, तीन पक्षांनी, किंवा तीन दिवसांनी मिळते. दुसरें :-

**''अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति ॥**
**पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति ॥''**

दुसऱ्या क्षेत्रांत केलेले पाप पुण्यक्षेत्रांत नाश पावते. परंतु पुण्यक्षेत्रांत केलेले पाप नाश पावत नाही. ते वज्रलेप होऊन त्यांचे फल याच जन्मांत मिळते. दुर्योधनादिकांनी आतापर्यंत अन्य क्षेत्रांत म्हणजे हस्तिनापुरात पाप केले होते, परंतु आतां कुरुक्षेत्र हे पुण्य क्षेत्र असल्यामुळे याच जन्मी त्यांना त्यांचे फळ मिळेल. वास्तविक दुर्योधनादिकांनी जेव्हा द्रौपदीचा छळ केला, पाडंव लाक्षागृहांतून सुटले, बकासुराला त्यांनी मारले, तेव्हाच धृतराष्ट्राने आपल्या जयाची आशा सोडली

होती. हे **''तदा नाशं ते विजयाय संजय ॥''** यावरून स्पष्ट होते.

**संचय उवाच :-दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ॥**

**आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥१.२॥**

दुर्योधनाचे अर्थ दोनः- दुर व अधन दुर्योधन हा दुष्ट व दरिद्री होता. दुसरा अर्थ दुर्योधन- कौरव पक्षीय हे वाईट योद्धे होते. लढाऊ नव्हते. असा अर्थ. या श्लोकांत संजय दुर्योधनाचे पाप निरूपण करीत आहे. गुरूपमर्दन किंवा गुरुशिक्षणदोष दाखविणें हे पाप आहे. ''तव शिष्येण धीमता'' तुमचा शिष्य बुद्धिमान आहे, मी नाही. याचा भाव असा की, तुम्ही आमच्याकडले अन्न खाऊन त्यांच्यापक्षाकडे चांगली तयारी केली. व्यूहयुक्त पांडवांना पाहून आचार्याजवळ जाऊन दुर्योधन याप्रमाणे बोलता झाला :- धृष्टद्युम्न बुद्धिमान आहे व आम्ही नाही अशा गुरूपमर्दनरूप पातकांस आरंभ केला. कोणी असा अर्थ करतील की, आम्ही बुद्धिमान नाही. हें गुरो आमचे रक्षण करा म्हणून विनयाने गेला असेल. पण विनयाने गेला असतां तर ''वचनमब्रवीत्'' असे न म्हणता विनंती केली असे म्हटले असते व पुढे त्याने तुम्ही सगळे मिळून भीष्माचे रक्षण करा अशी गुरूस आज्ञा केली आहे. यावरून विनयाने न जातां पांडवांचा द्वेष करून त्याने गुरूचा अपमान केला. (अपूर्ण)

०००

**अन्नपूर्णा आईला सांगितलेली गीता**

# २४. मनाचे स्वरूप व निग्रह

**मनोहि द्विविधं प्रोक्तं शुद्धं चाशुद्धमेव च ।**

**अशुद्धं कामसंयुक्तं शुद्धं कामविवर्जितम् ॥**

अथर्वणवेदांत अमृतबिंदू उपनिषत् आहे. त्यात मन हे दोन प्रकारचे सांगितले आहे. शुद्ध व अशुद्ध. शास्त्राप्रमाणे आचरण करण्याची प्रवृत्ति ते शुद्ध मन आणि शास्त्र विरुद्ध विषयासक्तीला धरून चालण्याची जी प्रवृत्ति ते अशुद्ध मन.

अशुद्धदशेंतच चित्त एकाग्र केले तर त्यापासून फायदा नाही जसे ओंगळ पाणी साठविले तर त्यांत किडे होतात परंतु तेच जर शुद्ध करून साठविले तर पिण्याच्या उपयोगी पडते. त्याप्रमाणे अशुद्ध चित्त जर एकाग्र केले तर आपल्या चित्तांत असलेले विकारच फार बळावतात. परंतु त्यातील गारा वगैरे काढून साठविलेले पाणी जसे पिण्याच्या उपयोगी पडते, तसे इंद्रिय दमन करून चित्तांतील विकार काढून जर चित्त एकाग्र केले तर ते आत्मसाक्षात्कार करून देण्याला उपयोगी पडते.



**मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।**

**बंधाय विषयासक्तं मुक्तं निर्विषयं स्मृतम् ॥**

बंध आणि मोक्ष दोन्ही मनालाच आहेत. मन विकाराच्या स्वाधीन होऊन, नीतीचा व धर्माचा विचार करीनासे झाले म्हणजे तेच बंधन होय व विकाराच्या ताब्यांत न जातां नीति व धर्माप्रमाणे चालून योग्य विचार करूं लागले म्हणजे तीच मुक्ति होय.

आतां कोणी अशी शंका काढील की, बंधन हे मुक्तीच्या उलट आहे, तर ह्या दोन्ही विरुद्ध गोष्टी एकाच मनांत कशा राहू शकतात. ह्याचें समाधान कपिलगीतेत केले आहे.

**''उदकेन भवेत्पंकः स च तेनैव शुद्ध्यति ।**

**मनः करोति वै कर्म मुच्यते मनसैव तत् ॥ (कपिल गीता)**

आपल्या अंगणांत थोडा पाऊस पडला तर त्याच्या योगानें चिखल होतो, परंतु तोच जर पुष्कळ पाऊस पडला तर सर्व चिखल वाहून जातो. त्याप्रमाणे अविचाराने आपले चित्त अति अशुद्ध होते परंतु तेंच विचाराने शुद्ध होते. हे मन निर्मळ करण्याकरिता वेदांतात तीन काण्डे सांगितले आहेत. पाणी गाळल्याने स्वच्छ होते, नंतर जर ते पाणी सांठविले तर पिण्याच्या कामी पडते. तसे धर्माने आपले विकार नाहिसे करावे म्हणजे पाणी गाळण्याचे काम झाले, नंतर ते पाणी सांठवावयाचे म्हणजे योग आणि भक्तीने ते एकाग्र केले पाहिजे. नंतर ते पाणी पिण्याच्या उपयोगी पडते. म्हणजे शुद्ध चित्त एकाग्र झाल्यावर ज्ञानाने आपल्या आत्म्याचा आपल्याला आनंद मिळतो. पहिले आपल्या चित्तांतील विकार नाहिसे करून एकाग्र करावे म्हणजे आपण आपल्या आत्म्याचा आनंद घेण्याला पात्र होतो. आधी धर्माने विकार नाहिसे न करता जो ज्ञान प्राप्त करून घेऊ पाहातो त्याला ते कधीच मिळत नाही.

**कर्मासह उपासना**

आतां उपासनेला धरून कर्म सांगतातः-

अर्जुन म्हणालाः- देवा ! मला ह्यावेळेस धर्म काय व अधर्म काय हे कळेनासे झाले आहे. चांगले काय व वाईट काय हे मला अगदी समजत नाही. म्हणून जे माझ्या हिताचे असेल ते आपण मला सांगा. श्री भगवानुवाचः-

**''सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ।**

**निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ गीता**

आपल्या मनाचे तीन गुण आहेत. ह्यानेच बंधन झाले आहे. ज्या बारीकशा तीन पदराची वळून दोरी होते व ती एखाद्याला बांधण्याच्या उपयोगी पडते, त्याप्रमाणे तीन गुणांनी झालेल्या मनाच्या योगानेच बंधन झाले आहे. सत्व, रज आणि तम हे तीन गुण होत.

त्यापैकी धर्म, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य असले म्हणजे सत्त्वगुण समजावा. वेदाज्ञेप्रमाणे चालणे तो धर्म.

सर्वांचा आत्मा एकच आहे हे **ज्ञान;**

विषयाला लाथ मारून निराळे होणे हे **वैराग्य** व

वैराग्यापासून होणारे दुःख सहन करणे ते **ऐश्वर्य.**

येथे ऐश्वर्य शब्दाचा अर्थ संपत्ति असा घ्यावयाचा नाही. तर वैराग्यांत होणाऱ्या कष्टाला सहन करण्याची जी शक्ति ते ऐश्वर्य. संसार सोडून वनांत निघून जाणे हे कांही खरे वैराग्य नव्हे. जो भिऊन पळतो त्याने आपल्या प्रतिपक्षाला जिंकले असा अर्थ होत नाही. पाणी अग्नीला विझविते. भिऊन पळत नाही. त्याप्रमाणे विषयाला भिऊन जो पळून जातो त्याला ते सुटत नाही. जो विषयाचे चपेटे सहन करितो, तोच खरा महात्मा.

**रजोगुणः** -

चंचलपणा, क्रोध, हठ हे रजोगुणाचे लक्षण होय.

**तमोगुणः** -

आळस, त्रास, चिंता हे तमोगुणाचे लक्षण होय.

कामक्रोधादि दुर्गुण वाईट खरे पण ते सर्वथा त्याज्य नाहीत. त्यांचा कांही तरी उपयोग आहेच. सर्पाचे विष हे मारक खरे, पण तेच जर वैद्याच्या हाती पडले, तर ते सन्निपातावर उपयोगी आहे. कशाही सन्निपातांत डोळे थिजून गेले असोत, परंतु श्वास आहे तोपर्यंत, जर त्याला शुद्ध केलेले सर्पविष दिले गेले तर तो खात्रीने वाचतोच. पण हे विष काढणे अति कठीण आहे.

सर्पाच्या १०,००० जाती आहेत, त्या सर्वांची नांवे, विष व चिकित्सा येथे सांगत नाही, मुख्य ह्यांच्या तीन जाती आहेत.

**पहिले दर्वीकर :-** हे दिवसास फिरत असतात. ह्यांच्या विषाने वात वाढतो. तेलाचा थेंब जसा पाण्यावर फैलतो, त्याप्रमाणे हे विष रक्ताला लागतांबरोबर एकदम सर्व आंगात भिनते.

**दुसरे मडंली :-** चट्टेवाले (कवडे साप ) हे संध्याकाळपासून रात्रीचे तीन प्रहर पर्यंत फिरतात. ह्यांच्या योगाने दाह, शुष्क, फोड येणे, काळीज कापणे, पित्त



वाढणे वगैरे विकार होतात.

**तिसरें राजीमंत :-** हे सोन्यासारखे चमकणारे असतात. हे रात्रीच्या शेवटल्या प्रहरांत फिरतात. झोंप येणे मूर्च्छा येणे, इत्यादि विकार यांच्या विषापासून होतात. हे सर्पविष शरीराला बाधक आहे.

ह्यावर औषधीपेक्षा मंत्राचाच उपयोग फार होतो व त्यापेक्षा देवतांचा जास्त होतो. सर्पविषावर चिकित्सा करणाऱ्याला दोन मोठ्या कडक पथ्य आहेत. एक खोटे न बोलणे व दुसरे परस्त्रीगमन न करणे.

लेपटीचे मूळाने  कसाहि सर्प चावलेला असो, मनुष्य अवश्य वाचतो. हे सर्पविष वैद्याचे हाताने अमृत होते. नदीतील मोठमोठ्या शिंपा आणाव्या व त्या सर्पापुढे ठेवाव्या. एक वनस्पति आहे. (ती सध्या सांगत नाही) ती आपल्या आंगाभोंवती टाकली म्हणजे साप आपल्याला येऊन डसूं शकत नाही. नंतर त्या सापाला त्या शिंपावर फणी आपटावयाला लावावे. म्हणजे त्याच्या दांतातले विष त्या शिंपात येऊन पडते. मग ते शुद्ध करून उपयोगांत आणावे. म्हणजे त्यापासून मोठमोठाली कार्ये घडतात.

त्याप्रमाणे कामक्रोधादिकांचा उपयोग चांगला जर केला तर त्यापासूनही मोठमोठी कार्ये घडून येतात.

क्रोध हा दुसऱ्यावर करूं नये तर आपला आपल्यावरच करावा. आपल्यास जर क्रोध आला तर आपण आपल्यावर क्रोध करावा की, मला क्रोध कां आला? दुसऱ्यावर जर त्याचा उपयोग केला तर मात्र वाईट परिणाम होतो.

काम म्हणजे अप्राप्त वस्तूंची इच्छा. येथे कामाचा दुसरा अर्थ घ्यावयाचा नाही. ह्या कामक्रोधादिकांचा योग्य उपयोग कोठे कोठे करावा हे कवि मुक्तेश्वर सांगतात.

**काम असावा ईश्वरभजनी । क्रोध असावा इंद्रियमनी ॥**
**तीर्थ प्रसाद ग्रहणीं । लोभ अत्यंत असावा ॥**

इच्छा करावयाची असेल तर ती भगवद्भजनाचीच करावी. रागवावयाचे असेल तर ते आपल्यावरच रागवावे. ह्या कामक्रोधादिकांचा दुरुपयोग केला तर तेच आपले शत्रू होतात. नाही तर तेच मित्राप्रमाणे मदत करितात. अशा रीतीनें आपल्यांत चांगलें गुण वाढविणें ही सत्त्ववृद्धी करणे होय. हा सत्त्वगुण वाढला म्हणजे रजस्तम हळूहळू कमी होत जातात व ह्यानेंच मुक्ती होते. भगवान् म्हणतात,

**दैवीसंपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ।**
**मा शुचःसंपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ गीता**

देव म्हणतात अर्जुना ! तुला रडण्याचें कांहींच कारण नाही. आसुरी संपत्तीचे लोक जे असतात, त्यांनाच रडण्याची पाळी येते. जो चांगल्या मार्गाने चालत आहे, त्याला कधींच रडण्याची पाळी येत नाही. अधर्माने वागणे ही आसुरी संपत्ति होय व हीच बंधनाला कारण होते. धर्माने वागणे ही दैवी संपत्ति होय. ही मोक्षाला कारण होते.

**''न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति'' गीता.**

ज्याचे सत्त्व वाढले आहे तो दैवी संपत्तीचा मनुष्य समजावा व अशा रीतीने जो सत्त्व वाढवून कल्याणाच्या मार्गाने चालला आहे तो कधीच दुर्गतीला जाणार नाही.

**महात्मानस्तु मां पार्थ दैवी प्रकृतिमाश्रिताः ।**
**भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ गीता**

दैवी संपत्तीवाला जो आहे तोच माझा भक्त व तोच महात्मा. पण जर दैवी संपत्ति नसली तर तो महात्मा होऊ शकत नाही.

॥ श्रीमत्सग्दुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

----------

**द्वितीय निरूपण** ता. १८-९-१९०९

# २५. भक्तीचा अधिकारी

ज्यांच्या आंगी उत्तम गुण आहेत, तोच महात्मा असे काल भगवंताने सांगितलेः-

**महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।**
**भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥**

ज्याच्या आंगी उत्तम गुण आहेत त्यालाच माझी भक्ति होणे शक्य आहे. परंतु ज्यांच्या आंगी उत्तम गुण नाहीत त्याला माझी भक्ति कधीच होणे शक्य नाही. एखाद्याच्या आंगी आरंभीं दुर्गुण असतात, परंतु तो जर ते सोडून माझी भक्ति करील तर तोहि महात्माच समाजावा. मात्र माझी भक्ति करतांना तो आपले दुर्गुण सोडीत गेला पाहिजे.

**अपिचेत्सुदुराचारो भजते मां अनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवस्थितो हि सः ॥**

आरंभी जरी एखादा मनुष्य दुर्गुणी असला परंतु तो आपले दुर्गुण सोडून जर माझे अनन्य भजन करील तर तो साधू समजावा. तात (ज्ञानेश्वर महाराज) म्हणतातः- एखादा मनुष्य बुडाला परंतु पुढे पोहून वर निघून आला, तर तो बुडून मेला असे कसे म्हणता येईल? तसेंच आरंभी दुर्गुणी असला, पण ते दुर्गुण सोडून पश्चात्तापपूर्वक जर माझी भक्ति करील तर तो साधूच समजावा.



एखाद्याचे आचरण शुद्ध नाही, परंतु तो नुसती भक्तिच करण्याचा जर प्रयत्न करीत आहे तर त्यापासून त्याला कांही एक उपयोग नाही. भक्ति ही पवित्र करणारी खरी, पण दुर्गुणांच्या योगाने मनुष्य पुनः पुनः मलीन होत जातो. असे पुनः पुनः मलीन होत जाणे काही उपयोगाचे नाही.

**बाध्यमानोऽपि मद्भक्तो विषयैरजितेन्द्रियः ॥**

## धर्म निर्मळ होऊ लागतो

एवढ्याकरिता स्वधर्म जरी दोषाचा असला, तरी तोच आरचण करावा. आरंभी आपला धर्म आपल्याला कठिण वाटतो, त्यांत दोष दिसतात, पण पुढे तोच धर्म निर्मळ होऊ लागतो.

**सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।**
**सर्वारंभाहि दोषेण धूमेनाग्निरिवावृतः ॥**

आपल्या धर्मात आपल्याला दोष दिसतले तरी तो सोडू नये. विस्तव पेटवितांना आपल्याला त्यावर पुष्कळ धुपट दिसते. परंतु तो विस्तव चांगला पेटला म्हणजे धुपट अगदी नाहिसें होऊन विस्तव चांगला झळकायला लागतो. तसेच आपल्या धर्मात आपल्याला आरंभी पुष्कळ दोष दिसतात, परंतु पुढे पुढे तोच धर्म निर्मळ व हितकर होतो. आणि परधर्म हा आरंभी सोपा परंतु परिणामी दुर्गतिदायक होतो. जसे औषधि घेऊन पथ्य करतांना वाईट वाटते, परंतु त्याचा परिणाम चांगला होतो. तेच अपथ्य करतांना आरंभी बरे वाटते, परंतु परिणाम फार वाईट होतो. तसेच स्वधर्म हा आरंभी कठीण परंतु परिणाम चांगला होतो. आणि परधर्म आरंभी सुलभ परंतु परिणामी दुर्गतिदायक होतो.

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यस्थितौ ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥**

शास्त्रावांचून खरी गोष्ट कोणती आणि खोटी गोष्ट कोणती याचा निर्णयच होत नाही. कोर्टात दोन प्रकारचे साक्षीदार असतात. एक तोंडी आणि दुसरें लेखी. त्यांत तोंडपेक्षा लेखीला जास्त खरे समजतात. म्हणतात ना - **''सौ बका नि एक लिखा''** म्हणून तोंडीपेक्षा लेखी जे शास्त्र तेंच जास्त प्रमाण आहे.

* शास्त्राप्रमाणे जर गुरुवचन मिळाले तर फारच उत्तम.

* परंतु शास्त्रविरुद्ध गुरुवचन प्रमाण नाही.

* गुरुविरुद्ध मात्र शास्त्रवचन प्रमाण होऊ शकते.

भगवान् म्हणतात की माझे आज्ञेप्रमाणे जर कोणी शास्त्रवचन प्रमाण न मानील तर त्याला भक्तीच उत्पन्न होणे शक्य नाही.

### रूपकाचे खंडन

पुन्हा भगवान म्हणतात मूर्ख लोक माझ्या सगुण शरीरालाच माझे खरे स्वरूप समजतात.

**अवजानन्ति मां मूढा मानुषी तनुमाश्रितम् ।**
**परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥ गीता**

मनुष्यासारख्या ह्या माझ्या शरीरालच मूर्ख लोक खरे समजतात. माझ्या निर्गुण स्वरूपाला जाणतच नाहीत, व माझ्या ज्या लीला आहेत त्यांचाहि यथार्थ अर्थ ते जाणत नाहीत.

**रूपकाण्यपि कुर्वन्ति . . . . . .।**
**मल्लीलां स्थापयन्त्याशुविषयांधदृषैरिह ॥**

माझ्या खऱ्या स्वरूपाला जर जाणतच नाहीत आणि

माझ्या लीलावर रूपक बसवितात आणि याच्या योगाने खऱ्या भक्तीचा नाश करीतात. जे माझ्या सगळ्या लीलांची रूपक आपल्या शरीरावर बसवितात, त्यांना माझ्या स्वरूपाचा प्रकाशच होत नाही.

मिठाने समुद्रांत मिळून समुद्रायेवढे होणे उत्तम, परंतु समुद्रच जर म्हणेल की मी मीठ होतो तर ते बरोबर नाही, त्यांत त्याचा लहानपणा आहे.

अग्नि सूर्यांत मिळणे बरोबर आहे. तोच एखाद्या कोलत्यात सांठविणे ठीक नाही.

जीव ईश्वरांत मिळणे बरोबर आहे, पण ईश्वराने जीव होणे इष्ट नाही.

त्याप्रमाणे रूपक करणारे लोक मलाच उलट जीव कोटीत आणतात.

**श्रीमहाराजांची थोरवी**

''विदर्भसंत श्रीगुलाबरावमहाराज यांचे वाङ्मयदर्शन घडून आले, त्या वेळेस माझी स्थिती विजापूर येथील गोलघुमटाच्या पायथ्याशी उभे राहून त्या गंभीर व विस्तृत अशा घुमटाकडे आश्चर्यस्तंभित होऊन पहाणाऱ्या मनुष्याप्रमाणे झाली.'' – ***गुरुवर्य श्री मामासाहेब दांडेकर***



॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥

## निरूपण तिसरे

# २६. अनेक देवतोपासना

**येप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**तेपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥**

नदीचे असो, नाल्याचे असो किंवा कोठलेहि पाणी असो, ते समुद्राला जाऊन मिळणारच, त्याप्रमाणे कोणीही कोणत्याहि देवतेचे पूजन करो, ते सर्व मलाच पावते. कारण त्या सर्व देवता माझीच रूपे आहेत. म्हणून इतर देवतांचे भजन करणारे माझेच भजन करतात असे समज.

सगळ्या देवतांत मी आहेच. सगळे मार्ग एकच खरे, तथापि त्यांचे ते भजन अविधिपूर्वक होते. कारण ते वास्तविकरूपाने मला जाणीत नाहीत. म्हणून ते पुन्हा पुन्हा खाली पडतात व त्यांना माझी प्राप्ति होत नाही.

पुन्हा भगवान् म्हणतात - फांद्या, फळे, फुलें हें जरी एकाच वृक्षाचे आहेत तरी झाडाला जे पाणी घालावयाचे ते मुळालाच घातले पाहिजे. फांद्यांना किंवा फळाला घालून चालणार नाही. तसेंच माझी प्राप्ति जर करून घ्यावयाची आहे, तर, माझ्या मुख्य स्वरूपाचेच यजन केल पाहिजे. इतर देवतांची साधने करून माझी प्राप्ति होऊ शकत नाही. नाक, तोंड, कान हे एकाच आईबापा पासून उत्पन्न झाले असते, तथापि जेवायचे ते तोंडानेच जेवले पाहिजे. नाकाने जेवून चालत नाही. त्याप्रमाणे सर्वत्र जरी एकच परमात्मा भरला आहे तरी ज्याला भगवत्प्राप्तीची इच्छा आहे, त्याला भगवंताचे खरे स्वरूप जाणूनच त्याचे भजन केले पाहिजे. कानाने कांही जेवता येत नाही. बाळी, बुगडी, नथ वगैरे अलंकार जरी एकाच सोन्याचे असलें तरी नाकांतली नथ कानांत व कानांतली बाळी नाकांत काही घालत नाहीत. ती जेथल्या तेथेच घालावी लागते.

त्याप्रमाणे भगवान् म्हणतात, माझे स्वरूप जरी अखंड एकरस भरले आहे, तरी ते कारणदृष्टीने एक आहे. कार्यदृष्टीने भिन्न भिन्न आहे. जेवावयाचे आहेनं, म्हणे दूध डोळ्यांतच घालू तर कांही उपयोग नाही. परमात्मा सर्व व्यापक आहे म्हणून भलतसे वागले तर चालत नाही. कारणदृष्टीने जरी परमात्मा एकच आहे, तरी कार्य दृष्टीने भिन्न भिन्न आहे. म्हणून भगवत्प्राप्तीची जर इच्छा असेल तर भगवंताच्या मुख्य स्वरूपाचेच भजन केले पाहिजे. इतर देवतांचे भजन करून परमेश्वर मिळत नाही.

**यांति देवव्रता देवान् पितृन् यान्ति पितृव्रताः ।**
**भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ॥**

म्हणून आपला मार्ग बरोबर आहे की, नाही, हे शास्त्रावरून परिक्षा करून नीट बरोबर समजून घ्यावे. मूर्ख लोक कोणताही मार्ग धरतात म्हणून त्यांना मी प्राप्त होत नाही. देवतांची पूजा करणारांना मी देवलोक देतो. नोकरहि राजाचेच काम करितात. तहसीलदारहि राजाचेच काम करतो, डिप्टीहि राजाचेच काम करतो. कमिश्नरहि राजाचेच काम करतो. तरी तहसीलदार, डिप्टी किंवा कमिश्नर हे कांही राजे नव्हते; किंवा हे राजाप्रमाणे एखाद्याला गावंचे गांव बक्षीसहि देऊ शकत नाहीत. - त्याप्रमाणे इतर देवतांची साधने करणाऱ्यांना जरी माझी भक्ति घडते तरी त्यांना माझी प्राप्ति होत नाही. देवतांची साधने करणाऱ्यांना देवलोक, श्राद्धादिक करणाऱ्यांना पितृलोक, भूताप्रेताला नवस करणारे दोरे गंडे करणाऱ्यांना मी भूतलोकाला पाठवितो. आणि माझे भजन करणाऱ्यांना मीच प्राप्त होतो. मात्र माझ्या खऱ्या स्वरूपाला जाणून शास्त्राप्रमाणेंच ते केले पाहिजे, स्वतःचे मताने वाटेल तसें करून चालत नाही.

**ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥ गीता.**

शास्त्रावरून भगवत्स्वरूपाचे खरे ज्ञान करून घेऊन, दृढ श्रद्धा ठेऊन कारणदृष्टीनें परमेश्वर एकच आहे व कार्यदृष्टीने तो भिन्न भिन्न भासतो, असे समजूनहि धर्माप्रमाणे व उपासनेला धरून जे मला भजतात त्यांनाच माझी प्राप्ती होते. आतां माझी प्राप्ती 'जीवंतपणी आणि मेल्यावर' अशी दोन प्रकारची आहे. पैकी योगी जे मजकडे येतात. त्यांचे दोन प्रकार आहेत,

**मृत्यूचे वर्णन**

**धूमोरात्रिस्तथाकृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ॥**
**तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ गीता**

मनुष्य मरतो तेव्हा कफ वरवर चढत जातो आणि त्याच्या योगाने कंठ दाटून येतो. त्या कफाच्या योनाने अग्नि विझत जातो व सगळ्या शरीरात धुपट पसरते. श्वास कोंडतो. अशा वेळी, परमेश्वर समोर आला तरी त्याला तो दिसत नाही. जन्मभर केलेलेहि त्याला दिसत नाही. 'मूर्तीचे ध्यान केले तर त्या वेळेस ती काळी व भयंकर अशी दिसते.' अशा वेळेस बाहेर रात्र कृष्णपक्ष आणि दक्षिणायन



असते. अशा वेळी तो योगी मेला म्हणजे - धुपटाची देवता त्याला रात्रदेवतेच्या स्वाधीन करिते. - रात्रीची देवता त्याला कृष्णपक्षाच्या देवतेचे स्वाधीन करिते. - कृष्णपक्षाची देवता त्याला दक्षिणायनाच्या देवतेच्या स्वाधीन करते. नंतर - दक्षिणायनाची देवता त्याला चंद्रलोकाला नेऊन पोहोचविते. आणि मग तो कसाहि योगी असला तरी तो खाली पडतोच. म्हणून मरणाऱ्या वेळेस धुपट होणार नाही असा यत्न केला पाहिजे, तरच योगादिकांचा फायदा! नाहीतर सारे व्यर्थ! पातकी तर यममार्गाने जातात. त्यांचा येथे विचारच नाही. राहिले दुसरे प्रकारचे योगी ते अर्चिरादिमार्गाने जातात.

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ॥**
**तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ गीता.**

या धूममार्गातून ज्याला चुकवावयाचे असेल त्याला खाली लिहिल्याप्रमाणे परमात्मा उपाय सुचवितात.

**सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ॥**
**मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ गीता**

सर्व इंद्रियांचा निग्रह करून मन हृदयांत रोकून, प्राण मस्तकांत ठेवून योगधारणा करावी.

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन् ॥**
**यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम् ॥ गीता.**

ॐ काराचा जप वाणीनें करून (ॐहे एकाक्षरी ब्रह्म आहे) त्याबरोबर माझेहि स्मरण करून प्राण ब्रह्माण्डांत न्यावा. त्याबरोबर माझेहि स्मरण असेलच पाहिजे नाहींतर कांही उपयोग नाही. अशा प्रमाणे जो योगी प्राण ब्रह्मांडात नेतो, त्याला धुपटापासून त्रास हेत नाही. कारण धुपट राहतो पोटांत आणि योगी राहतो मस्तकांत. नंतर असा योगी टाळू फोडून ब्रह्मलोकाला जातो. इतकीहि खटपट करून व्हावा तसा फायदा होत नाही. कारण -

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ॥**
**मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥ गीता.**

ब्रह्मलोकापर्यत हे जे सगळे लोक आहेत, त्यापैकी प्राणी कोठेहि गेला तरी तो खाली पडतोच. माझी प्राप्ती होण्याला एकच उपाय आहे,

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ॥**

**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ गीता.**

विषयांचा त्याग करून चित्त एकाग्र करून प्रेमाच्या भरांत जो माझे स्मरण करतो त्याला ह्या योगाच्या खटपटी मुळीच कराव्या लागत नाहीत. धर्माच्या योगाने आपले चित्त शुद्ध करून ते रोकून जो प्रेमानें माझे स्मरण करतो त्याला मी अवश्य मिळतोच. त्याला धुपट अग्नि ह्या योगाच्या खटपटीत मुळीच पडावे लागत नाही.

०००

**॥ श्रीज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

**निरूपण ४ थें**

# २७. मनोनिग्रहासाठी चार आश्रमांची व्यवस्था

ता. २८-९-१९०९, रायपूर

भगवान् म्हणाले जे सत्पुरुष सर्व विकाररहित झाले आहेत त्यांनाच माझी प्राप्ति होते. म्हणून विकार नाहिसे होऊन चित्त शुद्ध होण्याला हा कर्मयोगच श्रेष्ठ आहे. लेकरांवर प्रेम करितात खरें. परंतु कधी शिक्षाहि केलीच पाहिजे. अर्थात त्या शिक्षेचा उद्देश चांगलाच असतो. त्याप्रमाणे आपल्या इंद्रियांना आवडतील तसे विषय दिले, आपल्या मनाला वाटेल तसे नेहमी वागूं दिले तर त्यापासून फारच अनर्थ होतील. भगवान् म्हणतात आपल्या इंद्रियांचे व मनाचे लळे पुरविले तर असे परिणाम होतील.

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ॥**

**संगात्संजायते कामः कामात्क्रोधाभिजायते ॥ गीता.**

**(ध्यान)** आपलें मन अति चंचल आहे. हे ज्या ज्या वस्तूंचा आकार धरते म्हणजे ध्यान करते, **(संग)** त्याची प्रीति याला उत्पन्न होऊ लागते. मग तो विषय कोणताही असो. एक स्त्रीसंगच नाही, तर इतर विषयांचे ठिकाणी सुद्धा संग म्हणजे प्रीति उत्पन्न होऊ लागते, व (**काम)** त्याच्यापासून ती वस्तु आपल्याला असावी अशी इच्छा होऊ लागते. ध्यानाचे वेळी प्रथम इच्छा नसते. परंतु प्रीति जडल्यानंतर ती इच्छा होऊं लागते. **(क्रोध)** मग आपल्या इच्छेनुसार विषय न





मिळाले तर क्रोध उत्पन्न होतो. मनुष्याला क्रोध आला म्हणजे कांही सुचेनासे होते व **(संमोह)** कांही न सुचणे याचेच नांव मोह. **(स्मृतिविभ्रम)** पुढे पुढे याच्याच योगाने स्मृति म्हणजे आठवण नाहीशी होणे असे झाले म्हणजे **(बुद्धिनाश)** मग मनुष्याकडून कांहीच बनून येत नाही. **(प्रणाश)** मग सर्वस्वी म्हणजे प्राणादिकांचासुद्धा नाश होतो. मनालाल आवडेल तसे करू दिले म्हणजे अधिकच वासना वाढतात. चित्ताला सवड दिली की इच्छा उत्पन्न झाल्याच समजाव्या आणि धर्माच्या योगाने ही सबब मुळीच राहात नाही. चित्त रिकामे राहिले तर ते वासना वाढवील. परंतु आपल्या धर्मांत अशीच कांही योजना आहे की, त्याच्या योगाने चित्ताला मुळींच सवड सापडूं नये.

ही गोष्ट पतिव्रता धर्मावरून मी समजावून सांगतो.

एके वेळी नारदस्वामींनी श्रीकृष्णाला विचारले, ''महाराज, पतिव्रता धर्म कशाने उत्पन्न होतो?

त्यावर देव म्हणाले, ''ज्या अनेक जन्मापासून पतिव्रता धर्म करीत आल्या आहेत, त्या तर केवळ धर्मरूपानेच अवतरतात. त्यांचे चित्त अति शुद्ध असते. अशा त्या माउली जगत्कारणार्थ अवतरतात. परंतु ज्यांचे चित्त शुद्ध नाही त्यांना याप्रमाणे धर्म उत्पन्न होतो –

**क्षणो[1] नास्ति, रहो[2] नास्ति, नास्ति प्रार्थिता[3] जनाः ।**

**तेन नारद नारीणां पातिव्रत्यं हि जायते ॥**

* स्त्रियांनी क्षण म्हणजे उत्सवादिकांत जाऊ नये.
* त्यांना एकांत देऊ नये.
* त्यांना विकारोत्पत्ति व्हायला कालच देऊन नये.
* चित्तप्ररोहविनाशक असा पुरुष अप्रवेशित असावा.
* विकांराना सवड न मिळाली म्हणजेच धर्म होतो.

तसेच मनुष्याला रात्रंदिवस कर्मच सांगितली आहेत. त्याचा तरी उद्देश हाच की, विकारांना मुळीच सवड सांपडू नये. या धर्माच्या योगाने चित्तांतील मल म्हणजे दुष्ट विकार नाहीसे होऊन चित्त शुद्ध होते.

आपल्याला भूक लागली व खावयाला न मिळाले. नंतर पुष्कळ वेळाने कोणी एखादा तुकडा जरी दिला तरी मनुष्य संतुष्ट होतो. तसे चित्तांत जेव्हा विकार फार भयंकर होतात तेव्हां त्यांना मुळीच विषय देऊ नये, मागाहून थोडेसे द्यावे, म्हणजे चित्त थोडक्यात तृप्त होते.

जे अत्यंत स्त्रीरत आहेत त्यांनी सुद्धा असेच करावे. जेव्हा काम उत्पन्न होईल, तेव्हा मुळीच विषय सेवन करूं नये. मागाहून थोडेसे सेवावेत, म्हणजे फार

थोडक्यात तृप्ति होते.

सत्पुरुष हे आपल्या विषय सेवनाचा काल नियमून टाकतात. त्यांना जेव्हा विकार होईल तेव्हा ते मुळीच विषय सेवन करीत नाही. नेमलेल्यावेळी इच्छा असो नसो ते तितके विषय भोगून टाकतात - इच्छा नसो असो! त्यांच्या या पद्धतीने ते फार थोडक्यात फार संतुष्ट राहतात. किंबहुना नुसत्या वासनेनेंच तृप्त राहतात. साधकावस्थेंत कांही विषय, जसे जेवणखाण, ठेवावेच लागतात परंतु निषिद्ध विषयांचा मात्र अगदीच त्याग करतात. साधक जर गृहस्थाश्रमी असला तरी तो फार थोडक्यात किंबहुना नुसत्या वासनेनेच तो तृप्त होतो.

ज्यांना धर्म माहित नाही, चित्ताला नियम नाही, त्यांना सगळ्या पृथ्वीचे राज्य जरी मिळाले तरी ते तृप्त व सुखी होणे शक्य नाही. 'थोडक्याने तृप्त होणारा ईश्वराच्या खालोखाल' असे साक्रेटीस म्हणतो.

## सुधारणेचे परिणाम

पुष्कळ वेळा आपण ह्या निरनिराळ्या कलांच्या योगाने फार सुखी झालो असे वाटते. रेल्वे व तारायंत्राच्या योगाने आपले कोटकल्याण झालेसे दिसते. वरवर पाहिले असतां ह्या गोष्टी फार मनोहर वाटतात.परंतु ह्यांनी किती भयंकर दुःख प्राप्त झाले आहे ह्याची कोणाला कल्पनाहि नाही.

ह्यांच्या योगाने पूर्वी जी थोडक्यात संतुष्ट राहण्याची संवय होती ती आता अगदी नष्ट झाली आहे. पूर्वी थोडक्यात आपसांतल्या आपसांत व्यवहार ठेवून लोक संतुष्ट व सुखी राहात असत. आता वाटेल तेथला वाटेल तो माल मिळूनहि लोक अगदी असंतुष्ट व दुःखी दिसतात. याचे कारण त्यांनी पूर्वीची थोडक्यात संतुष्ट राहण्याची संवय गमावल्यामुळे वासना हव्या तेवढ्या वाढल्या व त्यामुळेच असंतोष झाला व असंतोषच्या ठिकाणी दुःख हे असणारच. पूर्वीचे लोक अति थोडक्यात आपल्या गरजा भागवून अति संतुष्ट राहात असत.

आतासुद्धा श्रीमंतापेक्षा गरिबांचेच फार थोडक्यात भागते. ही थोडक्यात भागविण्याची शक्ति श्रीमतांनी आपल्या आंगची निःशेष नाहिशी केली. त्यामुळे श्रीमंतच पुढे पुढे गरीब होऊ लागले व गरीबहि ह्याच्या योगानेच फार मेले. गरीबीमध्ये काम करणारे हजारो मजूर सारखे पिळले जात आहेत व त्याचा उपयोग श्रीमंत लोकांच्या फाजील ऐष आरामांत होत आहे.

एखाद्या कारखानदाराला आपला कारखाना बंद ठेवासा वाटला तर तो खुशाल बंद करून टाकतो. त्यात गरीब उपाशी मरतील किंवा आणीकहि काही अनर्थ घडतील याची ते मुळीच विचार करीत नाही. त्यात मिलवाल्यांचा फायदा



असला म्हणजे झाले. म्हणून थोडक्यात संतुष्ट राहणारे लोकच फार सुखी होते असे म्हणावे लागते. ह्या गोष्टी धार्मिक इतिहासनेंच समजतात.

## चार आश्रम

आपल्या चार आश्रम आहेत, ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास.

**ब्रह्मचर्य** - ब्रह्मचर्याश्रमांत गुरुगृही वास करावा लागे. त्यात त्यांना भिक्षेंत जसे अन्न मिळेल तसे खावे लागे. त्यामुळे खाण्यापिण्याच्या कामांत त्यांना चवना करण्याची सवडच मिळत नसे. जसे आंथरूण पांघरूण मिळेल तसे वापरावे लागे. ही संवय बालपणात दृढ झाली की पुढे ते जेव्हा गृहस्थाश्रमांत येत तेव्हा त्याचे फार थोडक्यात भागे.

**गृहस्थाश्रम** - गृहस्थाश्रमांत त्याना पंचमहायज्ञ करावे लागत. सगळ्या कुटुंबांचे पोषण करावे लागे. आलेल्या अतिथींची सुश्रूषा करून त्यांना खाऊ घालावे लागे. इतकेहि करून सर्व कर्म करावी लागत. कोट, बूट, सूट, आयनक, छत्री, जोडा ह्या फाजील जिनसा ते मुळीच वापरत नसत. डोळ्याच्या संरक्षणार्थ हिरवी आयनक वापरण्याच्या ऐवजी डोळ्याला ऊन सहन होईल अशी संवय लावून घेत. मुलगा होईपर्यंतच ते स्त्रीशी संबंध ठेवीत असत. जरीचे आंगरखे टोप्या वगैरे वापरणे, चांगले चांगले सामान वापरणे हे सर्व मुलगा होईपर्यंत. मुलगा होऊन तो वापरेसा झाला म्हणजे त्याला ते सर्व देऊन आपण रिकामे व्हायचे! विषय हे सर्वदाच भोगायचे नाहीत. अति जरूर असेल तितके भोगून टाकायचे व पुढे लगेच वानप्रस्थाश्रम घ्यावयाचा.

**वानप्रस्थाश्रम** - त्या स्थितीत ते लोक कंद, फळ, मूळ खाऊन, स्त्रीशी वैषयिक संबंध न ठेविता, वनांत राहात. एकंदरीत जिकडून विषयाला आळा बसून वासनांचा क्षय होईल असाच आपल्या धर्माचा इतिहास आहे.

**कृतयुगांत** माणसे फक्त थोडक्यांत संतुष्ट राहणारे असत. त्यामुळे त्यांच्यात शांती फार असे. आताप्रमाणे आचारी, शागीर्द, पाणके इत्यादिकांवर ते मुळीच अवलंबून नसत. पावसांत, उन्हांत जाण्याचे काम पडले तर शिष्याच्या खांद्यावर पालखी रेटून दुसऱ्याच्या दुःखावर स्वतः सुख मानणारे ते लोक नव्हते. आपल्याकडून होईल तर कोणालाहि ते सुखच देत असत.

**त्रेतायुगांत** ही संवय जात चालली व माणासांच्या वासना वाढत चालल्या. झाडाच्या मुळांच्या अलंकारांत व सोन्याच्या अलंकारांत वास्तविक फरक काय? आकार ह्यालाहि आहे, आकार त्यालाहि आहे. जेथे, टाकले तेथे हाही पडतो, जेथे टाकले तेथे तोही पडतो. एकंदर जड या नात्याने दोन्ही सारखेच. श्रमाने

मिळणाऱ्याकडे लोकांचे लक्ष जाऊ लागले. पितळेच्या किंवा मातीच्या भांड्यापेक्षा ॲल्युमिनियम् कशाला पाहिजे. स्वयंपाक दोन्हींतहि होतो. ''असेल ती स्थिती सहन करणे हाच साधुपणा.'' शरीराची एकेक गरज वाढविण्यांत हांशील नाही.

देशादेशांत पूर्वी नौकरामालाकांत अत्यंत प्रेम असे. आपण जसे सुखी आहोत तसेच सर्व सुखी असले पाहिजेत असे मालकास वाटे. आपल्या धन्याचे सर्वस्व हित तोच आपला फायदा असे नोकरास वाटे. आता चाकर-मालकांत चोऱ्यामाऱ्या, भांडाभांडी, संप वाटेल तितकी अस्वस्थता उत्पन्न होऊन दोघांनाही शांती मिळत नाही. नेहमीच धडपड.

जातीच्या बंधनाने एखाद्या ब्राह्मणाला दुसऱ्या कोणत्याहि जातीची पोरगी चालत नसल्यामुळे, त्याला त्याच्या जातीत मुलगी जर न मिळाली तर जन्मभर तसेच राहावे लागते. त्यामुळे तरी सहजच विषयास आळा पडतो.

जो अत्यंत कष्ट करून दुर्जनांची मनधरणी करीत असेल, बायका-लेकराकरिता व प्रपंचाकरिता जो अनन्वीत कृत्ये करून लोकांत सभ्य गणला जात असेल त्याला मोठा म्हणण्याची लोकांची प्रवृत्ति आहे. परंतु वास्तविक पाहाता – जरी आम्हांला घरदार नाही तरी आमच्यासारखे कोणीच सुखी नाही. एखादा सार्वभौम राजा असो किंवा पालखीपदस्थ महंत असो; दुसऱ्याचे दुःख म्हणजेच यांचे सुख! हजारो घोड्यांना, माणसांना, उन्हातान्हांत रखडावे लागले म्हणजे जमला त्यांच्या मिरवणुकीचा थाट! अशी मालकाच्या लोकांची स्थितीच झाली आहे.

नळ बांधण्याच्या योगाने विहिरी बुडाल्या. पैसा जास्त लागला. विहिरींतून पाणी काढण्याच्या योगाने बायकांच्या शरीराला मेहनत होत असे व त्या योगाने त्यांची प्रकृति चांगली राहात असे. नळाच्या योगाने घरांतल्या घरांत पाणीहि जास्त मिळत असेल परंतु परिणाम काय झाला? मेहनत नाहीशी झाल्यामुळे अशक्तता आली. ऊन, वारा, पाऊस यांना सहन करण्याची आगांतली शक्ति गेली. गरजा अत्यंत वाढल्या. उन्हाच्या वेळेस आतांच्या एखाद्या सुधारलेल्या मनुष्याला म्हटले की, थाडेसे नदीवरून पाणी घेऊन ये पाहू; तर त्याच्याने जाववणार नाही. सृष्टीवरील आपला ताबा नाहिसा झाला.

**''सर्व सृष्टी ही आपल्याला मित्रासारखी वाटली पाहिजे.''**

आपल्याला उन्ह सहन होत नाही. म्हणजे सूर्याचे मित्रत्व गेले. मग करा छत्री. आपल्या ज्ञा मनाने आपल्याला हे 'सगळे प्रेममय भासण्याच्या ऐवजी सगळे द्वेषमय भासायला लागले आहे.' पूर्वी परस्त्रियांवर कोणीच नजर ठेवील नसे. त्या आईसारख्या वाटत, स्त्रियांना पुरुषहि मुलासारखे वाटत.



''त्यांचीच नीति उत्तम राहणे शक्य आहे, ज्याचे थोडक्यांत भागते, ज्याला पावलोपावली इतर वस्तूची गरज लागते, त्याची नीति चांगली राहणे मुळीच शक्य नाही.'' जो, भाजीभाकरीत संतुष्ट आहे, त्याला दुसऱ्याच्या पोळीचा द्वेष होत नाही व त्यामुळेंच चोरी होणेहि शक्य नाही.

मूर्ख लोकांनीच यूटीलीटरीआनिझम्चे तत्त्व ('पुष्कळ लोकांच्या पुष्कळ सुख')काढले आहे. ते म्हणतात :- जास्ती लोकांना पुष्कळ सुख मिळावे, मग त्यांत नीति असो, अनीति असो! - पण माझे थोडक्यात सांगणे हे आहे की,

**'जेथे थोडक्यांत सुख मानण्याची रीत आहे, तेथेच उत्तम नीति असूं शकेल व हाच माझा अनुभव आहे.'**

राघोच्या चांगल्या बोलण्याकरिता आपण एक स्वतंत्र जीव पकडून बंदिवासांत टाकतो. तसेच आपल्या सुखाची इच्छा वाढली की, आपण वाटेल त्याला दुःख देण्याला कमी करणार नाही. वर सांगितल्याप्रमाणे जो थोडक्यात संतोष मानून नीति वाढवितो, स्वधर्माप्रमाणे आचरण करून जो ती मला अर्पण करतो, भगवान् म्हणतात, त्यांनाच मी प्राप्त होतो.

०००

॥ श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥

**निरूपण ५ वें**

# २८. धर्म आणि भक्ती

भगवान म्हणतात - ज्याप्रमाणे पाण्यावरून तरून जावयाचे असेल, तर आधी पाण्याचाच आश्रय घेऊन, पाण्यावर तरंगता येईलसें करावे लागते, त्याप्रमाणे ह्या संसाररूपी महासागरांतून तरून जावयाचे असेल तर आधी धर्माचा व भक्तीचा आश्रय करावा लागतो.

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ गीता.**

देव म्हणतात, हे कुंतीच्या मुला तू जे काही करतोस, खातोस, पितोस, यज्ञ करितोस, दान देतोस, ते सर्व तू मला (ईश्वराला) अर्पण कर.

ह्यावर पुष्कळांचे गैरसजम होतात. ते असे समजतात की, ईश्वराला पाप कर्महि अर्पण करावे. परंतु ह्या श्लोकांत पापाचे नाव मुळीच नाही. सामान्य कर्म आणि धर्म ह्याचेच फक्त नाव आहेत. खाणे, पिणे, यज्ञ, दान, तप जप वगैरे कर्म जर परमेश्वराला अर्पण केले, तर त्यापासून जीव मोकळा होतो. पापकर्म करून

जर ते अर्पण केले, तर जीव मोकळा होत नाही. पुष्कळांचे असे होते की, माझ्या प्राप्तीची इच्छा असताही त्यांना योग्य मार्ग न मिळाल्यामुळे ते खाली पडतात.

**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः॥गीता.**

हजारो माणसांपैकी एखादाच माझ्या प्राप्तीचा यत्न करतो. त्या हजारो यत्न करण्याऱ्यापैकी, एखादाच माझ्या खऱ्या स्वरूपाला जाणतो. तर तो आता यत्न तरी कसा कसा करावयाचा? तो असा - ज्याचा ज्याचा जो जो धर्म आहे तदनुसार कर्मे करून ती परमेश्वराला अर्पण करून, वेदान्त चिन्तन करावे, म्हणजे माझी प्राप्ती होणे शक्य आहे. पुण्यकर्म करून जर ती अर्पण केली तरच मुक्ति. पाप परमेश्वराला अर्पण करून मुक्ति मिळत नाही.

**करीत पुण्य समूह समस्तु । आणि म्हणे ईश्वरार्पणमस्तु ॥**
**तयालागी भगवंतू । दे समीपता आपुली ॥**

परमात्मा म्हणतात : - स्वधर्माप्रमाणे चांगली कर्मे करून जो मला ती अर्पण करून माझी जो भक्ति करितो, त्याला माझ्या स्वरूपाची ओळख होण्याकरिता, मी त्याला सद्‌गुरूची भेट करून देतो, परंतु जो धर्माचा त्याग करून केवळ माझी भक्तीच करू पाहतो, त्याला माझी प्राप्ती होणे मुळींच शक्य नाही; कारण माझा जन्मच मुळी धर्मस्थापनेकरिता आहे.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ गीता.**

जेव्हा धर्माची ग्लानि होते, जिकडे तिकडे अधर्म वाढतो, खरें काय, खोटे काय, हे लोकांना समजेनासे होते, तेव्हां माझे आत्मे जे सत्पुरुष त्यांना मी उत्पन्न करितो. ते उत्तम ज्ञान सांगतात; परंतु विषयासक्त व दुष्ट लोक त्यांचे ते उत्तम ज्ञानहि ऐकत नाहीत. तेव्हा त्या दुष्ट लोकांचा नाश करण्याकरतां साधूंचा प्रतिपाळ करण्याकरिता मी अवतार घेतो.

माझी प्राप्ति धर्मासह भक्तीने होते. नुसत्या धर्माने किंवा नुसत्या भक्तीने होत नाही. पुढे प्राणायाम सांगावयाचा आहे.

०००



**॥ श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

**निरूपण ६ वे**

# २९. भक्तीसहित कर्म

(रायपूर, ता. १-१२-१९०९)

भगवान् म्हणतात :- दोन्ही रिकाबींत पाय ठेवाणारा मनुष्यच घोड्यावर सुखाने बसून जातो. त्याप्रमाणे कर्म आणि उपासना दोन्ही करणारे मला पावतात.

**अन्धतमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।**
**ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः॥ ईशावास्योपनिषद् मंत्र ९**

अर्थ : - धर्म आणि भक्तीवाचून नुस्ते कर्म करणारा अंधतामिस्त्र नांवाच्या नर्काला जातो. परंतु कर्म सोडून नुसती उपासनाच करणारे त्याहिपेक्षा अधोगतीला जातात. - नुसत्या कर्मानेहि मोक्ष होत नाही किंवा उपासनेनेहि मोक्ष होत नाही, तर ती दोन्ही पाहिजेत. धर्माने तरून उपासनेने अक्षय सुख भोगावे. दोन्हीने माझी प्राप्ती होते. एकाने होत नाही. कारण याला श्रुति प्रमाण आहे.

श्रुति ही ईश्वराचे वाक्य आहे. त्यापुढे दुसरे प्रमाण नाही. इतर पुष्कळ मोठे असले, पण जर ते श्रुतिविरुद्ध असले तर प्रमाण नाही. कारण इतर जे मोठे होणार ते सर्व ईश्वराच्या वाक्यावरच! परमेश्वर सर्वांत वरिष्ठ आहे, म्हणून त्याची वाणी वेद. तेच सर्वांनी प्रमाण मानले पाहिजेत. धर्म आणि उपासना ह्याने भगवत्प्राप्ति होते असे श्रुति म्हणते.

**कुलधर्म -**

कुलांत जसा आचार चालत आला असेल तोच आपला धर्म! रुढीने महात्मे सांगतील, त्याप्रमाणे, व वडिलाच्या सांगण्यावरून आपला धर्म ठरवून घ्यावा.

**उपासना -**

उपासना, गुरु आणि शास्त्र यांच्यापासून ठरवून घ्यावी. याप्रमाणे धर्म आणि उपासना दोन्ही जो करतो त्यालाच ईश्वर मिळतो, असे श्रुति सांगते.

## भगवंताची दोन रूपे

भगवान् म्हणतात :- माझी दोन रूपे आहेत. एक सर्वाच्या कल्याणाकरतां रूप धारण करतो ते व दुसरे भक्तांच्या हृदयांत ! एकाला एकाची अपेक्षा आहे. जो मी सर्वांच्या कल्याणाकरता ह्या पृथ्वीवर अवतार घेतो 'तोच मी' भक्तांच्या हृदयांत नेहमी राहतो. लोकांत मी कधी कधी अवतार घेतो. भक्त जेव्हा माझी

प्रार्थना करतात, तेव्हा मी भक्तांच्या प्रार्थनेवरून लोकांत अवतार घेतो.

जगाचे कल्याण धर्माने होते. साधूलाहि तेच करावयाचे असते. धर्म आणि उपासना दोन्ही जर होईल तर जगाचे कल्याण होईल. आई आणि बाप यांच्या पासून पुत्र होतो. त्याप्रमाणे धर्म आणि उपासना ह्यांच्या योगाने माझी प्राप्ति होते. आतांपर्यंत धर्म सांगितला. आता उपासना सांगतात.

## उपासना

यथाविधि सर्व कर्म करून ती मला अर्पण करीत जावीत. ज्याप्रमाणे आपण दररोज जेवीत जातो, त्याप्रमाणे दररोज कर्म करून मला अर्पण करीत जावीत. नंतर आपापल्या धर्माप्रमाणे माझे नाव घेत जावे.

ब्राह्मणाने प्रणवाने माझे नामस्मरण करावे. स्त्रियांना प्रणवाची जरूर नाही, ज्ञानराज माऊली, रामकृष्णहरी, इत्यादि नांवे स्त्रियांनी व सर्वांनी घ्यावीत. स्त्रियांनी ॐ चा जप करूं नये.

यांत एक रहस्य आहे. ॐ हे नांव दूरच्या एखाद्याला हाक मारल्या सारखे होते. कर्मी ब्राह्मणांना देव दूर वाटतो; म्हणून त्यांना ॐकाराचा जप सांगितला; परंतु स्त्रियांना पतिदेव जवळ आहे. साधूंच्या हृदयांत त्यांना देव जवळ वाटतो म्हणून ते परमेश्वराला रामकृष्णादि नांवाने आळवितात.

## नामाचे दोन प्रकार

माझी नांवे दोन प्रकाराची आहेत. एक वेदांत सांगितलेले व दुसरी सांधूनी ठेवलेली. स्वधर्म पाळून वेदांत ठेविलेली नावे कोणीहि घेतली, तर त्यांना ती सारखीच फळ देतात. इतर नांवाच्या ठिकाणी जर आपली श्रद्धा असली तर ती फळतात, नाहीतर नाही. माझ्या नांवाचा जप प्रथम वाचेने करावा. नंतर प्राणात (श्वसोच्छ्वासात) करावा.

---

# मातोश्री रंगुबाई

***मातोश्री रंगुबाई व त्यांचे पती रामराव देशपांडे. हे माधानला महाराजांच्या लहानपणी शिक्षक होते. उभयतांना महाराज 'आई' व 'तात' (वडील) म्हणत. ज्ञानेश्वरमाउलीला 'तात'(पिता) संबोधत असत. त्यांनी महाराजांच्या बालपणी श्रींना पुत्रवत् वात्सल्य व आश्रय दिला होता.मथुरा ही रंगुबाईची मुलगी होती.***

***- प्रा. देवराव भुजाडे.***

मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबरावमहाराजांनी
मातोश्री रंगु आई यांना संगितलेली प्रवचने

# योगवासिष्ठतत्त्व

॥ समयोपदेश (सुबोध-हिंदुधर्म) यष्टि १७ / पान २३० ते ३९९ ॥

## १. विषयदोष दर्शन

**प्रणामामि परं ब्रह्म कृष्णशंकरसंज्ञितम् ।**
**ज्ञानेश्वरस्वरूपं यत् हृदब्जमधितिष्ठति ॥१॥**

आज मी तुला वासिष्ठांतील सिद्धांत व तो ग्रंथ वाचून मी जे कांही सिद्धांत काढले आहेत ते सर्व सांगणार आहे. तुला ठाऊक आहे की, लहान मुलाला जेऊं घालतांना आई एका मोठ्या घासाचे दोन घास करून देते व तोच मोठा झाल्यावर मग त्याच दोन लहान घासांचा एक मोठा घास करून देते. आपल्या एवढा घास कांही मुलांस चालत नाही, म्हणून जेवढ्या अन्नाचे आपण आपले घास करितो, तेवढ्याच अन्नाचे लहान मुलांकरिता लहान लहान असे पुष्कळ घास करितो. त्याप्रमाणे **मूर्खांना समजण्याकरिता वेदांतांत एका गोष्टीच्या दोन, तीन गोष्टी करून सांगितल्या आहेत.** श्रीमत् शंकराचार्य म्हणतातः-

**श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः ।**
**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥**

वेदांतांत दोन गोष्टी समजावयाच्या असतात.

१. ब्रह्म सत्य असून जगत् मिथ्या आहे.

२. जीव हा ब्रह्मच आहे.

याप्रमाणे सत्य आणि मिथ्या या दोनच गोष्टी वेदांतांत समजावयाच्या असतात. पण कांही माणसांनी या दोन गोष्टींच्या तीन गोष्टी करून सांगितल्या.

प्रश्न :- लहान मुलें गंजिफा खेळतात तो तुला खरा वाटतो की खोटा वाटतो?

उत्तरः- खोटा वाटतो, पण तोच खेळ पैसे लावून खेळल्यास आपण मुलांना खेळूं देणार नाही. याचे कारण काय ? तर त्याला आपण वाईट समजतो. त्या खेळाला आपण सत्य स्वरूप देतो. त्याला आपण जुवा म्हणतो.



रोज आपणांला नानातऱ्हेचे स्वप्न दिसतात. पण त्याबद्दल आपण कांहीच काळजी करीत नाही. ते सर्व खोटे समजतो. पण रोज रोज एकच स्वप्न दिसूं लागलें तर आपण चिंता करतो. व त्याबद्दल कांही उपायहि करितो. याप्रमाणे लोक जगांत कांही गोष्टी उपयोगी समजतात व कांही उपयोगी समजत नाही.

उदा. पूर्वी अशी चाल होती की, पतीची तसबीर काढून पत्नी पाहात असे व पत्नीची तसबीर काढून पती पाहात असे, आणि दोघानांहि परस्परांचें स्वरूप पसंत पडल्यास त्यांचा विवाह होत असे. यांत त्या तसबीरींचा उपयोग होतो. पण त्याच तसबीरी भिंतीवर काढल्यास कांहीच उपयोग होत नाही. पहिल्या तसबीरींचा उपयोग वाटत असल्यामुळे त्या खऱ्या भासतात व दुसरी भिंतीवरील चित्रें निरूपयोगी वाटत असल्यामुळे खोटी भासतात. पहिली तसबीर उपयोगामुळे खरी वाटावयास लागली व दुसरें भिंतीवरील चित्रें उपयोगी नसल्यामुळे खोटी वाटावयास लागली. मृगजळ घरांतून पाण्यासारखें दिसतें व तें आपण खोटें समजतो, पण त्याच्याकडे एखादें मूल जाऊं लागलें तर त्याला झळ लागेल म्हणून त्याला बाहेर जाऊं देत नाही. म्हणजे येथे तेंच मृगजळ खरें वाटलें. रोज स्वप्नांत जर एखादें भूत दिसूं लागलें तर त्या भीतीने तूं रोड होत जाशील व तें न दिसण्याकरिता उपाय करशील. कारण तें दुःखदायक आहे म्हणून. पण तोच रोज जर एखादा देव दिसूं लागला तर तो सुखहेतु असल्यामुळे नेहमीच दिसावासा वाटेल. पण तेंच भिंतीवर देवाचें किंवा भूताचें चित्र काढल्यास कांहीच वाटणार नाही.

### खोट्या वस्तूंत दोन प्रकार

याप्रमाणे खोट्या वस्तूंत दोन प्रकार झाले. जी वस्तू खोटी असून उपयोगी आहे असें वाटतें व खोटी असूनहि सुखदुःख देणारी आहे असें वाटतें ती एक व जिचा कांहीच उपयोग नसून जी कांहीच करणारी नसते, ती दुसरी. अशा दोन प्रकारच्या खोट्या वस्तू झाल्या. एखादें मातीचें वाघाचें चित्र वगैरे काढलें तर तूं भीत नाहीस पण तेंच चित्र पाहून मुलाला भिती वाटतें. कारण तूं तें खोटें समजतेस व मूल खरें समजतें. तुला तें अगदीच खोटें वाटत असल्यामुळें त्याबद्दल तुझी आवडहि नसते व तें नाहीसें व्हावें असेंही तुला वाटत नाही. तर त्याबद्दल तुझी उपेक्षा असते पण याच गोष्टी खऱ्या वाटल्यास आपण त्या खोट्या वस्तूवर राग किंवा द्वेष करितो. याचप्रमाणे वेदांतांत वेदांती जगताचे दोन भाग करतात.

### व्यावहारिक सत्य वस्तु व प्रातिभासिक सत्य वस्तु

आपण मुलीला मातीची भुलाई करून देतो. तिचा आपणांस कांहीच उपयोग

नसतो व ती आपल्यास खोटी वाटते. पण तीच मातीची भुलाई आपण माडी पौर्णिमेच्या दिवशी देवी समजून उपयोगांत आणतो. तिची आपण पूजा करितो. ती मोडल्यास अपशकून समजतो. माडी पौर्णिमेच्या दिवशी भुलाईच्या ठिकाणीं देवी बुद्धि असल्यामुळे ती खरी वाटते व मुलीस खेळावयासाठी करून दिलेल्या भुलाईचे ठिकाणीं खोटी बुद्धि असल्यामुळे तिला आपण कांहीच समजत नाही. तसाच आखाडपाटीचा खेळ. मुलीला खेळ पाठवितांना त्यांत लहान लहान भांडी असतात, पण तेंच मोठें ताट असल्यास तें जेवणाच्या उपयोगी पडत असल्यामुळे त्याला आपण खरें मानतो, व आखाडपाटींतील खेळांचीं ताटें वगैरे भांडीं खोटी समजतो. त्याप्रमाणें मापूल हे दीठ (दृष्ट) काढण्याच्या उपयोगी असल्यास खरें समजतो. नाहीतर त्याची उपेक्षा करितो.

याचप्रमाणे जगांतील सर्व पदार्थांविषयी समजावें. या संसारांतील सर्व पदार्थ रज्जुसर्प किंवा स्वप्नाप्रमाणें मिथ्या आहेत. जी वस्तु सत्य असते. ती नेहमी (तिन्ही काळीं) राहते, तिचा कधीहि नाश होत नाही. संसारांतील वस्तू धरून ठेवण्याची आपण कितीहि खटपट केली तर त्या नित्य राहणें शक्यच नाही. **आपण संसार धरून ठेविला तरी तो आपल्यापासून दूर पळतो.**

हा संसार इतका असत्य असूनहि त्यांत आपण व्यवहार करितो म्हणून त्याला व्यावहारिक सत्ता आहे. रज्जुसर्प किंवा स्वप्न अगदीच खोटें असल्यामुळे त्याची प्रातिभासिक सत्ता आहे.

या दोन वस्तु झाल्या. एक ब्रह्म तें अगदी सत्य आहे व दुसरा संसार

त्यांत कांही गोष्टी अगदीच खोट्या आहेत व कांही खोट्या असूनहि त्या खऱ्या समजून आपण त्यांच्याशीं व्यवहार करितो. या सर्वाहून सत्य असें एकच ब्रह्मच आहे. यालाच दृष्टिसृष्टिवाद म्हणतात. या वादांत अनेक ग्रंथ आहेत.

मातीची भुलाई मुलींना खरी वाटतें. तुम्हांला वाटत नाही. पण तीच माडी पौर्णिमेच्या दिवशीं खरी मानून तुम्ही तीची पूजा करतां. मुलगी मोठी झाल्यावर भुलाई खेळूं लागली तर आपण तिला रोखतो व म्हणतो की, 'आता तूं भूलाई कशाला खेळतेस?' स्वयंपाक वगैरे करणें व इतर घरांतील कामें शीक. हे सर्व व्यर्थ आहे.''

त्याप्रमाणे वेदांतांत ज्यांची थोडीशी प्रगती झाली आहे, त्यांना संसारांतल्या पदार्थांत दोन भेद आहेत, हें कशाला सांगितलें पाहिजें? लहान मुलाला आपण लहान लहान घास करून खाऊं घालतो. मोठ्या मुलाला त्या लहान घासांचा मोठा घास करून देतो. त्याप्रमाणे मूर्ख मनुष्याकरिता संसारांतील पदार्थांचे भेद केले



आहेत. वास्तविक नाही.

## दृष्टिसृष्टिवाद : योगवासिष्ट

सिद्धांत मुक्तावलीकार म्हणतात :- वस्तुतः दोनच गोष्टी आहेत :- १. ब्रह्म व २.री जगत्. जगत मिथ्या असल्यामुळे त्याचा त्याग करावयाचा व ब्रह्म सत्य असल्यामुळे तदाकारवृत्ति करावयाची. याला दृष्टिसृष्टिवाद म्हणतात. दुसऱ्या मतांत म्हणजे सृष्टिदृष्टिवादांत पुष्कळ ग्रंथ आहेत. पण या मतांत हाच मुख्य ग्रंथ आहे.

या वासिष्ठाची प्रक्रिया अशी आहेः-

जगतांत तीनच पदार्थ आहेत. - १. देह २. मन व ३. आत्मा.

यापैकी देह तुच्छ, घाणेरडा, जड, मेल्यावर कांही उपयोग नाही, कुत्र्यांनी खाल्यास विष्ठा होते असा असल्यामुळे त्याचा विचार कर्तव्य नाही.

आत्मा सर्वव्यापक आहे. सर्व विचाराचें फळ व सर्व विचार झाल्यावर जें उरतें तेंच तो आहे. एखाद्या गावास जावयाचें असल्यास ज्या गावाहून जावयाचें. त्या गावाचा विचार कर्तव्य नसतो व त्या गावाला पोचल्यावर समजतेच आहे. पण ज्या मार्गाने जावयाचें त्या मार्गाचा मात्र गावास पोचेपर्यंत विचार केला पाहिजे. त्याप्रमाणे देह व्यर्थ असल्यामुळे त्याचाहि विचार करण्याची जरूर नाही. पण देह व आत्मा यामधील चित्ताचा विचार कर्तव्य आहे. ओल्या मातींचीं जशीं नानाप्रकारचीं भांडीं करितां येतात, सुक्या मातीची किंवा भाजलेल्या मातीची कांहीच होऊ शकत नाही, त्याप्रमाणे मनच सर्व बंधनांचे कारण आहे व त्या बंधनापासून सुटण्याचेहि कारण तेंच आहे.

## हे मन दोन प्रकारचे आहे - शुद्ध व अशुद्ध.

उदा. नदीत ओंगळ पाणी असले तर तेच गाळून टाकल्यास शुद्ध होते. त्याप्रमाणे **मन देहाशी चिटकून असते तेव्हा अशुद्ध असते व देहाहून निघून आत्म्याकडे लागले म्हणजे शुद्ध होते.** 'अमृतबिंदू'त (उपनिषद्) यांचा चांगला विचार केला आहे. अशुद्ध मनाचा परित्याग करून शुद्ध मनाची वृद्धि करण्याकरिता तुला आज वासिष्ठ सांगतो. हा सर्व अर्थ ध्वनीने या श्लोकांत सांगितला आहे. – **''अहं बद्धो विमुक्त . . . ''**

## शास्त्राचा अधिकारी

ज्याला घरी खावयाला आहे त्याला भिक्षा मागण्याची जरूर नाही व जो उपवास करतो त्यालाहि भिक्षा मागण्याची जरूर नाही. पण ज्याला भूक लागते व खावयालाहि मिळतनाही त्याला भिक्षेचा उपयोग असतो. लहान मुलीला संसार

कसा करावा हे शिकविण्याची गरज नाही. त्याचा म्हातारीलाहि उपयोग नाही, पण जी मुलगी उपवर झाली, तिला त्याचा उपयोग असतो.

त्याप्रमाणे जो बद्ध आहे त्याचे मन देहाशी फारच चिटकले असल्यामुळे त्याला या शास्त्राचा उपयोग नाही. किंवा जो पूर्ण आहे त्यालाहि यापासून उपयोग नाही, कारण, त्याच्या विचाराची समाप्ति होऊन एक आत्माच सत्य असून तो सर्व व्यापक आहे, असे त्याला कळून चुकले असते. पण ज्याला संसारांत दुःख वाटते, म्हणजे ज्याला मन चांगलें समजू शकते, ज्याला दुःख नको आहे, आत्मा जाणण्याची इच्छा आहे, तो या शास्त्राचा अधिकारी आहे.

या सर्व निरूपणाचे रहस्य हे आहे की –

**ज्यांना संसारात दुःख नसून मनोरंजनाकरिताच जे वेदांत पाहतात, त्यांना या शास्त्रापासून कांहीच फायदा होत नाही.**

आज चार विषय सांगितले आहेत :- (१) संसारांत दोन प्रकारचे खोटे पदार्थ आहेत (२) आधी मनाचा विचार केला पाहिजे (३) वेदांतातील दोन वाद व (४) या शास्त्राचा अधिकारी.

मोक्षाचा व अधिकाऱ्याचा प्राप्यप्रापकभाव संबंध आहे. जीव-ब्रह्मैक्य हा विषय असून त्रिविध दुःखनिवृत्ति व अखंड परमानंद प्राप्ती हे फळ अथवा प्रयोजन आहे. (यांत सुतीक्ष्णाची कथा व आणखी एक कथा आहे, ती सोडून देतो, कारण त्यांचा येथे उपयोग नाही.)

**त्वदर्चनपरायण प्रमथ कन्यकालुंठित ।**
**अलंतट वितर्दिकाशयित सिद्ध सिमंतिनी ।**
**विकीर्ण सुमनो मनो रमण मेरुणा मेरुणा ॥**

मेरू पर्वतांच्या पायथ्याशी अप्सरांचे क्रीडास्थान आहे. अप्सरा म्हणजे देव किंवा गंधर्व स्त्रिया. त्या स्वेच्छाचारी असतात. म्हणजे कोणाहि बरोबर विहार करतात, तरी त्यांना पातक लागत नाही. उदा. एखाद्या मनुष्याजवळ थोडसे धन असले व तो फार खर्च करूं लागला तर लवकर दरिद्री होईल. पण ज्याच्यापाशी पुष्कळसे धन आहे, त्याने कितीहि खर्च केला तरी काय होते? त्याप्रमाणे मनुष्याचे पुण्य थोडे असल्यामुळे त्याचा लवकर क्षय होतो. स्वर्गातील देवांचे किंवा अप्सरांचे अति पुण्य असल्यामुळे त्यांच्या पुण्याचा क्षय होत नाही. मनुष्यांच्या इच्छा बांधलेल्या असतात. पण देव लोकांच्या इच्छा बांधलेल्या नसतात.



## अरिष्टनेमी राजा व सुरुची अप्सरा

त्या पर्वताच्या पायथ्याशी एक सुरुची नांवाची अप्सरा क्रीडा करीत होती. त्याच मार्गाने एक देवदूत जात होता. तिने त्याला एक हाक मारीली व ''आपले येणे कोठून झाले व कोठे जाता?'' असे विचारले.

तेव्हा तो देवदूत म्हणाला, ''कोणी अरिष्टनेमी नांवाचा राजा आपल्या पुत्राला राज्य देऊन तप करण्याकरिता गेला. त्याने फारच भयंकर तप केले. ते पाहून इंद्र भ्याला व मला सांगितले की, तूं त्या राजाकडे जाऊन त्याला स्वर्गात घेऊन ये. ही आज्ञा घेऊन मी राजाकडे गेलो व त्याला इंद्राचा निरोप सांगितला. तेव्हा त्यांनी स्वर्गातील गुणदोष विचारले.''

या कथेच्या संबंधाने मी तुला एक गोष्ट सांगतो. भारद्वाजाने वाल्मिकी ऋषींला विचारले, ''मुने ! पुष्कळ लोक मोक्षाचे साधन कर्म सांगतात. कित्येक उपासना सांगतात व कित्येक तर ज्ञान सांगतात. यापैकी कोणते खरे साधन आहे, हे कृपाकरून सांगा.''

वाल्मिकी म्हणाले :- ''मोक्षाचे साधन यापैकी काय होऊ शकते . हे मी तुला सांगतो. कल्पना कर की, एक बाई होती. तिला एक मुलगा झाला. लहानपणीच तो मुलगा तिच्यापासून दूर झाला व बराच मोठा झाल्यावर जरी पुनः तिच्याजवळ आला तरी तिची ओळख पटणार नाही. मंगळागौरीची कथा तुला माहित आहेच. तिचा पति जवळ असून खूण सांगितल्यावाचून ओळख पटली नाही. त्याप्रमाणे आत्मा जवळ असूनहि अज्ञानामुळे त्याचे ज्ञान होत नाही. ज्ञानावाचून त्याची साक्ष पटत नाही. आत्मप्राप्तिकरिता ज्ञानच मुख्य साधन आहे कर्म किंवा उपासना मोक्षाचे साधन होऊ शकत नाही. कोणी म्हणतात :-

**उभाभ्यामेव पक्षाभ्यां यथारवे पक्षिणां गतिः ।**
**तथैव ज्ञानकर्माभ्यां जायते परमं पदम् ॥**

घोड्यावर बसणारा दोन रिकाबींत पाय ठेविल्याशिवाय जाऊ शकत नाही, त्याप्रमाणे कर्म व ज्ञान हे दोन्ही मोक्षाला साधन आहे असे म्हटले आहे. या वाक्याचा अर्थ निराळा आहे.

भारद्वाजाने विचारले की, ''या संसारांत दुःखरहित असे कसे वागतां येईल?''

वाल्मिकी म्हणाले, – ''भारद्वाजा ! तूं रामाप्रमाणे वाग.''

जीवन्मुक्तिकरिता कर्म केले पाहिजे. ज्याप्रमाणे प्रकाशावाचून अंधारांत काम होत नाही, म्हणून पहिले दिव्याने अंधाराचा नाश करून नंतर काम करतो,

त्याप्रमाणे ज्ञानाने अज्ञानाचा नाश करून, नंतर प्रारब्धरूपी वृत्तीचा कर्माने रोध करून ज्ञानाने आपला आनंद भोगावा. ब्रह्मैक्य मात्र ज्ञानाने हाते. मुक्तीला कर्म साधन नाही. कारण ते विरोधी आहे.

लहान मुलांना जे दूधदांत येतात व ते पुढे पडून जातात व नंतर पुनः दुसरे दांत येतात. पण हे दुसरे दांत आल्यावर मात्र दूध पाजत नाही. कारण ते पुनः पडून जातात. किंवा लहान मुलांना दूध पाजावयाचे नसल्यास त्याचे तोंडात बोट घालून चोखावयास लावतात. कारण बोटे चोखून भूक जाते, अशी समजूत असते. पण तरुणपणी ही समजूत राहात नाही व तोंडात बोटे घालून भूकहि जात नाही. – त्याप्रमाणे कर्म करतांना मी देह आहे, मी पुण्यकर्ता, मी पापकर्ता इत्यादि कर्तृबुद्धि असते व ज्ञान झाल्यावर मी अकर्ता आहे, अशी बुद्धि असते. या दोन बुद्धि विरोधी आहेत. ज्ञान्याला मी कर्ता आहे, अशी बुद्धीच उत्पन्न होत नाही. तरुणपणी बोटे चोखणे व अन्न हे दोन्ही नको आहेत. नुसते अन्नच पाहिजे. व लहानपणी मात्र हे दोन्ही पाहिजेत. त्याप्रमाणे ज्ञान झाल्यावर कर्माची आवश्यकता नाही, पण लहान मुलांकरिता जसे आपण बोबडे बोलतो, तोतडे बोलतो, मुद्दाम त्याची काही आवश्यकता नसते, त्याप्रमाणे ज्ञान झाल्यावर लोकांना सन्मार्गाला लावण्याकरिता कर्म करावे लागते. ''मूर्खांना कर्मावाचून गतिच नसते.''

आत्मा हा कर्ता नाही तसाच भोक्ताहि नाही म्हणून त्याचे ठिकाणी कर्माचा लेप नाही. मोक्षाला साधन, ज्ञान व कर्म हे दोन्ही आहेत. या म्हणण्याचा दुसरा एक अर्थ असा आहे :- बालपण जाऊन तरुणपण आल्यावर जर एखाद्याने विष्ठा चिवडली तर तो काही बाळ होणार नाही किंवा त्याला कोणी बाळ म्हणणार नाही व त्यामुळे दुसऱ्या मुलांना शिक्षण देण्याच्या तो उपयोगाचा राहणार नाही. त्याप्रमाणे कुत्र्यासारखा कसाहि वागणारा ज्ञानी असल्यास त्याची कांही हानी नाही. पण लोक सुधारण्याच्या तो उपयोगी पडत नाही. ज्ञानी अज्ञान्याप्रमाणे विषयसेवन करू लागला तर त्याची कांहीच हानी होत नाही. नाश पावलेले अज्ञान पुनः उत्पन्न होत नाही. कारण त्याचा उत्पन्न होणे हा स्वभाव नाही, नाश होणे हा स्वभाव आहे.

**प्रश्न :-** अंधाराची उत्पत्ति होऊ शकेल काय ?

**उत्तर** :- दिवा विझवून अंधार करता येतो. पण दिवा स्वयंप्रकाश नाही. सूर्य विझवून मात्र होत नाही. पण ज्ञानी यथेष्ठाचरण करू लागला तर दुसऱ्या विचारी अज्ञानी लोकांस विषयसेवनाची संवय लागते. तो लोकोपयोगी होत नाही. म्हणून सद्‌गुरु होण्याला पात्र नाही. याकरिता ज्ञान जसे पाहिजे तसे लोकांना



सन्मार्गाला लावण्याला कर्महि पाहिजे. कर्म मोक्षाला हेतु नाही, हे दाखविण्याकरिता या कथेचा आरंभ होता.

## स्वर्गातील गुणदोष

अरिष्टनेमी राजाने स्वर्गातील गुणदोष विचारले, तेव्हा तो दूत म्हणाला,''राजा ! अतिपुण्यावाचून स्वर्गात कोणी येत नाही. अति सुंदर स्त्रिया, पुष्कळ धन व पुष्कळ आयुष्य वाढविणारे अमृत मिळते. जशी इच्छा असली तशी भोगाची पूर्ति होते, व या सर्व मनुष्य जातीवर सत्ता असते. हे गुण सांगितले.

आता दोष सांगतोः- तेथे अधिक पुण्याने अधिक सुख, मध्यम पुण्याने मध्यम सुख व कनिष्ट पुण्याने कनिष्ट सुख मिळते. व ते पुण्य संपले की, मनुष्य पुनः खाली पडतो. स्वर्गात आपल्याहून जे श्रेष्ठ व जास्त सुखी असतात त्यांच्या बद्दल द्वेष असतो व जे खाली कमी सुखी असतात त्यांच्याबद्दल हर्ष वाटतो व बरोबरीच्यांत हेवा असतो'' असें सांगितले.

तेव्हा राजा म्हणाला,''दूता ! तूं असत्य बोलतोस. कारण तू सांगितलेले गुण व दोष एकाच ठिकाणी राहणे शक्य नाही. तुझा स्वर्ग मृत्युलोकांपेक्षा जास्त दिसत नाही. कारण मृत्युलोकांप्रमाणेच हलक्या लोकांवर सत्ता, बरोबरीच्यांत कलह, मोठ्याबद्दल द्वेष इत्यादि गोष्टी स्वर्गातहि असतात. दुसरा स्वर्गात गुण नाही. तूं म्हणतोस की, पुण्याचे फळ स्वर्ग आहे. पण ते चुकीचे आहे. कारण मृत्युलोकांप्रमाणेच तेथे आहे, म्हणून पुण्य विपर्ययाने तो (=स्वर्ग ) पापाचेंच फळ आहे असे मला वाटते. उदाहरणार्थ :- प्रथम गोड व नंतर दुःखरूप अशा बचनागाप्रमाणे प्रथम सुखरूप व शेवटी दुःखरूप असा स्वर्ग पुण्याचे फळ होऊ शकत नाही. तेथील स्त्रिया व तेथील भोग फार सुंदर असतात, हेंहि तुझें म्हणणे चुकीचे आहे. कारण कोणतीच वस्तु सुंदर किंवा कुरूप नाही. जितका जितका वस्तूचा उपयोग जास्त, तेवढी तेवढी ती वस्तु जास्त सुंदर व प्रियकर वाटते. सुवर्ण कंकण चांगले खरे, पण तेच रणांत लढाईकरिता जातांना हातात घालून गेल्यास हिजड्याप्रमाणे दिसते. त्यावेळी हातात तलवार वगैरे आयुधे असणे हेंच सौंदर्य आहे. मुलाचे आंग जर उललेले असले तर चांगले दिसत नाही. ते चिकण चोपडेच पाहिजे. पण रणांत असणाऱ्या मनुष्यचे आंग चिकण चोपडे असून उपयोग नाही. ते सुंदर दिसत नाही. त्याच्या आंगावर तरवारीचे घावच चांगले दिसतात. सौंदर्याची कल्पना आपल्या मनाच्या आसक्तीवर अवलंबून आहे. तरुणपणांतच जेव्हा कामोत्पत्ति जास्त असते, तेव्हा कुरूप स्त्रीहि सुंदर वाटते. कुत्र्याला कुत्री जशी सुंदर वाटते तशीच इंद्राला इंद्राणी वाटते, म्हणून स्वर्ग पुण्यफळ म्हणता येत

नाही. स्वर्गात चांगले धन मिळते,हेहि म्हणणे बरोबर नाही. कारण तेथल्या धनाचेहि मृत्युलोकांतील द्रव्याप्रमाणे रक्षण करावे लागते. एकाच रसाने रसनेंद्रिय तृप्त होत नाही. तर मग ज्या अमृतांस षड्रस आहेत, ते पिऊन रसनेंद्रिय वाढेल व मधुर रसाने सत्त्वगुण वाढेल. मग अप्सरा वगैरेंचा कांहीच उपयोग राहणार नाही. मृत्यू लोकांत एका मनुष्याला तरी पतिव्रता स्त्री मिळण्याचा संभव आहे; परंतु स्वर्गात उष्ट्या भोगण्याकरिता मिळतात, मग हें पुण्याचे फळ कसे म्हणता येईल ? बरें ! स्वर्गातील स्त्रियांना असे वागूनहि पाप लागत नाही. असेंहि म्हणता येत नाही. कारण वेदविरुद्ध कर्म करणे हे पाप आहे. आपल्या स्त्रीचे ठिकाणी ऋतुकाली गमन करावे अशी वेदाज्ञा आहे. पण देव झाल्यावर कोणत्याहि स्त्रीचे ठिकाणी रममाण व्हावे, असे वेदांत कोठेच सांगितले नाही. देवांना पुष्कळ स्त्रिया रागानेच मिळतात. म्हूणन वेश्याभोग करणे वेदविरुद्ध आहे व म्हणून ते पाप आहे. याकरिता पापरूप स्वर्ग पुण्याचे फळ होऊ शकत नाही.''

देवदूत म्हणाला, मी ही सर्व हकीकत इंद्राला सांगितली.

(वेदाने 'स्वर्गासाठी यज्ञ करावा', असे म्हटले आहे. त्याचा अर्थ निराळा आहे. कल्पना कर की, एखादा मनुष्य आग लागलेल्या घरांत सापडला आहे व या घरांत जळून मरणार असे त्याला वाटते व त्यावेळी एखादा शहाणा मनुष्य तेथे येऊन त्याला ''घरांतून अमक्या वाटेने बाहेर नीघ'' असे सांगतो, त्याप्रमाणे मूर्ख जे आहेत, त्यांना देहच आत्मा आहे व देह पडल्यावर आत्म्याचाहि नाश होतो असे वाटते. त्या मूर्खाकरिता श्रुतिमातेने स्वर्गाचे वर्णन सांगितले आहे.)

अरिष्टनेमीचें भाषण ऐकून इंद्राला फार संतोष झाला व त्याने देव दूताला सांगितले की, ''तूं या राजाला वाल्मिकी ऋषिकडे घेऊन जा, व त्यांना या राजाला उपदेश करण्याविषयी माझी हात जोडून विनंती सांग.''

देवदूत म्हणाला, याप्रमाणे इंद्राची आज्ञा घेऊन मी त्या राजाला वाल्मिकी ऋषीकडे घेऊन गेलो व त्यांना इंद्राचा निरोप सांगितला.

ते म्हणाले ''राजा ! एकदा भारद्वाजाने मला ज्ञान विचारले होते. तेच मी तुला सांगतो. हीच कथा पूर्वी वसिष्ठाने रामाला व वाल्मिकीने भारद्वाजाला व वाल्मिकीने पुनः अरिष्टनेमीला सांगितली, तीच मी तुला सांगतो,'' असे देवदूत सुरुचीला म्हणाला. या कथेचे तात्पर्य असे आहे : -

कितीहि विचार केला तरी ज्ञान विचाराच्या स्वाधीन आहे व तो विचार उत्पन्न होऊन दृढ होण्याकरिता आंगी पुण्य पाहिजे. तप पाहिजे. तपादिक पुण्यकर्म केल्याशिवाय होत नाही. राजाचा मुलगा आहे, एवढे समजल्याबरोबर तो कांही



राज्याचा अधिकार होत नाही. त्याला मोठे काम करून तो अधिकार आणून घ्यावा लागतो. त्याप्रमाणे जे खाऊन पिऊन सुखी असतात व ज्यांना संसारांत कांही दुःख वाटत नाही तेहि जेवण झाल्यावर निजतेवेळी आत्मा देहाहून निराळा आहे असा विचार करतात पण अशा विचाराने ज्ञान होत नाही.

जपान देशांत एका कागदावर ईश्वराची प्रार्थना लिहून एका झाडावर बांधून देतात. त्या लोकांची अशी समजूत आहे की, तो कागद त्या मनुष्यातर्फे ईश्वराची प्रार्थना करतो. पण ही सर्व लुगिरी आहे. आळसामुळे कोणास वेळ सांपडतो?

यांतला अर्थ असा आहे :- देहाला कठिण व आत्मा मिळण्याकरिता सुलभ तीच परमार्थाकरिता साधने समजावी. विषयामध्ये राहून विषय मिळण्यास सुलभ व आत्मा मिळण्यास कठिण अशी साधने करू नयेत. पतिबरोबर सती जाणे हे साधन देहाच्या दृष्टीने कठिण आहे पण पति मिळण्याच्या कामांत सुलभ आहे. ज्यांना खरोखरच परमार्थ करावयाचा, त्यांनी देहाकडे पाहूं नये. हिंदुस्थानांतील सर्व मार्ग असेच आहेत. तप, योग, कर्म इत्यादि जे मार्ग आहेत, ते वैराग्याला साधन आहे. सत्कर्मांच्या संवयीनेच वैराग्य होतें. नेहमी विषयापासून दूर राहण्याची संवय असल्यामुळे थोडक्याशा विषयदोषदर्शनाने वैराग्य होतें. म्हणूनच तीर्थयात्रेनंतर रामाला वैराग्य झालें.

**॥ हरिःॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे महाराष्ट्रभाषायां वासिष्ठतत्त्वे प्रथमं रहस्यम् ॥**

**हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥ शुभं भवतुः ॥**

- - -

॥ ज्ञानेश्वर आई ॥

# २. वासना द्वैविध्य निरूपण

अरिष्टनेमीला वाल्मिकी म्हणालेः- मी एकांतीं आसनावर बसलो असतां भारद्वाज आले व म्हणाले की, ''महाराज संसारांतून मुक्ति होईल असें जाणण्याची मी इच्छा करतो.''

वाल्मिकी म्हणतातः - ''ठीक आहे. ज्याचें मनन निदिध्यासन केलें असतां तूं कृतकृत्य होशील असें साधन सांगतो.'' थोडक्यांत योगवासिष्ठाचा सार सांगतातः-

**उपक्रम :-** मागे सांगितलें की, चित्त हें शुद्ध व अशुद्ध असें दोन प्रकारचें आहे. जसें - आपण कपाळावर बिजवरा किंवा कुंकू लावतो व तें वाकडे आहे किंवा सरळ आहे हें आरशाने पाहतो. आरशांत पाहून आपण आपल्याच कपाळावरील कुंकवाची दुरुस्ती करतो. आरशांतील मुखाची दुरुस्ती करीत नाही. कारण

आपलें मुख आपल्याला पाहता येत नाही. आरशांतील मुख आपले कशावरून? असा आपण संशय घेत नाही.

आत्म्याचे कोणत्याहि शास्त्राने ज्ञान होत नाही. व कोणतेहि शास्त्र आत्म्याचे ज्ञान करून देण्याला समर्थ नाही व उपायहि ज्ञान करून देण्याचा नसतो. आपला डोळा आपणांस दिसत नाही. तसा आत्माहि समजत नाही. परंतु जसे आरशात प्रतिबिंब पाहतो व तें खोटे आहे असे समजतो, त्याप्रमाणे वासनेमध्ये असलेले आत्म्याचे प्रतिबिंब पाहून आपण त्याहून निराळे आहो, हे समजले पाहिजे. तूं आपल्याला वासनेपासून निराळे समजतो येते की नाही हे पहा.

उदाहरणार्थः- घरांत अंधार असतो तेव्हा तो दिव्याने निघून जातो. कां? तर दिवा अंधाराचा वैरी आहे म्हणून! दिव्याच्या प्रकाशाने घर किंवा जमीन नाहीशी होत नाही. वैरी भेटला म्हणजे नाश पावतो असा विरूद्धाचा नियम आहे. एक राजा जेव्हा दुसऱ्या राजाला मारतो तेव्हा तो त्याचे शस्त्र घेऊन जातो कारण शस्त्र कांही त्याच्या विरुद्ध नाही. बायकांचे भांडण क्रोध निघून गेला म्हणजे बंद पडते. क्रोध व शांति, रडणे व उगे राहणे हे परस्पर विरुद्ध आहेत. क्रोध येतो जातो तशीच शांतीहि येते जाते. दोन्ही वेळी तू असतेस. तूं क्रोधाची किंवा शांतीची वैरी नाहीस. विरोधी पदार्थ आपापसांत नाश पावतात, असा नियम आहे. – दोन्ही ठिकाणी तूं असतेस, पण तूं दोन्ही नव्हेस. क्रोध, शांति इत्यादि वृत्ति परस्पर विरोधी आहेत. तूं दोन्ही नव्हेस. तथापि क्रोधाची वेळी दुःख वाटते, अंधाराने घर प्रकाशित दिसत नाही. प्रकाशाने दिसते. तशा वासना दोन प्रकारच्या आहेत. मलिन व शुद्ध. मत्सर, क्रोध या मलिन वासना होत, स्त्रियांच्या ठिकाणी कामबुद्धि ही मलिन वासना होय. मातृबुद्धि ही शुद्ध वासना होय. ह्या परस्पर विरोधी आहेत.

दुसरे उदाहरणः - डोळे झाकले म्हणजे कांही दिसत नाही. उघडले म्हणजे दिसते. दोन्ही आपले स्वाधीन आहेत. त्याप्रमाणे शुद्ध वासना व मलिन वासना तुझ्याच ठिकाणी राहतात. दोन्ही वासनांशी आत्मा मिळून गेलेला असतो. जसे - आपले शरीर आहे, किंवा जीभ आहे. शिव्या देतांना जीभ रंगून जाते व गोड बोलतांनाहि त्यांत रंगून जाते. शिव्या देण्याला किंवा गोड बोलण्याला जिभच पाहिजे. त्याप्रमाणे मलिन वासना किंवा शुद्ध वासना दोन्ही मध्ये आत्मा असतो. तो शुद्ध असतो. नोकर कचेरीत असतो तेव्हा कचेरीच्या कामांत व घरी असतो तेव्हा घरच्या कामात गुंग असतो, तसा आत्मा हा शुद्ध वासनेतहि गुंग असतो व मलिन वासनेतहि गुंग असतो. आत्मा शुद्ध व मलरहित आहे. तुझे शरीर चित्रांतहि काढतां येते व आरशांतहि पाहता येते. परंतु आरशांत जशी कुंकवाची दुरुस्ती करतां येते,



तशी चित्रातल्या कुंकवाची करता येत नाही. कारण चित्र मलिन असते. आरसा निर्मळ असतो. चित्र एकवेळ काढले तसेच राहते, बदल करता येत नाही. आरशात बदल लवकर होतो.

शुद्ध वासनेत आत्म्याला दुःखाचा थोडाहि संस्पर्श समजतो. आपल्याला कितीहि दुःखाचा डाग समजतो. म्हणजे त्यापासून निराळे राहण्याची खटपट करतो. – मलिन वासनेंत दुःख समजत नाही.

भगवान वाल्मिकी म्हणतात :- मलिन वासना जन्म देणारी आहे. शुद्ध वासनेतील दुरुस्ती करून घेता येते. राम शुद्ध वासनेने जसे मुक्त झाले तसा तूंहि शुद्ध वासनेने मुक्त हो.

**॥ हरिः ॐतत्सत् श्री वासिष्ठतत्त्वे वासनाद्वैविध्यनिरूपणं नाम द्वितीय रहस्यम् ॥**

**॥ श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥**

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# ३. निरभिमानता रहस्य

आता मलिन वासनेचा त्याग करून शुद्ध वासना कशी वाढवावी, हे सांगण्याकरिता श्रीरामाच्या कथेचा उपक्रम करितात :- लग्नाच्या वेळी स्त्रियेची व पतीची ओळख नसते. लग्नात निकटचा संबंध काढून आपण दूरचा जुळवून घेतो.

## दहा संस्कार

मलिन वासनेचा संबंध सोडून शुद्ध वासनेस जुळवून घेण्याचे १० प्रकार आहेत. यांना संस्कार म्हणतात,

**आगमो[१]ऽपः[२] प्रजा[३] देशः[४] कालः[५] कर्म[६] च जन्म[७] च ।**
**ध्यान[८] मंत्रो[९]ऽथ संस्कारो[१०] दशैते गुणहेतवः ॥ श्रीमद्भागवत ॥**

ज्याप्रमाणे बायका लहानपणापासून कुंकू लावीत असतात. कां तर त्यांना पति मिळण्याची आशा असते. विधवा कुंकू लावीत नाहीत. कारण त्यांना पति मिळण्याची आशा नसते. मनुष्यजन्मांत आत्मा मिळण्याची आशा असते.

हळूहळू शरीराची इच्छा दाबत गेले पाहिजे. हळू हळू मलिन वासनेचा त्याग करीत शुद्ध वासनेला वाढवावे लागते. शुद्ध वासना शिकविण्याला शास्त्र उपयोगी पडते.

* **पाणी** हे शुद्ध वासना वाढविण्याला उपयोगी पडते. पाणी म्हणजे तीर्थ.

* **प्रजा** म्हणजे सत्संगती. सत्संगतीने शुद्ध वासना वाढते.

* **देश** म्हणजे ठिकाण. हेहि शुद्ध वासना वाढविण्याच्या उपयोगाचे आहे. शुद्ध देशांतला मनुष्य घाणेरड्या ठिकाणी गेला असता त्याला बरे वाटत नाही.

* मुलीला कुमारपणी कोणीतरी पति पाहिजे असे कल्पून ती कुंकू लावित असते. कुमारपणी पति दूर असतो. पण आपला आत्मा नेहमीच जवळ असतो.

* पाणी हे शुद्ध वासना वाढविणारे आहे. शास्त्र, पाणी, सत्संग, देश, काल, कर्म, जन्म, ध्यान, मंत्र व संस्कार ह्या दहा गोष्टी शुद्ध वासना वाढविणाऱ्या आहेत.

* **जन्म** म्हणजे दीक्षा.

* **ध्यान** म्हणजे एखादी एकाग्र करणारी वस्तु.

* **काल** म्हणजे प्रातःकाल प्रातःकाळी सत्त्वगुण असतो. दुपारी मन चंचल असते म्हणजे रजोगुण दोन्ही सकाळच्या वेळी नसतात.

* **जन्म** म्हणजे गुरूपासून घेतलेली दीक्षा.

* **ध्यान** हरीहरांचे.

* **मंत्र** पंचाक्षरी. हे दहा संस्कार शुद्ध वासना वाढवितात. तुझें आडनांव देशपांडे. हे शब्दमात्राने धारण केले आहे.

शरीर ज्या वासनेत गुंग होते, तो संबंध जबर मानावा लागतो. मी देह नसून परब्रह्म आहे, असा दृढ निश्चय झाला पाहिजे. वासना शुद्ध होण्याकरिता ह्या दहा गोष्टी क्रमाने झाल्या पाहिजेत. यापैकी एकहि गुण कमी असल्यास तेवढी शुद्ध वासना कमी वाढते.

## संवयीचे महत्व

संवयीचा परिणाम बुद्धिपेक्षा जास्त असतो. बुद्धीने आपण करतो ही गोष्ट चांगली नाही हे समजूनहि संवयीमुळे तसेच वर्तन करतो. म्हणून चांगल्या गोष्टी बुद्धीस न पटल्या तरी त्यांची संवय करून घ्यावी. आत्मा बुद्धीच्या आटोक्यात नाही. उदा. गांजा ओढणे वगैरे. याप्रमाणे कोणतीहि गोष्ट बुद्धीला पटवून घेण्याची नेहमी संवय करावी.

पहिले पहिले आपण आरसा घेऊन कुंकू पाहतो व नीट करतो. पण पुढे पुढे संवय झाली म्हणजे आरसा नको असतो. भंग्याला घाण सहन होते. सामान्य मनुष्य तेथे गेला तर वास बाधतो.

मूर्ख मनुष्याला संसारांत भयंकर दुःख होऊनहि ते सहन करतात. चांगली माणसें मानसिक दुःख देखील सहन करीत नाहीत. शहाणी माणसे यत्किंचित्



दुःखानेहि पोळतात. हे सर्व योगाचे रहस्य आहे.

श्रीराम अशाच प्रकारचे होते. ते विष्णु होते तरी आपल्या स्वरूपाला विसरल्यासारखे झाले होते. विष्णु एकदा ब्रह्मसभेंत गेले असता सर्वांनी त्यांना नमस्कार केला, पण सनत्कुमारांनी नमस्कार केला नाही. तेव्हा विष्णूंनी त्यांना शाप दिला की, ''तुम्हाला आपल्या निःष्कामतेचा अभिमान आहे, तर एकवेळ तुम्ही सकाम व्हाल.

सनत्कुमारांनी विष्णुला शाप दिला की, ''तुला सर्वज्ञतेचा अभिमान आहे, तर एकवेळ सर्वज्ञत्व विसरून तूं अल्पज्ञ होशील.''

जगांत सर्वज्ञ किंवा अल्पज्ञ कोणीच नाही. मुंगीच्या दंशाने हत्ती मरतो. अग्नी पर्वतांत राहतो व पर्वतालाच फोडून टाकतो. मनुष्याला जितका मोठेपणा येतो तितका लहानपणा आपोआप त्याच्यात शिरत जातो. सर्वज्ञतेचा किंवा अल्पज्ञतेचा (दोन्ही) अभिमान मिथ्याच आहे. वाघाला माणसे खाण्याची शक्ति आहे. मोठेपणा किंवा लहानपणा विश्वांत कोणालाच नाही. राजालाहि आपले काम करावयास लहान मनुष्याची मदत घ्यावी लागते. रात्री दिव्याच्या प्रकाशाने राजा काम करतो, तसेंच मुंगीलाहि दिव्याच्या प्रकाशाने दिसते. दिवा राजाच्या किंवा मुंगीच्या विरोधी नाही. तो मोठेपणाचा किंवा लहानपणाचा साक्षी होऊन राहतो.

सनत्कुमारांनी विष्णूला शाप दिला नाही, तर विष्णूला सर्वज्ञतेचा जो अभिमान होता त्याला शाप दिला असे त्या कथेचे तात्पर्य आहे.

सर्व रोगांस नाहीसे करणारे औषध जगांत नाही. भूक आणि अजीर्ण दोन्ही रोगांना नाहीसे करणारे औषध नाही. कुत्रें किंवा पक्षी आपल्यापेक्षा बुद्धिवान् नाहीत, पण त्यांना संग्रह करण्याची उपाधी नाही. आपल्यास खावयास मिळते ते आपल्या काळजीने मिळते असे नाही. कुत्रे आठ दहा घरे फिरतात तेव्हा त्यांना खावयास मिळते. आपण नोकरी करून खातो. कुत्र्याला तुकड्याकरिता मार खावा लागतो. आपणालाहि मालकाच्या लाता खाव्या लागतात. काम चुकले तर दंड होतो. मालकाला दया आली तर आपणाला तुकडा मिळतो.

**तात्पर्य :** - कुत्र्यासारखेच आपणास खावयास मिळते. मानाने मिळते म्हणणे लबाडी आहे. पुष्कळ गोष्टीत कुत्रे आपल्याहून श्रेष्ठ आहे. कुत्र्याला थोडी चोरी करावी लागते. कुत्रे विष्ठा खातात. आपणहि मध वगैरे माशांची विष्ठा खातो. कुत्रें जसे माणसांच्या अन्नांचा परिणाम विष्ठा वगैरे खातो. तसे आपणही गाई म्हशी यांच्या अन्नाचा परिणाम दूध वगैरे खातो. मनुष्याच्या शहाणपाणाचा अभिमान मात्र व्यर्थ आहे. जगात कितीहि वरिष्ठ झाला तरी तो कोणापेक्षाहि श्रेष्ठ नाही. इंद्र जसा

आपल्या स्त्रियेला घेऊन आनंद मानतो तसा कुत्राहि मानतो. जे सुखदुःख स्वर्गात आहे तेच नरकांतहि आहे. अन्न आपणांस जितके गोड लागते तितकेंच कुत्र्याला लागते.

स्वर्ग व नरक यांत भेद आहे तो हाच आहे.- मनुष्याला ब्रह्मज्ञान होण्याची योग्यता आहे. ब्रह्मलोकांत गुरूच्या अपेक्षेवाचूनच बुद्धीने ज्ञान होते. ज्ञानावाचून पशू व मनुष्य सारखेच. नीचपणा विष्णूचा व जारपणा पुरुषाचा सारखाच. विष्णूने वृंदेकरिता जालंदर दैत्याला मारले, यांत विष्णु व जार दोघहि सारखेच. विष्णु ब्रह्मज्ञानी असल्यामुळे त्याला लेप लागत नाही इतकेच. विष्णुसारखा जो ब्रह्मज्ञानी असला तर त्यालाहि लेप लागत नाही.

सनत्कुमार शाप कथेचे तात्पर्य इतकेंच आहे की, विष्णुसारखे वैभव असले तरी महात्म्यांचा अपमान करूं नये. खरोखर विष्णूला कांही त्यांनी शाप दिला नाही व विष्णु हे शापाने बद्ध होतहि नाहीत. तर सर्वज्ञपणाचा जो अभिमान विष्णूला होता, त्याला शाप दिला. लोकांना दाखविण्याकरिता तसे यांना करावे लागले.

श्रीराम शापाने अल्पज्ञाप्रमाणे भासले. त्यांनी बालपण गेल्यावर तीर्थाची आज्ञा मागितली. ''आईबाप घरी असता तीर्थाला जाण्याची जरूरी नाही'' हे त्यांना समजले, पण मोक्षमार्गाचे अवलंबन केल्यावर हेच त्यांना इष्ट वाटले. आईबाप तीर्थ खरे, पण तीर्थाचे फळच ते देऊ शकतील. मोक्ष देऊ शकत नाहीत. रामाने विचार केला की, स्वर्ग किंवा वैकुंठ हे तीर्थाचे फळ आईबापांच्या सेवेने मिळेल. पण त्यांची संसार करण्याची आज्ञाहि मला पाळावी लागेल व ती आज्ञा पाळली नाही तर आज्ञा मोडण्याचा दोषहि आपल्या पदरी येईल. तीर्थाला गेले असता तीर्थे आज्ञा मोडण्याचा प्रसंग आणणार नाहीत व सत्वशुद्धि मात्र अवश्य देतील म्हणून मोक्ष मार्गाचे अवलंबन करणाऱ्या मला तीर्थाला गेले पाहिजे. असा विचार करून तीर्थाकरिता रामाने आज्ञा मागितली. पित्याने मोठ्या कष्टाने आज्ञा दिली. याप्रमाणे पित्याची आज्ञा घेऊन श्रीराम तीर्थाला जाण्यास तयार झाले.

**हरिः ॐ तत्सत् श्रीवासिष्ठतत्त्वे**

**निरभिमानतारहस्य निरूपणं नाम तृतीय रहस्यम् ।**

**॥ श्री ज्ञानेश्वरर्पणमस्तु ॥**

०००



**॥ श्रीसद्‌गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

# ४. रामविषयदोषदर्शन

## (अथ गच्छति कालेषु . . . . . .श्लोक १६ ते २६)

याप्रमाणे श्रीरामाने पित्याला आज्ञा मागितली असता त्याने ती दिल्यानंतर श्रीराम भूमीला तीर्थरूप करण्याच्या उद्देशाने भूमीवर फिरत चालले. काल सत्त्वगुण वाढविण्याचे दहा हेतु सांगितले. त्या दहाहि हेतूंचा समुदाय तीर्थांत एके ठिकाणी होत असतो. तीर्थाचे ठिकाणी संतांचे मुखाने सहज सच्छास्त्र ऐकू येते. तीर्थातले पाणीहि तीर्थमय असते व सत्संग घडतो. तीर्थाला जाण्याचा मुख्य उद्देश सांगतो.-

## तीर्थाला जाणे कशासाठी?

आपण जे अन्न खातो व पाणी पितो त्याचे तीन तीन भाग होत असतात. सात्त्विक, राजस व तामस. त्यांतला जो भाग सात्त्विक असतो तो मनाला मिळतो. जेवल्याने आनंद वाटतो व तो सत्त्वगुणानेच वाटतो. आनंद जेवणांत नाही. सत्त्वगुणांत आहे. मन सत्त्वप्रधान आहे. मनास आवडेल असे अन्न मिळालें असतां अधिक आनंद वाटतो. *अन्नाचा सात्त्विकभाग मनाला मिळतो. राजस भाग रक्ताला मिळतो व तामसभागाची विष्ठा बनते. *पाण्याचा सात्त्विक भाग प्राणाला मिळतो, राजस रक्ताला मिळतो व तामस भागाचें मूत्र होतें.

## वासनाशरीर / मृत्यूचे वर्णन

तुपाचा पुतळा असावा याप्रमाणे वासनाशरीराचा देह जलमय असतो. याठिकाणीं प्रत्यक्ष प्रमाण किंवा अनुमान प्रमाण चालत नाही. याला एक श्रुतिप्रमाणच मानलें पाहिजें. वेदांत अशी एक कथा आहे की, जैबिली राजाला ऋषीने पंचाग्निविद्या सांगितली. त्या पंचाग्निविद्येने जीवाची गती समजते. त्यांत जलाचे वेष्टन जीव घेऊन जातो असें सांगितलें आहे. जल हें उपलक्षण आहे.

उपलक्षण म्हणजे काय तें सांगतों. दही कुत्र्याला खाऊं देऊं नको म्हणजे मांजरीला, उंदराला, कावळ्याला किंवा इतर प्राण्याला खाऊं दे, असें तात्पर्य नाही. या समजुतीला उपलक्षण म्हणतात. एका पदार्थावरून पुष्कळ पदार्थ घेणें या समजुतीला उपलक्षण म्हणावें. जलवेष्टित जीव म्हटलें असतां जलाने पंचभूतांचें उपलक्षण होतें. नुसतें जल नाही जाऊं शकत. वासना शरीरांत जलाचा भाग जास्त असतो. जलाचा सूक्ष्म भाग प्राण आहे, तोच शरीरांतून निघून जातो. ज्याप्रमाणे इंधनांत धुपट असतें त्याप्रमाणे शरीरांत प्राण असतो. लाकूड ओलें असलें तर धुपट

होतो. ओलेपणामुळे धुपट वर वर जातें.

मरणाचे वेळी प्राण धूमासारख्या रूपाने अतिसूक्ष्म होऊन वर निघून जातो. प्राण डोळ्यांतून भरकन निघून जातांना कधी कधी कोणाला दिसतो. पापी मनुष्याचा प्राण गुदावाटे जातो. पुण्यवानाचा प्राण डोळे, नाक, कान यापैकीं कशांतून तरी जातो. प्राणांत जल जास्त असल्यामुळे तो धुमासारखा निघून जातो. हें एकवेळ पुनः सांगतो :- कापुराचें धूपट फारसें दिसत नाही. थोडे थोडे दिसतें. प्राण सूक्ष्म असल्यामुळे धुपट दिसत नाही. ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे धूमरूपी प्रवाह उत्पन्न होतो. उदा. वाहत्या नदींत आपण बसलों असतां लोटलेंलें पाणी आपल्याकडें येतें. तसें जगत कर्मप्रवाहांत फिरत आहे. ज्याचें जसें कर्म असेल त्याप्रमाणे त्याच्याकडे धूमरूपी प्रवाह वाहतो. प्राणाबरोबर सूक्ष्म होऊन धूमरूपी प्रवाह निघून जातो. जसें शरीर असेल तशा देवता पकडतात, अशा अर्थाची एक श्रुती आहे.

## तीर्थक्षेत्रातील मृत्यूचे वर्णन

तीर्थाचें जल सत्त्वमय असतें. तीर्थांत स्नानपान केल्याने प्राण तीर्थाचे जलमय बनून जातात. तीर्थांत मेलेल्या मनुष्याचे प्राण प्रकाशरूपाने बाहेर जातात. धूमरूपाने जात नाहीत. ज्यांचे प्राण धूमरूपाने जातात त्यांना यमदूत पकडतात. मरणसमयीं अग्निबळ चांगलें पाहिजें. ज्यांच्या शरीरांत अग्निबळ चांगलें असतें त्याचें प्राण प्रकाशासारखे निघून जातात. हें तीर्थाचें अदृष्ट फल आहे. पण **''चित्त विकाररहित होणें हें तीर्थाचें दृष्ट फल आहे.''** पिण्याच्या पाण्याचा उत्तम भाग प्राण होतों. प्राणच कामक्रोधादि विकारांना पुष्ट करतो. प्राण वीर्याला चलन करणारा आहे. तीर्थाच्या पाण्यांत सात्त्विक गुण असल्यामुळे विकार कमी उत्पन्न होतात. विकार उठूं न देण्यांत प्राणाला तीर्थाच्या पाण्यांतील सत्त्वगुण साह्य करतो.

जे लोक तीर्थांत राहतात ते नित्य तीर्थस्नानपान करीत असल्यामुळे पुण्यवान असतात. पण तीर्थांत जाणारे अधिक पुण्यवान असतात. जसा एखादा भला मनुष्य असतो. त्याच्या घराचीं माणसें चागलीं नसलीं तर त्यांच्यापासून त्याला त्रास होतो. व त्या भल्या मनुष्याचें चित्त घरच्या माणसाकडे विशेष ओढत नाही. पण घरीं पाहुणा आला तर पाहुण्याकडे त्याचे चित्त लागलीच ओढतें व आदरातिथ्य करण्यांत त्याचा चांगुलपणा एकदम त्यांच्यापुढे प्रगट होतो, त्याप्रमाणे शुद्ध बुद्धीने जो तीर्थाला जातो त्यालाच तीर्थाचे गुण मिळतात.

तीर्थ निर्माण करण्यांत परमेश्वराचा उद्देश कांही निराळाच असतो. तुमच्या घरीं गाई म्हशी तुम्ही पाळतां व त्यांना रानातून गवत कापून आणून चारतां, पण वनांत गाई म्हशीसाठी स्वयं चारा निर्माण केला आहे. त्याप्रमाणे ईश्वरनिर्मित



शास्त्रोपदेशाने मनुष्य आपली उन्नति करून घेऊं शकतो. परंतु पशुसारख्या जीवांना शास्त्र समजत नाही. असें जीव मुंग्या, माकोडे, मासोळ्या, मेंडके इत्यादि तीर्थांत एकदम उद्धरतात. तीर्थांत वस्तु महात्म्य आहे. जशी लहान लेकरालाच आई कडेवर घेते, तसा परमात्मा अज्ञान्याला सहाय्यक आहे. पण ज्ञानाभिमान्याला सहाय्यक नाही. तीर्थे हीं परमेश्वराने सर्वांच्या उद्धाराकरिता निर्माण केलीं आहेत.

## गंगा माहात्म्य : कथा

कोणी एक 'गूढ' नांवाचा ब्राह्मण होता. त्याने केलें नाही असें एकहि पातक नव्हतें. सर्व पातकें त्याने केलीं. शेवटीं तो म्हातारा होऊन मरण पावला. लोकांनी त्याला एका ठिकाणीं पुरलें. एकें दिवशीं त्याला उदाने उकरलें व त्याच्या प्रेताचा कांही भाग नेला. दिवसा त्याचा एक भाग गिधाडाने उचलला व घेऊन चालला. दुसरा एक गिधाड त्याला भेटला व पहिल्या गिधाडाजवळची तंगडी हिसकूं लागला. त्यांच्या भांडणांत ती तंगडी खाली पडली. ती भागीरथींत पडली. त्या ब्राह्मणाच्या पातकामुळे त्याच्याकरिता महानरक निर्माण झाले होते. यमदूत त्याला घेऊन चालले होते. रस्त्यांत वैतरणी नांवाची नदी आहे. तिला गायदान करणारे तरून जातात. तो पापी वैतरणी नदीच्या तीरावर पोचला असतां तेथे शिवदूतांचा समुदाय येऊन पोचला, व त्यांनी सगळ्या महानरकाचें चूर्ण करून टाकलें.

यमदूत म्हणाले ''तुम्ही कोण आहांत?''

शिवदूत म्हणाले 'आम्ही कोणीहि असो. याला आमच्या स्वाधीन करा.'

यमदूतांनी ब्राह्मणाला सोडून दिलें. यमदूत यमाकडे गेले व सर्व वर्तमान सांगितलें. यमाने चित्रगुप्ताला हाक मारली. चित्रगुप्तानें सांगितलें की, गिधाडाने त्याची तंगडी धरली होती. ती भागीरथीत पडून तो पावन झाला. अशी कथा महात्म्यांत आहे.

पुनः श्रीरामाने विचार केला की, तीर्थांत संताचेंहि दर्शन होऊन सच्छास्त्र चर्चा ऐकूं येतें. म्हणून सर्व तीर्थांचें दर्शन, स्नान, दान, जप करीत फिरावें, तीर्थे पांच प्रकारची आहेतः- ब्राह्म, आसुर, दैव, आर्ष व मानुष.

**(१) ब्राह्मतीर्थ :-**

ज्या तीर्थाची गणना वेदांत आहे ते ब्राह्मतीर्थ. ब्राह्मतीर्थे अनादि अनंत आहेत. जोपर्यंत वेदांचा प्रमाणांत डंका वाजत आहे, तोपर्यंत या तीर्थांना नाश नाही. गंगा, यमुना, सरस्वती हीं ब्राह्म तीर्थे होत. ज्या ठिकाणीं गंगा, यमुना सरस्वती आहे व ज्या ठिकाणीं सोमेश्वर नांवाचा देव आहे त्या ठिकाणीं मी अमृत व्हावें, अशा अर्थाची श्रुति आहे.

**श्रुतिः- यत्र गंगा च यमुनाच यत्र प्राची सरस्वती ।**
**यत्र सोमेश्वरी देवो तत्र माममृतः कृधीः ॥**

गंगा यमुनादि तीर्थे कधीच नाश पावत नाहीत.

**(२) दैवतीर्थः-**

देवांनी स्थापन केलेली तीर्थे दैवतीर्थे होत.गोकर्णतीर्थ. याची कथा शिवलीलामृतांत आहे. काशींत अविमुक्तेश्वर लिंग आहे. रामेश्वर तीर्थ रामाने स्थापन केले आहे. ही दैवतीर्थेहि अनादि आहेत पण कल्पाकल्पांत पुनः नवीन उत्पन्न होतात. घोर कलीत सगळीं तीर्थे ब्राह्मतीर्थांत मिळतात. घोर कलींत सर्व नद्या गंगेंत आपलें माहात्म्य सोडून देतात.

## गंगेचे माहात्म्य

पुराणांचें म्हणणें आहे की, कलींत गंगामाहात्म्य जाईल, पण श्रुति तसें म्हणत नाही. श्रुतिपेक्षा पुराणें अधिक प्रमाण नाहीत. ''कलीत गंगामाहात्म्य जाईल'' अशी जी पुराणवचनें आहेत, त्यांचा असा अर्थ आहे की, गंगा देवतेला जो शाप झाला होता की, तूं कलीला पांच हजार वर्षे होत पर्यंत पृथ्वीवर राहशील. तो तिचा प्रतिबंध पांच हजार वर्षांनी जाईल व ती स्वर्गांत जाईल. पृथ्वीवर तिचे जलरूप राहील. तात्पर्य, पुराणाने श्रुतिवचनांचा बाध होत नाही. श्रुतिवचंनाचा बाध मुख्य श्रुतीनेच होईल.

**(३) आसुरतीर्थ :-** गयासुराच्या पाठीवर यज्ञ करून त्याला वर देण्याकरिता जे तीर्थ स्थापन केले ते, किंवा दिंडिर दैत्याला मारून दिंडिरवनांत पंढरपूर स्थापन केले. अशी तीर्थे असुरतीर्थ होत.

**(४) आर्षतीर्थ :-** ऋषींनी स्थापन केलेले आर्षतीर्थ होय.

**(५) मानुषतीर्थ :-** अमरावती येथे जनार्दन भट्ट यांच्याकरिता गंगा आली. कूर्मदासाकरिता देव लहुळास आले. द्वारकेची मूर्ति डाकोरास आली. ही सर्व मानुषतीर्थे होत.

**(६) सत्संग :-** आणखी एक तीर्थ आहे. सर्व तीर्थे त्या तीर्थाची अपेक्षा करतात. ते तीर्थ म्हणजे सत्संग होय. कांही तीर्थ कायेला पावन करितात. काही वाचेला पवित्र करतात. सत्पुरुष सर्व पदार्थांना पावन करतात. संत्संग मिळण्याला मोठे भाग्य पाहिजे.

श्रीराम सर्व प्रकारची तीर्थे फिरले. तेव्हा त्यांना दिसून आले की, नुसत्या तीर्थस्नानदिकाने चित्ताची तळमळ जात नाही. तीर्थस्नानाने इतके झाले की, तीर्थे फिरत असता रामाला वैराग्य झाले. त्यांनी दोन विचार केले. तीर्थे फिरत असता



त्यांनी सर्व देशांत दुःखी प्राणी पाहिले व तीर्थादिकांतून घरी येतांना विचार केला की, ''नास्तिक होणे बरे किंवा आस्तिक होणे बरे? सुखाकरिता सर्वांचाच प्रयत्न असतो. नास्तिक शरीरावरच भिस्त ठेवतात व शरीराच्या पलीकडे कांही आहे असे त्यांना वाटत नाही. परंतु नास्तिक झाला तरी शरीराच्या पलीकडे काही नाही म्हणून चालत नाही. त्यांना इच्छेला आळाच घालावा लागतो व आस्तिकालाहि इच्छेला आळाच घालावा लागतो.''

रामाने विचार केला की, ''नास्तिक होऊनहि सुख मिळत नाही. आपणाला पक्षाप्रमाणे आकाशांत उडतां येत नाही. माशाप्रमाणे पाण्यांत बुडता येत नाही. अग्नीत कांही न झाले पाहिजे अशी इच्छा होते. अशा अनंत इच्छा नास्तिक होऊनहि केल्या असता पूर्ण होत नाहीत.

## वासनेचे स्वरूप

एकंदरीत वासना ही भयंकर आहे. **वासनेचा पूर्ण होण्याचा स्वभावच नाही. वासनेचे मुख्य स्वरूप असे आहे की - जगांतील सर्व सुखे आपणांसच मिळावी.** सर्वांची वासना सफल झाली तर अंमल ठेवायला कोणीच राहणार नाही.

एक मनुष्य राजा झाला व त्याने गांवात सगळा आपला अंमल बसविला, 'तो काय म्हणून? तर इतर लोक अज्ञान म्हणून. सर्वच पाटील झाले तर कोणावर कोणी अंमल बसवावा? एकट्याची वासना सफल झाली तर पोराचीहि वासना तृप्त झाली पाहिजे.

तृप्त होण्याचा वासनेचा स्वभावच नाही. मूर्ख लोकांना तृप्तीची इच्छा असते. राहील त्या स्थितीतच संतोष मानला पाहिजे. जितकी ओढ मनाला लागते त्याच्या शतांशहि वासनेला मिळत नाही. — मुळेमास्तराला २०० रुपयांची नोकरी पाहिजे, ती मिळत नाही. बायकोने राग सोडला पाहिजे. काशीनाथ विद्याभ्यास करीत नाही तो झाला पाहिजे. आपल्या हातून देशाचे काही कार्य झाले पाहिजे. अशा एक की दोन? हजारो वासना उठत असतात. त्याचा शंभरावा हिस्साहि आपल्या जन्मात आपण पूर्ण करून शकत नाही. सर्व गोष्टी तर असोच.पण एका एका गोष्टीतहि वासना पूर्ण होत नाही. रुचकर अन्न आपणास जन्मभर आवडते. एखाद्या दिवशी त्यात खडेच पडतात. एखाद्या दिवशी अन्न क्चाच राहते. वासनेला पदार्थ संपून जातात. पूर्वी मोत्याचा चुना करीत असत. शेवटी मोती संपले. आता लोक खडीचा चुना खाऊ लागले.

वासना दाबून ठेवावी लागते. मनुष्य उगीच दुःख मात्र करून घेतो. अधिक मिळू शकत नाही. सर्व गोष्टीला प्रयत्न आहे, पण वासनेला नाही.

**'प्रयत्नाची बढाई वासना क्षय करून घेण्याकरिता आहे.'**

मृगजळाचे पाणी मुलाने आईला मागितले असता मरून गेले तरी देता येत नाही. त्याला शिक्षा करून थापडा मारून वगैरे ते मिथ्या आहे हेंच शिकविणे शक्य आहे. प्रयत्न वासना मिथ्या करण्याकरिताच आहे.

नास्तिक एवढ्याकरिता व्हावयाचे की, विषयावर यथेच्छ ताव मारता यावा. वासना तर तृप्त होतच नाही मग नास्तिपणानेच कां दाबावी ? वासना हा अदृश्य प्रतिबंध आहे. म्हणून ती आस्तिकपणानेच दाबावी. धर्मावर आस्था ठेवावी. तीर्थात देखील जन्म होऊन दुःख चुकते असे नाही. मासे तीर्थात जन्म घेऊनहि त्यांना दुसरे मासे खातात. तीर्थाची स्थिति अशी आहे. मोठे मासे लहान माशांना खातात. तीर्थांत जन्म घेऊनहि कर्म चुकत नाही. उपाध्ये पैशाकरिता फिरत असतात.

रामाला तीर्थयात्रेत अशा अनेक गोष्टी दिसून आल्या. त्याला वाटले की, धर्मावर विश्वास ठेवूनहि फायदा नाही. धर्मावर तरी कसा विश्वास ठेवूं? प्राणत्याग करावा तर प्राणत्याग करूहि काय फायदा होणार? पुनः जन्मास येणार नाही तर बरे. जन्मास आलो तर दुःख बहालच आहे.

मेल्यावर आत्मा नाहीसा होतो. म्हणून तो जन्मास येत नाही, असेहि म्हणता येत नाही, कारण पूर्वी नव्हतो तरी आता आलो व आता पुढे नाहीसा झालो तर पुढे पुनः येणार नाही. कशावरून ? भाववस्तु पुष्कळ असल्यामुळे एकदा एका वस्तूचा भाव तर दुसऱ्यान्दा दुसऱ्या वस्तूचा भाव होईल. पण सगळ्या वस्तूचा अभाव एकच असल्यामुळे अभावांतून येणे संभवनीय आहे. असा विचार करून श्रीराम घरी येऊन बसले व सर्व उपभोग भोगणे सोडून दिले.

**हरिः ॐ तत्सत् श्रीवासिष्ठतत्त्वे महाराष्ट्रभाषायांमाविष्कृते**
**मुमुक्षु-वैराग्यप्रकरणे रामविषयदोषदर्शनं नाम चतुर्थ रहस्यम् ॥**
**श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥**

०००



॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ५. रामाचे चिंतन

तीर्थयात्रेकरून राम परत आल्यावर आपल्या राज्याविषयी व उपभोगाविषयी विचार करूं लागले. ते म्हणाले : - आज माझ्या पदरी हजारो दास दासी आहेत. ते नेहमी माझ्या सुखाकरिता झटत असतात. त्यांनाहि सुखाची इच्छा आहेच. मग असे राजकीय भोग मीच एकट्याने काय म्हणून भोगावे? सर्वांना माझ्यासारखी इच्छा असून दासदासींनी माझ्याकरिता कमी सुखांत काय म्हणून राहावे? आमच्यासारखे राजे म्हणविणारे लोक बाहेर जातांना त्यांच्या भोवती नोकर माणसांची गर्दी असते. नेहमी त्यांना आपल्या सुखाकरिता त्या गरीब बिचाऱ्या लोकांना त्रास द्यावा लागतो. वाटेल तेव्हा वाटेल तितका पैसा आम्ही आपल्या संरक्षणाकरिता खर्च करतो व थोड्या पैशावर त्यांना सैन्यांत घेऊन त्यांचे प्राण आपल्याकरता खर्ची घालतो. आपण त्यांना नोकर ठेवून घेतले नसते तर त्यांचे प्राण वाचले असते असेंहि म्हणता येत नाही. कारण जो परमेश्वर, आपण उत्पन्न होण्यापूर्वी मातेच्या स्तनांत दूध निर्माण करतो, जो रानांत झाडांना फुले फळे आणतो, माशांना जो पाण्यांत जगवितो, तो परमात्मा असतांना आम्ही त्यांचे प्राण वाचवूं, असे म्हणण्यांत काय अर्थ आहे? गर्भांत आमचे व गरीब लोकांचे सारखेंच पोषण होते. पण जन्मल्यावर थोडेसे स्वतंत्र झालो की, तुम्ही आमच्याकडेच राहिले पाहिजे, असे म्हणून त्यांना ठेवून घेतो व त्यांच्याकडे न पाहता वाटेल तशा त्यांच्याकडून सेवा घेतो. आपल्याकरिता आम्ही जे उत्तम अन्न तयार करितो व त्याला जो खर्च येतो, तेवढ्या खर्चात हजारो गरीब लोकांचे उत्तम रीतीने पोट भरेल, पण आम्ही तसे करीत नाही म्हणून हजारो मनुष्यांचे अन्न हिसकावून घेतल्यासारखे नाही का होत? उत्तम स्त्रिया आम्हालाच मिळाव्या. उत्तम भोग आम्हीच भोगावे. काय म्हणून? आमच्यांत व राक्षसांत काय भेद राहिले?

## एका सूत्राची कथा

एक तुला आख्यायिका सांगतो. एक सेनजित नांवाचा राजा होता. त्याला एक आवडती व एक नावडती अशा दोघी स्त्रिया होत्या. राजा फार सद्‌गुणी होता. पण त्यांच्यांत एक दुर्गुण होता. तो हा की, सुंदर स्त्रीवर तो मोहित होत असे. मोठी स्त्री सुंदर नसल्यामुळे त्याला आवडत नसे. तिला गावाबाहेर एक स्वतंत्र बाग बांधून दिला होता. तेथे ती कंदमुळे खावून राहात असे. कांही दिवसांनी तिला पुत्र झाला. राजाने तिजवर व्यभिचाराचा आरोप ठेवून तिला व मुलाला काढून दिले

व वनांत ठेविले. ती साध्वी त्या अरण्यांत कंदमूल फळे खाऊन राहिली. तिचा मुलगा पुढे मोठा झाल्यावर वनांतील पक्षाबरोबर खेळत असे. त्याने आईला विचारावे, 'आई! हे पक्षी कसे उडतात?'

आईने सांगावे, ''बाळा ! हे सर्व एका कल्पित सूत्राने बद्ध आहेत. या पक्षांना ओढून धरणारा एक दोरा आकांशात असतो. तो दोरा वर ओढला की, पक्षी वर जाता व खाली सोडला की, ते खाली येतात.''

रोज त्या मुलाने असे पक्षी धरावे व त्यांच्यापाशी तो दोरा तपास करून पाहावा व न सापडला की पक्षी सोडून द्यावा. असे पुष्कळ पक्षी धरून पाहिले पण दोरा सापडला नाही. तेव्हा तो म्हणाला, ''आई ! दोरा दिसत नाही.''

ती म्हणाली, ''पुढे दिसेल.''

हें ऐकून त्याने तो क्रम चालूच ठेविला. आईला वाटले की, असाच याला नाद लागेल, म्हणून ती म्हणाली, ''पहा बरे ! एखादे वेळी तो दोरा तुझ्या गळ्याला अडकेल.''

हे ऐकून त्याला भिती वाटली व पक्षी धरण्याचा त्याने क्रम सोडून दिला. पण भिती जाईना. पण भितीमुळे गळ्यांत दोरा अडकेल असा त्याला ध्यास लागला व एकदा त्याला स्वप्न दिसले की, तो पक्ष्याबरोबर आकाशात फिरत आहे. दुसरे दिवशी झोप झाल्यावर त्याने आईला स्वप्न सांगितले व म्हणाला ''मी दोरा स्वप्नांत पाहिला तोच तर नाहीना?''

पुढे पुढे त्याला तेंच स्वप्न नेहमी पडावे. आईच्या म्हणण्याचा अर्थ निराळा हेता. तो त्याच्या मनांत आला नाही.एकदा त्याला असे स्वप्न पडले की, तो पक्षाबरोबर राजाच्या महालांत गेला व सर्व वाडाभर फिरला. सर्वांना तो पाहात असे पण त्याला कोणी पाहात नसे. आपल्या गळ्याला चिकटलेला दोरा राजाच्या डोक्याला व एका चित्राला चिटकलेला त्याने पाहिला. दोरा ओढल्यामुळे हा राजाच्या सिंहासनावर गेला व हात मारून राजाच्या डोक्यावरील मुकुट आपल्या डोक्यावर घातला. दुसरीकडे एका तसबीरीला तो दोरा चिकटला होता. तिकडे त्याचें लक्ष गेलें. चित्र कोणाचें होतें हें त्याने ओळखलें. त्याकडे पाहून त्याला संताप आला व राजाला विचारलें की, ''अशी हिची दुर्दशा कां झाली?''

राजा म्हणाला ''ती जारिणी आहे. म्हणून तिला मुलासहित काढून दिलें''

मुलगा म्हणाला, ''ती जारिणी आहे असें मला वाटत नाही.''

राजा म्हणाला ''कशावरून?''

मुलगा म्हणाला ''मी तिचा मुलगा असल्यामुळे ती जारिणी नसावी. माझा एवढा पराक्रम आहे की, या दोऱ्याने तुझा सर्व देश हालवून देईन.'' असें बोलून त्याने दोरा ओढला व सर्व देश हालविला.



सर्व लोक राजाकडे आले व सांगू लागले, ''राजा ! तूं हें काय करतोस? याच्यावर शस्त्र चालत नाही. याला कोण्यातरी रीतीने वश करून घे व याच्या सर्व स्वाधीन कर. हा एक सूत्राने राज्य करणारा आहे. याच्या आईला शोधून आणा.''

राजा म्हणाला ''तूं जर माझा मुलगा आहेस तर हे सर्व तुझ्या स्वाधीन करतो. हें घे. मी मात्र आता तपाला जातो. पण आधी तुझ्या आईला शोधून आणतो.''

तिला शोधण्याकरिता नोकर पाठविले. ते नोकर त्या वनांत आले. त्यांना पाहतांच ती भ्याली व मुलगा लपविण्याकरिता त्याला उठवूं लागली. पण तो कांही उठेना व पक्षीहि त्या वनांत येईनात. नोकराने सांगितलें की, ''तुम्हाला राजाने बोलाविले आहे. तेथे चला. तुमच्या मुलाला पाहून तेथे वैद्य वगैर औषध देतील.''

ते सर्व मिळून गावांत आले व राजाच्या महालांत गेले. इतक्यात मुलगा जागा झाला. तेथे बागेच्या मागे सर्वच पक्षी होते. त्याने आईला आपलें स्वप्न सांगितलें व विचारलें की, ''हा महाल कोठला? आपण येथे कसें आलो? हें सर्व काय आहे?''

वनांत तिचा व एका ऋषीचा समागम झाला होता. ती म्हणाली, ''मी जो तुला कल्पित दोरा सांगितला होता तो हाच आहे. माझ्या सांगण्याचा उद्देश हा होता की - माझा, तुझा, व तुझ्या बापाचा या आकाशांत उडणाऱ्या पक्षाप्रमाणे कल्पित संबंध आहे. त्या सूत्रांत आम्ही सर्वच बद्ध आहो. तें तूं न समजून सत्य समजलास व त्यामुळे तुझ्या मनाची तीव्र भावना होऊन सूत्ररूपाने दिसूं लागली व परमेश्वराने तुला साह्य केलें.''

राजाने पुढे स्त्रीची माफी मागितली. ''तुला दोष दिल्याबद्दल तूं वाईट वाटूं देऊं नकोस. तूं पतिव्रता आहेस.'' पुढे कांही दिवस त्या राणीसह विलास भोगून मुलाला राज्य देऊन राजा पत्नीसह तपास निघून गेला.

श्रीराम म्हणाले - या आख्यायिकेप्रमाणे आपण सर्व कल्पित सूत्राने बद्ध आहोत. हे सर्व प्रयत्नाने मिळतें म्हणावें तर तसेंहि होत नाही. कारण या लोकांपेक्षा एक शतांश देखील प्रयत्न मी करीत नाही. हेच लोक मजकरिता प्रयत्न करितात व 'माझ्या आश्रयाने राहातात,' असा फुकट डौल मात्र मी मारतो. पूर्व कर्माने मिळतें म्हणावें तर एखाद्या पूर्व कर्माने नाहीसें कशावरून होणार नाही? शुभ कर्माने ते भोग मिळतात असें म्हणावें तर ते भोग भोगून कांही मिळाले नाहीत. न भोगतां

साठवून ठेविले व तें आता मिळालें. असें साठवून ठेवून किती दिवस भोग तसेच राहतील?

असा विचार करीत श्रीरामाने सर्व भोग टाकून दिले. दासीने काही खाण्याकरिता आणून दिलेंच व खाल्ल्याशिवाय होत नसल्यास तरच खात असे. नेहमी विचार करीत बसत असे. हें पाहून दशारथाला चिंता उत्पन्न झाली. काय करावें कांहीं सूचेना.

## विश्वामित्रांचे आगमन व उपदेश

एकदा विश्वामित्र तेथे आले. दशरथाने अर्घ्यपाद्यादि पूजा करून त्यांना बसावयाला आसन दिलें. नंतर भोजनादिक आटोपल्यानंतर सर्वजण सभेंत येऊन बसलें. दशरथाने विश्वामित्रांला नमस्कार करून येण्याचें कारण विचारलें. तेव्हा विश्वामित्र म्हणाले,

''राजा ! मारिचादिक राक्षस माझा यज्ञ मोडून नेहमी विध्वंस करितात. याकरिता त्याचें संरक्षण व्हावें म्हणून श्रीरामाला मागावयाला मी आलो आहे.''

हें भाषण ऐकून राजा दशरथाला फार वाईट वाटलें व म्हणाले, ''महाराज ! माझा राम अजून फार लहान आहे. वृद्धपणाचा पुत्र असल्यामुळे तो मला फार प्रिय आहे. त्याला अजून कांही विद्या येत नाही. सुबाहू, मारिच हे रावणाचे मंत्री आहेत. रावण फार बलिष्ठ आहे. त्यांच्याशीं युद्ध करावयाचें रामांत सामर्थ्य नाही. मी यावें तर माझें उतार वय आहे. तरी पण मला घेऊन चला. मी येण्यास तयार आहे. पण माझ्या रामाला मागूं नका.'' दशरथ म्हणाले, ''महाराज ! मी आपलें काय प्रिय करूं? आज्ञा व्हावी.''

हें भाषण ऐकून विश्वामित्र फार संतापले, व म्हणाले, ''राजा ! सूर्यवंशांत आजपर्यंत पुष्कळ नामांकित राजे होऊन गेले. पण असत्याचा कलंक आजपर्यंत या सूर्यवंशाला कोणीहि लाविला नाही. मी आपलें काय प्रिय करूं? असें विचारलेंस म्हणून मी तुजपाशीं गोष्ट काढली.''

असें संतापाने बोलून विश्वामित्र चालते झालें.

वसिष्ठ म्हणाले, ''राजा हें तूं काय केलेस? अरे ! विश्वामित्र मोठा हट्टी आहे. तो दुसरा श्रीराम निर्माण करील व आपल्या यज्ञाचें रक्षण करील. श्रीराम हा परमेश्वर आहे. पृथ्वीचा भार हरण करण्याकरिताच ते अवतरले आहेत. विश्वामित्र महान पराक्रमी आहे. तो क्षत्रिय असतांना त्याला सर्व विद्या अवगत होत्या. त्यावेळेला त्या विद्येचा उपयोग होता. आता त्याला त्यांचा कांहीच उपयोग नाही. त्या सर्व विद्या श्रीरामाला अर्पण करण्याच्या उद्देशानेच त्याला मागण्याकरिता



ते आले असतील. यांच्या तेजापुढे क्षात्रतेज कांहीच नाही. -

**''क्षात्रतेज देहाच्या बलावर अवलंबवून आहे व ब्रह्मतेज मनावर अवलंबून आहे.**

जितके दिवस तपस्वी तेज राखून ठेवितो म्हणेल, तितके दिवस राखून ठेवूं शकतो.''

''त्यांच्यापाशीं श्रीरामाला भीती नाही. राम हारपला तरी विश्वामित्र पृथ्वी पालथी घालून त्याला शोधून आणतील.''

हें वसिष्ठांचें भाषण ऐकून दशरथ घाबरला व ''आता कसें करूं?'' असें म्हणूं लागला.

तेव्हा वसिष्ठ म्हणाले, ''राजा ! घाबरूं नकोस. तूं आताच विश्वामित्र रस्त्याने जात असतील त्यांना गाठून नमस्कार कर व सांग की महाराज ! मी शंकराच्या त्रिशूलाला भीत नाही. किंवा इंद्राच्या वज्राला भीत नाही; पण ब्रह्मशापाला फार भीतो. माझ्या बोलण्याचा उद्देश निराळा होता. एकट्या रामाला मी देण्याला तयार नव्हतो. त्याच्याबरोबर लक्ष्मणाला घेऊन जा असें मी म्हणत होतो व रामाची जी हल्लीची स्थिति आहे, ती आपणांस निवेदन करावी, अशी इच्छा होती. आपण कृपा करून पुनः घरीं चला, मी आपणांस सर्व वर्तमान निवेदन करतो.''

असें वसिष्ठांचे भाषण ऐकून विश्वामित्रांच्या मागे राजा एकदम धावत गेला व त्यांला लोटांगण घातलें व प्रार्थना करून घरीं घेऊन आला. दशरथाचें भाषण ऐकून विश्वामित्रांना आनंद झाला व ते परत सभेंत आलें. त्यांना यथायोग्य स्थानीं बसवून राजा म्हणाला,

''महाराज ! राम तीर्थे करून परत आल्यापासून सर्व भोग सोडून देऊन नेहमी एकांतांत राहतो. ''मी सर्वस्वीं बुडालों'' असें नेहमी ओरडत असतो. तो अतिशय कृश झाला आहे.''

हें ऐकून विश्वामित्र वसिष्ठाला म्हणाले, ''रामाला कोणती चिंता आहे? भोगप्राप्तीची तर संभवत नाही, कारण त्याला सर्व भोग तर प्राप्त आहेत. विद्येचीहि चिंता नसावी, कारण तो बुद्धिवान आहे. तर मग तीर्थयात्रेवरून आल्यापासून त्याला कोणती चिंता असावी? एकच चिंता असली पाहिजे व ती दूर करण्याकरिता वसिष्ठांसारखे महात्मे आहेत. त्यांच्यासमोर एकदा त्याला घेऊन ये.''

हें ऐकून रामाला बोलावून आणण्यास सांगितलें. राम येऊन वसिष्ठांना, विश्वामित्रांना व दशरथाला नमस्कार करून सचिंत बसला.

विश्वामित्र म्हणाले, ''रामा! दशरथाने मला सांगितलें की, तूं तीर्थयात्रेवरून आलास तेव्हापासून सर्व भोग सोडून देऊन, विचारांत गढलेला असतोस. तुला

कांही करावेसें वाटत नाही. असें करण्याचें कारण काय? तें सांग. तूं व्यर्थ शोक करूं नकोस. त्यांत कांही फायदा नाही. प्रयत्नाने होत नाही अशी गोष्ट कोणती आहे? तुझ्यासारख्याने प्रयत्न सोडून शोक करीत बसणें चांगलें नाही. एवढे शोक करण्याचें कारण मोठेच असलें पाहिजें. मुक्तीसारखें जरी कठीण असलें तरी वसिष्ठांसारखें महात्मे असतांना काळजी करणें ठीक नाही. सर्व कांही तुला अनुकूल आहे. आपलें मनोगत काय आहे तें सांग.''

**हरिः ॐ तत्सच्छ्रीवासिष्ठतत्त्वे महाराष्टभाषायांमाविष्कृते**
**विषयदोषदर्शनं नाम पंचमरहस्यम् ॥**

॥ श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

-----

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# ६. विश्वमित्रांचा उपदेश

## कालमहिमा

श्रीराम म्हणाले : - ''महाराज ! मला सर्व भोग अनुकूल आहेत खरे. राजाने सर्व राज्य मजकरिताच ठेविले आहे. हे मला ठाऊक आहे. म्हातारपणी मजशिवाय त्यांना कोण आहे? मी त्यांची सेवा करावी, हेंहि मी जाणतो, पण हे सर्व भोग मजकरिताच आहेत, असा अभिमान वाहणें, आपल्या कांहीच स्वाधीन नसल्यामुळे, व्यर्थ आहे. जन्मापासून पळ पळ आयुष्य वाढतें, असे आपण म्हणाते, पण तसे होत नसून, ते उणे होत जाते. इतके भोग उपभोगतो तरीपण पुरेसे वाटत नाही. या सूर्यवंशांत अनेक नामांकित राजे होऊन गेले पण वाऱ्याच्या तडाक्यांत सांपडलेल्या दीपाप्रमाणे ते कोणीकडे मावळून गेले, हे कळत देखील नाही. कोट्यावधी कुळे भगवान् काल क्षणांमध्ये आपल्या दाढेंत रगडीत आहे असे वाटतें. लोकांच्या इच्छा या कालामुळे तशाच अपूर्ण राहतात, अमुकांचे कार्य राहिले, हे काल कांही पहात नाही.''

## सुखाचे स्थान

याप्रमाणे कालमहिमा सांगून, राम म्हणतात,''त्यातहि तितक्याच्या तितक्यांत जे पदार्थापासून सुख होते, तेहि चांगले होत नाही. जो जो पदार्थ आपण सुखाचा समजतो, तो तो पदार्थ सुखदायकच असतो असे नाही. पदार्थाचे ठिकाणी सुख आहे असें म्हणतां येत नाही. कारण सुख जर पदार्थाचा स्वभाव धरला तर पदार्थ जोपर्यंत आहे, तोपर्यंत सुख असले पाहिजे,; पण तसे होत नाही.



उदाहरणार्थ :- अन्न. अन्नाचा स्वभाव सुख आहे असे म्हटल्यास कमी अन्न खाल्याने किंवा जास्त आन्न खाल्याने त्रास होतो व भोग भोगून वासना कायमच राहते. बरोबर विषयभोग भोगणे, म्हणजे वासना दाबून ठेवण्यासारखेच आहे. अति मैथुनाने शक्ति क्षीण होते.

बरे, एक एक भोग सुखाचे साधन आहे असेंहि म्हणता येत नाही, कारण दुसऱ्या भोगासाठी मन चंचल होतेच. पुष्कळ विषय एकदम भोगल्याने सुख होते म्हणावे तर तसे करणे शक्य नाही. बरे विषयापासून सुख नाही, म्हणून वासना तरी उगी राहते, असे म्हणावे तर तेहि नाही. पुनः मला अमुक केलेच पाहजे, माझ्यावाचून ते कोण करणार, इत्यादि अभिमान असतोच.

म्हणून महाराज ! व्रजिन लोक जसे आत्म्याचे ठिकाणी शान्त राहतात, तसा मीहि राहण्याची इच्छा करतो. दुसरे कांही इच्छित नाही.''

हे ऐकून विश्वामित्र म्हणाले : - ''रामा! तूं फार ठीक बोललास. जन्मात येऊन ही स्थिति प्राप्त होणे, हेच अनंत जन्मीच्या पुण्याचे फळ आहे. भोगाचें ठिकाणी अत्यंत कंटाळा जो येतो, व सर्व भोगाचे ठिकाणी दोष दिसतात - अशा वैराग्यापेक्षा वरिष्ठ फळ देणारे तप दुसरे कोणतेच नाही. सर्व कर्म-धर्म वगैरेंचे फळ हेच आहे.''

विश्वामित्र वसिष्ठांना म्हणाले :- महाराज ! आपले परस्परांत वैर असतांना त्याचे शांतवन करण्याकरिता ब्रह्मदेवाने आपणांस व मला बोलवून जो ज्ञानोपदेश केला तो उपदेश याला सांगा. असे वैराग्य होणे फार कठीण आहे. आत्मज्ञान एकदाचे होईल. पण वैराग्य होणे फार कठीण आहे.

**स्वात्मतत्त्वाभिगमनं प्रायशो भवति नृणाम् ।**
**मुने विषयवैरस्यं कदर्थादुपजायते ॥**

वाल्मिकि भरद्वाजाला सांगतात व भरद्वाज अरिष्टेनेमी राजाला सांगतात व देवदूत सुरूचीला सांगतो : - आत्मज्ञान एकदाचे होईल पण वैराग्य होणे फार कठीण आहे.

श्रीराम म्हणतात :- 'आत्मज्ञान होईल पण वैराग्य होत नाही हें कसे?'

विश्वामित्र म्हणतात :- ''वस्तूचे ज्ञान होऊनहि तिचा उपयोग करणारे लोकच फार आहेत.सुवर्णाचे ज्ञान होऊनहि ते आंगावर घालण्याच्या उपयोगी आहे, असे समजतात. उदा.- भुलाई. मुलीला खेळण्याकरिता जेव्हा ती आपण करून देतो, तेव्हा आपण तिला सत्य मानीत नाही पण तीच भुलाई माडी-पौर्णिमेच्या दिवशी सत्य समजून तिची आपण पूजा करतो व ती भंगली तर आपण अपशकून

समजतो. याप्रमाणे सत्याचे ज्ञान असूनहि जबरदस्त वासनेने ओढल्यामुळे असत्याचे ठिकाणी मूर्ख रममाण होतात.

निरनिराळे लोक आत्मज्ञानाने भोगाचे समर्थन करतात.

काही लोक म्हणतात की, ज्ञान झाल्यावर विषय द्वेष कां?

कित्येक लोक म्हणतात की, प्रारब्ध भोगलेच पाहिजे.

काही म्हणतात - विषयरोध करावा तर कर्तृत्वाहंकार येईल.

कोणी म्हणतात - ब्रह्मज्ञानी विषयभोगाचा अधिकारी आहे. ब्रह्मज्ञानी होऊन यथेच्छ विषयभोग भोगावे. ते म्हणतात की, याविषयी वेदातहि आधार आहे. याज्ञवल्क्यांनी राज्य मागून घेतले व दोन बायका केल्या. रैक्वमुनींनी जानश्रुति राजाला कन्या मागितली व मग त्याला ब्रह्मज्ञान सांगितले. राजा धन देण्यास तयार झाला असता, ''या धनाचे मी काय करूं? आपली मुलगी देत असशील तर मी तुला ज्ञान सांगतो'' असे ते म्हणाले, असा वेदात इतिहास असून मग लोकांवर का आक्षेप करता? असें कोणी म्हणतात.

पण वाल्मिकी म्हणतात :- माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाही, ब्रह्मज्ञानीयाला इच्छाच होत नाहीत. पण त्यांना इच्छा असली तर सर्व भोगाचे ठिकाणी त्यांना ग्लानी उत्पन्न होते. जर भोगाची वासना उत्पन्न झाली नाही तर भोग पुढे आले तरी ते भोगीत नाहीत. भोगाची वासना उत्पन्न झाली तर रोध करिता करिता अति तीव्र ज्या वासना असतात व ज्यांचा, प्रयत्नाने रोध होऊ शकत नाही, असे भोग भोगतात, इच्छेने भोगीत नाहीत. भोगाताना देखील थोडक्या भोगाने तृप्त होतात. किंवा वेदात जे मुनींना भोग मिळाले म्हणून सांगितले आहे त्यांत मुनींचे प्रारब्ध होते तसे भोग त्यांना मिळाले खरे, पण त्यांत नानाप्रकारचे दोष आहेत, हे दाखविले आहे.

किंवा विश्वामित्रांच्या बोलण्याचा असाहि अभिप्राय समज : - आत्मतत्त्वाचे ज्ञान होऊन विदेहमुक्ति होईल, पण जीवनमुक्ति हे सुख मिळणे कठीण आहे. शब्दमात्र ज्ञान होते. पुष्कळ चांगल्या बायका असतात व त्या सर्वांना पतिसुखहि मिळते; पण त्यांत सहमगन करणारी एखादीच बाई असते. त्याप्रमाणे आत्मज्ञान सर्वांना होते, पण मिथ्या विषयांचे ठिकाणी असणाऱ्या प्रवृत्तीचा नाश होऊ देणे कठीण आहे.

कोणी म्हणतात, विषयहि मिथ्या व प्रवृत्तीहि मिथ्याच आहे. विषय भोगावयाला काय हरकत आहे? पण हे समाधान बरोबर नाही, कारण असे मानणे म्हणजे आत्मज्ञानी व वेडे सारखेच होतील. मृगजल मिथ्या आहे असे समजून त्याकडे



प्रवृत्ति होऊं देणे जरी मिथ्या आहे, तरी हास्यास्पद आहे.

## कामक्रोधांचे वेग

विषय मिथ्या आहेत तर ते भासोत, पण त्याकडे प्रवृत्ति होणे कठीण नाही व प्रारब्धाने होत असली तरी ती कमी होते व ती आणि विषय अति जवळ असून मन त्यांच्यामध्ये भिंगाप्रमाणे असल्यामुळे मनाच्या द्वारे आत्म्याचा आनंद त्यावर जाऊन पुनः उलटून आत्म्यावर येतो.

पुनः असे की, आत्मज्ञानीच जर मिथ्या विषयाकडे मिथ्या प्रवृत्ति लावील तर इतर अज्ञानी लोकांना मार्ग मिळावयाचा नाही. तो आपले इहलोकचे नुकसान करून लोकांचे इहपर नुकसान करितो. कारण ज्ञानी कसाहि वागला तरी त्याची मुक्ति हे सिद्ध असतेच, पण कर्मबंधात गढलेले अज्ञानी जीव इहपरत्र नुकसान पावतात. भगवान् गीतेत म्हणतात -

**शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ।**
**कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ गीता ५.२३**

भाष्यकार म्हणतात :-

**''येन मातरमपि चाधिरोहति पितरमपि हन्ति ॥''आनंदगिरि**

मरावयाच्या पूर्वीच जो कामक्रोध यांचा वेग सहन करावयाला लागतो तो सुखी असतो. * प्रेताप्रमाणे आलिंगन देऊनहि, ज्याला कामोत्पत्ति होत नाही, तो खरा योगी असे कोणी म्हणतात. * कोणी म्हणतात :- वेग उत्पन्न होतात, पण शरदभ्राप्रमाणे तो रोधून टाकतो. * समाधीकाली स्त्रियांनी आलिंगन दिले तरी कामोत्पत्ति होत नाही. व्युत्थानकाली तो वेगाहून निराळा होतो व त्यामुळे त्या वेगाला आधार नसतो, व तो जिरून जातो. श्लोकांत ''सहन करितो'' असे पद आहे, त्यावरून वेग उत्पन्न होतो, पण जो त्याला सहन करतो जुमानित नाही, असा अर्थ ठीक आहे. ज्ञान होऊनहि विषयाची प्रवृत्ति झाल्यास ती व्यर्थ वाटून ज्याच्याकडून वेग रोधल्या जातो तो जीवन्मुक्त होतो.

विश्वामित्र म्हणाले :- ''ही गोष्ट रामाला ज्ञान होण्याचे पूर्वीच साध्य झाली, आहे आता फक्त याला शुकाप्रमाणे बोधाचीच अपेक्षा आहे. म्हणून तुम्ही कृपा करून याला ते ज्ञान सांगा. ब्रह्मदेवाने मला जे ज्ञान सांगितले तेच आपणालाहि सांगितले, तर मग आपणच सांगा, असे तुम्ही मला म्हणाल, पण मी या ठिकाणी याचक आहे. **'याचकाच्या उपदेशावर विश्वास बसत नसतो.'** आपण कुलगुरु आहांत, म्हणून आपणच उपदेश करणे चांगले होईल.''

**''दुसरियाचा शिष्य त्रिशुद्धि । बोधू नये स्वार्थबुद्धि''**

असे बोलणे चालले असतां राम कांही विचारण्याची इच्छा करून आज्ञा मागू लागले.

**''हरिः ॐ तत्सत् श्रीयोगवासिष्ठतत्त्वे महाराष्ट्रभाषायामाविष्कृते विश्वामित्रवाक्यं नाम षष्ठं प्रकरणम् । इति वैराग्य प्रकरणं समाप्तम् ॥ हरि ॐ तत्सत् श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु**

॥ श्री ज्ञानेश्वर माउली की जय ॥

०००

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ७. श्रीरामाचे प्रश्न

नंतर श्रीराम म्हणाले, मी ज्या दुःखसागरात पडलो होतो, तो मी आता निश्चयाने तरून जाणार असे मला वाटते. आता मला कांही काळजी नाही. या संसारांतून कोण सोडवील याचीच काळजी होती. परमेश्वराचा अनुग्रह, नाना तीर्थ, नाना व्रतें, यज्ञ, ज्ञान या सर्वांचे फळ सत्संगच आहे कारण एखाद्या वस्तूचे ज्ञान होण्याकरिता ती वस्तु ऐकली पाहिजे.

### शब्दप्रमाण सर्वात महत्वाचे

उदा. हा विस्तव आहे. असे सांगितल्याशिवाय मुलास ज्ञान होत नाही. या ठिकाणी प्रत्यक्ष वस्तूचे ज्ञान होण्याकरिता देखील शब्दप्रमाणाची गरज आहे. मग अप्रत्यक्ष वस्तूला तर शब्दाचीच गरज असली पाहिजे. येथे शब्द-प्रमाणाची आवश्यकता सांगितली आहे.या ज्ञानांत शब्दप्रमाणच बलवान आहे.

**प्रत्यक्षप्रमाण** म्हणजे आपल्या डोळ्यादि पांचज्ञानेंद्रियांनी जे समजते ते.

**अनुमान** म्हणजे धुपट पाहिला की, अग्नि असावा असा अंदाज करणे.

**शब्द** म्हणजे जे प्रत्यक्षाने किंवा अनुमानाने समजत नाही, ते एखाद्या शब्दाने समजते त्याला शब्दप्रमाण म्हणतात. उदा.– द्वारकी अमक्या गावी आहे, हे तुला माहित नाही, पण एखादा गृहस्थ आला व सांगितले की, मी तुझ्या द्वारकीला उमरावतीस सुखरूप पाहिले; तर तुला समजते.

### व्यवहारात प्रत्यक्षप्रमाण

प्रत्यक्ष अनुमान व शाब्द या तीन प्रमाणांत लौकिक गोष्टींच्या संबंधाने 'प्रत्यक्ष' जास्त बलवान आहे. धुपटावरून अग्नीचे अनुमान केले तरी उपयोग नाही. तेथे जाऊन प्रत्यक्ष करून घ्यावा लागतो. शाब्दप्रमाणाचेहि तसेच आहे. उदा.



अमक्या गावी द्वारकी आहे असे समजले तरी, तेथे जाऊन पाहशील तेव्हा त्याचा उपयोग आहे. शब्द प्रत्यक्ष होईल तेव्हाच त्या शाब्दप्रमाणाचा फायदा होतो. ही व्यवहारातली गोष्ट झाली.

### परमार्थात शाब्दप्रमाण

पण परमार्थात सर्व प्रमाणापेक्षा शाब्दप्रमाणच बलवान आहे. द्वारकी अमक्या गावी आहे, हे समजण्याकरिता ती दूर असल्यामुळे तेथे शाब्दप्रमाण जास्त बलावन आहे. पण या ठिकाणी आत्मा जवळ आहे. देहाचा व आत्म्याचा अविवेक (म्हणजे देहच मी आहे असे वाटू लागणे) दूर करण्यारिता प्रत्यक्ष किंवा अनुमान प्रवृत्त होते नाही.

कल्पना कर की, * एक मुलगा आहे. तो दुसऱ्याच्या घरी राहिला व घरधनीच माझा बाप आहे, असे म्हणूं लागला व कांही दिवसांनी त्याचा बाप येऊन खूण पटवून 'मी तुझा बाप आहे' असे सांगितल्यावर तो पूर्वीचा ध्यास सोडून देतो. * किंवा मुलाला भीति दाखविण्याकरिता मातेने ''बागूल आला'' असें म्हटल्याबरोबर तो भीतो, व ''तो मेला आता येत नाही'', असे म्हटल्याबरोबर पुनः त्याची भीति नाहीशी होते. या ठिकाणी शाब्दप्रमाण प्रत्यक्षावरून घ्यावे लागत नाही. म्हणून शब्दप्रमाण बलवान आहे. प्रत्यक्ष बलवान नाही.

भ्रम दूर करावयाचा असल्यास तो शब्दानेच लौकर दूर हातो, हा भ्रम प्रत्यक्ष दिसतो तरी त्याची निवृत्ति शब्दानेच हाते ; म्हणजे त्याजविषयी मिथ्या बुद्धि होते. पित्याचे आडनाव सोडून लग्न झाल्याबरोबर मुली पतीचे आडनाव धारण करितात. स्वर्ग आहे हे (प्रत्यक्ष) शाब्दप्रमाणाने समजून तेथे जाऊन प्रत्यक्ष करून घ्यावा लागतो. पण मृगजल भ्रम आहे, असे म्हटल्याबरोबर तो नाहीसा होतो. ब्राह्मणाचा पोर शूद्राच्या येथे वाढला, व पुढे मी ब्राह्मण आहे समजल्याबरोबर तो भ्रम (नाहीसा) होतो.

कोणी म्हणतील की, प्रत्यक्षापेक्षा शाब्दप्रमाण येवढे काय म्हणून बलवान समजता? पण ही गोष्ट लौकिक प्रमाणात लागू आहे. उदा. अंदनकारांच्या येथे गंगा निघाली, असे समजले तरी, तेथे प्रत्यक्ष जाऊन पाहील तेव्हा उपयोग. पण 'तुला शिंग आहे' असे म्हटल्याबरोबरच मिथ्या वाटेल.

### भ्रमनाशासाठी - शाब्द प्रमाणच

त्याप्रमाणे लौकिकामध्ये शब्दापेक्षा प्रत्यक्ष जरी बलवान आहे, तरी भ्रम नाहीसा करण्यामध्ये शब्द साक्षात् कारण आहे. अग्नि व तापलेले घमेले हे दोन्ही पदार्थाला जाळतात. पण अग्नि हे साक्षात् कारण आहे व तापलेले घमेले हे परंपरेने

कारण आहे. जेवणाने तृप्ति होते व अग्नि पेटवून इंधन घालून अन्न शिजवून जेवलो असतां तृप्ति होते. पण जेवणाने जशी तृप्ति हेते, तशी साक्षात् अग्नीने होत नाही. अग्नि हे परंपरेने कारण आहे व भोजन हे साक्षात् कारण आहे.

### उपासना व श्रवणमननादि

त्याप्रमाणे श्रवण, मनन वगैरे हे आपल्या सामर्थ्याने भ्रम दूर करितात. कर्म उपासना या गोष्टी केल्यावर, त्याचे फळ मिळेपर्यंत तसेच राहावे लागते. शब्दाने तात्काळ भ्रम निवटतो. श्रवण हे लवकर ज्ञान करून देते.

उदा. एखाद्या मुलाला बापाची ओळख नाही व बापाचे ध्यान करीत बसला तर काय होईल? बाप काही ओळखता येत नाही. जेव्हा दुसरा सांगेल तेव्हाच ओळख पटेल. हे कार्य शब्दाने झाले.

कर्म किंवा उपासनेने भ्रम दूर होत नाही. कर्म वगैरेंचे फळ चांगला गुरु मिळणे हे असून नंतर श्रवण होऊन मग ज्ञान होईल. म्हणजे कर्म-उपासना वगैरे परंपरेने ज्ञान होण्याला साधन आहे पण श्रवण मात्र साक्षात् साधन आहे. श्रवणाच्या व ज्ञानाच्यामध्ये काही पडदा नाही. तुला सांगितले की, श्वासांत सोहं शब्द होतो, तर तुला तसे मागाहून ऐकू येते. श्रवण ज्या जन्मात होते, त्याच जन्मांत ज्ञान व्हावयाला लागते. श्रवणाने एकदम ज्ञान होते. सत्संगावाचून श्रवण मिळत नाही. म्हणून सत्संगच श्रेष्ठ आहे.

कर्म, उपासना हे न दिसणारे आहेत. त्याचे फळ केव्हा होईल.

माहित नाही; पण श्रवणाचे फळ लगेच मिळते. सर्व कर्म व सर्व उपासना यांचे फळ सत्संगच आहे.

**यावन्नानुग्रहःसाक्षाज्ज्ञायते परमेश्वरात् ।**
**तावन्नसद्‌गुरुः कश्चित्सच्छास्त्रं वापि नो लभेत् ॥**

ईश्वरानुग्रहांवाचून सद्‌गुरु किंवा चांगले शास्त्र ऐकावयाला मिळत नाही आपण ज्या अर्थी सत्पुरुष येथे आहांत, त्या अर्थी माझे कार्य होईलच. आपण म्हणाला की, रामाला समजले आहे पण त्याला शुकासारखी बोधाची अपेक्षा आहे. तर ते शुक कोण होते व त्यांना दुसऱ्यापासून विश्रांती कशी प्राप्त झाली? हें कृपाकरून सांगा.

**हरिःॐतत्सत्श्रीवासिष्ठतत्त्वे महाराष्ट्रभाषायामाविष्कृते**
**मुमुक्षु-वैराग्यप्रकरणंनाम प्रथमरहस्यम् ।**
**श्रीज्ञानेश्वरर्पणमस्तु । शुभं भवतु । शुभं भवतु । गोंविद हरि शिव ॥**

०००



॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ८. शुकाचार्य व जनकराजा

रामाचा प्रश्न ऐकून विश्वामित्र म्हणाले, मला आता याला सांगितले पाहिजे. दुसऱ्याचा शिष्य बोधू नये असे मी एकदा सांगून गेलो. पण वसिष्ठांना वाटेल की, विश्वामित्र मला व रामाला परके समजतात. वास्तविक पाहता जे ज्ञान वसिष्ठाला ब्रह्मदेवाने सांगितले, तेच मलाहि सांगितले, म्हणून ते व मी गुरुबंधु आहोत. त्यांचा शिष्य तो माझाहि शिष्यच होय; म्हणून रामाला बोध करण्यास हरकत नाही. इतक्यांत बोध झालाच तर उत्तम आहे, नाहीतर वसिष्ठ पुढे सांगतीलच. असा विचार करून विश्वामित्र म्हणाले -

### वेगवेगळ्या कथांची कल्पभेदाने व्यवस्था

''रामा, भगवान व्यासांना शुक नांवाचा मुलगा होता. त्याच्या जन्माविषयी नाना कथा आहेत. त्यांची कल्पभेदाने व्यवस्था लागते. उदा. एक मूठभर दाणे घेतले व ते दुसऱ्या भांड्यांत टाकले व त्यांतून एकेक दाणा उचलला तर टाकलेले दाणे क्रमाने येतील, पण क्रम बदलेल. दाणे बदलणार नाहीत. त्याप्रमाणे अवतारहि तेच होतात, पण क्रम बदलत असतो. श्रीशुकाचार्य एकदा बसले असता त्यांनी असा विचार केला की, सर्व जगत् दुखःमय आहे; ''हें मला पाहिजे, हें नको'' इत्यादि वासनेने दुःख होते.

उदाहरणार्थ :- आपण बाजारांत गेलो व तेथे चामडे पाहिले. ते एक रुपया तोळ्याप्रमाणे मिळते, असे जर समजले, तर तुला वाईट वाटेल की, नाही? नाही वाटणार. बरें ! एक रुपया तोळ्याप्रामणे खात विकत असले तर तुला वाईट वाटेल की नाही? नाही. परंतु जर तूं बिल्लोर भरावयाला गेलीस व ते फार महाग मिळत असले, तर तुला वाईट वाटेल की नाही? होय. वाईट वाटेल. कां? चामडे महाग मिळत होते तरी वाईट वाटले नाही. खात महाग विकत होते तरी तुला वाईट वाटले नाही व बिल्लोर भरावयाला गेलीस व ते महाग होते म्हणून कां वाईट वाटलें?

वस्तु मिळत नाही, म्हणून वाईट वाटत नाही. वस्तु जवळ आहे किंवा जवळ नाही, यामुळेही वाईट वाटत नाही. पण ''अमुक वस्तु आपल्यास पाहिजे व अमुक वस्तु नको,'' या दोन वासनांची तृप्ति न झाली तर वाईट वाटत असते. या दोन वासनेनेच सर्व दुःखांचा उद्भव होतो.

तुझे लग्न झाले म्हणून पतीची प्रीति लागली, नाहीतर दुसऱ्याची लागली असती. ज्याबद्दल प्रीति वाटते, त्याच्या हानीबद्दल वाईट वाटते व प्रीति नसली तर

त्या वस्तूचा नाश किंवा ती न मिळाली तरी वाईट वाटत नाही. गवत पाहिजे असे वाटले व ते न मिळाले की, वाईट वाटते व ते लागत नसले व त्यावेळेस ते जरी मिळत नसले तरी दुःख होत नाही.

शुकाचार्यांनी विचार केला की, वासनेमुळे दुःख होते म्हणून ती नाहीशी करून स्वस्थ बसता येईल तर बरे. देह देखील वासनेनेच पोसला जातो.

**स्थूलो मांसमयो देहो सूक्ष्मः स्याद्वासनामयः ॥**

याप्रमाणे या स्थूल व सूक्ष्म देहारहित आपले स्वरूप त्यांनी ओळखले, पण विश्वास बसेना, कारण त्यांना वाटे, की, या जगात कोणी वरिष्ठ ज्ञाता नसेल कशावरून? जी गोष्ट जगांत सर्वत्र एकच असते, तिच्या संबंधाने मोठेपणा व लहानपणा मुळीच नसतो. नाना गोष्टीमध्येच मोठेपणा व लहानपणा असतो.

आपण आपल्या घरी जेवतो. त्यापेक्षा चांगले अन्न खाणारेहि पुष्कळ असतील, पण तृप्ति कोणाला कमी होत असेल व कोणाला जास्त होत असेल असें नाही. भाकरीची तृप्ति व बासुंदीची तृप्ति एकच ! कोणाची विद्या जास्त असते कोणाची कमी असते. कोणी अल्प शक्तिमान होईल व कोणी जास्त शक्तिमान होतील. पण देहारहित व वासनेरहित जे सुख आहे, ते कमी जास्त असूं शकत नाही.

लहानपणा मोठेपणा सर्व वासनेमुळे आहे. दुधाकरिता आई मोठी वाटते. मूर्ख लोक पदार्थावरूनच ज्ञानांतहि कोणी आपल्यापेक्षा मोठा असेल, अशी शंका घेतात व त्यामुळे झालेल्या आत्मज्ञानावर विश्वास बसत नाही.

भाजी भाकरीपेक्षा बासुंदीने भूक जाते, असे ज्याला वाटते, तो मग दुसऱ्या अन्नासाठी हपापतो.

चांगले पुरुष ''मी वासनारहित आहे किंवा नाही'' हे पाहतात. त्याच्या पलीकडे पाहूं इच्छित नाहीत. सर्वज्ञत्व व सर्वशक्तिमत्व या सर्वांवर लाथ मारतात.

याप्रमाणे शुकांना जरी खरे तत्त्व कळले होते. तरी विश्वास बसेना असे म्हणा किंवा लोकांना सद्‌गुरूची लीला दाखविण्याकरिता म्हणा, त्यांनी आपल्याला भ्रम झाल्यासारखे केले व बापाजवळ गेले व म्हणाले :-

'' महाराज, या संसारसागरातून तरून जाण्याचा कांही उपाय आहे काय?''

तेव्हा व्यास म्हणाले ''होय, हा सर्व संसार मिथ्या आहे हा तुझ्याच संकल्पाने उत्पन्न झाला असून तुझ्याच विचाराने शेवटी याचा नाश होणार!''

तेव्हा शुकांना वाटले की, ''यांत यांनी मोठेसे काय सांगितलें ? मला तर हे पूर्वीच माहित होते.''



हे व्यासांनी जाणून त्याला म्हणाले, ''बाबा! मी काही जाणत नाही. तूं जनक राजाकडे जा, तो माझ्यापेक्षा ज्ञाता आहे. तो तुला सर्व सांगेल.''

तेव्हा शुक जनकाकडे गेले व दाराशी उभे राहिले. द्वारपालांनी जाऊन राजाकडे निरोप पोचविला व शुकाचार्य आले आहेत असे सांगितले, पण जनकाने तिकडे लक्ष दिले नाही. याचा मोह गेला आहे व यांनी खरे तत्त्व जाणले आहे, हे सर्व राजाने जाणले असे असूनहि शुकाचार्यांना चार दिवसापर्यत त्या दारापाशी तसेच उभे केले. नंतर त्यांना दुसऱ्या दरवाज्यांत आणले, व तेथेहि कांहि दिवस उभे केले. नंतर समोर आणले व विचारले की ''कसे येणे झाले?''

तेव्हा शुकांनी विचारले की, ''संसारांतून सुटण्याचा काही उपाय आहे काय?''

तेव्हा जनक म्हणाले, ''ठीक आहे'' असे म्हणून त्यांनी एक कोपरा (परात) मागविला. त्यांत अगदी काठोकांठ पाणी भरले व सर्व रस्तोरस्ती व गल्लोगल्ली नाच तमाशे उभे करून दिले व शुकाचार्यांना सांगितले की, '' हा कोपरा डोक्यावर घेऊन, एक देखील बिंदु खाली न पाडता सर्व शहरातून फिरून या.''

आणि एका मनुष्याला बोलावून त्याच्याजवळ नागवी तरवार देऊन, त्याला सांगितले की, ''तूं त्यांच्या बरोबर जा व या कोपऱ्यांतला एक पाण्याच्या थेंब जरी खाली पडला, तर त्यांना तेथेच छाटून टाक.''

त्याप्रमाणे शुकाचार्यांनी तो कोपरा डोक्यावर घेतला आणि विचार केला की, पाण्याचा थेंब जरी खाली पडला तर ज्ञान न होता व्यर्थ मरण्याची पाळी येईल. या विचारामुळे शुकाचे लक्ष कोपऱ्याकडे लागून गेले होते. ते सर्व गावभर फिरले व घरी परत आले. पण कोपऱ्यांतला एकहि थेंब खाली सांडला नाही.

राजाने शुकाचार्यांना विचारले की, ''तुम्ही रस्त्यांनी काय पाहिले? ते सांगा.''

तेव्हा शुक म्हणाले, की, ''मला कांही माहित नाही''

नंतर राजाने जेवणाचा समारंभ केला. शुकाचार्यांना सुंदर स्त्रियांकडून न्हाऊ घातले, व नंतर भोजनास बसविले. तेथे त्यांच्या डोक्यावर एक कातणीच्या सुताला बांधलेली एक कट्यार लटकत ठेविली होती. तीहि अशा रीतीने ठेविली की, थोडसे लक्ष चुकले की, ती कट्यार डोक्यावर पडून प्राण जावा. म्हणून जेवतांना देखील त्यांचे लक्ष त्या कट्यारीकडेच होते. त्यामुळे त्यांना अन्नाची रुची किंवा कांहीच समजले नाही. जनकाने मधून मधून ''अमका पदार्थ कसा झाला'' म्हणून विचारावे. त्यावर ''उत्तम झाला'' असे त्यांनी म्हणावे, पण लक्ष नसल्यामुळे

कांहीच खरे सांगता येईना.

हे पाहून जनक खूष झाले व त्यांनी शुकाचा हात धरून आंत नेले व विचारले की,'' कसे येणे झालें?''

तेव्हा शुकाचार्य म्हणाले, ''राजन्! या दुःखरूप संसारांतून सुटका कशी होईल?''

तेव्हा जनक म्हणाले, ''डोक्यावर कोपरा घेतला होता, तेव्हा थेंब कां पडला नाही? आणि डोक्यावर कट्यार बांधली होती, तेव्हा का रुचले नाही? कारण असे की, त्यावेळी आपले सर्व लक्ष कोपऱ्याकडे व कट्यारीकडे लागले होते. त्याप्रमाणे सर्व वासना आणि देह वगैरे यांच्या पलीकडे जे आहे, त्याच्याकडे लक्ष असून इकडे लक्ष नसले म्हणजे मुक्तच आहेस. तूं जे जाणलेस, तेच शास्त्राने सांगितले आहे व मीहि तेंच सांगितले. मग यापेक्षा कोणती प्रतीति पाहिजे? आत्मतत्त्वांत लहानपणा किंवा मोठेपणा मुळीच नाही. हा विचार नसल्यामुळे तुला भ्रम झाला. व्यासांचा मुलगा माझा शिष्य झाला, म्हणून मी व्यासापेक्षा श्रेष्ठ आहे व तूं जन्मापासूनच वैराग्यसंपन्न असल्यामुळे तूं मजपेक्षा श्रेष्ठ आहेस.

कृमी, कीटक इत्यादि या सर्वांच्या शरीरांतला आत्मा तूंच आहेस. या सर्वांच्या देहापासून तूं असंग आहेस, असा विचार केला पाहिजे.

रज्जुसर्प भासला व तो दिव्याच्या उजेडाने नाहीसा झाला तर बुद्धिमानाने असे म्हणावे काय? की, दिव्यांच्या उजेडाने एवढा भ्रम नाहीसा झाला तर मग सूर्याच्या प्रकाशाने किती भ्रम नाहीसा झाला असता?

आपला गुरु जरी जीव आहे व त्याच्या उपदेशाने जर भ्रम दूर होतो तर मग ईश्वर उपदेशाचीच आवश्यकता आहे, असे कांही नाही. बोध न झाला तर ईश्वर असूनहि कांही अर्थ नाही. गुरुंनी करून दिलेल्या ज्ञानाने मुक्ति होत नाही व ईश्वराने करून दिलेल्या ज्ञानाने मुक्ति होते, असे कांही नाही.

**ईशोपदिष्ट बोधात् . . . . . .**

ईश्वराच्या उपदेशानेच मुक्ति होईल. गुरु जीव असल्यामुळे त्यांच्या उपदेशाने मुक्ति होणे शक्य नाही, असे वाटणे हा एक प्रतिबंध आहे. भ्रम निवृत्त करण्याला जेवढा प्रकाश (ज्ञान) पाहिजे, तेवढा गुरुजवळहि आहे व ईश्वराजवळहि आहे. म्हणून तूं असा भ्रम धरूं नकोस.''



विश्वामित्र म्हणाले, ''रामा ! तू ज्ञातज्ञेय आहेस. जनकाच्या शब्दाने जशी शुकाला विश्रांति झाली, तशी तुला माझ्या वाक्याने किंवा वसिष्ठांच्या वाक्याने विश्रांतीची अपेक्षा आहे.''

॥ हरिः ॐ तत्सत् श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# ९. वसिष्ठांचा उपदेश

नंतर विश्वामित्र वसिष्ठाची प्रार्थना करू लागले की, महाराज ! आपण रामाला बोध करावा. त्याप्रमाणे भगवान् नारद व व्यास हेहि प्रार्थना करू लागले. ते ऐकून वसिष्ठ म्हणाले,'' बरे आहे आपल्यासारख्या महात्म्यांची आज्ञा कोण मोडील?''

नंतर वसिष्ठ म्हणाले, ''रामा! तूं जे म्हणतोस की, या दुःखरूप जगांतून मी कसा सुटेन? तर हें म्हणणे बरोबर नाही. कारण तूं जेवढे हे जगत् सत्य मानतोस, तेवढे ते सत्य नाही; म्हणून दुःखांतून सुटणे फार सुलभ आहे. जगत् नाहीसे करून टाकणे आपल्या हाती आहे. जगत् मिथ्या आहे, हे ज्ञान्याच्या व मुमुक्षूच्या उपयोगी पडते.

उदा. वाईट अन्न न खाणे हे जसे निरोगी मनुष्याला रोग उत्पन्न होऊ नये म्हणून व रोगी मनुष्याला रोग वाढूं नये म्हणून उपयोगाचे आहे, त्याप्रमाणे मुमुक्षुला वाटते की, या दुखमय संसारांतून आपल्याला सुटता येत नाही; म्हणून ते मिथ्या आहे असे दाखवून त्याला धैर्य देण्याकरिता उपयोगी आहे व सिद्धानां मिथ्या वस्तूचा नाश झाल्यावर पुनः ते उत्पन्न होतच नाही, किंबहुना मिथ्या असल्यामुळे माझ्या ठिकाणी ते केव्हाच उत्पन्न झाले नाही व त्यामुळे माझ्या स्वरूपाला त्यापासून केव्हाहि बाधा नाही, असे जाणून ते दृढ करण्याच्या उपयोगी आहे.

रामा ! एखाद्या हत्तीला जसे एका काडीचे चूर्ण करणे सोपे आहे, त्याहिपेक्षा हे जगत मिथ्या असल्यामुळे याचे चूर्ण करणे सोपे आहे.

राम म्हणाले, ''गुरुमहाराज ! आपल्या कृपेने ज्ञान होऊन मी यांतून सुटेन, असे आता पूर्णपणे मला वाटते. पण व्यासाचा मुलगा शुक हा व्यास विदेह होण्यापूर्वीच कसा विदेहमुक्त झाला? मुलाला पूर्ण ज्ञान होऊन तो बापाच्या आधी विदेहमुक्त झाला, हें आश्चर्य आहे?''

## विदेहमुक्त व जीवन्मुक्त

वसिष्ठ म्हणाले, ''रामा! विदेहमुक्त व जीवन्मुक्त यांत कांही भेद नाही. दोघेहि सारखेच मुक्त आहेत. पण फरक एवढाच की, जीवन्मुक्त म्हणजे जसे वाळलेले गवत किंवा कागद जाळला असतां जळून जातो, त्यांत कांही राहात नाही, तरी पण त्याची आकृति वगेरे तशीच राहते, त्याप्रमाणे जीवन्मुक्त हे ब्रह्मांत मिळूनहि त्यांचा देह राहतो व विदेहमुक्त म्हणजे कापूर जाळला तर त्याचे कांहीच उरत नाही, देहहि पडतो तो विदेहमुक्त म्हणावा.

जसे मुलाचे कर्म असते, तसेच कांही बापाचे राहात नाही. पुष्कळ वेळा असे होते की, एखाद्या बाईला एकच मुलगी असते, पुढे तिला संततीच होत नाही. पण तिच्या मुलीला संतती होत राहते. म्हणून असे म्हणता येईल काय? की, आईलाच संतती झाली नाही; तर या मुलीला कोठून होणार? किंवा जे तूं म्हणत होतास की, श्रुतिमाता, शुक, वामदेव यांचीच मुक्ति सांगते, दुसऱ्या कोणाची सांगत नाही, तर मग आमची मुक्ति होणार कशी? अशी शंका घेऊ नकोस. अशी शंका घेणे म्हणजे तो ज्याअर्थी वडील आहे व कृष आहे, त्यावरून मी लठ्ठ होईन कशावरून? असे म्हणण्यासारखे आहे? व्यास जरी विदेहमुक्त झाले नाहीत, तरी शुक झाले आहेत. ज्याचे त्याचे दृढ ज्ञान व प्रारब्ध ज्याच्या त्याच्या स्वाधीन आहे. व्यासांचे प्रारब्ध पुष्कळ कल्पांचे आहे. शुकांचे प्रारब्ध थोड्या दिवसांचे होते, म्हणून शुक आधी विदेहमुक्त झाले किंवा एक शुकांचा अवतार मुक्त झाला व दुसरा अवतार घेऊन त्यांनी भागवत सांगितले. असेंहि होणे शक्य आहे. तूं जे समजत होतास की, 'विदेहमुक्त म्हणजे पक्का मुक्त व जीवन्मुक्त म्हणजे कच्चा मुक्त ही चुकीची समजूत आहे'. किंवा उन्हाळ्यांत मृगजळ असते म्हणून कांही सूर्य त्याच्यामुळे भिजत नाही; किंवा हिवाळ्यांत ते नसते म्हणून सूर्य सुकलेला असतो असेहि कांही नाही.

त्याप्रमाणे मिथ्या देह असला तरी देह व आत्मा एकच आहे असे काही जीवन्मुक्ताला वाटत नसते. विदेहमुक्तीत देह नसतोच, म्हणून त्याला काही जास्त प्रत्यय असतो असेहि नाही. आत्मदृष्टीने दोघांतहि कांही भेद नाही.

पुनः तूं जे विचारलेस की, 'पित्याच्या पूर्वीच पुत्र कसा मुक्त झाला?' तर वास्तविक या जगात पुत्रादिक संबंध कोणाचाच नाही. ज्याच्या त्याच्या अज्ञानाने ज्याला त्याला देह भासतो व जो तो आपल्या ज्ञानानेच मुक्त होतो. एकाच दोरीवर एका ठिकाणी. आईने व मुलीने सर्प पाहिला व मुलीने दिवा आणून दोरी पाहिली, तर प्रथम मुलीचा सर्पभ्रम निवृत्त होईल. म्हणून ज्याच्या त्याच्या अज्ञानाने जो तो बद्ध असतो, व जो तो आपल्या ज्ञानाने मुक्त होतो. म्हणून शुक पहिले का मुक्त झाले



असा प्रश्न होत नाही. पिता, पुत्र ही भ्रांति आहे. अनंत सृष्टि आहे, अनंत सृष्टि होते व पुढे होईल. अनंत मनुष्यजन्मांत गेलेत व पुढे जातील.

कार्य-कारणत्व : एक भ्रम

पित्याच्या मागून पुत्र जन्मतो, की पुत्राच्या मागून पिता जन्मतो, हें समजत नाही. आपण भ्रमाने मोठा व लहान समजतो. कोणी म्हणेल की, ''एकापासून दुसऱ्याचा जन्म दिसतो म्हणून पिता किंवा पुत्र जाणता येतो.'' पण हे म्हणणे बरोबर नाही. कारण पुष्कळ गोष्ट याला बाधक आहेत. पुष्कळ संयोग होऊन पुत्र होत नाही. म्हणजे या ठिकाणी पुरुषसंयोग पुत्राचे कारण नाही. जे त्याचे कारण आहे, त्यापासून ते कार्य नियमाने उत्पन्न झाले पाहिजे. उदा. अग्नीने हात जळणे. पित्यापासून पुत्र हा ''कारणत्व भ्रम'' होतो.

स्वप्नांत आपण अनंत पदार्थ उत्पन्न करतो, त्यांत आईलाहि पाहतो. आपण त्या स्वप्नाचे कर्ते असतो. आपण जेव्हा तिला उत्पन्न करतो, तेव्हा ती उत्पन्न होते. पण तिचे ठिकाणी आईबुद्धि ठेवितोच. पुत्र पित्यापासून होतो म्हणावे तर ते कोणत्याहि प्रमाणाने सिद्ध नाही. कारण पहिले शाब्दप्रमाणाने म्हणजे दुसऱ्याने सांगितले म्हणून म्हणावे तर दुसऱ्याने सशाचे शिंग सांगितल्यास तेहि प्रमाण मानावे लागेल. दुसऱ्यांना मूल होतांना मी पाहतो म्हणून मीहि असाच झाला असेन, असे अनुमानहि करतां येत नाही. कारण दुसऱ्याचे जसे नियमाने होते, तसे आपलेहि नियमाने होते असे कांही नाही. कारण दुसरे जेवले म्हणजे आपण जेवलो, असे कांही होत नाही. व तसे अनुमान केलेंच, तरी ते बरोबर नाही. कारण आपल्या जन्माविषयी आपल्याला प्रत्यक्ष असे कांही नाही.

लोकांच्या सांगण्यावरून आपण आपल्या आईबापाचा निर्धार करतो. आपण आपली बहीण स्वप्नांत बाळंतीण झाली व तिला पुत्र झाला असे पाहतो. तो मुलगा व ती आई असे आपण समजतो. पण वास्तविक ते दोघेहि एकदमच उत्पन्न झाले व जागृतीत आल्यावर सर्व एकदम नाहीसे होते. म्हणून जगांत कार्यकारणभाव अगदी नाही. हे जगत् हजारो वेळ नाश पावते. व हजारो वेळ उत्पन्न होते. एकच पुरुष हजारो वेळ उत्पन्न होतो. या सृष्टिकडे सृष्टिरूपाने न पाहता आत निरखून पाहा, म्हणजे सर्व ब्रह्मरूप आहे असे वाटेल. म्हणून तूं सर्व सोडून फुकट चिंता करू नकोस.

प्रयत्नाला कोणती गोष्ट साध्य नाही असे नाही. तीनहि काली नाश नाही, तिचा नाश प्रयत्नाने होऊ शकत नाही. जी अत्यंत खोटी गोष्ट आहे, तिचा नाश होणे शक्य नाही. पण जी गोष्ट आपणच केली, ती आपल्याला मोडावयाला कोणता

प्रत्यवाय आहे?

उदा. भुलाई आपणच करतो व आपणच मोडूं शकतो. आपला संबंध जोपर्यंत एखाद्या गोष्टीशी पडत नाही तोपर्यंत त्याला दूरकरणे कठीण नाही. नातलग मानले की मग उपेक्षा करू शकत नाही.

वसिष्ठ म्हणाले, ''रामा! या संसारांतून कसें सुटता येईल, ही बुद्धि तूंच दृढ करून बसलास. या जगताची पर्वा न केली व या जगताविषयी वासना न ठेविली, तर यांतून सुटणे सुलभ आहे. या मिथ्या जगताची निवृत्ति करण्याला काय वेळ लागतो? तूं प्रयत्नाचा आश्रय कर.

॥ हरिः ॐ तत्सत् श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# १०. दैववादाचे खंडन

वसिष्ठांचें भाषण ऐकून राम म्हणाले, ''आपण सांगतां की, हें जगत् मिथ्या आहे व त्याची प्रयत्नाने निवृत्ति कर. पण जे काही येते, ते तर दैवाने येते. त्यातहि आता कृतयुग नाही, की ज्यायोगे स्वभावतः मनुष्याला सत्कर्म करावेसे वाटते. तेव्हा धर्म पूर्ण होता. आता तर द्वापार आहे. त्यामुळे धर्माचे दोन पाद क्षीण झाल्यामुळे पुष्कळ अधर्म होतो. युगामुळे माझ्याकडून प्रयत्न होईल असे वाटत नाही. पुनः **१.** जीव अल्प आहे नाकांत वेसण घातलेल्या बैलाप्रमाणे परमेश्वर जिकडे नेईल तिकडे तो जातो. **२.** दैवाचे योगाने सुखदुःख भोगतो. **३.** युगामुळे तसे करावे लागते. **४.** ईश्वर जसे करवितो तसे तो करतो. **५.** त्याची इच्छा असेल त्याला तो स्वर्गात नेईल व इच्छा नसेल त्याला तो नर्कात घालील. **६.** ज्ञानीच जर प्रारब्धाने भोग भोगतो, मग आम्ही तर अज्ञानीच आहोत, आम्हाला ते कसे चुकतील?

**पूर्वजन्मजनितं पुराविदः कर्म दैवमिति संप्रचक्षते ।**
**उद्यमेन तदुपार्जितं चिरात् . . .**

वसिष्ठ म्हणाले, रामा ! यासाठीच मी तुला या मिथ्या जगाचे ज्ञान करून दिले. या जगात नित्य पदार्थ आत्म्यावाचून कोणताच नाही. कारण ज्या पदार्थाला उत्पत्ति असते, तो अवश्य नाश पावतो, जगांतील पदार्थ तीन प्रकाराने उत्पन्न होतात.

१. **मिश्रणाने :-** उदा. भाजी ही तिखट, मीठ, पाणी, तेल वगैरे पदार्थांच्या मिश्रणाने उत्पन्न होते. यांत मिश्रण काढून टाकले की, पदार्थ नाश पावतो.



२. **विकाराने :-** उदा. दही, बीजापासून वृक्ष.

३. **अज्ञानाने :-** म्हणजे काही पदार्थ न समजून उत्पन्न होतात. उदा. रज्जुसर्प. दोरी आपल्यास समजत नाही. म्हणून त्या ठिकाणी सर्प तयार झाला. दोरी समजली की, सर्प नाश पावतो. याप्रमाणे उत्पत्तिमान पदार्थ सर्वच नाश पावतात.

आता दैव म्हणून, जें काही तूं म्हणतोस, ते अनादिसिद्ध आहे, किंवा पूर्वी केलेले म्हणजे केव्हातरी उत्पन्न झालेले कर्म आहे?

अनादि घेऊन चाललो तर त्याचे फळ होऊ नये. कारण वृक्षाला फळ कां येते? याचे कारण असे आहे की, त्यात नित्य बदल होत जातो. पहिले त्याला पानें येतात. पुढे खांद्या फुटतात व नंतर फळें येतात, वृक्ष नेहमी बदलणारा आहे. पण खांब अनादि तसाच आहे. म्हणून त्याला फळ येत नाही. बदलणाऱ्या अवस्थेंत फळ येते. नित्य वस्तु अखंड असते. म्हणून कोणालाच फळ होऊ नये.

## नित्य दोन प्रकारचे

नित्य दोन प्रकारचे असते :- (१) बदलणारे व (२) न बदलणारे. वृक्ष व बीज यांचा संबंध अनादि आहे व ही बदलणारी नित्यता आहे. याप्रमाणे तीन्ही काली ज्याचा नाश होत नाही तो एक नित्य पदार्थ व ज्याची उत्पत्ति नाही, पण नाश होतो, असा एक नित्य पदार्थ. बीजाला भाजून टाकले तर पुनः झाड होत नाही. पण पृथ्वीचा नाश यत्नाने करता येत नाही. याप्रमाणे कर्माच्या योगाने देह व देहाच्या योगाने कर्म व कर्मापासून देह याप्रमाणे हा बदलणारा नित्यपणा आहे. या ठिकाणी ब्रह्म पृथ्वीसारखे नित्य आहे. वासनेचा कोंडा आत्म्यावरून काढून टाकला की, मग हे उत्पन्न होत नाही.

वसिष्ठ म्हणाले, ''रामा! हे दैव अनादि मानले तरी प्रयत्नाने त्याचा नाश होऊ शकतो. वास्तविक दैव अनादि नाही. तूं जे पूर्वी कर्म केलेस, तेच दैव आहे. तुझ्या हाताने जे निर्माण झाले, ते तुला न मोडावयाला काय झाले? जसा कोशाचा किडा घर करून आपल्यालाच त्यात बांधून घेतो व मरतो, त्याप्रमाणे मूर्ख माणसें विषयावर आसक्ति ठेवून दैव दूर करीत नाहीत.''

**प्रश्न ३ रा :-** हें तुझे म्हणणे अगदी खोटे आहे. काळाला तर आळशी माणसें देखील हरवितात. सकाळी शौच यावयाची; तर तें आळसाने सकाळी शौचास न जाता दुपारी जातात. मग प्रयत्नाने काळ कसा हटणार नाही? कोणाला जेवणापूर्वी, तर कोणाला मध्येच, तर कोणाला जेवण झाल्यावर पाणी पिण्याची संवय असते. काळ एक अखंड आहे. संवयीला प्रतिबंधक काळ नसला तर त्याचा उपयोग काय?

मुंबईचा रस्ता सहा महिन्याचा होता, तो आगगाडीने २४ तासांचा झाला आहे. संवयीने काळ कसाहि पालटता येतो. भारतात सांगितले आहे की, राजाप्रमाणे काळ बदलतो.जो चांगला असतो तो आपल्या काळाचा व संवयीचा चांगला उपयोग करून घेतो. प्रयत्नाने काळ जिंकल्या जातो. काळाला फसविण्याची एक कथा आहे, ती तुला सांगतो.

काळाला फसविण्याची कथा

एक मनुष्य होता. तो जेवावयास बसला. त्याने कढी मागितली पण कोणी वाढली नाही. त्याची वासना कढींत राहून गेली. इतक्यांत त्याला मरण आले, तेव्हा तो दूताला म्हणाला,''तुम्ही नव्या यमाचे दूत आहांत किंवा जुन्या यमाचे दूत आहांत ?''

तेव्हा दूत म्हणाले, ''बाबा आम्हाला माहित नाही. आम्ही विचारून येतो.'' असें म्हणून ते परत यमाकडे गेले.

इतक्यांत त्याची बायको आली व कढी वाढली. दूत यमाकडे जाऊन विचारू लागले की,'' महाराज ! आम्ही आपल्या आज्ञेप्रामणे गेलो असतां त्या मनुष्याने विचारले की, तुम्ही नव्या यमाकडील आहांत की जुन्या यमाकडील आहांत? काय आपल्या जागी कोणी दुसरा यम आला आहे?''

असें दूतांचें भाषण ऐकून यमालाहि आश्चर्य वाटले व म्हणाले, 'मला तर कांही माहित नाही. पण इंद्राने दुसरा पाठविला असेल तर सांगवत नाही.'

म्हणून यम इंद्राकडे गेला व म्हणाला, ''महाराज ! आम्ही आपल्या आज्ञेप्रमाणे सृष्टीची व्यवस्था चालवित असता दुसरा यम कोणी नेमला?''

इंद्राला आश्चर्य वाटले व तो म्हणाला, ''तुझा काळ अजून झालाच नाही, तर मग दुसरा यम कसा नेमला जाईल? तरी पण सांगवत नाही, कदाचित् ब्रह्मदेवाने नेमला असेल.''

म्हणून सर्वजण ब्रह्मदेवाकडे गेले. ही गोष्ट ऐकून त्यालाहि आश्चर्य वाटले. पुढे सर्व मिळून विष्णुकडे गेले व विष्णुसहित शंकराकडे गेलेत व म्हणाले, ''महाराज ! आपण दुसरा यम पाठविला काय?''

शंकर म्हणाले, ''अरे ! तुझा काळ संपल्याशिवाय दुसरा यम कसा पाठविता येईल? हें तुला कोणी सांगितले?''

तेव्हा यमाने सर्व हकीकत सांगितली. नंतर शंकराने त्या मनुष्याला घेऊन येण्यास सांगितले. तो आल्यावर शिवाने त्याला विचारले,''काय रे ! तुला कोणी सांगितले की, नवा यम आला म्हणून?''



तेव्हा तो म्हणाला,'' मला कढी खावयाची होती. म्हणून ही तोड काढली.''

ते ऐकून शंकराने सांगितले की, ''याला घेऊन जा.''

तेव्हा तो म्हणाला, ''बरे आहे. मी मृत्युलोकी जातो व सर्व लोकांना सांगतो की, बाबांनो हरीहराची सेवा करू नका. त्यापासून काही फायदा नाही. मी प्रत्यक्ष त्यांचे दर्शन घेऊन आलो तरी माझा नर्क व मृत्युलोक टळला नाही.''

हे ऐकून विष्णु व शंकर विचार करू लागले की, ''हे बरे होणार नाही. हा सर्व धर्म मोडून टाकील. याला आपल्या पुरीतच ठेवणे चांगले होईल.'' असा विचार करून त्याला तेथेच ठेविले. याप्रमाणे त्याची यमपुरी चुकली. तात्पर्य, जो बुद्धिमान असतो तो काळाला जिंकतो.

**प्रश्न ४ था :-** आता जो तुझा चौथा प्रश्न की, ''ईश्वर कोणाला वाईट कर्मांत प्रवृत्त करतो व कोणाच्या हातून चांगली कामे करवितो,''

असे असले तर ईश्वर महामूर्ख गणला जाईल. विंचू सर्प देखील त्यांना त्रास दिल्यावाचून कोणाला तेहि त्रास देत नाहीत. मग हा तर ईश्वर आहे. जर विनाकारण तो कोणाला त्रास देईल तर विंच्वादि नीच प्राण्यांपेक्षाहि तो नीच समजल्या जाईल. म्हणून हे म्हणणे अगदी चुकीचे आहे. ईश्वराचा व जगाचा काय द्वेष? ज्याचा ज्याला द्वेष असतो तो पदार्थच उत्पन्न करणार नाही. मग जग उत्पन्न होऊ नये. ईश्वर कांही करीत नाही व करवीतहि नाही. ज्याप्रमाणे पाणी आंब्याच्या आणि कडूनिंबाच्या दोन्ही झाडांना सारखी पुष्टी देते. पण आंब्याचा गोडपणा किंवा निंबाचा कडूपणा पाण्यावर कांही अवलंबून नाही; त्याप्रमाणे प्राणीमात्रांची कर्मे सुखःदुखांस कारण असून ईश्वर पाण्यासारखा साधारण कारण आहे. वाईट असो किंवा चांगला असो, कोणाचा कसाहि प्रयत्न असला तरी त्याला तो पुष्टि देतो. व्यासहि असे म्हणतात :-

**कृतप्रयत्नापेक्षस्तु विहित-प्रतिषिद्धा वैय्यर्थ्यादिभ्यः । (ब्रह्मसूत्रे)**

तुझा **(६) वा प्रश्न** असा की, ''ज्ञानियालाच जर प्रारब्ध सुटत नाही तर आम्हाला कसे सुटेल?''

हे तुझें म्हणणेंहि बरोबर नाही. कारण आत्मा कर्ता नाही, अशी ज्ञानियाची दृढबुद्धि असल्यामुळे आत्मा कर्ता आहे, अशी बुद्धि उत्पन्न होणे शक्य नाही व अशी बुद्धि उत्पन्न करून प्रयत्न करणे संभवत नाही. कारण एकवेळ नाहीसें झालेले अज्ञान पुनः उत्पन्न होत नाही. दोरीवर भासलेला सर्प एकवेळ नाहीसा झाला म्हणजे पुनः भासत नाही. पण दुसऱ्या दोरीवर भासेल. कारण पहिल्या दोरीहून दुसरी दोरी निराळी मिळूं शकते, म्हणून! पण आत्मे कांही पुष्कळ नाहीत. आत्मा

एकच आहे. म्हणून 'अज्ञान नाही,'' असे एकवेळ समजल्यावर पुनः ते कसे उत्पन्न होईल? वृद्ध पुरुष घरात थुंकला तर त्याला कोणी काही म्हणत नाही, पण तरुणाने तसे केले की, पाठीत लाथ बसते. मुमुक्षूने प्रयत्नच करावा. दैव वगैरे काही एक मानूं नये. त्याला जिंकावे त्याकरिता परमेश्वराचें साह्य घ्यावे. कालाची उपेक्षाच करावी. वाईट वासनेकडे मन जात असले तर त्याला ओढून चांगल्या वासनेकडे लावावे. मनुष्य कर्माच्या नदींत जरी पडला आहे तरी पोहणारे जसे पाण्याहून स्वतंत्र असतात व पाण्याचा प्रवाह हातांनी बाजूस सारून त्याच्यांतून पार पडतात, व पाण्याचा प्रवाह मात्र चाललाच असतो.

त्याप्रमाणे शरीर जरी प्रारब्धाधीन असले, तरी मन व बुद्धि स्वतंत्र असतात, म्हणून शरीर जरी कांही न करू शकले तर मानसिक ध्यान वगैरे मरेपर्यंत करावे. तो प्रयत्न शास्त्राधारे करावा.

शास्त्रांत न सांगितलेला संसाराचा प्रयत्न करू नये. ज्याचे नियमाने फल होते, त्या विषयीच प्रयत्न करणे बरे. नियमाने ज्याचे फल होत नाही. त्याबद्दल प्रयत्न करू नये. संसाराचे रस्ते निरनिराळे आहेत. परमार्थाचा प्रयत्न एकच आहे; म्हणून त्याचे फल नियत आहे. तुकाराम महाराज म्हणतात -**''हा तो नोव्हे निराशेचा ठाव''** इत्यादि.

**हरिः ॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे महाराष्ट्रभाषायामाविष्कृते**
**चतुर्थं रहस्यम् । श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु । शुभं भवतु ॥**

----

**कोणता धर्म आपला समजावा ?**

जो आपण स्वीकारला नसून
'आपल्याला प्राप्त झाला आहे'
असे वाटेल तो !

*(साधुबोध ४४०)*





॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ११. प्रयत्न-चतुष्टय

## शम - विचार - संतोष - सत्संग

**हैमवत्याः पतिं देवं भगवंतं दयार्णवम् ।**
**कुलेष्टं दैवतं वंदे सर्वशोकनिवृत्तये ॥**

आज प्रयत्न कसा करावा हे सांगतो. दोन राजे होते. त्यांच्यांत होड जुंपली की, कोण लवकर किल्ला बांधतो पाहू! एकाने पुष्कळ कारागीर लाविले. दुसऱ्याला एकच कारागीर मिळाला. पहिल्याचा किल्ला लवकर संपला. दुसऱ्याला पुष्कळ दिवस लागले. त्याप्रमाणे परमार्थरूपी किल्ला बांधण्याकरिता ज्यांनी योगरूपी एकच कारागीर लाविला असतो त्याला पुष्कळ जन्म लागतात व जो पुष्कळ कारागीर लावतो त्याचा किल्ला लवकर तयार होतो.

या ठिकाणी हा परमार्थरूपी किल्ला बांधण्याकरिता चार कारागीर आहेत. १. शम, २. विचार, ३. संतोष, ४. सत्संग.

यापैकी चारीहि असले तर फारच उत्तम किंवा एक जरी असला तरी बाकीचे तीन त्या ठिकाणी सहज येतात.

### (१) शम आणि (२) विचार

* शम म्हणजे मनाला ताब्यांत ठेवणे.

* विचार म्हणजे आत्मा कोण व अनात्मा कोण हे ओळखणे.

जसे कुत्र्याला बांधून ठेवावयाचे असले तर थोडे अन्न देऊन घरांत फिरू दिल्याने होत नाही. चांगले बांधून ठेविले पाहिजे. जंगलातले हत्ती पकडतांना ज्याप्रमाणे आधी त्यांना खड्ड्यांत धरतात व नंतर कांही दिवस खावयास न देऊन मग कांही दिवसांनी बाहेर काढून त्याला खावयाला देतात. त्याप्रमाणे मनावर दया करू नये.

आपल्या विशुद्ध चक्रावर चित्ताच्या सर्व वृत्ती स्थापन कराव्या.

आपली मनोवृत्ती तीन प्रकारची आहे. इच्छाशक्ति, क्रियाशक्ति व ज्ञानशक्ति.

ज्ञानशक्ति मूळची मनाची नाही. ती आत्म्याची आहे. परंतु मातीचे व पाण्याचे तादात्म्य होऊन गारा होतो, त्याप्रमाणे आत्म्याचा व मनाचा तादात्म्याने गारा झाल्यामुळे मनांत ती शक्ति झाली आहे. ''आत्मा व मन यांचा जो गारा म्हणजे दोघांचे जे तादात्म्य त्याला जीव म्हणतात.'' *(गारा=मताचा चिखल)*

आपले तोंड त्याच ठिकाणी असते, पण आरशांत पाहिल्यावर दुसरे भासते. ते खोटेच उत्पन्न होते. त्याप्रमाणे परमेश्वर एकच आहे. पण मनांत त्याचे खोटेच रूप उत्पन्न होते. ही ज्ञानशक्ति मनात भासते. ती आत्म्याचे प्रतिबिंब आहे. — आपण लोखंड लाल होईपर्यंत तापवितो. तेव्हा त्याचे ठिकाणी उष्णपणा अग्नीचा येतो. पण आपण लोखंड ऊन आहे, असे म्हणतो. लोखंडाचा स्वभाव जरी ऊन नाही, तरी अग्नीच्या तादात्म्याने लोखंड उष्ण आहे असें आपण म्हणतो, म्हणजे अग्नीचा उष्णपणा लोखंडावर आरोपित करतो. आरोप म्हणजे भलतेच म्हणणे. उदा. आईला काकी म्हणणे यालाच अध्यास म्हणतात.

## ज्ञानशक्ति

* अग्नीची उष्णता जशी लोंखडांत भासते, तशी आत्म्याची ज्ञानशक्ति मनात भासते. याला तादात्म्याध्यास म्हणतात.

## क्रियाशक्ति व इच्छाशक्ति

* क्रियाशक्ति म्हणजे धावणे, चालणे वगैरे. येथून मन एकदम काशीस जाते. सदाशिवरावच्या येथे जाते. ही मानसिक क्रिया आहे. इच्छाशक्ति म्हणजे अमुक पाहिजे असे वाटणे. मिठाई पाहिजे असे वाटल्याबरोबर मन हलवायाच्या घरी जाते. पण वासनाशक्तीचा रोध मात्र ध्यानाने होत नाही.

दुर्वासऋषी जेव्हा द्रौपदीकडे आले व अन्न मागूं लागले, तेव्हा द्रौपदीने त्यांना स्नानास पाठविले व श्रीकृष्ण आले, तेव्हा ''माझ्या पतीवरचे हे संकट टाळ'' असे ती म्हणू लागली. श्रीकृष्ण येऊनहि वासना नष्ट झाली नाही.

वस्त्रहरणाचे वेळी, माझी लाज राख ही वासना होतीच.

देवकीची ६ बाळांची वासना नाहीशी झाली नाही. संदीपन नित्य श्रीकृष्ण ध्यान करणारे होते पण 'माझे बाळ आणून दे' असे त्यांनी श्रीकृष्णाला मागितले म्हणून ध्यानाने क्रियाशक्ति कमी झालीतरी वासना कमी झाली नाही.

ही वासनाशक्ति कोणत्याच रीतीने (कमी) क्षीण होत नाही. पण सर्व विषयाचे ठिकाणी दोष पाहिल्याने मात्र ती क्षीण होते.

क्रियाशक्ति व वासनाशक्ति कमी झाल्या की, ज्ञानशक्ति आपोआप आत्म्यांत मिळून जाते. यालाच मोक्ष म्हणतात.

क्रियाशक्ति अभ्यासाने कमी होते.

वासनाशक्ति वैराग्याने कमी होते. म्हणूनच पतंजली व श्रीकृष्ण सांगतातः-

**''अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः'' - योगसूत्रे.**

**''अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते'' - गीता ६।३५**



अभ्यास व वैराग्याच्या योगाने मन जिंकल्या जाते.

क्रियाशक्त्यात्मक मनाचा व वासनाशक्त्यात्मक मनाचा लय करणे याला **शम** म्हणतात. हा शम उत्पन्न होण्याकरिता **विचारा**चा उपयोग होतो.

ज्याप्रमाणे चंचल पाण्यात पृथ्वी स्थिर दिसत नाही, त्याप्रमाणे चंचल मनांतून आत्मा दिसत नाही. मन स्थिर झाले म्हणजे त्याहून आत्मा निराळा आहे, असे स्पष्ट दिसते. क्रियाशक्ति व वासनाशक्ति नाहीशी झाली की, देहावर यावयाला मनच राहात नसल्यामुळे आत्मा लगेच मनाहून निराळा होतो व **ज्ञानशक्ति** आत्म्यांत मिळून जाते.

## निद्रेची स्थिती

झोपेत क्रियाशक्ति बंद होते, पण वासना असते त्यामुळे झोपेत आत्म्याचे भान होत नाही. एखाद्या मनुष्याचे एकदम डोळे झाकले तर तो घाबरतो. पण पदार्थ काढून टाकले तर त्याला मी एकटा आहे असे वाटेल. झोपेंत मन थकल्यामुळे वासनाशक्ति भांबावून जाऊन आपण आपल्याला भुलतो.

## समाधि, जागृती व स्वप्न यातील स्थिती

समाधीत इतर पदार्थांचा परित्याग होवून आपण एकटेच ज्ञानस्वरूप असतो.

जागृतीत व स्वप्नात कोणत्याहि पदार्थासारखे आपण होऊन जातो.

लग्न होते तेव्हा पतिपणा असतो. मुलगा होतो तेव्हा बापासारखा वागतो व सगळे मेले की, एकटाच असतो. याप्रमाणे संसारांत आपणांस देहच मी आहे असे वाटते, **झोपेत** काही सुचत नाही - सुन्न पडतो. **समाधीत** इतर पदार्थ नाहीसे होतात व आपण मात्र आपल्यास जाणत असतो.

## (३) संतोष

संतोष म्हणजे ब्रह्मप्राप्तीचे सुख नाही; तर आपल्यास काही मिळो अथवा न मिळो, पण दुःख दूर झाले म्हणून समाधान वाटणे, याचे नाव संतोष.

**''भीक नको पण कुत्रे आवर''** चुकून औषधांत विष दिल्या गेले व ते औषध चुकून फेकल्या गेले. व नंतर समजले की, त्यांत विष होते तर वाटेल की, बरे झाले. आजचे मरण उद्यावर गेले. हाहि एक संतोषाचा भाग आहे.

ब्रह्मप्राप्तीकरिता प्रयत्न करीत असता विषयदोषदर्शनाने संसारांत सुख नाही, दुःख नाही, याप्रमाणे उदासीन राहणे याला **संतोष** म्हणतात.

## (४) सत्संग

सत्संग या सर्वांच्या पलीकडे आहे. पण सत्संगाची ओळख करणे कठीण आहे. पुष्कळ लोक सत्पुरुषाची लक्षणे निरनिराळी करतात. सत्पुरुषांत समता असली पाहिजे असे कित्येक म्हणतात, पण

कारणदृष्टीनेच समता पाहिजे, कार्यदृष्टीने नको.

कशाचीहि आशा न करणें असेंहि कित्येक संतांचें लक्षण करितात पण चातक पक्षी खडे खातात व मेघाचें पाणी पितात. मग त्यांनाहि संत म्हणावें लागेल.

कोणी म्हणतात की, संसारांत नियमाने वागणाऱ्यास संत म्हणावें. पण याप्रमाणे मनुष्य थोडे वागत असतील. पण मनुष्यापेक्षाहि कुत्रें फारच नियमाने वागतात. ते कार्तिक महिन्यानंतरच संग करितात. म्हणून त्यांनाहि संत मानावें लागेल.

याप्रमाणे वर सांगितलेलीं लक्षणें चुकतात. पण हीं लक्षणें संतांचें ठिकाणीं राहणार नाहीत असें मात्र नाही. परंतु हीं चिन्हें असलीं तरच तो संत, नाही तर नाही; असें मात्र नाही. सारांश,

### संतांचे लक्षण

विचाराने मी देहाहून निराळा झालो खरा. पण हें खरें कसें आहे, हें महावाक्याने जीवब्रह्मैक्य उपदेश करून, त्या मार्गांत येणारे अडथळे कसे दूर करावे हें समन्वयाने जाणणारा पुरुष संत म्हटला जातो.

**मीनः स्नानरतः, फणी पवनभुक्, मेषस्तु पर्णाशनो ।**
**वैराग्यः खलु चातके, प्रतिदिनं शेते बिले मूषकः ॥**
**भस्मोद्धूलन तत्परः खलु खरो, ध्यानदिरूढो बकः ।**
**सर्वे किं ननु यान्ति मोक्षपदवीं ज्ञानं प्रधानं तपः ॥१॥ कपिलगीता**

म्हणून महावाक्याचा उपदेश असून सर्व ब्रह्मरूप कसें आहे हें जो जाणतो, व शिष्याचें नाना उपधी कोणकोणते आहेत, हें जो जाणतो तोच सत्पुरुष. असे साधारणपणे (संत) ओळखण्याचें लक्षण करतां येईल.

**हरिः तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे महाराष्टभाषायामाविष्कृते**
**कथामुमुक्षुव्यवहारप्रकरणं समाप्तम् ॥**
**॥ श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥**

०००



**॥ श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥**

# १२. आकाशज-आख्यान

काल तुला तीन प्रकारचे नित्य पदार्थ सांगितलें, **१. ब्रह्म** अत्यंत नित्य आहे. त्याचा कधीच नाश होत नाही. **२. माया** ज्ञान होईपर्यंत नित्य आहे व तिसरें **३. जगत्** हें क्षणोक्षणी उत्पत्तिमान व नाशिवंत असे नित्य आहे. यापैकी ब्रह्म हे सृदिानंद स्वरूप आहे. यापैकी आज तुला दोन पदांची ओळख करून देतो. बाकी तिसऱ्या पदाची ओळख निर्वाण प्रकरणांत सांगेन.

### सत् पद

सत् म्हणजे नित्य असणें, चित् म्हणजे ज्ञान. आता उदाहरण घेऊन सांगतो, म्हणजे नीट समजेल.

ही पृथ्वी आहे, हिला दुसरी बाजू आहे किंवा नाही? इच्यासारखे दुसरे भिंत वगैरे जे पदार्थ आहेत, त्यांना दुसरी बाजू आहे. म्हणून हिलाहि असली पाहिजे. बरें, ती बाजू या बाजू सारखी चोपडी असेल किंवा कशी असेल? कशी असेल हें सांगता येत नाही. आता पृथ्वीला दुसरी बाजू आहे हें तर आपण डोळ्यांनी कांही पाहिले नाही. मग आहे असे कसे वाटते? आहे असें मात्र पक्के वाटते.

याप्रमाणे विशेष धर्म न सांगतां 'सामान्य आहेपणा' सांगणे, या सामान्य आहेपणाला सत् म्हणतात.'' या सताला शास्त्रांत **'सामान्य'** संज्ञा आहे.

* चैतन्य म्हणजे ज्ञान. जे सगळ्याला जाणते त्याला ज्ञान म्हणतात.

* आनंद म्हणजे सुख.

* याप्रमाणे सत् शब्दाचा अर्थ, चित् शब्दाचा अर्थ, व आनंद शब्दाचा अर्थ, या तिन्ही शब्दांचा अर्थ एकरूपाने असणें, याला ब्रह्म म्हणतात.

### माया : आवरण व विक्षेप

### आकाश व मन

काल तुम्हाला सांगितलेंच होते की मायेचे दोन भाग आहेत. एक आवरण व दुसरा विक्षेप.

* **आवरण** म्हणजे न समजूं देणे. व

* **विक्षेप** म्हणजे खोट्या रूपाने भासविणें.

ब्रह्माला आपण **आकाश** म्हणतो. ब्रह्माची जाणीव मायेच्या महिम्यामुळे भलत्याच रीतीने भासते त्याला **मन** म्हणतात.

ब्रह्माचें अस्तित्त्व कसें आहे म्हणून जसे सांगतां येत नाही, त्याचप्रमाणे आकाश कसे आहे हेहि सांगता येत नाही.

**''तस्माद्वा एतस्मादाकाशः संभूतः ॥''**

**''तन्मनो कुरुत ॥''**

इत्यादी श्रुति आहेत. आकाश व मन हे पहिले दोन उत्पन्न झाले व पुढे हेच अति दृढ होऊन त्यापासून पंचभूतादिक पदार्थ एकदम उत्पन्न झाले, असें म्हटलें आहे. वास्तविक सर्व एकदमच उत्पन्न झाले. उत्पन्न झाले म्हणजे त्यांचा एकदम ब्रह्माचें ठिकाणी अध्यास झाला.

तथापि केव्हा उत्पन्न झाले हें सांगता येत नाही, म्हणून ज्ञान होईपर्यंत ते अनादि आहे. समुद्रावर जसे नानाप्रकारचे तरंग उठतात व हालतात व त्या हालण्यामुळे तरंगाच्यामध्ये खळगे पडतात, त्याप्रमाणे

* निश्चल ब्रह्माचें ठिकाणी जे हालतें ते **मन**; व
* त्याच्या हालण्यांत जी जागा होते त्याला **आकाश** म्हणतात.

## ब्रह्माचा व अविद्येचा महिमा

* ब्रह्माचा महिमा एकरूप राहणे, नाश न होणे असा आहे. तसा -
* अविद्येचा स्वभाव-अनेकत्व दाखविणे वैचित्र्य दाखवावे - असा आहे.

कोणताहि पदार्थ दाखविणें जसा प्रकाशाचा स्वभाव आहे, किंवा पदार्थ न दाखविणे जसा अंधाराचा स्वभाव आहे, तसाच एकरूप राहणे, नाश न पावणे हा ब्रह्माचा महिमा असून, अनेकत्व व वैचित्र्य दाखविणे हा अविद्येचा महिमा आहे.

तूं कोण आहे? असें तुला विचारले तर 'मी रंगुबाई आहे' असे म्हणशील. 'मी हात आहे किंवा कान आहे, किंवा डोळे आहे' असें म्हणणार नाहीस. वास्तविक हात, कान, डोळे यांच्या अध्यासापेक्षा रंगुबाई या नांवाचाच अध्यास जबर झाला. - असे होण्याचे कारण कांही नसून हा अविद्येचा महिमा आहे.

*(रंगुबाईचे पती रामराव देशपांडे. हे माधानला महाराजांच्या लहानपणी शिक्षक होते. त्यांना महाराज 'आई' व 'तात' म्हणत. या उभयतांनी महाराजांच्या बालपणी त्यांना पुत्रवत् वात्सल्य व आश्रय दिला होता.)*

आकाश हालत नाही, मन हालते. ज्ञानांश हालतो, फिरतो. जड चैतन्य भेदहि यामुळेच झाला.

निश्चलपणाच जड झाला आहे. त्यांत पहिला जड पदार्थ **आकाश** आहे. निश्चलपणा जसा ब्रह्माचा आहे तसाच आहे; पण अज्ञानाने तो युक्त होऊन आकाश होतो.



ज्ञान जसेंच्या तसेंच आहे, पण तेच अज्ञानाने युक्त झाले की, मन होते. ज्यांत मन जास्त आहे ते **सजीव** व ज्यांत मन कमी असते ते **निर्जीव** समजावे.

जोपर्यंत ज्ञान होत नाही, तोपर्यंत कोणत्याहि उपायांनी वासना शमूं शकत नाही.

या मनांतहि दोन प्रकार आहेत. एक **व्यष्टिमन,** व दुसरें **समष्टिमन**. सर्व ब्रह्मांडाचे व पहिले उत्पन्न झालेले समष्टिमन असून प्रत्येक व्यक्तीचे मन व्यष्टिमन होय. पाण्याचा जसा बर्फ बनतो व तो फोडावयाचा असल्यास दगडाने फुटतो, पण त्याचेंच पुनः पाणी केले तर ते मात्र फुटत नाही. त्याप्रमाणे मनाचीच अतिशय दृढ वासना होऊन तिच्या योगाने देह झाला आहे. तो कर्मक्षयानंतर नाश पावतो, पण मन नाश पावत नाही. या ब्रह्मांडाचे जे समष्टि मन तेंच हिरण्यगर्भ किंवा ब्रह्मा आहे. (ब्रह्मदेव =सृष्टिनिर्माता)

## आकाशज-आख्यान

कोणी एक आकाशापासून उत्पन्न झाला. तो घटकाभर येथे तर घटकाभर तेथे असा भासे, व क्षणोक्षणीं शरीर बदलीत असे. एकदा काळ म्हणालाः- ''सर्व प्राणी माझ्या ताब्यांत सापडतात, पण हा अजून सापडत नाही. याचें कारण काय?''

तेव्हा यम म्हणाले, ''त्याचें आधी कर्म पहा. ज्याच्या कर्माचा क्षय होतो, त्याला तूं आणतोस. कर्म क्षय न झाला तर तूं खाऊं शकत नाहीस. अरे, याला कर्म नाही. याच्यापासून सर्व कर्मे तयार होतात. याला कोणतेंच कर्म नाही.''

या कथेचा अर्थ असा आहेः- जसें पाण्याचा बर्फ झाला तर तो फुटतो, पण पाणी फुटत नाही, तें तसेंच राहातें, तसें मनाच्या वासना दृढतेने शरीर झाल्यावर त्या शरीराचा नाश होऊं शकतो.

## स्वप्नाचे रहस्य

## प्रत्येकाचें मन समष्टि व व्यष्टि आहे.

आपले दोन देह आहेत. एक मन व दुसरा स्थूल देह. मृत्यू वगैरे धर्म देहाला आहेत, मनाला नाही.

या सर्व ब्रह्मांडाचें जें शरीर आहे, तें मनच आहे, म्हणून त्याचा नाश होत नाही. प्रत्येकाचें मन समष्टि व व्यष्टि आहे. जेव्हा आपलें मन स्वप्न निर्माण करतें, तेव्हा तें (समष्टी) मनच आहे, म्हणून त्याचा नाश होत नाही. जेवढें जगत् आहे, तेवढेंहि तें निर्माण करतें, जागृतींत आलों की, आपल्याच्याने एक नखहि निर्माण

करणें होत नाही. स्वप्न आपण आपल्या वासनेने निर्माण करतो. पण तेथे व्यवहार करूं लागलो की, मग एक खडा देखील निर्माण करणें होत नाही. उलट जागृतीप्रमाणे तेथील प्राण्यांना आपण भितो. स्वतःच्या वासनेने स्वप्न निर्माण करून भ्रांति दृढ झाल्यामुळे लगेच स्वप्नांत पुनः भौतिक देह मिळतो.

ज्यांच्या मतांत मन हें अपंचिकृत भूतापासून झालें असें आहे, त्यांना असें विचारावें की, तेथे सर्व व्यवहार सृष्टिसारखाच कसा होईल? याचें उत्तर त्यांना सांगता येत नाही.

स्वप्न अगदी जागृतीसारखेच भासतें. अविद्येच्या माहात्म्यामुळे मनच स्थूल जगरूप होतें, म्हणून आपलें मन व्यष्टि-समष्टि आहे. तरंगाप्रमाणे हें जगत क्षणोक्षणीं उत्पन्न होतें व क्षणोक्षणी नाश पावतें.

येथे हें एक लक्षांत ठेव की, क्षण म्हणजे थोडासा वेळ. थोडा वेळ व पुष्कळ वेळ हे देखील मन भ्रांतीनेच कल्पना करिते. स्वप्नांत थोडक्याशा काळांत पुष्कळ काळाची कल्पना मन करिते. आपण आपल्या हाताने दागिने करतो व आपल्या हातानेच मोडतो किंवा केव्हा केव्हा लेकराबाळाकरिता ते तसेच ठेवितो.

त्याप्रमाणे कांही गोष्टी चित्ताने स्थिर कल्पिल्या आहेत व कांही गोष्टी अस्थिर कल्पिल्या आहेत. जेव्हा हें जगत भासत असतें, तेव्हा तें आहे, व जेव्हा तें भासत नसतें तेव्हा तें नाही.

आपण स्वप्न तयार करून आपणच अज्ञानी होतो. आपणांस वाटतें की आपणच एक या सृष्टींत कर्म करून राहिलो. परंतु मीच हें स्वप्न निर्माण केलें, अशी स्मृति नसतें.

परमेश्वराने हें जगत् उत्पन्न केलें नाही. अज्ञानानेच तूंच या जगताची कल्पना केलीस. जग निर्माण करितेस त्यावेळीं तूंच भगवान ब्रह्मा आहेस व त्याची जेव्हा तुला स्मृति नसते, तेव्हा तूं जीव होतेस.

**उदाहरणार्थ** - तूं आपल्या मनांत एक भयंकर चित्र निर्माण कर. त्याला तूं भितेस की नाही? नाही भीत. कारण तुला वाटते की, ही माझी नुसती कल्पना आहे. पण हेंच स्वप्नांत दिसलें तर तूं भीशील. कारण तूंच तें निर्माण केलें खरें, पण तूं ते विसरून गेल्यामुळे भीतेस.

''हें जगत् मी निर्माण केलें, असें जोपर्यंत वाटतें, तोपर्यंत तो ईश्वर असतो'' व ही माझी नुसती कल्पना आहे, असें जोपर्यंत वाटतें, तोपर्यंत भीति नाही, पण ती कल्पना दृढ होऊन सत्य वाटली की, त्यापासून भीति होते.



जागृतीची आठवण स्वप्नांत नसते व जागृतींत स्वप्न नसतें. परस्परांचें ठायीं परस्परांचा बाध आहे.

ज्यावेळेला संकल्प होता की, मी जगत् निर्माण करीन तेव्हा तूं ब्रह्मा होतीस व तें निर्माण करून तुला तें स्मरत नाही म्हणून तूं जीव झालीस.

चित्राचा वाघ पाहून आपण भीत नाही. कारण ती नुसती कल्पना आहे असें वाटतें, पण स्वप्नांत कल्पनेने वाघ उत्पन्न करून त्याचें ठिकाणीं सत्यबुद्धि दृढ झाल्यामुळे त्याला भीतेस. मीच या मृत्यूस उत्पन्न केलें, असें वाटत होतें तोपर्यंत तुला तो खाऊं शकला नाही. पण या संसारास सत्य मानल्याबरोबर तो तुला खातो व असाच मागेहि खात आला. जगत् सत्य मानल्यामुळे मृत्यूची जशी तुला भीती आहे, तशीच शंकर, राम, कृष्ण हे जर जगत् सत्य मानतील, तर त्यांनाहि मृत्यूची भीती आहे. ब्रह्मदेव जरी आहे व तो जर स्वप्न खरें मानीत असेल, तर तो मृत्यूने बद्ध होईल. व नर्कातला किडा जरी आहे व त्याला जर जगत् सत्य वाटत नसेल, तर तो मृत्युच्या हातीं सापडत नाही.

मागे तुला तीन संवेग सांगितलें होतें. पण दोनच संवेग आहेत. एक सूक्ष्म कल्पनारूप व दुसरा स्थूल संवेग. स्वप्न वगैरे सर्व स्थूल संवेग आहेत. एका स्वप्नांतून दुसऱ्या स्वप्नांत गेला की, पहिल्याच दृष्टीने या दुसऱ्या स्वप्नाला जागृति म्हणावयाची व पहिलें मिथ्या स्वप्न आहे असें समजतो. या आकाशज आख्यानाचें तात्पर्य असेंं आहे की, स्वतः मी ब्रह्म आहे. मला मृत्यु नाही व त्यामुळे जन्महि नाही. हीच भावना तूंहि दृढ कर.

**॥ हरिःॐतत्सत् श्रीवासिष्ठतत्त्वे महाराष्टभाषायामाविष्कृते उत्पत्ति प्रकरणे आकाशजाख्यानतात्पर्ये**

**जन्ममृत्युरहितत्व निरूपणान्नाम तृतीयं रहस्यम् ॥**

**॥ श्री ज्ञानेश्वर महाराजर्पणमस्तु ॥**

०००

॥ श्री ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥

# १३. लीलेच्या पूर्व जन्मांच्या कथा

## (मंडपाख्यान)

जगत भासते तोपर्यंत ते आहे व भासत नाही तेव्हा नाही, असे काल सांगितलें. वसिष्ठ म्हणाले, रामा! मी जे तुला सांगतो त्या योगाने तूं जीवन्मुक्तिपदाला प्राप्त होशील. याचा अर्थ असा की, वेदभिन्न गुरुवाक्यांनीहि बोध होण्याला प्रत्यवाय नाही. आज तुला मंडपाख्यान सांगतो.

कालचे आख्यान ब्रह्मदेवाचे म्हणजे समष्टिजीवाचे होते. आजच्या आख्यानाचा उद्देश असा आहे की, प्रत्येक जीव समष्टि व व्यष्टि आहे.

लीलेचा पति आपली सृष्टि निर्माण करतांना ब्रह्माहि झाला व ही सृष्टि मीच निर्माण केली, अशी स्मृति नसल्यामुळे व्यष्टि जीवहि झाला.

भारतवर्षांत एका नगरीत **पद्म** नावाचा राजा होता. तो प्रजापालनांत तत्पर होता. आपल्या सुंदर स्वरूपाने दुसऱ्या स्त्रिया मोहित करीत असे. धनाच्या योगाने भिक्षुक तृप्त करीत असे. आज्ञेने सेवक ताब्यात ठेवी. बलाने शत्रूंचा पराजय करीत असे. सद्‌गुणांच्या योगाने व कुलीनपणामुळे देव, अतिथि, ब्राह्मण यांचा सत्कार करीत असे. (याची तीन जन्माची कथा आहे.)

त्याला **लीला** नांवाची सुंदर पतिव्रता स्त्री होती. ज्याप्रमाणे शरीरांत प्राण आहे, तोपर्यंत श्वासोश्वास घेण्याचे कष्ट पडत नाहीत. त्याप्रमाणे पतिव्रताधर्म आचरतांना तिला काहीच श्रम पडत नसत. म्हणूनच तिचे नाव लीला होते.

एकादा तिच्या मनात असा विचार आला की, आपल्या प्राणाहून प्रिय जो पति, तो अमर व्हावा व त्यासहित आपण सुख भोगावे, किंवा तो पूर्वी मरण पावल्यास घरांतल्या घरातच राहावा. याला कोणता उपाय करावा या विचारांत ती पडली. धार्मिक पुरुषांना आपला धर्मच अक्षय व्हावा, असे वाटत असते. ज्याप्रमाणे राजाच्या पोराला वाटते की, बाप लवकर मरावा म्हणजे आपल्यास राज्यावर लवकर बसता येईल, त्याप्रमाणे पतिव्रता स्त्रियांना वाटत नाही.

**भोगार्थ जे संबंध असतात तेथे खरा प्रेम नसतो.**

अत्यंत आवडीची वस्तु नेहमी राहावी, आपल्याकरिता तिला काही होऊ नये असे वाटते. लीला महान पतिव्रता होती. धर्म उत्तम रीतीने पालन व्हावा अशी तिची इच्छा होती. लीलेची कथा दोन वेळ आली आहे.. एक येथे उत्पत्ति प्रकरणात आहे



व दुसरी निर्वाण प्रकरणात सिद्ध राजाची कथा सांगताना आली आहे. लीलेने पुष्कळ ऋषी जमा केले व 'अजरामत्व कशाने प्राप्त होईल,' असे त्यांना विचारले. ती पुनः म्हणाली ''अजरामरत्व रसायनाने किंवा अमृताने येते, असे मी ऐकते ते कसे प्राप्त होईल?''

तेव्हा ऋषी म्हणाले, ''अजरामरत्व येणे कधीच शक्य नाही, कारण खरे अमरत्व रसायनाने किंवा अमृताने येत नाही. रसायन घेऊनहि पुनः काही कालाने शक्ति क्षीण होतेच. देव जरी अमृत घेतात, तरी एकदाच घेतल्याने त्यांना अमरत्व येत नाही. पुष्कळ वेळा घ्यावे लागते व पुष्कळ वेळ पिऊनहि अमर होतात, असे नाही. कारण कर्माने झालेले देव, त्याचे प्रारब्ध क्षीण झाले की खाली येतात. सृष्टिपालनाचे श्रमाचा परिहार करण्याकरिता व पुष्टिकरता देव अमृत पीत असतात. त्यांचे कर्म संपले की, पुनः ते मृत्युलोकी परत येतात. पुराणांत अशा कथा आहेत की, देवांचे व राक्षसांचे युद्ध होऊन पुष्कळ देव मेले, त्यांना जिवंत करण्याकरता बृहस्पतीनी आपल्या कच नांवाच्या मुलास संजीवनी मंत्र शिकविण्याकरता दैत्य गुरु शुक्राचार्यांकडे पाठविले. म्हणून देवांना देखील अति अमरत्व नाही.''

## कृष्ण कथा

कित्येकाचे मत असे आहे की, गोलोकात श्रीकृष्णाचे समोर राहून शरीर अमर होते. पण 'कृष्णजन्म खंडात' अशी कथा आहे की, श्रीकृष्ण विरजा स्त्रीचे येथे जात होते. हे जेव्हा राधेला समजले, तेव्हा तिला राग आला. पुढे श्रीकृष्ण जेव्हा राधेकडे आले, तेव्हा तिने त्यांना काढून दिले, व शाप दिला की, तुम्ही दोघे पृथ्वीवर जन्म घ्याल. तेव्हा माझ्या पित्याला व्यर्थ शाप दिलास, असे म्हणून श्रीदामाने राधेला शाप दिला की, तूंहि मृत्युलोकी जन्म घेशील. असा परस्पराने शाप दिला हे पाहून राधेला वाईट वाटले पण श्रीकृष्णाने समाधान केले की,

''एकवेळ सर्वांनाच पृथ्वीवर जन्म घ्यावयाचा आहे. उगीच वाईट वाटून देऊ नकोस.''

यावरून असे दिसते की जरी श्रीकृष्णराधा गोलोकांत रासक्रीडा करीत असतील, तरी पण त्यांना शाप-वर चुकला नाही. याचा अर्थ असा आहे की, विरजेविषयी राधेच्या मनांत सापत्नभाव होता व तो रागद्वेषाशिवाय होत नाही. राग-द्वेष आहे तेथे अविद्या आहे. तेथे बंध सुटत नाही. त्यांचें हें करणें लीलेने असेल, पण दुसऱ्याने लीला करणें म्हणजे त्याचा चुराडाच होईल.

एक राजा होता. तो उन्हाळ्यांत वाळ्याच्या तट्ट्या थंड पाण्याने भिजवून

पंख्याची हवा खात असे. बर्फ वगैरे थंड पदार्थ खात असे. सभोवतीं गार छाया करावी व नेहमी थंड उपचार करावें. तेथेच एक गरीब मनुष्य येऊन बसला. व तोहि ती थंड हवा घेऊं लागला. संध्याकाळीं राजाने थंडीचा त्रास न व्हावा म्हणून विड्यांत कस्तूरी खाल्ली व गरीब मनुष्य थंडीची बाधा होऊन मेला.

गोलोकांत राधा व श्रीकृष्ण परमेश्वरच बसतील, म्हणून त्यांना बंधनहि नसेल. पण जीवाने तेथे जाण्याची इच्छा करणें म्हणजे (बंधनच). श्रीकृष्ण तर खरे मुक्त आहेत, त्यांची ही लीला आहे. त्यांना रागद्वेषापासून काय बंधन होणार? पण जीवांचें अज्ञान कायमच राहून त्यांचा संसार बनलाच राहील.

लीलेने विचार केला की, आता कोणास विचारूं नये. बुद्धीस जसें वाटेल तसें करावें. तिला वाटलें की, एक तर आपला पति अजरामर व्हावा किंवा मेला तर घरींच रहावा.

ज्याप्रमाणे ऋषींना वेद दिसले, तसा तिलाहि मार्ग सुचला. जे पूर्वजन्मीचें पुण्यवान असतात, त्यांची बुद्धि गूढ तत्त्व शोधून काढण्यास आपोआप समर्थ होते. ज्ञानेश्वरींत तात म्हणतात,

**'कां गुरुगम्य हन ठाय । तेथ संसरेवीण जाय । बुद्धि तयाची'**६।४५९

जे योगी असतात, त्यांना पुढचे जन्मीं सर्व शास्त्रे आपोआपच येतात. गूढ तत्त्व शोधून काढण्यास त्यांची बुद्धि चांगली चालते.

लीलेने तीन दिवस उपवास व चवथे दिवशी पारणें याप्रमाणे सरस्वतीची तीनशें आराधने केलीं. तेणेकरून भगवती प्रसन्न झाली व वर मागण्यास सांगितलें. लीला म्हणाली, ''माते मला दोन वर दे. एक पति मेला तर तो माझ्या घरांतच राहावा, व दुसरा, मी जेव्हा तुझें आव्हान करीन तेव्हा तूं मला भेट द्यावी.''

''ठीक आहे.'' असें म्हणून पाण्याचे तरंग उठून पाण्यांत जसे लीन होतात, त्याप्रमाणे सरस्वती ब्रह्मांत लीन झाली. ही सरस्वती कोण्या लोकांतून आली होती. असें काही नाही. तर सत्त्वाच्या योगानेच तिचे (लीलेचे) चैतन्यच सरस्वतींच्या आकाराचें झालें.

मनुष्याचा विश्वास आपल्या पालकांवर जास्त असतो. त्याच्यांविरूद्ध एकाएकीं तें कधीहि जात नाही. मुलाला जर कृमीवर औषधी दिली असली. व साखर कृमीवर्धक आहे, ती त्याने खाल्ली असली, तर आई त्याला सांगतें की, ''साखर कडू आहे, थुंकून टाक.'' म्हणजे तें मूल लागलीच साखर थुंकून देतें. कारण आईवर त्याचा दृढ विश्वास असतो व त्यामुळे गोड साखरहि मुलाला कडू लागते.

पुढे कांही दिवसांनी पद्म राजा मेला. तेव्हा लीला अत्यंत शोक करावयाला



लागली. त्यावेळीं अशी आकाशवाणी झाली की, ''पद्मराजाचें शरीर फुलांत झाकून ठेव. पुनः तो जीवंत होईल.'' ही वाणी कोणाची आहे हें जाणण्याकरिता तिने सरस्वतीला बोलाविलें. भगवती सरस्वती आली व आव्हान करण्याचें कारण विचारलें.

लीला म्हणाली ''माझा पति घरांतच राहिला पाहिजे.''

देवी म्हणाली ''तुझा पति घरांतच आहे.'' हा वेदांतातला दृष्टिसृष्टिवाद आहे.

लीला म्हणाली, ''माते, घरांतच आहे असें, कसें म्हणतेस?''

देवी म्हणाली, ''आपण स्वप्नांत काशीस जातो. तेथे आपल्याला काशी, काशीला जाणारा मार्ग वगैरे सर्व आपल्या हृदयांतच दिसते. ते सर्व आपल्या देहांतच कल्पित असतें. खरोखर आपण स्वप्नांत काशीस वगैरे जात नाहीः तर त्याप्रमाणे आपल्या या हृदयांतच वासनेच्या सहाय्याने सर्व ब्रह्मांड निर्माण होतें''

कांही वेदांती म्हणतात की, या पुरुषाला देवता येऊन त्याचें लिंग शरीर बाहेर काढून लोकान्तराला घेऊन जातात व तेथे भोग भोगवितात. - हें म्हणणें बरोबर नाही. एका स्वप्नांतून दुसऱ्या स्वप्नांत जातांना, जसें एका घरांतून दुसऱ्या घरांत जावें लागत नाहीं, त्याप्रमाणे मेलेला मनुष्य आपल्याच ठिकाणीं सर्व ब्रह्मांड निर्माण करतो. आत्मा व्यापक आहे. त्याला इकडे तिकडे नेतां येत नाही. तो सर्वत्र सारखा असल्यामुळे त्याला लोकांतरगमन संभवत नाही. प्राणी जेथे मरतो तेथेच दुसरी सृष्टि तयार करितो.

कोणी म्हणतील की, एका घटांतलें पाणी जसें दुसऱ्या घटांत टाकलें असतां त्याच्यातलें प्रतिबिंब जसें दुसऱ्या घटांत जाते, त्याप्रमाणे लिंग देहांत पडलेलें आत्म्याचें प्रतिबिंब जो जीव, तोच स्वर्गांत किंवा नर्कांत गमन करतो.

- पण हें म्हणणें बरोबर नाही. कारण प्रतिबिंब उपाधि अनुसार असते. व कोठे कोठे प्रतिबिंब उपाधीपेक्षा मोठेंहि असतें - पाण्यातलें आकाश त्या उपाधिपेक्षा पुष्कळ मोठें असतें. जीव या लोकांतून त्या लोकांत जातो, तेव्हा तो उपाधिबरोबर जातो, किंवा नुसता तोच जातो? ब्रह्म व्यापक असल्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकत नाही. उपाधी जात असल्यास एका ठिकाणची दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकत नाही. एका ठिकाणची उपाधी सुटून दुसऱ्या ठिकाणी लागते व प्रयत्न न करितां आपोआप बद्धब्रह्म मुक्त होऊन शुद्धब्रह्म बद्ध होईल.

– ही दोष परंपरा टाळण्याकरिता ''जो मनुष्य जेथे मरतो, तेथेच सृष्टि निर्माण करतो'' हे मानणे चांगले. तुझ्या पद्मराजाचे राज्य तुझ्या घराच्या एका

कोपऱ्यात आहे. मनुष्य मेला की, सर्व तेथेच निर्माण करितो. कोठे जात नाही. सावध राहात नसल्यामुळे वासनेच्या योगाने जीव होतो.

देवी म्हणाली, ''लीले ! जोपर्यंत हे जगत तूं सत्य पाहशील, तोपर्यत तुला या जगात पतीचे राज्य किंवा काहीच स्वतंत्र असे दिसणार नाही. पण जेव्हा तूं सर्व जगत् कल्पनामय आहे असे मानून आपल्या सर्व वृत्तींचा रोध करशील व सर्व ठिकाणी आत्माच ओतप्रोत भरलेला आहे असे ध्यान करशील, तेव्हा साक्षीरूपाने जगाचे ज्ञान होईल.''

इतके बोलून देवी अंतर्धान पावली. पुढे लीलेने सर्व भोगापासून आपले मन काढून त्या परमात्म्याकडे कसे लावले व त्यामुळे योग कसा साधला, हे सांगेन.

**॥ हरिः ॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥**

००००

**॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# १४. भूताकाश, चित्ताकाश व चिदाकाश

सरस्वती म्हणाली :- लीले ! आकाश तीन प्रकारचे आहे. आकाश म्हणजे देश/जागा. **भूताकाश, चित्ताकाश व चिदाकाश.**

**चिदाकाश** म्हणजे ब्रह्म. ते सर्वदा अलिप्त आहे. त्याचे ठिकाणी जगाचा केव्हाहि संस्पर्श होत नाही. ज्याप्रमाणे मृगजलाचा सूर्याचे ठिकाणी केव्हाहि संस्पर्श होत नाही, त्याप्रमाणे ब्रह्माला जगाचा किंवा मायेचा संस्पर्श केव्हाही झालेला नाही.

देवी म्हणाली, ज्या अधिष्ठानावर जे कार्य भासते, त्याला त्याचा संस्पर्श कधीहि होत नाही. जसे :- रज्जूवर सर्प भासला, तरी त्याचा संस्पर्श त्याला होत नाही. कारण, रज्जूवर सर्प मुळी उत्पन्नच होत नाही. मग त्याचा संस्पर्श रज्जूला कसा होणार? शिवगीतेत रामाने शिवाची स्तुति करतानां म्हटले आहे कीः-

**रज्जौ भुजंगो भयदो यथैव । न जायते नास्ति न चेति नाशम् ॥**
**त्वन्मायया केवलमात्तरूपम् । तथैव विश्वं त्वयि निलकंठ ॥ शिवगीता**

राम म्हणतात, हे नीलकंठ ! आपल्या ठिकाणी जे हे जगत् भासते, ते रज्जूच्या ठिकाणी सर्प कधीहि उत्पन्न होत नसून तो भ्रमाने भासतो तसे. कारण रज्जूच्या ठिकाणी सर्प उत्पन्न झाला असता तर तो प्रथम लहान व नंतर मोठा असा दिसला असता, व त्याचे आईबाप दिसले असते. तसे दिसत नाही. या ठिकाणी वेदांतात 'ख्यातिवाद' आहे, तो सांगतो.



## ख्यातिवाद

या ख्यातिवादाविषयी प्रत्येकाचे मत निरनिराळे आहे.

**बौद्ध** म्हणतात :- आपणाला जो सर्प दिसतो, तो रज्जु नसूनच दिसतो —पण तसे होत नाही. कारण रज्जु नसून जर सर्प दिसावा, तर मग मनुष्य कां दिसू नये? सर्पच कां दिसावा? म्हणून त्याचे हे म्हणणे बरोबर नाही. त्याप्रमाणेच रज्जूच्या ज्ञानाने सर्पाचा नाश होतो, असेहि ते म्हणतात. पण या ठिकाणी सर्पाचा तसा नाशहि होत नाही. कारण तसे असते तर सर्पाचे प्रेत दिसले असते. ते दिसत नाही. म्हणून तसा सर्पाचा नाशहि होत नाही. याविषयी निरनिराळ्या मतांच्या लोकांचे निरनिराळे वाद आहेत.

बौद्ध म्हणतातः- सर्प खोटा उत्पन्न होतो. म्हणजे सर्प नसतोच व रज्जूहि नसते. रज्जू नसूनच सर्प भासतो. पण हे म्हणणे बरोबर नाही – असे आहे तर शशश्रृंग, आकाशपुष्प हेहि भासावेत. ते तर भासत नाही.

**योगाचार बौद्ध** - दुसरे योगाचार नांवाचे बौद्ध आहेत, ते म्हणतात की, बुद्धिस्थ सर्पच बाहेर भासतो. – हेंहि म्हणणे बरोबर नाही. कारण बुद्धिस्थ सर्प असतो त्याचे ज्ञान होत नाही. तो एकदमच दिसतो व त्याचा नाश होतांनाहि बुद्धीत दिसत नाही, म्हणून त्याचेहि म्हणणे बरोबर नाही.

**न्यायमतवादी** म्हणतात की, पूर्वी कोठे तरी दूरच्या ठिकाणी वारूळांत सर्प पाहिलेला असतो. तोच सर्प दोरीवर दिसतो. ते प्रत्यक्षाचा अलौकिक संबंध मानतात. जातिसंस्काराने ज्ञान होते बिलादिस्थानी पाहिलेला जो खरा सर्प आहे त्याचा आपल्या डोळ्यांशी अलौकिक संबंध असल्यामुळे तो तेथील सर्पच रज्जूवर दिसतो. – त्यांचे हे म्हणणे बरोबर नाही. कारण जेवढी लांब दोरी असते, तेवढाच मंदांधःकारामध्ये सर्प दिसतो. पूर्वी बिळांतला पाहिलेलाच सर्प जर दोरीवर दिसतो, तर तो अर्ध्या दोरीवर दिसावा, व बाकीची अर्धी दोरी रिकामी दिसावी. तसे तर दिसत नाही. म्हणून खरा सर्प दोरीवर दिसतो, हे नैय्यायिकांचे म्हणणे बरोबर नाही.

**सांख्यवादी** म्हणतात की, आपण पूर्वी पाहिलेल्या खऱ्या सर्पाची आपणास आठवण होते व दोरी समोर असते, आणि ते दोन्ही एकत्र होत असतात; पण आपणास समजत नाही. – त्यांचे हे म्हणणे बरोबर नाही. कारण पूर्वी पाहिलेल्या सर्पाची आठवण होते, असे दिसत नाही. आपण एकदमच सर्प पाहतो. म्हणून पूर्वी पाहिलेला सर्प आपण पाहतो. असे म्हणता येत नाही. जसे भिंत पूर्वी पाहिली होती, तीच आता आपण पाहात आहो, अशी आठवण होत नाही. म्हणून सांख्यांचेहि

म्हणणे बरोबर नाही.

**वेदांती** म्हणतात की, अंतःकरणस्थ जो भ्रम आहे तोच दोरीचे ठिकाणी सर्परूपाने दिसतो व आपणास आपल्या अंतःकरणात समजते. दोन्ही एकाच अविद्येचे परिणाम आहेत व रज्जूच्या ज्ञानाने त्याची निवृत्ति होते. असे वेदांती म्हणतात. परंतु सर्पाचा नाश होतो तरी त्याचें प्रेत सापडत नाही. म्हणून दोरीवर सर्प उत्पन्न केव्हा झाला, हेंहि ठाऊक नाही. तो (=सर्प) दोरीच्या अज्ञानाने भासतो व दोरीच्या ज्ञानाने त्याची निवृत्ति होते. (हा ख्यातिवाद महाराजांनी घेऊ नये असे सांगितले)

## समष्टिमन म्हणजे चित्ताकाश

चिदाकाश सर्वदा अलिप्त असते. त्याचे ठिकाणी जगताचा कोणत्याहि प्रकाराने संसर्ग होत नाही. परंतु त्याचे ठिकाणी मायेने कल्पिलेले चित्ताकाश आहे. सगळ्याचे मन (=समष्टि मन) म्हणजे चित्ताकाश. त्या चित्ताकाशाचे ठिकाणी सर्व जगत् भासते. आपण पुष्कळ कामे करतो. पण सगळ्या कामाची आठवण येत नाही. आपण जे काम करीत आहो त्याचीच आठवण येते. दुसऱ्याची येत नाही.

देवी म्हणाली, ''लीले ! भूताकाश त्याप्रमाणे आहे, असे तूं समज.'' देवी म्हणाली, ''लीले ! मी देह आहे व हे दृश्य जगत सत्य आहे, अशी दृढ बुद्धि झाल्यामुळे तू गुंतून पडली आहेस. तुला मागचे पुढेच काही एक अनुसंधान नाही म्हणून तूं देहाची ममता सोड.'' (म्हणजे मी देह आहे, ही भावना सोड.)

एखादा गरीब मनुष्य मोठ्या हुद्याच्या कामावर गेला म्हणजे तो आपल्या गरीब मित्रांना व गरीबीला विसरतो, त्याप्रमाणे जीव हा मी देह आहे, अशी त्याची दृढ भावना झाल्यामुळे आपणा स्वतःला विसरला आहे. लीलेला पूर्ण ज्ञान करून देण्याचा देवीचा उद्देश होता. परंतु तिची वासना पतीत गुंतून राहिली असल्यामुळे देवीने तिला प्रथम चित्ताकाशाचे ज्ञान सांगितले. वासना अडकली असली म्हणजे शुद्ध ब्रह्माचे ज्ञान होत नाही. ''मला देव दिसावा, मी देवाजवळ राहावे, मी सुखांत राहावे'' इत्यादि निरनिराळ्या वासना दृढ राहत असल्यामुळे तदनुसार फळे मिळावीत, म्हणून परमेश्वराने वैकुंठ कैलासादिक लोक निर्माण केले आहेत. कारण आपल्या वासनेनुसार ईश्वर फल देत असतो.

देवी म्हणाली, ''लीले ! तूं आपल्या देहाचा अभिमान सोड, व साक्षी (=स्वतंत्र) होऊन राहा. पिंजऱ्यातील पक्षी (=राघो) पिंजऱ्याच्या बाहेर निघाला म्हणजे जसा तो वाटेल तिकडे या झाडावरून त्या झाडावर स्वैर उडतो, त्याप्रमाणे किंवा तळ्याच्या चारहि भिंती पाडल्या म्हणजे तळ्यातले पाणी जसे चोहोकडे



फैलते, त्याप्रमाणे देहाकडेच लागलेले चित्त देहाभिमान सोडला म्हणजे, ते बाहेर निघून चोहोंकडे फैलते व अनंत ब्रह्मांडाला व्यापून टाकते.''

असे सांगून देवी म्हणाली,''लीले ! तुझा पति कोठे आहे याचा तुला शोध करावयाचा असेल तर तूं या शरीरापासून वेगळी हो.''

असें सांगून ज्याप्रमाणे समुद्रात तरंग लीन होतात किंवा ज्याप्रमाणे कातीन (कातरणी=कोळी) आपल्याच शरीरांतून तंतू काढून घर करिते व आपल्याला त्यांत अडकवून घेतें, किंवा ज्याप्रमाणे आत्म्याला न जाणून मूर्ख मनुष्य मी निराळा आहे, असें कल्पितात व मी शरीर आहे असें समजून आत्म्याला त्यांत अडकवून घेतात, किंवा ज्याप्रमाणे उपासकाच्या अंतःकरणातून त्याची उपास्य देवता आविर्भूत होऊन त्याला दर्शन देते, व नंतर ती त्याच्या अंतकरणांतच लीन होते, त्याप्रमाणे देवी त्या ठिकाणीच अंतर्धान पावली.

नंतर आसनावर बसून लीलेने आपले मन आकर्षण केले आणि माझ्या पतीचा सर्ग जेथे असेल तेथे देवीच्या वरानी मी जाऊन पोहचावे असा तिने दृढ संकल्प केला. निश्चयाप्रमाणे फळ मिळते. भूक, तहान, निद्रा, ममता वगैरे सर्व व्यवहार काढून टाकून मला पतीकडे जावयाचे आहे, हा एकच संकल्प तिने दृढ केला. तुझा आत्मा चित्ताकाशरूप आहे, असे देवीने तिला सांगितले होते. म्हणून तेथे थोडेसे अज्ञान होतेच, कारण पतीच्या ठिकाणी तिची वासना अडकली होती, हे तिच्या ठिकाणी अज्ञान होते. पतीच दैवत आहे, असा पतिव्रतेचा धर्म आहे. आत्म्याचे ठिकाणी मात्र हा धर्म लागू पडत नाही. कारण चांगलेपणा किंवा वाईटपणा हे दोन्हीहि मिथ्या आहेत. अधर्म खरा असला तरच धर्माची गरज आहे. याविषयी स्मृति अशी सांगते की,

**त्यज धर्ममधर्मं च उभौ सत्यानृते त्यज ।**
**उभे सत्यानृते त्यक्त्वा येन त्यजसि तत्त्यज ॥**

आईबाप, पतिपत्नी, बहीणभाऊ इत्यादि कल्पना अज्ञानानेच कल्पिलेल्या आहेत. लीला पतिव्रता होती. पतिव्रतेने पतिसंबंधी वासना ठेवणे, हे जरी अधर्मापेक्षा उच्च आहे, तरी पण अध्यात्मज्ञानापेक्षा काही उच्च नाही. पति पहावा अशी लीलेची इच्छा असल्यामुळे तिच्या ठिकाणी अर्धे ज्ञान व अर्धे अज्ञान होते.

आपला पति ज्याठिकाणी असेल त्याठिकाणी मी जाऊन पोहचावे असा दृढ संकल्प करून तिने आपले मन आकर्षण केले व निद्रावश मनुष्य ज्याप्रमाणे स्वप्नांत जातो, त्याप्रमाणे एकदम योगबलाने ज्या ठिकाणी तिचा पति होता तेथे ती गेली आणि पूर्वी जसे तिच्या पतीचे नगर होते तसे नगर तिने पाहिले. त्या नगरांत एका

भव्य वाड्यात तिने एक सिंहासन पाहिले. त्या नगराच्या पूर्व, पश्चिम व उत्तर द्वारात तिने पुष्कळ लोक पाहिले व दक्षिणद्वारी पुष्कळ स्त्रिया पाहिल्या. त्यांत तिने आपल्या सारखी लीलाहि पाहिली व तिला फारच आश्चर्य वाटले. तिने पद्मराजालाहि पाहिले. तो तरुण दिसत होता. लीला सर्वांना पाहात होती. पण तिला मात्र कोणीहि पाहिले नाही. नंतर ती आपल्या पूर्वीच्या ब्रह्मांडांत तिच्या नवऱ्याचे प्रेत ज्या ठिकाणी फुलांत झांकून ठेविले होते, तेथे आली. तिने देवीचे स्मरण केले. देवी आली.

लीला म्हणाली, ''अंबे ! स्वप्नाप्रमाणे किंवा प्रतिमेप्रमाणे ती सृष्टि या सृष्टीची जणू काय हुबेहुब प्रतिमाच की काय? अशी कशी दिसली?

देवी म्हणाली :- लीले ! हे सगळे सर्ग अशाचप्रमाणे उत्पन्न झाले आहेत. ही सृष्टीहि तशीच उत्पन्न झाली आहे. कारण ज्याप्रमाणे आपल्यास एका स्वप्नात दुसरे स्वप्न दिसते, दुसऱ्यात तिसरे, तिसऱ्यात चौथे दिसते, त्याप्रमाणे सृष्टि उत्पन्न होते. कारण त्याला सत्य आधार नसतो (=नाही).

ज्या अवस्थेत मनुष्य असतो, त्या अवस्थेलाच तो सत्य मानीत असतो.

बालपणी मुलाला खेळ सत्य वाटत असतात, तरुणपणी स्त्री वगैरे भोगाचे पदार्थ सत्य वाटत असतात. म्हातारपणी म्हातारपणांतल्या गोष्टीच खऱ्या वाटत असतात. स्वप्नांत स्वप्नातल्या गोष्टी, जागृतीत जागृतीतल्या गोष्टी खऱ्या वाटत असतात. याप्रमाणे वासनेनुसार ज्या अवस्थेत मनुष्य असतो, त्या अवस्थेतील गोष्टीच त्याला खऱ्या वाटत असतात. म्हणून ''अमुक गोष्ट सत्य आहे व अमुक गोष्ट सत्य नाही, याचा निर्णय करता येत नाही'' कारण जागृतीत जागृतावस्था व त्यांतील पदार्थ सत्य वाटतात व स्वप्नांत स्वप्न व त्यातले पदार्थ सत्य वाटतात. किंवा जागृति व स्वप्न या दोहोत भेद वाटत नाही. कारण जो पदार्थ पुढे येतो, त्यावर आपली प्रीति किंवा द्वेष असला तर तो खराच वाटतो.

जसें - एखाद्या मनुष्याला काटा रुतला असता, मला सर्प चावला अशी त्याची दृढ भावना झाली तर सापाच्या लहरी येऊ लागतात. मग खऱ्या सर्प=दंशाची गोष्ट तर निराळीच आहे. कारण स्वतःच्या वासनेवरच पदार्थाचा खरेपणा किंवा खोटेपणा अवलंबून आहे. आपल्या वासनेनुसारच सृष्टि खरी आहे किंवा खोटी आहे असे वाटते.''

देवी म्हणाली :- लीले ! पतीची सृष्टि पाहून तुला आश्चर्य वाटले, पण तसे होण्याचे कांही कारण नाही. कारण तुझीहि सृष्टि तशीच आहे. हे सर्व जगत् स्वप्नाप्रमाणे मिथ्या असल्यामुळे त्याविषयी तूं राग-द्वेष धरू नको.''

जसे - आपण चित्रांतील वाघ पाहतो पण त्याचा द्वेष करीत नाही; कारण



तो खोटा आहे असे आपण समजतो. लहान मुलगी बाहुलीवर प्रेम करते, कारण तिला ती खरी वाटते. याप्रमाणे तुझी ही सृष्टि आहे. अशाच अनंत सृष्टि आहेत. पण त्यातील पदार्थावर राग-द्वेष करू नये.

लीला म्हणाली :- आई ! माझी सृष्टि स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे, असे तूं कशावरून म्हणतेस? त्यावर देवीने लीलेच्या पूर्वजन्माची कथा सांगण्यास प्रारंभ केला. ते पुढे सांगेन.

**॥ हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥**

# १५. भ्रम परंपरा

भगवती म्हणाली, ''लीले! तुझ्या नवऱ्याच्या पूर्व जन्माची कथा सांगते, ती ऐक. पूर्वजन्मीच्या वासनेच्या योगाने, जशी तुझी सृष्टि भ्रमरूप झाली आहे, त्याप्रमाणेच तुझ्या या जन्माच्या संचित वासनेमुळे तुला समाधीत दिसलेली तुझ्या नवऱ्याची सृष्टि भ्रमरूपच उत्पन्न झाली आहे.''

भ्रम म्हणजे अन्यथाभास. जसे रज्जुवर सर्प दिसणे, हा भ्रम केव्हा उत्पन्न झाला व कोणी उत्पन्न केला, असा पुष्कळांना प्रश्न उत्पन्न झाला व कोणी उत्पन्न केला, असा पुष्कळांना प्रश्न उत्पन्न होतो.

सिद्धांत असा आहे की, भ्रम हा कधी उत्पन्नच झाला नाही व कोणी उत्पन्न केलाहि नाही, पण त्याचा नाश मात्र ज्ञानाने होतो.

लीला म्हणाली, ''माते! भ्रम मुळीच उत्पन्न झाला नाही, असे तूं म्हणतेस, मग त्याचा नाश कसा होतो?''

भगवती म्हणाली, 'लीले! भ्रम उत्पन्न झाला नाही ही गोष्ट अगदी खरी आहे, तरीपण तो दिसतो. तो अनुभवसिद्ध आहे. त्यामुळे त्याचा नाश होतो.''

जसे तूं जेव्हा मास्तरीण होतीस तेव्हा तूं आपल्याला 'मी मास्तरीण आहे' असे समजत होतीस. आता तसे समजत नाहीस. तेव्हा तुझ्यात कांही विशेष फरक झाला होता असे नाही. तर 'मी मास्तरीण आहे' असे समजणे व न समजणे हे दोन्ही तुझ्या मनानेच घेतले होते, त्याप्रमाणे भ्रम जरी उत्पन्न झाला नाही, तरी तो अनुभवसिद्ध आहे.

भ्रमाविषयी असा सिद्धांत आहे की, ''पूर्वीच्या भ्रमापासून पुढचा भ्रम उत्पन्न होत असतो, पण मागचा भ्रम कोणी उत्पन्न केला हे सांगता येत नाही.'' बीज-

वृक्षाप्रमाणे भ्रमाची परंपरा अनादि आहे. बीजावांचून झाड होत नाही व झाडावांचून बीज होत नाही. आपण जर कोवळेपणीच झाड कापले तर त्याला बीज येत नाही व बीज नसल्यामुळे पुढे झाडहि होत नाही. त्याप्रमाणे ज्ञानाने भ्रमाचा नाश होतो आणि पुढे तो उत्पन्नहि होत नाही.

## भ्रमाची उत्पत्ति नसते

बरें, भ्रमाची जर उत्पत्ति मानली तर ती कशापासून मानावयाची? ब्रह्मापासून मानावी लागेल. कारण भ्रमाची उत्पत्ति दुसऱ्या पदार्थापासून मानली तर एक ब्रह्म व दुसरा तो पदार्थ असे द्वैत होईल.

बरे, ब्रह्मापासून भ्रम उत्पन्न झाला असे मानले तर एकवेळ जीवाच्या भ्रमाचा नाश झाला तर तो पुनः उत्पन्न होईल व मुक्तांनाहि बद्धताप्रसंग प्राप्त होईल. भ्रमाची उत्पत्ति मानल्यास वरील दोष येतात. म्हणून भ्रम हा कोणी कधीच उत्पन्न केला नसून तो अनुभवसिद्ध आहे.

त्याचा नाश ब्रह्मज्ञानाने मात्र होतो. जगत् हे भ्रमाचे कार्य आहे, म्हणून ज्ञान झाल्याबरोबर जागाचाहि नाश होतो.

## अज्ञान : आवरण व विक्षेप

भ्रमाचे कार्य दोन प्रकारचे आहे. एक तर १. खऱ्या वस्तूला झाकून टाकणे व त्या ठिकाणी २. खोटी वस्तु प्रकट करणे. जसे रज्जुवर सर्प भासतो त्यात भ्रमाचे दोन प्रकारचे कार्य होते. पहिले दोरी झाकून टाकणे व दुसरे त्या ठिकाणी सर्प ही खोटी वस्तु उत्पन्न होणे. वस्तु झांकून टाकणे याला **आवरण** म्हणतात, आणि खोटी वस्तू प्रकट होणे याला **विक्षेप** म्हणतात.

ज्ञानाच्या योगाने प्रथम आवरण दूर होते म्हणजे ज्ञानाने खरी वस्तु कळावयास लागते. प्रारब्ध कर्म आहे तोपर्यंत विक्षेप कायम राहतो. जसे मनुष्य स्वप्नांत वाघाला भिऊन ओरडतो व त्याच्या आंगाला घाम येतो. त्याला दुसऱ्याने हाक मारली तर स्वप्न निघून जाऊन, तो जागा होतो. परंतु घाम पुढे कांही वेळाने आपोआप निघून जातो. त्याप्रमाणे ज्ञानाने आवरणरूप अविद्या दूर होते.

जगत् ही विक्षेपरूप अविद्या आहे. हा विक्षेप ज्ञान्याला व अज्ञान्याला दोघांनाहि राहतो. ज्ञानाची आवरणरूप अविद्या ज्ञानाने दूर होते व त्याचे प्रारब्ध=कर्म संपल्यावर त्याची विक्षेपरूप अविद्याहि आपोआप दूर होते. प्रारब्ध=भोग संपला म्हणजे त्याचे शरीर पडते व तो विदेहमुक्त होतो. त्याप्रमाणे ज्ञानी जीवन्मुक्तहि होतो.

''मला ब्रह्म कळत नाही'' अशा अविद्येपासूनच सर्व वासना वगैरे उत्पन्न



होतात. ब्रह्मज्ञान झाल्यावर जगत् मिथ्या व दुःखरूप आहे असे समजल्यामुळे सर्व वासना नाश पावतात व प्रारब्धभोगाचाहि क्षय होतो.

देवी म्हणाली, ''लीले ! तुझ्या पूर्वीच्या वासनेमुळे हे भ्रमरूप जगत् तयार झाले असून आताच्या वासनेमुळे हे समाधीत दिसलेले तुझ्या पतीचे भ्रमरूप जगत् तयार झाले आहे.''

देवी म्हणाली, ''मुली ! आता तुला कथा सांगते.''

॥ हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

०००

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥**

# १६. सृष्टीची उत्पत्ती कशी होते ?

पति मरण पावल्यामुळे लीला शोकसंपन्न होऊन तिला देवीच्या वराची आठवण झाली. तिने देवीचे स्मरण केले. सरस्वतीने तिला असे सांगितले होते की, ''तुझ्या पूर्वी तुझा पति मरण पावल्यास तो तुझ्या घरांतच राहील. त्याचे शव तूं पुष्पांत झाकून ठेव.''

तिने पुनः देवीचे स्मरण कले, देवी आली. तिला आसन देऊन समोर उभी राहून लीला म्हणाली, ''माते! तूं सांगितले होते की, पति घरातच राहील. तर मग तो मला कां दिसत नाही?''

देवी म्हणाली, ''लीले ! तुझा पति तुझ्या घरातच आहे.''

लीला म्हणाली, ''तर मग मला कां दिसत नाही?''

देवी म्हणाली, ''याचे कारण तुझा पति दूर गेल्यामुळे दिसत नाही, असे नाही. कारण फार जवळची व फार दूरची वस्तू दिसत नाही, हा नियम आहे. तुझा पति तुझ्या फारच जवळ असल्यामुळे तो तुला दिसत नाही.''

लीला म्हणाली, ''जवळ आहे तर कां दिसत नाही?

देवी म्हणाली, ''डोळ्यांतील काजळ किंवा कपाळावरील कुंकू फारच जवळ आहे, पण ते दिसत नाही. ते आरशाने पाहावे लागते. त्याप्रमाणे तुझा पति तुझ्या फारच जवळ असल्यामुळे त्याला पाहावयाला समाधीरूपी आरसा तयार केला पाहिजे, म्हणजे पति दिसेल. समाधीरूपी आरसा कसा तयार करावयाचा हे आता तुला सांगते.

या जगात तीन प्रकारचे पदार्थ आहेत.

**दृश्य, अविद्या आणि ब्रह्म.**

यालाच कोणी **देह, मन व आत्मा** असे म्हणतात.

जोपर्यंत हे दृश्य जगत् तुला सत्य वाटते, तोपर्यंत तुझा पति तुला दिसणार नाही, कारण आपल्या मनाचा असा स्वभाव आहे की, एकीकडे मन लागले असले तर दुसरीकडील वस्तु दिसत नाही. (समजत नाही.) तूं यावेळेस माझे निरूपण एकाग्र मनाने ऐकत आहेस म्हणून तुला बाहेर कोण आले आहे, काय बोलत आहे, हे तुला समजणे शक्य नाही.''

देवी म्हणाली, ''तुझे मन जगाकडे आहे, म्हणून यावेळी दुसऱ्या जगातले तुला काहीच समजत नाही. याकरिता तूं आपले मन देहाहून वेगळे कर आणि ''तुझ्यासुद्धा हे जगत् मिथ्या असून सर्व ठिकाणी परमात्माच ओतप्रोत भरला आहे अशी भावना कर.'' माझ्या वराने तुला अशी सहज भावना करता येईल. काहीएक कठीण पडणार नाही.

वसिष्ठ म्हणाले,''रामा ! याप्रमाणे लीलेला सांगून देवी तेथेच अंतर्धान पावली. परमेश्वराचे स्थान सर्वाच्या हृदयांतच आहे.''

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥ गीता.१८।६१**

परमात्मा सर्वांच्या हृदयातच वास करितो. देवी अंतर्धान पावली तेव्हा ती तेथेच गुप्त झाली व लीलेच्याहि हृदयात होती. आई जशी लेकराचा हात धरते व त्या आधाराने लेकरू चालू लागते, त्याप्रमाणे लीला सहज निर्विकल्प समाधीत जाऊ लागली.

## समाधी : सविकल्प व निर्विकल्प

समाधि म्हणजे ध्यान करणारा व ध्यान करण्याची वस्तु एक होणे.

समाधि दोन प्रकारची - सविकल्प किंवा संप्रज्ञात व निर्विकल्प किंवा असंप्रज्ञात.

ज्या वस्तूचे आपण ध्यान करतो, ती वस्तू उपाधिपूर्वक असली व तिच्याशी आपण एक झालो, तर त्याला संप्रज्ञात किंवा सविकल्प समाधी म्हणतात. देवीच्या वराने लीला निर्विकल्प समाधीला प्राप्त झाली.

## मस्तकावर हात ठेवणे

गुरूच्या आशीर्वादाने किंवा गुरूने शिष्याच्या मस्तकावर हात ठेवून शिष्य पूर्ण होतो, असा या ठिकाणी आशय नाही. गुरूच्या नुसत्या आशीर्वादाने किंवा मस्तकावर हात ठेवून शिष्याने स्वतः काही एक प्रयत्न न करिता तो पूर्ण होतो असे समजणे सर्वथैव मिथ्या आहे.

बरे, असे होते असे आपण घटकाभर घेऊन चाललो तरी उत्तमाधिकारीच पूर्ण होतो, मध्यम किंवा कनिष्ठाधिकारी पूर्ण होत नाही, असे म्हणावे लागते.



मागील कथेवरून पाहिले असता असेच दिसते. देवाने अर्जुनाला गीता सांगितली. तुकारामबोवांचे शिष्य महिपतिबोवा हे लौकर पूर्ण झाले. पण तुकारामाची बायको पूर्ण झाली नाही. यावरून उत्तमाधिकारीच एकदम पूर्ण होतो, असे समजावे.

## उत्तम अधिकारी

उत्तमाधिकारी याचे लक्षण असे आहे :- वेदशास्त्रांचा चांगला अभ्यास करून ते जाणण्याची बुद्धि असणे व श्रीगुरूवर उत्तम विश्वास असणे.

दृष्टांत :- लहान मुलांस जंतादि कृमी विकार होऊ नयेत म्हणून आई मुलांस साखर कडू आहे असे सांगते. मुलाचे आईवर पूर्ण विश्वास असल्यामुळे तो लागलीच थुंकून देतो व तोंडहि वेडेवाकडे करतो. त्याचा आईवर पूर्ण विश्वास असल्यामुळे गोड सारखहि त्याला कडू लागते. कारण भावना तशी झाली म्हणजे पदार्थहि तसाच होतो. हे मेसमेरिझम् सारखेच आहे.

देव भेटतो तेव्हा आपला अत्यंत विश्वास असतो, त्यामुळे मनाची खात्री होते व तसे दिसते. एकलव्य व्याधाला तो व्याध असल्यामुळे द्रोणाचार्यांनी अस्त्रविद्या सांगितली नाही. तेव्हा त्याने मातीचा द्रोणाचार्य करून त्यांजपासून विद्या शिकला व त्याने अर्जुनादि द्रोणाचार्यांच्या सर्व शिष्यांवर ताण करून दाखविली, अशी महाभारतात कथा आहे, हे त्याच्या भावनेचे फळ होय.

देवीच्या सांगण्यावर पूर्ण विश्वास असल्यामुळे लीला एकदम निर्विकल्प समाधीत गेली. ती अशी :-

जगांतील सर्व पदार्थ (आकाशमय) आहेत. असे तिने प्रथम ध्यान केले. **''परमाणूहि आकाशमयच आहे म्हणजे परमाणूतहि पोकळी आहेच.''**

आकाश मनाने समजते, म्हणून तिने आकाशाचा मनात लय केला. तेव्हा सर्व ब्रह्मांडाचा लय झाला. कारण सर्व ब्रह्मांडे आकाशांत आहेत.

तिने आपले चित्त, आपला देह व जगांतील सर्व वस्तूपासून निराळे काढले व पुढे आपल्या मनाचाहि परमात्म्यात लय केला, आणि ती स्वस्थ (शांत) झाली.

निद्रेंत अज्ञान असते, समाधीत नसते.

देवीने सांगितल्याप्रमाणे तिने परमेश्वराकडे ध्यान लाविले, पण पूर्वीच्या संस्काराने (=वासनेने) तिने तेथेहि स्वप्नासारखी आपल्या पतीची सृष्टि पाहिली.

**प्रश्न** :- समाधीत गेल्यावर तेथे स्वप्नाप्रमाणे सृष्टि कशी दिसेल?

**उत्तर** :- झोपेतील स्वप्न वासनेने (चिंतनाने) पडते व समाधीतलेहि स्वप्न वासनेमुळेच दिसते. झोपेतील व समाधीतील स्वप्न सारखेच! फरक इतकाच की झोपतील स्वप्न तीव्र नसते, समाधीतील जगत् दृढ (=तीव्र) होते.

लीला पूर्ण उपासक असल्यामुळे तिला पतीची जरूर नव्हती. परंतु तिची वासना पूर्णपणे निवृत्त न झाल्यामुळे तिने समाधीतहि आपल्या पतीची सृष्टि पाहिली.

## वासना : दोन प्रकार

वासना दोन प्रकारची आहे. एक **उद्‌भूतरूप** म्हणजे उदय पावलेली आणि दुसरी **अनुद्‌भूतरूप** म्हणजे संस्काररूप किंवा लीन असलेली.

उदा. आंब्याच्या आठोळीत रस असतो, पण तो आठोळी पेरून त्याचे झाड होऊन त्याला फळें लागल्यावर खातां येतो. आठोळीतून रस काढून खातां येत नाही. आंब्याच्या आठोळीत रस नसता तर तो निंबाच्या बीजात किंवा दुसऱ्या कोणत्या तरी बीजात आला असता. पण तसे दिसत नाही. कारण निंबाचे बीज पेरून आंबा मिळत नाही. आंब्याचा रस आंब्याच्या आठोळीतच असतो. पण तो आठोळीच्या आत लय पावल्यामुळे दिसत नाही, व खाताहि येत नाही. म्हणजे आठोळीत रस अनुद्‌भूतरूपाने असून झाडावरच्या फळांत उद्‌भूतरूपाने असतो.

निःशेष अविद्येचा क्षय होत नाही तोपर्यंत संस्कार कायम राहतात. लीलेने मुक्तिकरिता देवी प्रसन्न केली नव्हती. त्यामुळे जरी देवीने तिला सांगितले होते की ''तूं आपले लक्ष परमेश्वराकडे लाव'' तरी पूर्वीच्या संस्काररूप वासनेमुळे तिने आपल्या पतीचा दुसरा सर्ग (सृष्टि) पाहिला; तो असाः-

तिने आपल्या पतीची सृष्टि आकाशांत पाहिली. राजा तरुण असून तो सिंहासनावर बसला होता. नंतर तिने अनेक देश व ब्रह्मांडे पाहिली. राजधानीच्या पूर्वेकडील दरवाज्यात ऋषी मंडळी आहे. पश्चिमेकडील दरवाज्यात दुसऱ्या राजांचे तुंगे आहेत. उत्तरेकडील दरवाज्यांत रथ, हत्ती, घोडे व सैन्य आहे, असे पाहिले. आणि दक्षिणेकडील दरवाज्यात स्त्रिया उभ्या आहेत, असे तिने पाहिले. पूर्वी जे जे लोक होते, तेच सर्व तिने पाहिले. तेच पंडित, तेच प्रधान, तेच सैन्य, हत्ती, घोडे, रथ, गावे, पर्वत, नद्या वगैरे पूर्वी जसे होते तसेच सर्व तिने पाहिले. याप्रमाणे समाधीत निर्माण झालेली पूर्वीसारखी हुबेहुब राजाची सृष्टि तिने पाहिली. तिला फार आश्चर्य वाटले. ती आपल्या मनाशीच म्हणाली, ''हे कसें? हा काय चमत्कार आहे?'' असे म्हणून तिने आपली समाधि आकर्षण केली आणि देहावर आली. ती अशी :-

प्रथम ती परमात्म्यापासून आपल्या चित्तावर आली. चित्तापासून तिने आकाश निर्माण केले, व आकाशापासून ती आपल्या देहावर आली. नंतर घरांत जाऊन तिने देवीचे स्मरण केले. त्याबरोबर देवी येऊन तिच्यासमोर उभी राहिली. तिने तिला बसावयास आसन देऊन नमस्कार केला व पुढे हात जोडून उभी राहून





म्हणाली,

''मला आश्चर्य वाटते की, हा काय भ्रम आहे? किंवा आहे तरी काय? मी आपला पति पाहिला, त्याची सृष्टि पाहिली व दुसरी लीलाहि पाहिली. मला तर काहीच इच्छा नाही. मग या सृष्टिपासून ती सृष्टि कशी उत्पन्न झाली? हे काही स्वप्न नाही. मी चांगली जागी होती. हे कसे झाले हे सर्व मला कृपेकरून सांग.''

## भूताकाश, चित्ताकाश आणि चिदाकाश

देवी म्हणाली :- सांगते. ऐक. आकाश तीन प्रकारचे आहे.

भूताकाश, चित्ताकाश आणि चिदाकाश.

**(१) भूताकाश** म्हणजे ज्याच्यात हे जगत् राहते ते.

**(२) चिदाकाश** म्हणजे परब्रह्म हे नेहमी स्वच्छ असते. त्यात जगत हे कधीहि झाले नाही, होणार नाही व आताहि नाही. तीन्ही काली त्याला जगाचा संस्पर्श होत नाही.

**(३) चित्ताकाश** म्हणजे चित्त. त्या चित्ताचे ठिकाणीच अंनत प्रकारचे जगत् निर्माण होत जात असते. भूताकाशांतून एखाद्या ठिकाणी जाण्यास जितका वेळ लागतो, तितका वेळ चित्ताकाशांतून जाण्यास लागत नाही.

बंदुकीच्या गोळीसारखा वेग केला तरी ध्रुवाजवळ भूतकाशांतून जाण्यास हजारो वर्षे लागतात. कारण ध्रुव नक्षत्र येथून इतके दूर आहे की, ते तेथे नाहीसे केले तरी या पृथ्वीवर पन्नास वर्षेपर्यंत त्याचा प्रकाश राहील. पण ध्रुवाजवळ मनाने एकदम जाता येते. जी वस्तू येथून अनंत योजने दूर आहे ती चित्ताकाशाच्या दृष्टीने कांहीच दूर नसते.

देवी म्हणाली, ''लीले ! तुझा पति मरून दूर गेला आहे असे जरी तुला वाटते, तरी तुझ्या चित्ताकाशांतच तो आहे.''

## वस्तूचा नाश म्हणजे . . . ?

**प्रश्न :-** एखादी गोष्ट नाश पावते, म्हणजे काय होते?

**उत्तर :-** ती आपल्या हृदयातच लीन होते व पुनः ती तेथूनच उत्पन्न होते. तुझ्या पतीची ही सृष्टि तुझ्या हृदयातूनच (=चित्ताकाशातून) उत्पन्न झाली आहे. आणखी तूं म्हणतेस की, ही भ्रमरूप सृष्टि दिसते कशी? तर असे म्हणू नकोस. कारण तूं ज्या सृष्टीत आहेस तीहि सृष्टि भ्रमरूपच आहे.

ज्याप्रमाणे स्वप्नांत एखाद्या राजाला मी भिकारी असून दारोदार तुकडे मागत आहे, असे दिसते, त्याप्रमाणे जसजशा वासना उत्पन्न होतात, तसतसे हे जगत् एका परमात्म्यावरच उत्पन्न होते. याप्रमाणे हे सर्व जगत् भ्रमरूप आहे, हे

सांगण्याकरिता लीलेच्या पूर्व जन्माची कथा देवी सांगते, ती पुढे सांगेन.

॥ हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

०००

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# १७. दृष्टिसृष्टिवाद : पांच सिद्धान्त

**लीला म्हणाली :-** ''आई ! वासना व कर्म यांचे योगाने जगत् कसे तयार होते? हे मला सांग.''

**भगवती म्हणाली :-** ''लीले! स्वप्नांत ज्याप्रमाणे आपल्या वासनेने जगत् उत्पन्न होते व तेच स्वप्न तीव्र झाले म्हणजे जगत् प्रत्यक्ष भासते, त्याचप्रमाणे वासना व कर्म यांच्या योगाने जगत् तयार होते.''

**भगवती म्हणाली :-** लीले! ही तुझी पृथ्वी म्हणजे पद्मराजाचे व विदुरथ राजाचे राज्य आणि वसिष्ठ ब्राह्मणाचे घर हे सगळे तुझ्या घरांतच आहे.''

वासनेच्या योगाने थोड्या देशांत पुष्कळ देश व थोड्या कालांत पुष्कळ काळ कसा राहू शकतो, हे काल सांगितले.

हा ग्रंथ दृष्टिसृष्टिवादपर आहे. वेदातात दोन वाद आहेत. एक सृष्टिदृष्टिवाद व दुसरा दृष्टिसृष्टिवाद.

अधिकारी तीन प्रकारचे आहेत. कनिष्ठ, मध्यम व उत्तम.

**सृष्टिदृष्टिवाद मध्यम व उत्तम अधिकाऱ्यांच्या उपयोगी आहे.**

**कनिष्ठ** वेदोक्त कर्माचा अधिकारी आहे. कनिष्ठ अधिकाऱ्यांतहि पुनः तीन भेद आहेत. त्यापैकी * शूद्र हे पुराणोक्त कर्माचे अधिकारी आहेत. * वैश्य व क्षत्रिय हे वेदोक्त तीन कर्माचे अधिकारी आहेत. (तीन कर्मे ही:- अध्ययन, यजन आणि दान) आणि * ब्राह्मण हे वेदोक्त सहा कर्माचे अधिकारी आहेत. (सहा कर्मे ही :- अध्ययन-अध्यापन, यजन-याजन, दान व प्रतिग्रह)

**मध्यमाधिकारी** हा उपासेनचा अधिकारी आहे. * त्यांतहि सकाम कर्मे करणारा **मंदाधिकारी** होय, व -

निष्काम कर्मे करणारा **उत्तमाधिकारी** समजावा. या उत्तमाधिकाऱ्यांतहि पुनः तीन भेद आहेत. * नुसती उपासना करणारा तो **कनिष्ठ.** * जो साधनचतुष्टय संपन्न असतो, तो **मध्यम** आणि * साधनचतुष्टयसंपन्न असून जो भगवंताची उपासना करतो तो **उत्तम.** हाच ज्ञानाचा अधिकारी आहे.

त्यांतहि तीन भेद आहेत. * सद्‌गुरुमुखांतून श्रवण केल्याबरोबरच जो तद्रूप



होतो तो **उत्तम.** * गुरुमुखांतून श्रवण करून त्याचे वारंवार मनन चिंतन करावे लागते, तो **मध्यम** आणि * गुरुपासून श्रवण केल्यावरहि पुनः पुनः तर्क येतात, त्यांचे निरसन करून पुनः पुनः ज्याला बोध करावा लागतो तो **कनिष्ठ.**

वेदांतांतील दृष्टिसृष्टिवाद हा उत्तम व मध्यम अधिकाऱ्याकरिता सांगितला आहे. योगवासिष्ठ हा ग्रंथ दृष्टिसृष्टिवादपरच आहे. दृष्टिसृष्टिवादाचा मुख्य सिद्धांत असा आहे :-

## सिद्धांत १ ला

**हे जगत् आपल्यास जेव्हा भासते - तेव्हाच ते असते. इतर काली नसते, म्हणजे पूर्वी ते नव्हते व पुढेहि राहात नाही.**

यास दृष्टांत असा :- रज्जुवर सर्प भासतो, तेव्हाच तो असतो. त्यापूर्वी तो नव्हताच. कारण असता तर दुसऱ्यास दिसला असता. आणि सर्प नाही, ही दोरी आहे असे आपणास ज्ञान झाल्यावरहि तो सर्प राहात नाही. तात्पर्य:- सर्प हा रज्जूच्या अज्ञानाने भासतो व रज्जूचे ज्ञान झाले म्हणजे त्याची निवृत्ति होते. त्याप्रमाणे एका ब्रह्मावाचून जगांत जे दुसरे पदार्थ आहेत ते जेव्हा भासतात, तेव्हाच ते असतात, इतर काली नसतात. हा पहिला सिद्धांत झाला.

दृष्टिसृष्टिवादाचा दुसरा सिद्धांत असा आहे :-

## सिद्धांत २ रा

कोणी कोणापासून उत्पन्न होत नाही. तर हे सगळे जगत् अज्ञानाने भासत आहे.

**उदा :-** आपणास वाटते की मातीपासून घट उत्पन्न होतो. परंतु तसे होत नसून आपली पुष्कळ दिवसापासून तशी समजूत आहे म्हणून तसे वाटते.

**शंका :-** तर मग सामुग्रीवाचून वस्तु उत्पन्न व्हावी? म्हणजे कणीक नसतांना पोळ्या उत्पन्न व्हाव्या.

**सिद्धांती :-** ही शंका घटत नाही. कारण सामुग्रीवाचूनच वस्तू उत्पन्न होते. म्हणजे आमचे म्हणणे असे आहे की, वस्तू जेव्हा भासते, तेव्हाच ती असते. म्हणजे कणीक भासल्यावरच पोळी उत्पन्न होते. कणीक भासली नाही तर कणीक व पोळी हे दोन्ही दिसणार नाहीत. म्हणून -

जगांतील कोणताहि पदार्थ कोणापासून उत्पन्न होत नाही.

हा या वादातील दुसरा सिद्धांत आहे. पुनः उदाहरणे देऊन हाच सिद्धांत स्पष्ट करतो.

स्वप्नांत आपली आई दिसते. तिला मुलगी झाली असेहि दिसते. बायकोला

मुलगा झाला असेहि स्वप्न दिसते. याप्रमाणे बहीण व मुलगा एकाच काळी उत्पन्न होतात. असे स्वप्न दिसते. गर्भातून मूल बाहेर येण्यास नऊ महिने लागतात. परंतु स्वप्नांत नऊ महिन्यांचा काल होत नाही, म्हणून गर्भापासून मुले होत नाहीत, असे सिद्ध होते. स्वप्नांतल्याप्रमाणेच व्यावहारिक गर्भापासूनहि मुले उत्पन्न होत नाहीत. तर मुलगा निराळा उत्पन्न होतो व गर्भ निराळा असतो. तो (गर्भ) आपोआपच नाहीसा होतो.

तात्पर्य असे की, एका भासापासून दुसरा भास उत्पन्न होत नाही. तर दुसरा निराळा भास असतो.

उदा. आजचा व कालचा रज्जुसर्प निराळा भासतो. त्याप्रमाणे गर्भांत मुलगा नाही व गर्भहि नाही. पोट फाडून पाहिले असता गर्भ दिसतो. तेव्हा पहिले पोट फाडण्याचा भास होतो. नंतर गर्भ दिसतो. गर्भ जेव्हा दिसत नाही तेव्हा तो नष्ट होतो, व पुनः दिसतो. (=भासतो) म्हणजे पुनः उत्पन्न होतो.

तात्पर्य असे की, नजरे आडची वस्तु नष्ट होते. याप्रमाणे कोणतीहि वस्तू स्थिर नाही. प्रत्येक वेळी नवीन वस्तू उत्पन्न होतात.

कालचाच मी आजहि आहे. असे जे वाटते ही आपणास भ्रांति होते. मी कालचीच रंगुबाई आहे, असे जे तुला वाटते, हे प्रमाण आत्म्याची एकताच सिद्ध करिते, देहाची एकता सिद्ध करीत नाही. कालचाच देह आज आहे याला प्रमाण काय? काहीच नाही. बरें, कालच्यासारखाच देह आजहि आहे असे म्हणशील तर दोन सारख्या वस्तु एक असत नाहीत. उदा. दोन वाटोळे गोटे सारखे दिसले तरी ते एक नाहीत. त्याप्रमाणे कालचा व आजचा देह हे सारखे दिसत असले तरी ते एक होत नाहीत. कालचा देह व आजचा देह हे वेगळे आहेत, म्हणजे आज पुनः कालच्या देहासारखा भास होतो. ताता तुझे काल पति होते, आज नाहीत. कारण दोघांचीहि शरीरे बदलली आहे, पण असे होत नाही. कारणे जरी बदलली तरी संस्कार (=पतिपत्नीभाव) कायम राहतो. तो बदलत नाही. कारण पतिपत्नीभाव वासनाजनित आहे. तो ज्ञान झाल्याशिवाय नष्ट होत नाही. पतिपत्नी, पितापुत्र, भाऊबहिण इत्यादि भाव वासनेने घेतले आहेत, म्हणून ते स्थायी आहेत.

''वासना नेहमी स्थायी आहे. ती बदलत नाही.''

## सिद्धांत ३ रा

दृष्टिसृष्टिवादाचा तिसरा सिद्धांत असा आहे :- **ईश्वर जीवाने कल्पिलेला आहे** कारण ब्रह्म म्हणजे परमेश्वर हा नेहमी आप्तकाम आहे. याला कशाचीहि अपेक्षा नाही.



बरें, लोकांवर अनुग्रह करण्याकरिता परमात्मा सृष्टि उत्पन्न करितो, असे जे म्हणतात त मूर्ख आहेत. कारण परमेश्वराला आपल्याहून भिन्न असा दुसरा कोणी दिसतच नाही. आपल्याहून भिन्न असा दुसरा ज्याला दिसतो तो अज्ञानी आहे व ज्या ठिकाणी दुसरा दिसतो त्या ठिकाणी द्वैत आहे व जेथे ते भासते तेथे अज्ञान आहे, असे समजावे, द्वैत अज्ञानजन्य आहे.

**उदा.** आपला मुलगा व दुसऱ्याचा मुलगा यांच्यात सारखेपणाच विशेष आहे. किडेहि गर्भातच उत्पन्न होतात.

* यावरून असे समज की, वस्तू सारख्या असून दुसरेपणा जो दिसतो, ते अज्ञान आहे.

* माझ्याहून जीव भिन्न आहेत, असे परमेश्वराला वाटले तर तो अज्ञानी आहे, असे म्हणावे लागेल. म्हणून स्वतःसाठी किंवा दुसऱ्यासाठी परमेश्वराला सृष्टि करणे संभवत नाही.

* दुसरे असे की, परमेश्वराला जीवावर अनुग्रह करणेहि संभवत नाही. कारण जीव हा परमेश्ववराहून भिन्न पदार्थ असता तर त्याला त्याच्यावर अनुग्रह करता आला असता. पण परमेश्वराला आपल्याहून भिन्न असा पदार्थच भासत नाही.

* पुनः असें की, परमेश्वर जर जीवावर अनुग्रह करितो तर तो दगडाला कां ज्ञान करून देत नाही? असाहि एक प्रश्न येतो. कारण जड वस्तुहि जीवाप्रमाणे परमेश्वरापासून निराळ्या नाहीत. म्हणून त्याने जड वस्तूवरहि अनुग्रह केला पाहिजे. तसे न करील तर तो (=परमात्मा) पक्षपाती आहे असे होईल.

* परमेश्वर ज्याचे जसे कर्म असेल तसे फळ देतो, म्हणून तो पक्षपाती नाही. असें कोणी म्हणेल, तर हे म्हणणेहि बरोबर नाही. कारण कर्माचे फळ देणारा कर्माहून निराळा असला पाहिजे. परमेश्वर तर सर्व व्यापक आहे, म्हणून त्याचा सर्व जीवांशी संबंध आहे.

* यावर कोणी असे म्हणेल की, परमेश्वराच्या नामाने जर पाप जाते तर त्याच्या संस्पर्शाने पाप कां जात नाही? आणि असे जर आहे तर याप्रमाणे दृष्टिसृष्टिवादात परमात्मा नाही काय? याचे उत्तर असे आहे की, जगताचा कर्ता व जीवाच्या कर्माप्रमाणे फळ देणारा असा परमात्मा दृष्टिसृष्टिवादात घेतला नाही या वादात परमेश्वर मानतात, तो येणे प्रमाणे :-

## दृष्टिसृष्टिवाद : 'ईश्वर-संकल्पना'

एक ब्रह्म आहे, तेच अविद्येच्या योगाने जीवस्वरूप झाले आहे. तो जीव ब्रह्माच्या ठिकाणी ईश्वराची कल्पना करतो. याप्रमाणे या वादांत जीवकल्पित परमेश्वर मानतात.

**उदाहरणार्थ :-** लहान लेकरूं सापाला किंवा अग्नीला भ्याले तर ते आपल्या आईकडे जाते. त्याला असे वाटते की, सर्पापासून किंवा अग्नीपासून आई माझे रक्षण करील. तिच्यात माझ्यापेक्षा अधिक सामर्थ्य आहे. परंतु तोच मुलगा मोठा झाला म्हणजे तो आपल्या सामर्थ्याने आईलाहि दाबून टाकतो. त्याप्रमाणे जीव हा सर्व शक्तिमान् व सर्वज्ञ अशा परमेश्वराची कल्पना करितो.

ती कांही खोटी नाही. कारण जीवाला अज्ञान आहे तोपर्यंत त्याला अशा कल्पित ईश्वरापासून फळ मिळते. मुलगा रडत असल्यास तो उगा रहावा म्हणून ''बागुलबोवा आला, तो तुला घेऊन जाईल'' अशी खोट्या बागुलाची आई कल्पना करिते व मूल त्याला भिऊन उगे राहते. कित्येक लोक भूताच्या भीतीने वेडे होतात. भूत केव्हा येईल याचा काही नेम नाही, असे त्यांना नेहमी वाटत असते. कल्पनेने गोड पदार्थ कडू लागतो.

याप्रमाणे अज्ञानाने कल्पनेप्रमाणे पदार्थ भासतात. परमेश्वर आहे, अशी जीवाची कल्पना आहे. ती बरोबर आहे. सर्व प्राचीन वेदांत्यांचा दृष्टिसृष्टिवाद असाच आहे.

## महाराजांचे निराळे मत

मी मात्र थोडे निराळे मानतो. ते असे :- परमेश्वर जीवकल्पित आहे ही गोष्ट मलाहि कबूल आहे. तरी जीवाला एवढी कल्पना करता येत नाही.

उदा. मनुष्याला सोन्याची वीट कल्पिता येत नाही, मातीचीच कल्पना येते. त्याप्रमाणे जीवाला जीवच कल्पिता येतो. परमेश्वर कल्पिता येत नाही. परंतु जीवाला परमेश्वर कल्पावा लागतो. त्यामुळे **जोपर्यंत जीवन्मुक्ति आहे तोपर्यंत परमेश्वराची भक्ति करण्याकरिता परमात्मा नित्य आहे** असे मानावे लागते. अशी माझी कल्पना आहे.

आज तुला दृष्टिसृष्टिवादाचे एकंदर पांच सिद्धांत सांगितले.

## पांच सिद्धांत

१. कोणतीहि वस्तु भासते, तेव्हा असते, इतर काली नसते.
२. कोणत्याहि वस्तूपासून कोणतीहि वस्तु उत्पन्न होत नाही.
३. कोणतीहि वस्तु नजरेआड गेली म्हणजे नष्ट होते,



४. कालचाच 'मी' आज आहे हे सिद्ध होत नाही, कारण जाणत्याच्या एकतेवरून आत्म्याची एकता सिद्ध होते. कालचेच शरीर आज आहे कशावरून? याला कांही प्रमाण नाही.
५. परमेश्वर जीवकल्पित आहे.

## बौद्ध व वेदान्त

सर्व पदार्थ क्षणोक्षणी बदलतात, असा बौद्धांचा सिद्धांत आहे, व तुम्ही वेदांतहि सगळे पदार्थ क्षणोक्षणी नष्ट होतात असे म्हणता, तर मग बौद्धांचे व वेदांतचे मत एकच झाले.

हे म्हणणे बरोबर नाही. कारण पदार्थ जोपर्यंत भासतो, तोपर्यंत तो स्थिर असतो व पदार्थ न भासला (दिसला) म्हणजे तो नष्ट झाला असे आम्ही वेदांती मानतो.

पदार्थ दिसत असला तरी तो नष्ट होतो म्हणजे प्रत्येक पदार्थ क्षणोक्षणी नष्ट होतो असे बौद्ध मानतात. याकरिता दोघाचे मत एकसारखे नाही.

## भ्रमाला नियम नाही

भगवती म्हणाली :- लीले तुझा पूर्वीचा भास, वसिष्ठ नांवाचा ब्राह्मण व त्याची पत्नी अरूंधती असा होता. तो जाऊन आता हा पद्मराजा व त्याची पत्नी तूं- लीला, असा भास उत्पन्न झाला.

त्यात ते ब्रह्मांड निराळे व हे ब्रह्मांड निराळे असे काही नाही. मन शब्दापूर्वीच काशीस जाऊन परत येते. काशीपर्यंत जमिनीची मन एकमदमच कल्पना करिते. अज्ञानाच्या योगाने परमाणूएवढ्या जागेवर मन ब्रह्मांडाची कल्पना करिते. भ्रमाला काही एक नियम नाही.

भ्रमाला नियम दिसतो, असे जे म्हणतात, ते नियमहि भ्रांतीनेच करतात. लोखंडाचा गोळा अग्नीत तापविला म्हणजे ज्याप्रमाणे तो अग्नीचाच गोळा आहे असे वाटते, त्याप्रमाणे आत्मा सत्य असल्यामुळे हा संसारहि सत्य आहे असे वाटते. स्वप्नातला देह असत्य असतो, तरी तो देह व हा जागृतीतला देह एकच आहे, असे आपणास वाटते. कारण आत्मा एक आहे, म्हणून त्याच्या एकपणाने दुसऱ्या पदार्थाचाहि एकपणा वाटतो. वास्तविक हा भ्रम आहे,

एक परब्रह्म-परमेश्वर सत्य असून, वासनेने जीव झाले आहेत. त्या जीवाच्याहि हजाराव्या अंशांत ही सृष्टि आहे. त्यात तुझे घर एका कोपऱ्यांत आहे व असे कित्येक ब्रह्मांड तुझ्या घरात आहेत. याचा अर्थ असा की, भ्रम हा कोणत्याहि प्रकाराने भासतो, त्याला काही नियम नाही.

**॥ हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥**

**॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# १८. सत्ता : तीन की दोन ?

काल वेदांताच्या मताप्रामणे चार सिद्धांत सांगितले. आज पांचवा सिद्धात सांगण्याचा देवी उपक्रम करिते. भगवती म्हणाली, लीले ! या जगांत एकंदर तीन प्रकारचे पदार्थ आहेत.

**१.** कधीहि नाश न पावणारा.

**२.** ब्रह्मज्ञानाने नाश पावणारा.

**३.** ब्रह्मज्ञानावांचून नाश पावणारा.

ब्रह्म कधीहि नाश पावत नाही. संसार ब्रह्मज्ञानाने नाश पावणारा आहे. रज्जुसर्प, शुक्तिरजत् हे ब्रह्मज्ञानावाचून नाश पावणारे आहेत; म्हणजे रज्जूच्या व शुक्तीच्या ज्ञानाने जो रजताचा व सर्पाचा नाश होतो, तो ब्रह्मज्ञानावाचून होतो. अविद्येचा नाश ब्रह्मज्ञानाने होतो. ब्रह्म परमार्थतः सत्य आहे. त्याचा कधीच नाश होत नाही. जगत् व्यावहारिक सत्य आहे, म्हणजे ब्रह्मज्ञान झाले नाही तोपर्यंत ते स्थिर आहे. रज्जु-सर्प व शुक्ति-रजत हे प्रातिभासिक सत्य आहेत.

याप्रमाणे तीन प्रकारची सत्ता आहे. **(१) पारमार्थिक (२) व्यावहारिक आणि (३) प्रातिभासिक.** याप्रमाणे सत्तात्रयवादी तीन सत्ता मानतात. ब्रह्म दोघांतहि सारखेच आहे, म्हणजे तिन्ही काली सत्य आहे. सत्ताद्वयवादी संसाराची सत्ता सत्य मानीत नाहीत. ते जगाचीहि प्रतिभासिक सत्ता मानतात.

**शंकाः-** जगाची जर प्रतिभासाकि सत्ता आहे, तर मग ब्रह्मज्ञानावाचूनच त्याचा नाश झाला पाहिजे. कारण प्रातिभासिक सत्तेचा ब्रह्मज्ञानावाचून नाश होतो. अशी शंका केली असता सत्ताद्वयवादी म्हणतात की -

प्रातिभासिक सत्तेचाहि ब्रह्मज्ञानानेच बाध होतो. म्हणजे रज्जुसर्पाचाहि नाश ब्रह्मज्ञानानेच होतो. रज्जुरूपी जे ब्रह्म, त्याच्या ज्ञानाने सर्प नाश पावतो, असे दृष्टिसृष्टिवादी म्हणतात.

ते म्हणतात की, सर्पाप्रमाणे रज्जुहि कल्पितच आहे. कल्पित वस्तूच्या ज्ञानाने कल्पित वस्तूचा नाश होत नाही. रज्जु न दिसला तर तोहि नाश पावतो. म्हणून रज्जुहि प्रातिभासिकच आहे. ज्यावेळेस तो दिसतो त्यावेळी असतो; इतर वेळी नसतो.

दृष्टिसृष्टिवादी म्हणतात की, ज्यावेळी सर्प दिसतो त्यावेळी रज्जु कशावरून



आहे. कारण ते म्हणतात की, पदार्थ दिसतो, तेव्हाच रज्जु आहे याला काय प्रमाण आहे?

**शंका :-** रज्जु जर नसता तर त्याच्या ज्ञानाने सर्पाचा नाश कसा होईल? - यावर ते म्हणतात की, रज्ज्ववच्छिन्न जे चैतन्य त्याच्यावरच अज्ञानाने सर्प भासतो.

**शंका:-** रज्जुवर जो सर्प भासतो, तो जर सर्पाप्रमाणे असेल तर मग जिवंत सर्पाप्रमाणे तो असूं शकेल. तोहि तसाच नाश पावला पाहिजे. आशय हा की, रज्जु उत्पन्न झाला असताना सर्पाचा लोप होतो व जिवंत सर्पाचा नाश रज्जुसर्पाप्रमाणे होतो, अशी आपली समजूत नाही. म्हणूनच त्याचा तसा नाश होत नाही. किंवा आपल्या शरीरांतील काही पदार्थ जसे नख, केशादिक पंधरा दिवसांनी वाढतात व काही पदार्थ एक वर्षानी वाढतात परंतु सर्व शरीरांतील पदार्थ (अवयव वगैरे) पंचभूतांपासूनच उत्पन्न होतात. असे असता काही पदार्थ पंधरा दिवसांनी कां वाढावे व काही पदार्थ वाढण्यास एक वर्ष का लागावे? याचे कारण काही सांगता येत नाही.

त्याप्रमाणे अविद्येत काही पदार्थ स्थिर प्रतीत होतात व काही पदार्थ क्षणिक प्रतीत होतात. जसेः- ही समोरची भिंत मातीची नसून सोन्याची आहे असा आपला दृढ विश्वास झाला तर भिंत खास सोन्याची दिसेल. पण आपले तसे ध्यानच होत नाही, उलट ध्यान होते. याप्रमाणे जगातील सर्व पदार्थ प्रातिभासिक आहेत.

देवी म्हणाली, ''लीले! दोनच प्रकारच्या सत्ता आहेत :- १ पारमार्थिक व २ री प्रातिभासिक.''

लीला म्हणाली, ''आई! आठ दिवसात हजारो वर्षे कशी झाली,हे मला पटत नाही.''

देवी म्हणाली, '' स्वप्नात थोड्या देशात जसा पुष्कळ देश उत्पन्न होतो, त्याप्रमाणेच थोड्या काळात पुष्कळ काळ जातो. जसा जीव स्वतः झोपेतून स्वप्नात नाना सृष्टि उत्पन्न करितो.

त्याप्रमाणे मृत्यु नावाच्या महानिद्रेत जेव्हा तो जातो, तेव्हा तो पूर्वीचा जन्म विसरतो व दुसरा जन्म घेतो. म्हणून त्याला मी अमुक अमक्याचा मुलगा आहे, इत्यादि गोष्टी भासतात. वास्तविक विचार केला तर आईच्या गर्भातून मुलगा झाला हें कशावरून खरे? तर लोकांच्या सांगण्यावरून; असे आपण म्हणू. मग श्रुतिमातेच्या सांगण्यावरून जगत् मिथ्या आहे असे आपण कां मानू नये? आईबापाला ही माझी मुलगी, असे वाटते, ते तरी खरे कशावरून? ती दुसऱ्याची मुलगी

कशावरून नसेल?''

आता ''असे वाटते'' ही गोष्ट कालच्या गोष्टीला काही प्रमाण नाही. तर आई-बापाला तसे वाटते, म्हणूनच ती त्यांच्या पोटची आहे. आपला असा समजच आहे की, जितके दिवस पदार्थ भासेल, तितके दिवस तो असतोच.

**जसे :-** पुस्तक समोर दिसते म्हणून आहे. मथुरा तुझी मुलगी आहे, ती तुझ्या समोर नाही, तरी ती तुझ्या स्मृतीत आहे - म्हणजे मनोरूपाने आहे म्हणून आहे. झोपेत सर्व प्रपंचाचा लय होतो, तेव्हा मात्र काहीच नसते. दृष्टिसृष्टिवादाचा सिद्धांत आहे, **जीव आपला भाव विसरून दुसरा भाव घेतो.** म्हणजे ही माझी आई आहे, हा माझा बाप आहे, असे त्याला वाटते ते खोटेच वाटत असते. वास्तविक जीव हा ब्रह्मरूपच आहे.

**॥ हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

---------

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥**

# १९. चमत्कार, सर्वशक्तित्व व सर्वज्ञता

भगवती म्हणाली, ''लीले! पूर्व जन्मी तूं वसिष्ठ नांवाच्या ब्राह्मणाची पत्नी होतीस. तुझे नाव अरुंधती होते.''

तेव्हा लीला म्हणाली, ''ब्रह्म सत्य आहे व जगत् मिथ्या आहे, अशी जोपर्यंत तूं मला आत्मज्ञानाची दृढ दृष्टि दिली नाहीस, (झाली नाही) तोपर्यंत तूं मला जे सांगत आहेस, ते कौतुक वाटते; ते दूर कर व या स्थूल शरीराने माझा पूर्व जन्म मला दाखीव''.

याठिकाणी असा आशय आहे की, **''जोपर्यंत ब्रह्मज्ञान होत नाही तोपर्यंत कोणत्याहि गोष्टीचे कौतुक वाटत असते.''** जगत् हे इंद्रजालाप्रमाणे मिथ्या आहे. त्याला जे सत्य मानतात, त्यांना आश्चर्य वाटून मोह उत्पन्न होतो. या जगाला जे मिथ्या मानतात, त्यांना मोह उत्पन्न होत नाही.

### नजरबंदी

गारुडी नजरबंदीने, मंत्राने किंवा हातचलाखीने एका मोठ्या चिंचेच्या झाडाला दोर बांधतात व त्याला एक बैल बांधून देतात, नंतर आपल्या पायाच्या आंगठ्याला तो दोर बांधून देतात व बारा बारा बैलाच्यानेहि हा ओढला जात नाही, असे सांगतात, आणि लोकांनाहि तसेच दिसते. कारण त्यांचे दृष्टिबंधन होते.

किंवा गारुडी गारांच्या पाण्यात एक आठोळी भिजवून तिला एक पदार्थ



लावून ती पेरतात. त्याचे लागलीच आंब्याचे झाड होते. व त्याला फळेहि येतात. भाजीची झाडे पेरतात, त्याला भाजी येते. हजारो रुपये काढतात याप्रमाणे पुष्कळ खेळ करून दाखवितात. असे चमत्कारिक खेळ पाहून लोकांना फार आश्चर्य वाटते. परंतु दृष्टिबंधनाचे जो खेळ करतो (गारुडी) त्यालाच काही आश्चर्य वाटत नाही. जगाला जे सत्य मानतात, त्यांनाच ऐन्द्रजालिक विद्येचा चमत्कार वाटतो. जे लोक जगत् मिथ्या आहे असे समजतात त्यांना मुळीच चमत्कार वाटत नाही.

### चमत्कार कर्मानुसार घडतात

''चमत्कार कर्माधीन आहेत.'' चमत्कार पाहून मोठी मोठी माणसे फसली आहेत.

**उदा -** * श्रीकृष्णाने प्रेत उठविले, परंतु अभिमन्यु उठविला गेला नाही. * श्रीरामाने अमृत शिंपडून वानर सैन्य जिवंत केले, पण त्याने दशरथाला जिवंत केले नाही. * तुकाराम महाराजींनी शिवाजीला मदत केली, एका बाईचा मेलेला मुलगा उठविला. परंतु लोहगाव जळला, तेव्हा काही केले नाही.

तात्पर्य, चमत्कार कर्ममूलक आहेत ज्याप्रमाणे कर्म असते त्याप्रमाणे चमत्कार होतात. म्हणून –

**''महात्म्यांनी चमत्कार करून लोकांना फसवू नये.''**

कोणतेहि कर्म भोगल्यावांचून निवृत्त होत नाही. वाईट कर्माची भगवंताने जरी शिक्षा दिली नाही, तरी त्या कर्माचे फळ होणारच! असा परमेश्वराने नियम केला म्हणजे मग ते कर्म भोगल्याशिवाय चालत नाही.

जोपर्यंत अध्यात्मदृष्टि होत नाही, तोपर्यंत कोणत्याहि चमत्कारिक गोष्टीचे कौतुक वाटते. गारुडी रुपये काढतात, पण त्यांना त्यापासून काहीच उपयोग होत नाही, कारण त्यांना त्या रुपयांचा उपयोग करता आला असता तर ते भीक का मागते? बरे चमत्कारावर भरंवसा ठेवावा तर चमत्कार करण्यांनाहि जन्म, मृत्यु, जरा इत्यादि अनेक दुःखे आहेतच. मग चमत्काराला भुलून व्यर्थ आत्महानी का करून घ्यावी?

लीला म्हणाली,''आई ! तू म्हणतेस ते खरे आहे. जोपर्यंत आत्मदृष्टि दृढ झाली नाही, तोपर्यंतच चमत्कारांचे कौतुक वाटते.

देवी म्हणाली,'' लीले ! हे कौतुक नाहीसे कर.''

लीला म्हणाली, ''आई ! ठीक आहे. तूं सांगतेस तसे वागते. पण मला वसिष्ठ ब्राह्मणाच्या जन्मात या स्थूल देहाने घेऊन चल. तो जन्म पाहण्याची इच्छा झाली आहे.''

भगवतीने विचार केला की, ''मी इला स्थूल देहाने तेथे कशी नेऊ? कारण गमनागमन आत्म्याला व स्थूल देहाला नाहीत. आत्मा व्यापक आहे म्हणून त्याला जाणे-येणे संभवत नाही. स्थूलदेह जड (दृगोचर) आहे, त्यामुळे त्याला गमनागमन संभवत नाही. गमनागमन लिंग देहाला संभवते (आहे) म्हणून मी इला स्थूल देहाने कशी नेऊ शकेन? कारण पूर्वीच्या स्थूल देहाचा अभिमान आता इला कसा उत्पन्न होईल ? बरे, इला लिंग देहाने नेले तरी तो (अरूंधतीचा) देह जाळून आठ दिवस झाले होते.

लिंग देहाला कोणत्याच देहाचा अभिमान नसतो. - मी कर्ता आहे, मी भोक्ता आहे, मी सुखी आहे, मी दुःखी आहे, ही माझी आई आहे, हा माझा बाप आहे, हा अभिमान स्थूल देहाचा असतो.

बरें, योगबलाने नेता येईल; तरी पण तो स्थूल देह तर नाहीच. तो तर पूर्वीच जाळला आहे.

बरे, योगबलाने स्थूल देह निर्माण कर, असे इला सांगितले तर तेहि पटणार नाही. कारण हा स्थूल मी निर्माण केला असे वाटेल. पोरे वगैरे माझी आहेत असे वाटले पाहिजे, तसे वाटणार नाही.

योगाने तत्सदृश देह निर्माण करिता येतात. पण इला ओळख पटली पाहिजे. याप्रमाणे अनेक विचार मनात येऊन देवी ध्यानस्थ झाली. कोणतीहि गोष्ट जीवाला ध्यानांत जाऊन पाहावी लागते. ईश्वराला भूत, भविष्य, वर्तमान गोष्टीचे एकदमच ज्ञान असते.

मग ध्यान विसर्जन करून आपल्या सिद्धांताप्रमाणे देवी म्हणाली, ''लीले ! देवतांचा असा सिद्धांत आहे की, जितकी मनुष्ये (प्राणी) मरण पावली आहेत त्या सर्वांचे देह दहराकाशात तसेच कायम आहेत, नाश पावले नाहीत.''

किंवा, कोणताहि पदार्थ नाश पावत नाही तर तो आपल्या कारणांत लीन असतो जसे मातीचा घट होतो, तो मातीत असल्यामुळेच उत्पन्न होतो, म्हणजे मातीत असलेला घटच उत्पन्न होतो. म्हणजे मातीत नसलेला घट जर उत्पन्न झाला असता, तर मातीपासून म्हैसहि उत्पन्न करता आली असती, कारण जो जो पदार्थ मातीत नाही, तो तो उत्पन्न करता आला असता.

कोणी म्हणतात की, मातीत घट करण्याची शक्ति आहे, म्हणून तसे होते. हे म्हणणे आमच्या म्हणण्यासारखेच आहे; शब्द मात्र निराळे आहेत. मातीत घट अदृश्य रीतीने होता, असेच आम्हीहि म्हणतो. दोघांच्या म्हणण्याचा अर्थ एकच आहे.



मागे सांगितले आहे की, पदार्थ जेव्हा भासतो, तेव्हाच तो असतो, इतर काली नसतो आणि सर्व पदार्थ कारणात लीन असतात, असे आता सांगतो. हा विरोध दिसतो. याचा अर्थ असा :-

गोचर पदार्थ जोपर्यंत भासतात, तोपर्यंत असतात, मग नसतात. पण आत्मज्ञान झाले नाही, तोपर्यंत सर्व संसार राहतोच, म्हणजे ज्ञानाने मायेचा नाश होत नाही तोपर्यंत सर्व पदार्थ असतातच. कोणत्याहि पदार्थाचा निशेःष नाश होत नाही. देह जाळले तरी ते कारणांत असतातच. त्यांचा नाश होत नाही. भारतीय युद्ध संपल्यावर कौरवांचे देह जसे होते तसेच व्यास महामुनींनी धृतराष्ट्राला व गांधारीला दाखविले अशी महाभारतात कथा आहे. त्यावरूनहि असे दितसे की, मनुष्याची शरीरे जशीच्या तशीच असतात. त्यांचा निःशेष नाश होत नाही.

असा विचार करून भगवती- ती परमेश्वरच होती- म्हणाली, ''लीले ! मी काय करू? कारण नियतीला अन्यथा करण्याचे आमचे सामर्थ्य नाही. तूं म्हणतेस की, 'मला स्थूल देहाने तेथे ने' तो देह मिळेल हे खास. पण या स्थूल देहाचा अभिमान योगबलाने तूं सोडला पाहिजे.''

## ईश्वराचे सामर्थ्य

देवीच्या सांगण्याचा आशय असा की, महात्मे यथार्थ सांगतात. भलतेंच सांगत नाहीत. नियतीला (सृष्टिनियमाला) अन्यथा करण्याचे सामर्थ्य परमेश्वरांतहि नाही. कारण ईश्वर हा सर्व जगताला साधारण कारण आहे. पण आंब्याच्या फळांत निंबाचा रस उत्पन्न करण्याचे त्याच्यात सामर्थ्य नाही.

परमेश्वर सर्व सामर्थ्यवान् आहे, असे ज्यांचे मत आहे,त्यांना पाप करण्याची इच्छा असते. ''पाप केले तरी परमेश्वर दयाळू आहे. तो क्षमा करील. दंड देणार नाही'' असे ते म्हणतात.

कांही चांगले आचरण करणाऱ्यांचेहि असेच मत आहे. ते कामनेच्या इच्छेने असे म्हणतात.**उदा.** परमेश्वर दयाळू आहे,असे महार लोक म्हणतात, कारण त्यांना दुष्ट कर्म करण्याची इच्छा असते. ब्राह्मणहि तसेंच म्हणतात. कारण भिक्षेच्या योगाने वासनेच्या बळाने ते तसें म्हणतात. चांगल्या लोकांची ही कामना जबरदस्त असते.

परंतु खरा सिद्धांत असा आहे की, जीवाची वासना पुरविण्याइतके परमेश्वराच्या आंगी सामर्थ्य नाही. **उदा.** मी अशी वासना करितो की परमेश्वराने अल्प शक्तिमान् व्हावे व नंतर मी मागेन ते द्यावे. पण ईश्वराला असे कदापि करता येणार नाही. याविषयी महाभारतात अशी कथा आहे :-

## कथा : रन्तिदेवाची

रंतिदेव नावाचा एक राजा होता. तो फार पराक्रमी व सामर्थ्यवान होता. तरी सर्व भूतांचे ठिकाणी फारच दयार्द्र होता. पोटच्या पुत्राप्रमाणे प्रजेचे पालन करीत असे. एकट्या मनुष्याचेच नाही, तर पशू, पक्षी, कीटक, झाडे वगैरे सर्वांचेच पालन आपल्या हातून उत्तम व्हावे अशी त्याची दृढ इच्छा होती. पण तसे होत नाही, आपल्या हातून धर्म पाळला जात नाही, म्हणून तो विरक्त झाला व त्याने राजधर्माचा परित्याग केला.

### कर्माचे फळ : विरक्ति

विषयाचे ठिकाणी दोष दिसून चित्त विरक्त होणे, इतकेच **खऱ्या कर्माचे फळ** आहे, अधिक नाही.

पूर्णपणे कर्म कोणाच्याच हातून होत नाही. 'मी यथासांग कर्म करतो' असा जे अभिमान वाहतात, त्यांच्यापेक्षा 'माझे कर्म न्यून आहे' म्हणून जे वैराग्य धरतात, ते श्रेष्ठ आहेत. कर्माच्या ठिकाणी व विषयांच्या ठिकाणी ज्यांना वैराग्य झाले आहे, त्यांच्यापेक्षा कर्मे करणारा श्रेष्ठ नाही. श्रुति असे सांगते की, ब्रह्मचारी असो, गृहस्थ असो, ज्यादिवशी वैराग्य होईल त्याच दिवशी सर्वाचा त्याग करून त्याने संन्यास घ्यावा.

**ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत् गृहाद्वा वनाद्वा ।**
**यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत् ॥**

वैराग्य न होऊन जे जबरदस्तीने संन्यास घेतात, ते पतन पावतात. खरे वैराग्य उत्पन्न होणे हेच कर्माचे उत्तम फळ आहे.

याप्रमाणे रंतिदेवाला वैराग्य झाले. तो आपल्याशीच म्हणाला की, ''उत्तम रीतीने राजधर्म परिपालन करू, असे माझ्या मनांत आहे पण तेहि होत नाही. मी पालखीत बसलो असतांना माझी प्रजा मला खांद्यावर वाहून नेते. मजप्रमाणे तेहि मनुष्ये आहेत. मग मी खुषाल बसावे, वाटेल तशी चैन मारावी, आणि त्यांनी उन्हातान्हांत खपावें, दुःख भोगावे, असे काय म्हणून? मीच काय सर्वांपेक्षा मोठा झालो आहे? मजपेक्षा स्त्रिया धन्य आहेत. कारण त्या पतीला आपले सर्वस्व दान करितात. मुलगा (जास्त) बापाच्या पक्षाचा असतो. मुलगी आईच्या पक्षाची असते. त्या खरोखरच धन्य आहेत. मी दुसऱ्यांना लुटून आपल्या प्रजेची व्यवस्था ठेवितो. प्रजेपासूनहि कर घेतोच. मग धर्म तो काय करतो?'' त्याच्या मनांत असे विचार येऊन तो विरक्त झाला. त्याने तपाला आरंभ केला. कांही हजार वर्षेपर्यंत तप केले. त्याला आपल्या आयुष्याची शंका नव्हती.



(नार्वेत एका गृहस्थाचे आयुष्य १५० वर्षांचे आहे. लंडन येथे एकाच्या आजीची आजी जिवंत होती, असा रिपोर्ट आहे. आजीच्या हातची केलेली भाकर नातु खातो. त्याचे आचरण चांगले असते. त्यांच्यामध्ये परस्त्रीगमन फार कमी आहे. हिंदुस्थान ३२, इंग्लंड ४२, नार्वे ५२ याप्रमाणे सरासरी आयुष्याचे प्रमाण आहे. असो.)

त्याचे भयंकर तप पाहून ब्रह्मदेव, विष्णु, शंकरप्रमुख देव येऊन 'काय पाहिजे ते माग' असे त्याला म्हणाले.

त्याने सर्व देवांची पूजा केली, व नमस्कार करून म्हटले की, ''येथे येण्याचे आपण व्यर्थ श्रम घेतले. आता आपण जा. कारण माझी वासना पुरविण्याचे आपल्या आंगी सामर्थ्य नाही.''

हे ऐकून देव संतापले आणि म्हणाले की,''तूं आमचा अपमान कसा करतोस? आमचे सामर्थ्य तू जाणत नाहीस काय? आम्ही (ब्रह्मदेव) सृष्टि निर्माण करतो. (विष्णु) पालन करतो आणि (शंकर) संहार करतो. दुसरे देवहि आपआपले सामर्थ्य सांगू लागले.''

राजा म्हणाला,'' मी तुमचेच तप करितो. आपण परमेश्वर आहात, हेंहि मला माहित आहे. पण आपल्याहि आंगी माझी वासना पुरविण्याचे सामर्थ्य नाही.''

त्यावर देव पुनः म्हणाले की, ''ते कांहीहि असो पण तूं मागितलेंच पाहिजे.''

राजा म्हणाला, ''माझी वासना पुरविण्याचे खरोखरच तुमच्या आंगी सामर्थ्य नाही. मग मी काय मागावे ?''

तेव्हा देव म्हणाले, ''आम्ही तुला शाप देऊन तुझी बुद्धि विषयाकडे नेऊ.''

राजा म्हणाला, '' ठीक आहे. मागतो. महाराज ! आपण असे करा की, पृथ्वीवरील सर्व जीव-जंतु, पशु-पक्षी, कीटक-मनुष्य फार काय सांगू- पण मुंगीपासून ब्रह्मदेव, विष्णु, शंकरापर्यंत सर्व प्राण्यांचे दुःख माझ्या एकट्यावर येऊन त्या सर्वांच्या वाट्यास सुखच राहावे, दुःख कांहीच असूं नये, इतकेंच माझे मागणे आहे.''

पण असे होणे शक्यच नव्हते. कारण सर्पाला पाय नसल्यामुळे त्याला चालता येत नाही, हें दुःख आहे. पाण्याबाहेर निघाली तर तळमळ करून प्राण सोडावा लागतो हे मासोळीला दुःख आहे. मांजरीला आपलेच पिल्लू खावे लागते. पशुपक्षांना आपले दुःख सांगता येत नाही. स्थावरांना (झाडांना) आपला ताप सांगता येत नाही. सारांश प्रत्येक प्राण्याला दुःख आहेच. - आता सर्व प्राण्यांचे

दुःख एकट्यालाच द्यावयाचे म्हणजे त्या माणसालाच त्या त्या योनीत घातले पाहिजे, पण एकट्या जीवाला सर्व प्राण्यांच्या योनी कर्मावाचून कशा द्यावयाच्या? अर्थातच देता येत नाहीत. कारण एका मनुष्याला सर्व योनीत एकदम कसे घालावयाचे? याप्रमाणे सर्व प्राण्यांचे देह एकाकाळी एकट्या माणसाला घेता येणे शक्यच नाही. योगाभ्यासाने एकाकाळी नाना देह निर्माण करतां येतात. ते योगाच्या पुण्यबळाने होते. पापबलाने होत नाही. तप म्हणजे पुण्य, पाप नाही. पुण्याचे फळ जर दुःखरूप होईल, तर मग धर्माची जरूरच राहणार नाही. याप्रमाणे सर्व देव हजारो तऱ्हेने अडल्या गेले व निरुपाय होऊन चित्रासारखे उभे राहिले. राजाने पुनः त्यांची पूजा केली, व म्हणाला ''आम्ही पुरुष. त्यातहि मी क्षत्रिय. आपण मला क्षमा करा व आपल्या स्थानी जा.'' असे म्हणून त्यांना बिदा केले; ते गेले.

## परमेश्वराचे व जीवाचे सामर्थ्य

भगवती म्हणाली, ''याप्रमाणे सृष्टिनियमाला अन्यथा करण्याचे आम्हा देवांचेहि सामर्थ्य नाही. ईश्वर जीवकल्पित आहे. जीवानेच त्याचे ठिकाणी सर्व शक्तिमत्ता व सर्वज्ञता स्थापन केली आहे. लेकरू जितके लहान असेल तितके आई त्याचे पालन करिते. त्याप्रमाणे -

जीव जितका अल्पज्ञ व अल्पशक्तिमान आहे, तितका परमेश्वर सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् होतो. जीव जेव्हा पूर्ण ज्ञानी होतो, तेव्हा जीवपणा व ईश्वरपणा दोन्हीहि नाहीसे होतात.

अथवा परमेश्वर जरी सर्व शक्तिमान् आहे, तरी तो न्यायी व सत्यवादी आहे. भलतेच करणारा नाही. त्याप्रमाणे जीवाचे जसे कर्म असेल, तसेच तो फल देतो, अन्यथा देत नाही. किंवा परमेश्वर सर्वव्यापक आहे. त्याला मोह नाही. तो सर्वांच्या अंतर्यामी आहे. जीव जबरदस्तीने त्याला विसरले आहेत (म्हणजे त्याला ते चुकले आहेत) म्हणून त्याला न्यायानेच वर्तन करणे भाग आहे.

अथवा परमेश्वर दयाळू असला तरी त्याला सर्वांवरच दया करावी लागेल व त्याला यथार्थ मार्गच दाखवावा लागेल. त्याला दयेने जीवांना मुक्त करता येत नाही. कारण ''खऱ्या गोष्टीवर कृपेचा परिणाम होत नाही. खोट्या गोष्टीवर कृपेचा परिणाम होतो.'' संसार मिथ्या आहे. मिथ्या संसाराची निवृत्ति ज्ञानावाचून कशानेहि होत नाही. म्हणून सृष्टिनियमाला अन्यथा करण्याचे सामर्थ्य परमेश्वरालाहि नाही.

देवी म्हणाली, ''लीले ! तूं वेडी आहेस. मी तुला स्थूल देहाने कशी नेऊ? स्थूल देहाचा स्वभाव आकाशमार्गाने जाण्याचा नाही.''



तुकाराम महाराज अवतारी पुरुष होते. अवतारांचे शरीर भूतकार्य नसते. मायाकार्य असते. ते लहानशा वावण्यांतूनहि जाऊ शकते. उदा. श्रीकृष्ण लहानशा वावण्यातून गेले होते. तुकारामबोवा देहासहित वैकुंठास गेले, त्याचे कारण असे की, त्यांचा स्थूल देहाचा अभिमान नष्ट झाला होता. म्हणून या भूतांचा त्या भूतांत असा परिणाम झाला.

''या देहावरचा तुझा अभिमान गलित झालेला नाही आणि तुला तर चित्ताकाशामध्ये जावयाचे आहे व सर्व देह पाहावयाचे आहेत. तर तसे होण्याला तुझ्या ह्या स्थूल देहाची आगळ (अडथळा) आहे. (म्हणजे तुझ्या ह्या स्थूल देहाचा अभिमान ही आगळ आहे) ती काढून टाक. त्याशिवाय मला तेथे तुला नेता येणार नाही.'' (दुसरा श्लोक)

भगवती म्हणाली, ''लीले! ज्याप्रमाणे एक घर दुसऱ्या घरात जाऊ शकत नाही, त्याप्रमाणे हा देह त्या देहात जाऊ शकत नाही. (दुसरा श्लोक) या देहाचा आकार तुला ब्रह्मस्वरूप भासणार नाही. मी जरी देवी आहे, तरी तुला तुझ्या प्रयत्नाशिवाय मला बह्मस्वरूप प्राप्त करून देता येणार नाही. जी गोष्ट जशी असते, तशीच असते. तिला अन्यथा करण्याला कोणीहि समर्थ नाही. उदा. अग्नि शीतल करावा असे वाटले तर तो तसा कोणाच्याने कोणत्याहि प्रकाराने केला जाणार नाही.''

लीला म्हणाली,'' माते! तर मग मी काय करू? ते सांग.''

भगवती म्हणाली, ''तूं प्रयत्न केला नाहीस तर मला काहीच करता येणार नाही. मी मार्ग मात्र दाखवीन. त्याप्रमाणे प्रयत्न तुलाच केला पाहिजे. तात म्हणतात,

**तूं प्राप्तीची चाड वाहसी । आणि अभ्यासी दक्ष न होसी ।**
**तरी सांग पां काय बिहिसी । दुवाडपणे ।।** ज्ञानेश्वरी ओ३५९गीता ६।१९

तुझा प्रयत्न नसला तर आमच्याने काहीच होणे शक्य नाही.''

भगवतीच्या सांगण्याचा आशय असा आहे की, जीवाच्या प्रयत्नाशिवाय परमेश्वरहि काहीच करू शकत नाही. त्याच्या कृपेचा परिणाम मिथ्या वस्तूवर होत नाही. म्हणून जीवाने प्रयत्नच केला पाहिजे. कारण जीव स्वतः बद्ध होऊन परमेश्वर सर्वज्ञ सर्व शक्तिमान् आहे अशी कल्पना करून पमेश्वराला परमेश्वरत्व जीवानेच दिले आहे व त्याच्यापासून जीवाला मुक्ति मिळणार आहे. परमात्मा नेहमी आप्तकाम आहे. त्याला कोणीच बद्ध दिसत नाही. मग त्याने मुक्त कोणाला करावे? भेद अज्ञानाने भासतो. परमेश्वर सर्व आहे. त्याला भेद भासणे शक्य नाही ''राजास

दिवाळी कोणीकडे, दिपवाळी गरीबांना! ''त्याप्रमाणे अल्पज्ञ जीवालाच ''मी बद्ध आहे - मी मुक्त आहे'' असे म्हणणे शोभते. परमेश्वराला भेदच भासत नाही. मग त्याने काय करावे? याकरिता जीवाने प्रयत्न केला पाहिजे. परमेश्वर काहीच करू शकत नाही, असा देवीच्या सांगण्याचा आशय आहे. वामन पंडित असेच म्हणतात,

**लक्ष्मीकांत दयासुधाघन जगी सर्वांवरी वर्षतो ।**
**जे का पातक झोपडींत दडती त्याते न तो स्पर्शतो ॥**

परमेश्वराचे पाणी सर्वावर पडते. झोपडी लोकांनी केली तर त्याला त्याने काय करावे? मोरोपंत असेच म्हणतात,

**प्रभो ! शरण आलियां कधि न व्हा तुम्ही वांकडे ।**

प्राणी परमेश्वराला शरण आला तर तो काही त्याला टाकून देत नाही. पण लोक त्याला शरणच येत नाहीत. त्यांत त्याच्याकडे कोणता दोष आहे?मिथ्या जगाला निवृत्त करण्याला प्रयत्नच कारण आहे.जीव जर प्रयत्न करील तर त्याला परमात्मा साह्य होतो असा या वचनाचा आशय आहे.

**हरिः ॐतत्सत् श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ।**

०००

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# २०. मनाचे तीन संवेग

## (मृदु- मध्य- तीव्र)

भगवती म्हणाली,''लीले ! तुझा हा स्थूल देह त्या जन्मांत नेण्याकरिता मध्ये आगळ आहे.

बहिर्मुख जीवाची धाव नेहमी बाहेर जाणारी आहे. जीवाचा नेहमीचा असा स्वभाव आहे की, वासना एक वेळ दृढ झाली की, ती सोडवत नाही.

पूर्वीच्या श्लोकांत तुझा देह कर्मबद्ध आहे, असे सांगितले. आता त्याला वासनाहि कारण आहे असे सांगतात. केवळ कर्मच किंवा केवळ वासनाच जीवाला जन्म घेण्याला कारण नाहीत, तर जीवाला जन्म देण्याला वासना व कर्म ही दोन्ही पाहिजेत. तरीपण **कर्मापेक्षा वासना फार वाईट आहे.** ब्रह्मज्ञानी पुरुषांचीहि कर्मे असतात. पण ती त्याला जन्म देत नाहीत, कारण त्यांच्या वासना नष्ट होतात.

आपणास पुष्कळ द्रव्य मिळावे अशी दरिद्री मनुष्याची जबरदस्त वासना असते, पण तदनुसार त्याचे कर्म नसल्यामुळे त्याला द्रव्य मिळत नाही. परंतु वासना मात्र त्याला दुःख देण्याला कारण होते.


वासनेवांचून केवळ कर्म फळ न देवो, पण दुःखहि देत नाही. कर्मावांचून केवळ वासना असल्या तर त्याला फल कांही देत नाहीत पण दुःख मात्र देतात. ज्ञानावाचून वासनेचा क्षयच होत नाही.

वासनेचे तीन संवेग आहेत. मृदु, मध्य आणि तीव्र. संवेग म्हणजे चिंतन.
एखाद्या वस्तूची कल्पना किंवा ध्यान मनांत येणे, हा **मृदुसंवेग** होय.
वस्तु स्वप्नासारखी दिसणे हा **मध्यसंवेग** आहे. व
जागृतीत वस्तु प्रत्यक्ष होणे याला **तीव्रसंवेग** म्हणतात.

## साक्षी संवेगांपासून वेगळा

परब्रह्म कोणत्याच संवेगात लिप्त नाही. जागृतीत तीव्र वासनेचा संवेग असतो. **साक्षी** तसाच आहे. तो तिन्ही संवेगांना जाणतो. त्यामुळे त्याला कोणताच संवेग नाही. सृष्टि उत्पन्न होवो किंवा तिचा प्रलय होवो आत्मा तसाच आहे. तो उत्पन्न होत नाही व लय पावत नाही. आत्मा म्हणजे जीव. हा कधीच जन्माला आला नाही, किंवा मृत्यु पावणार नाही. तसेच त्याला बंधमोक्षहि नाहीत. वास्तविक पाहता ईश्वर नाही, जीव नाही, स्वर्ग नाही, नरक नाही. देहादिक दृश्य पदार्थ नाहीत व आपल्याला काही नाही असे जे वाटते, तेहि नाही. परंतु जोपर्यंत आपल्यास भास होत आहे, तोपर्यंत सर्व काही आहे.

**न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ।**
**न मुमुक्षुर्न वै मुक्तः इत्येषा परमार्थता ॥**

उत्पत्ति नाही, प्रलय नाही, बद्ध कोणीच नाही, साधक कोणीच नाही, मुमुक्षु कोणी नाही, मुक्तहि कोणीच नाही, परमार्थतः अशा प्रकारची स्थिति आहे. ही स्थिति उत्पन्न होत नाही. आपणास जोपर्यंत हे दृश्य जगत् भासते, तोपर्यंत साधनाची अपेक्षा आहे.

## स्वप्न विचार

हा तुझा स्थूल देह स्वप्नांतहि नेता येत नाही. कारण तेथे दुसरा देह असतो. स्वप्नांत जावयाचे असल्यास प्रथम आपले मन या स्थूल देहापासून निराळे काढून निद्रेंत जावे लागते आणि नंतर जीव स्वप्नांतला देह घेतो.

पुष्कळांचे मत असे आहे की, ''मन म्हणजे जीव स्वप्नांत देहाहून बाहेर जातो व मग सगळे पदार्थ पाहतो.'' हे मत चुकले आहे. सांख्य, योगी, नैय्यायिक असे म्हणतात की, स्वप्नांत जीव या स्थूल देहाबाहेर जाऊन बाहेरचे खरे पदार्थ पाहतो, म्हणून स्वप्न खोटे नाही, खरे आहे.

''वेदान्त स्वप्न खोटे मानतो.'' त्यांचे हे म्हणणे बरोबर नाही, कारण स्वप्नांत आपण काशीस जातो व गंगेत स्नान करतांना बुडतो, तेव्हा घाबरून मोठ्याने ओरडतो. आपण ओरडलो म्हणजे घरची जवळ असलेली माणसे आपल्यास हाक मारतात व त्यामुळे आपण जागे होतो. तेथून काशीस हाक ऐकू जात नाही. यावरून स्वप्नांत जीव आपल्या हृदयांतच अनेक ब्रह्मांडे निर्माण करितो, असा अनुभव आहे. याच अर्थाची श्रुतिहि आहे, जीव या ठिकाणीच स्वप्नांत सर्व पदार्थ तयार करितो. देहाबाहेर जात नाही.

पुनः असे की, येथून काशीस हाक ऐकू जात नाही, ही गोष्ट लेकरालाहि समजते. जडशास्त्रवादियांचे (इंग्लिश सायंस) मत असे आहे की, मनुष्याची हाक हजारो-लाखो-मैलपर्यंत ऐकू जाते. तारायंत्राने हजारो लाखो-मैलपर्यंत शब्द नेता येतात. परंतु ते शब्द वाऱ्यांतून, तारातून स्थूल भूतांचा आश्रय करून जातात. जीव सूक्ष्मभूताने (देहाने) गमन करतो. स्थूलदेहाने जात नाही. स्थूलदेहाने मारलेली हाक सूक्ष्मदेहाला ऐकू येत नाही. कारण स्थूल आकाशाचा शब्द सूक्ष्म आकाशांत जाईपर्यंत शब्दच नाहीसा होतो.

कोणी म्हणेल की, स्वप्नांत जीव हीच (स्थूल देहाची) इंद्रिये घेउन जातो. हे म्हणणेहि बरोबर नाही. कारण तो तेथे ओरडतो, तो याच तोंडाने ओरडतो. सर्व इंद्रिये येथेच असतात. कान, नाक, तोंड वगैरे दुसरे नसतात. दुसरी इंद्रियेहि उत्पन्न होत नाहीत. कारण ''विदेहमुक्तिपर्यंत एकच लिंग-शरीर कायम असते.'' दुसरे लिंग शरीर मिळत नाही. त्यामुळे दुसरी इंद्रिये उत्पन्न होऊ शकत नाहीत. कारण इंद्रियावांचून जीव गमनागमन करू शकतो, असे मानल्यास तो लिंग शरीररहित जातो असे म्हटल्यासारखे होईल. येथून जीव इंद्रियावांचून म्हणजे लिंग शरीररहित जातो असे म्हटले तर तो जीव नव्हे. तो परमात्मा आहे. कारण लिंग शरीररहित जीवाला गमनागमन नाही. म्हणून स्वप्नांत जीव बाहेर जात नाही.

गौतम, पातंजली, कापिल हे सर्व स्वप्नांत जीव बाहेर जातो असे म्हणतात. ते सर्व चुकले आहेत, कारण श्रुतिवाक्य त्यांच्यापेक्षा जास्त प्रमाण आहे. ते आमच्यापेक्षा मोठे आहेत ही गोष्ट खरी, पण परमेश्वरापेक्षा काही मोठे नाहीत. त्यांचे वाक्य परमात्मप्रणीत वेदांपेक्षा श्रेष्ठ नाही आणि पुनः अनुभवविरुद्ध आहे. कारण त्याची (जीवाची) हाक येथे ऐकू येते, म्हणून स्वप्नांत जीव बाहेर जतो हे म्हणणे बरोबर नाही.



देवी म्हणाली, ''लीले! आपल्या वासनेने स्वप्नांत दुसरा देह उत्पन्न होतो. या देहाला स्वप्नांत नेता येत नाही. स्वप्नांत जातांना जर या देहापासून बाहेर निघावे लागते (हा देह सोडावा लागतो ) तर मग पूर्वजन्माच्या देहामध्ये हा स्थूल देह कसा नेता येईल बरे? याचा तूंच नीट विचार कर. याकरिता तूं आपली वासना या स्थूलदेहापासून काढून सूक्ष्म कर, म्हणजे लिंग शरीराने तेथे जाता येईल. तुला पूर्वी सांगितले आहे की, सगळे देह दहराकाशांत असतात. नाश पावत नाहीत. याकरिता तूं या स्थूल देहाचा अभिमान सोडला म्हणजे मग तुला त्या पूर्वजन्मीच्या देहात प्रवेश करता येईल.''

लीला म्हणाली, ''अंबे ! वासना सूक्ष्म कशी करता येईल?''

## देह विचार

देवी म्हणाली, ''पाण्याच्या तीन अवस्था आहेत. बर्फ, पाणी आणि वाफ. बर्फाला अग्नि लावला तर त्याचे पाणी होते. फारच अग्नि दिला तर वाफ होते. बर्फाप्रमाणे वासनेने हा स्थूल देह तयार झाला आहे. ज्ञानरूपी अग्नीच्या योगाने पाण्याप्रमाणे हा देह विरतो व वासनामय होतो. (सूक्ष्म होतो) ज्ञानरूपी अग्नीची फारच उष्णता लागली तर वाफेप्रमाणे वासनाहि नाहीशी हाते. पण अर्धे ज्ञान झाले तर कोणताहि देह घ्यावयाचे साधेल. याकरिता तूं ज्ञान प्राप्त होण्याकरिता अभ्यास कर. तुला अर्धे ज्ञान होईल तेव्हा या शरीरापासून तुझी वासना निवृत्त होऊन तुला कोणत्याहि जन्मांतील देहात जाता येईल.''

भगवतीच्या सांगण्याचा आशय असा :- विश्वामित्रासारखे महान् योगी जे आहेत ते देखिल अर्धज्ञानानेच चमत्कार दाखवीत होते. पूर्ण ज्ञानांत चमत्कार दाखविता येत नाहीत; कारण चमत्कार दाखविताना, चमत्कार दाखविणारा व चमत्कार दाखविणे, असे द्वैत पाहिजे म्हणजे चमत्कार दाखविता येतो. आपला आपल्यालाच चमत्कार दाखविता येत नाही. कारण मोठेपणा व लहानपणा हा बुद्धीचा धर्म आहे, आत्म्याचा नाही.

ज्यांचा मोठेपणा, लहानपणा निवृत्त झाला आहे त्यांना चमत्कार दाखविण्याची बुद्धिच होत नाही.'' कोणताहि पक्ष असो. चमत्कार दाखविण्यासाठी असो किंवा मुक्तीसाठी असो, अर्धवट ज्ञानाने तुझी वासना पाण्यासारखी होईल व मग तुला कोणत्याहि देहात शिरता येईल, आणि पूर्ण ज्ञान होईल तेव्हा तूं मुक्त होशील.

याप्रमाणे मुक्तीसाठी म्हण किंवा योग्यांच्या सिद्धि प्राप्त होण्यासाठी म्हण तुला ज्ञानाभ्यास केला पाहिजे. सिद्धीविषयी पातंजल योगशास्त्रांत असे सांगितले

आहे की, **''ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः''** सिद्धि या समाधीत विघ्नरूप आहेत. सिद्धि व्युत्थानांतल्या आहेत.

### चमत्कार तत्त्व

चमत्काराचे तत्त्व असे आहे की, एखाद्याला एखादी गोष्ट माहित नसली तर तो चमत्कार होतो. तीच गोष्ट वारंवार होऊ लागली तर चमत्कार होत नाही. विजेचे दिवे नवीन निघाल्यामुळे त्याचा आपणांस चमत्कार वाटतो. पण सूर्य किती मोठा प्रकाशमान आहे! तर तो रोज दिसतो म्हणून त्याचा चमत्कार वाटत नाही. **''ज्यांना चमत्काराची इच्छा आहे ते वासनावश आहेत असे समजावे.''** त्यांना एखादी नवीन गोष्ट दिसली म्हणजे चमत्कार वाटतो. इकडे पहिल्याने जेव्हा आगगाडी आली तेव्हा ते देवाचे विमान आहे असे समजून कित्येकांनी नवस केले. उमरावतीहून ६ कोसावर फुलआमले या नांवाचे एक खेडे आहे. तेथे माझ्या आजीचा भाऊ- बापूजी या नांवाचा राहात असे. तो माझ्या मामाचा मामा आहे. मी तेथे असतांना मला दातांचा रोग झाला होता. दातांतून रक्त पडे. त्याकरिता माझ्या मामाची माय कौसल्या मामी हिने नवस करून आगगाडीच्या पुलाखाली नारळ फोडले.

याप्रमाणे कोणतीहि नवीन गोष्ट दिसली तर चमत्कार वाटतो. सर्व चमत्कार अर्धवट ज्ञानाने दाखविता येतात.

॥ हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

**॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥**

# २१. ब्रह्माभ्यास

भगवती म्हणाली, ''लीले ! आपली वासना सूक्ष्म करण्याची तूं खटपट कर. वासना सूक्ष्म झाल्या नाहीत तर जीवनन्मुक्तिसुख प्राप्त होत नाही व पूर्ण ज्ञान होत नाही तोपर्यंत तूं आपला देह या ठिकाणी स्थापन करून आपल्या इच्छेप्रमाणे दुसरा जन्म पाहावयास जा.''

देवीचा आशय असा की, ज्याप्रमाणे पाण्याची किंवा कठीण अशा मातीच्या ढेकळाची पुतळी बनविता येत नाही, ओल्या मातीचीच पुतळी करता येते त्याप्रमाणे आत्मा सर्वव्यापक असल्यामुळे त्याला गमनागमन नाहीत. आत्मस्वरूपाने दुसरा जन्म पाहता येत नाही व स्थूल देहानेहि दुसरा जन्म पाहतां येत नाही. कारण स्थूल देहाला तेथे जाण्याकरिता हजारो अडथळे आहेत. म्हणून आत्म्याचे प्रतिबिंब ज्यात


पडले आहे असे जे चित्त (सूक्ष्मदेह) तेच जन्मांतरात जाण्यास योग्य आहे.

### योग्यांचे जन्म

दुसरा जन्म दोन प्रकाराने घेता येतो. एक कर्माच्या योगाने व दुसरा आपल्या इच्छेने. जसे चोरी केली व पकडला गेला तर सरकारचे दूत नेतील तिकडे (कैदेत) त्याला मुकाट्याने जावे लागते. पण आपण घोड्यावर बसून मित्राच्या घरी जातो ते आपल्या इच्छेने जातो. त्याप्रमाणे –

ज्यांनी योग केला असतो ते शरीरापासून आपले मन वेगळे करून इच्छेने दुसऱ्या जन्मात जातात. इतर लोक मेल्यावर कर्माच्या योगाने यमाच्या स्वाधीन होऊन त्याच्या आज्ञेने कर्माप्रमाणे त्यांना दुसरा जन्म घ्यावा लागतो.

याकरिता तूं आपला हा स्थूल देह येथेच ठेऊन आपले मन सूक्ष्म करून दुसरा जन्म पाहावयास जा. योगी देखील अपूर्णच असतात. पूर्ण अशा ज्ञानी पुरुषाला गमनागमन नाही. पूर्ण ज्ञानी पुरुषासंबंधाने वेदांचा असा आशय आहे की, ''ज्ञानी पुरुषाचे प्राण या लोकांत किंवा परलोकांत गमन करीत नाहीत, तर याच ठिकाणी लीन होतात,'' असे श्रुति सांगते.

### ज्ञान व योगसिद्धी : परस्पर भिन्न

टीकाकारांचा आशय हा आहे की, (प्रश्न करणाऱ्याचे म्हणणे टीकाकाराने कबूल करून ते असे म्हणतात की) ज्ञान व योगसिद्धी हे दोन्ही निरनिराळे आहेत.
* योगसिद्धि चित्ताच्या एकाग्रतेवर अवलंबून आहे.

* ज्ञान हे त्याच्या उलट आहे. म्हणजे आत्मा कर्ता व भोक्ता नसून, तो असंग, पूर्ण सृदािनंदानंत स्वरूप आहे. तो मागे कधीहि बद्ध नव्हता, आताहि बद्ध नाही व पुढे कधीहि बद्ध होणार नाही, असा आहे. याप्रमाणे आत्म्याला यथार्थ ओळखणे हे ज्ञान आहे.

मला चित्त एकाग्र केले पाहिजे, म्हणून आत्मा कर्ता आहे, अशी बुद्धि योग्याला धारण करावी लागते, म्हणून **ज्ञान योगाच्या विरोधी आहे.** म्हणूनच चूडाला राणीने, ज्ञान होऊनहि आकाश गमनादिकांसाठी योग निराळा साधला.

### कर्म, उपासना व योग, मंद ज्ञानाच्या विरोधी

कोणी म्हणेल की, योग जर ज्ञानाच्या विरोधी आहे तर मग ज्ञान झाल्यावर योगाचे साधन कां करावे? हे म्हणणे ठीक आहे. परंतु योग, उपासना व कर्म हे मंद ज्ञानाच्या विरोधी आहे, दृढ ज्ञानाच्या विरोधी नाहीत.

**दृष्टांतः-** वारा अग्नीच्या विरोधी आहे. लहान अग्नि म्हणजे दिवा वाऱ्याच्या विरोधी आहे. कारण वाऱ्याने तो विझून जातो पण वणवा पेटला असता, तर वारा

त्याच्या विरोधी न होता उलट त्याला साहायक होतो व वणवा जास्तच भडकतो.

त्याप्रमाणे कर्म, उपासना व योग हे मंद ज्ञानियाला (म्हणजे आत्मा कर्ता व भोक्ता नाही असे दृढ ज्ञान झाले नाही त्याला) विरोधी आहेत. कारण मंद ज्ञानियाला कर्माचा त्याग करावा लागतो. तो कर्म करूं लागला तर त्याचे ज्ञानानुसंधान सुटण्याचा संभव असतो. उपासनेतहि मी लहान (नीच) असून उपास्य देवता मोठी (श्रेष्ठ) आहे, असा सेव्यसेवक भाव ठेवावा लागतो.

**दृष्टांतः-** एका माणसाजवळ हजार तिफणीची जमीन असून तो कर्जबाजारी असला व दुसऱ्याजवळ थोडीशीच जमीन असून त्याला जर कर्ज नसले, तर कर्ज नसणारा जास्त सुखी असतो.

त्याप्रमाणे कितीहि चांगला मनुष्य असून कर्मोपासना उत्तम करीत आहे पण अज्ञानी आहे; तर थोडा ज्ञानी असून कर्मोपासना न करणारा त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे, असे समजावे.

पुनः असे की, मंद ज्ञानी पुरुषाला कर्मोपासना विहीतहि नाही. रात्री सूर्याचा उजेड नसल्यामुळे दिव्याने प्रकाशाचे काम भागवावे लागते. त्याकरिता सूर्योदय होईपर्यंत दिव्याचे वाऱ्यापासून रक्षण केले पाहिजे,

त्याप्रमाणे जोपर्यंत आपल्या हृदयातले अज्ञान मंद ज्ञानाने दूर करावयाचे आहे, तोपर्यंत कर्मोपासना व योग करणे ज्ञानेच्छु पुरुषास (योग्य) विहित नाही. कारण कर्मोपासना व योग हे करतांना ''मी कर्मोपासना करीत आहे'' अशी बुद्धि आत्म्याच्या ठिकाणी स्थापन करावी लागते. याकरिता मंद ज्ञानियाला, ज्ञान दृढ होण्याकरिता कर्मोपासना व योग यांचा त्याग करावा लागतो. त्याने तसे न केले तर त्याच्या चित्तांत वारंवार विक्षेप उत्पन्न होऊन त्याच्या वृत्तीचें वारंवार व्युत्थान होईल. याकरिता त्याने श्रवण करावे. परंतु कर्मोपासना किंवा योग करू नये. जर करील तर तो आरूढपतित समजला जाईल. एका रिकाबींत पाय ठेवून दुसऱ्या रिकाबीत पाय ठेवता ठेवता खाली घसरून पडणे याला आरूढपतित म्हणतात. दृढ ज्ञान झाल्यावर कर्मोपासना व योग या कशाचीहि जरूर राहात नाही. तरीपण दृढ ज्ञानियाने लोक संग्रहाकरिता तसे केले तर काही हरकत नाही. त्यापासून त्याचे कोणत्याहि प्रकारचे नुकसान होत नाही. - परंतु मंद ज्ञानियाने कर्मोपासना व योग केला तर त्याला श्रवणाचा परित्याग करावा लागेल व त्यामुळे ते विसरून जाण्याचाहि संभव आहे. चूडाला ही दृढ ज्ञानी होती. तिने पुढे आकाशांत उडण्याकरिता योगाभ्यास केला. त्याप्रमाणेच जनकाने राज्य केले, वसिष्ठाने उपाध्यायपणा केला. या सर्वांचे ज्ञान दृढ झाले होते. ''आत्मा कर्ता आहे'' अशी त्यांची बुद्धि कधीहि होत



नसे.

पण मंद ज्ञानियाला कर्मादिकांचा त्यागच करणे विहीत आहे.

भगवती म्हणाली, ''लीले! तुला अजून मंद ज्ञान देखील झाले नाही. कारण मंद ज्ञान व तीव्र (दृढ) ज्ञान या दोहीचेंहि ''अज्ञान निवृत्ति'' हे एकच फल आहे.

**दृष्टान्त :-** दिवा किंवा सूर्य. या दोहोपासूनहि अंधार नाश हे एकच फल आहे. परंतु दिवा विझावयाची भीती असते तशी सूर्याला नसते. प्रकाश देणे हा दोघांचाहि एकच धर्म आहे. दिव्याने जितक्या प्रदेशांतला अंधार दूर होतो, तितक्याच जागेतील अंधार सूर्यानेहि दूर होईल. त्याप्रमाणे अज्ञान दूर करण्याला मंद बोध व दृढ बोध हे दोन्ही सारखेच आहेत. अज्ञान दोघांपासूनहि निवृत्त होते. पण मंद ज्ञानाचा नाश होण्याचा (म्हणजे ते विसरून जाण्याचा) संभव आहे. तसा दृढ बोधाचा नाश कधीहि होत नाही''.

भगवती म्हणाली, ''लीले! तुला अजून मंद बोधहि झालेला नाही. कारण 'मला पूर्वजन्म दाखीव, जन्मांतर पाहण्याचे मला फार कौतुक वाटते,' असे तूं मला म्हणत आहेत.

मंद ज्ञानी व दृढ ज्ञानी या दोघांनाहि जगत् मिथ्या आहे, असे सारखेच वाटत असते. जगांतील कोणत्याहि गोष्टीचे त्यांना कौतुक वाटत नाही. त्यांचा हर्ष शोक निवृत्त झालेला असतो.

तुला तर तुझा पूर्वजन्म पाहण्याचे कौतुक वाटते. त्याअर्थी तुझा हर्षशोक गेला नाही देवी म्हणाली, ''लीले! तुला जर दुसरा जन्म पाहण्याची इच्छा आहे, तर तूं ह्या देहापासून आपले चित्त काढ व दुसऱ्या जन्मांत जाण्याकरिता अभ्यास कर.''

लीला म्हणाली, ''आई! अभ्यास कोणता करू? तो कसा करावयाचा? तो दृढ कशाने होईल? आणि तो दृढ झाल्याने काय होते? हे सर्व कृपा करून मला सांग.''

पातंजल योगशास्त्रांत निरनिराळ्या सिद्धि मिळविण्याकरिता निरनिराळ्या प्रकारचे अभ्यास सांगितले आहेत. तशा प्रकारचे निरनिराळे अभ्यास करून निरनिराळ्या सिद्धि मिळविणे चांगले नाही. कारण एका सिद्धीने मनुष्याच्या वासनेची तृप्ति न झाल्यामुळे दुसरी सिद्धि मिळविण्याकरिता त्याला दुसरा अभ्यास करावा लागेल.

**दृष्टांत :-** स्वतः स्वयंपाक करून जेवणारा एक पुरुष आहे. व दुसरा आपले पोट भिक्षा मागून भरणारा आहे. त्या दोघांनाहि निरनिराळे प्ान्न खाण्याची

इच्छा झाली तर जो स्वयंपाक करणारा आहे, तो स्वतः एकाच गव्हाचे निरनिराळे पक्वान्न करून खाईल. भिक्षा मागणाऱ्याला एका एकाच्या घरून एक एक प्रान्न मागून आणावे लागेल. त्याप्रमाणे ईश्वराची धारणा करिताकरिता जर काही वासना राहिली, तर त्यानेच सर्व सिद्धि प्राप्त होतात. पण ईश्वरासंबंधी ज्याला काही एक माहिती नाही, अशाकरिता निरनिराळ्या सिद्धींसाठी निरनिराळे उपाय पातंजल योगशास्त्रांत सांगितले आहेत.

**उदाहरणार्थ,** हत्तीच्या बलाचे ध्यान केले असता हत्तीचे बळ येते. परंतु श्रीमद्भागवतस्कंध ११ अध्याय १५ त असे सांगितले आहे की, ज्या ज्या रीतीने ध्यान करावयाचे असेल त्या त्या प्रकारचे मलाच (परमेश्वरालाच) समजून ध्यान करावे, म्हणजे त्या त्या प्रकारची सिद्धि प्राप्त होते.

**उदाहरणार्थ,** परमात्माच हत्तीसारखा बलवान आहे, अशी भावना धरून अभ्यास केला तर हत्तीसारखे बल येते. तात्पर्य असे की, परमेश्वराच्या धारणेनेच सर्व सिद्धि प्राप्त होतात. अशा आशयानेच भगवती म्हणाली,

## योगी कुलात जन्म व सर्वशास्त्रपारंगतता

''लीले ! तूं ब्रह्मज्ञानाचा अभ्यास कर. कारण तो अभ्यास पूरा झाला तर (तूं पक्की झालीस तर) तुला मुक्ति मिळेल; व तो अभ्यास पूरा झाला नाही तर (त्यांत तूं कच्ची राहिलीस तर) तुला सिद्धि प्राप्त होतील''.

''योग्याचा अभ्यास पुरा न होता तो मध्येच मरण पावला तर त्याचे काय होईल?'' असा प्रश्न अर्जुनाने विचारला असता, भगवंताने गीतेत असेच सांगितले आहे. भगवान् म्हणतात.

**नहि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति ।**

जो चांगले करणारा आहे, तो वाईट गतीला कधीच जात नाही. तो मध्येच मरण पावला तर स्वर्गात किंवा ब्रह्मदेवाला इंद्राला योग्य अशा पुण्यलोकांस जातो. त्याठिकाणी तो वाटेल तसे भोग भोगतो, व पुनः -

**पृथ्वीवर योगीयाच्या कुलांत जन्म घेतो; आणि कोणी शिकविणारा नसला तरी आपोआपच सर्व शास्त्रे त्याच्या बुद्धीत येऊन तो सर्व शास्त्र पारंगत होतो.**

भगवतीने असा विचार केला की, लीला जर ब्रह्मज्ञानाभ्यासांत कच्ची राहिली तर ती उत्तम गतीला जाऊन पुनः येथे येऊन तिला सिद्धि प्राप्त होतील; आणि तिचा अभ्यास पक्का झाला तर ती ज्ञानी होईल. म्हणून तिला एक ब्रह्माभ्यासच सांगणे बरें. निरनिराळे उपाय करावयास नकोत.

**जसेः-** प्रत्येक रोग दूर करण्याकरिता निरनिराळे औषध घेतले तर ते देता



येणार नाही, व दिलेच तर त्याच्यापासून नुकसान होते. याकरिता सगळ्या रोगांना धरून एकच औषध देणे चांगले. त्यापासून नुकसान होत नाही. त्याप्रमाणे लीलेला एक ब्रह्माभ्यासच सांगावा, असा भगवतीने विचार केला; कारण त्यांत ती कच्ची राहिली तर तिला सिद्धि प्राप्त होतील व पक्की झाली तर मुक्त होईल.

## ब्रह्माभ्यास कसा करावा?

लीला म्हणाली, ''आई! अभ्यास कोणता करावयाचा ते सांग.''

भगवती म्हणाली, ''लीले! मी तुला आता अभ्यासाचे लक्षण सांगते, ते नीट ध्यानात धर. ब्रह्माभ्यासाचे लक्षण योग (प्राणायाम वगैरे), कर्म किंवा उपासना यांच्यासारखे नाही.''

लीला म्हणाली, ''ब्रह्माभ्यासाचे लक्षण कर्मासारखे कां नाही?''

भगवती म्हणाली, ''आपल्याजवळ नसलेली वस्तु कर्माच्या योगाने मिळवावी लागते. आत्मा तर आपल्या अतिशय जवळ आहे. किंबहुना आपणच आत्मस्वरूप आहोत. आत्मा कर्माच्या योगाने मिळवावा लागत नाही म्हणून कर्म करणे हा त्याचा अभ्यास नव्हे.''

उपासना म्हणजे स्वर्ग मिळविण्याकरिता सोळा सोमवारचे व्रत करणे, इत्यादि अनेक प्रकारच्या उपासना आहेत. ह्या उपासना करणेहि ब्रह्माभ्यास नव्हे. कारण उपासनेमध्ये मी लहान व उपास्य देवता मोठी अशी बुद्धि ठेवावी लागते. अशी बुद्धि ठेवणे ज्ञानाच्या विरोधी आहे.

दुसरे असे की, जी गोष्ट द्वैतबुद्धि वाढविते, ती करण्यांत काही अर्थ नाही. आपल्याला अद्वैतसिद्धांत साधावयाचा असल्यामुळे द्वैतबुद्धि दृढ करण्यात त्याचे फल नाही, म्हणून उपासना करणे हाहि ब्रह्माभ्यास नव्हे.

प्राणायाम (योग) हाहि ब्रह्माभ्यास नाही. कारण पोहणारे प्राणायाम करतात. पण त्यांना ब्रह्मज्ञान नसते. म्हणून प्राणायामादि अष्टांगयोग करणे हाहि ब्रह्माभ्यास होत नाही.

लीला म्हणाली, ''आई! तर मग ब्रह्माभ्यास कोणता? त्याचे लक्षण मला सांग''.

भगवती म्हणाली, ''सांगते. ऐक. अभ्यास म्हणजे संवय पाडणे. संवय म्हणजे इतर गोष्टीची आठवण न होऊन वारंवार तेच तेच (एकच गोष्ट) करणे किंवा इतर गोष्टीची आठवण न येऊन तीच वस्तु डोळ्यापुढे सारखी दिसत राहणे, याला अभ्यास म्हणतात. अभ्यासाचे फलहि हेच आहे.

त्याकरिता प्राणायामच केला पाहिजे, असे नाही. कोणतीहि वासना धरून

योग करता येईल. परंतु देह, मन व बुद्धि या सर्वांचा त्याग करून, देहावेगळे होऊन– ''मी या सर्वाहून निराळा सच्चिदानंदस्वरूपी आत्मा आहे'' असे चिंतन करणे फार कठीण आहे.

मी देह, मन, बुद्धि या सर्वांहून निराळा आत्मस्वरूप असा असून, माझा देह, मन, व बुद्धि इत्यादिकांचा काहीच संबंध नाही, अशा प्रकारचे नेहमी चिंतन करणे व दुसऱ्यासहि अशाचप्रमाणे नेहमी सांगणे, याला **ब्रह्माभ्यास** म्हणतात.

आपण स्वतः एकांती आत्मचिंतन केले, पण लोकांत जर दुसऱ्या प्रकारच्या व्यावहारिक गोष्टी सांगितल्या, तर दुसऱ्या प्रकारचेच चिंतन होते. याकरिता लोकांतहि त्याच गोष्टी सांगितल्या पाहिजेत, आणि परस्पर वादविवादही त्याचेच केले पाहिजेत. याप्रमाणे -

**एकांती आत्मचिंतन करणे,**
**लोकांती तेच सांगणे व**
**गुरुशिष्य नात्यानेहि परस्पर त्याच गोष्टी करणे,**
**त्याच्यावाचून दुसऱ्या गोष्टी वर्ज्य करणे**
**यालाच ब्रह्माभ्यास म्हणतात.**

आत्मा असाधारण आहे. तो कोणत्याहि साधनाने मिळविण्यासारखा नाही, कारण साधनाने मिळविलेली गोष्ट (वस्तु) नाश पावते. आत्म्याचा कधीहि नाश होत नाही. तो अमर आहे.

वडिलांनी मिळवून ठेविलेले शंभर वर्षाचे द्रव्य उधळ्या मुलगा थोड्याच कालात संपवून टाकतो. याप्रमाणे मिळवून ठेविलेली वस्तू संपून जाते, (तिचा नाश होतो) हा सिद्धांत आहे. आत्मा साधनांनी मिळेल तर तो नाश पावेल. आत्मा तर नित्य आहे. म्हणून तो मिळण्यासारखा नाही. त्याच्याकडे लक्ष्य लागल्यानेच तो मिळण्यासारखा आहे. म्हणून त्याचेच नेहमी एकांती चिंतन करावे, तेच दुसऱ्यासहि सांगावे, व परस्पर वादविवादहि त्याचाच करावा. याप्रमाणे हा अभ्यासाचा एक प्रकार सांगितला आता पुढे अभ्यासाचे दुसरे प्रकार भगवती लीलेला सांगते, ते पुढे सांगेन.

**॥ हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥**

०००



॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

# २२. श्रवण, मनन व निदिध्यासन

मंदबोध ज्याला झाला असेल, त्याच्या उपयोगी कर्मोपासना व योग नाहीत, पण दृढ बोध ज्याला झाला असेल त्याने कर्मोपासना व योग केले असता काही हरकत नाही आणि कर्मोपासना व योग हे आत्मज्ञान होण्याकरिता हेतुहि नाही, असे काल सांगितले.

भगवती म्हणाली ''लीले! या आत्म्याला जाणण्याकरिता श्रवण, मनन व निदिध्यासन याशिवाय दुसरा मार्गच नाही. श्रवण, मनन आणि निदिध्यासन हेच आत्मा जाणण्याकरिता हेतु आहेत. कारण भ्रमाने उत्पन्न झालेल्या वस्तुमध्ये क्रियासाध्य शांती होत नसते. (म्हणजे तिचा क्रियासाध्य नाश होत नसतो) तो (भ्रमनाश) दुसऱ्याने सांगितल्याने किंवा अधिष्ठान ज्ञानानेच होतो.

**अधिष्टान** म्हणजे ज्याच्यावर भ्रम भासतो ते.

हा भ्रम दोन-तीन प्रकाराने होत असतो. जसा जसा विकार असतो तसा तसा भ्रम होतो. जसे- रज्जूवर सर्प दिसतो. तो भ्रम दोरी दिसल्यानेच दूर होतो.

एका मनुष्याला कांटा रुतला व सर्प चावला असे त्याला वाटते; पण लोकांनी सांगितले की, सर्प चावला नाही. कांटाच रुतला होता, तर त्याला तसे पुनः पुनः मनन करावे लागते म्हणजे तो भ्रम दूर होतो. याप्रमाणे भ्रम जितका दृढ असेल तितकी श्रवण, मनन, आणि निदिध्यासन या तिहींची अपेक्षा लागते.

## बुद्धीचे तीन दोष

आपल्या बुद्धीत तीन दोष आहेत. १. एक अज्ञान म्हणजे वस्तु न कळणे. २. रा संशय म्हणजे हे बरे आहे की ते बरे आहे? असे वाटणे. ३. रा भलतेच बरे वाटणे. यालाच आवरण, असंभावना व विपरीत भावना म्हणतात.

**१. आवरण** - ''मला आत्मा ठाऊक नाही, मला आत्मा कळत नाही,'' अशा बुद्धीला आवरण म्हणतात. आवरण म्हणजे झांकण.

**२. संशय** - आत्मा सत्य आहे की संसार सत्य आहे? अशी जी बुद्धि आहे तिला 'असंभावना' किंवा संशय म्हणतात.

**३. विपरीत भावना** - संसारच सत्य आहे, आत्मा सत्य नाही, असे भलतेच धरून बसू नये; अशी जी बुद्धि ती विपरीत भावना म्हणावी.

**१.** आत्मा आहे व तो देहादिकांहून निराळा आहे, अशा श्रवणाने आवरण दूर होते. श्रवणकाली आपण आत्मा हा शब्द ऐकतो, तो समजून घेण्याकरिता तरी

आपणास देहादिकांहून आत्मा निराळा आहे, असे वाटते. आत्मा शब्दानेच म्हणजे श्रवणानेच कळतो.

**२.** असंभावना म्हणजे संशय. तिचा नाश होण्याकरिता मनन केले पाहिजे. मनन म्हणजे जे वेद सांगतील तीच वस्तु तर्काने दृढ करणे व इतर वस्तु काढून टाकणे.

**३.** संसारच सत्य आहे, आत्मा वगैरे काही नाही, ही विपरीत भावना निदिध्यासनाशिवाय श्रवणाने किंवा मननाने दूर होऊ शकत नाही.

## गुरुसेवा

गुरुजवळ जे नेहमी राहतात, त्यांना श्रवण, मनन आणि निदिध्यासन हे तिन्हीहि एकदमच घडतात. (होतात) कारण त्यांना गुरुमुखाने **श्रवण** होते, वारंवार चर्चा चालत असल्यामुळे **मनन** होत असते आणि गुरूने घालून दिलेल्या नियमांप्रमाणे वागल्याने **निदिध्यासन** होत असते.

भारतात असे सांगितले आहे की, जे कुशल नाहीत त्यांनी गुरुवचनावर विश्वास ठेवावा. आपल्या मनुष्याला संवयीमुळे घरांत चांगल्या तऱ्हेने वापरता येते, त्याप्रमाणे जे स्वतः कुशल नसतात, त्यांचा गुरुजवळ राहिल्याने सहजच अभ्यास होतो.

गुरुकुलाचे ठिकाणी ज्यांचा वास नसतो, त्यांना शास्त्रावरून श्रवण होते. मनन आणि निदिध्यासन त्यांना आपल्या बुद्धीने करावे लागतात. मननाचे व निदिध्यासनाचे ठिकाणी देवताकृत विघ्ने पुष्कळ असतात. ते दूर करण्याकरिता स्वतःच अज्ञ जीव समर्थ नसतो. गुरुसन्निध राहिल्याने ती विघ्ने बाधत नाहीत. आणि श्रवण, मनन, व निदिध्यासनाचे फार क्लेशहि होत नाहीत. तथापि -

### गुरु कोणी करूं नये? : संशयी व कर्मनिष्ठांनी

कोण साधु आहे? कोण साधु नाही?
अशा प्रकारचा सत्संगाचा ज्याला संशय असेल,
अशाने आपल्या घरीच राहून शास्त्रांचा विचार करावा.
गुरुजवळ किंवा साधुजवळ जाऊ नये.

आतां गुरुवाचून शास्त्रांचा सम्यक् बोध होत नाही हे जरी खरे आहे, तरी ज्याला त्यांच्याबद्दल संशय आहे, त्यांनी त्यांच्याजवळ जाण्यांत काही अर्थ नाही.



त्यातहि धर्मनिष्ठ कर्म करणारा जो असेल त्याने संताजवळ जाऊच नये. कारण कर्मवादी म्हणतात की, 'अमुक प्रकारांनी वागणारा असेल तरच तो संत.' असा त्यांचा ग्रह झालेला असतो.

जसे - सकाळी पंच पंच उषःकाळी उठावे, मोरांचे पिसांनी डोळ्यांतील अश्रु धुऊन टाकावे. नाकातली मेकडे चांगली काढावी. शौचास मातीचे गोळे घ्यावे, स्नानसंध्या करावी, वगैरे वगैरे प्रकारांनी वागणारा असेल तोच सत्पुरुष! असे त्यांनी सत्पुरुषाचे लक्षण ठरविलेले असते.

## महात्म्यांचे प्रारब्ध भिन्न-भिन्न

परंतु वास्तविक तसा काहीच नियम नाही. कारण प्रत्येकाचे प्रारब्धकर्म भिन्न भिन्न असते. सर्व सत्पुरुषांचे ज्ञान एक असले तरी त्यांचे प्रारब्ध एक राहात नाही.

दृष्टांत :- ज्याला दोरीवर सर्प दिसतो, त्याला भीती उत्पन्न होते आणि ज्याला शिंपेवर रुपे दिसते त्याला लोभ होतो. भीती व लोभ हे परस्पर विरुद्ध धर्म आहेत. भीतीत वस्तू दूर जावी, असा तिचा द्वेष उत्पन्न होतो. लोभाने वस्तु जवळ यावी, अशी तिची प्रीति उत्पन्न होते. याप्रमाणे रागद्वेष हे परस्पर विरुद्ध धर्म आहेत, पण अधिष्ठानाचे ज्ञान झाले म्हणजे रुपे व लोभ दोन्हीहि निवृत्त होतात. त्याचप्रमाणे रज्जुरुपी अधिष्ठानाचे ज्ञान झाले म्हणजे सर्प व भीती ही दोन्ही निवृत्त होतात. पण भीतीचे संस्कार- थरथर कापणे, घाम येणे, हे काही वेळपर्यंत कायम राहतात. त्याचप्रमाणे हे रुपे आहे, ते मी घ्यावे अशी इच्छा असते, पण ते रुपे खोटे ठरले म्हणजे खिन्नपणा राहतो.

याप्रमाणे नानाविध भ्रम आहेत. कर्मेहि नाना आहेत आणि प्रारब्धहि नाना आहेत पण आत्मे नाना नाहीत. आत्मा सर्वांचा एकच आहे. म्हणून साधूचे लक्षण एकच ठरलेले नाही. प्रारब्धाने काही साधु सदाचरणी असतात, व कांही दुराचरणीहि असतात. दुराचरणी साधु आढळला तर त्याच्याकडे जाऊ नये.

**उत्तम जिज्ञासू सत्पुरुषाच्या ब्रह्मज्ञानाकडेच पाहतो,**
**त्याच्या आचरणाकडे पाहात नाही.**

ही गोष्ट मी आपल्या पदरची सांगतो असे नाही, तर वेदाचे कालापासून व इतिहासाचे कालापासून असेच होत आले आहे. वेदांत व इतिहासांत अशा पुष्कळ कथा आहेत.

* याज्ञवल्क्याने जनकाला ब्रह्मज्ञान सांगून त्याच्यापासून दोन मुली घेतल्या व पुढे संन्यास घेतला.

* वामदेवाला गर्भातच ज्ञान झाले व वेश्येशी संयोग करीत राहिले.
* जनक ब्रह्मज्ञानी असूनहि राज्य करीत होते.
* श्रीरामाला वनवास भोगावा लागला.
* पराशराला ढीवराचे ठिकाणी व्यासाची उत्पत्ति करावी लागली.
* इंद्राच्या अंगावर अहल्येच्या शापामुळे सहस्त्र छिद्रे पडली.
* वसिष्ठाला कल्पपर्यंत पुत्रशोक करावा लागला.
* शंकराचे लिंग गळाले.
* ब्रह्मदेवाचे पांचवे शीर तुटले.
* शंकराच्या शापाने व्यास गद्धे बनले.
* धर्माचा आंगठा गळाला.
* अर्जुनाला स्त्रीचे रूप घेऊन विराटाच्या घरी राहावे लागले.
* श्रीकृष्णाच्या सोळा हजार बायका कोळयांनी नेल्या.
* तुकारामाला खावयास मिळत नसे.
* एकनाथाच्या घरी हजारो उत्सव होत असत.
* असे दुःखरूप प्रारब्ध पुष्कळांचे आहे. तात्पर्य, प्रत्येकाचे प्रारब्ध भिन्न भिन्न आहे.

**वेश्यारतो वामदेवो, देवलो मांसभक्षकः।**
**एतेषामेकधा ज्ञानं व्यवहाररतु पृथक् पृथक् ॥**

* देवल मांस खात असत.
* रावण स्वभावातः गाई ब्राह्मणांना ताप देणारे होते. तथापि ते महात्मे होते.

**कृष्णो भोगी शुकस्त्यागी नृपौ जनकराघवौ ।**
**वसिष्ठः कर्मकर्ता च त एते ज्ञानिनः समाः॥**

* श्रीकृष्ण सोळा हजार स्त्रियां भोगीत होते.
* शुकाचार्य त्यागी होते. ते मुहूर्तभर एके ठिकाणी राहात नसत.
* जनक व श्रीराम हे राज्य करीत होते.
* वसिष्ठ उपाध्यायपणा करीत होते.
* नारदाला कळी लावण्याची संवय होती.

ह्या संवयी प्रारब्धाने प्रेरित असल्यामुळे महात्मे दूर करीत नाहीत.

**ओवी :- शुका न मिळे लंगोटी । जनक बैसे राज्यपटी ।**
**वसिष्ठ पौरोहित्यासाठी । दर्भ तोडी ॥**



तात्पर्य :- प्रत्येकाचे प्रारब्ध भिन्न भिन्न आहे. त्यामुळे ब्रह्मज्ञान दृढ असेल तर सत्पुरुषांचे अमुक एकच लक्षण असले पाहिजे या म्हणण्यांत काही अर्थ नाही. सर्वांना एकच स्वप्न दिसावे, असा नियम नाही. स्वप्नाचा पाहणारा आत्मा मात्र एक आहे. म्हणून कित्येक कर्मवादी, अमुक एका विशिष्ठ प्रकाराने वागणारा असला तरच साधु, याप्रमाणे त्यांना आवडेल तसे ते साधूचे लक्षण करतात; व तसा वागणारा साधू नसला, तर त्याला सोडून देतात.

अशा लोकांनी साधूकडे मुळीच जाऊं नये.

आपल्या घरीच राहून शास्त्रीय विचार करावा.

जो ब्रह्मज्ञानाकरिता वेडा झाला आहे त्याने मात्र महात्म्याजवळ अवश्य जावे, कारण त्याला ब्रह्मज्ञानावाचून दुसऱ्या कशाचीहि गरज नसते.

भगवति म्हणाली, ''लीले! श्रवण, मनन आणि निदिध्यासन यांचा अभ्यास करणारे तीन प्रकारचे लोक आहेत.

## तीन प्रकारचे अभ्यासक

(१) शास्त्राने व तर्काने जगत् मिथ्या असून ब्रह्मच सत्य आहे, असा ज्याचा निश्चय होतो ते कनिष्ठ.

(२) ज्याला जगन्मिथ्यात्व चांगले समजले आहे पण ते दृढ करण्याकरिता जे निदिध्यासनाचा अभ्यास करितात ते मध्यम आणि

(३) ब्रह्मज्ञान व जगन्मिथ्यात्व दृढ झाले असून ज्यांचे सर्व व्यवहार लीलेने चालतात ते उत्तम.

असा अभ्यास पूर्ण झाला असतांना जे ज्ञान होते, त्याने तिन्ही काली जगत् झाले नाही, असा अनुभव येतो. जसे— रज्जुवर सर्प कधीच उत्पन्न झाला नाही, झाला असतां तर त्याचे प्रेत सांपडले असते. तसे दिसत नाही, म्हणून रज्जूला त्याचा संस्पर्शहि झाला नाही, व त्याचा रज्जूत नाशहि झाला नाही, म्हणजे रज्जूत सर्प मिळूनहि जात नाही. आता रज्जुवर सर्प भासतो तो वास्तविक नसून भ्रमाने भासतो. त्याप्रमाणे विश्व केव्हाहि उत्पन्नच झाले नाही, असाच दृढ ज्ञानियाचा अनुभव असतो.

**रज्जौ भुजंगो भयदो यथैव । न जायते नास्ति न चैति नाशम् ॥**
**त्वन्मायया केवलमात्तरूपम् । तथैव विश्वं त्वयि नीलकंठ ॥ शिवगीता ॥**

राम म्हणतात, हे नीलकंठ! रज्जूवर सर्प उत्पन्न होत नाही, रज्जूवर सर्प नसतो व रज्जूत त्याचा नाशहि होत नाही. परंतु रज्जुवर सर्प भ्रमाने भासतो व भीती उत्पन्न करतो. त्याप्रमाणे तुझ्या मायेने हे विश्व भासते. वास्तविक ते कधीच उत्पन्न झाले नाही.

त्रिकालाबाधित एक ब्रह्मच सत्य आहे, अशी बुद्धि जेव्हा दृढ होते तेव्हा अभ्यास परिप्ï झाला असे समजावे. अभ्यास परिप्ï झाला म्हणजे अमुक गोष्ट घ्यावी किंवा अमुक गोष्ट टाकावी अशी बुद्धि होत नाही.

लहान मुली खेळावयाच्या भुलाईला मुलगी समजतात. त्या तिला स्नान घालतात, जेऊं घालतात. पण ही आवडती भुलाई आहे, असे त्यांना वाटत नाही. भुलाईचे ठिकाणी लहान मुलीची सत्य बुद्धि असते. पण तीच मुलगी मोठी झाली म्हणजे तिची भुलाईचे ठिकाणी अशी दृष्टि होत नाही. मी ही भुलाई खेळावयास घेतली आहे, असे तिला वाटते.

त्याप्रमाणे अमुक गोष्ट वाईट किंवा अमुक गोष्ट चांगली आहे, अशी महात्म्यांची बुद्धि होत नसते. त्यांना कोणत्याहि गोष्टींचा रागद्वेष होत नाही. कारण चांगली किंवा वाईट बुद्धि होण्याकरिता जगत् सत्य आहे असे वाटले पाहिजे. महात्म्याला जगत् मिथ्या आहे, असे भासते. त्यामुळे जगांतील अमुक गोष्ट खरी आहे किंवा अमुक गोष्ट खोटी आहे, असे त्यांना वाटत नाही. सर्व जगत् मिथ्याच आहे, असे ते समजतात. म्हणून ते आलेल्या भोगाचा त्याग करीत नाहीत. कारण त्यांना द्वेष नसतो आणि न मिळालेल्या भोगाची इच्छाहि करीत नाहीत. कारण त्यांना रागहि नसतो. याप्रमाणे ज्ञानी पुरुष प्राप्त भोगांचा त्याग करीत नाहीत व अप्राप्त भोगांची इच्छाहि करीत नाहीत.

ज्याला ज्ञान झाले आहे तो प्राप्त भोगांचा त्याग करितो असे काही ज्ञानी म्हणतात हे त्यांचे म्हणणे लोकांकरिता असले तर हरकत नाही. पण वास्तविक तसे नाही. कारण ज्ञान झाल्यावर त्यांना कोणतेहि कर्तव्य उरत नाही. त्यामुळे प्रारब्धाने जसे येईल तसे तो भोगतो व आचरण करतो.

कोणी म्हणतील की, तो जर चांगले वाईट आचरण करील तर लोक त्याची स्तुति किंवा निंदा करतील. पण तो निंदा किंवा स्तुति हेहि प्रारब्ध समजूनच भोगतो.

तात्पर्य :- सर्व व्यवहार प्रारब्धावरच अवलंबून असल्यामुळे ज्ञानी पुरुष हर्षविषादाला प्राप्त होत नाही. तो शांत निरालंब स्थितीत असतो. या स्थितीलाच **जीवन्मुक्ति** असे म्हणतात.

भगवती म्हणाली, ''लीले ! शिष्याला समाधि लागणे हे गुरूच्या अधिकारावर अवलंबून नसते.

जसे - लवकर जेवणे किंवा हळूहळू जेवणे हे कांही स्वयंपाक उत्तम करणाऱ्याच्या उत्तमपणावर अवलंबून नसते, तर भूक लागण्यावर अवलंबून असते. त्याप्रमाणे -



**गुरूने कितीहि ज्ञान सांगितले, पण शिष्य जर जिज्ञासू नसला तर ते पटत नाही, व समाधीहि लागत नाही.**

**पण शिष्य जर चांगला जिज्ञासू असला तर त्याला ज्ञान सांगण्याबरोबरच समाधी लागून जाते आणि -**

**आत्मचिंतन करीत असतांना इंद्रियादिकांचा विसर पडतो.**

लीला देवीला गुरु समजत असून ती उत्तम जिज्ञासू होती. पतीला पाहण्याची व जगत् कसे राहते, हे पाहण्याची तिची इच्छा होती. तसेच परब्रह्म कसे आहे व जगत् मिथ्या कसे आहे? हे जाणण्याची तिची जिज्ञासा होती.

उत्तम जिज्ञासू असून जर त्यांच्यात तर्क शिरला तर त्याला श्रुत्यनुसार ज्ञान सांगितले तरीहि पटत नाही.

उदाहरणार्थ :- लहान लेकरू आईच्या सांगण्यावरून भातके- साखर- कडू आहे म्हणून थुंकून टाकते. कारण आई कधीहि खोटे बोलणार नाही अशी त्याची बुद्धि असते.

आपल्या बरोबरीचा महात्मा असला तर दृढ बुद्धि होत नाही. ही देवी आहे, असा लीलेचा दृढ विश्वास होता. अज्ञानी लोकांचा विलक्षण (चमत्कारिक) गोष्टीवर विश्वास बसतो.

देवी जसे जसे सांगत असे तसे तसे लीलेचे अंतःकरण होत असे. हेच या आख्यानाचे तत्त्व आहे. देवीच्या वराने लीलेची बुद्धि निर्मल झाली होती, त्यामुळे देवी तिला जसे जसे सांगत असे तसे तसे तिचे अंतःकरणावर समाधी उत्पन्न होत असे. लीलेने देवी कल्पित केली होती. कल्पित पदार्थ तर्काने जसाच्या तसाच दिसत नाही. श्रद्धेनेच तसा दिसतो.

जसे - कोनाड्यांतल्या मूर्तीचे ठिकाणी हा कागदाचा तुकडा आहे, असे तर्क दृष्टीने पाहू लागले तर कल्पनेत मूर्ति राहणार नाही, पण भावनेने दृढ श्रद्धा ठेविली तर तशीच कल्पनेत मूर्ति राहील.

याप्रमाणे कल्पित वस्तु तर्काने दृढ होत नाही. श्रद्धेने दृढ होते.

**उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना ।**

अशी श्रुति सांगते. उपासकांच्या कार्यासाठी ब्रह्माचे ठिकाणी रूपाची कल्पना करावी लागते, अशी श्रुति सांगते. श्रुतीचा आशय असा आहे की,

**उपासनेत तर्काची आवश्यकता नाही, कारण श्रद्धेनेच ती वस्तु तशी भासते.**

एकतर लीलेने देवी कल्पित केली असल्यामुळे म्हणा किंवा तिच्या तपाने व व्रताने देवी तिच्यावर प्रसन्न झाली होती म्हणून म्हणा, लीलेचा विश्वासच देवीरूपाने

परिणाम पावून आविर्भूत झाला होता.

आपल्या इच्छेप्रमाणे व्रततपादिक केले असता देव प्रसन्न होतो. हे खरे आहे, तथापि आपल्या इच्छेने व्रतादिक करतांना शास्त्राप्रमाणे दृढ विश्वास होत नाही. कारण अज्ञानी लोकांना आपल्या स्वतःसंबंधानेच संशय असतो.

दुसरे असे की, आपण एखादी वस्तु पाहिली नसली म्हणजे ती कल्पनेमध्ये आणता येते, अशी आपली समज नाही. ती वस्तु अमुक प्रकारची आहे म्हणून शास्त्रावर विश्वास ठेवूनच मनुष्य तरूं शकतात. दुसऱ्या तऱ्हेने तरत नाहीत. देवी लीलेच्याच आधीन असल्यामुळे स्वप्नांत आपण आकाशांतून उडतो व त्याप्रमाणेच देवीहि आकाशांतून उडते, असा तिचा दृढ विश्वास होता.

## दिव्यदृष्टि म्हणजे आत्मदृष्टि नव्हे

भगवंताने अर्जुनाला जेव्हा विश्वरूप दाखविले. तेव्हा त्या ठिकाणी पांडव कौरवादिक सर्व होते. परंतु विश्वरूप एकट्या अर्जुनालाच दिसले, बाकीच्यांना दिसले नाही. देवाने अर्जुनाला **''दिव्यदृष्टि म्हणजे आपली सत्त्वमय निर्मळ बुद्धि दिली होती. दिव्यदृष्टि म्हणजे आत्मदृष्टि नाही.''** त्यात भगवान् कौरवादिकांना खाऊन राहिला आहे. आणि पांडवांचे रक्षण करीत आहे असे अर्जुनाने पाहिले. दिव्यदृष्टि मलिन आहे.

त्याप्रमाणे देवी ही जीव नाही, परमेश्वरच आहे (हे जाणून) तिच्या वचनावर पूर्ण विश्वास असल्यामुळे देवी जसे जसे सांगत असे तशी तशी तिला समाधी लागत होती.

वसिष्ठ म्हणाले, ''रामा! लीला समाधिस्थ होऊन लाकडासारखा तिचा देह पडला आणि भगवती व लीला दोघीहि समाधिस्थित झाल्या.

**॥ हरिः ॐ तत्सत् श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥**

०००



॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

***मातुःश्री रंगुआईला सांगितलेले निरूपण***

***अथ योगवासिष्ट***

( प्रथमावृत्ति यष्टि १८ वी )

# २३. परमार्थाचा उपदेश

### देवदूत व अप्सरा यांचा संवाद.

### भारद्वाज, इंद्र व देवदूत यांचा संवाद

**स्वर्ग गुण :-** राम व वसिष्ठ यांचा संवाद, स्वर्गात वाटेल ते भोग मिळतात. अमृतपान, विमानात बसणे, अप्सरा भोग इत्यादि.

**दोष :-** खालच्या संबंधाने गर्व, बरोबरीच्यांत कलह व परस्परांचा द्वेष. एकंदरीत स्वर्गात मन शांत राहात नाही व शांतिशिवाय सुख नाही; म्हणून स्वर्ग दुःखरूप आहे. पुण्य संपल्यावर पतन (म्हणून) स्वर्ग त्याज्य.

आत्मप्राप्तीची इच्छा करणे हाच प्रत्येकाचा पुरुषार्थ आहे. आपल्या जीवितात विचार करावयाच्या तीनच गोष्टी – शरीर, मन व आत्मा.

**शरीर** – हे प्रत्यक्ष असून जड म्हणून याविषयी विचार कर्तव्य नाही.

**मन** – ज्याच्या योगाने ज्ञान होते ते मन.

**आत्मा** – हा इंद्रियगोचर नसल्यामुळे तो दिसत नाही, म्हणून नाही असे नाही. उदा . डोळ्याने सर्व वस्तु दिसतात. परंतु तो स्वतः दिसत नाही, म्हणून नाही असे नाही. जसे :- स्त्रीला पतीचे नांव विचारणे. (पूर्वी स्त्री पतीचे नाव घेत नसे)

शरीर व मन नाहीसे केले म्हणून केवळ आत्माच राहतो. मनाचाच जास्त विचार केला पाहिजे; कारण त्याच्याच योगाने जीवाला बंधन व मोक्ष आहेत.

मनाला कोणत्याहि पदार्थाचे ज्ञान होते, म्हणजे ते मन इंद्रियाद्वारा जावून त्या त्या पदार्थाच्या आकाराचे होते. शरीर, इंद्रिये, पदार्थ व संबंधी; हे मनावर अवलंबून आहेत. स्वप्नांत मनानेच शरीरे तयार होतात. तसेच इंद्रिय ज्या इंद्रियाकडे मन असते त्याच्या व्यतिरिक्त इंद्रियाला ज्ञान होत नाही. उदा. कोणाशी बोलत असता दुसऱ्याचे बोलणे ऐकू येत नाही. कारण तिकडे मन नसते.

**पदार्थ :-** हेहि मनावरच अवलंबून आहे. जागृतीत मन असते, म्हणूनच पदार्थ भासतात. झोपेत काहीच भासत नाही व मूर्च्छेतहि तसेच.

**संबंधी :-** एकच स्त्री - मुलाची आई, बापाची मुलगी, सासऱ्याची सून,

सूनेची सासू, अशी अनेक प्रकारे अनेकांच्या मनाने भासते.

**मनाच्या शक्ती** - देवही मनाच्याच स्वाधीन. ज्या गोष्टी देवाला करता येतात, त्याच मनालाहि करता येतात. पाण्यांतून चालणे व आकाशांत चालणे.

**मन दोन प्रकारचे :-** चंचल व स्थिर. जेव्हा वासना करते, तेव्हा चल होते व जेव्हा स्थिर असते तेव्हा मुक्ति. मनोनाश झाल्याशिवाय मोक्ष नाही. देव दिसणे म्हणजे मन त्या देवतेच्या आकाराचे होणे.

**आत्मप्रीति** - आत्मप्रीति सर्वांत श्रेष्ठ आहे. देवाची प्रीतिसुद्धा गौण. कारण देव दयाळू, रक्षण करणारा असला, तरच आवडतो. कुरूप वगैरे आवडत नाही; म्हणूनच सर्वांवरून प्रीति काढून आपल्यावर लावावी.

एखादी गोष्ट 'गेली-आली' म्हणजे ती गेली नाही तर आपले मनच तसे होते. मनाचाच त्याग केला तर सुखदु:ख कोठले!

जसे आपपर भाव गेल्यावर आपला मुलगा व दुसऱ्याचा मुलगा, ह्यापैकी कोणीही मेला किंवा राज्यावर बसला तरी हर्ष अगर विषाद होत नाही.

काळजी असली तर खाल्लेले अन्नहि आंगी लागत नाही. तेच खाण्याशिवायहि एखादा मनुष्य धष्टपुष्ट राहू शकतो. तर पुष्टि ही अन्नावर अवलंबून नसून, मन प्रसन्नतेवर आहे.

**संसार काय आहे ? :-** स्वप्नांत पुत्र झाला तर तो नाहीसा व्हावा, असे वाटत नाही. तोच जागृतीत भास वाटतो. म्हणजे पुत्र झालाहि नाही व गेलाहि नाही. तसेच ब्रह्म नित्य झाले म्हणजे काही जात नाही व येत नाही. आवडी असेल तेथे मन चिकटून राहते. सुख हे समाधानात आहे. मनाच्या चंचलावस्थेत सुख नाही, तर एकाग्रतेत सुख आहे. विष खाणे थोड्या वेळात होते; पण त्याची निशा फार वेळ राहते. आता सूक्ष्मात जावयाचे.

**मन सृष्टि करते :-** हे जेवढे जगत् तेवढे मनच. स्वप्नांत स्त्रीची इच्छा झाली तर स्त्री उत्पन्न करते, याप्रमाणे सर्वच उत्पन्न करते. स्वप्नांत जेव्हा वस्तु पाहतो, तेव्हा आपण त्या त्या शरीराने पाहात नसून दुसऱ्या शरीराने पाहात असतो.

प्रश्न:- स्वप्नशरीर कशाचे उत्पन्न होते?

उत्तर :- मनाचे.

## महानिद्रा म्हणजे मृत्यु

ही सर्व सृष्टिरचना कोणाचे तरी स्वप्नातीलच आहे. स्वप्नांत मेलो आहे असे वाटते. याहून निराळे शरीर घेता येते.

**मरण म्हणजे शरीर सोडणे. जन्म म्हणजे दुसरे शरीर घेणे.**



**मन ही कृत्ये, दररोज करते.**

**आपण निद्रेत एक शरीर सोडतो व एक शरीर धरतो, हीच निद्रा फार मोठी म्हणजे मृत्यु.**

प्रश्न :- तो मेला आणि दुसरे ठिकाणी जन्मला म्हणजे काय?

उत्तर:- एके ठिकाणाहून निजून दुसरे ठिकाणी जागा झाला.

प्रश्न :- आपण चोराचाच विचार करीत बसलो तर काय होईल?

उत्तर:- जशी वासना तसे शरीर : स्वप्नात चोर दिसेल. जशी वासना धरावी तशी रोज आपण शरीरे धारण करतो. जागृतीत सर्प पाहिला तर निद्राकाली दुसरा देह घेऊन स्वप्नांतील सर्पास पाहून भीतो.

प्रश्न :- हे शरीर व ते शरीर कशावर अवलंबून आहे.?

उत्तर:- मनावर.

**मनाच्या तीन अवस्था :-** स्वप्न, विचार व काही न करणे.

विचार म्हणजे जागृती व

काही न करणे म्हणजे सुषुप्ति.

१. दगडाला मन असते, ते मूर्च्छेमध्ये म्हणजे काही न करणे या अवस्थेत असते.

२. पशु पक्षी यांना मन असते परंतु ते शरीरापुरतेच.

३. मनुष्य - याला शरीरापुरते मन असून विचार वगैरे सर्व करीता येतो. वासनेच्या योगाने पुन्हा जन्म होतो.

## लीलेची कथा

एक पद्म नावाचा राजा होता. त्याची लीला नांवाची स्त्री होती. राजा एकपत्नी म्हणून तिची त्याजवर विशेष प्रीति होती. मी आणि माझा नवरा कधीच मरू नये, असे तिला वाटे. तिने एके वेळी सर्व ऋषींना बोलाविले व विचारले की, अमरत्व कशाने प्राप्त होते. एका ब्रह्माशिवाय कोणीच अमर नाही. लीलेने देवीची तपश्चर्या करण्यास आरंभ केला. दररोज एक एक ग्रास खावून तीन दिवस तपश्चर्या केली. देवी प्रसन्न झाली. अमरत्व मागताच देवीने अशक्य म्हणून सांगितले.

लीला म्हणाली, ''असे तरी करा की, माझा नवरा माझे आधी मेल्यास माझ्या घरांत तरी राहावा. त्याच्या जीवाला पाहून मी आनंदित राहीन''.

''बरे''! म्हणून देवी निघून गेली. काही दिवसांनी राजा मेला. लीला शोकग्रस्त झाली. शेवटी प्राण देण्यास तयार झाली.

देवी म्हणाली, ''लीले पति घरांतच आहेत.

लीला - तर कां दिसत नाही?

देवी - तुझे डोळे स्थूल पदार्थाला पाहू शकतात. आत्मा जीव वगैरेना पाहू शकत नाहीत. तूं दिव्यदृष्टी आण. प्रत्येकाला दिव्य दृष्टी आहे.

लीला - दिव्य दृष्टी कशी आणू?

देवी - ती तुला आहेच. प्रत्येकाला दिव्य दृष्टी आहेच.

राघो वनात असताना कोणत्याही झाडावर जाऊ शकतो, परंतु तोच पिंजऱ्यात कोंडला, तर धन्यावरच अवलंबून राहतो. तसे तुझे मन जोपर्यंत शरीरात अडकले आहे, तोपर्यंत त्याला स्वतंत्रपणे कोठे जाता येत नाही. ते निराळे कर. अभ्यासाने मन निराळे करून, त्याला पुन्हा शरीरात आणता येते. शरीराचा अभिमान सोड. मन शरीराच्या योगाने कुंठित होते. समजा आपल्याला भिंतीपलीकडे जावयाचे आहे. मन जावून परत येऊं शकते. शरीराला तसे करता येत नाही. शरीराला पुष्कळ अडथळे येतील. कारण ते स्थूल आहे. पाण्यावरून लाकूड वाहात जात असल्यास, पाणी छिद्रातूनहि जाऊ शकते, परंतु लाकूड जाऊ शकत नाही. शरीर जर मनाप्रमाणे सूक्ष्म करता येईल तर तेहि जाईल.

प्रश्न :- शरीर सूक्ष्म कशाने होईल?

उत्तर :- ''शरीरावरील अभिमान काढून मनावर बसविला म्हणजे मी मनच आहे असे तुला वाटले पाहिजे.'' लीले तुझा नवरा येथेच, पण तुझ्या स्थूल दृष्टीला दिसत नाही. मनाच्या गोष्टी कल्पना वाटतात. त्या मृदुसंवेगात असतात, म्हणून तसे वाटते. त्याच मध्यसंवेगाने स्वप्नांत खऱ्या वाटतात. झोपेत आपण कधी दचकतो व कधी भीतो. ज्याला भीतो ते पदार्थ मनाचेच केले असतात. ते खोटे असते तर त्याचा खरा परिणाम झाला नसता.

मनाच्या कल्पना खऱ्या असतांना शरीरालाच चिकटून राहिल्यामुळे खऱ्या वाटत नाहीत.

मनात दोन गोष्टी :- (१) जाणीव (२) हालणे — लोहाराचा भाता श्वासोच्छवास करतो; पण त्यांत जाणीव नाही, म्हणून जीवंत नाही.

चेतना ही जाणीवशक्तीवर अवलंबून आहे.

केवळ जाणीव परमेश्वरच आहे.

प्रश्न :- भीती वाटते तेव्हा काय होते?

उत्तर :- हृदयावर ठोके बसतात आणि ती गोष्ट डोळ्यासमोर येते. हे हालणे म्हणजे भीती दूर केली तर केवळ जाणीवच राहते.

जाणीव जास्त व हालणे कमी = **मन - जीव**



हालणे जास्त व जाणीव कमी = **प्राण**

प्राणाला म्हणजे श्वासोश्वासाला हालविणारे मन. मन जेव्हा शांत असते तेव्हा प्राणहि हळूहळू चालतो. तेच भीतीने चंचल झाले म्हणजे श्वासोश्वास जोराने चालतो.

मन जर स्वप्नांतल्या शरीराचा अभिमान धरील तर निद्रित शरीरांत प्राणाला हालविणारे मन नसल्यामुळे, प्राण काही काळाने विरून जाईल.

झोपेत मन असते, मात्र लीनावस्थेत असते, म्हणून प्राण चालतो.

प्रत्येकाचे मन शरीरामुळे जरी निराळे वाटते, तरी ते सर्वांचे एकच आहे.

## स्वप्नपरंपरा

स्वप्न जगत्तुल्य आहे. जगांत जसा व्यवहार करतो, तसाच स्वप्नातहि करतो. स्वप्नांत मृतपुत्र पाहून दुःख विसरतो; कारण तो खरा वाटतो. जागृतीत पाहिला तर भूत वाटेल. स्वप्नात जागृतीतल्या सारखी सृष्टी दिसते. ही सृष्टी मनच आहे. हे जगसुद्धा कोणाचे तरी स्वप्न आहे. स्वप्नांत स्वप्न असे हे जग स्वप्नपरंपरा आहे.

जागृतीत मैथुनापासून गर्भ राहून पुत्र होतो, परंतु स्वप्नांत मुलगा व आपण एकसमयावच्छेदेकरून उत्पन्न होतो. वास्तविक मनापासूनच सृष्टी उत्पन्न होते. कार्यकारण भाव भ्रमाने वाटतो.

मनच ब्रह्मा, विष्णु व महेश होते. जागे नाही तोपर्यंत स्वप्नसृष्टी आहे. जागृती आल्यावर नाश होतो. आपण ज्याच्या स्वप्नांत आहो तो जागा झाल्याबरोबर आपला नाश होणार!

योगी हे शरीरातून मन बाहेर काढून संकल्प करू शकतात. जन्ममरण संकल्पाने होतात. जसे साप डसला असून काटा रुतला असे वाटले, तर तो जगतो; नाहीतर नाना उपायाने तो जगत नाही. ज्याची काळजी फार लागते, ती गोष्ट स्वप्नांत दिसते, बाकी जागृतीत पाहिल्या जरी असल्या तरी दिसत नाहीत; कारण आपले मन देहाला चिकटले आहे.

## संसार : व्यष्टि व समष्टि

## सर्वांचे मन एकच

ब्रह्माहून जेवढे निराळे तेवढा सर्व संसार. जग हे आपणास दोन रीतीने पाहतां येते. व्यष्टि व समष्टि. तूं आणि मथुरा हा निराळेपणा. कारण मथुरा म्हटल्याने तूं ओ देत नाहीस म्हणजे एकपण नाही. परंतु स्त्रीभावाने एकपणा. तुम्ही दोघी स्त्रिया व हरीभाऊ आदि मंडळी यांत भेद आहे, कारण पुरुष म्हटल्याने स्त्रीची कल्पना येत नाही; परंतु दोन पायांची मनुष्ये यांत सर्वच आले. पशु आणि मनुष्य निराळे,

परंतु जीवंत प्राणी म्हटले की, दोघांचाही समावेश होतो. जीवंत व निर्जीव पदार्थ निराळे; परंतु दृश्य म्हटले की, दोन्ही आले. जे जे पदार्थ निरनिराळे असतात त्यांत कांहीतरी एकपणा असतोच. तुलाही दुःख आवडत नाही व मलाही आवडत नाही. आपले मन एकच; परंतु दुःख एकाला एकापासून तर दुसऱ्याला दुसऱ्यापासून. हे आवडीवर अवलंबून आहे. बाकी मन एकच. असे मन एक असता माझ्या मनांतले तुला व तुझ्या मनातले मला कळत नाही ते कां?

समुद्रातून काही पाणी तांब्यात व काही रांजणात आणले तर त्या दोन घटांतील पाण्याचा काही संबंध आहे काय? नाही. पण पाणी एकच. उपाधिमुळे निरनिराळे भासले; परंतु समुद्रांत नेऊन टाकले तर ते एकच, तसेच उपाधिमुळे मनहि निराळे भासते. बाकी एकच.

## सर्व जगताचे मन

सर्व जगताचे मन त्याला **हिरण्यगर्भ-** माया- म्हणतात. ही समुद्रासारखी एकच आहे व सर्व जीव रांजण, तांबे, घट इत्यादि या सारखे. हिरण्यगर्भ किंवा मायारूपी सागरांतून प्रत्येक शरीरांमध्ये आलेले मन उपाधिमुळे निराळे झाले. शरीराच्या कैदेत राहण्याची संवय झाल्यामुळे ते निराळे वाटते. महासमुद्ररूपी मायेत नेऊन टाकले तर एकच.

## जन्म-मृत्यूंचे वर्णन

लीले! वास्तविक पाहता तूं आणि पति एकच. शरीराला ज्या रीतीने सोडता येईल त्या रीतीने सोड. सर्वांचे मन जर एक आहे तर - मृत्यु म्हणजे एक शरीर सोडणे व जन्म म्हणजे दुसरे शरीर घेणे, हे मनाला नाही परंतु शरीरालाच आहे. श्वासाला हालविणारा प्राण, शोक, राग, दुःख हे मनाचे धर्म. शोक व क्रोधकाली श्वास जोराने चालतो; म्हणजे त्या श्वासास मनच हालविणारे आहे. मरणसमयी श्वास कोठे जात नाही, तर तेथेच विरतो. मन जेव्हा शरीरांत जाते तेव्हा प्रथम शरीरात मनाने प्राणाला वेग दिलेला असतो. मात्र तो काही वेळाने पूर्व शरीरात जातो म्हणून त्याला वेग मिळून पुन्हा तो चालूं लागतो. मन जेव्हा महानिद्रेत जाते तेव्हा श्वास विरतो. त्याला हालविणारे मन नसल्यामुळे लाळ बाहेर येते. तो तेथेच विरून जातो.

निद्रेत जसे मन शरीराहून निराळे राहते त्याच प्रमाणे महानिद्रेतहि असते, म्हणून शरीर जाळल्याने मनास बाधा होत नाही. पुढे महिन्याने ६ महिन्याने जेव्हा ते जागे होते तेव्हा पहिले शरीर नसल्यामुळे ते दुसरे शरीर धारण करते, अशी मनाची शक्ति आहे. वायु जेथल्या तेथेच विरतो. मन जेथल्या तेथेच राहते. प्राणी जेथे मरतो तेथेच तो जन्म घेतो. तुझा पति जरी तुला दिसत नाही तरी तो तुझ्या घरांतच



आहे. या शरीराने तो तुला दिसत नाही. तूं देहाहून निराळी हो. अ-योग्याला शरीर निद्रावश झाल्याशिवाय सोडता येत नाही, कारण आपल्या देहावर अभिमान आहे.

जन्म घेतो तेव्हा या जगातून आपण दुसऱ्या जगात जातो. मरण म्हणजे मोठी निद्रा. दुसरे मोठे स्वप्न दिसणे म्हणजे जन्म. दुसरे जग येथेच आहे. मन गुपचुप बसून राहिले तर शरीर जळले तरी त्याला कळतच नाही. स्वप्नात आपण काशीत जातो म्हणजे आपण शरीराच्या बाहेर जातो काय? नाही. कारण तसे जर असते तर तेथल्या लोकांनी आपणाला ओळखले असते. तूं म्हणतेस, ताता मला दिसले, परंतु हे ताताला माहीत नाही. यावरून मन शरीरातच असते व शरीरातच सर्व वस्तु निर्माण करू शकते. आता आपण निजल्यावर स्वप्न पाहतो व स्वप्नातच गावाला जातो. तेथून दुसरे ठिकाणी जातो व तेथून काशीलाही जातो, म्हणजे एवढ्याशा लहान जागेत आणि दहाबारा हजार कोसाची जागा तयार करतो. मन जरी स्वप्नात असले आणि फुंकून दिले तरी स्वप्न मोडत नाही.

**सर्व जग स्वप्नच आहे. कोणालाही जन्म-मरण नाही.**

चार कोस जागा मन एवढ्याशा शरीरात तयार करते हे झाले जागेचे.

## काळाचे स्वरूप ?

आता वेळे संबंधाने. आपण किती वेळ निजतो. फार झाले तर ५-६ तास; पण तेवढ्या वेळात किती तरी महिने आणि कितीतरी वर्षे गेली असा भास होतो. अशा स्वप्नांत श्वास विरून गेला की, इकडे मृत्यु झाला असे म्हणतात. 'मला गर्भ राहिला' असे आईला कळते. 'मी मुलगा प्रसवली' असे वाटते. ताताला तूं स्वप्नात पाहतेस. तुला वाटते की ते वडील आहेत; परंतु वास्तविक ते व तूं स्वप्न दिसल्याबरोबरच उत्पन्न झाले. यात वडील धाकटेपण मुळीच नाही. वडील धाकटा हे सर्व भ्रमाने वाटते वास्तविक नाही.

आता आपणाला वाटते की, आपण आपल्या आईबापांपासून उत्पन्न झालो; परंतु आईबापहि आपले मन स्वप्नांत उत्पन्न करू शकते. म्हणजे कोणीकोणास उत्पन्न करू शकत नाही. कोणापासून काहीहि उत्पन्न होत नाही. परंतु स्वप्नांत वरील गोष्ट खरी वाटते. स्वप्नांत तुला कोणी सांगितले की, 'तुझा बाप वडील नाही,' तर तुला ते खरे वाटेल. परंतु जागृतीत खरे वाटणार नाही. थोड्या काळांत पुष्कळ कसे भासते हे सांगून वडीलधाकटेपण मन कसे भासविते हेहि सांगितले.

लीले, तुझ्या घरांत तुझा नवरा आहे. तो कोठे गेला नाही. जड पदार्थांचा कार्यकारणभाव नाही. मरण झाले म्हणजे जीव निघून गेला, असे अज्ञानियांस वाटते. तसे लीलेलाहि देवीचे ऐकून वाटले.

**जो निष्कपटपणाने बोलतो, त्यावर कुत्रेहि विश्वास ठेवतात.**

देवता ह्या तर सर्वदा निष्कपट असल्यामुळे देवीवर तिचा पूर्ण विश्वास बसला.

''आई ! तूं म्हणतेस ते खरे; पण मी आपल्या पतीला कसे पाहूं?''

देवी म्हणते ''जवळची वस्तु पाहण्यास काय हरकत आहे. अगदी जवळची वस्तु दिसत नाही व दूरचीहि दिसत नाही. काजळ डोळ्याच्या जवळ असूनहि दिसत नाही. मधल्या स्थितीतील दिसते. मेलेली माणसे आपल्या फार जवळ असतात तुला पति पाहावयाचा असला तर शरीराहून निराळी हो.''

''निराळी कशी होवू?''

''शरीराचा अभ्यासाने विसर पाड, व मी शरीराहून निराळी आहे, अशी भावना कर.''

''जसे तूं मास्तरीण नव्हतीस, तेव्हा मी मास्तरीण आहे, असे वाटत नव्हते.''

''मी शरीर आहे असे विसरले पाहिजे. पण आपण नेहमी शरीर आठवतो; परंतु हे विसरले पाहिजे. मनाने तशी नेहमी भावना करीत असले पाहिजे. मनाने सूक्ष्म रूपात जाणे त्यास ''**अंतवाहक**'' म्हणतात. घडीघडी भावना कर की, ''मी शरीर नाही.''

लीलेने पतीचे प्रेत फुलांत झांकून ठेविले. लीलेने इतकी भावना केली की, तिच्या तोंडावर प्रेतकळा आली आणि जों निघाली तो आपला पतीच पाहिला. त्याला एका सिंहासनावर लवाजम्यासह पाहिले. ही सूक्ष्म रीतीने गेली असल्यामुळे हिला कोणी पाहूं शकले नाही; कारण ते स्थूल शरीराला चिकटलेले होते. तेथे तिने आपल्यासारखी लीलाही पाहिली. राजाच्या मांडीवर जाऊन बसली. ही मनाने गेली होती, म्हणून त्याला कळले नाही. लीला म्हणाली - इकडे दुसरी लीलाहि दिसली. हा दुसरीवर प्रीति कां करतो असे वाटून तिचे राजावरचे प्रेम कमी झाले व म्हणाली, ''हे जरा चमत्कारिक आहे'' व तेथून परत फिरली म्हणजे जागी झाली.

तिने देवीस विचारले ''हे कसे? तिकडे राजा तर मोठा झाला व माझ्यासारखी लीलाहि दिसली. मी हे एका घटकेतच पाहिले.

देवी म्हणाली - ''तो वासनेच्या 'स्वाधीन होऊन' गेला व तूं वासना 'स्वाधीन करून' गेलीस म्हणून तो तुला पाहू शकला नाही. योग्यांना इच्छेने स्वप्न दिसते; परंतु आपणाला झोपेच्या स्वाधीन होऊन स्वप्न दिसते राजा मेला तेव्हा त्याची तुझ्यात वासना होती, म्हणून त्याला तेथेही लीला मिळाली. तेथे सैन्य वगैरे होते, तेही वासनेचे झालेले होते. येथे थोडा वेळ झाला, पण तिकडे लाख वर्षे झाली. देवीला साक्षात्कृत केले. नमस्कार केला. राजाच्या स्वप्नांतील तिने जे लोक पाहिले,



त्यापैकी सर्व काही मेले नव्हते. येथे पाहते ते सर्व निजले आहेत. तेथे जागे आहेत. देवीने सांगितले तुला जे लोक दिसले ते येथले नव्हते. तेथले नगर आणि लोक राजाच्या वासनेने आलेले आहेत.

वासना जेव्हा उद्भूत होते म्हणजे पदार्थ भासतो तो बंध. वासनाक्षय म्हणजे मुक्ति. तुला मोक्ष नाही.

तीन शरीरे : स्थूल, अंतवाहक मन आणि प्राण

देवीने तीन शरीरे सांगितली. स्थूल, अंतवाहक मन, आणि प्राण- मन आणि प्राण याबद्दल तुला वर सांगितलेच आहे. **मन व प्राण ज्यांत आहेत ते अंतवाहक किंवा लिंग शरीर -** ज्याप्रमाणे तुझा पति संपला व राजा झाला आहे व तूं पाहिला आहेस आणि हा पद्मराजा जो येथे पडला आहे, तो आणि तूं सुद्धा दुसऱ्याच्या स्वप्नांतून आलेले आहेत.

## लीलेचा पहिला जन्म
## (वसिष्ठ ब्राह्मण व अरुंधती)

राजाच्या तिसऱ्या सृष्टीत त्याला शंभर वर्षे झाली, तरी त्याला एक मुहूर्तच झाले आहे व दुसऱ्या जन्मांत हजार वर्षे घालविली आहेत. तो पूर्वी वसिष्ठ ब्राह्मण होता व तूं त्याची अरुंधती नावाची स्त्री होतीस. तूं त्याचे बरोबर सती गेली. त्या ब्राह्मणाला मरून तुला त्याच्याबरोबर सती जाऊन ८ दिवस झाले.

लीला म्हणाली, ''मला घेऊन चल.''

देवी म्हणाली, ''या शरीराने तेथे जावयास हजारो वर्षे पाहिजेत. स्थूल शरीराला वारा, थंडी, पाऊस वगैरे हजारो अडचणी आहेत. तूं मनाने जा. मन निमिषांत तेथे जाते.''

## चित्ताकाश

देवीने तिला योग म्हणजे एकाग्र व्हावयास शिकविले.

देवी म्हणाली, '' बाई लीले! तीन प्रकारचे आकाश आहेत. १ भूताकाश १ चित्ताकाश व ३ चिदाकाश.

चित्ताकाश म्हणजे ज्यांतून मन जाते ते. तूं चित्ताकाशांतून चल. दोघी चालल्या. त्या पहिल्या जन्मांत गेल्या.

त्या ठिकाणी ब्राह्मणाची मुले रडत होती. सुतक होतेच. पहिल्या आठ दिवसाच्या अवधीत इकडे दुसऱ्या जन्मांतील हजार वर्षे व तिसऱ्या जन्मांतील १०० वर्षे होऊन गेली.

लीलेने इच्छा केली की, या मुलांनी मला पाहावे. म्हणून स्थूल झाल्या त्यांनी त्यांना नमस्कार केला व यांनी मस्तकावर हात ठेवले व जावयास निघाले ''आमचे आईबाप नुकतेच मेले, आम्हांस कोणी नाही'' असे ती मुले म्हणाली.

''वासनांच्या योगाने असाच संसार बदलतो; कोणी कोणाचे नाही'' असा उपदेश केला लीलेच्या आंगी अशी ताकद होती की, मुलाची अंतवाहक शरीरे नेता आली असती. परंतु ज्यांना उपदेश झाला असतो त्यांना आपपरभाव नसून सारे एकच असते. त्या येथून निघून चित्ताकाशांतून चालल्या.

देवी म्हणाली ''लीले! या ब्राह्मणाच्या घराच्या कोपऱ्यांत तुमचे राज्य आहे व राजाचा तिसरा जन्म व राज्य तुझ्या एका घराच्या कोपऱ्यात आहेत. भावनेच्या योगाने लाखो ब्रह्मांडे घराच्या कोपऱ्यांतच होतात''.

नंतर ती पहिल्या पतीच्या घरी चित्ताकाशांतून गेली. आकाश म्हणजे पोकळी. भूताकाशामध्ये हजारो कोस जरी लांब असले तरी चित्ताकाशांत अगदी जवळ असते.

## मनुष्याचे पुष्कळ आकार

मनुष्याचे आकार पुष्कळ असतात. प्रत्येकाच्या वासनेमुळे आपण त्यांना निरनिराळे भासतो.

गाईला चारा घालतो तेव्हा मुलगी, दूध काढतो तेव्हां माता. आपण वाघाचे अन्न आहो. ज्याच्या ज्याच्या जशा वासना तशी तशी आपली शरीरे होतात. आपण एखाद्याचा द्वेष करतो, तेव्हा आपण वासनेनेच प्रवृत्त होतो. सर्पाला विष आहे व बचनागालाही विष आहे. सर्पाला पाहून लोक त्याला मारतात. परंतु बचनागाची झाडे तोडीत नाहीत. असे कां? सर्पाला वाटते की, मनुष्ये माझी शत्रु आहेत. तसे बचनागाच्या झाडाला वाटत नाही. सर्पाची भावना व माणसाची भावनाच एकमेकांच्या नाशाला प्रवृत्त करते. आपण बचनागाच्या झाडाला भीत नाही; कारण त्या ठिकाणी वासना नाही. भय वगैरे वासनेतच उत्पन्न होते. कारण नख, दांत वगैरेसारख्या पदार्थात विष असूनहि त्याच्या ठिकाणी वासना नसल्यामुळे, आपण त्यांना भीत नाही. 'जाणे आणि येणे' या आपण मनानेच कल्पना करतो.

मनाला वाटले आपण गेलो तेव्हाच आपण जातो. मनाला वाटले की मी मेलो तर शरीर पडते. सर्व शरीर मनाचेच बनले आहे.

एखाद्या गोष्टीची काळजी असली तर अन्न खाऊनहि तृप्ति होत नाही. ती मनानेच होऊ शकते पण आपले मन आपल्याला ठाऊक नसल्यामुळे अन्नपाण्याकरिता दारोदार फिरावे लागते.





ज्यांना मन कळले असते, ते शरीराहून त्याला निराळे करतात. मन एकाग्र केले पाहिजे. जसजसे शरीराचे धर्म असतात, तसतसे ते जास्त ओढून घेतले तर मन शरीराला जास्त चिकटते. देवदूत, यम वगैरे वासनेनेच बनले असतात. चोरी करीत असतांना, चोरांना शिपायांची धास्ती वाटते. सापाला कांही नाही.

जो द्वेष करतो त्याला वाटते की, माझाही कोणी द्वेष करीत असेल. तसेच त्याच्या छातीवर कोणी बसला आहे (स्वप्नांत) हेही त्याला त्याच्या द्वेषानेच भासते. जशी आपली वासना होते, तसे तिचे फळ आपण भोगीत असतो.

उमरावतीला मनाला जावेसे वाटले तर ते केव्हांच जाते; नाहीतर हजारो उपाय केले तरी जात नाही. मरणाचेहि तसेच आहे. स्वप्नांत काशीला गेलो व आलो असे वाटते परंतु कोठेहि जात नाही. शरीरांतच सर्व कांही आहे. आपण जर गेलो असतो, तर तेथल्या लोकांनी पाहिले असते. तर मग काय होते? आपण आपल्या शरीरांत तितका देश उत्पन्न करतो;

मेला म्हणजे यमपुरीला गेला, नरकांत गेला वगैरे आपण जे बोलतो ते सर्व आपण या शरीरांतच भोगतो. एखाद्या मुलाला स्वप्नांत चोर दिसले व तो जर भ्याला, तर आपण सांगतो की 'ते चोर मेले' वास्तविक ते चोर झालेहि नाही व मेलेहि नाहीत, तसे स्वर्ग, नरक वगैरे काही नाही; परंतु मनुष्याच्या भावनेप्रमाणे ते बनत असतात. जसा मुलगा लहान असतां त्याचे गुन्हे लक्षात घेतले जात नाहीत. तोच मोठा झाला की, त्याला त्याची शिक्षा मिळते.

आपण एखाद्या माणसाला मारण्याची इच्छा केली तर आपण व्याघ्ररूपी बनतो व तीच दृढ झाली की वाघाचे शरीर मिळते. स्वप्नांतून जागे न होणे म्हणजे जन्म. स्वप्न म्हणजे जग. जन्म घेतला की स्वप्न पाहतो. तुझे जितके पति तितके येथेच आहेत.''

लीला म्हणाली:- ''मला पद्मराजा पाहिजे. ''

त्या दोघी उडाल्या. जन्ममरण वासनेने होते. आपण निद्रावश होऊन स्वप्न पाहतो व योगी जागृतीत स्वप्न पाहातात. ज्यांना स्वतंत्रपणे जन्ममरण होते ते सुखी. (योगी व अज्ञानी) दोघांना इच्छेनेच मरण होते. पण अज्ञान्याला वाटते की, आपण मेलो; पण योग्याला तसे वाटत नाही. अज्ञानी वासनेच्या स्वाधीन असतात. उदा. कैफ. थोडी थोडी निशा घेतो तेव्हा ती स्वाधीन असते; व पुढे आपण तिच्या स्वाधीन होतो. जोपर्यंत एखादा मनुष्य मास्तर नसतो, तोपर्यंत त्याला काही नाही; परंतु (मी)मास्तर असे मनाने घेतले की, मुलांकडून अपमान सहन होत नाही. त्याप्रमाणे मनाने आपण बांधून घेतो. मग कैफाशिवाय होत नाही, पण योगी वासना जरी वाढवितात, तरी

त्या त्यांच्या स्वाधीन असतात.

ती लीला देवीला म्हणाली, ''मला तिसऱ्या ब्रह्मांडात घेऊन चल.''

चित्ताकाशांतून सहज जाता येते. मनाचे दृष्टीने ते ब्रह्मांड अगदी जवळ आहे. सूर्य मंडळाजवळ जाण्याला हजारो वर्षे लागतात, परंतु मनाने तेव्हाच जाता येते. तेथे जातो म्हटले की, मन जाऊन येते. शब्द निघायला तरी वेळ लागतो, पण ते त्याच्यापूर्वी जाते. एखादा मुलगा पास झाला, असे कितीही सांगितले, तरी निकाल लागेपर्यंत त्याची खात्री होत नाही. सर्टिफिकेट मिळाल्यावर खात्री होते. आपलेहि तसेच आहे. एखाद्याने सांगितले की तुझ्या द्वारकीला राज्यपद मिळाले. ती गोष्ट काहीशी खरी व काही खोटी वाटेल.

## मनाचे कार्य

**मन जोपर्यंत अर्धे अर्धे असते, तोपर्यंत त्याच्या कडून कार्य होत नाही. परंतु ते एकदा पूर्णपणे घुसले की तेव्हाच कार्य होते.**

तुला मास्तरीण नेमले असे जरी समजले तरी पगार मिळेपर्यंत चांगले शिकवावेसे वाटणार नाही. परंतु तेच पगार मिळाला की, तुम्ही चांगले मन लावून शिकवाल. एखादी गोष्ट आपण केव्हा करतो? पूर्ण मन घुसले की ! अर्धे मन शिरून उपयोग नाही.

आपण काशीला गेलो, मग तेथून वस्तु कां नाही आणीत? मन अर्धे जाते व अर्धे शरीरावर राहते. सारे मन गेले तर एकतर शरीर पडून राहील किंवा मनाबरोबरच निघूनहि जाईल. जर मनाच्या भीतीने शरीर मरते तर त्याच्या बरोबर कां निघून जाणार नाही? आपल्याला असे वाटते की, आपले अर्धे मन काशीत गेले व अर्धे येथे राहिले. म्हणून तेथला पदार्थ आणता येत नाही. काही काही गोष्टीचे आपले पक्के समज होऊन बसतात. मनाला वाटते की शरीर जाणार नाही, असा समज पूर्ण झाला आहे.

आपण बालकाला ह्या गोष्टी लहानपणापासून शिकविल्या तर ते वाटेल तसे करील. मात्र त्याच्या मनावर **जडभाव** – मनाचा परिणाम होता कामा नये. त्याला बालपणी सत्त्वगुणधर्म सांगितले पाहिजे, म्हणजे तमोगुणी सृष्टीचा परिणाम होणार नाही. क्षुधा, तृष्णा, मैथुन काही सांगावयास नको.

मनाने लवकर जाता येते. त्या दोघी मनाने निघाल्या होत्या. शरीराने पुष्कळ वर्षे लागतात.

लीला देवीच झाली होती, ब्रह्मज्ञान झाल्यावर देव आणि ज्ञानी यांत फरक राहत नाही. त्या विदुरथ राजाच्या सिंहासनाजवळ आल्या. चार दूत जवळ आले.


राजा लढाईला गेला व परत आल्यावर निजला. लीलेला वाटले, आपण राजाला दिसावे. राजाने पूजा केली व ''आगमन कसे झाले?'' म्हणून विचारले. लीला काही बोलली नाही.

देवी म्हणाली, ''तुला युद्धात मरण आहे. तुला ज्ञान सांगण्यास आलो. वर माग.''

मस्तकावर हात ठेवला. त्यामुळे पूर्वजन्माची स्मृति झाली, याचे कारण असे पहा. आपली आई आहे, एखादी गोष्ट एखाद्याने सांगितली तर ती पटत नाही. परंतु तीच आईने सांगितली की पटते. देवीने वर देऊन सुद्धा फलप्राप्ति न झालेले आहेत. रावणाला १४ चौकड्याचे राज्य दिले असून त्याला चौकडी पुरी सापडली नाही. याचे कारण त्याचा अविश्वास! जसा जसा तो देवांना बंदीत घालू लागला तसतसा देवाला तुच्छ मानू लागला. अर्थात् सांबाच्याही वराचा विश्वास राहीला नाही. (सांब=शिव)

राजाला वाटले ही देवी आहे त्याअर्थी खोटे सांगणार नाही. म्हणून त्यावर विश्वास बसून पूर्वजन्म आठवला. पूर्वी आपण काला पाहावयाला गेलो. तेथे कोणी गोटे मारले. एवढ्यावरून तुला ती आठवली. यापूर्वीहि ती तुझ्या मनावर संस्कारित होती. त्याचप्रमाणे पूर्वजन्माचा संस्कार होता म्हणून आठवण दिल्याबरोबर त्याला पूर्वजन्म आठवला.

राजा म्हणाला ''मी ओळखतो की, ही लीला आहे व तुझ्या वराने मी त्या प्रेतात जागा व्हावा व सैन्यहि तेथे यावे. देवीने बरे म्हटले. राजाला विश्वास पटला व तो न भीता लढाईला गेला. कारण त्याला दृढ भावना झाली की, मी पद्मराजा होईल.

## वासनापरतंत्र

आज जी गोष्ट सांगणार आहे, तिच्यावर सारी इमारत आहे. आपण स्वतंत्र व परतंत्र असे असतो. एखादी गोष्ट स्वतंत्र होऊन करतो किंवा परतंत्र होऊन करतो. कित्येक म्हणतात की, ''एखादी गोष्ट इच्छा नसतांहि होते.'' ते आपण सोडून देऊ. इच्छा नसतांना जे करतो ते परतंत्र होऊन व इच्छा असतांना करतो ते स्वतंत्र होऊन! जेवढ्या म्हणून जगातील गोष्टी तेवढ्या स्वतंत्र किंवा परतंत्र होऊन कराव्या लागतात. जेवायचे म्हणजे भुकेच्या ताब्यात होवून जेवावे लागेल. आपल्यामध्ये स्वतंत्र व परतंत्र गोष्टी आहेत. काही स्वतंत्र होऊन मरतात व काही परतंत्र होऊन मरतात. झोपेचेहि तसेच. काही सुखाने पडतात व काही थकवा येऊन पडतात. थकवा येऊन पडणाऱ्यांना निद्रेच्या स्वाधीन झाले पाहिजे.

आपण स्वतंत्र किंवा परतंत्र नाही. आपली वासनाच आपल्याला स्वतंत्र व परतंत्र करते, जी वासना पहिल्याने स्वतंत्र दिसते. काही दिवसांनी आपण तिच्या स्वाधीन होतो, तीच आपल्या ताब्यात असली तर आपण स्वतंत्र.

पण आपण कोण? आपणहि मनाचेच बनलेलो आहो. मनाच्या एका स्थितीला अहंकार व दुसऱ्या स्थितीला वासना (म्हणतात). माझेपणा म्हणजे वासना व मीपणा म्हणजे जीवंत अहंकार. 'अमुक पाहिजे म्हणजे मी पाहिजे'' असे नाही तर मला पाहिजे.

**मीपणाहून माझेपणा भिन्न आहे.**

**जी भिन्न भासविते ती वासना, जिच्या योगाने आपण परतंत्र राहतो.**

एखादी गोष्ट करून टाकल्यावर मग पश्चाताप वाटतो. रागाच्या आवेशात डोके फोडून घेतात व मागाहून वाटते की मी असे केले नसते, तर बरे झाले असते. हे आपल्या वासनेने केले. काही स्त्रिया कामाच्या तडाख्यांत सापडून बालहत्या करतात. ही बालहत्या कोणी करविली? त्यांनीच वासनेच्या ताब्यात जाऊन केली. रडून डोळे बिघडवून घेतात. ते शोकाच्या स्वाधीन होऊनच. वासना आपणाला बांधून टाकते. **आपण करतो तेव्हा स्वतंत्र, पण केले की वासनेच्या झालो परतंत्र.**

आपणाला स्वतंत्र परतंत्र करणारा दुसरा कोणी नाही. आपल्या वासनेनेच बरे वाईट करतो. वासनेनेच बरे वाईट होते. दोन्ही गोष्टी वासनेच्या योगाने होतात. वासनेच्या ताब्यात जातो व दुसऱ्याला आपल्याप्रमाणे वागवितो. कितीतरी जन्मामध्ये आपल्याच वासना आपल्याला बांधून टाकतात.

एखाद्या माणसाबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला तर कितीहि लोकांनी त्याच्याबद्दल चांगले सांगितले, तरी आपला तिरस्कार जात नाही. म्हणजे तिरस्कार सोडणे आपल्या ताब्यात नसते.

आपण तंबाखूची संवय लावून घेतो आणि ती अनावर झाली म्हणजे तिला सोडणे आपल्या स्वाधीन नसते. मला खा असे तंबाखू म्हणत नसतो. हा मुद्दाम संवय लावून घेतो. आणि अशाप्रकारे संवय बळकट झाली म्हणजे हा म्हणतो की, ''छे! बोवा! आपल्याने नाही होत.'' केवढा चमत्कार हा ! तसेच तिखटाचे ! ही जबाबदारी आपल्यावर आहे. ईश्वरावर नाही. वासना अनावर होते, तेव्हा विचार नष्ट होतो.

**आपले कितीहि महत्वाचे काम असले तरी ते वासनेपुढे तुच्छच वाटते.**

रोग्याचेहि असेच. हितकर अशा औषधाची त्याला अपथ्यापुढे किंमत वाटत नाही. म्हणून चांगल्या वासनेच्या ताब्यांत रहावे किंवा वासना आपल्या ताब्यांत ठेवावी.



**भले मनुष्य माझ्याने हे होत नाही, असे कधीच म्हणत नाहीत.**

संसारामध्ये वाटेल ते सुख-दुःख भोगून शरीर क्षीण होते. दुःख सुटावेसे वाटते. ऊन सहन करण्याची संवय नसल्यामुळे दुःख होते. दुःख कशाने होते? ऊन लागल्यामुळे. आपण ऊन सहन करण्याची संवय लावून घेतली असती, तर दुःख वाटते ना! ते वासनेवर अवलंबून आहे. अन्न असले तर खातो. पैसा खर्च करतो पण केव्हातरी संपायचाच त्याचप्रमाणे विषयभोगाचे आहे. ते सुद्धा केव्हा ना केव्हातरी संपायचेच. ते भोगत असता किंवा भोगल्यावर आपल्याला त्यांचा तिरस्कार वाटतो व 'अरेरे! मी काहीच केले नाही' म्हणतो पण उपयोग काय? ते भोगून तर चुकतो. बाळंतपण, वारा, कष्ट इत्यादिकाशी शरीराला टकरा खाव्या लागत असल्यामुळे त्याने किती टिकाव धरावा? ते शेवटी पडते, परंतु वासना मात्र वाढत असते. वासनेच्या स्वाधीन होऊन दुसरे शरीर घेतो.

एखाद्या मनुष्याला स्त्रीचे वेड लागले आहे. त्या स्त्रीला पाहिल्याबरोबर मन आवरले तर बरे. परंतु वेड लावून घेतले, तर स्वप्नांत रेतस्खलन होते व वेड लागून तो मरतोहि. त्याचे मन तिकडेच लागले असते. म्हणून स्वप्न पाहू नये, असे वाटले तरी ते दिसते कारण त्याचा मध्यसंवेग होतो. मरायाचे वेळी वासनेनेच जन्म घेतो. देवाकडे बोल नाही.

वासना स्वाधीन ठेवणारे एखाद्या मंडळीत बसोत किंवा चौसरी खेळोत, किंवा चिलीम ओढीत असोत. वासना त्यांच्या स्वाधीन असते आणि म्हणूनच ते वाटेल त्यावेळेस स्वप्न पाहतात व जन्म मरण करू शकतात. मरण पूर्वजन्मानुरूप असल्यामुळे टळत नाही. चिलीम पिऊन पिऊन कफ झाला, कंठ दाटून आला व पुष्कळ जरी पश्चाताप झाला व मी चिलीम पीत नाही म्हटले तरी ते थोडेच आपल्या उपयोगी पडावयाचे! फार तर पुढे त्रास होणार नाही. आता झालाच पाहिजे.

आपली वासना शुद्ध ठेवून जन्म घेणारे ते स्वेच्छाचारी होतात, इतर मरतात ते मात्र वासनेने बाहेर होतात. पूर्वी वाईट वासना धरून वागल्याने ज्याप्रमाणे फुटक्या घटामधले पाणी गळून जाते त्याप्रमाणे त्यांचे आयुष्य क्षीण होते. मी आता देह सोडीत नाही, असे म्हटले तरी, तसे त्यांचेकडून होत नाही; ते वासनांच्या ताब्यांत होऊन मरतात. योगी तसे मरत नाहीत ते आपल्या इच्छेप्रमाणे शरीर धारण करतात. ते सत्त्वगुणी असल्यामुळे त्यांना इंद्रिये ताब्यात ठेवता येतात. तसेच रोग झाला असता पथ्य करून शरीर आपल्या ताब्यात ठेवतात. आपण जे आवडेल ते खाऊन घेतो. सत्त्वगुणी देव आहे. लीला सत्त्वगुणी होती. म्हणून शरीराहून मन निराळे करता आले. आता ज्याला आपण परतंत्र म्हणतो ते आधी परतंत्र नसून आपल्या वासनेनेच (पारतंत्र्य) वाढते. उदा. तंबाखू खाण्याची संवय आरंभी आपल्या स्वाधीन

असते, परंतु ती अनावर झाली म्हणजे आपण तिच्या स्वाधीन होतो.

**योगी म्हणजे ज्याने चित्ताचा निरोध केला तो !**

प्राणायाम करणे वगैरे त्याची साधने आहेत.

## मनाची शक्ती व व्यापकता

आपण जेव्हा वासनेच्या परतंत्र होतो, तेव्हा आपल्याला पुष्कळ गोष्टींची गरज लागते. शरीराच्या स्वाधीन वासनेनेच झालो. हे शरीरसुद्धा वासनेनेच बनले आहे. जेव्हा एखाद्या सुंदर स्त्रीविषयी वासना होते तेव्हा आपण तिच्याकरिता स्वप्नात दुसरे शरीर उत्पन्न करितो व तिलाही उत्पन्न करतो. आपण वासनेने सर्व जग उत्पन्न करू शकतो. स्त्रीविषयी वासना झाली म्हणजे आपण स्वप्नांत मनाने दुसरे शरीर घेतो व बाकीचे सर्व उपभोगास लागणारे जगतातले पदार्थ उत्पन्न करतो. शरीर उत्पन्न केले की त्या शरीराला राहण्याला पृथ्वीची वासना झाल्यामुळे पृथ्वी उत्पन्न करतो पृथ्वीशिवाय राहता येत नाही. हे सुद्धा आपण आपल्या मनानेच बांधून घेतले. जेव्हा मन सूर्यलोकात जाते, तेव्हा सर्व आकाश मनच होते. आपले शरीर ज्या जागेवर आहे, ती जागाही मनात असते.

**आकाश मनापेक्षा मोठे नाही. शरीराच्या दृष्टीने आपण आकाश मोठे मानतो.**

मनोवेगांना कोणताही लोक मनाने फार जवळ आहे. हे सगळे ब्रह्मांड शरीराच्या दृष्टीने मोठे आहे. मनाला मोठे काहीच नाही. मनाला शरीरापुरतेच मानल्याने आपण पृथ्वीहून लहान आहोसें वाटते. वेळ, जागा वगैरे पुष्कळ असे जेव्हा आपण म्हणतो ते शरीराच्या स्वाधीन होऊन म्हणतो.

**मनाला लहान मोठे काहीच नाही.** जगाचे मूळ देखील मनच आहे. मन शरीरापुरते केले म्हणजे लहान होते.

## वासनेचे स्वरूप

डोळ्यांना पाहण्याच्या वासनेने उजेड व आंधार आहे. डोळ्याशिवाय पाहता आले असते तर उजेडाची व आंधाराची जरूरी नसती. जाण्याच्या इच्छेने गाडी आली. बातमी पाठविण्याच्या वासनेने तार (टेलिग्राम) झाला.

जशी वासना वाढते तशी गरज वाढते. जशी गरज वाढते तसे आपण पदार्थ निर्माण करतो. व त्यातच गुरफटत जातो.

शेवटी वासना जोरावते. शरीर पडले तरी वासना निवृत होत नाही.

हळूहळू वासना सोडीत जाऊन आपल्या स्वाधीन ठेवावी. हेच प्रत्येकास



उचित आहे. योगी आपली वासना स्वाधीन ठेवतात. इंग्रजी सुरू होण्यापूर्वी आपणास चून-भाकरीची संवय होती. आता वासना वाढल्यामुळे आम्हाला नाना प्रान्नावांचून होत नाही, म्हणून आम्ही परतंत्र होत चाललो. म्हणून जग हे आम्हीच आपल्या वासनेने वाढविले.

तुला स्त्रीप्रेम नसले तर दूध उत्पन्न होत नाही. दूध वासनेनेच उत्पन्न होते. आधी माझे मूल अशी समजूत झाली पाहिजे. नंतर दूध येते.

शरीर पडल्यावर वासना कायम राहते व दुसरे शरीर ती पूर्ण करण्यास घ्यावे लागते. नास्तिकांना वासनेची वाढ माहित नसते. शरीर म्हातारे होते, परंतु वासना म्हातारी होत नाही. म्हाताऱ्याची वासना तरुण असते. पण शरीर विषय सेवन करू शकत नाही. मन जसेचे तसेच राहते.

वासना शेवटी कालरूपिणी होते. काळ वास्तविक नाही.

आपण आपल्याकडे कमीपणा घेतो तेव्हा असे होते. तूं मास्तरीण झाली. या समजुतीनेच तुला बांधून टाकले. पति-पुत्र समजूत करून त्या अनुरोधाने वागावे लागते. पुत्राप्रमाणे मल, मुत्र शरीरातूनच होतात, परंतु वासनेमुळे पुत्रावरच प्रेम राहते. तुम्ही म्हणाल मलमूत्राची दुर्गंधी येते, तशी पुत्राची कोठे येते? तर पुत्र दुर्गुणी निघाला तरी प्रेम राहते. स्त्रीसंभोग झाला तरी वासनेशिवाय गर्भ राहत नाही. मरण- शरीर सोडणे हेही वासनेनेच. स्वप्नच दृढ झाले म्हणजे इकडे श्वासाला हालविणारे मन नसल्यामुळे श्वास विरतो व देह पडतो. पुत्राची वगैरे समजूत करून घ्यावी लागते.

योग्यांची समजूत असते की, आपण शरीराहून निराळे आहो. त्याप्रमाणे ते क्रिया करतात व मनाचेच स्वरूप बनून जातात, व वाटेल तेथे संचार करतात.

**आपले मन कोठेहि अर्धवट जाते म्हणून पूर्ण कळत नाही.**

याप्रमाणे लीला मन शरीरातून बाहेर काढून निघाली होती, तेथे त्यांनी दुसरी लीला पाहिली. दुसरी लीला कशी झाली? स्वप्नांत आई दिसते, ती वासनेनेच निर्माण होते त्याप्रमाणे!

श्वास जीव नव्हे. मन श्वासाला हालविते. मन फार वेळ स्वप्नांत राहिले म्हणजे श्वासाला हालविणारे कोणी नसते, म्हणून प्राण विरून जातो. लोक दुर्गतीला जाऊ नयेत म्हणून सत्पुरुषांना धर्म पाळावा लागतो.

लीलेने पतीला उठविले नाही, कारण ती आई झाली असती. म्हणून देवीने उठविले. दोन लीलांचे मन एकच होते पण शरीरामुळे भिन्न भास होते. (*स्वप्नांतली आई निजली असते)*

दुसरी लीला म्हणाली, ''याच शरीराने तेथे गेले पाहिजे.''

पहिली लीला म्हणाली, ''मला कां म्हणून शरीरांतून मन काढून यावे लागले?''

देवी म्हणाली, ''तूं सत्यासत्य जाणतेस. असे लोक शरीरातच गुरफटून राहात नाहीत. तुला परब्रह्माचे ज्ञान आहे. असे ज्ञान करून देण्याकरिताच तुला मी अशा रीतीने आणले. तूं पतिसेवा करून मोक्ष भावनेने माझी पूजा केली. दुसऱ्या लीलेने पतिबरोबर राहण्याच्याच इच्छेने पूजा केली. देवी व दोघी लीला गृीवर जाऊन युद्ध चमत्कार पाहू लागल्या.

योगी एकाग्र मन करून कसे शरीराबाहेर येतात हे सांगितले.

राजा युद्धाला निघून गेला. देवी, प्रबुद्धलीला व अप्रबुद्धलीला ह्या युद्ध चमत्कार पाहात होत्या. राजा लढत होता. राजा युद्धात मेल्याशिवाय त्याला ब्रह्मज्ञान होणे शक्य नव्हते.

तुला हे माहित असेल की - शरीराला ज्याचे मन चिकटून राहते, त्यांना पुष्कळ गोष्टीची गरज लागते. शरीराहून वेगळे राहणारास काम, क्रोध वगैरे षड्‌रिपु नाहीत. स्त्री दिसली की काम उत्पन्न होतो. स्त्री मेली की राग येतो. शरीराहून वेगळे राहता येत असेल तर कामक्रोधादिकांचा त्रास होत नाही. काम क्रोध वगैरे शरीरालाच. त्याच शरीराला जास्त चिकटून राहिले म्हणून सरतेशेवटी शरीराभिमान सोडताना कठीण जाते. त्यांना शरीराचा अभिमान सोडता येत नाही. मनुष्य पहिल्याने गुंतून घेतो.

पाश ज्याचे मनात नसतात त्याची वासना कोठे गुंतत नाही. जो मनुष्य सत्त्वस्थ असतो तो फक्त शरीरालाच चिकटून असतो. इतर पदार्थाला चिकटून राहत नाही. त्यांच्यावर उपदेशाचा परीणाम लवकर होतो. ज्यांच्या मनात राज्यासंबंधी वगैरे वासना फार वाढलेल्या असतात, त्यांना देह पडल्याशिवाय अभिमान सोडता येत नाही.

**क्षत्रिय** म्हणजे ज्याच्या मनात देहाभिमान असतो तो.

**ब्राह्मण** म्हणजे अभिमान रहित सत्त्वस्थ.

म्हणून क्षत्रियांना युद्धच सांगितले. काही क्षत्रिय शरीरातल्या शरीरातच मुक्त होतात. त्याचप्रमाणे काही वैश्य शूद्र वगैरे! परंतु हा अपवाद होय. साधारण नियम वरचाच. युद्ध चालले असता विदुरथ राजाने सिद्धरथ राजाला खाली पाडले तेव्हा दुसरी लीला म्हणाली ''राजाला खात्रीने जय येणार''

पण इतक्यांत विदुरथ राजाहि पडला. तेव्हा दुसरी लीला म्हणाली ''हे तर तुमच्या म्हणण्याप्रमाणेच झाले''



दुसरी लीला मूर्च्छित पडली. पहिली लीला दुसऱ्या ब्रह्मांडातून आलेली व तिला माहित की, तो पद्मराजा व्हावयाचा. राजाला घरी आणले व तो मेला. उत्तरक्रिया झाली. सिद्धरथराजाने आपले राज्य स्थापिले. आता मृत्यूचे लक्षण-

## मृत्यूचे लक्षण

मृत्यू म्हणजे महानिद्रा.

मृत्यूत दुःख नाही.

दुःख जन्मांतच.

झोपेत दुःख नाही. स्वप्नांत मात्र सुखदुःख आहे.

मृत्यूचे सूक्ष्म लक्षण.

हा जो राजा मेला की नाही, तो या स्वप्नांतून मागच्या स्वप्नांत गेला म्हणजे हे स्वप्न मोडले.

प्रथम लीलेचा पति मेला, त्यावेळी विदुरथराजाचे एवढे राज्य झाले.

हेही पद्मराजाचे शरीरातच.

स्वप्न मूहूर्तभरच. पण स्वप्नांत १०० वर्षेहि होऊन जातात.

पद्मराजाचे शरीरात विदुरथ राजा मेला पण हा सर्व पसारा मिथ्या. एक वाटोळा पदार्थ घेतला तो जिकडून घेतला तिकडून सारखाच. सृष्टी मायाबद्ध आहे.

**जेथे वासना स्फुरेल तेथेच पदार्थ उत्पन्न होतात.**

शरीराच्या दृष्टीनेच लांब, मनाने जवळ भासते. येथून पंढरीला जावयाचे म्हटले तर मन जाऊनहि आले. शरीराला दोन तीन दिवस लागतात. पायी गेले तर एक महिना. शरीरापुरते मन केले म्हणून गाडीची गरज. ती मनाला नको.

दुसऱ्या लीलेने असा वर मागितला की, ''राजा मेल्यावर तो ज्या जन्मांत जाईल त्या जन्मांत मी या देहासकट जावे.'' पण हेही तिने देहाला चिकटून मागितले होते. तुला स्वप्नांत पुत्र झाला व तो मेला तर दुःख होईल, परंतु जागृतीत ते खोटे. पुनर्जन्म होतो हे खरे. परंतु ज्ञान दृष्टीने खोटे. शरीराच्या मनाने पाहता काशी हजार कोस पण मनाने अगदी जवळ. मी म्हटले की, 'काशी जवळ आहे' हे ऐकून जर एखाद्याने कंडी फिरविली, तर ज्यांना अनुभव नाही, त्यांना पटणार नाही. येथून तेथे जाणे हे मनाने जरी खरे असले तरी योग्यांना मनच नसल्यामुळे त्यांच्या मते जाणे व येणे काहीच नाही.

दुसऱ्या लीलेने मागितले ''मी शरीरासुद्धा जावे.'' दुसरीच्या मानाने विदुरथ राजाचा दुसरा जन्म. यावरून पहिला दुसरा जन्म कारण हे मनाचे कल्पित आहे.

स्वप्नांत आई आपल्यापेक्षा मोठी वाटते, परंतु आई आपल्या पूर्वी उत्पन्न

झाली असे नाही. तर सर्व एकदमच उत्पन्न झाले. ही मानसिक स्थिति आहे. त्या दुसऱ्या लीलेला वाटले ''मी या देहासकट जावे'' पहिल्या लीलेला ''दोन्ही देह वासनेचे म्हणून खोटे वाटले.'' दोघी निघाल्या. पंचाईत पडली दुसऱ्या लीलेची.

पहिली लीला म्हणाली ''ही लीला कशी येणार''

''तूं तिला तेथे आल्यावर पाहाशील.''

आपल्या स्वतंत्रतेने पहिली लीला जाणार, वराच्या स्वाधीन होऊन दुसरी लीला जाणार व राजा महानिद्रावश होऊन झोपेतून उठल्यासारखा त्या देहात जाणार. दुसरी लीला जागीच जाणार, देवी व लीला यांना दोन्ही (स्वप्न) संकल्प रचता येत होते. यांना कोठे जावयाचे नव्हते.

त्या पूर्वब्रह्मांडात गेल्या इकडे इतके दिवस झाले तरी इकडे एक मुहूर्तच झाला. लीला सावध झाली. प्रेत हालू लागले. राजा उठून बसला. तिकडले स्वप्न मोडले. राजाला नमस्कार केला. 'मी आतापर्यंत निजलो' असे राजास वाटले. तो दुसरी लीला वरून उतरली. ही कोण म्हणून राजास आश्चर्य वाटले. या शरीरांत आल्यावर पहिली लीला ओळखीची. दुसरी लीला तिच्या सारखीच होती.

देवीने विचारले ''तूं कोण?'' लीला म्हणाली,

''आई तूं मला ओळखले नाहीस?''

राजा टक लावून पाहात होता. पहिली लीला मर्यादेने गप्प बसली. तिला काही सांगवले नाही. देवी पुढे झाली. दोघीला राजा देवीच समजला होता. देवी आल्यावर लीलेने सत्कार केला. राजानेही नमस्कार केला.

देवी म्हणाली ''राजा! निजून कसे करतोस''.

''आई! आपण कशा आल्या?''

देवीने मस्तकावर हात ठेविला. त्याला मागच्या पुढच्या जन्मांचे स्मरण झाले. देवी म्हणाली, ''बाबा! हे सर्व मनःकल्पित आहे. या जन्मांत हे खरे वाटले, स्वप्नांत स्वप्नच खरे वाटते. जागृती व स्वप्नही खरे व (मन) जिकडे लागते तेच खरे वाटते.''

राजा म्हणाला, ''असे कां?''

ब्रह्मज्ञान सांगणारा श्रेष्ठ म्हणून राजाने तिला आसन दिले.

राजा म्हणाला, ''आई! हे सर्व पटले. **ज्याकडे मन जाईल ते खरे वाटते.** असे हे दोन जन्मांत झाले की आणखी कधी झाले?''

देवी म्हणाली, ''अरे! असे हजारो जन्म झाले.''

देवी जसजशी हात ठेवत गेली, तसेतसे त्याला एक एक जन्माचे स्मरण झाले.

देवी म्हणाली, ''तुला वाटेल त्या जन्मांत नेऊन ठेवते.



राजा म्हणाला, ''स्वप्नाला खरे मानून मी या शरीरात यावे असे मी कां मागितले? वासनेने मला अजूनही हजारो जन्म येतील. मग देव वर देवो की न देवो.''

पहिली लीला हसली. देवी म्हणाली ''अरे, खरे काय म्हणून तूं मला विचारतोस? हे खोटे तुला वाटत नाही.

**अनुभव पटेपर्यंत देव, गुरु ज्ञान सांगतात.**

**गुरूने घेतलेली मेहनत नंतर भक्तीने फेडावी.**

तुला सर्व दिसलेना. आता माझ्यावर कां दोष?''

राजा म्हणाला, '' हे सर्व मनःकल्पित आहे आणि वासना धावेल तसे खरे वाटते. या जन्मात ही लीला. त्या जन्मांत तीच लीला खरी वाटली. तसेच स्वप्न ते खरे (वाटते ते) वासनेमुळे! जग वास्तविक खोटे.!

**माझा अमुक पदार्थ गेला म्हणून कोणी शोक करू नये.**

**हे सर्व वासनाजाल आहे. कोणी जन्मत नाही व मरतही नाही.''**

दुसरी लीला टक लावून पाहात होती. 'मी देहासकट आली' एवढेच तिला माहीत ही स्त्री खोटी व तीहि खोटी, असे राजाने म्हटलेले तिने ऐकले; म्हणून तिला वाटले, आपण राजाला आवडत नाही; म्हणून मूर्च्छित पडली. देवीने सावध केले.(व विचारले), ''बाई तूं कशी आलीस.''

दुसरी लीला म्हणाली, '' मी पूर्वी मूर्छित पडले. त्यातच मी आकाशातून पतिकडे जावयास निघाली, तेव्हा एक सुंदर स्त्री भेटली. मी तुझी कन्या आहे. मला सरस्वतीने पाठविले. मी तुला नेऊन घालण्याकरीता आली आहे म्हणाली व ती मला घेऊन जी उडाली तो सरते शेवटी एक समुद्र, पर्वत, पृथ्वी, पुन्हा पाणी, चंद्र, सूर्य, ब्रह्मलोक, वैकुंठ लोक, कैलास लोक (असे जात जात) ब्रह्मांडखापर फोडून आम्ही निघालो तो एकदम कैलास, वैकुंठ, ब्रह्मलोक यातून यमपुरीत आलो. तेथे गोष्ट ऐकली की, 'ही लीला या देहासकट जाणार.' आम्हाला कोणी रोखले नाही. तिने मला या दारात आणून सोडून दिले. परंतु इतके कृत्य व्हायला ३ लाख वर्षे लागली. इकडे एकच रात्र.''

देवी म्हणाली - ''अरे, हे काय! ऐकलेस ना! हे सर्व खोटे. ही शरीराने आली म्हणून इतका वेळ लागला. दुसऱ्या लीलेने पहिल्या लीलेप्रमाणे ज्ञान व्हावे म्हणून देवीला नमस्कार केला.

देवी म्हणाली, ''शरीरसंबंध आहे तोपर्यंत वैकुंठलोकात भोग भोगतो असे वाटते; परंतु - **शरीर सोडल्याशिवाय हा आनंद मिळावयाचा नाही.**

राजाला ज्ञान झाले.(देवीने) दुसऱ्या लीलेला पहिल्या लीलेप्रमाणेच उपदेश केला. त्याप्रमाणे दुसऱ्या लीलेलाहि अंतवाहक शरीर करता आले. दोन्ही लीला व राजा हे जीवन्मुक्त झाले. नंतर राजा उठला म्हणून उत्साह झाला. देवी निघून गेली. ते निर्वाण पदाला गेले.

वसिष्ठाने रामास सांगितले ''याप्रमाणेच सर्व अज्ञान आहे.''

**मुख्य गोष्टः-** वासना ही अघटितघटनापटु आहे. हिला काल देश नाही. ही म्हणेल मी मेलो तर खात्रीनेच मरणार. जीवनहि तसेच आहे.

**''मरण ही निद्रा व जन्म म्हणजे मोठे स्वप्न''** हे सार आहे.

**दुसरी गोष्ट अशी आहेः-** एकाच पुरुषाची वासना असते पण निरनिराळे ब्रह्मांड उत्पन्न होऊं शकतात. या जगांत आपण पाहतो की- झाडे, घोडे, पशु, पक्षी बोलत नाहीत. माणसे मात्र बोलतात. तसेच आपण स्वप्नांतहि पाहतो. घोड्याला बोलता येत नाही, असे आपल्या मनानेच घेतले. तसेच आपणाला स्वप्नांतहि दिसते. स्वप्नातही मन असते. कारण भूक, तहान, शोक इत्यादि विकार मनाचेच.

**सारी सृष्टी उत्पन्न करून मन शिल्लक राहाते.**

**थोड्याशा मनाचे स्वप्न होते.**

**बाकीचे तसेच कायम राहाते.**

स्वप्नांत जी माणसे आपण पाहातो ती आपल्या मनासारखी नसतात. त्यांनाही मन असते. तेही आपला व्यवहार करतात. त्यांना मन कोणते? आपल्या मनाचा अंश. आपले मन सागरासारखे आहे. दुसऱ्याचे मन घटासारखे. आपल्या स्वप्नांत आपण चोर उत्पन्न करून घेतो व त्याला आपणच भीतो.

**स्वप्नसृष्टी आपणच करतो,**

**पण 'मी ही केली' असे तेव्हा काही वाटत नाही.**

कारण आपणाला एकाच देहाचा अभिमान दृढ झाला असतो.

वासना त्या त्या शरीराचा अभिमान धरून तसतशी होते.

मन झाले स्वप्नरूप.

हजारो स्वप्ने जरी पाहिली तरी मन शिल्लक राहायचेच! पाण्याची जशी गार होते, तसे मन संपून जात नाही. हजारो जन्म झाले तरी वासना पूर्ण होत नाही. शिल्लक राहते.

०००





**॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज की जय ॥**

# २४. लवण राजाचे आख्यान

**स्वप्नांत प्रत्येकाला वाटते मी निराळा आहे.**

महात्मे शरीरातून मन निराळे करून जातात, असे मागच्या आख्यानात सांगितले. ऐन्द्रजालादि जगत् भ्रमाने दिसतात.

लवण राजा मोठा न्यायी होता. पुत्राप्रमाणे प्रजेचे पालन करीत असे. **सहावा अंश कर घेई** व तो प्रजेच्याच उपयोगाला लावी. तो फार धनाढ्य नव्हता म्हणून लोकप्रिय झाला. पैसा नसल्यामुळे त्याने मानसिक राजसूययज्ञ केला. तो सार्वभौम होता. इतके दूर देश फिरून पैसा आणणे फार वेळाचे काम होते व यज्ञ तर करावयाचा लौकर. मन स्वाधीन होते म्हणूनच तो काही व्यत्यय न येता फळला.

मानसिक यज्ञाने पाचपट फळ येते.

कोणतेहि काम मनानेच करतो. मनाशिवाय शरीराकडून काम कधीच होणार नाही. ''शरीराने काम केले तरच होईल'' अशी आपली समजूत होऊन बसली. म्हणून 'शरीरानेच केले ते केले' असे वाटते. वसिष्ठ म्हणतातः-

**मनसैव कृतं राम, न शरीरकृतं कृतम् ॥**
**येनैव आलिंग्यते भार्या, तेनैवालिंग्यते सुता ॥१॥**

मनाने जे केले तेच केले. शरीराने केले ते केले नव्हे कारण ज्या शरीराने भार्येला आलिंगन देतो त्याच शरीराने मुलीलाही देतो (पण) काम स्त्रीविषयीच उत्पन्न होतो (कन्येच्या बाबतीत उत्पन्न होत नाही.) मनाने घेतले की, हे विष आहे तर शरीर कधीच घेणार नाही.

राज्य सुरळीत चालले होते. सर्व प्रजा अनुकूल होती. राजा नेहमी प्रजेला शिक्षण देत असे. अपराध्यांनाच शिक्षा होत असे. राजा सिंहासनावर बसला असतांना एक ऐन्द्रजालिक घोडा एकाने आणला.

''बसल्यावर मोल द्या.'' असे तो म्हणाला.

राजा लागलीच घोड्यावर बसला. तो घोडा मेरुपर्वताजवळ हिमालयाच्याही कित्येक लक्ष योजने दूर गेला. २८ दिवस चालला. शेवटी एक तळे लागले. राजा पाणी पिण्यास उतरला. लागलीच घोडा, तळे, नाहीसे झाले राजा पाणी पिण्यास भटकूं लागला. एक चांडाळीण दिसली. तिच्यापाशी थोडे मांस होते. राजाला भूक लागल्यामुळे ते तिच्यापाशी मागितले. तिला बायको केली. त्याला वाटले की, ''मी आता महार झालो'' वगैरे अनेक दुःखे झाली. तितक्यांत साठ वर्षे झाली. इकडे

राजा ओरडून जागा झाला.

रामाला वसिष्ठ म्हणाले, ''यज्ञाचे दुःख भोगण्याकरिता इंद्राने दूत पाठविला होता. पांडवांनाही १२ वर्षे शारीरिक कष्ट झाले. याने मानसिक यज्ञ केला होता म्हणून याला मानसिक कष्ट झाले.''

तो लवण पुन्हा आपली कथा सांगता झाला.

वसिष्ठ म्हणाले, ''राजसूय यज्ञ कला असतां १२ वर्षे दुःख भोगावे लागते, नंतर स्वर्गप्राप्ती होते. कर्माचे फळ ज्याचे त्यालाच. राजसूययज्ञांत जितके सुख देवाला तितके दुःख मानवाला! पुष्कळ राजे जिंकून कर आणावा लागतो, म्हणून लोकांना पीडा होते. राजसूय यज्ञांत रज व सत्त्व असते. काही भाग पितरांना मिळत असल्यामुळे स्वर्ग मिळतो व मानवांना त्रास होत असल्यामुळे १२ वर्षे दुःख भोगावे लागते. राजसूय यज्ञामुळे पांडवांना दुःख होणार हे भीष्मादिकांना माहित होते. म्हणून ते बोलले नाहीत.

* व्यासांचे वचन मोडले म्हणून एक वर्षाचा अज्ञात वास!

* लवणाने मनाने राजसूय यज्ञ केला होता म्हणून दुःखहि मानसिकच झाले व सुखही पांचपट भोगावे लागले.

वसिष्ठांनी विचारले, ''तूं दुःख कसे कसे भोगले.''

राजा म्हणाला - ''मी घोड्यावर बसलो तों काहीच दिसेना. अंधार पडला. माहारीणीशी लग्न लावले. घोंगडे नेसावयाला दिले. मी लवणत्व विसरलो. महार आहे असे वाटले मला पुष्कळ मुले झाली. मृग मारावे व तेच खावे, अशी कित्येक वर्षे लोटली. माझी मुले सर्व मेली, बायको मेली, मला फार शोक झाला. त्या सर्वांना अग्नि दिला, व मीही त्यात शिरलो. मला शोक लागला. इतक्यांत ६० वर्षे लोटली. जागा झालो व पाहातो, तों सिंहासनावर !''

वसिष्ठ - ''**जगदृष्टीने हा प्रकार खरा, ब्रह्मदृष्टीने खोटा.** माया ही मनरूप आहे. जे जे तुला दिसते ते मनाने कल्पिलेले. हा देहही मनानेच कल्पिला. या देहात असलो म्हणजे येथलेच जेवतो. स्वप्नांत स्वप्नांतले. लवणदृष्टीने (जागृत् दृष्टीने) स्वप्नांतले खोटे व दुसऱ्याच्या दृष्टीने हाही देह कल्पितच! माया जिला म्हणतात ते मनच. चांडाळिशी तू लग्न केले व नंतर अग्नीत उडी घातली तेव्हा तूं जागा झाल्याबरोबर तुझ्या दृष्टीने त्या जगाचा प्रलय. तेथले देव वगैरे सर्व नष्ट! देहाचा अभिमान धरला म्हणून मन! सर्व ब्रह्मांडाचा अभिमान धरणारे मन- हिरण्यगर्भ- ब्रह्मा! स्त्रीपुरूषांचे प्रेम, एकमेकांचे शरीर एकमेकांशी बांधल्याने होत नाही. दोघांचे मन एकांशी झाल्याने होते. तशीच गुरुशिष्यांची गोष्ट. ही गोष्ट पशुपक्षांसही लागू आहे.



## एकागतेची शक्ती

एखादयाच्या प्रेमामुळे हजारो लोक जमतात. याचे कारण त्याचेमध्ये सर्वांची मने आकर्षण करण्याची शक्ति असते. राजावर सर्व प्रजा प्रेम करते व भिऊनही वागते. काही आश्रमात गाई, व्याघ्र एकत्र राहतात.

**एकाग्र करण्याची ज्याला शक्ती असते त्याच्या ताब्यांत सर्वजण राहतात.** तसे सर्व सृष्टीचे मन ज्याच्या ताब्यात आहे अशा ब्रह्मदेवाच्या स्वाधीन सर्व सृष्टी राहते व त्याच्यावर प्रीति करते म्हणून तो ईश्वर व त्याला भिऊन वागतात म्हणून यम तोच! आपल्या कर्माप्रमाणे चांगली वाईट फळे देतो. पाणी कोठून तरी म्हणजे पाण्याच्या साठ्यांतून आणतो. तसेच सर्व जीव हिरण्यगर्भातूनच निघतात व तेथेच लय पावतात.

तथापि प्रत्येकजण हिरण्यगर्भ आहे. देहाहंकारामुळे ते मर्यादित होते. एका शरीराचा अभिमान म्हणून ब्रह्मांडे निराळे वाटतात व म्हणूनच आपण लहान व ईश्वर मोठा असे वाटते. म्हणूनच द्वैताभास होतो व त्यामुळेच मरणाची भीति वाटते.

## मरणाची भीति

वासना भीतीला कारण व भीति हेच दुःखाला कारण आहे.
सर्व व आपण दोन वाटते म्हणूनच भीतिदुःख !
भेदामुळे जन्ममरणाची भीति ! तूं अशा प्रकारचे द्वैत सोडून दे.
जगत् आणि ईश्वर निराळे मानतो त्यालाच मृत्यु !
ईश्वर आपणाहून वरिष्ठ नाही. आपणहि लहान नाही.
शरीराचा अहंकार आहे तोपर्यंत ईश्वर श्रेष्ठ !
आपण रात्री सूर्य उत्पन्न करतो. परमेश्वर ते करू शकत नाही.
परंतु आपण शरीरावर येतो म्हणून वासना पुन्हा खाली पाडते.
यमदूत वगैरे कोणी आपणाला बांधीत नाही.
आपली वासनाच आपणाला बांधते.

## स्वप्नातील सृष्टि

स्वप्नांत आपण जरी सृष्टी उत्पन्न करतो तरी वाघाला भीतो. आपणाला वाटते आपण जागे आहो. स्वप्नाचे आपण उत्पन्नकर्ते असून आपण ते खरे मानून दुःखात व भयात पडतो. वाघाला आपणच उत्पन्न करून त्याला भीतो, याचे कारण त्याला खरे समजतो. ब्रह्मदेवहि या सृष्टीला खरी समजेल तर तोहि दुःखात पडेल.

## मृत्यु : निद्रेसारखा

आपणाला मृत्यु नसून ते निद्रेसारखे आहे. पण ते खरे समजून आपण आंगावर घेतले आहे. मरण म्हणजे निद्रा. पण आपण खरे मानतो म्हणून भीतो. राजा तूं जर म्हणशील की चांडाळीण भेटावी तर ती येथे सुद्धा भेटेल. गर्भात पुत्र मेला तर प्रेम नसते, पण बाहेर आल्यावर संगती झाल्यावर प्रेम जडते. जोपर्यंत पुत्र नसतो तोपर्यंत आपण खोटा समजतो, पण बाहेर आला म्हणजे खरे; म्हणजे आनंद हा जन्ममरणावर नसून मनावरच आहे. हे सारे जग मनोभ्रम आहे. तूं, मी हेही खोटे. मित्र व शत्रु आपल्या मनाचेच! निरपराधी मनुष्यालाहि शत्रु आढळतात. परंतु त्याच्या मताने शत्रु नसतात. उदा. चंद्र. चोर व्यर्थ (चंद्राचा) द्वेष करतात.

ता. ४-३-१९०७

## सर्व सृष्टीचे मन म्हणजे हिरण्यगर्भ

सर्व सृष्टीचे मनच हिरण्यगर्भ. सर्व जन स्वप्नवत्. संकल्पच स्वप्नाला कारण आहे. ब्रह्मांडाच्या मनाच्या संकल्पाला माया म्हणतात. लोकांत चांगले किंवा वाईट गुण दिसतात त्यांत चांगले ते सत्त्व व वाईटात दोन भेद (रज व तम) वाईट गुण आपणाला आवडत नाहीत. वाईट गुण त्याला अविद्या म्हणतात.. ब्रह्मांडाच्या एक मनात - हिरण्यगर्भात सर्व चांगले गुण असतात. परंतु आपल्या मनात वाईट गोष्टी काही येतात. समुद्र एक व घटातील पाणी व्यष्टि. परोपकार चांगला गुण, समुद्राच्या पाण्याचा चांगला उपयोग - त्याच्या योगाने नद्या, झाडे, मासे यांना पाणी मिळते. परंतु तेच घरांतले पाणी थोडे ! म्हणून परोपकार होत नाही म्हणून येथे कृपणता. समुद्राच्या ठिकाणी कृपणता नाही. घडलीतून (कळशीतून) पाणी पुष्कळांना देता येत नाही. तूं म्हणशील हा समुद्र, घट निर्जिव आहेत बालांनी त्यांना ज्ञान नाही तोपर्यंत त्यांना सजीवच समजावे, नाहीतर त्यांना क्रीडेत आनंदच वाटणार नाही.

अज्ञानांत निर्जीव पदार्थांना सजीव मानण्यांतच फायदा आहे.

परोपकारी मनुष्याबद्दल चांगले वाटते, परंतु मुलगा कृपण निघाला तर वाईट वाटते. घडलीमुळे कृपणता आली. ही समुद्राच्या ठिकाणी नाही.

ब्रह्मदेवाच्या संकल्पांतून कोणी काहीहि इच्छा केली तर ती मिळते. स्वप्नांत आपण बाहेर जात नाही. आपण सर्व ब्रह्मदेवाच्या भूमीचाच उपयोग घेतो.

आपल्या शरीरापुरते मन केले, म्हणून पुत्र मेला असता, दुःख होते. सर्व ब्रह्मांडा इतके मन केले, तर दुःख नाही. आपल्या शरीरापुरते मन झाले म्हणजे



अविद्या. आपल्यामध्ये असलेले दुर्गुण न्यूनपणामुळे दिसतात. चांगले तेवढी माया, न्यून तेवढी अविद्या. पूर्णतेमुळे सत्त्वगुण. परोपकार केला तरच आपणाला दिसते की हा चांगला.

## मनाचे स्फुरण

पंचभूतापासून मन झाले, असे श्रुतीत कोठे नाही. **''अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा''** येथे मन ही माझी प्रकृति आहे व **''इंद्रियाणां मनश्चास्मि''** येथे मी मन आहे असे म्हटले आहे.

पहिल्या ठिकाणी **वृत्तिरूपाने** व दुसऱ्या ठिकाणी मी **चैतन्यरूपाने** आहे.

पंचदशीत ''मन हे अपंचीकृत भूतांच्या सत्त्वगुणापासून व प्राण पंचभूताच्या रजापासून झाले'' असे सांगितले आहे

परंतु हे बरोबर नाही, कारण असे असते तर पंचभूत अगोदर व नंतर मन असा क्रमाने लय झाला पाहिजे, पण तसे होत नाही. निद्रेत मन लीन होते. सुषुप्तीत तमोगुण असतो म्हणजे काय? मन लय पावत नाही. जर लय पावत असले तर मी सुखाने निजलो ह्या स्फूर्तिसहित सुषप्ति मानली आहे. त्यात विषयाचे ज्ञान मात्र नसते. त्याचा स्वभाव स्फुरण्याचा; ते लीन कसे होईल?

मनाच्या लीनतेला सुषुप्ति म्हटले तर घोटाळा होईल. कसा, तर निद्रा जशी टिकते. तमांश स्थिर व सत्वांश अस्थिर. सत्ताद्वय उत्तम. व्यतिरेक - हेत्वभावावरून साध्य अभाव. निषेधात् - अज्ञान नाहीसे केले, बाकीचे ज्ञान. तत् ज्ञानाचा व तत् कार्याचा व्यय करावे लागते. ग्रंथाचे लक्षण अनुभवास लावू नये.

ग्रंथ **परोक्ष**, अनुभव **अपरोक्ष.**

**व्यष्टिरूप** मन **अविद्या** व **समष्टिरूप** मन **माया.**

## जीव आणि वासना

एखादे काम करतो तेव्हा आपले मनात दोन गोष्टी असतात.

(१) आपण आहो ते, (२) ते काम आपण (पाहिले) केले पाहिजे.

मी आहे असे अगोदर वाटते. नंतर वाचेने बोलतो. ''हा जो मीपणा वाटतो तोच **जीव**. आणि ते काम करण्याविषयी जे वाटणे ते **वासना**'' एकच आहे, परंतु उपाधीमुळे निरनिराळ्या वाटतात.

एखादी गोष्ट आपल्याजवळ पुष्कळ असली तर ती इतरांच्याहि उपयोगी पडते गाई म्हशीला दूध फार, स्त्रीला कमी, म्हणून म्हशीच्या दुधाचा पुष्कळाला उपयोग. अन्न खावून उरले, तर दुसऱ्यालाही देतो.

पण आपण मन शरीरापुरतेच केल्यामुळे आपल्याला पुष्कळ गोष्टी लागतात.

आपण दोन शरीराइतकेच झालो तर दुसऱ्यांच्या तृप्तीने आपली तृप्ति होईल. बैल आणि आपण एक झालो तर बैलाने गवत खाल्ले की, आपली तृप्ति होईल. सर्व ब्रह्मांडाचे मन जो ब्रह्मदेव त्याला आपलेच भोग मिळतात, म्हणून तो तृप्त. समुद्र आपल्याकरिता पाणी साठवीत नाही तर इतरांकरिता. (आपल्याला) आपल्याहून भिन्न वस्तूची इच्छा होते. ब्रह्मदेवाला भिन्न काहीच नसते, म्हणून त्याला इच्छा होत नाही. तोच सर्व जगरूप होतो. ब्रह्मदेवाचे, हे जगत् हात पाय आहेत. आपण जे निरनिराळे झालो, ते आपल्या वासनेमुळेच.

**ब्रह्मदेवाचा मीपणा म्हणजे सगळे जग व आपला मीपणा तो जीव.**

स्वप्नांत आपणास मीपणा वाटतो. स्वप्नांत आपणच अन्ने उत्पन्न केली. ती आपणच काय खावयाची, परंतु आपणाला काय वाटते की, हे खरे आहे, व आपण जेवढे मोठे असतो तेवढेच वाटतो हे स्वप्न आपणच झालो; असे समजले तर त्यांत आपण निर्मिलेल्या वाघ सिंहाची भीति वाटणार नाही; परंतु आपणाला मी हे स्वप्न झालो असे वाटतच नाही. आपण देहापुरता अहंकार धरतो व बाकीचे हे जग निराळे असे वाटते.

**आपल्याला कमी समजल्यामुळे शत्रु- मित्र वाटतात.**

ब्रह्मदेवालाहि मी निराळा आहे, असे वाटेल, तर तोहि आपल्यासारखाच दुःखांत पडेल. जो ब्रह्मदेव ज्ञानावाचून सृष्टी उत्पन्न करतो, त्याला वाटते दैत्य माझे शत्रु आहेत व देव भिन्न आहेत. महादेवाला सुद्धा भस्मासुर डोक्यावर हात ठेवू लागला, तेव्हा निराळा समजल्यामुळे मोह झाला होता. सगळ्या सृष्टीचे मन जेव्हा पालन करते तेव्हा विष्णु. झोपेतून उठले की, काम करावेसे वाटते व निजावयाची वेळ झाली म्हणजे सर्व कामे सोडून मन निजते. तसेच ब्रह्मा, विष्णु, महेशांचे. सर्व जगांचे काम करून मनास थकवा येतोच. महादेवाला ५(मुखे), ब्रह्मदेवाला ४(मुखे) व विष्णुला ४ भुजा असे हे भक्ताकरिता कल्पिले आहे (ध्यानाकरिता). हे आपल्याला वासनेनेच होते. चतुर्मुखी ब्रह्मदेव सृष्टी उत्पन्न करीत नाही व शंकर प्रलयादि करीत नाही. अंबरीषाच्या घरी विष्णु गेले तेव्हा सृष्टीचे पालन कोणी केले? (दिवसा आला असेल तर) तर मग रक्षण, पालन कोण करतो. सकल जगाचे मन. हा आपल्या वासनेनेच त्या सकल जगाच्या मनातून बनलेला.

**जे जे स्वप्न दिसत जाईल ते ते आपणच झालो, असा अभ्यास करावा.**

कारण त्याशिवाय स्वप्नांतील वाघ सिंहाचे भय जाणार नाही. स्वप्नांत आपण जगात आहो असे वाटते व आता येथे बसलो आहो म्हणूनहि वाटते. तर येथे -सारे जग आपणच आहो असा जागृतीतच अभ्यास करावा.



जसे आपले मन स्वप्नात सृष्टी उत्पन्न करते, म्हणजे ते ब्रह्मदेव आहे. तसेच सर्व जगाचे मन हे जगत् कसे (आहे?) म्हणजे तो **ब्रह्मदेव व आपण एकच आहो.**

लहान मुलाला दुध पिण्याची गरज. आई तिकडे मेली तरी त्याला फिकीर नाही. मोठा झाला की, दुधाची, अन्नाची व आईची (गरज). पाटील झाला की, आपली व गावाची, राजा झाला की, आपल्या प्रजेची व देशाची!

तुम्ही आपल्या मताने भावना कराल तर अर्धे मन शिरते. तेच गुरुदेव यांनी सांगितले की, पुरी भावना होते. परिक्षा झाल्यावर तूं पास झाला म्हटले तर त्याला अर्धवट खरे वाटते तेच त्याच्या गुरुजीने सांगितले की खरे वाटते.

स्वप्न मी झालो अशी भावना करण्यापेक्षा, हे जगतच मी झालो अशी भावना करणे विशेष चांगले.

## कथा : इन्दु पुत्रांची

इंदु नावाचा राजा होता. तो प्रजेचे मुलासारखे पालन करी. मनुष्याचे बापावर व पालन करणारावर सारखे प्रेम जडते. आईसारखे प्रेम कोणावर होऊ शकत नाहीत. बापासारखे प्रेम पालन करणाऱ्यावर होवू शकते, कारण आईसारखा बापाला लळा नसतो. कारण आईचा गर्भात संबंध असतो. गौतमांनी चिरकारीस त्याच्या आईला मारावयास सांगितले; मारले तर मातृहत्या, न मारले तर पितृआज्ञाभंग. वास्तविक आईचाच मुलगा. बापाचा अनुभव फक्त पालन करण्यापुरताच. बापाच्या वीर्यापासून आपण झालो हे तरी श्रद्धेनेच समजतो, म्हणून आपली प्रीति बापाप्रमाणे इतरावर बसू शकते. परंतु बापाला वाटते की हा माझ्या वीर्यापासून झाला म्हणून मुलाप्रमाणे इतरावर प्रेम नसते.

रक्षण कर्ता, पालन कर्ता, जन्मदाता यांना पितर समजावे.

हा बहुतेक शत्रूंना सामानेच (बोड बोलून) वश करीत असे. याला १० मुले. त्या सर्वांचे नाव ऐंदव पुत्र. अशा राजाला अजात शत्रु असतात.- चोरी करणाऱ्याला हा पैसे देई म्हणून त्याच्या राज्यांत चोर नव्हते. राजाला एकच स्त्री होती. ज्याला लढाया करण्याचे पुष्कळ काम त्याला पुष्कळ स्त्रिया असल्या पाहिजे. लढाईपासून उत्पन्न झालेला क्रोध कामाने शांत होतो. मध्यम राजाला पुष्कळ लढाया व पुष्कळ सुख. कनिष्ठाला दुःख फार. उत्तमाला सुख फार. राज्य हे प्रजेच्या सुखाकरिता आहे, असे त्यास माहित असल्यावरून त्याने व्यवस्था केली नाही. राजा संपला.

सात्त्विक मनुष्याला ज्ञान होईपर्यंत प्रेमळपणाच फार असतो. ज्ञान झाल्यावर सर्व समान असते.

राजाला ज्ञान होते व सत्त्वशील होता. म्हणून त्याला मरणाचे काही वाटले

नाही. राजाच्या मुलांना फार शोक झाला. मनावर परिणाम झाला की, शरीरावर परिणाम होतात.

शोक सत्त्वशीलालाहि व तामसालाही होतो. तामसी त्याबद्दल सूड घेण्याचा विचार करतो व सत्वशीलाला वैराग्य होते.

यांनी राज्य सोडले व वनात जाऊन एकसारखे शोक करू लागले. शोकाचे असे आहे की, एकाला रडे आले की, सर्वांनाच येते. त्या सर्वांची एकाच गोष्टीत एकाग्रता झाल्यामुळे सर्व जणांची जूट होती. वडील भाऊ शेवटी म्हणाला शोक करून काय उपयोग? ''वैराग्य शोकाने होवो किंवा कशानेहि होवो त्याचा दुसऱ्यावर पगडा बसतो.'' तरुण वयात सात्त्विक असला तरी थोडासा काम विकार होतो. परंतु वयाच्या मानाने कमी होत जातो. त्याप्रमाणे वडील भाऊ जास्त विचारी होता.

नऊ जण म्हणाले ''आपण आपल्या पित्याकडे जाऊं व तेथेच राहू''.

वडील भाऊ म्हणाला, ''अरे वेड्यांनो! या जन्मातल्या पित्याबद्दल शोक करतां, असे तुमचे कित्येक जन्म झाले व तितकेच पितेहि झाले. कोणाकोणाबद्दल शोक करावयाचा? सगळ्या, जगाचा तात म्हणजे ब्रह्मदेवच आपण होऊ.''

म्हणून ''मीच ब्रह्मदेव व मीच सर्व जगभर झालो'' अशी प्रत्येकाने भावना दृढ केली. शरीरे पडली. लढाईचा आवेश चढला की, कोणी थापड मारली तरी कळत नाही, इतक्या भावनेने ते बसले. मन पूर्ण आहे. दहा ब्रह्मांडे झाली. खरा ब्रह्मदेव जागा झाला तो पाहतो १० सृष्ट्या.

अकराव्या ब्रह्मदेवाने एका सूर्याला हे विचारले, त्याने सांगितले की, ''इंदुराजाच्या मुलांनी आम्ही ब्रह्मदेव अशी दृढ भावना करून ह्या निर्माण केल्या''.

तो म्हणाला - ''मी काय करूं?''

सूर्य - ''तुम्हाला काय जागा थोडी आहे?''

ज्याप्रमाणे काशीपर्यंत प्रदेश आपल्या कंठाइतक्या जागेत दिसतो. डोळे लावले की, मोठे मोठे आकार दिसतात. तुम्ही बिंदु एवढ्या जागेत सृष्टी उत्पन्न करता.

सूर्य म्हणाला- ''मागचाजन्म व पुढचाजन्म हे बीजवृक्षन्यायाने चालले आहे.''

## स्वतःची खात्री महत्वाची

आपल्याला आपली जितकी खात्री तितकी दुसऱ्याला देता येईल काय? आपली खात्री दुसऱ्याच्या खात्रीने नष्ट होत नाही. एकाने एक गोष्ट सांगितली व दुसऱ्याने ती नाही म्हणून सप्रमाण सिद्ध केले तर पहिली व्यर्थ. (पण) आपल्या



बद्दलच्या खातरीचा बाध होत नाही. 'मी गुलाबराव नाही' असे (मला) कोणी कितीही सांगितले तरी मला पटणार नाही.

## मागील व पुढील जन्म

काल व आज जे बोललो त्याचीच आठवण नाही. तरी काल काही केले नाही असे नाही. तसे मागला जन्म नाही असे म्हणता येत नाही. मागला जन्म पाहता येतो. कालच्या गोष्टी आठवत नाही, तरी आठवू लागलो तर आठवतील. तसे संस्कार साक्षात्करण केल्याने मागच्या जन्माचे आठवत गेले तर आठवते. मागला जन्म आठवून काय होईल? पापे आठवतील. त्यापासून काही फायदा नाही. पुढली स्थिति आठवणे फायदेशीर. पुढली स्थिति पाहाणेच चांगले ज्या गोष्टीवर आपले प्रेम तीच गोष्ट पुढील जन्मांत मिळते. ह्याच देहावर प्रीति म्हणून हाच देह स्वप्नांत मिळतो.

एखाद्या गोष्टीवर आपले प्रेम बसते. तीच स्वप्नात पुन्हा पुन्हा दिसते; तसेच दुसऱ्या जन्माचे. दुसरा देह घेतल्यावर आपली ज्या ज्या वस्तूवर प्रीति त्या त्या मिळतात - गृह, गुरं, ढोरं, मुले वगैरे. द्वेष ज्याच्यावर त्या मिळत नाहीत.

स्वप्नांत वैरीहि उत्पन्न होतात तेही प्रेमानेच. आपले प्रेम सोन्याच्या भांड्यावर आहे, त्यावरच दुसऱ्यांचेहि आहे. त्याला मिळू नये म्हणून आपला प्रयत्न व आपल्याला मिळू नये म्हणून दुसऱ्याचा प्रयत्न. अशा झटपटीत प्राण गेले तर ते एकमेकांचे वैरी होतील. वैरी जरी असला तरी वस्तु मिळू शकते. आपल्याला वस्तु पाहिजे परंतु ती राजाजवळ असली तर इच्छा करून नुसते मिळणार नाही, त्याला प्रसन्न करून घेतले पाहिजे. स्वर्ग वगैरे सर्व देवांच्या ताब्यात म्हणून त्यांना संतुष्ट केले पाहिजे. प्रेमाचे फळ कर्माने मिळते. विघ्ननाश होऊन कर्म पूर्ण होते. **विघ्ननाश कशाने? — निष्काम कर्म केल्याने !** सकाम वासनेने स्वर्ग मिळतो.

**वासना दोन प्रकारच्या - नाश पावणाऱ्या व दुसऱ्या कायमच्या !**

भिकारी मागावयास आला. इतक्यांत कुत्रा अंगावर धावला, तितक्यांत त्याला मारण्याची इच्छा झाली व गेली. ज्या वस्तुवर प्रेम असते, त्या स्थितीत जातांना काही वासना उद्भवतात. आपले प्रेम एखाद्या धनावर आहे, परंतु ते पाण्यात आहे, मग दुसऱ्या जन्मांत मत्स्य झाले पाहिजे. हे कुत्र्याच्या मारण्याप्रमाणे मध्येच इच्छा झाली. विराट मनुष्याच्या देहाला हात आहेत. पशूला नाहीत. म्हणून तो माणसाच्या आकाराचा आहे.

जसे मन स्फुरेल तसतसे किंवा ज्या वस्तूवर आपले प्रेम असेल ती ज्या शरीराने मिळणे शक्य असेल तसा देह घ्यावा लागेल. आपले मुलावर प्रेम आहे आणि मुलाचे प्रेम मुसलमानावर आहे. तो होईल मुसलमान त्याला भेटावयाला जावे

लागेल.

ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्यांत एक चुकते, त्यामुळे दुसऱ्याची हानी होते. आपले घरावर प्रेम आहे, तितकेच चिलटाचे आहे पण त्यांना आपण हाकून देतो. त्यांचीहि इच्छा आपल्याला घर मिळावे अशी राहते. यामुळे घर राहते एकीकडे व वैरी होऊन ते येतात.

## मनावरच प्रेम करावे

सर्व वस्तूवरील प्रेम सोडून द्यावा. आपल्या शरीरावरचा प्रेमहि सोडून द्यावा. मनावरच प्रेम करावा. स्वप्नांत मनच दिसेल व स्वप्न दिसणार नाही. मन अपंचीकृत आहे म्हणजे आपणच दिसू. दुसरे काही दिसणार नाही. असे होता होता शेवटी आपली भावना दृढ झाली म्हणजे आपणाला एकट्यावाचून दुसरे काहीच दिसणार नाही. मग तुला तहानभूक मुळीच लागणार नाही. मग तूं शंकर होऊन जाशील.

शरीर, मन आणि आत्मा. पोकळीत हाताने हालविले म्हणजे वायु होतो. तद्वत् मनाने हालविलेला तो प्राण. मनाच्या स्पंदाने शरीरात वायु होतो. शरीराचा जसा विचार नको तसा प्राणाचाहि नको.

सर्व सृष्टि मनोमय आहे. जसा संकल्प करावा तशी उत्पन्न होते. आता आत्म्याविषयी विचार करतांना आत्मा मनाहून भिन्न आहे. मन, आत्मा आणि शरीर यांच्या मध्ये आहे. काही भाग शरीराकडे व काही भाग आत्म्याकडे.

आत्मा शब्दाने सांगता येत नाही. सर्व काढून बाकी राहिलेला आत्मा, असा निषेधमार्गाने सांगता येतो. हा ''आत्मा पहावयाचा असला तर शरीरावरची आसक्ति काढून मनावर आणली पाहिजे.'' मोठा समुद्र आहे. सर्वीकडे असणे म्हणजे मागे, पुढे असणे, कांठावर उभे राहतो तेव्हा पाणी पुढे आहे असे म्हणतो. तेच आत गेलो म्हणजे चोहोकडे आहे असे म्हणतो. आपण आत्मसमुद्राच्या काठावर आहो. मनावर स्थित झालो म्हणजे मनच दिसते.

## मानसिक दृष्टीची मीमांसा

ज्याची मानसिक दृष्टि होते म्हणजे शरीरावरील आसक्ति नाहीशी होते, त्यालाच आत्मा दिसतो. शरीराच्या स्वाधीन असतो तेव्हा पुष्कळ गोष्टीची उणीव वाटते. तेच मन आपल्या स्वाधीन असले तर आपणास कशाचीच उणीव वाटत नाही. काशीला जावयाचे, शरीराला पुष्कळ अडथळे, मनाला काही नाही; म्हणून मनावर लक्ष दिले पाहिजे.

धर्म हा सुद्धा आत्म्याकडे नेणारा आहे. दया, परोपकार, आर्जव इत्यादि. काम, क्रोध, लोभ ह्या शरीराकडे नेणाऱ्या वृत्ति आहेत.



**वेदपुराणे जो धर्म सांगतात तो तरी शरीराकडला मनाचा भाग काढून आत्म्याकडे लावण्याकरिता !**

क्रोध मनांत येतो हा शरीरालाच धरून येतो. स्त्रीला पुरुषाची व पुरुषाला स्त्रीची इच्छा नुसत्या मनाने व्हावयाची नाही. त्याला शरीर पाहिजे. ''काम, क्रोध जसे उत्पन्न होतील तसतशी शरीराची आवड जास्त होवू लागते.''

* **नीति** हा धर्म (कर्तव्य).

* **दया** दुसऱ्याचे बरे होण्याकरितांच.

* **क्रोध** आपल्याकरिता असतो. यांत दुसऱ्याचे नुकसान होऊन आपल्या बऱ्यांकरिता असतो.

दयेलाहि शरीराची थोडी जरुरी लागते परंतु ती शरीराची आसक्ती वाढूं देत नाही. दया ही मनाची वृत्ति. ही शरीराकरिता नाही. मनामध्ये आहे. तसाच परोपकार. स्वार्थाचा परोपकार निराळा. यावरून दया ही वृत्ति शरीराहून निराळी असते. दया जास्त वाढली तर शरीरावरची आसक्ति अगदी नष्ट होईल. तसे काम, क्रोधाचे नाही.

क्षमा, शांति हे मनाचा संबंध शरीरापासून तोडून टाकतात. हे धर्म वाढविले तर शरीराची पर्वा आपणाला कमी राहते. मनाची जास्त राहते, जसे कीर्ति. ही शरीराला काही उटणे लावीत नाही. बुगड्या बाळ्या घालीत नाही. कीर्ति हा मनाचा धर्म. जे मनाची पर्वा करतात, त्यांना शरीराची पर्वा कमी राहते. कीर्ति ही शरीरांची आसक्ति कमी करते.

**धनवान् माणसाला शरीराची आसक्ति फार.**

यापेक्षा दया, क्षमा वगैरे शरीराची आसक्ति कमी करतात.

आपल्या धर्मात चांगले वागावयास सांगितले ते स्वर्ग मिळण्याकरीतां नव्हे; तर शरीराची आसक्ति कमी करण्याकरीता आहे. बहिऱ्या मुक्यांना जसे खुणेने सांगता येते. तसे पशुपक्षांनाही आत्मज्ञान करून देता येईल. परंतु त्यांची शरीरावर अति आसक्ति असते.

## आत्मज्ञानाचा पाया

आत्मज्ञानाचा पाया नीतिमध्येच भरला आहे शरीराहून निराळे व्हावे, अशी जर इच्छा असेल तर नीति पाळावी. नीतिवान मनुष्याला मनाच्या द्वारे शरीराहून निराळे राहता येईल.

चांगल्यारीतीने जेव्हा आपण शरीराहून भिन्न होतो व **आपण मनच आहो अशी भावना दृढ होते, तेव्हा आत्मप्राप्ति.** मी आत्मा असून मनाच्या वृत्ति माझ्या

आहेत असे वाटू लागेल तर आत्म्याच्या ठिकाणी मीपणा ठेवता येईल. मी आत्मा आहे असे वाटल्यावाचून आत्म्याच्या ठिकाणी मीपणा स्थापन करता येणार नाही. मनाहून आत्म्याला निराळे करण्याकरिता विवेक केला पाहिजे.

०००

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज की जय ॥

# २५. याज्ञवल्क्यांचा उपदेश

**''आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति''**

आत्मा मी आहे असे वाटले पाहिजे. **शरीराहून मनाला निराळे करता येते, तसे मनाहून निराळे होता आले पाहिजे.** मन हे सुख देणारे व शरीर हे दुःख देणारे असे तुला वाटत होते. पण मन सारी सृष्टि उत्पन्न करते व तेच सुखदुःख देणारे आहे

. कोणी याज्ञवल्क्य मुनी होते, त्यांना दोन स्त्रिया होत्या. धर्म, अर्थ काम या तीनच गोष्टी पुरुषाला स्त्रीपासून व स्त्रीला पुरुषापासून. मोक्ष ज्याचा त्यालाच केला पाहिजे. अभिषेक ब्राह्मणाकडूनहि करविता येतो व जेवण ज्याचे त्यालाच केले पाहिजे ब्रह्मप्राप्ति आपली आपल्यापासूनच. कथाश्रवणापासून पातके नाहिशी होतात.

ते मुनी संन्यासाला निघाले तेव्हा आपले धन दोघींना द्यावे व निघून जावे असे त्यांस वाटले. त्या म्हणाल्या ''धन नको. जे धन कधी नष्ट होणार नाही असे धन मला द्या.'

त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, ''हिला तीन रीतीने ज्ञान दिले पाहिजे. *ती माझी आई, स्त्रीच्या ठिकाणी पुत्र उत्पन्न झाला की तिच्या ठिकाणी संयोग करू नये. आईचा उद्धार केला पाहिजे. *ही तर धन घेत नाही म्हणून मला जे काही येते, त्याचा अर्धा भाग दिला पाहिजे. *मलाही पुत्र नाही. ज्ञान दिले की ही माझी कन्या होणार. तिन्ही प्रकाराने ज्ञान देणे उचित आहे.''

मुनी म्हणाले, ''तुला जो प्रेम आहे, तो आपल्या करिताच! पतीवर प्रेम आपल्या सुखाकरिताच! बापाचे पुत्रावर प्रेम बापाकरिताच! असेच सर्वांचे. यावरून आपआपल्या सुखासाठी इतरावर प्रेम करतो. देवावरहि प्रेम आपल्या करिताच! खरा प्रेम कोणावर? आपल्यावरच! आत्म्याचा शोध कशाने लागेल.? आपल्यावर प्रीति केल्याने! आपण आपणाला आवडत नाही असे कधी होत नाही. स्त्री, पुत्र दुर्गुणी असले तर आवडत नाहीत.

गरजेपुरते प्रेम ज्यावर असते तो अनात्मा! अखंड प्रेम तो आत्मा!



शरीरावर अखंड प्रीति नाही. मनही आवडत नाही. भलतेच काही विचार आले तर तेही आवडत नाही. शरीराचे प्रेम असते म्हणून आपल्याला वाटते उडी टाकून हात पाय मोडेल. मन आवडत नाही कारण मनाला वाटले विष खावे, तें आपणाला आवडत नाही. यावरून आपण मनाहून निराळे! आपणाला आपली अखंड प्रीति! शरीराहून मन निराळे व मनाहून आत्मा निराळा!

पतीला स्त्री, आपल्या करिताच आवडते. स्त्रीला पतीही आपल्या करिताच (आवडतो). आपली प्रीति दुसऱ्यापासून आलेली नाही. आपण अखंड सुखमय आहो. आपणाला सुख पाहिजे. जे जे आवडते ते ते सुख! अखंड सुख-जे अखंड आवडते ते! पुत्रहि दुःख देणारा असला तर आवडत नाही. शरीर अति क्षीण झाले म्हणजे मरावेसे वाटते. शरीराहून मन आवडते पण त्यातही वाईट विचार आले तर तेही आवडत नाही.

असे जरी आहे तरी हे स्थिर राहत नाही. वर गोटा फेकला असता जसा पुन्हा खाली येतो, त्याप्रमाणे आपण विषयाच्या ओढीमुळे पुनः पुनः शरीरावर येतो.

**ज्यांची शरीरावर आसक्ति आहे ते कामनेने भक्ति करतात.**

ज्यांना धनाची आवडी आहे, त्यांना शरीरावरच विशेष प्रीति! परंतु ज्यांना मनाची प्रीति ते शरीराची फार थोडी काळजी करतात.

**वृत्तीचे जड होणे म्हणजे नेहमी देहावर येणे याला पातके म्हणतात.**

जिलेबी खावीशी वाटली परंतु पैसे नाहीत तर चोरी करण्याची प्रवृत्ति होते.

**पैसा अति मिळवावासे वाटले म्हणजे तो लबाडीला प्रवृत्त होतो.**

गंगेचे पाणी आपल्याला काही उपयोगाचे नाही. कांखेतील पाणीच उपयोगी. एका बाईची नथ हारपली. धुंडावयास लागली. परंतु ती होती गळ्यांत. एकाने आरसा दाखविला तोंच तिला सापडली. ब्रह्मलोक स्त्री पुत्र वगैरे सर्व विषय आपातरमणीय आहेत. आता तुला एथल्या पुत्राची आवडी! स्वप्नांत स्वप्नांतल्या पुत्राची! या जन्मांत या पुत्राची, पुढल्या जन्मांत पुढल्या पुत्राची! नदीत पाण्याबरोबर वाहत येऊन एके ठिकाणी जमलेल्या लाकडाप्रमाणे आपला या जगात आप्तवर्गाशी संबंध! एक बह्मज्ञान तारक! कोणी कोणाच्या मोक्षात उपयोगी पडत नाही.

**संसारात जे जे आवडते, ते ते दुःखाला कारण होते.**

वैराग्याशिवाय हे ज्ञान होत नाही. संसारातून जो वेगळा राहतो तोच मुक्त. संसारात सर्वस्वी परतंत्रता असते.

**''वैराग्यावाचूनि कही । ज्ञानासि तगणेचि नाही'' ज्ञानेश्वरी**

आत्मज्ञान ज्या शास्त्रांत सांगितले तेच पढावे. तर्काने तेच पटवून घ्यावे.

ता. १२-३-१९०७

आपणच सुखमय, इतर नाही. आता आपण शरीराहून निराळे आहो हे पाहण्याच्या नाना रीति आहेत. कोणी एकाग्र करून पाहतात. असे योगी थोडे!

## धर्मानेच वागावे

कोणी धर्माने वागून (आपण शरीराहून निराळे आहो, हे पाहतात.) . धर्म म्हणजे नीति. ही स्वर्गाकरिता नाही. कारण तो दृष्ट नाही. संसाराकरिताही नाही. कारण त्यात बळी तो कान पिळी असा न्याय दिसतो. तर धर्म हा शरीराची आसक्ति कमी करण्याकरीता! मानी मनुष्यांना मानाचीच जास्त परवा! परंतु शरीराकडूनच मान मिळावा अशी त्यांची इच्छा असते. पण याहून दया श्रेष्ठ; कारण दया ही पशुपक्षी किटकावरही करतो. यात शरीराची आसक्ति फार कमी. उदा- शिबीराजा. शरीराहून मन निराळे करताना पुष्कळ गोष्टी अटकतात.

धर्म तीन गोष्टीने चांगला चालतो. **१) भीति, २) आवडी, ३) एकाग्रता** परंतु इतक्या गोष्टी मनुष्याकडून होत नाही. कोणी दंभाकरीता करतो.

**धर्म म्हणजे दान नव्हे, तर शुद्ध आचरण!**

**स्त्रियांना पतिव्रता धर्मासारखा सुखकर धर्म नाही.**

विष्णु पुराणात अशी कथा आहे. व्यासांकडे पुष्कळ ऋषी आले व उत्तम धर्म कोणता? म्हणून विचारले.

नदीत उडी मारून ते वर येऊन (व्यास)म्हणाले.

* ''शूद्रा तूं धन्य आहेस तूं ब्राह्मणसेवेनेच मुक्त होशील.''

## स्त्री धर्म

* दुसऱ्याने उडी मारून वर आले तेव्हा म्हणाले. ''स्त्रियांना पतिव्रत्य चांगले.''

दंभ केव्हां? जेव्हां आपण स्वतंत्र असतो तेव्हां !

पतिव्रतेचे तसे नाही. ती सर्वस्वी पतीच्या स्वाधीन! दुसरे तिला पतीची भीति व ती सर्व काही पतीकरीताच करते.

मनुष्यांना पुष्कळ गोष्टी पाळाव्या लागतात. यज्ञ करावयाचा असला तर धन दुसऱ्याकडून आणावे लागते. क्षत्रियांना मदतीकरता बोलवावे लागते. त्यांत काही कमीपणा झाला तर विध्वंस!

स्त्री धर्माचे तसे नाही. पतिसेवा करताना ती शरीराहून निराळी होते. ती ज्ञानसंपन्न झाल्याशिवाय मोक्ष नाही. ती ज्ञानी झाल्यावर पतीला ज्ञान करून द्यावे. देवधर्म, गुरुसेवा, पतिसेवा, पितृसेवा हे शरीराहून मनाला निराळे करतात.



एखाद्या मनुष्याला जितका आळस जास्त तितकी शरीराची आसक्ति जास्त, म्हणून मन निराळे होत नाही. कर्म करण्याने शरीराची आसक्ति कमी होते. अशी थोडी थोडी आसक्ति कमी करीत गेले म्हणजे शरीरावरची आसक्ति अगदी नाहीशी होऊन ध्यानात निमग्न होवू.

**परमानंदी लागली टाळी । कोण देहाते सांभाळी ॥**

हे कर्म मनाला शरीराहून निराळे करते. परंतु आत्मा निराळा केला जात नाही. ज्ञानच आत्म्याला मनापासून निराळे करते. कुऱ्हाड झाडाला तोडून टाकते. परंतु त्यास समूळ जाळण्यास अग्नीच समर्थ. पाक (स्वयंपाक) हा हातानी तयार करतो. परंतु रसस्वादाला जिव्हाच पाहिजे.

पतिसेवा शरीराहून मनाला निराळे करते, परंतु आत्म्याला निराळे करीत नाही. त्याचे ज्ञानच झाले पाहिजे. कर्म न करिता केवळ ज्ञानानेच सर्व काही करू म्हणेल तर आळस वाढेल. प्रातःस्नान वगैरे शरीराची आसक्ति कमी करितात. शेतकरी उन्हात काम करतात. परंतु रात्री थकून निजतात. तसे कर्म केल्याने दगदग वाटत नाही.

०००

**॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज की जय ॥**

# २६. चुडाला राणीची कथा

कोणी शिखिध्वज नावाचा राजा होऊन गेला त्याची चुडाला नावाची स्त्री होती. ती फार साध्वी होती. पति दुसऱ्या गावास गेला असला तर ती श्रृंगार करीत नसे. जे पतीचे दुःख. तेच तिचे दुःख! राजाचे काही मन राज्यात व काही मन हिच्यात! परंतु चुडालेचे सर्वस्वी लक्ष पतिसेवेतच होते. त्यामुळे तिला शरीराहून मनाला निराळे होता येत होते.

**जसजसे शरीराहून मन निघत जाते, तसतशी दिव्यदृष्टी येते.**

दिव्यदृष्टीने तिने संतांचा शोध केला. पतीला सुख देणे हीच पतीसेवा. तिला वैराग्य प्राप्त झाले. पतीला सुख द्यावयाचे. पण खरे सुख आपल्याजवळ तरी कोठे आहे. खरे सुख म्हणजे आत्मज्ञान होणे. तेही सुखरूप आहेत, परंतु त्यांना त्याचे ज्ञान नाही. वसिष्ठ एकेवेळी आपलीच कथा रामास सांगतात. जितके जितके मन शरीराहून निराळे करावे तसतसे आपल्याला इतर वस्तुची गरज कमी लागते.

**मरणार नाही, असे जर आपल्या मनाने घेतले तर कधीच मरण येणार नाही.**

वासनेचे काहूर माजल्यामुळे पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो.

वसिष्ठ ब्रह्मदेवाच्या सभेत गेले. मनुष्य पहिल्याने कोणाचा पिता नसतो. सृष्टि जोपर्यंत झाली नसते तोपर्यंत ब्रह्मदेव कोणाचा नसतो. पुत्र कन्या वगैरे झाले म्हणजे काका सासरा इत्यादि उपाधि लागतात. चार मुखाचा ब्रह्मदेव म्हणजे भक्तांकरिता धरलेले रूप. सर्व जगताचे मनच भक्ताच्या भावनेने ब्रह्मा, विष्णु, महेश रूपे घेते, वसिष्ठ त्यांचा मुलगा.

## कथा : काक भुशुंडींची

सभेत गोष्ट निघाली - ''जो पुष्कळ दिवस जगला व ज्याने पुष्कळ गोष्टी ऐकिल्या असा कोण?''

''काकभुशुंडीऋषि आहेत.''

वसिष्ठ एकदम मनाने निघाले. अनंत ब्रह्माण्डे ओलांडली. एका ब्रह्माण्डात वडाच्या झाडावर कावळा पाहिला. तोंच त्यांना नमस्कार केला.

ब्रह्मांडाच्या मनात सर्व काही एकच असते. पण शरीर लागले की, भेद उत्पन्न झाले. जसे सुख मिळावे असे सर्वांच्या मनात आहे. बैल असला तर गवत! मनुष्याला प्ऱान्ने! कावळ्याला विष्ठा! पशु, पक्षी, माणसे, ब्रह्मांडाच्या मनात जेव्हा असतात, तेव्हा एकच असतात. चाकाला नाभी, आरे, नेमी, इ. हे जसजसे नाभीपासून लांब, तितके भ्रमण जास्त! स्थिरब्रह्माला धरून राहतात. ते शांत चित्त! जसे जसे स्थिर कमी तसतसा चंचलपणा जास्त म्हणून दुःख! कावळयाचे पंख डोक्यात खोचून देवळात एका मंत्राचा जप केला असता कावळ्याची भाषा येते. कोणाच्याही भाषेत शब्द असतो. बाजाराच्या बाहेर मोठा गलबला ऐकूं येतो. परंतु तेच बाजारात गेलो म्हणजे शब्द ऐकू येतात.

**ज्यांना शरीराबाहेर होता येते, त्यांना सर्व काही कळते.**

वसिष्ठांनी विचारले, ''आपण इतके दिवस कसे जगला?''

ते म्हणाले ''माझी आई देवीचे वाहन होते. तीस हंसापासून मी झालो. मला चिरंजीव होशील म्हणून वर दिला. तेव्हा प्रलयकाली मी व हा वृक्ष पोकळी बनून जातो व मी अहंकाररूपाने राहतो. एक कल्प असा गेला की, सर्व दूर गवतच होते. एका कल्पांत रामाने रावणास मारिले. कित्येक राम मी पाहिले. इंद्र तर ९९ झाले.

प्रयत्न म्हणजे या जन्मांतला व दैव मागच्या जन्मातले.

दोन्ही प्रयत्नच.

साठवून ठेवलेली वासना ते दैव.

एखाद्या स्त्रीचे ध्यान लागले व ती वासना साठवून ठेविली म्हणजे तीच दुसऱ्यात प्रारब्धाने मिळते.



या जन्मांतल्या प्रयत्नाने प्रारब्ध ढासळून देतां येते. प्रारब्धाबद्दल हर्ष विषाद मानण्यास नको. कारण प्रयत्नाने ते नाहीसे करता येते. प्रयत्नाने कलीयुगात कृतयुग करता येते. मी मनात गुरफटलो नाही. पुष्कळ दिवस वाचणे म्हणजे मोठे स्वप्न. प्रयत्नाने ब्रह्मसुख मिळविता येते.''

शिखिध्वज राजा धर्मशील होता. स्त्रीचे लक्ष्य पतिसेवेत एकाग्र असल्यामुळे तिची बुद्धी अधिक शुद्ध झाली. संत तेथे येत, चर्चा करीत. ती पतिसह ती चर्चा ऐकत बसे.

ज्याचे चित्त एकाग्र असते त्याला कोणतीही गोष्ट तेव्हाच ठसते.

त्या संतांचे बोधाचा परिणाम दोघांच्या मनावर दोन रीतीने झाला. एकाने त्यांच्या वाक्याचा अर्थ प्रवृत्तिपर करावा व चुडालेने निवृत्तिपर करावा. अशा दोन पद्धति आहेत. आपणाला जेवढा उणेपणा दिसतो तो भरून काढणे. जो उणीववान पदार्थ आहे किंवा जो दुःखरूप पदार्थ आहे तोच नको. पहिले विषयातले दोष दाखविले. राजाहि धर्मशील होता. त्यालाही वैराग्य होते. दोघेही एकत्र ऐकत, परंतु राणीचे मन विशेष शुद्ध होते.

संताने केलेल्या उपदेशावरून राजाला वाटे ''आपण पुण्यवान व्हावे.''

हिला वाटे की, ''पापपुण्य दोन्हीहि बंधाला कारण आहेत म्हणून त्या दोन्ही विरहित व्हावे.''

साधु सांगत विषय दुःखरूप आहेत.

यावरून राजाला वाटे– ''ज्यारीतीने हे सुखरूप होतील असे काही करावे.''

तिला वाटे- ''हे दुःखरूप असल्यामुळे त्यांचा अगदी त्याग करावा.''

काल हा सर्व वस्तूंचा नाश करणारा आहे.

त्यावरून राजाला वाटे- ''दुष्काळ वगैरे पडणार नाही असा काहीतरी बंदोबस्त करावा.''

राणीला वाटे- ''हे राज्य वैभव केव्हातरी नाश पावणार म्हणून ती त्याची उपेक्षा करी.''

लक्ष्मी भ्रमराप्रमाणे चंचल आहे.

राजाला वाटले, ''असे आहे तर आपण दान करावे, भांडार भरून ठेवावे. धन जमिनीत ठेवावे.''

राणीला वाटे- ''हे केव्हांतरी नाश पावणार. त्याची आशाच करावयास नको. शरीर नाशवंत आहे.

यावर राजाला वाटे की, ''औषधि रसायनादिकांच्या योगाने शरीर जास्त

दिवस टिकेल असे करावे.''

राणीला वाटे की, ''हे शरीर राखण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो व्यर्थ जाणार. करीता या शरीराच्या साह्याने प्रयत्न करून जेथून कधी पतन होणार नाही अशा ठिकाणी मोक्षाला जावे.

शरीराच्या पलिकडे आत्मा आहे. या वाक्यावरून राजाला वाटले, ''शरीरावरची आसक्ति सोडली म्हणजे उत्तम लोक मिळतात. देह आणि मन यापलीकडील आत्मा जाणल्याने मोक्ष मिळतो.''

देहाला आत्मा म्हटले तर रडावे लागेल. यावरून राजाला वाटले की, ''संत ईश्वर असतात. आपण काही बोललो तर हे शाप देतील. धनपुत्र हे दुःख देणारे आहेत, देह हा सत्य नाही. आत्माच खरा. असे राजाला शापभीतीने वाटले.'' राणीला विचाराने वाटले असे होता होता राजाचे चित्त नेहमी व्यग्र असे, मात्र राणीच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा असे.

त्याने विचारले ''हे कसे?''

ती म्हणाली, ''मला सुखदुःखाचे काहीच वाटत नाही. जगत खोटे, हा देहही खोटा.''

राजा रागावला व म्हणाला ''तूं काही तरी वेड्या समजुती करून घेतल्या.''

याबद्दल तिला काही वाटले नाही. ती म्हणाली ''राजाला काही समजले नाही.''

कांहीं दिवसानीं राजाला वाटले तप करावे. संतांनी राजाला राज्याचा त्याग करून तप करण्यास जावयास सांगितले. ही परमानंदात असल्यामुळे हिला राज्याचे काहीच वाटेना. लेकराला पहिल्याने दुधच आवडते. - आपल्याला सर्व विषय पाहिजेत, त्यांतले काही मिळाले नाही, तर बरे वाटत नाही. लेकराला एकच रस. लेकराची इंद्रिये शांत असतात.- तसेच ब्रह्मनिष्ठांचेहि असते. कुंभाराच्या फेऱ्याप्रमाणे पहिल्याने थोडी थोडी नंतर गति वाढत जाते. ती फारच मोठी, नंतर कमी कमी होत, अगदी नाहीशी होते.

संतांनी सांगितले ''राज्य सोडून तप कर.'' तो चुडालेला सोडून गेला. त्याला वाटले ही काही तयार नाही. तिला झोप नव्हती

जसे धनिक पुरुष व काबाडकष्ट करणारा मजूर हे दोघेही निजतात. परंतु पहिला नुसता निजतो व दुसरा थकून निजतो.

अज्ञ लोक ''मला कळले नाही परंतु आनंद होता'' त्या दोन्हीचा अनुभव घेतात. ब्रह्मवेत्ते केवळ आनंदच घेतात.



राजा एक दंड, कमंडलु घेऊन चालला. दुसऱ्या दिवशी चहुंकडे गडबड उडाली. चुडालेला माहित होते. तिने एकदम सर्व बंद केले. चुडाला मनाने ज्या गुहेत राजा तप करीत होता तेथे गेली. ती जागा उत्तम असून तेथे ऋषीचा आश्रम होता. हा राजा ब्रह्मनिष्ठ होऊन पुन्हा राज्य करील. यावेळेस याच्या तपामध्ये ढवळूं नये. तिने राजाचा देह धरला व प्रधानास सांगितले की, ''राज्याचा बंदोबस्त उत्तम ठेवा. मी काही (काळ) घरी विश्रांति घेतो.''

राणीने राज्य चालविले. तिच्या राज्यांत रोग व दारिद्र्य मुळीच नव्हते. हिला मन बाहेर काढता येत असल्यामुळे चोरांनी चोरी केली की ती एकदम तेथे जाऊन त्यांना शिक्षा करी,

ही ऋषिपुत्राच्या वेषाने राजास भेटावयास गेली. त्यास म्हणाली, ''तुझी स्त्री मोठी ब्रह्मज्ञानी आहे. स्त्री पुरुष हे वासनेने कल्पिले आहेत. पुरुषाचे अवयव म्हणजे खुंट्या, कोनाडे सारखे आहेत. शरीरापेक्षा मन श्रेष्ठ. तूं राणीपासून ब्रह्मज्ञान शिकावयास पाहिजे होते.''

कुंभमुनीच्या वेषाने ती राजास पुन्हा भेटली. देवाच्या योनीत जन्मून तपश्चर्या करतो तो देवर्षि. देवर्षींत नारद श्रेष्ठ. ब्रह्मर्षीत वसिष्ठ व विश्वामित्र. विश्वामित्रानेच रामाला उपदेश करण्याकरीता वसिष्ठास सांगितले. राजाने तिचा (ब्रह्मर्षि मानून) सत्कार केला. **गृहस्थाश्रमात अतिथीसत्कार श्रेष्ठ.**

राजा कुंभऋषीला म्हणाला ''अजून मला शांति वाटत नाही.''

मुनी म्हणाले, ''अरे तुझी स्त्री पतिव्रता व ब्रह्मनिष्ठ असतां तिला तूं सोडून आलास. गर्भिणी हत्तीणीसारखा तूं खड्ड्यात सापडला आहेस. तिला मूर्ख म्हणून सोडून दिले.''

राजा म्हणाला, ''मी काय करूं?''

ते म्हणाले, ''तूं सर्वांचा त्याग कर.

राजा म्हणाला, तो कसा करूं?

''एखादी वस्तू फेकून दिल्याने त्याग होत नाही. भोग भोगूनही त्याग होतो. सर्व जग खोटे वाटल्याशिवाय उपयोग नाही. मृगजळाकडे हरणे धावतात. मनुष्य तृषेने प्राण जरी व्याकूळ झाला तरी तिकडे जाणार नाही. विषयसुखाकडे कोण धांव घेतात? संसाराला खरे समजतात ते! खोटी भुलाई मेली किंवा जन्मली तरी काही वाटत नाही. संसार खोटा समजला तर त्याग होतो.''

ती जाणत होती की हा ब्रह्मज्ञानी झाल्यावर राज्य करणार आहे. हे केव्हाहि उत्पन्न झाले नाही व याचा कधी नाशही नाही, हे अनंत व अनादि आहे. झाड आधी

की बी आधी हे सांगता येत नाही. तसा जगाचा सारखा प्रवाह चालला आहे. यात कोण आधी व कोण नंतर हे काहीच सांगता येत नाही. चक्राप्रमाणे आरावरचा खाली व खालचा वर जातो त्याप्रमाणे आपण चाललो आहो. आपण उत्पन्न झालो नाही व नाश पावणार नाही. हे सर्व भ्रमाने प्रतीतीस येते.

**आपण स्वप्नांतले असल्यामुळे आपणाला स्वप्नाचा अंत कळत नाही. जागृत होऊनच त्याचा नाश होईल.**

या अनादि संसाराचा केवळ ज्ञानानेच नाश होतो. अंधारात दोरी पाहून साप वाटला. त्याचे आईबाप पाहू लागले तर तो किती वेळ राहील? भ्रम आहे तोपर्यंत. जो पर्यंत मनाला भ्रम आहे तोपर्यंत जग खरे. ज्ञानाशिवाय निवृत्ति नाही.

तीन प्रकारचे दु:ख अध्यात्मिक, अधिदैविक व अधिभौतिक,

अध्यात्मिक म्हणजे आपल्यापासून निघणारे ते दोन प्रकारचे – शारिरिक व मानसिक! शारिरिक जसे कफ, ज्वर वगैरे. मानसिक क्रोध चिंता इ.

अधिभौतिक दुसऱ्या भूतांपासून होणारे - चोर व्याघ्रापासून.

अधिवैदिक म्हणजे देवांपासून होणारे. वीज, गारा पडणे इत्यादि.

दु:ख कोणत्या साधनानी जाईल? आपल्यालाच ओळखून घेतल्याने. आपणच सुखमय आहो. देवाची आवडी आपल्या सुखाकरीता! आपण कसेही चांगले वाईट असलो तरी आपणाला आपणच आवडतोच. दु:ख नको तर देह व मनापासून निराळे झाले पाहिजे. राजाने कमंडलू व लंगोटी सोडून दिली व म्हणाला मनही सोडले.

ती म्हणाली - ''नाही अजून.''

राजाने समाधीच्या योगाने शरीर, मन सोडले व ती एकदम राज्यांत निघून गेली. व कारभार पाहू लागली. इकडे राजाला हजार वर्षे झाली. राजाने देह सोडला तर नाहीना या भीतीने ती त्याकडे गेली, कारण मला अगोदर देह सोडला पाहिजे. राजाला नंतर जागे केले व समाधिस्त कसे व्हावे हे सांगितले. शरीराहून मन निराळे करावे म्हणजे काही दिवसानी प्राण विरतात.

शहाणे विचाराने समाधि लावतात. व अज्ञानी नाक आदि दाबून समाधि लावतात.

राजाला पुन्हा समाधि लागली. ती राज्यांत येऊन राज्यकारभार पाहू लागली.

**समाधि :-** मन एकाग्र करून शरीराहून वेगळे करणे. ते सृष्टीतील पदार्थाकडे लावू नका. म्हणून शरीरांतील चक्रावर मन एकाग्र करावे. चक्र मन स्थिर करण्याकरिता


कल्पिलेले आहेत. कोणत्याहि वस्तूंकडे मन लावणे यांस **धारणा** म्हणतात. त्याला संवय झाली म्हणजे ते तिकडे आपोआप लागते त्याला **ध्यान** म्हणतात. मन व पदार्थ एक होणे यास **समाधि** म्हणतात. समाधि पूर्ण झाली म्हणजे श्वास हालविणारे मन नसते.

राजाने मन आत्म्याकडे लावले होते. ब्रह्माण्डाकडे लावले नाही. कारण त्याने विचार केला की, सर्व स्वप्ने सारखी, लीलेने ब्रह्मांड पाहाण्याकरिता मन लाविले होते. चूडालेने मन निराळे करून, त्याच्या शरीरात प्रवेश करून त्याच्या फुफ्फुसाला हालवून त्याला जागे केले व नंतर पुन्हा कुंभज झाली व म्हणाली-

''अरे हे काय करतोस. ज्ञानाने समाधि लाव. असे करू नको. ज्ञानापूर्वी अभ्यासाने असेच केले पाहिजे. पोकळ वेदान्ताच्या गप्पा मारण्यांत अर्थ नाही. तुझा अभ्यास पूर्ण झाला व तूं आत्माही जाणला. आता हाच सर्वत्र आहे, असे समज. ''

आत्मा तीन गोष्टींनी समजतो. सत, चित्, आनंद! सत्=अस्तित्व किंवा आहे असे वाटणे, ज्याचा नाश होत नाही ते ! चिद्=ज्ञान ! आनंद=सुख ! उत्पन्न होतो त्याचा नाश होते. आत्म्याची उत्पत्ति नाही म्हणून त्याचा नाशही नाही. आत्माच ज्ञानरूप आहे; व तोच सुखरूप आहे. कारण तो आपणाला आवडतो.'' याप्रमाणे बोध केला.

''राजन्! डोळ्याने पाहिले, कानानी ऐकिले इ. इंद्रियांचे (ज्ञान) जरी निराळे आहेसे वाटते तरी ''मी रूपाने ''ज्ञान एकच आहे.''

## मनाचे स्वरूप

मनाचे स्वरूप– राग येणे, स्मृति होणे, शास्त्र विचार हे आपणाला कळतात. त्यावरून आपण मनाहून निराळे आहो. ज्ञाता व ज्ञेय निराळ्या वस्तु आहेत. मनाच्या निरनिराळ्या अवस्था प्रतीत होतात.

शांततेच्या वेळेस क्रोध नसतो, व क्रोधकाळी शांतता नसते. मात्र दोन्ही वेळेस मी असतो. म्हणजे त्या दोन्ही अवस्थेला आपण जाणतो. मनाच्या निरनिराळ्या अवस्था होतात, त्या अवस्थांना जाणणारा एकच असतो, तो कधी बदलत नाही.

ज्यात रूपांतर होते, त्याचा नाश होतो. मनाचे रूपांतर होते.

उदा:- बालपणी मनाला ज्ञान नसते. तरुणपणी स्त्रीकडे लक्ष असते. वृद्धपणी चिंता असते. परंतु बालपणांतल्या व तरुणपणांतल्या गोष्टी वृद्धपणी आठवतात. यावरुन बाळपणांतले मन तरुणपणी नसते, परंतु आपण बालपणीही असतो व तरुणपणीही असतो. लहान, मोठा वगैरे शरीराच्या उपाधीने वाटते. मी-पणांत फरक नाही. आत्मा शरीराहून निराळा असा विवेक होत नसल्यामुळे 'मी शरीर'

असे वाटते. आत्म्यांत फरक होत नाही, म्हणून तो **सत्** आहे.

"राजा! तूं मन व शरीर याहून निराळा हो. जिचा नाश नाही अशी एकच वस्तु असूं शकेल. ज्याचे भाग तुटतात ते नाशवंत. सगळ्यांमध्ये आत्मा एकच परंतु शरीरांमुळे निरनिराळा भासतो. शरीराहून निराळे झाले म्हणजे, सगळ्याचा आत्मा एकच! जाणे, येणे कोणाला? जो येथे आहे व तेथे नाही त्याला! जी वस्तु एकच आहे, तिला जाणे येणे नाही. देऊरवाड्यास जाण्याचे उदाहरण! पोकळी जात नाही व येत नाही वायु जातो व येतो. अत्म्याला जाणे येणे नाही म्हणून जन्म मरण नाही. कैलासात व वैकुंठात मनच जाते. वासनेला गमनागमन. आत्म्याला नाही. तूं त्याला जाणून सर्व सोडून दे. जगात देहबुद्धीने आलो अशी बुद्धी सोडून दे."

राणी प्रधानावर राज्यकारभार सोडून पुन्हा राजाकडे गेली. व राजाची समाधि उतरवून म्हणाली, "शरीर व मन याहून आत्मा निराळा हे तुला कळले. आत्मा एक धरून ठेवून मन व देह याची उपेक्षा कर. ज्यांत क्षणांत मीपण, त्यात क्रोध, शांती, शोक, आनंद इत्यादि येतात. आत्मा सत्य! शरीर व मन भ्रमाने झाले आहे. वस्तू नसून वस्तु दाखविणे ती भ्रांती! भ्रांतीचे मूळ समजले म्हणजे ती निवृत्त होते. मृगजळाला मूळ सूर्य! अंधारात दिसणाऱ्या सर्पाला मूळ रज्जू, तसे जगताचे मूळ - ब्रह्म! शरीराहून आपण निराळे असून मी शरीर असे भ्रांतीने वाटते. देहही न समजणे हेच अज्ञान! त्याच्या विरोधी ज्ञानाशिवाय त्याचा नाश नाही. शस्त्राने आंधार नष्ट होत नाही, कारण ते त्याच्या विरोधी नाही. ते उजेडानेच जाते. दोरी वरचा साप काठीने मरत नाही.

जगातले पदार्थ घेवून संसार नाश पावत नाही कारण, ते त्याच्या विरोधी नाही.

त्याला एक ज्ञानच पाहिजे. मन भ्रम आहे. त्याचे मूळ ब्रह्म! इतर शास्त्रज्ञान सोडून दे. दोरीवर सर्प दिसला तर भीतीने घाम येतो व दिवा आणून सर्प निवृत्त झाल्यावरहि तो राहतो. त्याप्रमाणे ज्ञान झाल्यावरही प्रारब्ध राहते. **उदाः-** शुक, जनक इ. ज्ञानापूर्वी केलेल्या कर्माचे फळ त्याने भोगलेच पाहिजे. खोट्या जगातले कर्म कायम राहते.

राजाला कुंभमुनी म्हणाले. 'राज्य कर. समबुद्धी झाली की नाही हे पाहण्याकरिता परिक्षा घेतली.'

राजाला आपण जीवन्मुक्त दशेत ठेवावे असे तिला वाटले. तिने सांगितले हे जग भ्रांतिरूप आहे. हे अधिष्ठान ज्ञानाने निवृत्त होते. भ्रांतिनाशानंतरही भ्रांतीचे कार्य काहीवेळ शिल्लक राहते. तसे अज्ञान गेल्यावर जगत् राहते.



भ्रांती दोन प्रकारची– एकीचा नाश होतो व दुसरी कळली म्हणजे झाले. (१) रज्जूवर दिसलेल्या सर्पाचा दिवा आणल्यावर समूळ नाश होतो. (२) अशी असते ती कळली म्हणजे झाले. त्याचा नाश करावयास नको. जसे मृगजळ कळल्यावर मनुष्य फसत नाही.

ब्रह्मवेत्त्याला संसार मिथ्या कळला म्हणजे दुःख निवृत्त होते. त्याचा नाश करण्याचे प्रयोजन नाही.

शरीराहून मन काढले म्हणजे मनाहून आत्मा निराळा कळतो. मन व शरीर मिथ्या आहे असे कळले म्हणजे जग नाश पावले किंवा उत्पन्न झाले तरी त्याला काही वाटत नाही.

पतीला सुख देणे हे स्त्रीचे कर्तव्य! राजाला कष्ट देऊ नये, परंतु त्याचे ज्ञान दृढ झाले की नाही, हे पहावयाचे आहे.

शरीराहून मन काढले म्हणजे कोणतेही शरीर धारण करता येते.

राजाचे चित्त तपाने शुद्ध, चुडालेचे चित्त पतिसेवेने शुद्ध. मुमुक्षुचे मन अगोदरच शरीराहून निराळे होते.

आपल्या शरीरावर अनेकांचा अभिमान ! **उदा -** शरीरावर कीटकादिकांचा अभिमान असतो. म्हणून ब्रह्मवेत्ते शरीरावर अभिमान धरीत नाहीत. त्याप्रमाणे घरावरही चिलटे, ढेकणांचा वगैरे अभिमान असतो.

**ज्यांना शरीराहून निराळे राहता येते, त्यांना मरणाची भीति नसते.**

दोन प्रकारे घराबाहेर निघणे! राजसत्तेने व दुसरे घर सोडण्याच्या इच्छेने. जरावृद्ध हे कालाच्या पाशाने शरीराबाहेर निघतात व योगी स्वेच्छेने! वृद्धांना शरीराची वासना राहते तशी योगीयांना नसते.

दुसरे चित्ताकाशांत त्यांना अनेक जन्मांतले आईबाप, गृह, मुले वगैरे. दिसतात म्हणून त्यांना इच्छा नसते.

पूर्ण मनाचा निश्चय झाला तर आपणाला आकाशांतही उडता येईल; अर्धवट निश्चय झाला तर उडता येणार नाही. राजा व कुंभऋषि दोघेही आकाशात उडाले. कुंभऋषीने बद्रीकेदारादि अनेक तीर्थे दाखविली.

**सात्त्विक स्थाने :-** जेथे विषय नसताना आनंद होतो ती !

**राजस स्थाने :-** गृह, राजवाडे !

**तामस स्थाने :-** विषय असून चिंता.

आपण सुखरूप आहो असे कळले म्हणजे कोठेहि आनंद होतो. कुंभमुनीने एकदम स्त्रीचे शरीर धारण केले व राजास म्हटले की, "माझे पति व्हा." राजाने

लग्न लावले. दिवसा मुनी व रात्री स्त्री व सांगतसे की, ''मी वसिष्ठांच्या शापामुळे स्त्री होते.''

हिने एक दिवस मायेचा मनुष्य केला व त्याबरोबर फिरू लागली. त्याला (राजाला) काही वाटले नाही. तिने नंतर येऊन राजापाशी क्षमा मागितली.

राजा :- धर्मदृष्टीने हे उचित नाही. हे सत्पुरुषांच्या विरुद्ध आहे. याने लोकसंग्रह बिघडेल. मी कोणाचा पति नाही व कोणी माझी स्त्री नाही. मी एक शुद्ध आत्मा. मला याचे कांही वाटत नाही. तरी तुला घेऊन फिरणे उचित नाही.''

साधूंनी लोकांकरिता तरी चांगले वर्तन ठेवावे. वासना आहे तोपर्यंत पापपुण्य चुकत नाही. ब्रह्मज्ञान असून धर्माने वागणे कठिण आहे.

**ब्रह्मनिष्ठता व धर्मनिष्ठता ह्या दोन्ही पाहिजेत.**

एक पुत्र नेहमी वेश्येपाशी जात असे. नंतर तसे त्याने करू नये म्हणून वेदान्त शिकविला. (पण) नंतर (तो) वेश्येप्रमाणे मातेपाशी भलतेच बोलू लागला.

**ज्याचे चित्त शुद्ध नाही व ज्यांना शरीराहून मन निराळे काढता येत नाही, त्यांना ब्रह्मज्ञान सांगू नये.** माझे गुरु मजजवळच आहेत.

राजा म्हणाला ''मी लग्न केले हे वाईट झाले. तूं माझी आई झालीस!''.

चूडालाला वाटले जिवंतपणी पतिसेवा व राजा मुक्त झाल्यामुळे माझ्याशी कधीच वियोग होणार नाही. इतक्या अवकाशात राज्यातील शरीराचे अनेक जन्म झाले. शरीराला चिकटून राहतात त्यांना काळ नेतो.

ब्रह्मनिष्ठाला मरण नाही व ते स्वेच्छेने जन्म घेतात. राजा निजला व उठून पाहतो तो चूडाला दिसली.

''मी तुझा अपमान करून निघून गेलो. तरी तूं मला कसे शोधले.'' राजा म्हणाला, ''तूं तर पूर्ण होती. तेव्हा माझीही इच्छा कां केली?''

ती म्हणाली ''मीच हा सर्व खेळ केला''

राजाने मन निराळे करून पाहिले तो तिला फार कष्ट झाले असे दिसले, म्हणून राजाने नमस्कार केला. ती रागावून म्हणाली, ''याचकरिता मी दुसऱ्या शरीराने बोध केला.''

राजाने पतिव्रता धर्म सांगितला. ती म्हणाली ''तुमचे प्रारब्ध शेष आहे. तुम्हाला राज्य केले पाहिजे.''

राजा :- आता राज्य कसचे?''

राणीने मनाने एकदम सर्व राज्य उत्पन्न केले.

०००



**॥ श्रीज्ञानेश्वरमहाराज की जय ॥**

# २७. काही वैदिक प्रक्रिया

मागे शरीर, मन व आत्मा यांच्या स्वरूपाचे ज्ञान (सांगणे) झाले. ज्ञान दोन प्रकारचेः- शुद्ध-ज्ञान व अपरोक्ष-ज्ञान! भातशब्द ऐकला. यापासून फक्त शब्दज्ञान झाले परंतु तो खाल्ल्याशिवाय त्याचा अनुभव येत नाही.

**शब्दाने कळणे ते परोक्ष व त्याचा अनुभव होणे अपरोक्ष.**

ज्ञानेश्वर म्हणतात -

**अन्न आणि भूक । पाशी असताही देख ।**
**जेवूं नेणे बालक । तरी लंघनचि की ॥**

मोक्षेच्छा आहे व ज्ञानही पूर्ण आहे. परंतु अभ्यास न केला तरी विदेहमुक्ति मिळेल; जीवनमुक्ति नाही! शब्दज्ञान विसरते व अनुभवज्ञान विसरत नाही. तुला आत्मा शरीराहून निराळा कळला. आता कोणी सांगितले, 'आत्मा व शरीर एकच' तर तूं काही फसणार नाही.

एकाग्रतेने शरीराहून मन निराळे करता आले, पण मनाहून आत्मा निराळा कळला नाही व अभ्यास चालू आहे. तर पुण्यलोक प्राप्ति म्हणजे वैकुंठादि लोक मिळतील.

अभ्यास व ज्ञानपूर्ण ते जीवन्मुक्त! जेवण्याचा आनंद घेण्याकरिता जसा स्वयंपाक अवश्य तसा जीवन्मुक्तीकरिता अभ्यास अवश्य!

शरीरात व मनात बदल होतो परंतु आत्मा शुद्ध! भ्रमांत आत्मा व मन एक असे वाटते. पुढे शरीर व आत्मा एक असे वाटते. मन व शरीर काढले म्हणजे बाकी राहिलेला तो आत्मा. तो निषेधरूपाने सांगता येतो. उदा - शेवाळ काढले की, पाणी हाती लागते.

मी देह मानणारा तो **जीव.**

मी मनाहून व शरीराहून निराळा मानणारा तो **ईश्वर.**

घटांतील पाणी काढण्याकरिता घट फोडणे नको. मनरूपी पाणी काढले म्हणजे झाले. आपलातुपला इत्यादि भाव काढण्याकरिता **अभ्यास म्हणजे तत्पद व त्वंपद याचे एकीकरण करणे.**

## १ - ''अन्नं ब्रह्म''

अन्नच परमात्मा, त्यावर मन एकाग्र करावे. सर्व प्राणी अन्नावरच राहतात. जो जे जे खातो, ते त्याचे अन्न-ब्रह्म! ज्यापासून जगाची उत्पत्ति, स्थिति व लय होतात ते! तीच भावना अन्नावर करावी कारण त्यापासून स्थिति लय इत्यादि सृष्टीचे होतात.

उदा. - मोरीत सडल्या अन्नापासून किडे होतात व आपल्या शरीरात अन्नापासून किडे जन्मतात व अन्नावरच सर्व जगतात. अन्नापासूनच अजीर्ण होऊन रोगाने मरतात. म्हणून अन्नब्रह्म.

**इतके जन्म संसारात गेले. मग एकदोन जन्म परमार्थाच्या अभ्यासात कां घालू नये ?**

ब्रह्मापासूनच सर्व काही उत्पन्न होते. परंतु ते कोणापासून उत्पन्न होत नाही. कारण उत्पन्न होणारी वस्तू नाश पावलीच पाहिजे.

''एक महिना अन्नच ब्रह्म असे चिंतन कर. हा वेदोक्त मार्ग आहे. याहून योगादिक तुच्छ आहे.''

ज्या लोकांवर (आपत्ति) बीततात त्याच आपणावर बितू लागल्या म्हणजे तोच अनुभव.

भृगूने विचारले- ''ब्रह्म म्हणजे काय?''

**'अन्नच ब्रह्म'** असे ऐकून ९० वर्षे तप केले.

नंतर दोष दिसले. ब्रह्म उत्पन्न होईल तर अनवस्था दोष येईल. अन्न पृथ्वीपासून उत्पन्न होते. त्याला शिजवितात, त्याची विष्ठा होते. यावरून त्याला विकार आहे म्हणून ते ब्रह्म नाही.

## २ - ''प्राणं ब्रह्म''

जगत् वायुपासून उत्पन्न होते. वायुनेच प्रत्येक मातेच्या उदरातून बाहेर पडतो. वायुनेच श्वासोश्वास घेतो, थुंकतो, व मलमूत्र सोडतो. वायुनेच जिवंत राहतो. वायुनेच संहार होतो. वायु अटकला तर रोग उत्पत्ति होते. वायु नसला तर मनुष्यप्राणी मरतो. अनुकूल वायूने जगतो व प्रतिकूल वायूने मरतो. 'प्राण ब्रह्म' असे त्याने ६ वर्षे तप केले.

नंतर दोष दिसले उदा. ब्रह्म सर्व ठिकाणी व्यापक वायु कोठे कमी व कोठे जास्त. वायु कधी थंड, कधी गरम. म्हणून वायु ब्रह्म नाही.



## ३ - ''मनोब्रह्म''

मनानेच उत्पत्ति. भूक लागणे वगैरे मनानेच. मनालाच प्रेम उत्पन्न झाला म्हणजे आई मुलाला पाजते. पिकाच्या लोभाने पेरणी करतो. मन आहे तरच लोभ, राग इ. पुत्रादिकांकडे मन असल्याशिवाय पोषण होणार नाही. आईच्या मनात प्रेम उत्पन्न तर दूध उत्पन्न होईल. मनालाच भूक लागते. मनानेच संहार, पथ्य मोडणे, अति संग, पशु विकणे, मनानेच वाघ मनुष्याला खातो. म्हणून **''मन ब्रह्म असा ३ महिने अभ्यास कर.''** मग दोष दिसतात.

## ४ - ''विज्ञानं ब्रह्म''

''संशयात्मक ते मन व निश्चयात्मक ती बुद्धि.'' जगाची उत्पत्ति मनाने नाही तर निश्चयाने, खावे असे निश्चयाने वाटते तेव्हांच जेवतो. म्हणून **''बुद्धी किंवा विज्ञानच ब्रह्म'' असा ३ महीने अभ्यास करावा.** कनिष्ठाला मुळीच येत नाही. मध्यमाने ह्या क्रमाने करावा. उत्तमाला तेव्हाच येतो. तीन महिन्यानंतर दोष दिसतात. आपला निश्चय क्षणोक्षणी बदलतो. कधी विरुद्धही निश्चय करतो. एकदा वाटते उन्हात बसावे एकदा वाटते थंडीत बसावे. असा बुद्धीत नेहमी फरक होतो. पदार्थ पुढे तर निश्चय व तो खरा खोटाही असू शकतो. ब्रह्म तसे नाही. बुद्धि ब्रह्म नाही.

## ५ - ''आनंदं ब्रह्म''

बाकी राहिलेला आनंदरूप (आत्माच) ब्रह्म. मनाहून आत्मा निराळा मानला की दुःख. स्त्रीसंग सुखाकरता पशु सुखाकरता. व परस्पर प्रीति सुखाकरिताच. जेवणापासून आनंद नाही, तर त्या जेवण्याच्या आनंदापासून पोषण. सुखाकरिताच वाचावे वाटते. सुखांत बदल नाही. थंडीत किंवा उन्हात सुखाकरिताच बसतो. झोपेत पदार्थ नसून (आनंद) सुख आपणापासूनच. विषयापासून सुख भ्रमाने वाटते. स्त्रीसंगापासून सुख नाही. वीर्यस्खलनापासून सुख नाही. असे असते तर प्रमेहाचा रोगी सुखी असता. मैथुनांत एकाग्रता झाल्यामुळे सुख होते. प्रत्येकाला सुखाची इच्छा.

ज्ञानियाला अखंड सुख व विषयी मनुष्याला विजेप्रमाणे क्षणिक सुख. **ज्ञानियाला शरीराहून निराळे होऊन सुख घेता येते.**

पति हा स्त्रीला आपले इतका प्रिय नाही. असे असते तर स्त्रीला (स्वतःपेक्षा) जास्त पति आवडता असता.

निद्रेत मन ओळखले जात नाही. मग महानिद्रा जे मरण त्यांत कोठे *(मन ओळखले जाणार)?* असो. . . . !

॥ समाप्त ॥

## श्रीगुलाबरावमहाराज : सूक्तिरत्नावली-यष्टीनुसार ग्रंथ-सूचि

विदर्भातील संतविभूति मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराजकृत सांख्य-योग-वेदान्त-पराभक्तिज्ञानपर **सूक्ति-रत्नावली** या नांवाने असलेल्या समग्र ग्रंथांची यष्टीक्रमाने विषयवार माहिती.

श्रींच्या प्रत्येक ग्रंथाच्या भागाला **'यष्टी'** (काठी किंवा गळ्यातील रत्नांचा कंठा) असे नांव आहे.

(*) चिन्ह असलेले लहान मोठे ग्रंथ स्वतंत्र मुद्रित आहेत.

*- प्रा.देवराव भुजाडे,- प्रा.शरदराव पाटील*

---

**(यष्टि १) रु ४०**

(१) भक्तिपदतीर्थामृत *
(२) निगमान्तपथसंदीपक *
(३) चौसष्टी (अमृ.अ.१)
(४) ११ पत्रे (योग) *
(५) भगवद्गीतासंगति *
(६) निदिध्यासनप्रकाश(योग) *
(७) कान्तकान्तावाक्यपुष्पम् (सं)
(८) सूचनाप्रकरणम् - १
(९) गायत्री-अन्वयार्थ *

**(यष्टी २ - पूर्वार्ध) रु.४०**

(१०) कृष्णपंचपदी
(११) सद्वैजयंती
(१२) बाराखडी *
(१३) चित्तोपदेश *
(१४) त्रिकांडसार *
(१५) तुंबडी
(१६) चिरंजीवपदाभ्यास *
(१७) शांतिसुधाकर *
(१८) सोपानसिद्धि (योग)
(१९) नित्यतीर्थ *
(२०) मणिमंजुषा *
(२१) प्रियपाहुणेर
(२२) अलौकिक प्रवास
(२३) अमोघनिरूपण (ॐ)
(२४) स्त्रीगीत (५अध्याय)
(२५) श्रीज्ञानेश्वरक्षमापनस्तोत्र

**(यष्टी २ - उत्तरार्ध) रु.५०**

(२६) गुरुपंचपदी
(२७) २० पत्रे
(२८) ध्यानयोगदिवाकर (योग)
(२९) भगवद्भक्तिसौरभ *
(रुक्मिणी पत्रिका)
(३०) प्रीतिनिर्तन *
(३१) गोविन्दानंदसुधा
(३२) मातृपितृभावनाष्टक
(३३) सूचनाप्रकरण - २

**(यष्टी ३) रु.९०**

प्रियलीलामहोत्सव भाग-१
(३४) आमंत्रणविलास.
*श्रीभागवत : प्रथम स्कंध-विवरण*
(३५) सूचनाप्रकरण - ३

**(यष्टी ४) रु.४०**

(३६) स्त्रीगीतसंग्रह
*ग्रामीण विदर्भातील ज्ञान व भक्ति प्रधान लोकगीतात्मक गाणी.*

**(यष्टी ५) रु.४०**

(३७)अलौकिक व्याख्यानमाला
*(मानसशास्त्रीय विवेचन)*
*पाश्चात्य तत्त्वज्ञानांची तौलनिक समीक्षा. मनासंबंधीचे विश्लेषण तर मनोविज्ञानाला नवे आयाम देणारे आहे. इंग्रजी व हिंदी भाषांतर उपलब्ध.*

**(यष्टी ६) रु.२०**

(३८) स्वमन्तव्यांश सिद्धान्त-तुषार (हिंदी) *व्रजभाषेत प्रश्नोत्तर रुपात.*



**(यष्टी ७) रु. ३०**

(३९) अडतीस पत्रे
*(बुवाबाजी, धर्म-सुधारक, धर्म, तत्त्वज्ञान समीक्षा, योग, भौतिक विज्ञान, स्वजाति बांधवांना विनंती इ.विषय)*

**(यष्टी ८) रु.४०**

(४०) साधुबोध- ९३८ प्रश्नोत्तरे
*धार्मिक, नैतिक, सामाजिक, कौटुंबिक, पारकीय व आर्य-शास्त्रांसंबंधी प्रश्नोत्तरे.*

**(यष्टी ९ पूर्वार्ध) रु.१००**

(४१) अभंगांची गाथा (२१५७)
*भक्ति,ज्ञान,वैराग्य,उपदेशपर. कीर्तनोपयोगी १९ आख्याने.*

**(यष्टी ९ उत्तरार्ध) रु.१००**

(४२) पदांची गाथा (२२४४ पदे)
*राग, ताल, चाली स्वतः श्रीमहाराजांनी लावलेल्या असून मराठी हिंदी संस्कृत व वऱ्हाडी या भाषांत पदे आहेत. तसेच कीर्तनोपयोगी ७ पदांची आख्याने आहेत. तसेच स्तोत्रे, स्तुति, आरत्या, पाळणे, लावण्या, तुमडी व स्त्रीगीतादि अनेक प्रकारची लोकगीतेही रचली आहेत.*

**(यष्टी १०) रु.७५**

(४३) प्रेमनिकुंज
*मधुराद्वैत दर्शनाचे- पांडित्यपूर्ण अद्भुत खंडन-मंडनपूर्वक, उत्थाप्य शंका निरसनपूर्वक, ज्ञानोत्तर भक्तीचे ''अनध्यस्त विवर्त'' सिद्धान्ताची शास्त्रीय सिद्धी. श्रीभाऊसाहेब खापरे यांच्या अप्रतीम विवरणासह.*

**(यष्टी ११) रु.१६०**

(४४) संप्रदायसुरतरू (पूर्वविहार व उत्तरविहार) *हा श्रुतिस्मृतिपुराणोक्त भक्तिमार्गाचा आकर ग्रंथ असून यात जिज्ञासूंच्या - वर्णाश्रम, खरा धर्ममार्ग, नाम-माहात्म्य आणि मधुराद्वैत संप्रदायाच्या विविध अंगांवर सविस्तर प्रकाश टाकला आहे. सर्व शंकांचे श्रुतियुक्ति व स्वानुभवाने समाधान केले आहे. ८०० पृष्ठांचे दोन भाग आहेत.*

**(यष्टी १२) रु.५०**

(४५) पत्रे व समीक्षा ४३
*संस्कृत-काव्य-गद्य पत्रे व आधु. विषयांवरील समीक्षा.*

**(यष्टी १३) रु.५०**

(४६) सुखवरसुधा.
*स्वकृत ग्रंथ तारतम्ये करून कसे प्रमाण मानावे? याचे विवेचन*
(४७) वेदान्तपदार्थोद्देशदीपिका
*वेदान्तातील जुन्या आणि स्वनिर्मित पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण व श्रीभाऊसाहेब खापरेंचे 'अध्ययन-भाष्य.*

**(यष्टी १४) रु.**

(४८) नारदीयभक्तिसूत्रभाष्य
*(ओवीबद्ध)*
(४९) सांख्यसुरेन्द्र
*कपिल-सांख्यसूत्रांवर ओवीबद्ध भाष्य*
(५०) 'आगमनविलास' *प्रियलीला-महोत्सवाचा दुसरा खंड.भागवत २ रा स्कंध. ओवीबद्ध भाष्य (अपूर्ण)*

**(यष्टी १५) रु.**

*३० अपूर्ण ग्रंथ*
(५१) ईशावास्योपनिषद्
(५२) ज्ञानेश्वरी निरूपण
(५३) निगमान्तसुभा
(५४) ऐश्वर्यार्थदीपिका
(५५) ब्रह्मसूत्रव्याख्या
(५६) छंदप्रदीप
(५७) प्रमाद-कल्लोळ
(५८) योगप्रभाव - पद्य
(५९) हिरण्ययोग - स्वप्नयोग
(६०) पतिव्रता चरितामृत *
(६१) षट्पदध्वनि
(६२) गोपिकापादपीयूषलहरी
(६३) वेदान्त निरूपण
(६४) गान सोपान *
(६५) योगांगयमलक्षण (योग)
(६६) दुर्मत हृदयभंजन
(६७) सिद्धिसार

(६८) ईशावास्योपनिषद्
(६९) वेदान्तप्रक्रियासमुच्चय
(७०) वृत्तिक्षीरसागर
(७१) सुखपर्व
(७२) सांख्य सूत्रावर विचार
(७३) एक निबंध (सांख्य)
(७४) बौद्ध निबंध
(७५) आत्मचरित्र
(७६) नवीन भाषा - नावंग
(७७) प्रश्नोत्तरे
(७८) श्री खापरेंना पत्र....
(७९) मानसायुर्वेद२लेख *

**(यष्टी १६) रु.२०**

**संस्कृत भा.१.सूत्रग्रंथा:**

(८०) अन्तर्विज्ञानसंहिता
(८१) ईश्वरदर्शनम्
(८२) समसूत्री
(८३) दुर्गात्त्वम्
(८४) काव्यसूत्रसंहिता *
(८५) शिशुबोधव्याकरणम्
(८६) न्यायसूत्राणि
(८७) एकादशीनिर्णयः
(८८) पुराणमीमांसा
(८९) आगमदीपिका
(९०) शास्त्रसमन्वयः
(९१) युक्तितत्त्वानुशासनम्
(९२) षड्दर्शनलेशसंग्रहः
(९३) तत्त्वबोधः

**(यष्टी १६) रु.५०**

**संस्कृत - भा.२**

(९४) स्वमतनिर्णयः
(९५) संप्रदाय-कुसुम-मधु
(९६) ऋग्वेदटिप्पणी
(९७) सच्चिन्निर्णयः
(१९८) गंगामृतपानम्
(९९) भिषगींद्रशचीप्रभा
(१००) कान्तकान्तावाक्यपुष्पम्
(१०१) उच्छिष्टपुष्टिलेशः
(१०२) श्रीधरोच्छिष्टपुष्टिः
(१०३) संस्कृतपदानि
(१०४) नारदीयभक्तिसूत्रभाष्य
(१०५) नारदीय सूत्रांवरील भक्त्यधिकरणन्यायमाला
(१०६) बालवासिष्ठ
(१०७) गंगास्थितिनिर्णयः *
(१०८) भक्तिभाष्य
(१०९) मानसायुर्वेद *

**(यष्टी १७) रु.१००**

**समयोपदेश** (सुबोध हिंदुधर्म)

(११०) सर्वमान्य धर्माची कल्पना
(१११) गीतेवरील निरूपणे
(११२) योगवासिष्ठतत्त्व *गद्य निरुपणे*

**(यष्टी १८) रु.**

समयोपदेश - स्फुट निरूपणे

(११३) सांख्यसार
(११४) युक्त्या
(११५) ब्रह्मसूत्र निरूपणे
(११६) बोधवाक्ये
(११७) सुवर्णकण
(११८) पंचदशीनिरूपणे
(११९) गुरुचरणकौमुदी
(१२०) बालबुद्धिविवर्धिनी
(१२१) भिषगींद्रशचीप्रभा *
(१२२) वैद्यवृन्दावन *
(१२३) वैद्यनन्दिनी *
(१२४) भिषग्पाटवोपपत्तिः *
(१२५) नावंग-लिपी.

*सांकेतिक लघु लिपी*

(१२६) हरिपाठ अर्थक्रमः *
(१२७) हरिपाठा-प्रतिज्ञाः *
(१२८) श्रौतक्रीडाविशेष *

*मोक्षपट / कैवल्यपट व खेळण्याचे नियम*

(१२९) स्वसमाज-नियम
(१३०) मायर्सची समीक्षा
(१३१) मननार्थ गीताप्रश्न
(१३२) शिक्षण रत्नाकर

**(यष्टी १९) रु.२०**

(१३३) मनोहरिणी (हिंदी)
*व्रजभाषेत गीताप्रवचने*

**(यष्टी २०) रु.१२०**

(१३४) योगप्रभाव (गद्य)
*श्री पतंजलींच्या ४४ योगसूत्रांवर गुरुशिष्य-संवाद रूपाने निरूपणे.*

---

श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी

**श्री बाबाजीमहाराज पंडितांचे ग्रंथ**

---

**१. आर्यधर्मोपपत्ति** (रु.५०)
*वैदिक हिंदुधर्माचे विस्ताराने विश्लेषण करणारा अपूर्व ग्रंथ.*

**२. हरिपाठ-रहस्य** (रु.६०)
*श्रुति- स्मृति- पुराणे व संत वचनांच्या आधारे अपूर्व विवरण असलेला ग्रंथ.*

**३.अमृतानुभवकौमुदी** (रु.१००)
*शंकराचार्यांच्या अद्वैतज्ञानावर उभारलेले पराभक्तिपर अनुपम विस्तृत भाष्य.*

**४. ज्ञाने.गूढार्थदीपिका** (रु.३००)
अर्थ आणि विवरण. *पृ. १०००*
(,,) गीताप्रेस **(रु.१२५)**
(,,) हिंदी प्रत (रु.५००)

**५. अभंगगाथा** (रु.५०)
**६. विविध लेखसंग्रह** (रु.१००)
**७. संतकथा** (रु.६)
**८. पंचदशी प्रवचने**
**९. भागवत प्रवचने**

**श्री बाबाजीमहाराज पंडितांनी अनुवादित केलेले ग्रंथ**

१. भगवद्भक्तिसौरभ *(रुक्मिणीपत्रिका)*
२. प्रीतिनर्तन
३. स्वमतनिर्णयः (रु.१०)
३. भक्तिपदतीर्थामृत (रु.१०)
४. निगमान्तपथसंदीपक
५. चित्तोपदेश (रु.५)
६. गोविंदानंद सुधा
७. कान्त-कान्ता वाक्यपुष्पम्
८. हरिपाठ अर्थक्रमासह (रु.३)

---

कै त्रिपुरवार लिखित
''श्रीज्ञानेश्वकन्यापदपांसु''

**श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्र (रु.९०)**

*मूळ अधिकृत चरित्र (पृ.४३२)*

---

**कै. भाऊसाहेब खापरे निर्मित**

**माधुर्यमधुकोष (रु.३००)**

*मोठा आकार, पृ.७००.श्रींच्या ग्रंथांत कोणता विषय कोठे आला आहे? या संबंधी विस्तृत नोंदी असलेला* ***संदर्भग्रंथ*** *(अंदाजे २८००० नोंदी)*

**डॉ. वा. ना. पंडित कृत ग्रंथ**

**१.** शांकरतत्त्वज्ञानात भक्तीचे स्थान
*(पहिला पीएच.डी.प्रबंध)*

**डॉ. कृष्ण माधव घटाटे कृत**

**१.** श्री गुलाबराव महाराजांची विचार संपदा (पीएच.डी प्रबंध) **रु.७५**
**२.** १३० ग्रंथांचा सारांश (११८ पत्रांसह) म./ हिं. **रु.२०**

---

**ग्रंथमूल्य + पार्सलखर्चाचा ड्राप्ट पाठवावा.**
**'श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ'**
**दहिसाथ, अमरावती.** टेली.०७२१-२६७६३०७

## संत श्री गुलाबरावमहाराजांची विषयानुसार ग्रंथावली

**सूत्रग्रंथ** – (१) अन्तर्विज्ञानसंहिता(सं)य१६ (२) ईश्वरदर्शनम् (सं) य१६ (३) समसूत्री (सं) य१६ (४) दुर्गातत्त्वम् (सं) य१६ (५) काव्यसूत्रसंहिता (सं) य१६ (६) शिशु-व्याकरणम (सं) य१६ (७) न्यायसूत्राणि (सं) य१६ (८) एकादशीनिर्णयः (सं) य१६ (९) पुराणमीमांसा (सं) य१६

**आकर ग्रंथ** – (१०) संप्रदायसुरतरु य११

**भाष्यग्रंथ** – (११) नारदीयभक्त्यधिकरण न्यायमाला (सं) य१६ (१२) भक्तिभाष्यम् (सं) य १६ (१३) भक्तिभाष्यम् (सं) य १५ (१४) प्रियलीलामहोत्सव (भागवत) निमंत्रणविलास य ३(१५) प्रियलीलामहोत्सव आमंत्रणविलास, आगमनविलास य३ (१६) श्रीधरोच्छिष्टपुष्टिः(सं) य१६ (१७) श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः(सं) य१६ (१८) ब्रह्मसूत्रव्याख्या य१५ (१९) निगमांतसुभा य१५ (२०) ब्रह्मसूत्रांवर निरूपण य१८ (२१) भगवद्गीतासंगति य१(२२) मनोहारिणी (हिन्दी) य१८ (२३) गीतेवरील निरूपणे य१७ (२४) गीतेवरील प्रवचने य१७ (२५) गीता निरूपणे य१८ (२६) गीता स्फुट निरूपणे य१८ (२७) ऐश्वर्यार्थदीपिका-ईश्वरगीता य१५ (२८) षट्पद्ध्वनिः (सं) य१६ (२९) ईशावास्योपनिषद् (सं) य१६ (३०) ऋग्वेदटिप्पणी (सं)य१६ (३१) अमृ. चौसष्टी य१ (३२) चिरंजीवपदाभ्यास य२ (३३)बालवासिष्ठ(सं) य१६ (३४) योगवासिष्ठतत्त्व य१७ (३५)योगवासिष्ठ(म) य१८

**शास्त्रीय ग्रंथ** – (३६) सुखवरसुधा य१३ (३७) वेदान्तपदार्थोद्देशदीपिका य१३ (३८) शास्त्रसमन्वयः (सं) य१६ (३९) आगमदीपिका (सं) य१६ (४०) युक्तितत्त्वानुशासनम् (सं) य१६ (४१) प्रेमनिकुंज य१० (४२) शांतिसुधाकर य२ (४३) वेदान्तप्रक्रियासमुाय य१५ (४४) वेदान्तनिरूपण य१५ (४५) तत्त्वबोधः (सं) य१६ (४६) षड्दर्शनलेशसंग्रहः (सं) य१६

**भक्ति ग्रंथ** – (४७) भक्तिपदतीर्थामृत - 'तत्त्वमसि' महावाक्यविरण य१ (४८) निगमांतपथसंदीपक य१(४९) भगवद्भक्तिसौरभ य२ (५०) प्रीतिनर्तन य२ (५१) नित्यतीर्थ य२ (५२) प्रिय पाहुणेर य२ (५३) भक्तितत्त्वविवेक (सं) य१६ (५४) प्रियप्रेमोन्माद (सं) य१६ (५५) गोपिकापादपीयूषलहरी य१५ (५६) गोविंदानंदसुधा (सं) य२

**योग ग्रंथ** – (५७) निदिध्यासनप्रकाश य १ (५८) ध्यानयोगदिवाकर य२ (५९) सोपानसिद्धि य२ (६०) हिरण्ययोग (स्वप्न)य१५ (६१) योगांगयमलक्षण य१५ (६२) योगप्रभाव (पद्य) य१५ (६३) योगप्रभाव (गद्य) य१९ (६४) कुंडलिनी. जगदंबा य१५

**सांख्य** – (६५) सांख्यसुरेंद्र य१४ (६६) सांख्यतत्त्व सूत्र य१५ (६७) सांख्यसार निबंध य१५ (६८) सांख्यसार य१८

**संगीत** – (६९) छंद प्रदीप य१५ (७०) गानसोपान य१५

**आयुर्वेद** – (७१) मानसायुर्वेद (सं) य१६ (७२) मानसायुर्वेद (म) य१५ (७३) भिषगिंद्रशचीप्रभा (सं)य१६ (७४) वैद्यवृंदावन (म)य१५

**प्रकरणग्रंथ** – (७५) स्वमतनिर्णयः(सं)य१६ (७६) संप्रदायकुसुममधु(सं) य१६ (७७) सग्निर्णयः(सं) य१ (७८) कांतकांतावाक्यपुष्पम् (सं)य२ (७९) चित्तोपदेश य२ (८०) सद्वैजयंती य२ (८१) बाराखडी य२ (८२) त्रिकांडसार य२ (८३) प्रमादकल्लोळ य१५

**गाथा** – (८४) अभंगांची गाथा य९ (८५) पदांची गाथा य९

**निबंध** – (८६) अलौकिक प्रवास य२ (८७) अमोघनिरूपण य२ (८८) बौद्ध निबंध य१५ (८९) वेदान्तनिरूपण य१५ (९०) सिद्धिसार य१५ (९१) अलौ. व्याख्यानमाला य५ (९२) युक्त्या य१७ (९३) गुरुचरणकौमुदी य१८ (९४) निरूपण य१७

**संवाद व वचनामृत** – (९५) साधुबोध य८ (९६) मणिमंजुषा य१२ (९७) सुवर्णकण य१७ (९८) स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार य६ (९९) दुर्महृदयभंजन य१५ (१००) प्रश्नोत्तरे य१५ (१०१) वृत्तिक्षीरसागर य१५ (१०२) बालबुद्धिविवर्धिनी य१७

**पत्रे, निबंध व समीक्षा (११८)** – (१०३) अकरा पत्रे य१ (१०४) वीस पत्रे य२ (१०५) अडतीस पत्रे य७ (१०६) सत्तेचाळीस पत्रे य१२ १०७. एकपत्र य१५

**लोकगीते, स्तोत्रे** – (१०८) स्त्रीगीते य४ (१०९) स्त्रगीतसंग्रह य४ (११०) तुंबडी य२ (१११) रुक्मिणी स्वयंवर य९ (११२) रुक्मिणीपत्रिका य९ (११३) मातृपितृभावनाष्टक य२ (११४) कृष्णपंचपदी य२ (११५) गुरुपंचपदी य२

**आत्मकथन व आख्याने** – (११६) आत्मचरित्र य१५ (११७)सूचना प्रकरण य१ (११८) सूचना प्रकरण य२ (११९) अभंग१९ आख्या. य९ (१२०). पदे ७ आख्याने य९ (१२१) पतिव्रताचरितामृत य१५

**विविधरचना** – (१२२) सुखपर्व (नाटक) य१५ (१२३) मात्रामृतपानम् (सं) य१६ (१२४) पत्नीप्रेमपराग य१५ (१२५) नवीनभाषा 'नावंग' य१६ (१२६). शब्दकोष य१५ (१२७) सांकेतिक लधुलिपी य १५ (१२८) मोक्षपट (क्रीडा) य१५ (१२९) हरिपाठ- प्रतिज्ञा य१५ (१३०) हरिपाठ-अर्थक्रम य१५ (१३१) मायर्स समीक्षा य१५ (१३२) शिक्षणरत्नाकर-नाही (१३३) ज्ञानबोध अभंग य९पू.

०००



**श्रीगुलाबरावमहाराजांच्या सूक्तिरत्नावली-यष्टीनुसार**

## मूल्यसूचि

(यष्टि १) रु ४०
(यष्टी २) पूर्वार्ध रु.४०
( ″ ) उत्तरार्ध रु.५०
(यष्टी ३) प्रियलीलामहोत्सव
आमंत्रण विलास रु.९०
(यष्टी ४) स्त्रीगीत संग्रह रु.४०
(यष्टी ५) अलौ.व्याख्या० रु.४०
(यष्टी ६)स्वमन्तव्यांश-
सिद्धान्त-तुषार (हिंदी) रु.२०
(यष्टी ७) ३८ पत्रे रु.३०
(यष्टी ८) साधुबोध रु.५०
(यष्टी ९) पूर्वार्ध रु.१००
अभंगांची गाथा
(″) उत्तरार्ध रु.१००
पदांची गाथा
(यष्टी १०) प्रेमनिकुंज रु.७५
(यष्टी ११)
संप्रदायसुरतरू रु.१६०

(यष्टी १२) पत्रे ४३ रु.५०
(यष्टी १३) रु.५०
सुखवरसुधा.
वेदान्तपदार्थोद्देशदीपिका
(यष्टी १४) रु.
(यष्टी १५) रु.
(यष्टी १६) संस्कृत भा.१.रु.२०
सूत्रग्रंथाः
( ″ ) संस्कृत भा.२ रु.५०

(यष्टी १७) रु.१००
समयोपदेश (सुबोध हिंदुधर्म)
(यष्टी १८) रु.
समयोपदेश (स्फुट निरूपणे)
(यष्टी १९) रु.२०
मनोहरिणी (हिंदी)
(यष्टी २०) रु.१२०
योगप्रभाव (गद्य)

'श्रीमहाराजांचे चरित्र' त्रिपुरवारकृत (मूळ अधिकृत) रु.१००
'माधुर्यमधुकोश' महाराजांच्या ग्रंथांतील विषयसूचि रु.३००

श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

## श्रीबाबाजीमहाराज पंडित

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल-घरदार-शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे, वगैरे लहान-मोठी सारी कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमान् साकारली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत तेही प्रमुख होते. त्यांनी महाराजांची, कांहीहि अपेक्षा न ठेवतां सेवा केली. त्यांनी महाराजांना कधीही कांही देखील मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले -

''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं ! शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन अमोघ आशीर्वाद पंडितांना दिला -

''अरे पंडित, आजवर मी तुला कांही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला ते समजतील !''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं. अन् पंडितांचं सारं जीवन उजळून गेलं.

''सोनियाचा दिवस आजि अमृतें पाहिला''

त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित केलीत. अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांतून श्रीमहाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली.

दृष्ट लागावं असं गुलाबाचं अक्षरशिल्प मुद्रांकित झालं.
आणि अखिल मानवी संस्कृतीला
सत्त्वसंपन्नतेची दृष्टी देणारं विचार-वैभव लाभलं !

*